यादवकालीन मराठी भाषा

[भाषाशास्त्रीय अभ्यास]

लेखक
डॉ. शं. गो. तुळपुळे
एम्. ए., पीएच्. डी.

Introduction by
Dr. S. M. Katre
M. A., Ph. D. (Lon.)

केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ-सदन
गिरगांव, मुंबई
प्रज्वलितो ज्ञानमय प्रदीपः

दक्र. ९५८

यादवकालीन मराठी भाषा

[भाषाशास्त्रीय अभ्यास]

लेखक

डॉ० शं० गो० तुळपुळे, एम्. ए., पीएच्. डी.

मराठीचे प्राध्यापक, डी. ए. व्ही. कॉलेज, सोलापूर

INTRODUCTION

Dr. S. M. KATRE, M. A., Ph. D. (London)

Professor of Indo-European Philology,

Deccan College Research Institute, Poona

केशव भिकाजी ढवळे श्रीसमर्थ-सदन गिरगांव, मुंबई

मूल्य चार रुपये

प्रथमावृत्ति : १९४२

सर्वाधिकार सुरक्षित

मुद्रक–दिनकर केशव पारकर, न्यू जॅक् प्रिंटिंग वर्क्स, फोर्ट, मुंबई
प्रकाशक–केशव भिकाजी ढवळे, श्रीसमर्थ-सदन, गिरगांव, मुंबई

INTRODUCTION

BY

Dr. S. M. KATRE, M.A., Ph.D. (Lond.),

Professor of Indo-European Philology,

Deccan College Research Institute, Poona.

INTRODUCTION

When my friend DR. S. G. TULPULE invited me to contribute a short introduction to his work on the Marāṭhī Language of the Yādava period, I gladly acceded to his request for two reasons. In the first place I have known him for a number of years as a diligent and serious student of Indian linguistics, particularly interested in Marāṭhī, carrying on his work despite the many handicaps for such studies in this province which, though the first in India to recognize the value of linguistics by founding the Wilson Philological Lectureship in the Bombay University in 1877, nevertheless has not encouraged the cultivation of this science by including it in the curriculum of studies connected with the Arts Courses in languages. Naturally the result of this absence of scientific training as well as centres for the spreading of its methods will be found in a large number of Marāṭhī publications styled as linguistic studies which have appeared during the last two decades or so. Even the present work is not altogether free from the influence of these honest but pioneer efforts in the field of Indian linguistics. But the facts that the author has honestly collected original material of a definite period and tried to interpret it as scientifically as he could under the circumstances mentioned above, qualify his book to be considered as the first serious and scientific attempt in Marāṭhī in the domain of Marāṭhī linguistics. When it is remembered that the most important contributions to Indian linguistics appeared in Germany and France, and that they were all in languages which are ordinarily beyond the scope of our Arts graduates in India, whatever shortcomings one finds in works of this type can easily be understood and the difficulties involved properly appreciated.

The era of scientific linguistics in the modern Indian field may be said to begin with the publication of Prof. Jules

Bloch's *Formation de la langue marathe* which, actually printed in 1914 just before the beginning of the last Great War, appeared only in 1919. Since then a number of scholars, both European and Indian, have undertaken serious researches in the modern Indo-Aryan languages and published the results of their investigations in the shape of books, monographs and articles in various learned journals in the world. Marāṭhī thus holds a unique place in the revival of scientific linguistics applied to the modern phase of Indo-Aryan by initiating brilliantly a new era of scientific research. The chief honour in India goes to Prof. Suniti Kumar Chatterji for his monumental work on the *Origin and Development of Bengali* published in 1926. Here we find the culmination of the first phase of scientific research where a scholar 'born to the language' analyzes it with the perfect mastery of both the Eastern and Western approaches to linguistic studies. If the study of linguistics has made any progress in India it is chiefly due to this brilliant Indian contribution written in English where, in addition to the usual departments of linguistics, Phonetics was included as part and parcel of a linguist's equipment. Being easily accessible in a language known to all Indian Arts graduates it has given a model for others to follow, and it is no exaggeration to state that it has also supplied all the necessary material for equipping Indian students for scientific work in linguistics.

But both these works cover the entire history of the two languages from their first appearance up to the present century and treat this development not in point of the space-time context involved of each significant change, but in its ensemble. Moreover, as a large amount of pre-Marāṭhī material was not available, Bloch's treatment suffers to that extent, but he has made up for this omission in his subsequent work dealing panoramically with the development of Indo-Aryan from the Vedic period up to the present day, published in 1934. But

this work again is in French and therefore not easily accessible to Indian scholars, and although we have now a Marāṭhī translation of BLOCH's earlier work by Prof. V. G. PARANJPYE, the dearth of good books in Indian languages, whether translations or original treatises, has seriously interfered with the development of linguistic studies. It is therefore a matter of good fortune that Prof. CHATTERJI has brought out this year his lectures delivered during 1940 under the auspices of the Post-graduate department of the Gujarat Vernacular Society of Ahmedabad in book form under the title *Indo-Aryan and Hindi*, wherein much of what BLOCH has written has been incorporated and made attractive by his own penetrating insight.

Although the major work of modern Indian linguistics is appearing in the English language, attempts have not been wanting to present the latest results of research in the modern literary media. I believe Bengal has led India in this field as in many others, and several good publications dealing with dialectology in the modern scientific spirit have appeared in Bengali. Marāṭhī has not lagged behind in such attempts, and the many contributions appearing in the local journals have added considerably to dialect materials. But whereas Bengali linguistics got its inspiration from a scholar trained in the modern scientific methods, who laid solid foundation for further developments, the only scientific work available on Marāṭhī linguistics, written in French, has for long remained in the background, and neglected even by scholars who have primarily to deal with Marāṭhī linguistics. Its appearance in translation, rather late in the day, has not altered this sad state of affairs; perhaps it is as yet too early to measure its possible influence on future studies. And the prevalence of loose methods applied by earlier scholars still retains its hold on modern discussions, and the imposition of a Pāṇinian structure on modern Indo-Aryan linguistics is still engaging the attention of scholars on this side.

One important reason for this superstructure of Pāṇinian scheme built about the modern IA. vernaculars and dialects is the absence of a linguistic approach to the Prakrits and Apabhraṁśa, which are but historical stages through which Old Indo-Aryan passed and assumed its modern garb. The study of Prakrits became in the middle ages an appendage to Sanskrit Grammar so that from the time of Vararuci, Caṇḍa, Hemacandra and others, Prakrits were merely considered as coming within the general scheme of Sanskrit Grammar. In fact the synthetic system had not so far broken as to make for the inapplicability of the old superstructure to be imposed on these Middle Indo-Aryan languages. The comparative method which could have been developed by these ancient grammarians became a still-born child, and until the Europeans 'discovered' Sanskrit and all its implications for Comparative Grammar or Linguistics, the old methods continued and still continue to clog the studies of the modern languages.

Without entering into details of this new scheme it is sufficient to mention here that with the proper development of the comparative grammar of Indo-Aryan, it was possible to trace with a good deal of accuracy the transformation of Old into Middle, and Middle into New Indo-Aryan, in phonology as well as in morphology; side by side with these branches, much work has also been done with respect to Semantics and Syntax, while the study of vocabulary has received considerable impetus, firstly from the late Sir GEORGE A. GRIERSON'S *Linguistic Survey of India*, and secondly from Prof. TURNER'S *Nepali-English Dictionary* in which the comparative etymology of Indo-Aryan as affecting about 5,000 vocables has been given, as an earnest of his major work which is to complete the *Linguistic Survey of India*. But all these great works, though confining themselves to general development, have not been in a position to study the history of any given language in its development in the space-time context. In several places I

have indicated the importance of this new concept to the development of Indian linguistics, and this is not the place to dwell upon it. Grierson has already remarked in his preface to *Origin and Development of Bengali* that the edifice of the comparative grammar of Indo-Aryan is to be built up by two series of studies: (a) the individual history of each language belonging to this family and (b) the comparative study of minor groups within the family. The first subdivision includes naturally the study of dialects as well, but the space-time factor has not been stressed to the desired extent. The provenance of linguistic facts in this context indicates exactly the direction of linguistic change and enables us to fix within certain narrow limits the manner of this change. Facts will then come to light which will help up to evaluate the rate of change within a given space-context, or the types of changes current within this context at a given moment.

From this new angle it is necessary that each language must be studied in all its details within a given geographical locality in its time-sequence or within a particular period in its space-context. And in each case the comparative method of linguistics should be applied for the elucidation of linguistic development. Thus on the one hand we note the relationship broad-based on the concept of Old, Middle and New Indo-Aryan in its space-time development from this comparative stand-point. This is the foundation of Historical Linguistics which applies the methods developed by comparative linguistics to the History of a language in its space-time growth.

Turning to the question of Marāṭhī the general development of this language has been delineated with great clearness and mastery by Bloch in his first great work; but the attitude here is that of comparative grammar, comparing Sanskrit, Prakrits and Marāṭhī, one with the other, and positing phonological and morphological equivalence; but no attempt is made to trace the growth of Marāṭhī itself from its earliest appear-

ance to our own days, through forms documented in the language. Moreover no attempt has so far been possible to trace this development in the space-time context. Many of the early texts are not even available in reliable editions, and much of the material is of no use unless preliminary critical work is done in editing the texts. And it is of this preliminary work that I must speak here. For Marāṭhī literature has a respectable but not too great an antiquity to prevent us from applying the critical methods developed by the textual critics of Europe in restoring ancient texts to their original forms, despite the fact that the rate of deterioration has been somewhat of a surprising nature, as witnessed by the fact that the original *Jñāneśvarī* composed in A.D. 1290 became very corrupt within three hundred years, necessitating a revision by Ekanāth in A D. 1584. Fortunately, however, the vast literature of the Mahānubhāv sect, preserved in several code alphabets, representing the older phase of Marāṭhī, is now being deciphered and presented to the scholarly world. Although this represents only a sectarian literature, we have still in it a large number of vocables and linguistic factors which can yield valuable results when critically examined and brought within the range of competent linguists. The critical editing of texts so far as Marāṭhī is concerned is of but recent date, and much remains to be done yet. But without a preliminary knowledge of the actual development of Marāṭhī at this stage, the textual critic will not be in a position to restore the text to its original form in such cases where the textual tradition demands a conjectural emendation or where the balance of probability is equal as between two given variant readings, and for which there exists no previous experience to guide him. It is particularly from this point of view that Dr. TULPULE's study is welcome, though by no means it can be considered as final. It is but the beginning of a scientific work which remains to be done in the entire field of Marāṭhī Philology.

The author has confined his attention to the first period of Marāṭhī development, between A.D. 1100 and 1350 when it flourished under the great Yādava dynasty. As will be seen from his introductory part, he has utilized 19 inscriptions and copper-plates ranging between A.D. 689 and 1367 as representing the engravers' art in the recording of linguistic data. The actual texts other than inscriptions and copper-plates which he has utilized belong to the 13th century with the single exception of Śrīpati's Marāṭhī *Jyotiṣaratnamālā* which is attributed to belong to *c.* 1100. A few extracts from several ancient works belonging to the 13th century have also been utilized for this work, and it will be seen from the list that Dr. TULPULE has collected the material for his critical study from all the available sources. Two ways were open to the author to study his material : (a) he could have made a study of one great work of this period, such as the *Jñānes'varī*, in detail, and compared these results with suitable examples collected from this wider literature; or (b) he could have attempted a comparative study of selected material from this entire literature and built up a general theory. And in view of the obvious advantage of the second alternative, he has attempted to survey the linguistic facts covering a period of two centuries leaving aside the incidental references to earlier or later examples. It must not be lost sight of that in all these discussions the absence of critical editions of these early works is a great handicap for the ordinary linguist, and that when such editions become ultimately available, we may have to revise many of the conclusions arrived at on the basis of uncritical editions.

The question of the pre-Marāṭhī period has not failed to draw the attention of Dr. TULPULE ; this was one of the drawbacks in BLOCH's work on Marāṭhī, and recent writers on this subject have made much of the Apabhraṁśa material since published. It is true, no doubt, that with the analysis of Apabhraṁśa we shall have sufficient material for evaluating the

pre-New Indo-Aryan period from a linguistic point of view. But I have all along pointed out that like the Prakrit literature even this Apabhraṁśa literature is in a form which has become stylised and separated from the common currents of linguistic expression. In other words the Apabhraṁśa that we find in literature is as artificial as the literary Prakrits or classical Sanskrit and divorced, perhaps in a lesser degree so far as sentiment is concerned, but certainly to the same extent as far as linguistics is concerned, from the common expression of the man in the street. This is, however, not the case with the early New Indo-Aryan literature, and here we find for the first time the actually current *s'iṣṭa* expression of New Indo-Aryan. None has satisfactorily explained, for instance, the absence of Sanskrit loan-words from literary Prakrit or Apabhraṁśa; for, in the view of the earlier Western linguists the so-called 'Gāthā' dialect was merely a mixture of Middle Indo-Aryan and Sanskrit, or as sometimes they expressed it, a mixture of incorrect and correct Sanskrit. It has taken more than one generation to realize that for actual current speech forms we have no claims on literary Prakrits, Sanskrit or even Apabhraṁśa, and that it is only in some survivals to be seen in the Epic variants, Purāṇas, Buddhist and Jain Sanskrit, that we get glimpses of the true state of affairs in medieval India. Precisely from this point of view the study of Buddhist, Jain and Epic Sanskrit as part and parcel of Middle Indo-Aryan, is as essential for a correct appreciation of linguistic forms as for the current state of affairs. And our experience either with the *Jñānes'varī* or with the Mahānubhāv masterpieces does not belie this conclusion. I cannot deny the value of Apabhraṁśa studies as reflecting the linguistic usages current during the pre-New Indo-Aryan stage, but their importance should not be exaggerated for the simple reason that so far no regional evolution of Apabhraṁśa has been minutely studied in its time sequence, and the medium, like Sanskrit, became a vehicle for

archaic expression when the living medium was something other than itself. Marāṭhī, with its inherited forms, does not scorn the use of Sanskrit vocables, and the model found in its literary remains is true of the picture we can build of the speakers of that medium. And it is because of this free mixture of the inherited vocabulary and the learned borrowings from Sanskrit that the history of the language still continues uninterrupted. If this had not been the case, Marāṭhī would have become as 'dead' a language as Prakrits or Apabhraṁśa or even the refined Sanskrit. And this refined Sanskrit today lives more truly in the mouth of the ordinary man in the street than in the Pandit's, because it has become a vital part of his own literary or even social needs, and not merely confined to the study of a past literature.

Until a comparative study of Middle Indo-Aryan consisting of the great religious Prakrits like Pālī and Ardhamāgadhī, Epic, Buddhist and Jain Sanskrit, the literary Prakrits like Māhārāṣṭrī or Apabhraṁśa, the Inscriptional Prakrits such as those found in Aśoka's inscriptions, and of extra-Indian Prakrits found in documents like the Prakrit Dhammapada or the fragments discovered in Niya near Khotan, appears, it is not possible to have a correct picture of the development of Indo-Aryan from its Middle to its New phase. But this should not prevent pioneering studies being undertaken in early New Indo-Aryan, for as suggested by GRIERSON, this double development should be simultaneous. Dr. TULPULE has therefore done the right thing in undertaking the present work in spite of the scholarly handicaps mentioned above, and trying to build up a firm edifice for the development of Old Marāṭhī.

One of the cardinal principles in this new science is the consistent applicability of the generalisations made from the selected examples illustrating the particular generalisation. The strength of BLOCH's contribution, in spite of his not taking account of Apabhraṁśa, or even the stages of development

within Marāṭhī itself, lies in this universal application. There is a sureness of touch, a certainty in the generalisations, which make his work a unique contribution to Indian linguistics. Judged from this angle many contributions in India fail to reach a high mark. The generalisations are forgotten when dealing with individual linguistic forms, and apparent likenesses wean a linguistic aspirant from possible generalisations. Dr. TULPULE has tried to get over this difficulty in the main part of his work, but the fact that there are no standard books dealing with linguistic theories in English or Marāṭhī and that the all too-frequently prevailing incorrect methods are employed by the adherent of the earlier school of Marāṭhī linguisticians, has not failed to leave its mark sometimes in the present work. But as far as possible he has tried to rise superior to these methods, and it is this fact which has attracted my notice to his contribution. To illustrate this fact I have only to refer to p. 27, where he gives the correspondence Sk. *malina*-> Pk. Ap. *maïla*->M. *maïl*. Now it has been clearly demonstrated by earlier scholars and accepted by Dr. TULPULE himself that Sk.-*n*->Pk. A.-*ṇ*-, Mar.-*ṇ*-[1], and we are should really have a correspondence like Sk. *malina*->Pk. *maliṇa*->M. *maḷiṇ*. Thus two factors have been inadvertently omitted from consideration in positing this correspondence, namely that of intervocalic Sk.-*n*-and-*l*-with Pk. Ap. M.-*ṇ*- and M.-*ḷ*- respectively; even Pk.-*l*-becomes -*ḷ*- in Marāṭhī, and in effect Pk. Ap. *maïla*-cannot be considered as the *ur*-form of Old Mar. *maïl*. The modern science of linguistics would at once pose as the origin of Mar. *maïl* and Pk. *maïla*-a MIA. **maïlla*-derived ultimately from OIA. **mṛd-illa*-'soiled, muddy'. Pk. *maïla*-will not then correspond to OIA. **mṛd*-

[1] The exceptional cases Sk.-*āṇi*> Pk.*āïṁ*, or Sk. *āṇāṁ*> Ap. Mar.-*ā*, is for the present outside the pale of our discussion, since the postulation of this correspondence itself is linguistically speaking not beyond question.

ila- while Mar. *mail* will correspond to a Pk. *maïlla-*, and it is this apparent correspondence between Sk. *mala-*, *malina-*[2] with the Pk. and Mar. words which has diverted the attention of the author from the pure linguistic aspect involved in these forms.

Similarly there is a simplicity in linguistic generalisation which does not require detailed arguments. For instance let us consider the question whether Old Marāṭhī distinguished the two lateral sounds *l* and *ḷ*. With the exception of the Paiśācī Prakrit the others retain only *l*, while the Manuscript tradition diverges as between the Southern and Northern Mss. Confining our attention only to this question, we notice that Pk. *-ll-* corresponds to modern Mar. *-l-*, while Pk. *-l-* corresponds to modern Mar. *-ḷ-*. If we now agree in the first instance that the first remained *-ll-* in the old Mar. stage, there is no need for any discussion and we can pose the introduction of *-ḷ-* to the medieval or modern stage: or modern stage: on the other hand if Pk. *-ll-* had simplified itself, as it did, in the old stage of Mar. before the introduction of *ḷ*, then there would be no difference between this *-l-* from Pk. *-ll-* and the *-l-* from Pk. *-l-* and the two would converge; if the process of cerebralisation then affected an intervocalic *-l-*, then it is not possible to explain the modern correspondence of Pk. *-ll-* : M. *-l-*, Pk. *-l-*: M. *-ḷ-*, so that we are at once led to the conclusion that Old Mar. distinguished these two series, even if the Manuscript tradition does not help us to fix it or even contradicts it at places. Dr. TULPULE's discussion on pp. 32-4 is from this point of view polemical.

I have indicated the above facts not with a desire to give a critique of the present work, although I know that Dr. TULPULE would personally welcome such constructive sugges-

[2] Even TURNER in his *Nepali Dictionary*, is misled by this apparent similarily in positing a **malila-* <*malám*.

tions; I leave it to the intelligent reader and the critics outside actually to judge both the good points and the weaknesses of Dr. TULPULE's work; he himself would welcome such suggestions from competent scholars, but I am convinced that this first contribution of his to serious linguistics in the modern connotation of the term is a promise of deeper work worthy of initiating a new era in Marāṭhī linguistics.

It appears to me that this work fulfils two crying needs in Marāṭhī linguistics. By the side of Prof. PARANJPYE's translation of BLOCH's *La langue marathe*, it will give the general resumé of development within the Old Marāṭhī stage, summarising wherever possible the results of previous researches in the field and giving succinctly all the prevailing views on several moot points. By specifying the particular problems for which no satisfactory answers are yet available it opens out a new vista of research, which is really a *sine qua non* of good scientific work. Moreover, by following the accepted methods of linguistic treatment, it supplies a model on the basis of which further work can be done by other scholars in Maharashtra.

Originally it was my intention to utilize the facts analysed by Dr. TULPULE and indicate both the modern methods of scientific linguistics as well as the results which could be arrived at by the strict application of these methods, for it was the author's express desire, since he himself as a student of the subject, working on it as a thesis for the Ph.D. degree of the Bombay University, had felt the lack of proper guidance in these methods, and the necessary literature which could direct his own efforts in the accepted tradition worked out by the masters of this science in the West. But the fact that I desist from doing so is at once a little tribute to this short but first attempt of a scholar from whom still greater things may be expected in the days to come, and an indication of my desire to reserve the complete development of the subject in my own

Historical Grammar of Marāṭhī on which I have been engaged for some time by the side of my other major activities. Such contributions as the present one are the foundations on which my own edifice will be built and I can, with all my heart, congratulate Dr. TULPULE on his sound beginning and signal entry into the field of Marāṭhī linguistics. I feel that this work will give stimulus to those who, for one reason or another, are unable to follow the development of Indian linguistics in other languages than their own, and enable them to do similar work in allied fields. I commend this work to the notice of competent scholars in the strong hope that they will pursue it with care and convey their objective and constructive observations to the author who is once again engaged in furthering his acquaintance with Marāṭhī linguistics.

S. M. KATRE

Poona, 19th August, 1942

निवेदन

प्रस्तुत ग्रंथ अभ्यासकांचे स्वाधीन करण्यांत मला अतिशय आनंद होत आहे. इ० स० १९४० सालीं "यादवकालीन मराठीचा भाषाशास्त्रीय अभ्यास" या विषयावर डॉक्टोरेटच्या परीक्षेकरितां एक संशोधनात्मक प्रबंध मीं लिहिला, व त्यास मुंबई विद्यापीठानें मान्यताहि दिली. तोच प्रबंध, त्यांतील कांहीं न्यूनाधिक सरतेंपुरतें करून, आज प्रसिद्ध करीत आहें.

इतर अनेक शास्त्रांप्रमाणें भाषाशास्त्रहि आज नवें रूप धारण करीत असून, ऐतिहासिक, पृथक्करणात्मक, शास्त्रीय पद्धति अभ्यासकांत रूढ होत आहे. निराधार विधानें, अवास्तव कल्पना, नसता अभिनिवेश यांना आजच्या शास्त्रयुगांत मान नाहीं. सुप्रसिद्ध जर्मन पंडित प्रो० वाकरनागल आणि फ्रेंच पंडित प्रो० सिल्हां लेव्ही व प्रो० झुल् ब्लोक यांनीं ही शास्त्रीय पद्धति सर्वत्र रूढ केली आहे. तिला अनुसरूनच प्रस्तुत ग्रंथांत यादवकालीन मराठीचें स्वरूप आणि परंपरा अजमाविण्याचा मीं प्रयत्न केला आहे. मराठीचा इतिहास व परंपरा शोधणें असल्यास केवळ संस्कृत-प्राकृतावर विसंबून भागणार नाहीं ही गोष्ट पंडितांच्या ध्यानीं येऊं लागली आहे. मराठी शब्दरूपांचें निर्वचन करण्यास तत्पूर्वीचें वाङ्मय तपासलें पाहिजे ही जाणीव होत असून मीं त्याच दिशेनें कांहीं यत्न केला आहे. अमरावतीचे प्रो० हिरालाल जैन यांनीं अलीकडे प्रसिद्ध केलेल्या अपभ्रंश-ग्रंथांमुळेंच हें काम शक्य झालें.

प्रस्तुत विषयाचा अभ्यास मीं साहित्याचार्य श्री० न० चिं० केळकर यांच्या मार्मिक दिग्दर्शनाखालीं केला. त्यांची, तसेंच अमरावतीचे प्रो० वि० भि० कोलते, नागपूरचे श्री० ह० ना० नेने आणि पुण्याचे संशोधक श्री० ग० ह० खरे या सर्व विद्वानांची बहुमोल मदत मला लाभली. वाडिया कॉलेजचे डॉ० प० ल० वैद्य व डेक्कन कॉलेजचे डॉ० सु० मं० कात्रे यांच्या संशोधनाचा लाभ वारंवार घडला. डॉ० कात्रे यांनीं ग्रंथास प्रस्तावना लिहून मला उपकृत केलें. ही प्रस्तावना त्यांच्या इच्छेनुसार व इतर भाषिकांच्या लाभार्थ इंग्रजींत छापली आहे. पुण्याचे डॉ० वा० गो० परांजपे यांनीं आपण करीत असलेल्या झुल् ब्लोक् यांच्या ग्रंथाचें भाषांतर तें प्रसिद्ध होण्यापूर्वींच मला उदारपणें उपलब्ध करून दिलें. वाडिया कॉलेजचे प्रि० वि० के० जोग व प्रो० श्री० भि० बोंडाळे यांनीं 'बोंडाळे पारितोषिक' देऊन मला या कामीं प्रोत्साहन दिलें. वरील सर्व विद्वानांचे मी मनःपूर्वक आभार मानतों.

शेवटीं, प्रस्तुत ग्रंथाच्या प्रकाशनार्थ भरपूर आर्थिक साहाय्य केल्याबद्दल मी मुंबई विद्यापीठाचा आभारी आहें.

डी० ए० व्ही० कॉलेज, सोलापूर.
ता. २० ऑगस्ट, १९४२

शं. गो. तुळपुळे

अनुक्रमणिका

यादवकालांतील आधारभूत साहित्य

(अ) ग्रांथिक......

संक्षेप

(लीळा०) १ लीळाचरित्र (इ० स० १२६० सुमारें) भाग १ ते ४ संपा०–ह० ना० नेने, नागपूर

(दृ०) २ दृष्टांतपाठ (इ० स० १२७०) संपा०– नेने-भवाळकर, नागपूर

(शि०) ३ शिशुपालवध (इ० स० १२७३) संपा०–वि० ल० भावे, ठाणें

(उ०) ४ उद्धवगीता (इ० स० १२७५) संपा०–वि० भि० कोलते, अमरावती

(वच्छ०) ५ वच्छहरण (इ० स० १२७८) संपा० – द० सी० पंगु, कोल्हापूर

(सि० सू०) ६ चक्रधरासिद्धान्तसूत्रें (इ० स० १२८०) संपा० – नेने–भवाळकर, नागपूर

(ध०) ७ धवळे (महदंबाकृत) (इ० स० १२८०) संपा० – वा० ना० देशपांडे, यवतमाळ

(पं०) ८ पंचतंत्र (इ० सं० १२८० सुमारें) संपा० – वि० ल० भावे, ठाणें.

(" महाराष्ट्र–कवि " मासिक, वर्ष २)

(गद्य०) ९ गद्यराज–हयग्रीवाचार्य (इ० स० १२९०) संपा० – ह० ना० नेने,

(भा० इ० सं० मं० त्रैमासिक, वर्ष १८)

(ज्ञा०) १० श्रीज्ञानेश्वरी (इ० स० १२९०) संपा–वि० का० राजवाडे, धुळें

(सू०) ११ सूत्रपाठ (काल अनिश्चित) संपा० – ह० ना० नेने, नागपूर

(उषा०) १२ उषाहरण (इ० स० १३५० सुमारें) संपा० – वि० का० राजवाडे (भारत इ० सं० मं० वार्षिक १९११)

(ऋ०) १३ ऋद्धिपूरवर्णन (इ० सं० १३६३) संपा० – य० खु० देशपांडे, यवतमाळ

(स्मृ०) १४ स्मृतिस्थळ (१३ वें शतक) संपा०–वा० ना० देशपांडे, यवतमाळ

(आ) शिलालेख-ताम्रपट......

यादवकालांतील सर्व मराठी शिलालेख व ताम्रपट यांची समग्र यादी प्रस्तावनेच्या आरंभीं दिली आहे.

संदर्भ ग्रंथ

(टीप : महत्त्वाच्या व वारंवार उल्लेखिल्या जाणाऱ्या साहित्याचीच तेवढी यादी पुढें देतों. प्रस्तुत विषयावरील यच्चयावत् बऱ्यावाईट ग्रंथांची यादी देण्याचें कारण नाहीं.)

(अ) व्याकरणें—

१ ज्ञानेश्वरींतील मराठी भाषेचें व्याकरण–वि० का० राजवाडे, धुळें १९०९

२ शास्त्रीय मराठी व्याकरण–मो० के० दामले, १९२५

३ मराठी व्याकरणावरील निबंध–कृष्णशास्त्री चिपळूणकर

४ मराठी भाषेचें नवीन व्याकरण–कृष्णशास्त्री गोडबोले, १८९५

५ पंचवार्तिक (भीष्माचार्यकृत) : महानुभाव मराठी व्याकरण, संपा०–मो० स० मोने, १९२७

६ प्राकृतप्रकाश : वररुचि. संपादक – डॉ० प० ल० वैद्य

७ प्राकृतव्याकरणम् : हेमचंद्र. संपादक – डॉ० प० ल० वैद्य

८ A Comparative Grammar of Modern Aryan Languages – John Beames, 1872

९ A Grammar of Gaudian Languages – Rudolf Hoernle, 1880

१० La Formation de la langue Marathe – Jules Bloch, 1920 (Translated into Marathi by Prof. V. G. Paranjpe, Poona.)

११ Grammar of Jnyanesvari – W. Doderet (B. S. O. S. London, Vol. IV)

१२ Sanskrit Grammar Series – Max Muller

१३ A Comparative Grammar of Dravidian Languages – Dr. R. Caldwell, 1875

१४ A Manual of Ardhamagadhi Grammar, Dr. P. L. Vaidya, 1933

१५ Grammatik der Prakritsprachen
१६ Altindische Grammatic – J. Wackernagal.
१७ Introduction to Prakrit – Woolner

(आ) शब्दकोश —

१ महाराष्ट्र शब्दकोश. संपा०–य० रा० दाते, १९३८
२ राजवाडे मराठी धातुकोश. संपा०–कृ० पां० कुळकर्णी, १९३८
३ Sanskrit–English Dictionary–V. S. Apte, 1890
४ Kannad–English Dictionary–Rev. Kittel, 1894
५ A Comparative Etymological Dictionary of Nepali–Prof. R. L. Turner, 1931
६ Hemchandra's Desi–Nama–Mala : Pischel and Buhler, 1880
७ Bihari Dictionary : Hoernle–Grierson.
८ Pali Dictionary–Childer.
९ Malyalam–English Dictionary, 1872

(इ) अपभ्रंश-ग्रंथ —

१ णायकुमारचरिउ (पुष्पदंतकृत)–संपा० प्रो० हिरालाल जैन १९३३
२ सावयधम्मदोहा (देवसेनकृत)–संपा० प्रो० हिरालाल जैन १९३२
३ भविसयत्तकहा (धनपालकृत)–संपा० डॉ० गुणे–दलाल
४ भावनासंधिप्रकरण (जयदेव मुनिकृत)–संपा० मोदी. (भांडारकर ओरि० इन्स्टिटयूटचें वार्षिक, व्हॉ० ११)

(ई) इंडो-आर्यन भाषा —

१ The Wilson Philological Lectures–
(a) Dr. R. G. Bhandarkar
(b) Prof. N. B. Divatia
२ Dr. Grierson : Linguistic Survey of India, Vol. 7,9

३ Dr P. D. Gune : Comparative Philology, 1918
४ Jules Bloch : L' indo aryen, 1934
५ Dr. S. K. Chatterji : Origin and Development of Bengali Language, 1926
६ Banarasi Das Jain : Phonology of Punjabi 1934
७ Dr. S. M. Katre : Formation of Konkani (Bhandarkar O. R. Instt. Annual, Vol. 18–20)
८ Memoires de la Society de Linguistique de Paris
९ Max Muller–Lectures on The Science of Language
१० Prof. Sten Konow : Maharastri and Marathi. (Indian Antiquary, Vol. 32)
११ प्रो० कृ० पां० कुळकर्णी : मराठी भाषा, उद्गम–विकास, १९३३

(उ) सर्वसाधारण—

१ वि० का० राजवाडे – ज्ञानेश्वरीची प्रस्तावना, धुळें, १९०९
२ वि० का० राजवाडे – राधामाधवविलासचंपू, प्रस्तावना
३ वि० का० राजवाडे – सुबन्त आणि तिङन्तविचार (लेखसंग्रह, भाग २)
४ चिं० वि० वैद्य – निबंध आणि भाषणें, १९२७
५ कें० आ० पाध्ये – हेमाद्रि पंडित
६ ग० ह० खरे – दक्षिणच्या मध्ययुगीन इतिहासाचीं साधनें, भाग १–२
७ ग० ह० खरे – श्रीविठ्ठल आणि पंढरपूर
८ श्री ज्ञानेश्वरदर्शन, भाग १ (संपादक, वाङ्मयोपासक मंडळ, नगर)
९ वि० ल० भावे – महाराष्ट्र सारस्वत, भाग १
१० राजारामशास्त्री भागवत – प्राकृत भाषची विचिकित्सा.
११ महाराष्ट्र–शब्दकोश, प्रस्तावना, भाग १ ते ७ (संपादक–य० रा० दाते)

१२ बा० अ० भिडे – मराठी भाषेचा इतिहास (मानभाव अखेर)
१३ Otto Jesperson : Language, 1928
१४ Dr. R. G. Bhandarkar : History of the Deccan
१५ M. Briel : Semantics (Translated into English by Mrs. Cust, London, 1900)
१६ Whitney : Origin and Growth of Language.
१७ Vendryes : Lanauage.
१८ Barnett : Antiquities of India
१९ Studies in Dravidian Philology – Ramkrishnaiah, 1935
२० History of Kannad Language, R. Narsinhacharya, 1934

(ऊ) नियतकालिकें —

१ भारत-इतिहाससंशोधक मंडळ, पुणें. (त्रैमासिकें, वार्षिकें व संमेलनवृत्तें)
२ महाराष्ट्र-साहित्यपत्रिका, पुणें.
३ विविधज्ञानविस्तार, मुंबई
४ संशोधक (राजवाडे-संशोधनमंदिर, धुळें)
५ Journal of the Royal Asiatic Society, London & Bombay
६ Epigraphia Indica
७ Epigraphia Carnatica.
८ Indian Antiquary
९ Annals of the Bhandarkar Oriental Research Institute, Poona
१० Reports of the Oriental Conferences, No. 1, 2, 4, 7.
११ Bulletin of the School of Oriental Studies, London.

१२ New Indian Antiquary (Ed. S. M. Katre) Vol. 1–2
१३ Journal of the American Oriental Studies, Vol. 3
१४ Bulletin of the Deccan College Research Institute, Vol. 1 (1940)

(टीप : इतर किरकोळ संदर्भांचा उल्लेख त्या त्या ठिकाणीं केला आहे.)

प्रस्तुत प्रबंधांतील परिभाषा

(टीप : भाषाशास्त्रावर मराठींत फारसे ग्रंथ नसल्यानें या विषयावर मराठींत लिहिणाराला बरेच पारिभाषिक शब्द बनवावे लागतात. प्रो० कृ० पां० कुळकर्णी यांच्या " मराठी भाषे " वरील ग्रंथानें ही अडचण पुष्कळच दूर केली आहे. तरीहि कांहीं परिभाषा विवाद्य राहतेच. म्हणून प्रस्तुत प्रबंधांत वापरलेले मराठींतील पारिभाषिक शब्द आरंभींच पुढें देतों.)

वर्णप्रक्रिया, उच्चारप्रक्रिया	=	Phonology
प्रत्ययप्रक्रिया	=	Morphology
स्वरांतर्गत	=	Inter-vocalic
उपांत्य	=	Penultimate
उपांत्यपूर्व	=	Prepenultimate
दंत्यतालव्य	=	Dento-palatal or Palato-alveolar
व्यत्यास	=	Metathesis
स्वरभक्ति	=	Anaptyxis
स्वरलोप	=	Syncope
स्थाननियत उच्चारप्रक्रिया	=	Conditional Phonetic change.
साम्याभास	=	False Analogy
स्वरागम	=	Prothesis
ओष्ठ्यीकरण	=	Law of Labialisation
तालव्यीकरण	=	Law of Palatalisation
संयुक्त स्वर	=	Dipthongs
प्रत्ययी	=	Synthetical
सामासिक	=	Analytical
शब्दयोगीसाधित विभक्ति	=	Postpositional declension.
सामान्य रूप	=	Oblique base
शब्दसाधित अनेकवचन	=	Pleonastic Plural
आख्यातविभक्ति	=	Conjugation of verbs

प्रातिपदिक	=	Base
वर्तमाने लट्	=	Present
आज्ञार्थे लोट्	=	Imperative
भूते लङ्	=	Imperfect
भूते लुङ्	=	Aorist
भूते लिट्	=	Perfect
हेतुहेतुमद्भावे लृङ्	=	Conditional
विधिलिङ्	=	Optative
भविष्ये लुट्	=	Periphrastic Future
भविष्ये लृट्	=	Second Future
कृदन्त	=	Participle
निपात	=	Adverb
संयुक्त क्रियापदें	=	Compound verbs
सहाय क्रियापदें	=	Ancillary verbs
शब्दसिद्धि	=	Word-formation
द्विरुक्त शब्द	=	Reduplicatives
सादशब्द	=	Echo-words
ध्वन्यनुकारी शब्द	=	Onomatopoeic words
वाक्प्रचार	=	Idiom
सामासिक शब्द	=	Polyglottic words

दक्र ९५८.

यादवकालीन मराठी भाषा

[भाषाशास्त्रीय अभ्यास]

★

प्रस्तावना

§ १

प्रस्तुत प्रबंधांत यादवकालीन मराठी भाषेचा भाषाशास्त्रीय प्रपंच मी करीत आहें. या विषयाचे चार भाग पडतात, ते असे—

१ वर्णप्रक्रिया
२ प्रत्ययप्रक्रिया
३ शब्दसिद्धि व वाक्यरचना
४ परभाषांचा परिणाम

प्रस्तावनेंत प्राचीन मराठीच्या कालमर्यादा, आधारभूत साहित्य, महानुभावीय वाङ्मयाचें भाषाशास्त्रदृष्टया महत्त्व आणि प्राकृत-मराठीचा संबंध या प्रश्नांचें विवेचन करून प्रबंधांत सिद्ध झालेल्या अनुमानांचें दिग्दर्शनही करणार आहें.

§ २ कालमर्यादा

प्राचीन मराठी भाषा आणि वाङ्मय हीं मुख्यतः यादवांच्या राजवटींत वाढलीं व त्याच दृष्टीनें प्रबंधाला **यादवकालीन मराठी** हें अन्वर्थक नांव दिलें आहे. या कालखंडाच्या दोन मर्यादा म्हणजे एक मराठी भाषेचा उगमकाळ व दुसरी यादव घराण्याचा अंतकाळ, अशा होत. पैकीं यादवांची राजवट इ० स० १३१२ त शेवटला यादवराजा शंकरदेव याच्या मृत्यूनें संपली. यानंतर मराठी भाषेचा अज्ञातकाळ सुरू होतो आणि आपणाला यादवकालावरून एकदम एकनाथकालावर उडी घ्यावी लागते.

तेव्हां उपलब्ध साहित्याच्या आधारावर १४ व्या शतकाच्या मध्यापर्यंत प्राचीन मराठीची मर्यादा भिडवितां येईल. मराठीच्या जन्मकाळाबद्दल मात्र मतामतांचा गलबला आढळतो. वि० का० राजवाडे हे मंगळवेढ्याच्या इ० स० ४८८ च्या ताम्रपटाच्या आधारें मराठी भाषेचा जन्म ५ व्या शतकापर्यंत मागें खेचतात. परंतु हा आधार सबळ नाहीं. या ताम्रपटांतील ' खळोजी, पवार, पटल ' हीं नांवें अर्वाचीन वाटतात. ' पवार ' हें नांव ' परमार ' पासून सिद्ध होतें आणि परमारांचें घराणें ९ व्या शतकाच्या पुढचें आहे. अर्थात् हा ताम्रपट मान्य नाहीं. हीच गत ज्याला राजवाडे इ० स० ७३६ तील मानतात त्या चिकुर्डे-ताम्रपटाची होय. पूर्व चालुक्यांचीं जीं नांवें तत्कालीन इतर ताम्रपटांतून नित्य आढळतात तीं यांत नाहींत[3]. म्हणजे ज्या आधारांवर राजवाडे मराठीला ५ व्या शतकापर्यंत मागें ओढतात ते आधार बळकट व निश्चित नाहींत. परंतु जन्मकाळाच्या या प्रश्नांत अधिक खोल शिरणें विषयमर्यादेंत नसल्यानें, मराठीच्या आद्य ग्रांथिक अवताराचा उल्लेख करून प्रस्तुत विषयापुरत्या कालमर्यादा निश्चित करतों. सोमेश्वराच्या **अभिलषितार्थचिंतामणीं**त (इ० स० ११२९) कांहीं मराठी पदें आहेत. त्यांतील एक असें—

" जेणें रसातलाउणु मत्स्यरूपें वेद आणियले मनुशिवक वाणियले
तौ संसारसायरतारण मोहंतो रावो नारायणु जो गीची. "

यापूर्वींचा ग्रांथिक पुरावा नसल्यानें सोमेश्वर कवीचा काळ हाच साधारणपणें मराठीचा जन्मकाळ धरावा. अर्थात् यापूर्वीं निदान शंभर वर्षें तरी मराठी भाषा ही बोली म्हणून अस्तित्वांत असली पाहिजे. परंतु, येथें प्राचीन मराठीच्या अभ्यासार्थ **इ० स० ११०० ते इ० स० १३५०** अशा कालमर्यादा निश्चित करण्यास हरकत नाहीं. या सुद्धां म्हणजे अगदीं कांटेकोर नव्हत. कोणत्याही भाषेचे कालखंड हे विलग व स्वतंत्र नसून एकमेकांत गुंतलेले असतात. पूर्वकालीन भाषेचे अवशेष व पुरोकालीन भाषेचे अंकुर

१ ज्ञानेश्वरी, प्रस्तावना, पान १८
२ डॉ० गुणे : " मराठी भाषेचा कालनिर्णय " – भा० इ० सं० मं०, षष्ठ संमेलनवृत्त
३ Dr. R. G. Bhandarkar: History of Deccan, pp. 48–61
४ वि० ल० भावे : महाराष्ट्र सारस्वत, भाग १ (१९२४), पान १२

हे प्रत्येक कालखंडाच्या मागेंपुढें असतात व याच तत्त्वामुळें प्राचीन यादव-मराठींत अस्तंगत अपभ्रंशाच्या छटा दिसतील व चौदाव्या शतकाच्या मध्यास एकनाथी वळणाचे क्रिया-प्रत्यय आढळतील. तात्पर्य, या कालमर्यादा कांटेकोर नाहींत. दुसरें असें, कीं दहाव्या शतकापर्यंत अपभ्रंश भाषा ही ग्रांथिक होती. १० व्या शतकांतील **णायकुमारचरिउ** व **सावय-धम्मदोहा** हीं अपभ्रंश काव्यें प्रसिद्ध आहेत. त्यांच्या अभ्यासानें प्राकृताचा अपभ्रंश व प्राचीन मराठी यांच्यांतील दुवा नीट उलगडेल. अपभ्रंशाची प्राचीन मराठी ही नैसर्गिक परिणति आहे कीं नाहीं व असल्यास ही भाषिक उत्क्रांति कोणत्या दिशेनें झाली, हीं विवेचनें अपभ्रंशाच्या आधारें होतील. तेव्हां इ० स० ११०० ते १३५० यांतील मराठी भाषा व यापूर्वीची अपभ्रंश भाषा यांचा तौलनिक अभ्यास करून अनुमानें काढण्याचा मीं प्रयत्न केला आहे. **कालमर्यादा कृत्रिम नाहींत** व त्यांच्यामागचा अपभ्रंशाचा धागा लक्षांत घेतला पाहिजे एवढाच मुद्दा.

§ ३ आधारभूत साहित्य

यादवकालीन मराठीच्या अभ्यासार्थ दोन प्रकारचे आधार घेतले आहेत– शिलालेखीय व ग्रांथिक. ताम्रपट–शिलालेख हें खरें संशोधनसाहित्य असून त्याचा उपयोग उच्चारप्रक्रियेचें व प्रत्ययप्रक्रियेचें स्वरूप सांगतांना मीं केला आहे. शिलालेखांवर स्वतंत्र असा भाषिक निबंध लिहितां येईल, परंतु त्याचें येथें कारण नाहीं. ग्रांथिक साहित्यासंबंधीं एक खुलासा येथेंच करतों. मूळाबरहुकूम असलेल्या अस्सल प्रतीच मीं निर्णयार्थ घेतल्या आहेत. नकलकारांनीं ‘ सुधारलेल्या ’ म्हणजे विपर्यस्त प्रती भाषाशास्त्रांत निरुपयोगी होत. याचसाठीं मराठी आद्यग्रंथ म्हणून मानला गेलेला मुकुंदराजाचा ‘ विवेकसिंधु ’ (इ० स० ११८८) हा प्रमाण नाहीं. एक तर, त्यांतील

“ शके अकरा दाहोत्तरु । साधारण संवत्सरू ।
राजा शारंगधरू । राज्य करी ” ॥

या ओवींतील शक व संवत्सर यांचा मेळ बसत नाहीं; व दुसरें, त्या ग्रंथाची भाषा बरीच आधुनिक वाटते. निदान ती यादवकालीन खचित नाहीं. हीच

कश्च ज्ञानेश्वर व नामदेव यांच्या अभंगवाङ्मयाची. आज उपलब्ध असलेले या संतांचे हजारों अभंग भाषाशास्त्राला मान्य नाहींत. त्यांवरून आधुनिक नकलकारांचा हात फिरल्यानें त्यांचें शास्त्रीय महत्त्व लोपतें. तुकारामाच्या[1] अस्सल जगनाडी प्रतीप्रमाणें यादवकालीन अभंगांच्या संहिता उपलब्ध असत्या तर वेगळें. परंतु त्या तशा नाहींत. अतएव या अफाट अभंग-सागराचा आधार प्रमाण नाहीं. तसेंच मीं येथें ज्ञानेश्वरीच्या एकनाथी प्रतीचा उपयोग केलेला नाहीं. राजवाडेप्रत मुकुंदराजाच्या हातची असेल वा नसेल, पण ती प्राचीनतम होय हें निःसंशय. माडगांवकरांची पाठभेदात्मक ज्ञानदेवीची प्रतही (variorum edition) या प्रकरणीं पाहिली आहे.

(अ) शिलालेख–ताम्रपट

१ श्रवणबेळगोळ शिलालेख, इ० स० ९८३
(एपिग्राफिआ कर्नाटिका, व्हॉ० २)
२ पाटण शिलालेख, इ० स० ११०६
३ पळसदेव शिलालेख, इ० स० ११५७
४ सावरगांवचा कदंब मारडदेव शिलालेख, इ० स० ११६४
(भारत इतिहाससंशोधक मंडळ, त्रैमासिक, व्हॉ० १२)
५ तेर शिलालेख, क्र० २, इ० स० ११६४
(भारत इतिहाससंशोधक मंडळ, त्रैमासिक, व्हॉ० १४)
६ परळ शिलालेख, इ० स० ११८७
७ भोज ताम्रपट, इ० स० १२०४
(भारत इतिहाससंशोधक मंडळ, इतिवृत्त, १९१४)
८ देउळगांव-राजे शिलालेख, इ० स० १२०० सुमारें
(प्रो. पोतदार, भारत इतिहाससंशो० मं०, वार्षिक, व्हॉ० ७)
९ खोलेश्वर शिलालेख, इ० स० १२२८
(खरे, द० म० इ० साधनें, भा० १, पान ५५)
१० नेवासें शिलालेख, इ० स० १२३९
(भारत इतिहाससंशोधक मंडळ, त्रैमासिक, व्हॉ० १२)

१ " तुकारामाचा अस्सल गाथा " – भावे

११ मार्कंड शिलालेख, इ० स० १२५६
(भारत इतिहाससंशोधक मंडळ, त्रैमासिक, व्हॉ० १९)
१२ मातुलिंगी येथील श्री बप्पदेवराय ताम्रपट, इ० स० १२५९
(भारत इतिहाससंशोधक मंडळ, वार्षिक, व्हॉ० ३)
१३ पंढरपूर शिलालेख, इ० स० १२७३
१४ पूर शिलालेख, इ० स० १२८५
(खरे, द० म० इ० साधनें, भाग १, पान ४५)
१५ उनकेश्वर शिलालेख, इ० स० १२८९
(भारत इतिहाससंशोधक मंडळ, त्रैमासिक, व्हॉ० ९)
१६ गोमांतकी मराठी ताम्रपट, इ० स० १३००
(भारत इतिहाससंशोधक मंडळ, वार्षिक, १९१४)
१७ वेळापूर शिलालेख, क्र० १, इ० स० १३००
(खरे, द० म० इ० साधनें, भाग २)
१८ वेळापूर शिलालेख, क्र० २, इ० स० १३०५
१९ नागांव शिलालेख, इ० स० १३६७
(बुलेटिन ऑफ स्कू० ओ० स्ट०, लंडन, व्हॉ० ५)

(आ) ग्रांथिक

१ दृष्टान्तपाठ, इ० स० १२७० सुमारें (संपा० नेने-भवाळकर)
२ शिशुपाळवध, इ० स० १२७३ (संपा० भावे)
३ उद्धवगीता, इ० स० १२७५ (संपा० कोलतें)
४ वच्छहरण, इ० स० १२७८ (संपा० पंगु)
५ चक्रधरसिद्धांतसूत्रें, इ० स० १२८० (संपा० नेने-भवाळकर)
६ धवळे, पूर्वार्ध, इ० स० १२८० (संपा० वा० ना० देशपांडे)
७ स्मृतिस्थळ, (१४ वें शतक) (संपा० वा० ना० देशपांडे)
८ सूत्रपाठ, (संपा० नेने)
९ श्रीज्ञानेश्वरी-धुळें प्रत, इ० स० १२९० (संपा० राजवाडे)
१० लीळाचरित्र, भाग १-४ इ० स० १२६० सुमारें (संपा० नेने)
११ धवळे, उत्तरार्ध, इ० स० १३१० (संपा० वा० ना० देशपांडे)

१२ उपाहरण, इ० स० १३५० सुमारें (संपा० राजवाडे, भा० इ० सं० मं०, अहवाल, १९११)
१३ ऋद्धिपूरवर्णन, इ० स० १३६३ (संपा० य० खु० देशपांडे)
१४ श्रीपतिकृत मराठी ज्योतिषरत्नमाला, इ० स० ११०० सुमारें (संपा० राजवाडे, भा० इ० सं० मं०, संमेलनवृत्त, व्हॉ० २)
१५ हयग्रीवाचार्यकृत गद्यराज, इ० स० १२९० सुमारें (संपा० नेने, भारत इतिहाससंशोधक मंडळ, त्रैमासिक, व्हॉ० १८)
१६ पंचतंत्र, इ० स० १२८० सुमारें (संपादक भावे, महाराष्ट्र-कवि, व्हॉ० ११)

या ग्रांथिक साहित्याखेरीज अनेक स्फुट व त्रुटित असे तत्कालीन लेख या प्रबंधांत उपयोजिले आहेत. त्यांपैकीं कांहीं देतों—

१ कोकशास्त्र, १३ वें शतक, (संपा० चांदोरकर) (भारत इतिहाससंशोधक मंडळ, वार्षिक, इ० स० १९१४)
२ निवृत्तिदेवकृत गीतेची समओवी टीका, इ० स० १२६० सुमारें (भारत-इतिहाससंशोधक मंडळ, वार्षिक, १९१६)
३ चांगा वटेश्वराचा तत्त्वसार, इ० स० १३०० सुमारें (संपा० डॉ० दिवेकर, ७ वी ओरिएंटल कॉन्फरन्स, १९३३)
४ ज्ञानदेवाचा सच्चिदानंदास लखोटा, (संपादक मुजुमदार) (भारत इतिहाससंशोधक मंडळ, वार्षिक, इ० स० १९१५)
५ श्रीगोरक्षविरचित अमरनाथ संवाद, (संपा० चांदोरकर) (भारत इतिहाससंशोधक मंडळ, वार्षिक, इ० स० १९१५)

§ ४ महानुभाव वाङ्मयाचें भाषाशास्त्रदृष्ट्या महत्त्व

वरील साधनांत, विशेषतः ग्रांथिक आधारांत, महानुभाव-साहित्याला विशेष मान आहे. कारणें उघड आहेत. यादव-कालीन मराठी भाषेचें रूप

१ हा ग्रंथ निःसंशय प्राचीन आहे. कारण यांत गुंडम राउळ हें नांव येतें. " अवधूत गुंडम राउळ शबरी "। ओवी ७७. याशिवाय देमाई, नागार्जुन हीं यादवकालीन मानभावी नांवेंही आहेत.

जाणण्यास ज्ञानेश्वरीच्या राजवाडे प्रतीचें जें महत्त्व तेंच महानुभाव साहित्याचें होय. पहिलें कारण असें, कीं या पंथाचें वाङ्मय पंथीयांना वेदतुल्य होतें. वरील ग्रंथ म्हणजे त्यांचे वेदच होत. त्यांतील शब्दन् शब्द, रूपन् रूप त्यांना वंद्य वाटे व मुळांत फेरबदल सहसा होत नसे. आपण वेदांतील ऋचांच्या एकेका मात्रेबद्दल जी कसोशी दाखविली तीच त्यांनीं आपल्या मराठी वेदांविषयीं दाखविली. दुसरें कारण असें, कीं महानुभाव पंथ सांकेतिक लिप्या वापरी. सकळ, सुंदरी, पारिमांडल्य या त्यांच्या सांकेतिक लिप्या प्रसिद्ध आहेत. नकलकार नकला करीत त्या सांकेतिक लिपींतील पोथीच्या करीत, अस्सलाच्या नव्हत. त्यामुळें शब्दरूपें बदलूं म्हटलें तरी तें शक्य नव्हतें. सांकेतिक स्वरव्यंजनें अविकृत ठेवणेंच त्यांना भाग होतें. इतकें असूनहि क्वचित् कोठें नकलकार आधुनिक वळण भाषेला लावण्याचा यत्न करी, हें खरें. परंतु हे बदल क्षुल्लक आहेत. सांकेतिक लिपीचा बंध या भाषाविकृतीला चांगलाच बसला व म्हणूनच ज्ञानेश्वरीच्या मुकुंदराजी प्रतींत आणि एकनाथी प्रतींत जो फरक दिसतो, तसा व तेवढा महानुभावांच्या जुन्या-नव्या प्रतींत नाहीं. अर्थात्, प्राचीन मराठीचें बरेंचसें अविकृत स्वरूप भाषाशास्त्राला दिसूं शकतें. ज्यांवरून उच्चारांचे व व्याकरणाचे नियम सिद्ध करावयाचे ते आधार महानुभाव-वाङ्मयांत जितके शास्त्रशुद्ध आहेत तितके ज्ञानेश्वरीच्या राजवाडे प्रतीखेरीज अन्यत्र नाहींत. तिसरें कारण हें, कीं महानुभाव वाङ्मयाचा बराच मोठा भाग गद्यांत व तोही साध्या, सोप्या, सामान्य गद्यांत आहे. पद्य पोथी कितीही अस्सल लाभली तरी सयमकतेमुळें तिचें महत्त्व भाषाशास्त्रदृष्ट्या अस्सल गद्यापेक्षां किंचित् कमी होतें. यमकामुळें शब्दरूपें बुद्धया विकृत करावीं लागतात व तशीं तीं झालीं, कीं शास्त्राला निरुपयोगी ठरतात. उदाहरणार्थ, महानुभावी पद्यांतील एक ओवी बघा—

"भणे **जगींहूनि जन्ममरणा** । मुनी रिगाले जेया शरणा
तेआ दातारांचेआ श्रीचरणा । पात्र जालेति ।" ऋद्धिपूर, ६०

येथें 'हूनि' हें शब्दयोगी वास्तविक जन्ममरण या नामापुढें पाहिजे असतां यमकाकरितां 'जगीं' या सप्तम्यन्त रूपाशीं जोडलें आहे व तसेंच 'शरणा' हें अशास्त्रीय आकारान्त रूप यमकाकरितां ठेवलें आहे.

आतां यावरून कोणी मराठींत शब्दयोगी हीं नामाच्या मागेंहि क्वचित् लागत असें म्हणेल तर तें अयुक्त होईल. गद्यरचना सदाच निर्यमक असल्यानें हा प्रश्न तेथें उद्भवत नाहीं व हें गद्य महानुभावांतच अधिक असल्यानें त्या पंथाचें वाङ्मय विशेष ठरतें. शिवाय असें, कीं 'ज्ञानेश्वरी' काय किंवा महानुभावांचीं 'शिशुपालवध', 'उद्धवगीता', 'ऋद्धिपूरवर्णन', 'वच्छहरण' हीं काव्यें काय, तीं शिष्ट, ग्रांथिक, पंडिती वळणाची भाषा दाखवितात. त्यांत शिष्टसंमत अशीं एकविध व्याकरणाचीं रूपें दिसतील. ग्रांथिक, शिष्ट भाषा ही नेहमीं नियमबद्ध असून तिचा कल एकविधतेकडे असतो. उलट 'स्मृतिस्थळ', 'लीळाचरित्र', 'दृष्टांतपाठ' वगैरे गद्य ग्रंथांतून तत्कालीन सर्वसामान्य बोली भाषेचें प्रतिबिंब आढळेल. कारण, या महानुभावी गद्यग्रंथांची भाषा कृत्रिम, अलंकृत नाहीं. ती साधीसुधी, सामान्य आहे. अर्थात् तिचा कल एकविधतेपेक्षां विविधतेकडे, वैचित्र्याकडे अधिक आहे. शिष्ट ग्रांथिक पद्यांत येऊं शकत नाहींत, अशीं कितीतरीं नामरूपें व क्रियारूपें सामान्य बोलींत व लौकिक गद्यांत रूढ असतात. कोणत्याही अस्सल भाषेचें स्वरूप तिच्या सामान्य बोलीवरून समजेल तसें शिष्ट ग्रांथिकवरून समजणार नाहीं. यादवकालीन मराठीचा भाषाशास्त्रीय अभ्यास जसा 'लीळाचरित्र' व 'स्मृतिस्थळ' या लौकिक ग्रंथांवरून होईल तसा 'ज्ञानेश्वरी' वा 'उद्धवगीता' या सालंकृत, पंडिती काव्यांवरून होणार नाहीं. नमुन्यादाखल खालीं 'स्मृतिस्थळांतील' तृतीयपुरुषी स्त्री० सर्वनामांचीं रूपें देतों—

	एकवचन	अनेकवचन
प्रथमा	ती, तीयें, ते	तिया
तृतीया	तिया, त्या, तिं	तिहिंसि
सप्तमी	तियां, तिये	तियां

यांतील 'तीयें, ते' हीं प्रथमेचीं, 'तिं' हें तृतीयेचें व 'तियां' हें सप्तमीचें एकवचनी, अशीं रूपें ज्ञानेश्वरींत नाहींत, अन्य पद्य ग्रंथांत क्वचित् आहेत, परंतु 'स्मृतिस्थळा'सारख्या गद्यांत नित्य येतात. याचा अर्थ हाच कीं, हीं सर्व रूपें तत्कालीं अस्तित्वांत रूढ होतीं व बहुजनसमाजाकरितां लिहिलेल्या सामान्य गद्यांत तीं येत. 'ज्ञानेश्वरी'सारख्या शिष्ट ग्रंथांत

त्यांतील कांहीं ठेवून भाषेला एकविधता आणण्याचा यत्न सुरू होता. म्हणूनच यादवकालीन मराठीचें शिष्ट व लौकिक, ग्रांथिक व सामान्य असें द्विविध रूप पहाणें असेल तर महानुभावीय गद्य ग्रंथांकडेच वळलें पाहिजे. चौथें कारण जरा तांत्रिक स्वरूपाचें आहे. महानुभावांच्या पोथ्यांत टिंबद्वयानें (:) शब्द आणि त्याचें साधित रूप यांतील भिन्नपणा दाखविला जातो. या विशिष्ट लेखनपद्धतीमुळें नामें व त्यांचे प्रत्यय हीं अलग काढण्यास मदत होते. उदा० 'चक्रधर' या नामाची चतुर्थी 'चक्रधरा : सि, ते' अशी व तृतीया 'चक्रधरें : सि' अशी दाखविली जाईल. चान्त रूपेंही अशींच वेगळीं काढतात व मानतात (जसें, 'चक्रधरा : चा'). आज दादोबा व होर्न्ले[१], यांच्यासारखे वैयाकरण ज्याला षष्ठीचा प्रत्यय समजतात तो 'च' तसा नसून 'त्यत्' या संस्कृत सर्वनामोत्पन्न आहे हें यामुळें सिद्ध होतें. नामाच्या सामान्यरूपाहून शब्दयोगी अलग लिहिण्यांत तत्कालीं मराठींत नवीनच येत असलेल्या सामासिक पद्धतीची जाणीव लेखकांना होती व प्रत्ययी स्वरूपापासून सामासिक स्वरूपाकडे होणारा मराठीचा कल ते अशा रीतीनें दाखवीत. भाषाशास्त्राला या लेखनपद्धतीचा उपयोग फार फार आहे. सारांश, ग्रंथांचें वेदतुल्यत्व, सांकेतिक लिपी, सर्वसामान्यस्वरूपाचें गद्य व विशिष्ट लेखनपद्धति, हीं चार कारणें भाषाशास्त्राला विशेष विचारणीय होत.

महानुभाव आणि ज्ञानेश्वरी

वरील विवेचन सर्वसामान्य झालें. तौलनिक विचार करितां ज्ञानेश्वरीच्या भाषाशास्त्रीय अभ्यासावर महानुभाव ग्रंथ नवाच प्रकाश टाकतात. ज्ञानेश्वरीच्या राजवाडे-प्रतींत 'ळ' नाहीं. त्याऐवजीं 'ल' सर्वत्र आहे. परंतु महानुभाव ग्रंथांवरून तत्कालीं 'ळ' होता व त्याला 'ल' हून स्वतंत्र अस्तित्व होतें हें सिद्ध होईल. तसेंच षष्ठीच्या विशेषणाचीं केवळ चान्त रूपेंच होतीं असा सिद्धान्त राजवाडे ज्ञानेश्वरीच्या आधारें काढतात. पण महानुभावी ग्रंथांत याचीं 'चान्त', 'जान्त', 'कान्त' व 'सान्त' अशीं चार रूपें सांपडतात. एतत्संबंधीं सविस्तर,

१ Hoernle : "Grammar of Gaudian Languages," pp. 238

सोदाहरण विवेचन मीं वर्णप्रक्रियेच्या व प्रत्ययप्रक्रियेच्या भागांत केलें आहे. तसेंच ज्या द्विवचनाचें राजवाडे एकच उदाहरण देतात त्याचीं आणखी दहापांच तरी मीं पुढें महानुभाव-ग्रंथांतून दिलीं आहेत. त्यांवरून द्विवचनाची अति पुसट जाणीव तेव्हां असावी असें वाटतें. प्रत्ययी विभक्तीचा हळूहळू लोप होत असतां सामासिक विभक्ति कशी तयार होत होती तेंहि महानुभावी भाषेवरून अधिक स्पष्ट दिसतें. कांहीं शब्दयोगीसुद्धां काळाच्या ओघांत प्रत्यय बनल्यावर नवीन शब्दयोगींची वाण भासते व ती पुरीहि होते, हा भाषिक उत्क्रांतीचा नियम महानुभावीय भाषेंत सिद्ध झालेला दिसेलं. याचीहि चर्चा पुढें आहेच.

आणखी एक तौलनिक दृष्टि आहे. तिनें ज्ञानेश्वरींतील कांहीं शब्दांचा पडताळा महानुभावीय मराठींत मिळेल व अर्थ, व्युत्पत्ति हीं स्पष्ट होतील. खालील उदाहरणें बघा......

(१) **सुरवाड**...हा शब्द 'सुखाड' असा राजवाडे मानतात[२]. याविषयीं वादहि पुष्कळ झाले. हा शब्द वास्तविक 'सुरवाड' असाच आहे हें खालील ओव्यांतील यमक पाहिल्यास दिसेल.

ज्ञानेश्वरी—

"तेया बोलाचा हान पाडु। कां रसवृत्तीचा निवाडु।
जेणें श्रोतेयां होईल सुरवाडु। श्रवणसुखाचा" ॥ ३–२७०
"ऐसी निजपुण्याची जोडी। वाढिनली सर्व सुखांची कुलवाडी।
तिए जन्में तो सुरवाडी। योगच्युतु" ॥ ६–४४६
"तेंवि आवडे तैसा सांकडु। आचरतां जऱ्ही दुवाडु।
तऱ्ही स्वधर्मेंचि सुरवाडु। पारत्रिकिं" ॥ ३–२२०

महानुभावीय ग्रंथांतील—

"या काजां देओ नेणता जाला। तवं ब्रह्मा निजभुवना गेला।
गोपवासरुवां सुरवाडु केला। राउळींची भणौनि" ॥
[वच्छ० २६४]

१ माझा पुढील निबंध पहा "Linguistic Importance of Mahanubhava Literature"...............10th Oriental Conference, Tirupathi.
२ ज्ञानेश्वरी–प्रस्तावना, पा० ८९

(२) **दोसें**...हें अव्यय ' करितां, साठीं, उद्देशें ' या अर्थी ज्ञानेश्वरींत येतें. उदा०-

" तेंहिं करावेया दोसें। मज सामर्थ्य असे।
कीं नाहीं हें ऐसें। न पांत करी " ॥ १८-६१८
" हें एकैक ऐसें। नानापरिं भाषावसें।
स्तोत्र करुनि तुजदोसें। निर्विशेषा " ॥ १८-११

महानुभावीय ग्रंथांत—

" सौरभ्यें गिवसावेआं दोषें। गर्भ सुमनाचा।" (ऋ० ४४)
" श्रीकृष्ण पावावेआं दोसें। मुनी षट्पदु जाले।" (वच्छ०१६१)
" कीं दी असतां तारा न दिसे। तें उणें फेडावेआं दोसें।
वनश्रिया वेढिलें जैसें। अंबरू नक्षत्रेसीं ॥ " (वच्छ० १३३)

(३) **श्लेष** ...या अलंकाराचें नांव ज्ञानेश्वरींत येतें, पण तें प्रचलित रूढार्थानें नव्हे. कारण श्लेषाची अनेकार्थता ज्ञानेश्वरींत कोठेंही दिसत नाहीं. खालील उल्लेख पहा—

" म्हणौनि आखरीं सुभेदीं । उपमा**श्लेष**कोंदाकोंदी।
झाडा देईन प्रतिपदीं। ग्रंथार्थासि। " (ज्ञा० १३-११५८)
" तेवि भेदबुद्धिचिये तुलें। घालूनि सूर्य**श्लेषांचें** कांटालें।"
(ज्ञा० १६-२८)

महानुभावीय ग्रंथांतील--

" उपमा **श्लेष**वर्णकं। तिहीं रंजउं सकळैक लोक।"(वच्छ० १४)

" वस्त्रें बाह्यें पांधुरता। तरि हा **श्लेषु** घडतां।" (ऋ० ४२७)

म्हणजे " श्लेष " हा शब्द रूढार्थी नसून, त्याचा सादृश्याशीं संबंध असावा. याला महानुभावीय वाङ्मयांतील साती ग्रंथांच्या टीपग्रंथांवरून पुष्टि मिळते.' वच्छहरण ' काव्यांतील १४ व्या ओवीवर अशी टीप आहे—

" उपमा देउनि वीटभनेंला नाहीं : **श्लेष** भणिजे..." ।

१ ह० ना० नेने : " श्लेष शब्दाच्या अर्थावर नवीन प्रकाश "
(भारत इतिहाससंशोधक मंडळ, त्रैमासिक, व्हॉ० १९, अं० २)

आणखी एक टीप अशी—

"उपमा देउनि दूषिजे आणि पदार्थ निर्धारिजे तो श्लेष"।

प्रसिद्ध संस्कृत साहित्यशास्त्रज्ञ "काव्यालंकार" कर्ता भामह याची "श्लेषा" ची व्याख्या वरील अर्थास किंचित् पोषक ठरते.

"उपमानेन यत्तत्त्वमुपमेयस्य साध्यते।
गुणक्रियाभ्यां नाम्ना च श्लिष्टं तदभिधीयते॥" ३-१४

भामहाची ही व्याख्या यादवकालीन "श्लेष" शब्दाच्या अर्थाशीं जवळ येते हें महानुभावीय टीपग्रंथांवरून दिसेल.

व्युत्पत्तीच्या आणि अर्थाच्या दृष्टीनें असा तौलनिक अभ्यास महत्त्वाचा होय. याशिवाय, महानुभावीय गद्य हें लौकिक असल्यानें त्यांत ज्ञानेश्वरी-सारख्या "नागर-प्रबंधांत" न आढळणारे असे कितीतरी भाषेचे वाक्प्रचार दिसतील. द्विरुक्त शब्द, सादशब्द, प्रतिशब्द अशा शब्दसिद्धीच्या अनेक लकबा आढळतील. नवीन निपात वापरले जाऊन काव्यांतील रूढ निपातांचा नवाच वापर केला जाईल. अर्थबदल, अर्थविकास वगैरे अर्थासंबंधीं अनेक बाबी अधिक स्पष्ट होतील व भाषेच्या शिष्ट, नागर स्वरूपाबरोबरच लौकिक, रूढ स्वरूपाचाही प्रत्यय येईल. या दृष्टीनें, वरील बाबींचा उल्लेख मीं त्या त्या प्रकरणीं केला आहे. शिवाय गद्य महानुभावीय ग्रंथांतून तत्कालीन अनेक वाक्प्रचार, वाक्यप्रयोगांच्या लकबी, शब्दविशेष यांची माहिती मिळते. म्हणजे शिष्ट काव्यांत भाषेच्या स्वरूपाचा जो एक भाग दिसूं शकत नाहीं तो महानुभावीय ग्रंथांतून पहावयास सांपडेल.

§ ५ आजपर्यंतचें एतत् प्रकरणीं संशोधन

मुख्य विषयाकडे वळण्यापूर्वी, मराठी भाषेच्या अभ्यासकांचा व त्यांच्या तद्विषयक प्रयत्नांचा आढावा घेणें अवश्य आहे. पूर्वाचार्यांचा मागोवा घेत व भाषाशास्त्रज्ञांना वाट पुसतच पुढील मार्ग आक्रमिला पाहिजे. मराठी भाषेच्या आरंभीं आरंभींच्या अभ्यासकांत डॉ० ग्रीयरसन, बीम्स, होर्न्ले, प्रो० स्टेन कोनौ व डॉ० भांडारकर हीं नांवें प्रमुख होत. पैकीं डॉ० ग्रीयरसन यांच्या ग्रंथांतून संपूर्ण भाषाशास्त्रीय अभ्यास न आढळला तरी

मराठीच्या प्रांतिक भेदांतील सूक्ष्म धाग्यांचें विवेचन आढळतें. डॉ॰ ग्रीयरसन यांचे ग्रंथेतर लेखही मराठीच्या दृष्टीनें विशेषतः आघातप्रकरणीं मननीय आहेत. बीम्स व होर्न्ले यांचा प्राकृत भाषांचा अभ्यास विशेष नसल्यानें त्यांच्या ग्रंथांत अपुरेपणा येऊन त्यांना ऐतिहासिक दृष्टि राहिलेली नाहीं. आर्य भाषांची परंपरा लक्षांत न घेतल्यानें त्यांचीं विधानें बऱ्याच ठिकाणीं निराधार दिसतात. ही उणीव प्रो॰ स्टेन कोनौ यांच्यांत नाहीं. त्यांच्या "महाराष्ट्री व मराठी" या प्रबंधाचा उपयोग ऐतिहासिक व्याकरणाला फार आहे. परंतु शास्त्रीय दृष्टि प्रथम कोठें आढळत असेल तर ती डॉ॰ भांडारकरांच्या "वुइलसन फिलॉलॉजिकल लेक्चर्स" मध्यें. बीम्स–होर्न्ले यांच्या तौलनिक अभ्यासाचा भाव व त्यांच्या अनैतिहासिक दृष्टीचा अभाव या दोन्ही गुणांचें मीलन डॉ॰ भांडारकर यांच्या लेखांत दिसतें. त्यांनीं पाली–प्राकृत–अपभ्रंश यांचें स्वतंत्र भाषाशास्त्रीय विवेचन केल्यानें त्यांच्या अर्वाचीन आर्य भाषांच्या अभ्यासाला ऐतिहासिक दृष्टीचा लाभ झालेला आहे. संस्कृतांतून पालींत, पालींतून प्राकृत–अपभ्रंशांत आणि शेवटीं मराठींत भाषेच्या कोणत्या बाबी गळाल्या, कोणत्या नवीन आल्या हें डॉ॰ भांडारकरांनीं शास्त्रीय व ऐतिहासिक दृष्टीनें पाहिल्यानें त्यांचा ग्रंथ आधारभूत झाला आहे. प्रो॰ दिवेटिया यांचीं "वुइलसन फिलॉलॉजिकल लेक्चर्स" डॉ॰ भांडारकरांच्याच धर्तीवर परंतु गुजरातीपुरतीं मर्यादित आहेत. तौलनिक अभ्यासाला त्यांचा उपयोग होईल.

वरील अभ्यासकांत डॉ॰ भांडारकर, स्टेन कोनौ यांचा उपयोग फार हें खरें; परंतु मराठी भाषेची घडण पहाणारानें इतर सर्व सोडून प्रथम ज्ञानेश्वरीकडे पाहिलें पाहिजे तें वरील विद्वानांनीं पाहिलेलें दिसत नाहीं. डॉ॰ भांडारकर आपल्या व्याख्यानांत ज्ञानेश्वरींतील उदाहरणें देतात, परंतु फार क्वचित्. त्यांचें लक्ष जुन्या मराठीपेक्षां आधुनिक भाषांकडेच विशेष आहे. ही उणीव प्रथम वि॰ का॰ राजवाडे यांनीं दूर केली. इ॰ स॰ १९०९ त प्रसिद्ध झालेलें त्यांचें "ज्ञानेश्वरींतील मराठी भाषेचें व्याकरण" भाषाशास्त्राला केवळ अमोल होय. त्यांची ज्ञानेश्वरीची प्रत मान्य होवो वा न

१ "The stress accent in Modern Indo-Aryan Vernaculars" J. R. A. S. 1895, p.p. 139

होवो, त्यांच्या व्याकरणाचें महत्त्व हें मानलेंच पाहिजे. डॉ० भांडारकरांच्या नंतर एका ब्लोकवांचून शास्त्रीय दृष्टीनें पहाणारा मराठीचा भाषाशास्त्रज्ञ राजवाड्यांच्या खेरीज दुसरा नाहीं. राजवाड्यांनीं ज्ञानेश्वरींतील मराठी भाषेची प्रत्येक बाब ऐतिहासिक दृष्ट्या विवेचून तिची परंपरा लाविली आहे. बीम्स व होर्न्ले यांची प्राकृतभाषाभ्यासाची उणीव अर्थातच राजवाड्यांत नाहीं. पाणिनीय परिभाषा, शास्त्रीय दृष्टि व ऐतिहासिक उपपत्ति या गुणत्रयीमुळें राजवाड्यांच्या ग्रंथाला अधिकारवाणी म्हणावें लागेल. मात्र राजवाड्यांची अलौकिक बुद्धिमत्ता मान्य करून त्यांच्या लेखांतील दोषांपासून सावध असलें पाहिजे. त्यांचे गुणविशेष आहेत तसे दोषविशेषहि आहेत. एक तर, सबंध ज्ञानेश्वरीच्या व्याकरणांत मूळांतील संदर्भ पांचांपेक्षां अधिक नाहींत. प्रत्यक्ष प्रमाण दिल्याखेरीज कोणतेंहि म्हणणें साधार आहे हें कशावरून समजावयाचें? राजवाडे उदाहरणें व तींहि ससंदर्भ, देत नाहींत ही त्यांच्यांतील मोठीच उणीव आहे. या कामांत पाश्चात्य संशोधकांची पद्धतिच योग्य होय. दुसरें असें, कीं आपण कोणत्या अपभ्रंशाशीं वा अपभ्रंश-ग्रंथांतील भाषेशीं मराठीचा दुवा जोडत आहोंत, हें राजवाड्यांनीं लिहिलेलें नाहीं. असें वाटतें, कीं त्यांच्यापुढें वररुचि व हेमचंद्र यांचीं प्राकृत व्याकरणेंच तेवढीं असावींत व त्यांवरूनच त्यांनीं परंपरा दाखविली असावी. अपभ्रंशाखेरीज मराठीची घडण नीट उकलणार नाहीं शिवाय असें, कीं राजवाड्यांच्या आग्रही वृत्तीला शास्त्राची मर्यादा क्वचितच पडते. ज्ञानेश्वरींतील मराठी भाषेचें रूपन् रूप, प्रत्ययन् प्रत्यय पाणिनीय संस्कृतापासूनच व्युत्पादिला पाहिजे हा त्यांचा आग्रह दिसतो, व यामुळें प्राकृत व अपभ्रंश या मधल्या पायऱ्या गाळून खुशाल ते पाणिनीवरून ज्ञानेश्वरावर उतरूं शकतात. संस्कृतांतील लुङ्, लिट् व लुट् हे वास्तविक पूर्वीच लोपले असतांना ते ज्ञानेश्वरींत आहेत असें राजवाडे मानतात तें यामुळेंच होय. मराठीच्या प्रत्येक बाबीची परंपरा थेट पाणिनीपर्यंत लावावयाची या कल्पनेमुळें राजवाड्यांची बरीचशी उपपत्ति काल्पनिक ठरते. जी गोष्ट त्यांच्या व्याकरणाची तीच व्युत्पत्तीची. संस्कृत विष्ठा या शब्दापासून ते विठ्ठल शब्द व्युत्पादितात व एकाच शब्दाला

१ भा० इ० सं० मं०, त्रैमासिक, वर्ष ३

विविध ठिकाणीं विविध व्युत्पत्ति सुचवितात. त्यांच्या मराठी धातुपाठांत याचीं उदाहरणें अनेक आहेत. प्रो० कुलकर्णी यांनीं त्यांचें कितीहि समर्थन केलें तरी राजवाड्यांच्या संशोधनांतील कल्पनेचा अंश नाकबूल करतां येणार नाहीं. आतां या कल्पनेलाच कांहीं विद्वान् 'सिद्धप्राय सिद्धान्त' किंवा Brilliant Hypothesis मानतात हें निराळें. परंतु हे सारे दोष जमेस धरूनहि राजवाड्यांचें भाषाशास्त्रांतील स्थान अढळ आहे. त्यांनीं पुढील संशोधनाचा पाया रचून ठेविला हें केव्हांहि खरेंच होय. अनुक्रम सोडून येथेंच राजवाडे संप्रदायांतील इतरांविषयीं थोडक्यांत लिहितों. या मंडळींत प्रमुख नांव श्री० कृ० पां० कुलकर्णी यांचें. त्यांच्या 'मराठी भाषा-उद्गम–विकास' या ग्रंथानें मराठी भाषेवर लिहिण्याची दिशा दाखवून कांहीं स्वतंत्र विवेचनहि केलें आहे. राजवाडे धातुपाठाची त्यांची प्रस्तावना आख्यातविभक्तिप्रकरणीं उपयोगी आहे. श्री० गो० कृ० मोडक यांनीं भारत इतिहाससंशोधक मंडळाच्या त्रैमासिकांतून ज्ञानेश्वरीच्या राजवाडे प्रतीसंबंधीं कांहीं मूलगामी चर्चा केली आहे व ज्ञानेश्वर–मराठीचे कांहीं व्याकरणविशेषहि सांगितले आहेत. परंतु श्री० मोडकांचें लक्ष प्राकृत-अपभ्रंशाकडे नाहीं. संस्कृतावरून ते थेट मराठीवर येतात. उलट, श्री० ह० ना० नेने प्राकृत-अपभ्रंशांतील रूपें दिल्याशिवाय मराठीसंबंधींचीं विधानें सहसा करीत नाहींत. या दृष्टीनें श्री० नेने यांचे यादव-मराठीवरील लेख भाषाशास्त्राला बहुमोल आहेत. शिवाय, ते ज्ञानेश्वरीबरोबर महानुभाव वाङ्मयाकडेहि पहात असल्यानें तुलनेला अवसर झालेला दिसतो.

परंतु वरील सर्वांहून प्रो० झुल् ब्लोक यांच्या ग्रंथाचें महत्त्व विशेषच आहे. आपल्या पहिल्या ग्रंथांत त्यांनीं एकंदर आर्य भाषांविषयीं लिहिलें असून दुसऱ्यांत मराठीचाच केवळ प्रपंच केला आहे. भाषाशास्त्राच्या आधुनिक तत्त्वांच्या रोखानें प्रो० ब्लोक मराठीची परीक्षा करितात. बीम्स, होर्न्लें यांचें लक्ष प्राचीन मराठीकडे नाहीं. ब्लोक ज्ञानेश्वरी-मराठी संबंधींही अनुषंगानें लिहितात. प्राकृत-अपभ्रंशद्वारा मराठी भाषा निघाली इकडे त्यांचें अवधान

१ राजवाडे मराठी धातुपाठ, प्रस्तावना.

२ J. Bloch : L'Indo aryen.

३ J. Bloch : Formation de la langue Marathe.

एकसारखें आहे व त्यांचीं सर्व विधानें ससंदर्भ आहेत. तात्पर्य, शास्त्रीय दृष्टि, आधुनिक भाषाशास्त्रीय तत्त्वें, आणि ससंदर्भत्व यांमुळें ब्लोक यांचें विवेचन शास्त्रशुद्ध झालें आहे. त्यांच्याच विवेचनपद्धतीचा अवलंब बंगाली भाषेवर लिहिणारे डॉ॰ सुनीतिकुमार चतर्जी व कोंकणीचे अभ्यासक डॉ॰ कात्रे हे करितात. ही पद्धति आतां शास्त्रीय म्हणून सर्वमान्य असून तिचाच अवलंब मी प्रस्तुत प्रबंधांत करीत आहें. प्रो. ब्लोक यांच्या वरील ग्रंथाचें "मराठी भाषेचा विकास" हें भाषांतर प्रसिद्ध करून प्रो॰ वा॰ गो॰ परांजपे यांनीं मराठीच्या अभ्यासकांवर उपकार करून ठेवले आहेत. प्रो॰ परांजप्यांनीं आपलें भाषांतर नुकतेंच (इ॰ स॰ १९४१ फेब्रुआरी) प्रसिद्ध केलें आहे.

तात्पर्य, डॉ॰ भांडारकर, इतिहासाचार्य राजवाडे व प्रो॰ ब्लोक हे मराठी भाषेवर लिहिणाराचे प्रमुख आधार होत. यांखेरीज इतर कांहीं ग्रंथांचा उपयोग एतत्प्रकरणीं बराच आहे. त्यांचा येथें उल्लेख मात्र करतों. डॉडेरेटनें[१] ज्ञानेश्वरींतील मराठी भाषेचें व्याकरण लिहिलें आहे तिकडे अद्यापि महाराष्ट्रीय विद्वानांचें लक्ष गेलेलें दिसत नाहीं. राजवाड्यांचें व्याकरण प्रसिद्ध झाल्यानंतर तें अवलोकून मगच डॉडेरेट् लिहीत असल्यानें त्याच्या या निबंधाचें विशेषच महत्त्व आहे. डॉडेरेट कांहीं नवीन सांगतो असें नाहीं, परंतु त्यानें प्रो॰ ब्लोक याच्या शास्त्रीय पद्धतीनें विचार केल्यामुळें त्याच्या व्याकरणाचा उपयोग थोडासा तरी आहे. प्रो॰ टर्नर[२] यांचा नेपाळी भाषेचा तौलनिक व्युत्पत्तिकोश आर्यभाषांच्या प्रत्येक अभ्यासकाला अत्यवश्य आहे. या पद्धतीचा शास्त्रीय कोश नेपाळीखेरीज दुसऱ्या भाषेचा नाहीं. प्रो॰ टर्नर यांनीं शेवटीं व्युत्पत्तिदर्शक सूची दिल्यानें तौलनिक अभ्यासाची मोठीच उणीव दूर झाली आहे. असो. यादव-कालीन मराठीवर कानडी भाषेची छाया असल्याचें मीं पुढें दाखविलेंच आहे. द्राविडी भाषेचा मराठीवरील परिणाम अजमाविण्याच्या दृष्टीनें डॉ॰ किटेल यांच्या कानडी–इंग्रजी शब्दकोशाचें व डॉ॰ काल्डवेल यांच्या द्राविडी भाषांच्या तौलनिक व्याकरणाचें

१ W. Doderet: B. S. O. S. (London) Vol. IV (A Grammar of Jnyanesvari)

२ R. L. Turner: "A Comparative and Etymological Dictionary of Nepali Language," (Kegan Paul, London, 1931)

३ भाग ४

महत्त्व फार आहे. प्रो० जागिरदार यांनीं यासंबंधीं " प्राचीन मराठीवरील कानडीचा परिणाम "[१] हा निबंध लिहिला आहे त्यांत संशोधनपर चर्चा केली असून ती मूलगामी आहे. श्री० विठ्ठल रामजी शिंदे यांचें " कानडी आणि मराठी " हें पुस्तक विशेषसें उपयुक्त नाहीं. प्रो० जोशी यांनीं द्राविडी पंडितांच्या साहाय्यानें ज्ञानेश्वरींतील कानडी शब्दांची केलेली यादी यथार्थ नसली तरी सूचक खचित आहे. वरील सर्व लेखांत एका गोष्टीस फार जपलें पाहिजे. कानडीचा मराठीवरील परिणाम पाहतांना त्या त्या विद्वानास मराठींतील प्रत्येक बाबींत द्राविडी अंश दिसूं लागतो, व क्वचित् ठिकाणीं डॉ० काल्डवेल व प्रो० जागिरदार यांची शास्त्रीय दृष्टि लोपून त्यांत आग्रहीपणा येतो, आणि त्यांचें विवेचन पक्षाभिनिवेशानें दूषित झालेंसें वाटूं लागतें. उदा० वस्तुतः मराठींतील सामासिक नामविभक्ति आणि कृदंत-पद्धति ही कोणत्याहि आर्य भाषेच्या रक्तांत भिनलेली आहे, आनुवंशिक आहे. असें असतांना मराठीनें ती कानडीपासून घेतली असें प्रो० जागिरदार प्रभृति सिद्ध करूं पाहतात. अतएव, या प्रश्नाकडे निरंगी दृष्टीनें पहाणें अवश्य आहे. राजवाड्यांचे 'सुबंत' व 'तिङन्त' प्रकरणावरील विचार ध्यानीं घेणें जरूर असलें तरी त्यांचीहि बुद्धि या ठिकाणीं आग्रही झालेली दिसते हें नाकबूल करून चालणार नाहीं. एकंदरींतच, राजवाड्यांचें विधान मान्य करण्यापूर्वीं तें नीट तपासावें हें योग्य.

वर, मराठी भाषेच्या सांगाड्यासंबंधीं आजवर जें शास्त्रीय दृष्टीनें लिहिलें गेलें त्याचा विचार झाला. इतर अनेक प्रयत्न झालेले दिसतात. परंतु ते अशास्त्रीय असल्यानें विनाकारण यादी वाढविण्यांत अर्थ नाहीं. बऱ्यावाईट कसल्याहि संदर्भग्रंथांची लांबलचक मालिका देण्याची पद्धति जर्मन पंडितांची असली तरी ती त्याज्यच होय. व्याकरणविषयक ग्रंथांसंबंधीं मीं वर लिहिलें नाहीं हें खरें; परंतु तसें लिहिण्याची जरूरहि नाहीं. प्रस्तुतचा प्रबंध जुन्या मराठीच्या व्याकरणावरील नसून भाषास्वरूपावरील आहे. भाषाशास्त्र आणि व्याकरण यांतील भेद स्पष्टच असल्यानें येथें त्याचा विस्तार करीत नाहीं. इतकेंच लिहितों, कीं भाषाशास्त्रीय अभ्यास अधिक व्यापक

१ " Kanarese Influence on old Marathi " —(Annals of B. O. R. I., Vol. XI, part 4.)

स्वरूपाचा असल्यानें त्याच्या पोटांत व्याकरणाचा समावेश होतो. म्हणूनच वैयाकरणांची वेगळी चर्चा देण्याचें प्रयोजन नाहीं.

§ ६ यादव-मराठी आणि अपभ्रंश

येथवर मराठीसंबंधीं भाषाशास्त्रीय दृष्टीनें ज्यांनीं लिहिलें आहे त्यांची चर्चा झाली. त्यांच्या प्रबंधांत सर्वसामान्य अशी एक उणीव आहे, आणि ती म्हणजे अपभ्रंशाकडील दुर्लक्ष. परंतु हा दोष त्यांचा नव्हे. डॉ० भांडारकर, राजवाडे आणि ब्लोक यांच्या वेळीं अपभ्रंश भाषेंतील वाङ्मय विशेषसें उपलब्ध नव्हतें व जें थोडेंसें होतें त्याचा उपयोग राजवाड्यांनीं केलेला दिसत नाहीं. डॉ० भांडारकरांचीं "बुइलसन फिलॉलॉजिकल लेक्चर्स" इ० स० १९१४ त व प्रो० ब्लोक यांचा मराठीवरील ग्रंथ इ० स० १९२० त प्रसिद्ध झाल्यानें त्यांसंबंधीं प्रश्नच उरत नाहीं. राजवाड्यांचें ज्ञानेश्वरीचें व्याकरण इ० स० १९०९ त निघालें असलें तरी पुढें अनेक वर्षें ते या विषयावर लिहीत असत. ज्या अपभ्रंशासंबंधीं ते चर्चा करतात व जो इ० स० नंतर ५ व्या शतकांत मृत झाला असें मानतात, तो अपभ्रंश कोणता याविषयीं त्यांनीं लिहिलें नाहीं. अपभ्रंश ग्रंथांतूनहि रूपांचीं वा उच्चारप्रक्रियेचीं उदाहरणें त्यांनीं दिलेलीं नाहींत. अर्थात् राजवाडे अपभ्रंशासंबंधानें कल्पनेनेंच बोलत असावेत असें वाटतें.

परंतु आतां अशी कल्पना करण्याचें कारण नाहीं. अलीकडे अमरावतीचे प्रो० हिरालाल जैन यांनीं अपभ्रंश भाषेंतील कांहीं ग्रंथ छापून काढले आहेत. त्यांची व प्रो० याकोबी वगैरेंनीं संपादिलेल्या अपभ्रंश ग्रंथांची यादी पुढें देतों——

१ भविसयत्तकहा (धनपाल) : डॉ० गुणे-दलाल
२ सनत्कुमारचरित (हरिभद्र) : प्रो० हर्मान याकोबी १९२१
३ भावनासंधिप्रकरण (जयदेव मुनि) : मोदी १९३०
४ णायकुमारचरिउ (पुष्पदंत) : प्रो० जैन १९३३
५ सावयधम्मदोहा (देवसेन) : प्रो० जैन १९३२
६ जसहारचरिउ (पुष्पदंत) : डॉ० वैद्य.
७ करकंडचरिउ (मुनि कनकामर) : प्रो० जैन १९३४
८ भविसयत्तकहा : प्रो० याकोबी.

वरील ग्रंथांतून साधारण १० व्या शतकांतील ग्रांथिक अपभ्रंश भाषा आढळते व ती अर्वाचीन आर्य भाषांच्या अलीकडील पायरी होय यांत संशय नाहीं. यादव-मराठीची वर्णप्रक्रिया व प्रत्ययप्रक्रिया या वरील अपभ्रंश भाषेंतून उत्क्रांत झालेल्या दिसतात. म्हणजेच यादव-मराठी ही अपभ्रंशापासून उत्पन्न झाली. मराठीची जन्मदात्री भाषा म्हणून वरील ग्रांथिक अपभ्रंशाला विशेष महत्त्व असून त्याचा अभ्यास होणें अत्यवश्य आहे. अपभ्रंशाचा सांगाडा नीट तपासल्याशिवाय यादव-मराठींतील कित्येक बाबींचा उलगडा होणार नाहीं. एवढ्याच करितां, वरीलपैकीं कांहीं ग्रंथांतील भाषा अभ्यासून मराठीचा दुवा अपभ्रंशाशीं जोडण्याचा मीं यत्न केला आहे. तो जुळविला असतां अपभ्रंशापासून साक्षात् मराठी निघाली हें सिद्ध होतें. मराठींतील कांहीं बाबी अपभ्रंशांत न आढळतां महाराष्ट्रींत व कांहीं थोड्या मागधी-शौरसेनींत आढळतात. तेवढ्यापुरतें मराठीनें अपभ्रंशाला सोडलें असलें तरी मुख्यतः अपभ्रंशाचाच सांगाडा जशाचा तसा यादव-मराठींत उतरला हें निश्चित. मराठी ही अनेक भाषांपासून निघाली असा सिद्धान्त कित्येक प्रतिपादितात, तसें नसून ती अपभ्रंशापासूनच निघाली हें माझें मुख्य म्हणणें आहे.

§ ७ महाराष्ट्री, अपभ्रंश आणि यादव-मराठी

संस्कृतापासून प्राकृत भाषा कशा निघाल्या, किंवा त्या मूळांतच संस्कृतबरोबर बोली-भाषा म्हणून रूढ होत्या, त्या आहेत किती, त्यांचे प्रांत कोणते, प्रांतिक प्राकृतांतील वैशिष्ट्यें कोणतीं, प्राकृत या शब्दाची व्युत्पत्ति व त्या भाषांचे उत्पत्तिकाल, वगैरे प्रश्न इंडो–आर्यन भाषेच्या दृष्टीनें महत्त्वाचे आहेत खरे; परंतु ते प्रस्तुत प्रबंधाच्या कक्षेंत न येतां प्राकृत भाषेवरील ग्रंथांतच येऊं शकतात. प्राकृतांतील व विशेषतः महाराष्ट्रींतील वर्णप्रक्रिया आणि प्रत्ययप्रक्रिया यांचाहि विचार येथें कर्तव्य नाहीं. वररुचि आणि हेमचंद्र यांच्या प्राकृत व्याकरणांवरून अनेकांनीं ही चर्चा केली आहे. सर्वसाधारण प्राकृत भाषांचा उगम, त्यांचा काल व त्यांचे प्रांतिक भेद यासंबंधींहि प्रो॰ ब्लोक यांनीं आपल्या प्रस्तावनेंत, राजवाड्यांनीं ज्ञानेश्वरीच्या प्रस्तावनेंत, प्रो॰ कृ॰ पां॰ कुळकर्ण्यांनीं ‘मराठीची पूर्वपीठिका’ या

प्रकरणांत, आणि चिं० वि० वैद्यांनीं आपल्या निबंधांत विस्तारानें चर्चा केली आहे. या पंडितांत मतैक्य नसलें तरी प्राकृत भाषांचें सम्यग् ज्ञान होण्यास ती चर्चा उपयुक्त आहे. पुढें मी महाराष्ट्री–अपभ्रंशाशीं यादव-मराठीचा दुवा जोडून दाखविणार आहें, तेव्हां त्या दृष्टीनें महाराष्ट्री आणि तिचा अपभ्रंश यासंबंधीं पुढें कांहीं प्रास्ताविक चर्चा करितों.

आर्य लोक विंध्याच्या दक्षिणेस साधारणतः इ० स० पूर्वी ६०० च्या सुमारास येऊं लागले व त्यांनीं गोपराष्ट्र, मल्लराष्ट्र, पांडुराष्ट्र, कोंकण, विदर्भ व अश्मक हीं मुख्य राष्ट्रें स्थापित केलीं. या सर्व राष्ट्रांतून आर्य जी भाषा तत्कालीं बोलत ती महाराष्ट्री प्राकृत. म्हणजे महाराष्ट्रीचा आरंभकाल साधारणतः इ० स० पूर्वी ६०० हा मानला पाहिजे. महाराष्ट्र या शब्दाच्या अनेक व्युत्पत्ति सुचविल्या गेल्या आहेत. " महा + राष्ट्र [मोठें राष्ट्र]; महा+रट्ट; मल्लराष्ट्र; महार राष्ट्र " अशा अनेक कल्पना विद्वान् पुढें मांडतात. पैकीं विंध्यापलीकडील महारण्याचें बनविलेलें म्हणून महाराष्ट्र, मोठें राष्ट्र हीच व्युत्पति अधिक पटते. तें कसेंहि असलें, तरी इ० स० पूर्वी ६०० च्या सुमारास महाराष्ट्राचें स्वतंत्र अस्तित्व होतें हें निश्चित. जुन्नरजवळच्या नाणेघाटांतील शिलालेखांत **महारठिगनकहिरो** असा महाराष्ट्रिकांचा उल्लेख येतो. नाणेघाटांतील या लेखांत महरट्टांना ' गण ' हें उपपद लाविलें आहे. महाराष्ट्रिकांचा, रट्टांचा, किंवा महरट्टांचा जो जमाव किंवा संघ तो ' महारठिगन ' होय. महाराष्ट्र देश, वसाहत आणि लोक यांसंबंधीं ' महाराष्ट्र शब्दकोशा 'च्या प्रस्तावनेंत (खंड ३ मध्यें) विस्तृत विवेचन केलेलें आहे. असो.

या महाराष्ट्रांतील महारठी लोक इ० स० पूर्वी साधारण ६००–७०० पासून महाराष्ट्री भाषा बोलत. ती संस्कृतची उघड उघड अपभ्रष्ट प्रतिकृति होती. डॉ० ग्रीयरसन व प्रो. स्टेन कोनौ[३] यांनीं " महाराष्ट्राश्रयां भाषां प्रकृष्टं प्राकृतं विदुः " । (दंडी काव्यादर्श १. ३४) या प्राकृत विद्वानांच्या मतास पुष्टिच दिली आहे. " सेतुबंध,

---

१ महाराष्ट्र शब्दकोश, प्रस्तावना, खंड ३, पान ४

२ प्रो० पां० वा० काणे (वि० विस्तार, वर्ष ४९)

३ Sten Konow: Maharastri and Marathi.

सप्तशती, कर्पूरमंजरी " हे महाराष्ट्रींतील प्रमुख ग्रंथ होत. प्राकृत या शब्दाच्याहि अनेक व्याख्या आढळतात. "प्रकृतिः संस्कृतं तत्र भवं ततः आगतं वा प्राकृतम्" (हेमचंद्रः) "प्रकृतिः संस्कृतं तत्र भवं प्राकृतमुच्यते"। (वररुचि) या केवळ पंडिती व्याख्या सोडल्या तर, "प्रकृत्या सिद्धं प्राकृतम्" आणि "प्रकृतीनां इदं प्राकृतम्" या व्युत्पत्तीं-वरून महाराष्ट्री वा इतर प्राकृत या सामान्य जनसमूहाच्या भाषा होत्या हें कळतें. त्यांत महाराष्ट्री व अर्धमागधी या अत्यंत निकट आहेत. स्वरांतर्गत व्यंजनाची प्रक्रिया आणि विभक्तिप्रत्यय या दोन बाबतींत महाराष्ट्री व अर्धमागधी यांत पुष्कळच साम्य आहे. सर्व प्राकृत भाषांत आद्य स्थान महाराष्ट्रीस देतात. वररुचि आपल्या 'प्राकृतप्रकाशां'त शौरसेनीचें व्याकरण सांगत असतांना त्या भाषेचे कांहीं विशेष देऊन पुढें 'शेषं महाराष्ट्रीवत्' हें सूत्र देतो व हेमचंद्र तर प्राकृत व्याकरण म्हणजे महाराष्ट्रीचेंच समजतो. अर्धमागधीचें महाराष्ट्रीशीं बरेंच साम्य दिसतें याचें कारण असें, कीं चंद्रगुप्ताच्या राजवटींत मगध देशांत जें मोठें अवर्षण झालें त्या वेळीं जैन मुनि दक्षिणेंत समुद्रतीरीं वास्तव्य करण्यास गेले व कोंकण–महाराष्ट्र प्रांतीं संचार करणाऱ्या जैन मुनींच्या भाषेवर महाराष्ट्रीचा परिणाम झाला. पुढें, जैनअपभ्रंश आणि महाराष्ट्री-अपभ्रंश दोन्ही एकरूप दिसतात याचें कारण हेंच होय.

§ ८ महाराष्ट्री–अपभ्रंश

इ० स० ४०० च्या सुमारास महाराष्ट्रीचा अंत होऊन अपभ्रंश कां सुरू झाला या प्रश्नाचें निश्चित उत्तर देणें कठिण आहे. मात्र राजवाडे मानतात त्याप्रमाणें याचें कारण बाह्य नसावें. परप्रांतांतील नाग लोकांशीं मिश्रण होऊन अपभ्रंश तयार झाला असें मत राजवाड्यांनीं मांडिलें आहे. परंतु त्याला आधार नाहीं. शिवाय महाराष्ट्री लुप्त झाली याची मीमांसा भाषेच्या आंतर स्वभावांतच सांपडूं शकेल. कोणत्याहि भाषेचें पंडिती व्याकरण झालें म्हणजे ती भाषा जशी पूर्णतेस पोहोंचते त्याप्रमाणेंच तेथें तिची वाढहि खुंटते. पाणिनीय व्याकरणानंतर संस्कृतची वाढ खुंटली, तिला स्थिरत्व आलें.

१ राधामाधवविलासचंपू...प्रस्तावना, भाग ३

वररुचीचा ‘ प्राकृतप्रकाश ’ झाल्यावर महाराष्ट्रीची व इतर प्राकृत भाषांची ग्रांथिक वाढ स्थगित होऊन सामान्य जनसमूहाच्या बोलींत मात्र त्यांच्या ज्या कांहीं प्रक्रिया व्हावयाच्या त्या चालूच राहिल्या. पुढें हेमचंद्र आपल्या प्राकृत व्याकरणांत अपभ्रंश-भाषेचें स्वरूप सांगतो. परंतु तें जिवंतपेक्षां मृत अपभ्रंशाचेंच स्वरूप वाटतें. म्हणजे हेमचंद्राच्या वेळीं अपभ्रंश लुप्त होऊन आधुनिक आर्यभाषांना आरंभ झाला होता. तात्पर्य, अपभ्रंशाचा काळ साधारण इ० स० ५०० ते १००० असा मानण्यास हरकत नाहीं.

परंतु हा अपभ्रंश कोणत्या भाषेचा ? हा प्रश्न मराठीच्या दृष्टीनें महत्त्वाचा आहे. अपभ्रंश याचा धात्वर्थच पाहिला तर ‘ विकृति ’ असा होईल. आणि याच अर्थानें संस्कृत वैयाकरण हा शब्द वापरीत. पतंजलीनें आपल्या महाभाष्यांत एकाच शब्दाचे अनेक अपभ्रंश होतात असें सांगितलें आहे. पहा—

“ एकैकस्य हि शब्दस्य बहवोऽपभ्रंशाः ” (महाभाष्य १. १. १)

दंडी आपल्या काव्यादर्शांत आभीरांची भाषा अपभ्रंश असून शास्त्रांत सर्व संस्कृतभिन्न भाषांस अपभ्रंशच म्हणतात असें सांगतो. पहा—

“ आभीरादिगिरः काव्ये अपभ्रंश इति स्मृताः ।
शास्त्रे तु संस्कृतादन्यदपभ्रंशतयोदितम् ”। (काव्यादर्श १. ३६)

तेव्हां अपभ्रंशाचा संस्कृत पंडितांचा अर्थ प्रस्तुत प्रकरणीं लागू नाहीं.

प्राकृत भाषांचे वैयाकरण मात्र अपभ्रंश हा एक भाषाभेद मानतात आणि तेंच योग्य आहे. संस्कृत भाषेप्रमाणेंच प्राकृत भाषा जेव्हां ग्रांथिक स्वरूपांत व व्याकरणनियमांनीं बद्ध झाल्या तेव्हां सामान्य लोकांच्या बोलींस जें रूप प्राप्त झालें तें अपभ्रंशाचें होय. प्रत्येक प्राकृत भाषेची एकेक अपभ्रंश भाषा त्या त्या प्राकृताच्या प्रांतांत रूढ झाली; व अशा रीतीनें आपणांस महाराष्ट्री-अपभ्रंश, शौरसेनी-अपभ्रंश, मागधी-अपभ्रंश आणि पैशाची-अपभ्रंश मानावे लागतात. त्यांचा काळ साधारण इ० स० ५०० धरावा. प्रो० हर्मान याकोबी हे मात्र “ पउमचरिय ” या ग्रंथावरून अपभ्रंशाचा काळ आणखी २०० वर्षें मागें नेण्याचा यत्न करितात.

अपभ्रंशाचे २७ उपभेद 'प्राकृतचंद्रिकें'त[1] दिले आहेत. तेच आपल्या 'प्राकृतसर्वस्वांत' उद्धृत करून मार्कंडेय त्यांवर टीका लिहितो. अपभ्रंशाचे हे २७ उपभेद असे:—

१ व्राचड,	२ लाट,	३ वैदर्भ,	४ उपनागर
५ नागर,	६ ?	७ बार्बर,	८ आवंत्य,
९ पांचाल,	१० टक्क,	११ मालव,	१२ कैकय,
१३ गौड,	१४ औढ्र,	१५ पाश्चात्य	१६ पांड्य,
१७ कौंतल,	१८ सैंहल	१९ कालिंग,	२० प्राच्य,
२१ कार्णाट,	२२ कांच्य,	२३ द्राविड,	२४ गौर्जर.
२५ आभीर,	२६ मध्यदेशीय	२७ वैताल,	

परंतु या सर्वांत ग्रंथरचना नाहीं. शिवाय ही नुसती प्रांतिक बोलींची यादी असावी. मार्कंडेय स्वतःच पुढें हे २७ उपभेद सोडून 'नागर, व्राचड, आणि उपनागर' असे तीन महत्त्वाचे भेद करतो. पुरुषोत्तमानें आपल्या 'प्राकृतानुशासनां'त[2] मार्कंडेयासारखेंच वर्गीकरण केलें आहे. विद्यापतीनें आपल्या 'कीर्तिलते'त[3] "अवहट्ट" असा शब्द वापरला असून, 'संनेहय रासय' या अबदुर्रहमान यांच्या ग्रंथांतहि[4] अवहट्ट भाषेचा अवलंब केल्याचें दिसतें.

तेव्हां अपभ्रंश भाषेचे नागर, उपनागर व व्राचड असे तीन मुख्य भेद दिसतात. पैकीं हेमचंद्राचा अपभ्रंश व मार्कंडेयाचा नागर अपभ्रंश हे एकच असें मत प्रो० कुळकर्णी[5] प्रतिपादितात. परंतु वरील तीन प्रकारच्या अपभ्रंशांतील अमक्या अपभ्रंशाहून अमकी आधुनिक भाषा निघाली असें सिद्ध करण्यास पुरावा नाहीं. तेव्हां हीं नांवें आणि आधुनिक आर्यभाषा यांचे संबंध जोडण्यांत

१ "Names of Prakrit Languages"–S. M. Katre (Volume of Studies Presented to Prof. Ross.)
२ "प्राकृतानुशासन" – पुरुषोत्तम, (संपा० निटिडॉल्फी, पॅरिस, १९३८)
३ Edited by Dr. Baburam Saksena.
४ "A Muslim Contribution to Apabhramsa Literature" —S. M. Katre (Karnatak Hist. Review- Vol. IV)
५ मराठी भाषा—उद्गम व विकास, पा. ११५.

अर्थ नाहीं. प्राकृतवैयाकरणांचा व त्यांच्या व्याकरणांचा जो इतिहास मॅ० लुगिया निटिडॉल्की यांनीं लिहिला आहे, त्यामुळें प्राकृतावर बराच प्रकाश पडला तरी अपभ्रंशाचे भेद नीट उकलतां येत नाहींत. वैदिकपासून पाणिनीय संस्कृत, संस्कृतापासून प्राकृत व प्राकृतापासून अपभ्रंश, येथवर दुवे नीट जुळतात. परंतु पुढें अमक्या अपभ्रंशापासून मराठी असें विधान निदान प्राकृत वैयाकरणांच्या अपभ्रंशनामांवरून तरी करतां येत नाहीं आणि म्हणूनच मराठीच्या उत्पत्तीबाबत मतमतान्तरें दृष्टीस पडतात. कोणी महाराष्ट्रीपासून साक्षात्, कोणी नागर-अपभ्रंशापासून, कोणी अर्धमागधीपासून, तर कोणी सर्व प्राकृत भाषांपासून मराठीची उपपत्ति लावितो. याऐवजीं नागर, उपनागर व व्राचड अपभ्रंश हीं नांवें सोडून, महाराष्ट्रांत महाराष्ट्रीचा जो अपभ्रंश इ० स० ५०० च्या सुमारास रूढ झाला त्याचे अवशेष जर यादव-मराठींत दिसले तर मराठी ही महाराष्ट्री-अपभ्रंशापासून निघाली असें कां म्हणूं नये ? एतत्प्रकरणीं वि० का० राजवाडे यांचीच मीमांसा बरोबर वाटते. त्यांचें म्हणणें थोडक्यांत असें—

संस्कृत > प्राकृत :	महाराष्ट्री	मागधी	शौरसेनी	पैशाची
	|	|	|	|
> अपभ्रंश :	महाराष्ट्री अपभ्रंश	मागधी अपभ्रंश	शौरसेनी अपभ्रंश	पैशाची अपभ्रंश

प्रत्येक प्राकृताची एकेक स्वतंत्र अपभ्रष्ट भाषा इ० स० ५०० च्या सुमारास रूढ झाली होती व त्यांपासून पुढें आधुनिक आर्य भाषा जन्मल्या. अशा रीतीनें मराठीचा दुवा महाराष्ट्री-अपभ्रंशाशींच सांधूं शकेल. या प्रकरणीं आधार जैन लेखकांनीं लिहिलेल्या अपभ्रंश-ग्रंथांचा आहे. इ० स० ५०० पासून १००० पर्यंतचा काळ अपभ्रंश-भाषांच्या भरभराटीचा होता. त्यांत " पउमचरिउ, भविसयत्तकहा, करकंडचरिउ, संणकुमारचरिउ, णायकुमारचरिउ, सावयधम्मदोहा, जसहारचरिउ, भावनासंधिप्रकरण " वगैरे उत्तम ग्रंथ झाले. त्यांतील भाषा महाराष्ट्री प्राकृत होय. तिलाच जैन महाराष्ट्री ही संज्ञा अलीकडे मिळते, ती केवळ जातिवाचक होय. वस्तुतः महाराष्ट्री-

१ Mme. Luigia Nitti–Dolci: "Les Grammariens Prakrits," 1938

२ ज्ञानेश्वरीची प्रस्तावना, पा० ५४–५६

अपभ्रंश व जैन महाराष्ट्री या एकच होत. जैन महाराष्ट्री हें नांव प्राकृत व्याकरणांतून आढळत नाहीं. अर्थात् तें नव्या छापाचें आहे. जैन मुनींनीं मगध प्रांतांतून महाराष्ट्रांत येऊन ग्रंथ केले हें मान्य आहे व जैनांनीं जो अपभ्रंश वापरला तो महाराष्ट्रीचा असून केवळ धर्मामुळें त्यास 'जैन महाराष्ट्री' हें नांव अलीकडे मिळालें. अर्धमागधीच्या कांहीं खुणा यादव-मराठींत आढळतात याचें कारण हेंच होय. प्रो० हिरालाल जैन हे अपभ्रंश-ग्रंथांचे विद्वान् संपादक यासंबंधीं म्हणतात—

"Apabhramsa has been regarded as one of the Prakrit Bhasas which include all the ancient languages other than Sanskrit. The most simple meaning of the word seems to be "The Natural language", i. e. the language of the people unrefined by any rigid rules of grammar and rhetorics."

(णायकुमार० Intro. p. 46)

तसेंच 'सावयधम्मदोहा' च्या प्रस्तावनेंत (पान २०) ते लिहितात—

"जैन भंडारों की सूचियों में इस भाषा के ग्रंथ प्रायः मागधी भाषा के नाम से दर्ज किये हुये मिलते हैं; किंतु यह भाषा न तो मागधी है और न अन्य शौरसेनी आदि प्राचीन प्राकृत। किंतु इन प्राकृतों ने प्रचलित देशी भाषाओं के पूर्व जो रूप धारण किया था वही इन ग्रंथों में पाया जाता है। यह उनका विकसित या अपभ्रष्ट रूप है और इसी से इस भाषा का नाम अपभ्रंश या अवहट्टा पडा। १० वीं ११ वीं शताब्दि के लगभग यही भाषा समस्त उत्तर भारत में प्रचलित थी, किंतु देशभेद के अनुसार उसमें भेद थे।"

वरील दोन उताऱ्यांवरून अपभ्रंशाचें इंडो-आर्यन मधील स्थान ध्यानांत येईल. वररुचीच्या प्राकृत व्याकरणांमुळें स्थगित झालेल्या प्राकृतांचा अपभ्रंश भारताच्या निरनिराळ्या भागांत भिन्नभिन्न रूपांनीं रूढ झाला. महाराष्ट्रांत तो महाराष्ट्री-अपभ्रंश किंवा उपलब्ध ग्रंथांवरूनच बोलावयाचें तर जैन महाराष्ट्री (अपभ्रंश) म्हणून होता व त्यापासूनच साक्षात् यादव-मराठी निघाली. उपलब्ध अपभ्रंश-ग्रंथांची चर्चा डॉ. गुणे यांनीं केली

आहेचं. तीवरून व अलीकडे प्रो० हर्मान याकोबी आणि प्रो० हिरालाल जैन यांनीं कांहीं अपभ्रंश ग्रंथ संपादित केले आहेत त्यांवरून मुख्यतः यादव-मराठीचा तत्पूर्व अपभ्रंशांशीं दुवा जोडण्याचें काम प्रस्तुत प्रबंधाचें आहे· असा दुवा जोडला गेला म्हणजे यादव-मराठी ही साक्षात् अपभ्रंशापासून निघाली असें सिद्ध झालें, तरच तिचें इंडो-आर्यन भाषांच्या इतिहासांतील स्थान निश्चित करतां येईल. तस्मात्, पुढें प्रथम यादव-मराठीची वर्णप्रक्रिया, प्रत्ययप्रक्रिया, शब्दसिद्धि, वाक्प्रयोग यांसंबंधीं प्रबंधाच्या मुख्य भागांचा आढावा घेऊन व नंतर यादवपूर्व अपभ्रंशाचें स्वरूप सांगून, शेवटीं दोहोंचा मेळ घालण्याचें किंवा दुवा जोडण्याचें काम मी करीन. तो जोडला गेला म्हणजे यादव-मराठी संबंधींचें मुख्य प्रमेय वा सिद्धान्त मांडतां येईल. तत्पूर्वी तिची वर्णप्रक्रिया व प्रत्ययप्रक्रिया सांगतों.

§ ९ यादव-मराठीची वर्णप्रक्रिया

यादव-मराठींतील उच्चारांपैकीं 'ऐ, औ' हे संयुक्तस्वर, 'च, छ, ज, झ' यांचे दंत्यतालव्य उच्चार आणि 'ळ' हें मूर्धन्य, एवढे भाग चर्च्य आहेत. मराठीची वर्णप्रक्रिया अपभ्रंशापासूनच झालेली असून अपभ्रंशातील सर्व उच्चार तींत आढळतात. या परंपरागत उच्चारांखेरीज इतर कांहीं यादव-मराठीनें स्वतंत्रपणें सिद्ध केले. 'ऋ' या स्वराचीं अपभ्रंशांत 'अ, इ, उ, ए, अर, रि' अशीं रूपान्तरें होत. यादव-मराठींतहि तीं सर्व होऊन शिवाय भाषेचें संस्कृतीकरण होत असल्यानें तत्सम शब्दांत मूळ 'ऋ' कायम राहिलेला दिसतो.

संयुक्त स्वर—प्राचीन इंडो-आर्यनमधील 'ऐ' व 'औ' हे संयुक्त स्वर मध्य-इंडो-आर्यन-कालींच लोपून त्यांच्या जागीं अनुक्रमें 'ए-ओ' किंवा 'इ-उ' येऊं लागले. हीच परंपरा मराठींतहि दिसते. उदा० मोतीं (मौक्तिकम्); सेवाळ (शैवाल); विआही (वैवाहिक); तेल (तैल); जोवण (यौवन). म्हणजे प्राचीन इंडो-आर्यनमधील संयुक्त स्वर प्राकृत-अपभ्रंशांत नाहींत, तसे मराठींतहि नाहींत. यादव-मराठींत संयुक्तस्वर

१ "Apabhramsa Literature and its Importance to Philology" –Dr. P. D. Gune (Ist Oriental Conference, Poona, 1919)

दिसतात ते संस्कृतजन्य नसून, अपभ्रंशांतील स्वरांतर्गत व्यंजनलोपामुळें उत्पन्न झालेल्या स्वरांच्या संयोगानें सिद्ध होतात. अ + इ = ई, आणि अ + उ = ऊ अशा संयोगामुळें संयुक्त स्वर अनुक्रमें 'ऐ' व 'औ' हे निघाले. उदा०

संस्कृत	प्राकृत–अपभ्रंश	मराठी
प्रतिज्ञा	पइज्जा	पैज [अ+इ]
मलिन	मइल	मैल [अ+इ]
प्रविष्ट	पइठ्ठ	पैठ [अ+इ]
प्रतिष्ठान	पइठ्ठाण	पैठण [अ+इ]
जतुगृह	जउघर	जौहर [अ+उ]
चतुर्थ	चउत्थ	चौथ [अ+उ]
चतुष्क	चउक्क	चौक [अ+उ]
जय	जइ	जै [अ+इ]

तात्पर्य, अपभ्रंशांतील भिन्न स्वरांच्या संयोगानें मराठींतील 'ऐ–औ' हे संयुक्त स्वर बनले आहेत.

च, छ, ज, झ : संस्कृतांतील या व्यंजनांच्या शुद्ध तालव्य उच्चारांखेरीज त्यांचे दंत्यतालव्य उच्चार यादव-मराठींत आहेत. हे उच्चार कोठून आले हा एक प्रश्न आहे. या बाबतींत गुजराती मराठीशीं समधर्म आहे. यादव-मराठींत तत्सम शब्दांत या वर्णांचा उच्चार शुद्ध तालव्य होतो. परंतु तद्भव आणि देशी शब्दांत, 'इ–ए' हे स्वर पुढें नसतांना, याच वर्णांचा उच्चार दंत्यतालव्य होतो. [उदा० चेओ, छेदणें जेहीं, जिणौनि, झिडिकाय–शुद्ध तालव्य]. याशिवाय, "तद्भव शब्दांतील 'ज्, झ्,' हे वर्ण ज्या वेळीं संस्कृत 'य्' ह्या वर्णापासून उत्पन्न झालेले असतात त्या वेळींहि त्यांचा उच्चार शुद्ध तालव्य होतो" असा नियम प्रो० कृ० पां० कुळकर्णी[२] देतात, तो अयोग्य होय. उदा० "जुझ" (सं० युध्) यांतील उच्चार दंत्यतालव्यच आहेत, शुद्ध तालव्य नाहींत. असो. हे

१ राजवाडे [ज्ञा० ज्ञा० पा० ३] म्हणतात त्याप्रमाणें मराठींतील संयुक्त स्वर म्हणजे संस्कृताचें पुनरुज्जीवन नव्हे. सर्व वर्तमान इंडो-आर्यन भाषांमधील संयुक्त स्वरांची उपपत्ति भिन्नस्वरसंयोगानेंच लागते.

२ मराठी भाषा–उद्गम व विकास, पा० ३२२

दंत्यतालव्य उच्चार कसे आले यासंबंधीं मतभेद आहेत. मोगली भाषेचा हा परिणाम असावा असें प्रो० दिवेटिया[1] मानतात. प्रो० ब्लोक[2] यांचा संबंध द्राविडीशीं जोडतात.

यादव-मराठींतील दंत्यतालव्य उच्चारांसंबंधींची प्रक्रिया पाहतां, 'इ-ए' हे स्वर पुढें नसतांना, तद्भव शब्दांत वरील उच्चार आढळतात. संस्कृत 'य्' ह्या वर्णापासून 'ज, झ' आले असतां त्यांचे उच्चार शुद्ध तालव्य होतात असा नियम गुजरातीपुरता देऊन प्रो० दिवेटिया त्याला अपवादहि सांगतात. प्रो० कुळकर्ण्यांनीं दिवेटियांचाच अनुकार मराठीसंबंधीं केला असावा. परंतु ते अपवाद मात्र देत नाहींत. वस्तुतः मराठींत जुआरी [द्यूतकार]; सांझ [संध्या]; काज [कार्य]; वांझ [वंध्या]; वीज [विद्युत्] असे कितीतरी दंत्यतालव्य उच्चार संस्कृत 'य्' पासून निघालेल्या वर्णांचे होतात. तेव्हां हा उच्चार संस्कृतावर अवलंबून नसून मराठींतीलच त्या वर्णांच्या निकटवर्ती स्वरावर अवलंबून आहे.

महाराष्ट्री व अपभ्रंश यांत हा उच्चारभेद सुरू झाला. तो मराठी, गुजराती, बंगाली, मारवाडी या भाषांत आहे. सिंधींत आणि हिंदींत मात्र नाहीं. काश्मिरी भाषेंत 'त्स' असा एक विशिष्ट उच्चार असून 'चौर' शब्द 'त्सूर' असा उच्चारिलेला आहे. भूतानी भाषेंत 'च' चा 'त्स' असाच उच्चार आहे. ब्रह्मी भाषेंत 'चंद्र'चें 'संदा' असें रूप होतें. सिंहलींतही 'च' चा 'स' होतो.[4]

संस्कृतांत हा उच्चारभेद नसून महाराष्ट्रींत तो नव्यानेंच आला. डॉ० ग्रीयरसन यांनीं या विषयाचा संपूर्ण अभ्यास करून स्वतःचा सिद्धान्त मांडिला आहे. त्यांच्या मतें शुद्ध तालव्यांचा दंत्यतालव्य उच्चार चंद्रगुप्ताच्या

१ Wilson Philological Lectures, p. 349

२ La langue Marathe, p. 33

३ Dr. Grierson: Manual of Kashmiri Language, Vol. I, p. 14

४ Childer's Pali Dictionary.

५ Dr. Grierson: "Prakrit Palatals"— J. R. A. S. (1913) Pp. 391 ff.

महाराष्ट्रींत व शौरसेनींत सुरू झाला. एतत्प्रकरणीं ते वररुचीच्या पुढील सूत्राचा आधार देतात......

'चवर्गस्य स्पष्टता तथोच्चारणः'। –प्राकृतप्रकाश ९.५ [मागधीसंबंधीं] परंतु या सूत्रांतील 'स्पष्टता' या पाठाबद्दल व या शब्दाच्या अर्थाबद्दल मतैक्य नाहीं आणि स्पष्ट अर्थ निश्चित झाल्यावांचून हें सूत्र आधारभूत होऊं शकत नाहीं. मात्र महाराष्ट्री आणि मागधी यांतील 'च' वर्गाच्या उच्चारांत फरक होता एवढें मात्र खचित. मार्कंडेयं या प्राकृत वैयाकरणाचीं पुढील सूत्रें या दृष्टीनें महत्त्वाचीं आहेत. पहा—

"चजयोरुपरि यः स्यात्। य्चिरं। य्चिअ"। १२–२१
"श्रिण्टो य्चिश इत्येके। य्चिशदि"। १३–३
"चजोरुपरि यो भवेत्। य्चलइ। य्जलइ"। १८–२
"चवर्गस्योपरिष्टाद्यः। य्छले"। २०–४

म्हणजे मार्कंडेयाच्या मतें मागधी व वायव्येकडील व्राचड-अपभ्रंश यांत शुद्ध तालव्य उच्चार होई. तात्पर्य, प्राकृत वैयाकरणांच्या मतें 'च, छ, ज, झ' हे दंत्यतालव्य म्हणजे 'अस्पष्ट' आणि 'य्च, य्छ, य्ज, य्झ' हे शुद्ध तालव्य म्हणजे 'स्पष्ट' उच्चार दिसतात व महाराष्ट्री शौरसेनींत यांपैकीं स्पष्ट व मागधींत अस्पष्ट उच्चार आहेत. ही विभागणी सोडली तरी एकाच वर्णाचे दोन भिन्न उच्चार महाराष्ट्रींत होते हें खरें. 'य' या तालव्य अर्धस्वरानें चवर्गाचे हे दोन उच्चारभेद दाखविण्याची मार्कंडेयाची प्रथा डॉ. ग्रियरसन यांनीं प्रकाशांत आणिली. त्यांच्या विधानाला पुरावा भारतीय नांवांचीं जीं ग्रीक रूपान्तरें केलेलीं आढळतात त्यांत मिळतो. त्यांवरून महाराष्ट्रींत चवर्गाचे दंत्यतालव्य उच्चार चंद्रगुप्त राजाच्या पूर्वकालापासून आहेत हें स्पष्ट होतें. डॉ. ग्रियरसन यांनीं पुढील ग्रीक रूपान्तरांचीं उदाहरणें दिलीं आहेत...

चंद्रगुप्त	Sandrokuptos	पंचाल	Passaloi
चंदन	Tzandanon	चष्टन	Tiastanes
उज्जयिनी	Ozena	जमुना	Diamouna

१ "प्राकृतसर्वस्व"

म्हणजे तत्कालीन प्राकृतांत—पालींत—चवर्ग दंत्यतालव्यासारखा उच्चारिला जात असल्याखेरीज त्याचें रूपान्तर ग्रीकमध्यें दंत्यवर्णानें होतें ना. तात्पर्य, इ० स० ३२२ मध्यें हिंदुस्थानांतील प्राकृतांत हा उच्चारभेद होता. तो पुढें महाराष्ट्री-अपभ्रंश, यादवमराठी, यांत दिसतो. प्रो० दिवेटिया यांनीं हा उच्चारभेद प्रथम चंद्रगुप्ताच्या काळाच्या मागें व नंतर वेदकालाच्याहि मागें नेण्याचा यत्न केला आहे. तो सोडला तरी ही दंत्यतालव्य उच्चाराची प्रथा मोगली भाषांतून आली असावी हा त्यांचा तर्क अयोग्य ठरतो. कारण, एक तर हिंदी व सिंधी भाषांतून तो दिसत नाहीं व उलट सिंहली भाषेंत नित्य दिसतो. तेव्हां बीम्स व प्रो० ब्लोक यांच्या म्हणण्याप्रमाणें हा द्राविडी भाषांचा परिणाम होय हेंच खरें. इतकेंच, कीं तो पाली-प्राकृतापासून दृश्यमान होतो.

'**ळ**'—ज्ञानेश्वरीच्या राजवाडे प्रतींत 'ळ' हा वर्ण नाहीं. त्याऐवजीं सर्वत्र 'ल' आहे. परंतु ही लेखकाची वैयक्तिक वा प्रांतिक लकब होय. कारण, राजवाडेच स्वतः कबूल करतात कीं तत्पश्चात्क मराठींत व तदितर तत्समकालीन शिलालेखांत 'ळ' आहे. पंढरपूरच्या इ० स० १२७३ च्या व नागांवच्या इ० स० १३६७ च्या शिलालेखांत 'ळ' दिसतो. माडगांवकरी ज्ञानेश्वरींत [पैठण प्रत इ० स० १६२९] तो आहे. महानुभाव ग्रंथांचा आधार या प्रकरणीं सबळ आहे. महानुभावी जुन्या पोथ्यांतून सर्वत्र 'ळ' आढळतो. एवढेंच नव्हे तर त्यांतील सांकेतिक लिपींत 'ग' व 'ळ' यांना अनुक्रमें 'ळ' व 'ल' असे संकेत बसविले आहेत. श्री० ह० ना० नेने हे महानुभाव वाङ्मयाचे संशोधक 'सकळ' व 'सुंदरी' या सांकेतिक लिप्यांचे काळ अनुक्रमें इ० स० १३५३ व १३६३ असे मानतात. तेव्हां संकेत बसवितेकाळीं म्हणजे १४ व्या शतकांत 'ळ' हा स्वतंत्र उच्चार होता हें निश्चित. शिवाय, "मळेयानीळु (शि० २८७), नीह्ळळ (निलालः द० ११), यळा (लीळा. ३-५३)" व "गुळळा, लीळा, राउळ, बहळ, डोळा, गळा, विळचां" इत्यादि शब्दांत 'ळ' कडेच ओढा दिसतो. याहून अधिक उलगडा यमकांच्या साहाय्यानें होईल. पुढील यमकें पहा—

१ N. B. Divatia: "Wilson Philological Lectures," p. 348.

२ "श्रीज्ञानेश्वरदर्शन"—साहित्यखंड, पान ५१

“ रजस्तमाचिये सांजवेळे : फळवृत्तीचेनि भाषा **बोले** ।
ते निवृत्तिमार्ग चोरमोळे : सारिले मन्वादिकीं ” ॥ (उद्ध० ६३६)
“ तीये मुक्तिचां राउळीं : वेधवतिये वोळग **वारिली** ।
तेथ रीगों न ल्हाये हाउळी । सिल्पविद्याचि ” ॥ (उद्ध० ६३८)

येथें वास्तविक यमकाकरितां ‘ बोळे ’ व ‘ वारिळी ’ अशीं रूपें व्हावयास पाहिजेत; परंतु तीं तशीं न होतां ‘ ल ’ युक्तच राहातात. अर्थात् ‘ ल ’ आणि ‘ ळ ’ असे दोन भिन्न उच्चार तत्कालीन लेखक मानीत. असाच ‘ ळ ’ मराठी पंचतंत्रांतही आहे. ‘ वोळवितु, पिंगळकु, पोकळ ’ हीं रूपें त्यांत येतात. तेव्हां ज्ञानेश्वरींत ‘ ळ ’ नाहीं हें राजवाड्यांचें म्हणणें भ्रांत ठरतें.

या मूर्धन्य ‘ ळ ’ चा उगम निश्चित नाहीं. ज्ञानेश्वरानंतर मराठी भाषेंत तो तेलंगणांतून शिरला हें राजवाड्यांचें विधान कालदृष्ट्या बरोबर नाहीं. कारण, ज्ञानेश्वरकालीं ‘ ळ ’ होता. वैदिक ‘ ळ ’ चा व अर्वाचीन ‘ ळ ’ चा संबंध नाहीं. वैदिक ऋग्वेदी ब्राह्मणांच्या पाठांत जो ‘ ळ ’ आहे तो ‘ ड ’ पासून निघतो. ‘ ऋक् प्रातिशाख्यां’त ‘ ड-ढ ’ यांची ‘ ळ-ळ्ह ’ अशी प्रक्रिया सांगितली आहे.[२] अर्वाचीन ळ हा ‘ ल ’ पासून सिद्ध होतो. तेव्हां प्राचीन वैदिक ‘ ळ ’ चा संबंध येथें नाहीं. तो आहे असें गृहीत धरल्यानें प्रो० दिवेटिया या वैदिक ‘ ळ ’ चा अंश प्राकृतांत शोधण्याचा व्यर्थ प्रयत्न करतात.[३] असो. हा ‘ ळ ’ संस्कृतांत नाहीं. पालींत स्वरांतर्गत ‘ ड ’ चा ‘ ळ ’ होतो.[४] प्राकृतांत ‘ ळ ’ दिसतो. हेमचंद्र ‘ लोळः ’ असा नियमच देतो. परंतु तो पैशाचीपुरताच आहे. [व्याकरण ८-४-३०७]. त्यावरून ‘ ळ ’ अर्वाचीन भाषांत पैशाचीमधून आला असा सिद्धान्त प्रो० दिवेटिया बांधतात. [लेक्चर्स, पान ३६६]. तसें असतें, तर तो मराठी-गुजरातींत येऊन बंगाली-हिंदींतच कां येता ना ? अर्थात् मराठी ‘ ळ ’ चा पैशाचीशीं संबंध नाहीं.

---

१ “ ज्ञानेश्वरीचें व्याकरण ”, पान ४

२ “ Rik–Pratisakhya of Sannaka, Ed. Max Muller, 1–21; 1–22.

३ N. B. Divatia: Wilson Philological Lectures, Vol. I, pp. 362–68.

४ Dr. Bhandarkar: Wilson Philological Lectures, p. 41.

यादव-मराठींत स्वरान्तर्गत ' ल ' चा ' ळ ' होतो हें बव्हंशीं खरें आहे. मात्र तसा नियम सांगतां येणार नाहीं. उलट, ' ड ' चाहि ' ळ ' झाल्याचीं स्थळें आहेत. उदा० पिळणें [पीड्]; केळि [क्रीडा]. तेव्हां, "Inter-vocalic ल is changed to ळ " याबरोबर ' ळ ' हा ' ड ' पासूनहि सिद्ध होऊं शकतो. ' ळ ' कार प्राकृत कालापासून द्राविडी भाषांच्या द्वारेंच आला असावा. द्राविडींतील ' ळ ' काराचें प्राबल्य प्रसिद्धच आहे. हाच द्राविडी ' ळ ' प्रथम प्राकृतांत व नंतर अपभ्रंशद्वारा वर्तमान भाषांत शिरला. दंत्यतालव्य उच्चार जसे द्राविडींतून आले तशीच गोष्ट मूर्धन्य ' ळ ' चीहि आहे. एकंदरींतच आर्य भाषांतील मूर्धन्य वर्णांची उपपत्ति द्राविडीच्या संपर्कापासून लावणारा डॉ० काल्डवेल आदि पंडितांचा वर्ग आहे. त्या म्हणण्यांत तथ्य नसलें, तरी ' ल ' चा ' ळ ' असा मूर्धन्य उच्चार द्राविडींतून आला असें मानावें लागतें. भिल्ली भाषेंतही स्वरान्तर्गत ' ड-ढ ' चा ' ळ ' होतो.[1] आणि भिल्लांच्या भाषेंत द्राविडीचे पुष्कळ अंश सांपडतात, हें प्रसिद्ध आहे. एतावता, प्रो० दिवेटिया आणि प्रो० स्टेन कोनौ[2] यांची पैशाचीची उपपत्ति सोडून द्राविडीची मानणें अधिक युक्त.

येथवर यादव-मराठींतील विशेष वर्ण पाहिले. तिची सर्वसाधारण वर्णप्रक्रिया पाहतां अपभ्रंशाची परंपरा तिनें पुढें चालविलेली दिसते. स्थाननियत स्वरान्तरांत, अंत्यस्वरलोपाला नुकता आरंभ झाला आहे. अपभ्रंशांतील ' अ, आ, इ ' या अंत्य स्वरांचाच काय तो लोप होतो, व ' ई, उ, ऊ, ए, ओ ' हे अंत्य स्वर लोपत नाहींत. वर्तमान मराठींतून लुप्त झालेला अंत्य स्वर पुष्कळ प्रमाणांत यादव-मराठींत कायम आहे व त्याच्या लोपाला यादवोत्तरकालीं आरंभ झालेला दिसतो. [क्र० ४[3]] महाराष्ट्रींतील उपान्त्य स्वर यादव–मराठींत केवळ ऱ्हस्वाचे दीर्घ व दीर्घाचे ऱ्हस्व झालेले दिसतात. स्वरान्तर्गत व्यंजनाच्या लोपामुळें मात्र प्राकृतांतील उपान्त्य स्वर मराठींत पुष्कळ स्थळीं अंत्य झाला आहे. [क्र० ५] उपान्त्यपूर्व

१ " The Bhil Language of Marutha "–C. V. Raval, Third Gujrati Sahitya Parishad, 1909 A. D.

२ " Maharastri and Marathi " Sten Konow.

३ हे आंकडे प्रकरण १ मधील परिच्छेदांचे आहेत.

स्वरांच्या भिन्न भिन्न प्रक्रिया होतात, [क्र० ६] व त्या अपभ्रंशांतील प्रक्रियेला धरून होतात. आद्याक्षरांतील ' आ, ई, ऊ ' हे स्वर ऱ्हस्व करण्याकडे कल आहे. प्राकृतांतील स्वरान्तर्गत व्यंजनलोपामुळें निकट आलेले दोन वा अधिक स्वर प्राकृतअपभ्रंशांत तसेच राहतात. परंतु यादव-मराठीनें या बाबतींत प्रगति केली आहे. निकट स्वरोच्चारांतील क्लिष्टता मराठीनें पुढील तीन मार्गांनीं दूर केली आहे.

१ यश्रुति, वश्रुति

२ संयुक्त स्वर

३ दोन स्वरांचें ऱ्हस्वीकरण

वरील तीन प्रकारांनीं स्वरांच्या लगडी एकसारख्या उच्चारण्याचें यादव-मराठी टाळते. ही उच्चारविषयक प्रगति होय. स्वरांच्या ओष्ठ्यीकरण आणि तालव्यीकरण या प्रक्रिया नित्य आढळतात. संयुक्त स्वरांची चर्चा वर केली आहेच. व्यंजनांसंबंधीं पाहतां अल्पप्राणत्व आणि महाप्राणत्व या दोन्ही प्रक्रिया यादव-मराठींत आहेत. कण्ठ्य, दन्त्य, ओष्ठ्य व मूर्धन्य उच्चार अपभ्रंशाप्रमाणेंच दिसतात. मात्र दंत्यतालव्य उच्चारांकडे अपभ्रंशापेक्षां अधिक ओढा दिसतो. यादव-मराठींत व्यंजनांचें मूर्धन्यीकरण बऱ्याच प्रमाणांत स्थाननियत आहे. निकट र, स्वरान्तर्गत दन्त्य वर्ण, आणि आद्य व स्वरान्तर्गत न, ल यांमुळें मूर्धन्यीकरण झालें आहे. ' न, ण, म ' हीं अनुनासिकें अपभ्रंशाप्रमाणेंच आहेत. ' श, ष, स ' या ऊष्म वर्णांचा कल बहुशः ' स ' कडेच आहे. संयुक्त व द्वित्त व्यंजनें साधीं होऊन शब्दाचा तोल संभाळण्यासाठीं त्यांच्या मागील स्वर दीर्घ होतो. शिवाय भिन्न भिन्न संयुक्त व्यंजनांचे निरनिराळे प्रकार होतात. या, कांहीं स्थाननियत व कांहीं विशेष वर्णप्रक्रियांखेरीज व्यत्यय, स्वरभक्ति, स्वरागम, वर्णागम, सान्निध्य-परिणाम, स्वरलोप हे नेहमींचे वर्णप्रक्रियेचे उत्सर्ग यादव-मराठींत आढळतात. स्वरभक्ति विशेष प्रबल व व्यापक आहे.

तात्पर्य, यादव-मराठीची वर्णप्रक्रिया भाषाशास्त्राच्या सर्वसामान्य नियमांप्रमाणें व अपभ्रंशाच्या विशेष स्वभावाच्या रोखानें होतांना दिसेल.

§ १० यादव-मराठीची प्रत्ययप्रक्रिया

पुढें दुसऱ्या भागांत यादवकालीन मराठी भाषेंतील नामांचीं व क्रियापदांचीं रूपें देऊन त्यांची संपूर्ण, सोपपत्तिक व ससंदर्भ चर्चा केली आहे. त्यावरून या भाषेचें **प्रत्ययी-सामासिक असें मिश्र स्वरूप** कळून येईल. येथें त्या भागाचा आढावा घेतों.

नामांचीं तीन लिंगें सामान्यतः संस्कृत-महाराष्ट्री-अपभ्रंश यांच्या द्वारा आलेलीं आहेत. परंतु लिंगबदलाचीं अनेक उदाहरणें आढळतात (पहा क्र० १). पैकीं बरींच नामाच्या अन्त्य स्वरावर अवलंबून आहेत. उदा० सांखळें (नपुं०) < सं० शृंखला (स्त्री०). शब्दाच्या रूपावरून, विशेषतः त्यांतील अन्त्य स्वरावरून, लिंगनिश्चिति करण्याचा प्रकार पाहिला म्हणजे निसर्गसिद्ध व अर्थसिद्ध लिंग व्याकरणांतील लिंगाहून भिन्न असूं शकतें, याचा प्रत्यय येतो. यादव-मराठींतील वचनें दोन असून क्वचित् कोठें द्विवचन आढळतें. अशा द्विवचनाचीं दहा रूपें मीं पुढें दिलीं आहेत, त्यांतील बरींच शुद्ध संस्कृत आहेत. अर्थात् त्यांवरून द्विवचन यादवकालीं होतें असा सिद्धान्त बांधणें योग्य नाहीं. अनेकवचन क्वचित् ठिकाणीं प्रत्ययानें न साधतां स्वतंत्र शब्दानें साधलें आहे. हा भाषेचा सामासिक स्वरूपाकडील कल होय (क्र० २२).

नामविभक्तिप्रत्ययांचा विचार करतां यादव-मराठींत प्रथमेपासून संबोधनापर्यंत आठहि विभक्त्यांचीं प्रत्ययी रूपें दिसतात. पैकीं द्वितीया आणि प्रथमा या एकरूप आहेत. हा गुण मराठीनें अपभ्रंशापासून घेतला. पंचमी विभक्तीचें प्रत्ययी रूप क्वचित् आढळतें. बहुतेक पंचमी शब्दयोगी अव्ययानें साधण्याचीच पद्धति आहे. म्हणजे पंचमी ही विभक्ति सर्वांत आधीं सामासिक बनली. एकविधता आणि अनुकरण या दोन प्रवृत्तींचा खेळ नामविभक्तींत अविरत व अखंड चाललेला दिसतो. पुल्लिंगी अकारान्त नामांचीं तृतीयेचीं कांहीं रूपें आंकारान्त होतात. उदा० ' नवरसां, रामदेवां, मनुष्यां ' (क्र० ५). या रूपांना आधार संस्कृतांत वा प्राकृतांत नाहीं. यादव-मराठीनें तीं सर्वस्वीं स्वतंत्र रीत्या बनविलीं. पुल्लिंगी अकारान्त नामांची चतुर्थी, पंचमी व षष्ठी या आंकारान्त आहेत. तेव्हां त्यांचें अनुकरण करून तृतीयाहि

'आं'कारान्त रूपें करूं लागली. राजवाड्यांनीं तृतीयेच्या आकारान्त रूपांची चर्चा आधीं विशेष केलीच नाहीं; व जी कांहीं चर्चा ते करितात ती अशास्त्रीय आहे. चतुर्थी आणि षष्ठी यांच्या रूपांत साम्य असलें तरी त्यांच्या उपपत्तींत भेद आहे. एकविधतेची वृत्ति सप्तमी विभक्तींतहि दिसते. 'ई' या प्रत्ययाखेरीज 'आं' हा आणखी एक सप्तमीचा प्रत्यय यादव-मराठींत आहे, व हीं आंकारान्त सप्तमीचीं रूपें शुद्धप्रत्ययी आहेत, सामासिक नव्हत. आ-कारान्त पुल्लिंगी नामांच्या सप्तमीच्या रूपांवरून व अनुकरणाच्या नादानें अकारान्त पुल्लिंगी नामाची सप्तमीहि आंकारान्त झाली आहे. तात्पर्य, तृतीया, चतुर्थी, पंचमी, षष्ठी आणि सप्तमी या सर्व विभक्त्यांचीं रूपें एकच, म्हणजे **आंकारान्त** करण्याकडे कल आहे. मराठींतील सामान्यरूपाचीं बीजें या वृत्तींत, म्हणजे एकविधतेंत, अनुकरणांत आहेत, हें मीं पुढें दाखविलेंच आहे (क्र० २४). असो. ज्ञानेश्वरींत ओकारान्त पुल्लिंगी नामें नाहींत; परंतु महानुभाव ग्रंथांत तीं आढळतात. उदा० 'वरो, डो, पो, दादो' (क्र० ११). पुल्लिंगी नामांची ही चर्चा बव्हंशीं नपुंसकलिंगी नामांनाहि लागू आहे. पुल्लिंगी अकारान्त नामाचा प्रथमेचा उकार नपुंसकलिंगांतहि कधीं दिसतो, व तृतीया आणि सप्तमी यांचीं आंकारान्त रूपें येथेंहि येतात. मात्र नपुंसकलिंगी अकारान्त नामांचीं प्रथमे-द्वितीयेचीं दोन्ही वचनांचीं रूपें पुल्लिंगी रूपांहून भिन्न करण्याचा गुण यादव-मराठीनें महाराष्ट्रीपासून घेतला, अपभ्रंशापासून नव्हे. कारण, अपभ्रंशांत अनेकवचनी रूपेंच मात्र भिन्न आहेत (क्र० १२). 'एं' कारान्त नपुं० नामें 'अक' या संस्कृतांतील साधित प्रत्ययामुळें झालीं आहेत. 'आ' कारान्त पुल्लिंगी नामांची उपपत्ति अशीच लावावी लागते. म्हणजे राजवाडे म्हणतात त्याप्रमाणें या दोन प्रकारच्या नामांची सिद्धि सार्वनामिक प्रत्ययानें न होतां, अन्त्यवर्णप्रक्रियेनें होते (क्र० १५). एकविधतेनें व साम्याभासानें स्त्रीलिंगालाहि सोडलेलें नाहीं. पुल्लिंगी नामांचा उकार स्त्रीलिंगांतहि क्वचित् दिसतो. उदा० 'आशु, नम्रतु.' पुल्लिंगाप्रमाणें स्त्रीलिंगाचींहि कांहीं तृतीयेचीं आंकारान्त रूपें आहेत. हीं प्राकृत-अपभ्रंशांत नसून यादव-मराठीनें हा प्रयत्न ('आं') लिंग व अन्त्य वर्ण यांच्या उपाधिभेदातीत लावण्यास आरंभ केला.

१ ज्ञानेश्वरीचें व्याकरण, पान ४०

एकविधतेचा हा अति प्रबळ पुरावा होय. सप्तमीच्या 'सु' या प्रत्ययाची ओळख पुल्लिंग-नपुंसकलिंगामध्यें नाहीं. परंतु स्त्रीलिंगांत क्वचित् आहे (क्र० २१). हा 'सु' प्रत्यय अपभ्रंशांत 'हिं' असा आढळतो. प्राकृतांत मात्र तो 'सुं' असा आहे. अर्थात् ही महाराष्ट्रीची छटा होय व ती स्त्रीलिंगांतच केवळ दृश्यमान होते. तिन्ही लिंगीं नामांच्या अनेकवचनाची अनुनासिक ही नियत खूण आहे. द्वितीयेपासून पुढें अनेकवचनांत अनुनासिक नियमानें आढळतो. या अनुनासिकाचा फारशी व पल्हवी या भाषांतील अनेकवचनी 'आन्' प्रत्ययाशीं, राजवाडे मानतात त्याप्रमाणें, मुळींच संबंध नसून तो षष्ठीच्या 'णाम्,' द्वितीयेच्या अनेकवचनी 'आन्,' व नपुं० प्रथमेच्या अनेकवचनी 'आनि' या तिहींपासून उत्पन्न झाला आहे. एतावता, अनेकवचनांतील अनुनासिकाचें मूळ पुल्लिंगी षष्ठी, द्वितीया व नपुं० प्रथमा या विभक्त्यांच्या अनेकवचनी प्रत्ययांत आहे (क्र० २२).

वरील विवेचनाचा इत्यर्थ हा, कीं **नामांचीं प्रत्ययी विभक्तिरूपें अनुकरणाच्या वृत्तीमुळें एकविध बनत होतीं व एकमेकांपासून ओळखण्यास आणि कारकार्थ व्यक्तविण्यास असमर्थ होत होतीं.** विशेषतः, चतुर्थी, पंचमी व षष्ठी या संदर्भावरूनच केवळ ओळखल्या जाव्यात इतका एकविधपणा त्यांच्या ठायीं आला होता. प्रत्ययी विभक्तिरूपें जेव्हां अशा रीतीनें सर्वसामान्य बनलीं, तेव्हां नवीन शब्दयोगी अव्ययांच्या साहाय्यानें विभक्त्यर्थ व्यक्त करण्याची पद्धति सुरू झालेली दिसते. हीं शब्दयोगीसाधित विभक्तिरूपें प्रत्ययी नसल्यानें साहजिकच तीं होण्यापूर्वी नामाचें तृतीयेपासून पुढील विभक्तींत एक सर्वसाधारण असें रूप होई. हेंच सामान्य रूप. या सामान्य रूपाच्या उपपत्तींतील मतमतान्तरें निर्देशून मीं त्याची शास्त्रीय व ऐतिहासिक उपपत्ति लावण्याचा प्रयत्न केला आहे (क्र० २४). एकविधतेमुळें प्रत्ययी विभक्तिरूपांबरोबर सामासिक विभक्तिरूपें सुरू झालीं, व या सामासिक विभक्तीलाहि आधार साहजिकच एकविधतेचा आहे. मात्र सामान्यरूपाच्या मुळाशीं असणाऱ्या एकविधतेनें षष्ठी विभक्तीचें अधिष्ठान घेतलें आहे. षष्ठीचा सर्वसामान्यत्व हा एक स्वभावच असावा. तात्पर्य, केवळ एकविधता, किंवा केवळ षष्ठी विभक्ति यांपासून सामान्य रूपाची उपपत्ति लागू शकत

नाहीं. दोहोंच्या समन्वयानें, म्हणजे **एकविधतेला षष्ठीचें अधिष्ठान लाभल्यामुळें सामान्यरूप दृढ झालें हें माझें विधान मीं पुढें सप्रमाण सिद्ध केलें आहे.** यादव-मराठींत शुद्ध शब्दयोगीबरोबर अर्धप्रत्ययात्मक विभक्तिरूपेंहि नित्य आढळतात (क्र० २३). पैकीं अर्धप्रत्ययात्मक विभक्ति ही वस्तुत: सामासिकच होय. परंतु उच्चारप्रक्रियेच्या ओघांत मूळांत शब्दयोगी म्हणून असलेलीं अव्ययें विकृत होत होत प्रत्ययांसारखीं दिसूं लागलीं इतकेंच. उदा०

सि < सं० सहितम्

थें-तें < सं० अर्थे

सि < सं० आर्श्वे

तात्पर्य, हे प्रत्यय वाटले तरी मूळांत ते संपूर्ण शब्द होते, हेंच खरें.

यादव-मराठींत अशा प्रत्ययात्मक शब्दयोगींना निश्चित स्वरूप अद्यापि कसें आलें नव्हतें, हें षष्ठीच्या रूपांवरून दिसेल. षष्ठीचीं चान्त, जान्त, सान्त व कान्त रूपें आढळतात. पैकीं चान्त हींच सर्वत्र असून इतर तीन अति विरल आहेत. परंतु त्यांचें अस्तित्व दुर्लक्षून चालणार नाहीं (क्र० २३ षष्ठी). राजवाडे एका चान्त रूपाखेरीज इतरांचा निर्देश करीत नाहींत. डॉडेरेट एका जान्त रूपांचा मात्र करतो. या चारी तऱ्हेच्या रूपांची समग्र चर्चा करून यादव-मराठींतील विविधता मीं पुढें दाखविली आहे. हीच विविधता शुद्धशब्दयोगी अव्ययांतहि दिसते. यादव-मराठींत खालील शब्दयोगी आढळतात (क्र० २५).

प्रथमा / द्वितीया	:	वांचौनि, वेऱ्हीं, पर्यंत, सहित.
तृतीया	:	विण, हीन, सहित, सरिस, सवें, वांचौनि, करूनि, करवीं, वरि.
चतुर्थी	:	लागीं–लागौनि, कारणें, प्रति, साठीं, दोषें, पासीं, पासाव, स्तव.
पंचमी	:	तवं, लागीं-लागौनि, पसि, पासाव, पासौनि, पाउनि, होउनि, हौनि.
षष्ठी	:	वरि, सकट, समोर, परौता, वांचौनिया, वारिया.
सप्तमी	:	आंतु, भीतरीं, माजि–मध्यें, माझारीं.

वरील शब्दयोगांपूर्वी प्रातिपदिकाचें बहुश: सामान्यरूप होतें. परंतु न झाल्याचींहि स्थळें आहेत. यावरून, सामान्यरूपाला प्रारंभ यादवकाळीं झाला होता, परंतु तें नियमानें होईच असें मात्र नाहीं. नामविभक्तिप्रकरणा वरून पुढील सिद्धान्त बांधतां येईल—

" यादव-मराठींत विभक्तीचीं प्रत्ययी आणि सामासिक अशीं दोन्ही स्वरूपें जोडीनें आढळतात. अपभ्रंशांतील प्रत्ययी विभक्ति आणि वर्तमान-मराठींतील सामासिक विभक्ति यांमधील हा एक सांधणारा दुवा आहे. "

सर्वनामांसंबंधीं विचार करतां, भाषेचें प्रत्ययी स्वरूप नामांपेक्षां येथेंच अधिक जागृत असलेलें दिसतें. तसेंच रूपांची विविधताहि येथें नामांपेक्षां कितीतरी अधिक आहे. क्वचित् अर्थव्यक्तिहि अधिक विस्तृत दिसते. उदा० ' कवण ' या प्रश्नार्थी सर्वनामाला ' कोणताही ' असा अर्थ प्राप्त झाला आहे (क्र० २६). ' आमच ' आणि ' आपल ' या दोन आत्मवाचक सर्व-नामांत यादव-मराठी कधीं घोंटाळा करते. म्हणजे दोहोंतील भेद स्पष्ट नाहीं. सर्वनामांपासून सार्वनामिक विशेषणें सिद्ध झालेलीं दिसतात. उदा० " ऐस, एतुल, एतुक, एवढ, एउत, एसण, एसणाल "—' एं ' पासून. मराठींत सर्वनामें व सार्वनामिक रूपें अपभ्रंशापासून सिद्ध होतात. विशेषणें यादव-मराठींत विशेष्यनिघ्न व अविकृत अशीं दोन्ही आहेत (क्र० २८).

आख्यातविभक्तीकडे वळलें म्हणजे संस्कृत धातु, प्राकृत धात्वादेश आणि देशी नामधातु यांपासून मराठी क्रियापदें बनलेलीं दिसतात (क्र० २९). कांहीं वैदिक धातुहि आहेत. आख्यातविभक्तिरूपें यादव-मराठींत तीन प्रकारचीं होतात—

१ प्रत्ययी, २ कृदन्तसाधित, ३ संयुक्त.

प्रत्ययी रूपांत, पाणिनीच्या दशविध लकारांपैकीं " वर्तमाने लट्, आज्ञार्थे लोट्, भूते लङ्, विधिलिङ्, भविष्ये लृट्, " एवढे यादव-मराठींत आहेत.

भूते लुङ्, भूते लिट्, भविष्ये लुट् व हेतुहेतुमद्भावे लृङ् हेहि राजवाडे यादव-मराठींत आहेत असें मानतात. पैकीं लुङ् व लिट् यांचीं एकाकी रूपें सर्वथा त्याज्य होत, आणि लुट् व लृङ् हे प्राकृतांतच लोपलेले लकार मराठीनें पुनः जिवंत करणें अशक्यप्राय होय (क्र० ३१ ते ४०). तात्पर्य, यादव मराठींत वर्तमान-भूत-भविष्य या काळांचीं आणि आज्ञा व विधि या अर्थांचीं प्रत्ययी रूपें आहेत. त्यांतहि लट् हा वर्तमानाबरोबर क्वचित् भूत-भविष्यहि दाखवी (क्र० ३१). लङ्चीं रूपें लट्सारखीं होत; मात्र त्यांची उपपत्ति भिन्न आहे. विधिलिङ्चीं रूपें व क्वचित् अर्थ कर्मणि रूपांप्रमाणें होत (क्र० ३७). संकेतार्थी रूपें होत तीं भविष्ये लुट्च्या प्रत्ययी रूपांसारखीं भासत. इतकीं, कीं राजवाडे यांच्या मतें तीं लुट्चींच होत. लुट् हा ज्ञानेश्वरींत भविष्यार्थी व वर्तमान-मराठींत संकेतार्थी आहे हें राजवाड्यांचें विधान अशास्त्रीय कसें ठरतें तें मीं क्र० ३८ मध्यें दाखविलेंच आहे. तसेंच राजवाडे ज्याला 'हेतुहेतुमद्भावे लृङ्' मानतात तो केवळ लट् आहे (क्र० ४०). **तात्पर्य यादव-मराठीनें अपभ्रंशाव्यतिरिक्त कोणतेंहि प्रत्ययी रूप स्वतंत्रपणें बनांवलें नाहीं.** अपभ्रंशांत वर्तमान, क्वचित् भूत, व भविष्य हे काल आणि विध्यर्थ व आज्ञार्थ हे प्रत्ययी रूपांनीं व्यक्तविले जात. अपभ्रंशांतील हीं रूपेंच यादव-मराठींत वर्णप्रक्रियेमुळें बदल होऊन आलीं आहेत. त्यांत आणखी कांहीं लकारांची, म्हणजे प्रत्ययी रूपांची भर मराठीनें टाकली नाहीं. **एवंच, अपभ्रंशांतील आणि यादव-मराठींतील प्रत्ययी आख्यातविभक्ति समसमान आहेत.**

अकरणरूप 'न, ना, आह-नाह, नको आणि झणें' यांनीं व्यक्त होतें. प्रयोजक रूपें 'अव' या प्रत्ययानें आणि कधीं धातूच्या उपधेस वृद्धि होऊन सिद्ध होतात (क्र० ४३). कर्मणि व भावे रूपें साधण्याचे प्रत्यय 'ज, इज, प, पिज' असे विविध आहेत (भाग ३).

येथवर प्रत्ययी रूपांची मीमांसा केली. परंतु एकंदरींतच यादव-मराठी ही प्रत्ययी आख्यातविभक्तीपेक्षां कृदन्तांचा किंवा धातुसाधितांचा उपयोग अधिक प्रमाणांत करते. नामविभक्तिसारखाच कांहींसा प्रकार येथें आहे. प्रत्ययी नामविभक्तिरूपें एकविध झाल्यामुळें शब्दयोगी अव्ययांची प्रथा

निघाली. तसेंच ' लट्, लङ् व लृट् ' हे लकार वर्तमान-भूत-भविष्यांतील सूक्ष्म भेद व्यक्तविण्यास असमर्थ होऊं लागल्यामुळें व इतर लकार लोपल्यामुळें अर्थव्यक्तीचें कार्य करण्यास कृदन्तांचा उपयोग अधिक प्रमाणांत होऊं लागला. वर्तमाने लट् आणि भूते लङ् हे सारखेच दिसत. विध्यर्थ आणि कर्मणि यांचीं रूपें सारखींच होत. ' लुङ्, लिट्, लेट्, लुट् ' हे तर लोपलेच होते; तेव्हां काळ आणि अर्थ हे व्यवस्थित व्यक्त व्हावेत व त्यांच्या सूक्ष्म छटाहि दिसाव्यात एवढ्याकरितां कृदन्तांचा व विशेषत: संयुक्त क्रियापदांचा वापर मराठी अधिकाधिक करूं लागली. पैकीं कृदन्तांची प्रथा प्राकृत-अपभ्रंशांत होतीच. ती मराठीनें वाढविली. यादव-मराठींत वर्तमान-कृदंतें क्रियापदात्मक, विशेषणात्मक व क्रियाविशेषणात्मक अशीं तीन प्रकारचीं आहेत. पैकीं क्रियाविशेषणात्मक वर्तमान कृदन्तें ' आं ' कारान्त असून तीं प्राकृतांतील ' न्त ' व ' माण ' या वर्तमान कृदन्ताच्या दोन प्रत्ययांच्या समन्वयानें मराठींत आलीं अशी त्यांची स्वतंत्र व नवीन उपपत्ति मीं लाविली आहे (क्र० ४५). हीं ' आं ' कारान्त कृदन्तें व्युत्पत्तिदृष्ट्या द्विमूलक असल्यानें त्यांत सामासिक आख्यातविभक्तीचीं बीजें स्पष्ट दिसतात. भूत कृदन्तांत मराठीनें प्राकृत-अपभ्रंशांतील रूपांना ' ल ' स्वार्थे जोडिला आहे. अपभ्रंशांत हा ' ल ' अगदीं नाहीं, व यादव-मराठींत तो नित्य आहे. अर्थात् हें भूतकाळाचें नियत चिन्ह म्हणून ठरून गेलें. यादव-मराठींत हा ' ल ' लागण्यापूर्वीचें भूतकृदन्ताचें रूप अकारान्त, तकारान्त वा नकारान्त असतें (क्र० ४६) या कर्मण्यर्थी भूत-कृदन्ताबरोबरच कर्तरि-कृदन्तेंहि आढळतात. मात्र कर्तरि रूपांना प्राकृत-अपभ्रंशांत आधार नाहीं. यादव-मराठीनें हीं रूपें परंपरेनें घेतलीं नसून स्वतंत्रपणें बनविलीं. कर्मणि भूत-कृदन्ताच्या प्रथमेच्या एकवचनाला लट्चा प्र० पु० ए० व० चा अनुस्वार लागून हीं कर्तरि रूपें सिद्ध होत, ही नवीन उपपत्ति मीं पुढें मांडिली आहे (क्र० ४७). अव्ययी भूत-कृदन्ताची किंवा ल्यबन्ताची अशीच स्वतंत्र उपपत्ति लावण्याचा यत्न मीं केला आहे (क्र० ४८). संस्कृतांतील त्वानम् , त्वीनम् , आणि प्राकृतांतील त्ताणं, तूणं या प्रत्ययांपासून मराठींतील ल्यबन्ताचा ' ऊन ' प्रत्यय निघाला. महानुभाव गद्यग्रंथांत हाच ऊन प्रत्यय ' ऊं ' असा आढळतो, तो वर्णप्रक्रियेचा एक खेळ होय इतकेंच. परंतु एकाच काळांतील भाषेच्या या दोन थरांतील

सूक्ष्म भेद व्यक्तविण्यास तो पुरे आहे. भविष्य-कृदन्तें ऊं (तुमन्त), आव (विध्यर्थी), ज (नामें), व अवेया या प्रत्ययांनीं सिद्ध होतात. पैकीं शेवटलें व्ययी आणि अव्ययी भविष्यकृदन्तांच्या जोडानें बनलें आहे. ही उपपत्ति स्वतंत्र व नवीन असून तिला अपभ्रंश-ग्रंथांत आधार आहे (क्र० ४९).

वर दिलेल्या कृदन्तांपासूनच **यादव-मराठीचें तिसरें म्हणजे सामासिक स्वरूप बनलें आहे.** या कृदन्तांना अस् व भू या साहाय्य धातूंची जोड होऊन संयुक्त क्रियापदें बनतात. यांत मुख्य धातूचें कृदन्त व साहाय्य धातूचें आख्यातरूप असतें. संयुक्त क्रियापदांची प्रथा संस्कृत-महाराष्ट्री-अपभ्रंश-अर्वाचीन आर्य भाषा या भाषिक परंपरेंत प्रथम यादव-मराठींत दिसते. अर्थात् प्राकृत-अपभ्रंशांत संयुक्त क्रियापदें आढळत नाहींत. यादव-मराठीनें तीं प्रथम बनविलीं (क्र० ५१). आख्यात-विभक्तींतील सामासिक पद्धति म्हणून त्यांचें महत्त्व विशेषच होय. याच संयुक्त क्रियापदांपासून पुढें वर्तमान मराठींतील वर्तमान काळ सिद्ध झालेला दिसतो, व त्याचीं अति सूक्ष्म बीजेंहि ज्ञानेश्वरकालीं आढळतात. तात्पर्य, यादव-मराठींत प्रत्ययी रूपें मागें पडत जाऊन त्यांची जागा सामासिक रूपें हळूहळू कशीं घेत होतीं हें स्पष्ट होतें. अशाच सामासिक रूपांवरून, म्हणजे वर्तमान कृदन्ताला 'हो' धातूचीं रूपें जोडून यादव-मराठीनें संकेतार्थ बनविला. या संकेतार्थाचा पाणिनीय लृट्शीं मुळींच संबंध नसून तो सर्वस्वी सामासिक व मऱ्हाठी आहे, अशी नवीन उपपत्ति मीं मांडून दाखविली आहे (क्र० ५२). तिला अपभ्रंशांतहि आधार मिळतो.

निपात प्रकरण (क्र० ५४) यादव-मराठीनें प्राकृत-अपभ्रंशद्वारा घेतलें व विस्तृत केलें; यादव-मराठींतील निपात चार तऱ्हांनीं सिद्ध होतात.

१ विभक्तिरूपांपासून
२ सर्वनामांपासून
३ प्राचीन निपातांपासून
४ निपातात्मक शब्दांपासून

यांची समग्र व ससंदर्भ चर्चा पुढें आली आहे. 'तर' हें पादपूरक (क्र०५५) 'ऐसांही' हें उभयान्वयी (क्र० ५७), 'मग-आतां', "झिन्न"; 'मा'

हे निपात ज्ञानेश्वरीव्यतिरिक्त महानुभावी ग्रंथांत आढळतात. एकंदरींत यादव-मराठी निपातांनीं संपन्न आहे, व यांतील बरेच तिनें अपभ्रंशद्वारा न घेतां स्वतंत्रपणें साधिले आहेत.

§ ११ यादव-मराठीची शब्दसिद्धि

यादव-मराठीची शब्दसिद्धीची शाखा संपन्न व विविधतापूर्ण आहे. या प्रकरणाची समग्र चर्चा पुढें भाग ३ मध्यें केली आहे. त्यावरून शब्दसिद्धीचे खालील विशेष प्रकार आढळतात—

१ तद्धितप्रक्रिया
२ नामधातु व क्रियानामें
३ ध्वन्यनुकारी शब्द
४ सादशब्द
५ द्विरुक्त शब्द
६ सामासिक शब्द

या सहा प्रकारांपैकीं तद्धितप्रक्रिया, नामधातु, ध्वन्यनुकारी व द्विरुक्त शब्द हे यादव-मराठीनें अपभ्रंशद्वारा परंपरेनें घेतले. सादशब्द व सामासिक शब्द मात्र परंपरेनें न येतां तिनें परभाषांच्या–विशेषतः द्राविडीच्या–संपर्कानें बनविले. यादव-मराठींतील सादशब्दांवर व सामासिक शब्दांवर अद्यापि कोणीं कांहीं लिहिलें नाहीं. शब्दसिद्धीचे इतर प्रकार अपभ्रंशांत असले तरी मराठीनें तद्धितप्रत्ययांची संख्या पुष्कळ वाढविली, नामधातुहि वाढले, आणि ध्वन्यनुकारी शब्दांचा अपभ्रंशांतील अतिरेक मराठीनें सोडला. तात्पर्य, अर्थाच्या विविध छटा व्यक्तविण्यास समर्थ अशी शब्दसिद्धि यादव-मराठी करते.

§ १२ प्रयोग, वाक्यरचना, वाक्प्रचार, अर्थप्रक्रिया

यादव-मराठींत कर्तरि, कर्मणि व भावे हे तीन प्रयोग असून एका कर्मणीचे पांच विविध प्रकार आहेत. त्यांचा निर्देश राजवाडे व प्रो० ब्लोक यांपैकीं कोणीहि करीत नाहींत. भावे प्रयोगाचाहि वर्तमान मराठींत नसलेला असा एक विशेष प्रकार तत्कालीं होता. त्यांत उद्देश्य हें तृतीयान्त असून पूरक हें सदा आंकारान्त असतें. तसेंच यादव-मराठींत सति सप्तमी व सता तृतीया

नित्य, आणि सतें चतुर्थी क्वचित् आढळते. हा गुण प्राकृत-अपभ्रंशद्वारा आला. वाक्यरचना सर्वस्वी संस्कृतच्या धर्तीवर असून क्वचित् कोठें तृतीयान्त कर्ता व कर्तरि क्रियापद, आणि प्रथमान्त कर्ता व कर्मणि क्रियापद अशी विकृत रचना आढळते. परंतु अति विरल. एकंदरींत विभक्त्यांचीं कारकें व रचना संस्कृत-प्राकृताप्रमाणेंच आहेत. वाक्प्रचार, म्हणी, भाषेच्या विशेष लकबी या सर्व दृष्टींनीं यादव-मराठी सुसंपन्न असून वाक्प्रचारांचा थाट विशेषतः महानुभावी गद्यांत दिसतो.

§ १३ यादव-मराठीवरील परभाषांचे परिणाम

यादवकालीं मराठीचा कानडीशीं किती निकटचा संबंध आला, आणि तत्कालीन मराठीभोंवतीं द्राविडी भाषांचें वातावरण किती व्यापक होतें, याचा सविस्तर विचार मीं भाग ४ मध्यें केला आहेच. असें दिसतें, कीं यादवकालीन महाराष्ट्राच्या सीमा आजच्याहून भिन्न असाव्यात. भाषा कानडी तर लिपी देवनागरी, व भाषा मराठी तर लिपी कानडी असले प्रकार तेव्हांच्या पांच शिलालेखांत आढळतात (भाग ४–१). यादव-कालीन विठ्ठल-संप्रदाय, त्याचें विठ्ठल हें आराध्य दैवत, मूर्ति आणि क्षेत्र हीं सारीं मूळांत कर्नाटकीय असल्याची साक्ष महाराष्ट्र कवि व कन्नड विद्वान् देतात. तेव्हां अनेक बाबतींत या दोन समाजांत देवघेव होत असतां, भाषेच्या बाबतींतहि ती झाली असावी असा संभव दिसतो, आणि या प्रकरणीं यादव-मराठींत पुरावा मिळतो, तो असा—

१ **शाब्दिक**—यादव-मराठीनें कानडीपासून अनेक शब्द साक्षात् व कांहीं संस्कृत–प्राकृतद्वारा घेतले. असेच कांहीं तामीळ व तेलगू या भाषांतूनहि आलेले दिसतात. त्यांच्या समग्र याद्या भाग ४ मध्यें ससंदर्भ दिल्या आहेत. द्राविडी भाषांतील पुढील शब्द यादव-मराठींत आहेत.

कानडी शब्द (शिलालेखांत)…………	५
कानडी शब्द (ग्रंथांत)……………	१०० सुमारें
तामीळ शब्द (ग्रंथांत)……………	२ ,,
तेलगू शब्द (ग्रंथांत)……………	८ ,,
एकूण साधारण	११५

हे शब्द ग्रंथांतील आहेत. यादी अपूर्ण असली तरी शाब्दिक उसनवारीची कल्पना येईल.

२ **वर्णप्रक्रिया**—पुढील बाबी मराठीनें द्राविडीपासून उचलल्या असें मानण्यास पुरावा आहे.

(अ) य-व या अर्धस्वरांचें प्राचुर्य

(आ) मूर्धन्य ळ[1] (प्राकृत-अपभ्रंशद्वारा)

(इ) शुद्धतालव्यांचे दन्त्यतालव्य उच्चार

३ **प्रत्ययप्रक्रिया**—दोन भिन्न भाषांच्या निकट सहवासानें केवळ शाब्दिक देवघेवच होते असें नसून भाषेच्या सांगाड्यावरहि त्याचा परिणाम होऊं शकतो हें यादव-मराठीच्या व्याकरणांतील पुढील द्राविडी अंश तपासून दिसेल.

(अ) कर्मणि रूपाचे दोन अर्थ—एक साधा व दुसरा विध्यर्थ-पैकीं पहिला प्राकृत-अपभ्रंशद्वारा 'इज्ज' या कर्मणि प्रत्ययापासून, व दुसरा द्राविडीच्या संसर्गानें अपभ्रंशकालींच आला.

(आ) मूळ धातूच्या कृदन्ताशीं 'येणें' या साहाय्य धातूचें अकरण-रूप जोडून विध्यर्थाचें अकरण-रूप दाखविणें.

यांखेरीज कांहीं बाबी द्राविडीचा परिणाम म्हणून द्राविडी भाषांचे अभ्यासक सांगतात. त्या तशा नाहींत असें मीं सिद्ध केलें आहे. माझ्या मतें त्या सर्वस्वी आर्य होत (भाग ४, क्र० ३).

४ **वाक्यरचना, शब्दसिद्धि**—

(अ) 'म्हणौनि' या भूत कृदन्ताचा उभयान्वयी निपातासारखा विशेष उपयोग (कानडी 'एंदु' व तामीळ 'एन्रू').

(आ) 'कवाड घालणें' हा वाक्प्रचार.

१ मूर्धन्य 'ळ' टार्टर किंवा फिनिश भाषांतून द्राविडीद्वारा इंडो-आर्यनमध्यें आला असावा. पहा—Mr. Norris's paper on "The Language of the Scythian Tablets of Behistun." डॉ. बुल्हेर यांचें मत डॉ. कॉल्डवेल किंवा नॉरिस यांच्या-विरुद्ध आहे. पहा—Madras Journal of Literature, 1864 (pp. 116-136)

(इ) ' सादशब्द ' वापरण्याची प्रथा.

(ई) सामासिक शब्द–ही प्रथा द्राविडीची नव्हे. परंतु द्राविडी शब्द अनेक आल्यामुळें मराठीनें कांहीं सामासिक शब्द (आर्य + द्राविडी) बनविले.

भाषेच्या वरील चार प्रकरणांत द्राविडीचा संपर्क यादव-मराठीला लागला. याखेरीज ९ फारशी व ३ ग्रीक शब्द यादव-मराठींत आहेत. पैकीं फारशी शब्द साक्षात् व ग्रीक शब्द संस्कृत-प्राकृतद्वारा आले. यादवकालीं मराठीला फारशीचा संपर्क अगदीं नव्हता अशी राजवाड्यांसारख्यांची समजूत आहे, ती वरील नऊ फारशी शब्दांनीं लोपेल.

वर सांगितलेल्या द्राविडी शब्दांखेरीज आणखी कितीतरी शब्द संस्कृतांत द्राविडींतून आले असें डॉ० काल्डवेल[1], डॉ. गुंडार्ट[2], डॉ. किटेल्[3] वगैरे विद्वान् आपापल्या निबंधांत सांगतात. परंतु हा प्रश्न संस्कृताच्या प्रांतांतील असल्यानें येथें चर्च्य नाहीं. शाब्दिक ऋण सोडलें तरी व्याकरणाबाबत आधुनिक इंडो-आर्यन आणि विशेषतः मराठी, बऱ्याच बाबींत द्राविडीचें अनुकरण करिते असें वरील पंडितांचें व प्रो० जागिरदार यांचें[4] आग्रहाचें म्हणणें आहे. या प्रश्नाचा निरंग दृष्टीनें अभ्यास झाला पाहिजे. डॉ० काल्डवेल आणि प्रो० जागिरदार यांच्या कांहीं बाबी मीं पुढें साधार खोडिल्या आहेत. प्रो० जोशी यांनीं दिलेली ज्ञानेश्वरींतील कानडी शब्दांची यादी ही उपयुक्त असली तरी तितकी शुद्ध नाहीं. उदा० परि (सं० पर्याय); पवाडे (सं० प्रवाद); परिया (सं० परि + इ); हे शब्द संस्कृत व अस्सल आर्य असून त्यांनीं द्राविडी मानले आहेत. प्रो० उपाध्ये यांच्या यादीचाहि[5] उपयोग एतत्प्रकरणीं बराच आहे.

१ Comparative Grammar of Dravidian Languages.— Part VII, Glossorial Affinities.

२ Dravidian Element in Sanskrit: J. G. O. S. 1869

३ Some borrowings by Sanskrit from Dravidian. Ind. Antiquary, 1872

४ Seventh Oriental Conference, Baroda. 1933.

५ A. N. Upadhye: Kanarese Words in Desi Lexicons: Annals of B. O. R. I. Vol. XII

वर्तमान मराठींतील एकदोन वाक्प्रचार मूळचे द्राविडी असावेत असें दिसतें. यादव-मराठींत ते आढळत नाहींत. अर्थात् यादवोत्तर कालीं ते मराठींत रूढ झाले. पैकीं पहिला ' गंगेंत घोडें न्हाणें ' हा होय. वासुदेवशास्त्री खऱ्यांच्या मतें हा वाक्प्रचार शिवकालीन होय. मराठींत तो तसा असेल; परंतु कानडींत तो इ० स० ९४१ च्या सुमारास पंप कवीनें लिहिलेल्या ' विक्रमार्जुनविजय ' या काव्यांत आढळतो. पंप म्हणतो—

" गंगावार्धियो लात्मतुरंगमंभिसिसि नेगळ्दु " – श्लो० ३८ (तो आपल्या घोड्यांना गंगानदीचें स्नान घालून प्रख्यात झाला.)

" गाढवाचा नांगर फिरणें " हा दुसरा वाक्प्रचार होय. हरिभद्रि व हेमचंद्र या जैन ग्रंथकारांनीं आपल्या अनुक्रमें ' आवश्यकवृत्ति ' व ' वीरचरित्र ' या ग्रंथांत तो वापरला आहे. हा मध्ययुगीन उल्लेख झाला. याच्याहि पूर्वीचा पुरावा ' खारवेलच्या **हाथीगुंफा**[२] ' येथील लेखांत मिळतो. (इ० स० पूर्वी साधारण २०० वर्षें). या दोन वाक्प्रचारांकरितां मी श्री० ग० ह० खरे यांचा आभारी आहें.

असो. तात्पर्य, परकीय भाषांचा, विशेषतः द्राविडीचा, परिणाम यादव-मराठीवर शब्दकोश आणि वर्णप्रक्रिया या बाबींत अधिक आढळतो. प्रत्ययप्रक्रियेवर त्या मानानें तो फारच अल्प आहे.

§ १४ यादव-मराठीची घटना

कोणत्याहि भाषेची घटना तिच्यांतील शब्दप्रकारांवरून ध्यानांत येते. प्राकृत, अपभ्रंश व वर्तमान आर्य भाषांत तीन प्रकारचे शब्द आढळतात.

१ तत्सम,
२ तद्भव,
३ परकीय.

यांचें प्रमाण कळलें तर त्या त्या भाषेची घडण उकलण्यास मदत होते. म्हणून पुढें यादव-मराठीसंबंधीं ही चर्चा करतों. नमुने मुद्दाम भाषेच्या निरनिराळ्या थरांतून निवडले आहेत. शिवाय त्यांत कोठें तांत्रिक स्वरूपाचा

१ भा० इ० सं० मं०, षष्ठ संमेलनवृत्त, पा० ६८

२ एपिग्राफिआ इंडिका, व्हॉ० २०, पा० ४४ व ७९

भाग येऊं दिलेला नाहीं. कारण तांत्रिक उताऱ्यांत संस्कृत शब्दांचें प्रमाण अवास्तव असतें. एतावता, सर्वसामान्य वेंचे घेऊन त्यांतील शब्दघटनेचें प्रमाण देतों व शेवटीं या सर्व थरांच्या समालोचनानें एकंदर यादव-मराठींतील शब्दांचे भेद शेंकडेवारी देतों—

१ श्रीज्ञानेश्वरी (नागर पद्य) **अध्याय ९**

"तरि अवधान एकलें देइजे । मग सर्व सुखांसि पत्र घेइजे ।
हें प्रतिज्ञोत्तर माझें । उघड आइका ॥ १ ॥
परि प्रौढी न बोलें हो जी । तुम्हां सर्वज्ञांचां समाजीं ।
देया अवधान म्हणे हे माझी । विनवणी सलगी ॥ २ ॥
कां जे ललेयाचे लले सरति । मनोरथाचे मनौरे पुरति ।
जरि माह्येरें श्रीमंतें होंति । तुम्हा ऐसीं ॥ ३ ॥
तुमचेया दीठिवेयाचिये खोले । सांसिनले प्रसन्नतेचे मळे ।
ते साउली देखौनि लोले । श्रांतु जी मी ॥ ४ ॥
तुम्ही सुखामृताचे डोहो । म्हणौनि आपुलिया सवें बोल्हावों लाहों ।
आणि एथहि सलगी करुं जरि बिहों । तरि निवों कें पां ॥ ५ ॥
आणि बालक बोबडां बोलीं । कां वांकुडां विचुकीं पाउलीं ।
चोज करूनि माउली । रिझवी जेवि ॥ ६ ॥
तेवि तुम्हां संतांचा पढियो । कैसेनि तऱ्ही आम्हावरि हो ।
इया वहुवा अङुकी जी आहों । सलगी करित ॥ ७ ॥
वांचूनि माझिये बोलतिये योग्यते । सर्वज्ञ भवादृश श्रोते ।
काइ धडेयावरि सारस्वतें । पढों सिकिजे ॥ ८ ॥
अवधारा आवडे तेसणा धुंधुरु । परि महातेजीं न भिरवे काइ करुं ।
अमृताचां ताटीं वोगरुं । ऐसिं रसोयें कैचीं ॥ ९ ॥
हां हो हिमकरा वीजणें । किं नादापुढां आइकवणें ।
लेणेयांसि हें लेणें । केहीं आहे" ॥ १० ॥

तत्सम शब्द: अवधान, एकलें, सर्वसुखांसि, पत्र, प्रतिज्ञोत्तर, परि, प्रौढी, न, सर्वज्ञांचां, समाजीं, मनोरथ, श्रीमंत, प्रसन्नता, श्रांतु, सुखामृत, बालक, संत, वहु, योग्यता, भवादृश, श्रोता, सारस्वत, अवधारा, महातेज, अमृत, हिमकर, नाद, धुंधुरु.

तद्भव शब्द: तरि, देइजे, मग, घेइजे, हें, माझे, उघड, आइकां, बोलें, होजी, तुम्हां, देया, म्हणे, विनवणी, सलगि, कां, जे, सरति, पुरति, मनौरे, जरि, माह्येरें, होंति, ऐसीं, दिठी, सांसिन्नले, मळे, ते, साउली, देखौनि, लोले, जी, मी, आपुलिया, सवें, वोल्हावों, लाहों, आणि एथही, करुं, विहों, निवों, कें, पां, बोलीं, वांकुडां, पाउलीं, माउली, रिझवी, जेवि, तेवि, पढियो, कैसेनि, हो, इया, अलुकी, आहों, वांचूनि, कांइ, धडेयावरी, पढों, सिकिजे, आवडे, तेसणा, मिरवे, ताटीं, ऐसीं, रसोयें, कैचीं, वीजणें, हांहो, आइकवणें, लेणें, केहीं.

देशी व इतर शब्द : खोले, डोहो, बोवडां, चोज, वोगरुं, विचुकीं.

प्रमाण :	तत्सम	शेंकडा	२३
	तद्भव	,,	६४
	इतर	,,	४॥

२ **दृष्टान्तपाठ**—दृ० ९८ वा (लौकिक गद्य).

"कव्हणी एकि लेंकुरवाळी माता असे : ते कव्हणी लेंकरु काइसेनि बुझावी : कव्हणी लेंकरु काइसेनि बुझावी : एक ते काइसेनिही बुझावे ना : तेयासि तीची कडेचि होआवी : ते म्हणीयाचेनि लाहें झडती नीगे : तें देखे : तवं पाठीं धांवे : न देखे तेथचि लोळणि घाली : मग सेजोया साइलीया असति तीया तेयातें बुझाउं रीगति : तें तयांचें तोंड पाहे इतुलेनि तें तयांचेनि न बुझावे : मग ते म्हणे हें कव्हणाचेनिहीं न बुझावे : मग म्हणीये सारूनि झडती ये : पाटाउवाचेनि पालवें लाळ सेंबुड पुसौनि कडीए घेउनि स्तनपान दे।"

तत्सम : एकि, माता, असे, ना, स्तनपान.

तद्भव : कव्हणी, तें, काइसेनि, बुझावी, तेयासि, तीची, कडेचि, होआवी, म्हणीयाचेनि, लाहें, झडती, नीगे, देखे, तवं, पाठीं, धांवें, तेथचि, लोळणी, घाली, मग, सेजीया, साइलीया, रीगति, तोंड, पाहे, इतुलेनि, म्हणे, सारूनि, ये, पाटाउवाचेनि, पालवें, लाळ, पुसौनि, घेउनि, दे, सेंबुड.

इतर : लेंकरु

प्रमाण : तत्सम शेंकडा १२
तद्भव ,, ८६
इतर ,, २

३ **पूजावसर** (नित्यदिनीलीळा) नागर गद्य :

" बाईसें : भीतरिला ओटेआंवरी : आसनु रचीती : आड कानवडा लावीती : ताट करीती : गोसावी भीतरीं बीजें करौनि : आसनीं उपविष्ट होती : बाइसें निंबलोणु करीती : तंवं सर्वज्ञां आरोगणा होएः पौळी तर चौतकोरु : मांडा तर दीढ : पुरी तर एकि : तुप भातु कढीः दोनि शाकवतिआ : पहितु धृतु : पाठीं तक्रभातुसी : सर्वज्ञांची श्रीमंत सकुमारु आरोगणा होए : मग गोसावियासि गुळणा होए : श्रीकर प्रक्षालन होए : आन सर्वज्ञांचा श्रीकरीं चंदन ओळगवीती : चंदनें दोनि श्रीकरें उलळीती : श्रीकरीं सपूरदाहवा ओळगवीती : श्रीकर परमार्जीती : भट्ट : गोसाविआंचेआं श्रीकरीं सकर्पूरा फोडीं ओळगवीती : वीडिआ करौनि देती : गोसांवी भट्टांचा हातु धरौनि : आरोग्य वाउली शतपदीं वेढें करीती : बाइसें ओटा झाडीती : पद्मासनु असें तें शयनासनु रचीती : पुहुडु स्वीकारीती । "

प्रमाण : तत्सम शेंकडा ३१
तद्भव ,, ६२
इतर ,, ६ (आरोगणा, मांडा, तुप, ओळगवीती)

४ **पाटण शिलालेख** : इ० स० १२०८

" इयां पाटणीं जें केणें उघडे तेहाचा आसि आउं जो राउला होता ग्राहकापासी तो मढा दीन्हला । ब्राह्मणां जें विक्रतेयापासीं ब्रह्मोत्तर तें ब्राह्मणीं दीन्हलें । ग्राहकापासीं दामाचा वीसोवा आसूपाठीं गनरें दीन्हला । तुलदाइयां बैलां सिद्धवै । बाहीरिला आसूपाठीं-गिधवें ग्राहकापासीं । पांच पोफली ग्राहकापासीं । पहिलेआ घाणेआ दाणाची लोटि मठा दीन्हली । जेती घाणे वांहती तेतीयांप्रति पली पली तेला । एथ जे मविजे ते मढीचेन मापें मवावें । मापाऊं मढा अर्द्ध मापहारी ।

रूपाचें सूंक तथा भूमिः । चतुराघाट विशुद्ध ओडुग्रामु पश्रड वालेआ कामतामध्यें चहवंटा । एकलवंटा । पंडितांचा कामतु ।"

प्रमाण :	तत्सम	शेंकडा	२५
	तद्भव	,,	७५
	इतर	,,	४

वर यादव-मराठीचे चार थर पाहिले. त्यांत, नागर पद्यांत म्हणजे श्रीज्ञानेश्वरींत तत्सम शब्द सर्वांत अधिक, तर लौकिक गद्यांत म्हणजे दृष्टान्त-पाठांत ते सर्वांत कमी आहेत. शिलालेखांत तत्सम बरेच आहेत. तद्भव शब्द लौकिक गद्यांत सर्वांत अधिक येतात. देशी शब्द मुख्यतः कानडींतून आलेले आहेत. भाषेचे हे चार थर विचारांत घेऊन यादव-मराठींतील शब्दांची शेंकडेवारी पुढें देतों—

यादव-मराठींतील शब्द :	तत्सम	तद्भव	देशी व इतर
शेंकडा	२३	७२	५

§ १५ यादव-मराठी आणि अपभ्रंश

येथवर प्राकृत अपभ्रंशाचा इतिहास, आणि यादव-मराठीची वर्णप्रक्रिया, प्रत्ययप्रक्रिया, शब्दसिद्धि, वाक्प्रयोग आणि तत्सम, तद्भव व देशी शब्दांचें शेंकडा प्रमाण इत्यादि गोष्टींचा आढावा घेतला. त्यावरून आतां महाराष्ट्री-अपभ्रंश आणि यादव-मराठी यांतील दुवा नीट जुळवून दाखवितां येईल. तो जुळवितांना जैन-अपभ्रंशाचाच आधार मी घेत आहें. मागें हा जैन-अपभ्रंश म्हणजेच महाराष्ट्री-अपभ्रंश असें प्रतिपादिलें असल्यानें येथें त्याचा आणखी विस्तार करीत नाहीं. एका भाषेचा दुसरीशीं दुवा जोडतांना वर्णप्रक्रिया आणि प्रत्ययप्रक्रिया हींच भाषेचीं दोन अंगें मुख्यतः तपासावीं लागतात. शब्दसिद्धि व वाक्प्रयोग इत्यादि बाबींना त्या मानानें महत्त्व कमी. डॉ॰ काल्डवेलनें जे उद्गार परभाषेच्या परिणामासंबंधीं[१] काढले आहेत, तेच एकंदर भाषेच्या स्वभावालाहि लागू पडतात. ते असे—

१ Dr, Caldwell : "Comp. Grammar of Dravidian Langs." pp. 452

"Declensional and conjugational forms are the bones and sinews of language, and retain for ages both their shape and their significance. Hence comparative vocabulary is inferior to comparative grammar."

तेव्हां यादव-मराठीच्या कोणत्या घटनाविषयक बाबी **महाराष्ट्री–अपभ्रंशापासून साक्षात् निघाल्या** तें पुढें सांगतों—

§ १६ उच्चारप्रक्रिया

यादव-मराठीची उच्चारप्रक्रिया म्हणजे अपभ्रंशांतील उच्चारपद्धतीचीच उत्क्रांत अवस्था होय. अपभ्रंशांतील स्वर व व्यंजनें यादव-मराठींत उतरलीं असून त्याखेरीज 'ऐ' व 'औ' हे संयुक्त स्वर स्वरांतर्गत व्यंजनलोपामुळें उत्पन्न होणाऱ्या स्वरांच्या संयोगानें झालेले आहेत. अर्थात् ही अपभ्रंशाच्या पुढची पायरी होय (भाग १, क्र० १). अपभ्रंशांतील 'च, छ, ज, झ' यांचे दंत्यतालव्य उच्चार यादव-मराठींतहि आले. संयुक्त वा द्वित्त व्यंजनांच्या ठिकाणीं साधें व्यंजन येऊन शब्दाचा तोल सांभाळण्यासाठीं मागील स्वर दीर्घ होण्याची प्रक्रिया अपभ्रंशांत नाहीं. यादव-मराठींत नित्य आहे. परंतु हा भेद नसून ही उच्चारविषयक उत्क्रांति म्हणजेच उच्चारप्रक्रिया आहे. एतत्प्रकरणीं **पुढील बाबी यादव-मराठीनें साक्षात् अपभ्रंशापासून घेतल्या.**

१ संस्कृत 'ऋ'च्या 'अ, इ, उ' या प्रक्रिया.

२ स्थाननियत स्वरप्रक्रिया.

३ अंत्य स्वरांचें ऱ्हस्वीकरणः अपभ्रंशाची ही विशेष लकब यादव-मराठींत पुष्कळ अंशानें दिसते. वर्तमानआर्यभाषांतील बहुतेकींतून अंत्यस्वरलोप आढळतो. परंतु यादव-मराठींत 'इ' आणि 'उ' हे अपभ्रंशांतील अंत्य स्वर विकल्पानें कायम आहेत व 'अ, आ, इ' या अंत्य स्वरांचाच काय तो लोप झालेला आहे. वर्तमान दक्षिण कोंकणींतहि अंत्य स्वर ऱ्हस्व रूपानें आज कायम आहेत. तात्पर्य, यादवोत्तर कालीं शिष्ट मराठींत अंत्यस्वरलोप सुरु झाला. यादवकालीं अपभ्रंशाचा छाप स्वच्छ दिसतो (भाग १, क्र० ४).

१ Linguistic Survey of India, Vol. VII, p. 188.

४ संस्कृतांतील संयुक्त स्वरांचा ऱ्हस्व स्वर होणें वा विश्लेष होणें हे अपभ्रंशांतील दोन्ही प्रकार यादव-मराठींत आहेत. (ऐ > ए–अइ; औ > ओ – अउ).

५ आद्य ‘ उ ’ व ‘ ओ ’ या स्वरांचा क्वचित् लोप.

६ दोन निकटवर्ती ‘ अ ’ स्वरांचा संधि.

७ ‘ य ’ श्रुति आणि ‘ व ’ श्रुति.

८ नामें व्यंजनान्त न ठेवतां स्वरान्त ठेवण्याची पद्धति.

९ अल्पप्राण व्यंजनलोप व महाप्राण व्यंजनाच्या जागीं ‘ ह ’ असा आदेश होणें.

१० आद्य व्यंजनें बव्हंशीं अविकृत राहणें.

११ कठोर व्यंजनें मृदु होण्याची प्रक्रिया.

१२ य > ज

१३ अंत्य व > उ

१४ म > व

१५ श > स; स > स; ष > छ, ख

१६ संस्कृतांतील आकारान्त नामें अपभ्रंशाप्रमाणें मराठींतहि अकारान्त होतात.

१७ स्वरभक्तीचें प्राबल्य.

१८ आद्य व मध्य संयुक्त व्यंजनांची प्रक्रिया अपभ्रंशाप्रमाणें होते.

१९ ‘ क्ष, ज्ञ, त्य, त्स, द्य, स्थ, स्म, ष्ण, ध्व, ध्य, त्स्य ’ या संयुक्त व्यंजनांच्या अनुक्रमें ‘ ख–झ, ण, च, च्छ, ज, ठ, स, म्ह, न्ह, झ, झ्झ, छ ’ अशा प्रक्रिया.

तात्पर्य, यादव-मराठींतील उच्चार अपभ्रंशांतून वर्णप्रक्रियेच्या नियमांनीं उतरले आहेत. अंत्य स्वराचा अंशतः लोप व अंशतः ऱ्हस्वीकरण म्हणजे अपभ्रंश व यादव-मराठी यांतील एक निश्चित दुवा होय.

§ १७ नामविभक्ति

यादव-मराठीनें नामांचीं व सर्वनामांचीं प्रत्ययी विभक्तिरूपें अपभ्रंशापासूनच घेतलीं आहेत. अपभ्रंशांत जे नामविभक्तीचे प्रत्यय होते तेच

परिणत स्वरूपांत यादव-मराठींत दिसतात. अपभ्रंशांत नामविभक्ति केवळ प्रत्ययी स्वरूपाचीच आहे. पुढें यादव-मराठींत सामासिक म्हणजे शब्द-योगीसाधित नामरूपांना आरंभ झाला. अर्थात् सामासिक रूपें बनविण्याची पद्धति अपभ्रंशापासून वा कोणत्याहि इतर भाषेपासून न येतां ती यादव-मराठींतीलच अंतर्गत परिस्थितीमुळें नवीन उत्पन्न झाली. अपभ्रंशांत नामांचे जे लिंगबदल दृष्टीस पडतात ते पुढें मराठींतहि उतरले. एतत्प्रकरणीं ज्या विशेष लकबा अपभ्रंशांतून आल्या त्या देतों—

(१) पुल्लिंगी अकारान्त नामांच्या प्रथमेचा एकवचनी 'उ'कार. त्याचप्रमाणें अपभ्रंशांत क्वचित् आढळणारा 'ओ' कार.

(२) पुल्लिंगी अकारान्त नामांच्या प्रथमेच्या अनेकवचनीं प्रत्ययलोप करण्याची पद्धति. जसें—

प्रा० पुत्ता > अप० पुत्त > म० पूत.

(३) प्रथमेसारखींच द्वितीयेचीं रूपें करण्याचा गुण. महाराष्ट्रींत द्वितीयेचीं रूपें प्रथमेहून भिन्न आहेत. अपभ्रंशांत व यादव-मराठींत सारखीं आहेत.

(४) तृतीया, चतुर्थी, पंचमी, षष्ठी, सप्तमी व संबोधन यांचीं प्रत्ययी रूपें व प्रत्यय.

(५) पुल्लिंगी अकारान्त नामाखेरीज इतर ठिकाणींहि 'उ'कार जोडण्याचें प्राबल्य. हें अपभ्रंशांतहि होतेंच. उदा० "एत्थु, जेत्थु, तेत्थु, जासु, तासु." (भविसयत्तकहा)

(६) अकारान्त नपुंसकलिंगी नामांचीं प्रथमे-द्वितीयेखेरीज इतर विभक्त्यांचीं रूपें पुल्लिंगी नामांसारखीं करण्याचा गुण.

(७) इकारान्त व ईकारान्त स्त्रीलिंगी नामांतील भेद अपभ्रंशांत नाहीं, तसाच तो यादव-मराठींतहि नाहीं.

(८) अनेकवचनाची अनुनासिक ही जी नियत खूण यादव-मराठींत आहे तिचीं सूक्ष्म बीजें अपभ्रंशांतच तृतीया, षष्ठी आणि सप्तमी यांच्या सानुनासिक अनेकवचनी रूपांत आहे. तात्पर्य, मराठींतील अनेकवचनी अनुनासिक अपभ्रंशद्वारा आलें. (भा० २, क्र० २२)

(९) यादव–मराठींतील विभक्तिरूपांचा एकविधतेकडील कल अपभ्रंशकालींच अंधुक अंधुक दिसतो. अपभ्रंशांत चतुर्थी, पंचमी आणि षष्ठी या विभक्त्यांचीं रूपें बरींचशीं एकविध झालीं होतीं. तसेंच, अपभ्रंशाप्रमाणें प्रथमे-द्वितीयेचीं रूपेंहि यादव–मराठींत सारखींच आहेत. म्हणजे, एकविधतेची जी छटा अपभ्रंशकालीं उदयाला येत होती ती यादवकालीं जवळ जवळ संपूर्णतेला पोहोंचली. शिवाय, अपभ्रंशांत षष्ठी ही विभक्ति अनेक वेळां चतुर्थी व पंचमी यांकरितां वापरली जाई. यादव–मराठींतहि हा प्रकार आहे. यामुळेंच चतुर्थी, पंचमी व षष्ठी या विभक्त्यांचीं प्रत्ययी रूपें ओळखणें कित्येकदां कठिण होतें. इतर प्रत्ययांबरोबर तृतीया आणि सप्तमी या विभक्त्यांचा यादव-मराठींत 'आं' हा अपभ्रंशांत नसणारा प्रत्यय आढळतो. तोहि मराठीनें अनुकरणाच्या नादानेंच सिद्ध केला आहे. तात्पर्य, एकविधतेची प्रवृत्ति आणि षष्ठी विभक्तीचें सर्वगामित्व हीं मराठीनें अपभ्रंशापासूनच उचललीं. आणि हें जर खरें, तर यादव-मराठीनें नवीनच बनविलेल्या 'सामान्यरूपा'चीं अति सूक्ष्म बीजें, अपभ्रंशांतील विभक्तिरूपांचीं एकविधता आणि तिला असणारें षष्ठीचें अधिष्ठान यांत सांपडतील. **तात्पर्य, सामान्यरूप नवीन असलें तरी तें अपभ्रंशांत बीज-रूपानें होतें, किंवा अपभ्रंशांतील एकविध विभक्ति-रूपांनीं यादव-मराठींतील सामान्यरूपाला जन्म दिला हेंच खरें**. सामान्यरूपाची ही उपपत्ति म्हणजे अपभ्रंश आणि यादव-मराठी यांना जोडणारा एक भक्कम दुवा होय (भा० २, क्र० २४). अपभ्रंशांतील षष्ठी या सामान्यविभक्तीपासून यादव-मराठींतील सामान्यरूप निघालें, असें थोडक्यांत म्हणतां येईल.

(१०) यादव-मराठींतील सर्वनामांचीं रूपें अपभ्रंशापासूनच निघतात. तृतीयपुरुषी सर्वनामाचें प्रथमेचें एकवचन अपभ्रंशांतील सामान्य विभक्तीवरून सिद्ध होतें. प्रश्नार्थी 'कवण' हें सर्वनाम

अपभ्रंशांत 'कवण' असेंच आढळतें (हेमचंद्र ४–३६७). यादव-मराठींतील संयुक्त सर्वनामें व सार्वनामिक विशेषणें अपभ्रंशद्वारा येतात (भाग २, क्र० २६).

(११) संख्यावाचक, क्रमवाचक, आणि अंशवाचक विशेषणें अपभ्रंशांतून सिद्ध होतात (भाग २, क्र० २७).

(१२) विशेष्यनिघ्न विशेषणें वापरण्याची प्रथा अपभ्रंशद्वारा आली.

§ १८ क्रियापदविभक्ति

यादव-मराठीनें क्रियापदांचीं प्रत्ययी रूपें व कृदन्त रूपें साक्षात् अपभ्रंशांपासून घेतलीं. संयुक्त क्रियापदें किंवा सामासिक क्रियारूपें मात्र तिनें स्वतंत्रपणें बनविलीं. पुढें अपभ्रंशद्वारा आलेल्या बाबी देतों—

(१) यादव-मराठींतील धात्वादेश अपभ्रंशांतून सिद्ध होतात.

(२) 'वर्तमाने लट्, आज्ञार्थे लोट्, भूते लङ्, विधिलिङ्, भविष्ये लृट्' एवढीं पांच प्रत्ययी क्रियापदरूपें यादव-मराठींत आहेत. अपभ्रंशांतहि नेमकीं हीं पांचच आहेत. प्राकृत-महाराष्ट्रींतच आख्यात विभक्तीचें प्रत्ययी रूप लोपूं लागलें. पुढें अपभ्रंशांत वर्तमान, भूत आणि भविष्य यांचा प्रत्येकीं एकेक लकार व आज्ञार्थ आणि विध्यर्थ इतके प्रत्ययी रूपांनीं व्यक्त होत. त्यांतहि भूतकाळ निष्ठान्त प्रयोगांनींच बव्हंशीं दाखविला जाई. अपभ्रंशांत 'भूते लङ्'चीं रूपें 'आसि–अहेसि' एवढींच काय तीं 'अस्' धातूपुरतीं आढळतात. (पहा–णायकुमारचरिउ, प्रस्तावना, पान ५५) म्हणजे यादव-मराठींतील लङ्चें स्वरूप अपभ्रंशद्वारा आलें असलें तरी अपभ्रंशांत अति विरल असणारीं लङ्चीं रूपें यादव-मराठींत विपुल आहेत (भाग २, क्र० ३३). असो. यादव–मराठींत 'आज्ञार्थे लोट्'चीं रूपें प्रथमपुरुषाच्या एकवचनांत नाहींत. अपभ्रंशांतहि एकवचनी रूपें नाहींत व अनेकवचनी अति विरल आहेत. यादव-मराठींतील 'विधिलिङ्'वर कर्मणीची दाट छाया आहे. अपभ्रंशांत तर हा लिङ् कर्माणि

रूपांनींच व्यक्त होतो. 'भविष्ये लट्'चीं रूपें अपभ्रंशांत आहेत तशींच तीं मराठींत होतात. मात्र त्यांना 'ल' स्वार्थे लागतो. अपभ्रंशांत 'ल' स्वार्थे नाहीं, कारण तेव्हां लट्चीं रूपें लट्च्या रूपांहून भिन्न दिसत. पुढें यादव–मराठींत दोहोंचा घोंटाळा होऊं लागला, म्हणून स्वार्थे 'ल' आवश्यक झाला. तात्पर्य, यादव–मराठींतील आख्यातविभक्ति (प्रत्ययी) सर्वस्वीं अपभ्रंशापासून सिद्ध होते (भाग २, क्र० ३१–४०).

(३) अकरणरूपें अपभ्रंशाप्रमाणेंच होतात (भाग २, क्र० ४१).

(४) यादव–मराठींत कर्मणि व भावे प्रयोगांचीं रूपें 'इज, व, प, पिज' या चार रीतींनीं सिद्ध होतात. पैकीं अपभ्रंशांत 'ज, प, व' या रूपांना आधार मिळतो. 'व' रूप ही केवळ वर्णप्रक्रिया आहे. तात्पर्य, यादव–मराठीनें कर्मणि-भावे रूपें (एका तृतीयान्त भावे प्रयोगाखेरीज) अपभ्रंशांतून घेतलीं (भाग २).

(५) प्रयोजक रूपांचा 'अव' हा प्रत्यय अपभ्रंशद्वाराच सिद्ध होतो (भाग २, क्र० ४३).

(६) कृदंतरूपें अपभ्रंशद्वारा आलीं. अपभ्रंशांतील 'न्त' आणि 'माण' या प्रत्ययांनीं साधिलेल्या कृदंतांवरूनच यादव-मराठीनें वर्तमानकृदंतें बनविलीं. मात्र मराठींत 'आं' वर्तमानकृदंत संयुक्त व विशेषणात्मक आहे. अपभ्रंशांत तें तसें नाहीं. म्हणजे या बाबतींत यादव-मराठी अपभ्रंशाच्या पुढें एक पायरी गेली (भाग २, क्र० ४५). यादव–मराठींतील भूत कृदंतें अपभ्रंशद्वाराच सिद्ध होऊन फक्त त्यांना भूतकाळाची नियत खूण 'ल' स्वार्थे लागते. अपभ्रंशांत स्वार्थे 'ल' वांचून भूतकृदंतें होतात. अव्ययी भूतकृदंतें किंवा ल्यबंतें अपभ्रंशांतील 'ऊण, एविणु, एप्पिणु' या प्रत्ययांवरून सिद्ध होतात. प्रो. ब्लोक म्हणतात तसा त्यांचा संबंध कोणत्याहि विभक्तीशीं नाहीं. तुमन्त व विध्यर्थी कृदंतें हीं अपभ्रंशांतूनच आलीं. यांशिवाय यादव–मराठींत 'आवेया' हा प्रत्यय लागून भविष्यकृदंतें होतात. तीं अपभ्रंशांतून साक्षात् न येतां 'आव' (व्ययी) आणि 'इव'

(अव्ययी) या भविष्य–कृदंतांच्या प्रत्ययांच्या जोडानें बनलीं आहेत. अपभ्रंशांतील ' इवि ' हा तुमंताचा प्रत्यय मराठींत लोपला, तरी तो ' आव ' नें साधलेल्या कृदंतांत एक घटक म्हणून अवशिष्ट आहे (भाग २, क्र० ४४–५०).

एवंच, यादव–मराठीचीं कृदंत रूपें अपभ्रंशापासून सिद्ध होतात.

(७) निपात प्रकरण यादव मराठीनें अपभ्रंशापासूनच घेतलें आणि तें अधिक विस्तृत मात्र केलें (भाग २, क्र० ५४–५८).

§ १९ शब्दसिद्धि आणि वाक्यरचना

(१) यादव–मराठीची तद्धितप्रक्रिया बव्हंशीं अपभ्रंशांतून निघते.

(२) भाववाचक नामें यादव–मराठींत ' पण, पें, एं, इक, ई, ता–ती, इव, त्व, य, आरु, ऐ ' इतक्या प्रत्ययांनीं साधलीं जातात. पैकीं ' पण, पें, एं, ई, इव ' हे प्रत्यय अपभ्रंशांतून आले. अपभ्रंशापेक्षां प्रत्ययांची विविधता यादव-मराठींत अधिक आहे (भाग ३, क्र० ३).

(३) ध्वन्यनुकारी शब्दांची प्रथा मुख्यतः अपभ्रंशांतूनच उतरली. मात्र अपभ्रंशांतील ध्वन्यनुकारी शब्दांचा अतिरेक यादव-मराठींत नाहीं (भाग ३, क्र० ४).

(४) यादव–मराठीनें द्विरुक्त शब्दांचें प्रकरण बव्हंशीं अपभ्रंशद्वारा घेतलें. सादशब्द व सामासिक जोडशब्द हे याला अपवाद होत. बाकीचे द्विरुक्त शब्द, विरोधी जोडशब्द, अकरणदर्शक शब्द इत्यादि परंपरागत आहेत (भाग ३, क्र० ४).

(५) नामधातु आणि क्रियानामें वापरण्याची प्रथा अपभ्रंशद्वारा आली.

(६) संधि विकल्पानें करण्याचा गुण अपभ्रंशापासून आला.

(७) अपभ्रंशांत ' प ' कर्मणि विरल असून, मूळ संस्कृतांतील ' प्य ' चा प्रयोजकाचा अर्थ लोपून त्याला शुद्ध कर्मणीचा अर्थ नुकता कोठें प्राप्त होत होता. अपभ्रंशांत क्वचित् येणारा हा ' प ' कर्मणि यादव–मराठींत कांहीं विशिष्ट धातूंपुरता वारंवार आढळतो (भाग ३, क्र० ९).

(८) सति-सप्तमी व सता-तृतीया यादव-मराठीनें अपभ्रंशद्वारा उचलल्या (भाग ३, क्र० १०).

(९) यादव-मराठीची वाक्यरचना व कारकार्थ हे अपभ्रंशाप्रमाणेंच आहेत. अपभ्रंशकालीं दिसणारी नामिक वाक्यरचना मराठींत आणखी बळावली.

§ २० महाराष्ट्री प्राकृताचे अवशेष

वरील विवेचनावरून यादव-मराठीची वर्णप्रक्रिया व प्रत्ययप्रक्रिया या संपूर्णतः अपभ्रंशापासून निघाल्या हें स्पष्ट होतें. तरीहि महाराष्ट्री प्राकृताचे कांहीं अवशेष मराठींत दिसतात. महाराष्ट्रीचे जे विशेष अपभ्रंशद्वारा मराठींत उतरले ते अर्थातच येथें लक्ष्य नाहींत. तर **ज्या ठिकाणीं यादव-मराठीनें अपभ्रंशाला सोडून महाराष्ट्रीला धरलें आहे अशा बाबी** पुढें देतों. त्यांची सविस्तर चर्चा त्या त्या स्थळीं प्रबंधांत केली आहे.

(१) अकारान्त पुल्लिंगी नामाचें प्र० ए० व० महाराष्ट्रींत सदा ओकारान्त होई, अपभ्रंशांत क्वचित् होई व यादव-मराठींत कांहीं विशिष्ट स्थळीं होई. हा गुण महाराष्ट्रीचा होय (भाग २, क्र० ५).

(२) अकारान्त पुल्लिंगी नामांची क्वचित् आढळणारी सप्रत्ययी द्वितीया साक्षात् महाराष्ट्रींतून आली. महाराष्ट्रींत द्वितीयेचीं रूपें प्रथमेहून भिन्न असतात (भाग २, क्र० ५).

(३) नपुंसकलिंगी अकारान्त नामांचीं प्रथमे-द्वितीयेचीं दोहीं वचनांचीं रूपें पुल्लिंगी रूपांहून भिन्न करण्याचा गुण. अपभ्रंशांत अनेकवचनी रूपेंच तेवढीं भिन्न असतात. परंतु महाराष्ट्रींत दोन्ही वचनांचीं रूपें पुल्लिंगी रूपांहून भिन्न आहेत. याबाबत यादव-मराठी महाराष्ट्रीचें अनुकरण करिते.

(४) पुल्लिंगी-नपुंसकलिंगी नामांत कोठें न दिसणारी सप्तमीच्या अनेकवचनी 'सु-सुं' या महाराष्ट्रींतील प्रत्ययाची ओळख क्वचित् स्त्रीलिंगी रूपांत आढळते. अपभ्रंशांत हा 'सुं' प्रत्यय 'हिं' असा होतो, परंतु यादव-मराठींत स्त्रीलिंगी नामांपुरता 'सि' असा राहतो (भाग २, क्र० २१).

(५) 'मी' या प्रथमपुरुषी सर्वनामाचें प्र० ए० व० महाराष्ट्रींतील रूपाशीं अधिक जुळतें (मी < प्रा० अहम्मि, अम्मि).

यांखेरीज यादव-मराठीनें आख्यातविभक्तिप्रकरण सर्वस्वीं महाराष्ट्रीपासून घेतलें, अपभ्रंशापासून नव्हे, असें प्रो० कृ० पां० कुलकर्णी म्हणतात (मराठी भाषा, पा० १३४). त्यांनीं वि० का० राजवाड्यांच्याच मताचा (ज्ञानेश्वरीचें व्याकरण, पान ७७) अनुकार केला आहे. माझ्या मतें यादव-मराठीनें नामविभक्ति व आख्यातविभक्ति हीं दोन्ही प्रकरणें अपभ्रंशांतूनच घेतलीं. याची सविस्तर चर्चा प्रबंधांत आख्यातप्रकरणीं आली आहे.

(६) अपभ्रंशांत ' हार ' धातूचें प-कर्मणि रूप सांपडत नाहीं. यादव-मराठींत तें आहे. महाराष्ट्रींत ' व्याहृ ' या संस्कृत धातूचा कर्मभावे आदेश ' वाहिप्प ' असा होतो (हेमचंद्र ४-२५३). म्हणजे यादव-मराठींतील ' हार ' धातूचा प-कर्मणि साक्षात् महाराष्ट्रींतील कर्मणि आदेशावरून आला.

§ २१ यादव-मराठीची उत्पत्ति

येथवर अपभ्रंश आणि महाराष्ट्री यांतून यादव-मराठींत उतरलेले विशेष पाहिले. त्यांवरून हें स्पष्ट होतें कीं, यादव-मराठीची उच्चार-प्रक्रिया, प्रत्ययप्रक्रिया आणि शब्दसिद्धि या सर्वस्वीं अपभ्रंशाच्या पुढची पायरी म्हणजे उत्क्रांत अवस्था दर्शवितात. सामासिक नामविभक्ति व सामासिक क्रियापदविभक्ति हीं दोन प्रकरणें मुख्यतः अपभ्रंशांत नसलेलीं मराठीनें स्वतंत्रपणें चालू केलीं. परंतु मराठीनें अपभ्रंशाला सोडल्याचा हा पुरावा नसून, भाषेचें प्रत्ययी स्वरूप लोपत लोपत त्याऐवजीं सामासिक स्वरूप येत होतें त्याची ही साक्ष आहे. एतावता, मराठीचा सांगाडा अपभ्रंशोत्पन्न आहे हें सिद्ध होतें. अपभ्रंशांत न उतरलेल्या अशा महाराष्ट्री-प्राकृताच्या सहाच बाबी यादव-मराठीत आहेत. तेवढ्यांवरून मराठी ही साक्षात् महाराष्ट्रीपासून निघाली असें म्हणतां येणें शक्य नाहीं. यांखेरीज पैशाची-प्राकृतांतील 'न'कार व मागधींतील ' र > ल ' आणि ' स > श ' या प्रक्रिया यादव-मराठींत नित्य आढळतात. परंतु महाराष्ट्री, पैशाची आणि मागधी यांच्या वरील अवशिष्ट लकबा म्हणजे त्यांचें जनकत्व नव्हे. भाषेच्या अविरत संचारांत असे प्रांतिक विशेष येणें अपरिहार्य आहे. यांखेरीज महाराष्ट्रिकांचें ' नाग ' लोकांशीं मिश्रण होऊन मराठी भाषा बनली व त्या दृष्टीनें नाग भाषेचा कांहीं परिणाम मराठीवर दिसतो, असें राजवाडे ' राधामाधवविलास चंपू ' च्या प्रस्तावनेंत

सांगतात. परंतु या म्हणण्याला कसलाहि आधार नाहीं. मराठी भाषा निरनिराळ्या प्राकृत भाषांच्या मिश्रणानें बनली असें मत प्रो० कुलकर्णी मांडतात (मराठी भाषा, पा० १३८). अपभ्रंशाची वर्णप्रक्रिया आणि प्रत्यय-प्रक्रियाच मराठींत अवतरली असतां, तिचा उगम दुसरीकडे शोधण्याचें वस्तुतः कारणच नाहीं. अर्धमागधींतील अनेक विशेष मराठींत दिसतात. परंतु अर्धमागधी आणि महाराष्ट्री-अपभ्रंश वा जैन-अपभ्रंश अति निकट आहेत हें आपण मागें पाहिलेंच. **एतावता यादव-मराठी ही महाराष्ट्री-अपभ्रंशापासून निघाली हें स्पष्ट आहे.**

§ २२ मराठी वृत्तें आणि अपभ्रंश

एतत्प्रकरणीं अपभ्रंशांतील वृत्तांचा आणखी एक आधार आहे. यादव-मराठींतील बहुतेक सारी पद्यरचना ओवी आणि अभंग या वृत्तांत आहे. हीं दोन वृत्तें मराठीनें अपभ्रंशापासून घेतलीं. अपभ्रंशांत 'षट्पदी' नांवाचें एक वृत्त असून त्याची ३ री आणि ६ वी ओळ दीर्घ असते. तेव्हां तिचे दोन विभाग पाडून ३॥ ओळींचें एक याप्रमाणें दोन 'कडवकें' बनविलीं जातात. या साडेतीन ओळींच्या कडवकापासून म्हणजे अर्धचतुष्पदीपासून मराठी ओवी निघाली असें **प्रो० वेलणकर** सांगतात¹. त्यांनीं ओवी शब्दाची पुढील परंपरा बसविली आहे.

सं० अर्धचतुष्पदी (= ३॥ ओळी) अद्धौठवै-अद्धुधवै-अध्दुहवै-हुअवै-होअवै-ओवई-ओवी.

डॉ० कात्रे हे वरील व्युत्पत्ति भाषाशास्त्रदृष्ट्या त्याज्य ठरवून पुढील सुचवितात².

सं० अपपादिका-अववाइआ-ओवैया-ओवी.

---

१ "Apabhramsa and Marathi Metres"—Prof. H. D. Velankar (New Indian Antiquary, Vol. I, No. 4).

२ New Indian Antiquary, Vol. I, No.6, "Notes on Marathi Etymology" —Dr. S. M. Katre.

व्युत्पत्ति कशीहि असली तरी, ३॥ चरणांची, चौथा चरण अर्धा असणारी ओवी अपभ्रंशांतील षट्पदीशीं जुळते हें मात्र खरें. शिवाय ओवी ही षट्पदीप्रमाणेंच मूळांत तालगेय असून हें तालगेयत्व अभंगांतहि आहे. पुढें ज्ञानेश्वरकालीं ही ओवी जेव्हां ग्रांथिक बनली तेव्हां तींतील तालगेयत्व लोपलें, व ती स्वरगेय ओवी किंवा एक वृत्त बनली. यादव-मराठीनें ओवी हें वृत्त सामान्य अशिक्षित लोकांच्या तोंडीं असणाऱ्या लोकगीतांतून घेतलें यांत संशय नाहीं. अपभ्रंशांतील एकंदर पद्यच लौकिक किंवा जानपद स्वरूपाचें आहे हें विचारणीय होय. मराठींत ज्ञानेश्वरांनीं ओवी वृत्त लोकगीतांतून घेतल्याचा पुरावा ज्ञानेश्वरींत मिळतो. पहा—

"तेणें आबालसुबोधें । ओवियेचेनि बंधें ।" (ज्ञा०, १८–१७२१)

"तैसी गाणीव ते मिरवी । गीतें विण रंगु दावी ।" (ज्ञा०, १८-१७२०)

वरील ठिकाणीं ओवी ही 'आबालसुबोध' आणि 'स्वरगेय' असल्याचा उल्लेख आहे. दिंडी, साकी, आरती आणि घनाक्षरी हीं वृत्तेंहि मूळचीं अपभ्रंशांत असल्याचें प्रो० वेलणकरांनीं सिद्ध केलें आहे. तात्पर्य, यादव-मराठीचा सांगाडा मूळचा अपभ्रंशाचा आहे असें विधान वर भाषाशास्त्रदृष्ट्या केलें, त्याला बळकट आधार मराठींतील वृत्तपरीक्षेवरून मिळतो.

§ २३ यादव-मराठीनें स्वतंत्रपणें रूढ केलेले प्रकार

यादव-मराठी ही महाराष्ट्री-अपभ्रंशापासून निघाली व तिनें वर्णप्रक्रियेच्या आणि प्रत्ययप्रक्रियेच्या सर्व बाबी साक्षात् अपभ्रंशापासून उचलल्या हें खरें. परंतु भाषा ही सजीव असल्यानें ती जुनी परंपरा तर चालवितेच, पण नवीन विशेष उत्पन्न करण्याची शक्तिहि तिच्या ठायीं असते. ती विकासप्रवण असल्यानें, भाषाशास्त्राचे जे सर्वसामान्य नियम आहेत त्यांनुसार तिची प्रगति होत असते. 'व्हिटने' यांनीं भाषेच्या सजीवतेची व पुरोगामित्वाची चर्चा केली आहे, तीवरून भाषेचें जुनें स्वरूप पालटत पालटत नवें रूढ होतें व अशा रीतीनें तिची प्रकृति स्थिर नसून

१ Whitney : Origin and growth of Language, Ch. 2

गतिमान असते याची साक्ष मिळते. यादव–मराठी वरील नियमाला अपवाद नाहीं. प्रत्ययी स्वरूपाच्या अपभ्रंशापासून सामासिक स्वरूपाच्या आधुनिक आर्य भाषेकडे कल असणारी यादव–मराठी त्या दृष्टीनें पालटत होती व अपभ्रंशाची वर्णप्रक्रिया आणि प्रत्ययप्राक्रिया या तींत उत्क्रांत स्वरूपांत आढळल्या, तरी तिनें कांहीं बाबी स्वतंत्रपणें उत्पन्न केल्या. **यादव–मराठी ही प्रत्ययी अपभ्रंश आणि सामासिक वर्तमान आर्य भाषा यांना जोडणारा दुवा असल्यानें तींत परंपरेला सोडून केलेले स्वतंत्र प्रयोग अनेक दिसतात.** अशांची चर्चा पुढें करितों—

(अ) वर्णप्रक्रिया :

(१) 'ऋ' व 'विसर्ग' हे प्राकृत, अपभ्रंशांत नाहींत. परंतु यादव–मराठीचें कांहींशा प्रमाणांत संस्कृतीकरण होत असल्यानें तींत तत्सम शब्दांत वरील उच्चार आहेत.

(२) 'ऐ–औ' हे संयुक्त स्वर संस्कृतांत आहेत, प्राकृत अपभ्रंशांत नाहींत. प्राकृतांतील स्वरांतर्गत व्यंजनलोपामुळें उत्पन्न झालेल्या स्वरांच्या संधीनें यादव-मराठी हे संयुक्त स्वर बनविते. ही वर्णप्राक्रिया होय. भाषेचें संस्कृतीकरण नव्हे.

(३) महाराष्ट्रींत व अपभ्रंशांत 'श, ष' हे उष्मे नाहींत. त्यांऐवजीं 'स' होतो. यादव-मराठींत वरील तिन्ही उष्मे आहेत.

(४) अपभ्रंशांत अंत्य स्वराचें ऱ्हस्वीकरण रूढ होतें. यादव–मराठींत तें असून शिवाय अंत्यस्वरलोप होण्यास प्रारंभ झाला. म्हणजे अंत्य स्वर (अविकृत) — ऱ्हस्वीकरण — लोप या तीन पायऱ्यांपैकीं शेवटल्या दोन यादव-मराठींत एकदमच दिसतात. अंत्यस्वरलोप हा ऱ्हस्वीकरणाच्या पुढचा टप्पा होय(भा० १,क्र० ४).

(५) 'ए-ओ' ऐवजीं 'ये-वो' येण्याची प्रवृत्ति यादव-मराठीनें अपभ्रंशापेक्षां अधिक व्यापकत्वानें द्राविडीपासून उचलली (भा० ४, क्र० २).

(६) 'अकरा' (< अप० एग्गारअ < प्रा० एआरह < सं० एकादश) येथें परंपरेला सोडून मराठी आद्य 'ए' चा 'अ' करिते.

(आ) प्रत्ययप्रक्रिया :

(१) अकारान्त पुल्लिंगी नामांचीं, 'आं'कारान्त तृतीयेचीं व 'आं'कारान्त सप्तमीचीं रूपें (भाग २, क्र० ५), आणि ईकारान्त स्त्रीलिंगी नामांचीं 'आं'कारान्त तृ० रूपें (क्र० १८) अपभ्रंशाला सोडून यादव-मराठी बनविते. हा सारा एकविधतेचा व मिथ्यानुकरणाचा परिणाम होय. चतुर्थी, पंचमी, षष्ठी यांचीं रूपें 'आं' कारान्त होतात, म्हणून तृतीया आणि सप्तमी यांचींहि तशींच बनलीं गेलीं. 'आं' हा प्रत्यय लिंगविभक्ति यांच्या उपाधिभेदातीत वापरण्यास यादव-मराठीनें आरंभ केला ही तिच्या सामासिक स्वरूपाची पहिली पायरी म्हणून महत्त्वाची होय.

(२) ऐ-औकारान्त पुल्लिंगी नामें व 'ऐ' कारान्त स्त्रीलिंगी नामें अपभ्रंशांत नसतांना यादव-मराठीनें स्वरसंयोगानें बनविलीं (जसें, दलपतिः > दळवइ > दळवै; जृंभिका > जांभिआ < जांभै; क्र० ९, १०, २०).

(३) 'आ' कारान्त पुल्लिंगी नामें अपभ्रंशांत नाहींत. यादव-मराठींत तीं असल्यानें त्यांचीं विभक्तिरूपें 'एतत्' आणि 'इदं' या सर्वनामांपासून निघालेल्या प्रत्ययांनीं बनलीं आहेत. सार्वनामिक बीजांपासून प्रत्यय साधण्याची यादव-मराठीची ही लकब म्हणजे सामासिक रूपांचा आरंभच होय (भाग २, क्र० ६).

(४) एकविधतेचा नाद आणि षष्ठीचें अनुष्ठान या दोहींमुळें यादव-मराठींत प्रथम सामान्यरूप सिद्ध झालें. सामान्यरूप प्राकृत-अपभ्रंशांत नाहीं. मात्र अपभ्रंशांत त्याचीं अति सूक्ष्म बीजें दिसतात. यादव-मराठींत विकसित सामान्य रूप दृष्टीस पडतें. या सामान्य रूपांतच सामासिक विभक्तीचें बीज आहे (भा० २, क्र० २४).

(५) अपभ्रंशांत नसलेलीं प्रत्ययात्मक शब्दयोगी व शुद्ध शब्दयोगी अव्ययें प्रथम यादव-मराठींत दिसतात. प्रत्ययी विभक्तिरूपें एकविध

झाल्यामुळें कारकार्थ व्यक्तविण्यास अक्षम ठरूं लागलीं. म्हणून शब्दयोगी-साधित विभक्तींचा अवतार झाला. हें यादव-मराठीचें सामासिक स्वरूप होय व तें प्रथम यादवकालीं सुरू झालें (भा० २, क्र० २३-२५).

(६) 'भविष्ये लृट्'च्या अपभ्रंशांतील रूपांत स्वार्थे 'ल' नाहीं. यादव-मराठींत तो नव्यानें आला. लट्चीं आणि लृट्चीं रूपें सारखीं दिसूं लागल्यानें एक नियत चिन्ह म्हणून तो वापरण्यांत आला. मात्र तो विकल्पानें लागतो (भा० २, क्र० ३९).

(७) 'भूते लङ्'चा वापर प्राकृत अपभ्रंशांत अति अल्प आहे. बव्हंशीं धातूचें निष्ठारूपच भूतकाळीं वापरलें जातें. फक्त 'अस्' धातूचीं 'आसि–अहेसि' एवढींच रूपें काय तीं अपभ्रंश-ग्रंथांत दिसतात व हेमचंद्रहि फक्त त्यांचाच तेवढा उल्लेख करितो. यादव–मराठीनें हा 'भूते लङ्' विस्तृत प्रमाणावर वापरण्यास आरंभ केला, तो नवीन होय (भा० २, क्र० ३३).

(८) यादव–मराठी भावे प्रयोगाचा एक विशेष प्रकार वापरते. त्यांत उद्देश्य व पूरक हीं सदा तृतीयान्त असतात. हा प्रकार संस्कृतांत आहे, प्राकृत–अपभ्रंशांत मुळींच नाहीं. तेव्हां येथें यादव-मराठीनें साक्षात् संस्कृताचें अनुकरण केलें आहे. हा प्रकार यादवकालींच दिसतो. पुढें तो लोपला (भा० ३, क्र० ९).

(९) यादव–मराठींत 'आं' प्रत्ययानें साधिलेलीं जातां, करितां, खातां अशीं वर्तमान कृदंतें आहेत व तीं सदा क्रियाविशेषणात्मक असतात. सं० मान > माण > आण > 'आं' हा प्रत्यय नेहमींच्या 'त' वर्तमानकृदंताला लागून हीं सिद्ध होतात. अपभ्रंशांत हा 'माण' प्रत्यय क्वचित् दिसतो, परंतु त्याचें यादव–मराठींतीलप्रमाणें जोडरूप अपभ्रंशांत नाहीं. म्हणजे, प्रत्यय अपभ्रंशद्वारा घेऊन मराठीनें त्याचें जोड व क्रियाविशेषणात्मक रूप बनविलें, तें सर्वस्वीं नवीन होय (भाग २, क्र० ४५).

(१०) प्राकृत–अपभ्रंशांत नसलेलीं कर्तरि भूत कृदंतें यादव–मराठीनें

नवीं बनविलीं. त्यांचीं प्रथमपुरुषी रूपेंच विपुल आढळतात. इतर अति विरल आहेत. कर्मणि भूतकृदंताला लट्च्या प्रथमपुरुषी प्रत्ययाचा जोड होऊन हीं कर्तरि भूत कृदंतें यादव-मराठींत सिद्ध होतात (भाग २, क्र० ४७).

(११) 'आवेया' या प्रत्ययानें यादव-मराठी तुमंतार्थक कृदंतें बनविते. हीं प्राकृत-अपभ्रंशांत नाहींत. मराठींत तीं 'आव' या व्ययी आणि 'इय' या अव्ययी भविष्यकृदंतांच्या प्रत्ययांच्या जोडानें तयार होतात. अपभ्रंशांत 'इवि' हा तुमंताचा एक प्रत्यय आहे. त्याचा उपयोग यादव-मराठी एतत्प्रकरणीं करिते. या जोड कृदंताची वरील उपपत्ति स्वतंत्र आहे (भा० २, क्र० ४९).

(१२) संयुक्त आणि सहाय क्रियापदांची पद्धति यादव-मराठींत नव्यानें दिसते. प्राकृत-अपभ्रंशांत ती कोठेंहि नाहीं. मराठी-शिवाय इतर अर्वाचीन आर्य भाषांच्या इतिहासांतहि संयुक्त क्रियापदाला आरंभ अपभ्रंशकालानंतरच झाला. यांत मुख्य धातूचें कृदन्त रूप व सहाय धातूचें आख्यात रूप यांचा जोड होतो. हें आख्यातविभक्तीचें परिणत असें सामासिक स्वरूप होय (भाग २, क्र० ५१).

(१३) अपभ्रंशांत केवळ वर्तमान कृदंतच संकेतार्थी वापरलें जाई. यादव-मराठीनें वर्तमानकृदंताला 'हो' धातूच्या रूपांचा जोड देऊन संकेतार्थ साधिला. तात्पर्य, मराठींतील संकेतार्थी रूपें कांहीं एका प्रमाणांत नवीन आहेत (भाग २, क्र० ५२).

(इ) शब्दसिद्धि व वाक्यरचना :

(१) यादव-मराठीनें तद्धितप्रक्रिया बरीचशी अपभ्रंशांतून घेतली असली तरी भाववाचक नामांचे 'इक, ता, त्व, आरु, ऐ' हे प्रत्यय तिनें नव्यानें वापरण्यास आरंभ केला. म्हणजे, अपभ्रंशांतील तद्धितप्रत्ययांची संख्या मराठीनें वाढविली (भा० ३, क्र० २–३).

(२) यादव-मराठीनें सादशब्द व सामासिक जोडशब्दें द्राविडी

१ Echo words and Polyglottic words.

भाषांच्या संपर्कानें सर्वस्वीं नवीन बनविले. ते संस्कृत–प्राकृत–अपभ्रंशांत अगदीं नाहींत. परभाषेचा परिणाम होऊन यादव-मराठीनें शब्दसिद्धीचीं हीं दोन साधनें वाढविलीं (भा० ३, क्र० ४)

(३) यादव–मराठीनें ‘ पिज ’ कर्मणि हा ‘ प ’ आणि ‘ इज ’ कर्मणि यांच्या संयोगानें स्वतंत्रपणें साधिला. ही जोड कर्मणीची प्रथा प्राकृत अपभ्रंशांत नाहीं. यादव-मराठींत ती नव्यानें दिसते (भाग ३, क्र० ९).

(४) संस्कृतांतील भावेप्रयोगांत उद्देश्य व पूरक दोन्ही तृतीयान्त असतात. हा भावेप्रयोग महाराष्ट्रींत, अपभ्रंशांत नाहीं, यादव-मराठींत आहे, वर्तमान–मराठींत नाहीं. म्हणजे हा तृतीयान्त भावे यादव-मराठीचा एक विशेषच होय. यादवकालीं भाषेचें कांहीं प्रमाणांत संस्कृतीकरण होत होतें त्याचा हा पुरावा होय (भा० ३, क्र० ९).

(५) संस्कृतांतील ‘ तर–तम ’ व ‘ ईयस–इष्ठ ’ हे तुलनेचे प्रत्यय प्राकृत अपभ्रंशांत आहेत. परंतु यादव-मराठी हे परंपरागत प्रत्यय न वापरतां, शब्दयोगी अव्ययें योजून तरतमभाव व्यक्तविते. हें भाषेचें सामासिक स्वरूप मराठीनें नवीन बनविलें. “तारतम्याचा गुण मराठीनें महाराष्ट्रीपासून घेतला” हें प्रो० कुंळकर्ण्यांचें[१] विधान अयोग्य होय. तो गुण तिनें स्वतंत्रपणें सिद्ध केला (भाग ३, क्र० १२).

§ २४ प्रमुख अनुमानें

वरील सर्व विवेचनावरून आणि प्रबंधांतील चर्चेवरून यादव–मराठी-संबंधीं पुढील अनुमानें करितां येतील. हीं अनुमानें म्हणजे प्रस्तुत प्रबंधांतील मुख्य सिद्धान्ताचा पायाच होय. तीं अशीं—

१ वर्णप्रक्रिया आणि प्रत्ययप्रक्रिया या तपासून पाहतां यादव-मराठी ही साक्षात् महाराष्ट्री-अपभ्रंशापासून निघाली आहे. अपभ्रंशांत नसलेल्या अशा कांहीं किरकोळ बाबी महाराष्ट्री, मागधी व पैशाची या प्राकृत भाषांतून

१ मराठी भाषा उद्गम–विकास, पान १३५

उतरल्या आहेत, हें खरें. तथापि, यादव-मराठीचा सांगाडा महाराष्ट्री-अपभ्रंशापासून आल्यानें तीच मराठीची जननी ठरते.

२ यादव मराठींत इंडो-आर्यन भाषांचीं तीन विविध स्वरूपें एकसमयावच्छेदेंकरून दिसतात, तीं अशीं—

१ प्रत्ययी Synthetical
२ अर्ध-प्रत्ययी Quasi-synthetical
३ सामासिक Analytical.

भाषेचा कल प्रत्ययी स्वरूपापासून सामासिकाकडे असतो, या नियमानें प्रत्ययी प्राकृत-अपभ्रंशांचें सामासिक वर्तमान भाषांत रूपांतर झालें आहे. **या दोहोंमधील यादव-मराठी हा संधिकाल होय. त्यांत प्राचीन प्रत्ययी स्वरूपाचे अवशेष आहेत व अर्वाचीन सामासिक स्वरूपाचे अंकुर आहेत.**

प्रत्ययी स्वरूप प्रत्ययी नामविभक्ति व आख्यात विभक्ति यांत दिसतें व सामासिक स्वरूप शब्दयोगीसाधित विभक्ति आणि संयुक्त क्रियापदें यांत दिसतें. नामविभक्तिप्रक्रियेंतील सामान्यरूप व संयुक्त क्रियापदांतील कृदंत आणि आख्यात यांचा जोड, हीं दोन चिन्हें भाषा सामासिक स्वरूपाकडे वळत असल्याचीं होत. तात्पर्य, एकाच काळांत भाषेचीं प्रत्ययी, अर्धप्रत्ययी व सामासिक हीं तिन्ही रूपें एकदम दिसतात. या दृष्टीनें यादव-मराठीचा अभ्यास भाषाशास्त्राला व एकंदर इंडो-आर्यन भाषांना अत्यवश्य आहे. भाषिक उत्क्रांतीच्या या तीन पायऱ्या तींत असल्यानें, **यादव-मराठी ही प्रत्ययी प्राचीन भाषा व सामासिक अर्वाचीन भाषा या दोघींची प्रातिनिधिक होऊं शकते.**

३ यादव-मराठीला अपभ्रंशाचा अपभ्रंश किंवा सुलभोच्चारप्रवण भाषा न म्हणतां **'संस्कृतीकरणाचा संस्कार झालेला असा उत्क्रांत स्वरूपांतील अपभ्रंश'** म्हणतां येईल. याला पुरावा पुढीलप्रमाणें—

(अ) 'ऋ, ऐ, औ, श, ष' हे प्राकृत-अपभ्रंशांत नसलेले संस्कृत उच्चार यादव-मराठींत नव्यानें आढळतात. पैकीं 'ऋ' हा केवळ तत्सम शब्दांत आहे, व 'ऐ-औ' चा मूळ संस्कृत 'ऐ-औ' शीं संबंध कांहींहि

नाहीं हें खरें. तथापि हे उच्चार प्राकृत-अपभ्रंशांत नव्हते आणि यादव-मराठींत आहेत इतक्यापुरतें भाषेचें संस्कृतीकरणच होय.

(आ) प्राकृत-अपभ्रंशांत लोपलेली द्विवचनाची ओळख यादव-मराठींत तत्सम रूपांतच कां होईना, पण क्वचित् आढळते.

(इ) 'भूते लङ्' हा काळ प्राकृत-अपभ्रंशांत अति विरल असून त्याचीं 'आसि—अहेसि' एवढीं दोन रूपेंच काय तीं आढळतात. यादव-मराठींत हा काळ नित्य वापरांत असून त्याचीं सर्व वचनीं, सर्व पुरुषीं रूपें आहेत. 'भूते लङ्' च्या योजनेचें हें व्यापकत्व म्हणजे संस्कृतचें अनुकरणच होय.

(ई) संस्कृतांतील तृतीयान्त भावेप्रयोग प्राकृत-अपभ्रंशांत नाहीं. यादव-मराठींत तो साक्षात् संस्कृतापासून आला.

(उ) यादव-मराठींतील कांहीं तद्धित प्रत्यय साक्षात् संस्कृतापासून आले आहेत.

(ऊ) यादव-मराठीच्या घटनेंत, विशेषतः नागर पद्यांत, तत्सम शब्दांचें प्रमाण वाढतें आहे. शेंकडा २३ तत्सम शब्द यादव-मराठींत येतात. या संस्कृतीकरणाचें कारण स्पष्ट आहे. प्राकृत-अपभ्रंशाच्या काळांत बौद्ध व जैन मतांचा जोर होता व त्यानुसार ग्रंथ सामान्य किंवा प्राकृत जनांकरितां लिहिले जात. इ० स० ८०० नंतर वैदिक धर्माचा ध्वज पुनश्च झळकला व महाराष्ट्रांत चालुक्य आणि यादव यांच्या राजवटींत संस्कृताचें माहात्म्य वाढलें. त्यामुळें पंडिती संस्कृताची छटा लौकिक प्राकृत भाषेवर पडून मराठी 'सुसंस्कृत' झाली. तात्पर्य, भाषेचें संस्कृतीकरण धर्माच्या व विद्येच्या संस्कृतीकरणामुळें यादवकाळीं झालें.

४ वर्णप्रक्रिया आणि प्रत्ययप्रक्रिया यांबाबत यादव-मराठी ही अपभ्रंशाच्या पुढची पायरी असून तींत वर्तमान-मराठीच्या सामासिक स्वरूपाचीं बीजें स्पष्ट दिसतात.

५ यादव-मराठींत व विशेषतः तिच्यांतील गद्यांत, रूपांची विविधता अपभ्रंशाहून अधिक दिसते.

६ परभाषांचा परिणाम यादव-मराठीवर अत्यल्प आहे व तोहि व्याकरणापेक्षां उच्चार आणि शब्दसिद्धि यांतच अधिक आढळतो.

§ २५ मुख्य प्रमेय

वरील विवेचन आणि सर्वसाधारण अनुमानें यांवरून प्रस्तुत प्रबंधांत जें प्रमेय सिद्ध केलें आहे किंवा जो सिद्धान्त मांडिला आहे, तो असा—

"यादव-मराठी ही संस्कृत-प्राकृत-अपभ्रंश या प्रत्ययी आणि वर्तमान मराठी या सामासिक भाषांच्या मधली स्थिति आहे. तींत भाषेच्या प्रत्ययी स्वरूपाचे अवशेष आणि सामासिक स्वरूपाचीं बीजें दोन्ही आढळतात. अतएव, इंडो-आर्यन भाषांच्या इतिहासांत तिचें स्थान प्रत्ययी प्राचीन आणि सामासिक अर्वाचीन भाषांमधील एक दुवा असें आहे. तात्पर्य, यादव-मराठी ही **'प्रत्ययी–सामासिक'** अशा द्विविध स्वरूपाची भाषा होय."

हाच सिद्धान्त इंग्रजींत पुढीलप्रमाणें मांडतां येईल.

"The Yadav–Marathi represents the medial stage between the Synthetic OIA and MIA on the one hand, and the Analytic NIA on the other. It's position in the history of Indo–Aryan is of **SYNTHETICO-ANALYTICAL** stage."

भाग पहिला

उच्चार-प्रक्रिया Phonology

§ १ यादव-मराठींत खालील उच्चार आढळतात :

स्वर : अ, आ, इ, ई, उ, ऊ, ऋ, ए, ऐ, ओ, औ, ँ

व्यंजनें: क्, ख्, ग्, घ्,
च्, छ्, ज्, झ्,
चॣ, छॣ, जॣ, झॣ,
ट्, ठ्, ड्, ढ्, ण्
त्, थ्, द्, ध्, न्
प्, फ्, ब्, भ्, म्
य्, र्, ल्, व्
श्, ष्, स्, ह्, ळ्

पैकीं ऋ केवळ तत्सम शब्दांतच येतो. 'ऐ' व 'औ' या संस्कृतांतील संयुक्त स्वरांचा लोप अपभ्रंशकालींच झाला होता व त्यांच्या जागीं अनुक्रमें 'ए–ओ' किंवा 'इ–उ' येत. अर्थात् मराठींत 'ऐ' व 'औ' हे संयुक्त स्वर आहेत ते संस्कृतजन्य नाहींत. तर प्राकृतांतील स्वरान्तर्गत व्यंजनलोपामुळें उत्पन्न झालेल्या स्वरांच्या संयोगानें मराठींतील संयुक्त स्वर निघाले.

(जसें— सं० प्रतिज्ञा > प्रा० पइज्जा > म० पैज

सं० जतुगृह > प्रा० जउघर > म० जौहर)

म्हणजे मराठींतील संयुक्त स्वर हे वर्णप्रक्रियेच्या नियमांनीं सिद्ध होतात; राजवाडे म्हणतात[१] त्याप्रमाणें हें संस्कृताचें पुनरुज्जीवन नव्हे. मराठींतील 'चॣ, छॣ, जॣ, झॣ' हे दंत्यतालव्य वर्ण आणि 'ळ्' यासंबंधीं सविस्तर

---

१ ज्ञानेश्वरीचें व्याकरण, पान ३

चर्चा मीं प्रस्तावनेंत केली आहे ती पहावी[1]. पुढें यादव-मराठीची उच्चार-प्रक्रिया देतों.

§ २ 'ऋ' ची प्रक्रिया

पाली भाषेंत 'ऋ' च्या जागीं 'अ, इ, उ, रि, रु, र, रू' हे वर्ण येतें[2]. प्राकृत–अपभ्रंशांत 'ऋ' ची प्रक्रिया पूर्ण होऊन त्याच्या जागीं 'अ, इ, उ' येत. हीच परंपरा पुढें यादव-मराठींत दिसते. पहा—

१ **सं० ऋ > मराठी 'अ':**
शांखळ [शृंखला]; ग्रह [गृह]; तनकट [तृण]; कान्हा [कृष्ण]; व्रषभ [वृषभ]; माहार [मृतहर]; जागा [जागृत]; तहान [तृष्णा]; मऊ [मृदु]; मढें [मृत]; सइ [स्मृति]; नाचणें [नृत्य]; वाड [वृद्ध]; पाठि [पृष्ठ]; पोहा [पृथुक-पहुअ]; जांभै [जृंभा].

२ **सं० ऋ > मराठी 'इ':**
रीतु [ऋतु]; गिधी [गृध्र]; रिद्धि [ऋद्धि]; सरिस [सदृश]; भाई[3] [भ्रातृ]; द्रिढ [दृढ]; श्रींगार [शृंगार]; सींगी [शृंगी]; पीढें [पृष्ठ]; भींगरुटी [भृंगी]; रिणाइतु [ऋण]; दिठी [दृष्टि]; विंचू [वृश्चिक]; रीस [ऋक्ष]; तीज [तृतीय]; हियें [हृदय]; माह्येर [मातृगृह].

३ **सं० ऋ > मराठी 'उ':**
रुख [वृक्ष]; रुसी [ऋषि]; भाऊ [भ्रातृ]; उजू [ऋजु]; पाऊस [प्रावृष्]; पुसणें [पृच्छ्]; आंथुरण [आस्तृ].

यादव-मराठींत 'ऋ' च्या वरील तीन प्रक्रिया होतात. पैकीं 'ऋ > अ' ही सर्वांत अधिक आहे. 'इ' आणि 'उ' प्रक्रियेचीं उदाहरणें वर दिलीं आहेत त्यांहून फारशीं वाढवितां येणार नाहींत. या भिन्न

---

१ पहा, प्रस्तावना क्र० ९

२ Treatment of R in Pali–Dr. S. M. Katre in B. O. R. I. Vol. xvi, pp. 189-201

३ 'भाई' हें रूप अतिकचित् आढळतें. (धवळे पू० ७, नागांव शिलालेख)

भिन्न वर्णांतरांत कोणतेंहि ‘ भेदक ’ तत्त्व न आढळल्यानें प्रो० ब्लोकें यांनीं त्यांची व्यवस्था अंशतः तरी भौगोलिक तत्त्वांवर लाविली आहे. नैर्ऋत्य प्रांतांत ‘ ऋ > अ ’ हीच प्रक्रिया त्यांच्या मतानें विशेष आहे. दुसऱ्या दोन प्रक्रिया मराठीनें मध्यभारतीय बोलींपासून उचलल्या असें ते म्हणतात. ‘ ऋ > उ ’ या प्रक्रियेची उपपत्ति कदाचित् ओष्ठ्य वर्णांच्या संसर्गानें लावितां येईल. परंतु ‘ ऋ > इ ’ या प्रक्रियेची वाट काय ? गुजराती आणि सिंहली या भाषांतहि ‘ अ ’ प्रक्रियाच अधिक आहे. तेव्हां, हें रूपान्तर उच्चार-प्रक्रियेच्या नियमानें न होतां मध्यबोलींच्या परिणामामुळें झालें असेंच मानावें लागतें. प्राकृतांतहि वरील तीन प्रक्रियांसंबंधीं स्पष्ट नियम नाहींत[2]. अशोकाच्या गिरनार शिलालेखांत ‘ ऋ ’ चा ‘ अ ’ होत असून ‘ इ-उ ’ झाल्याचीं स्थळें अत्यल्प आहेत. त्यावरून प्रो० ब्लोक वरील विधानांना बळकटी आणतात.

§ ३ स्थाननियत स्वरप्रक्रिया

आघात Accent

यादव-मराठींतील स्वरप्रक्रिया शब्दांतील स्वरांच्या त्या त्या स्थानावर अवलंबून आहे. येथें साहजिकच स्वराघाताचा प्रश्न पुढें येतो. वैदिक काळीं स्वराघात नव्हता. जो होता तो Musical Accent होता, Stress Accent नव्हता. पाणिनि आदि वैयाकरणांची त्याबाबत मुग्धताच दिसते. अंत्य स्वराचा लोप होणें किंवा उपान्त्य स्वराशीं त्याचा संयोग होणें, उपान्त्य स्वर अन्त्य होऊन दीर्घ होणें, आणि उपान्त्यपूर्व स्वरांची प्रक्रिया होणें या सर्वच गोष्टी डॉ० ग्रीयरसनें[3] हे स्वराघातामुळें मानतात. प्रो० टर्नरें[4] यांनीं आघात-प्रकरणाचा संपूर्ण विचार करून सर्व स्वरप्रक्रिया एका आघातावरच बसविली

१ La Langue Marathe, 31

२ Pischel : Grammatika, 49–53

३ ‘On Stress Accent in Modern IA.’—J. R. A. S. 1895 (pp. 139)

४ ‘ The Indo Gemranic Accent in Marathi’—J. R.A.S. 1916 (pp. 203–250)

आहे. बीम्स हा विषयच मुळीं सोडून देतो. मराठी वैयाकरण साधारणतः आघात प्रश्नाचा विचार करीत नाहींत. प्रो० कृ० पां० कुळकर्ण्यांनीं[2] मात्र आघाताची सोपपत्तिक चर्चा करून वैदिक, संस्कृत, प्राकृत आणि मराठी भाषांतील आघात दाखवून त्यामुळें होणारी स्वरप्रक्रिया सिद्ध केली आहे. मराठींतील आघाताला परंपरा आहे हें त्यांचें मुख्य म्हणणें. डॉ० भांडारकरें[3] यांनीं तर 'आघातनियम' (Law of Accentuation) सिद्ध करून दोन तऱ्हेचे आघात मानले आहेत. ते म्हणतात—

"Thus, these two accents, that on the penultimate when a word ends in the silent "a", and that on the new final, are to be met with in the Vernaculars. The first may be called the original accent, and the second derivative."

—(pp. 160–1)

प्रो० ब्लोकें[4] हे स्वराघात मानीत नाहींत असें नव्हे. तर त्यांच्या मतें स्वराघाताचा इतिहास सुसंबद्धपणें लिहितां येणें पुराव्याच्या अभावीं शक्य नाहीं. एवढ्याचकरितां त्यांनीं या प्रश्नाचा अधिक विचार केलेला नाहीं.

मला स्वतःला प्रो० ब्लोक यांचें विवेचन बरेंचसें पटतें. मात्र स्वराघाताची चर्चा अशक्य होय हें त्यांचें म्हणणें डॉ० भांडारकरांनीं दिलेल्या उदाहरणांवरून सहजच खोडलें जातें. परंतु या चर्चेंतील अडचणीहि पाहिल्या पाहिजेत. यादव-मराठींतील स्वराघातासंबंधीं बोलावयाचें तर या प्रकरणीं कोणता प्रत्यक्ष पुरावा उपलब्ध आहे ? आघात हा मुख्यतः नादाचा असतो आणि आपल्याकडे कोणत्याच भाषेच्या वा भाषिक कालखंडाच्या ध्वनिमुद्रिका नाहींत. पाश्चात्य भाषाशास्त्रज्ञांनीं भाषेचे–विशेषतः तिच्यांतील सूक्ष्म उच्चारांचे–ठसे ध्वनिमुद्रिकांवर कायम केल्यानें आघातप्रकरणीं ते साधार लिहूं शकतात. आपल्याकडे असें कोणतें साधन आहे ? वर्तमान-भाषा प्रत्यक्ष ऐकून एक वेळ आघात-प्रकरण लावितां येईल; परंतु यादवकालीं

१ 'Comparative Grammar' (part 1) pp. 17–20
२ मराठी भाषा उद्गम–विकास, पा. ३११–३१७
३ Wilson Philological Lectures, pp. 154–165
४ La Langue Marathe, 32–34

मराठी भाषा कशी बोलली जाई तें कसें समजणार ? या प्रत्यक्ष प्रमाणाच्या अभावींच, "ज्ञानेश्वराच्या काळींहि व त्यापूर्वींहि बोलण्याच्या भाषेंत 'उ' प्रत्यय नाहींसा झाला होता" असें चुकीचें विधान चिं० वि० वैद्यांसारखे विद्वान् करतात.[1] वस्तुतः 'उ' कार तेव्हांच्या बोली भाषेंतहि असलाच पाहिजे. दुसरें असें, कीं मराठींतील आघात स्थिर नाहीं. तो आपलें स्थान बदलतो, त्याअर्थी विकारी आहे. एतावता, यादव-मराठींतील स्वरप्रक्रिया आघातावरून उपपादिण्याऐवजीं तिचें स्वरूप शब्दामधील स्वराच्या स्थानावरून-अंत्य, उपांत्य, आद्य-ठरविणें हेंच आजच्या परिस्थितींत अधिक बरें वाटतें.

§ ४ अंत्य स्वर

संस्कृतांतील अंत्य व्यंजनें प्राकृतांत लोपून त्यांच्याऐवजीं केवळ स्वर राहिले. या स्वरांवर आघात बसल्यानें ते ऱ्हस्व करण्याकडे प्रवृत्ति होती व तिचीं प्रथम चिन्हें अशोकाच्या शिलालेखांत दिसतात. पुल्लिंगी नामाच्या प्रथमेच्या एकवचनाचें उदाहरण घ्या—

प्राकृत 'ओ' > अप० 'उ' > जुनें मराठी 'उ.' म्हणजे अंत्य स्वर ऱ्हस्व करण्याची लकब अपभ्रंश कालापासून जोरानें चालू झाली. याच परंपरेनें वर्तमान आर्य भाषांतून अंत्य स्वर अजीबात लोपला व या नियमाला अपवाद म्हणून बिहारी, काश्मिरी, सिंधी, सिंहली, नेपाळी आणि दक्षिण कोंकणी या भाषा प्रो० ब्लोक[2] सांगतात. म्हणजे त्यांच्या मतें यादव-मराठींतहि अंत्य स्वर संपूर्णतः लोपला होता असें ठरतें. प्रो० ब्लोक यांचें हें मत सगळेंच खरें नाहीं. कारण, यादव-मराठींत 'इ' आणि 'उ' हे अपभ्रंशांतील अंत्य स्वर विकल्पानें कायम असलेले दिसतात. प्रथमेच्या पुल्लिंगी ए० व० तील 'उ' (पंडितु, विवरु,-पंढरपूर शिललेख); चतुर्थीच्या प्रत्ययांतील 'सि'; वर्तमानकाळाच्या तृ० पु० अ० व० चा प्रत्यय 'अति-इति'-या सर्व रूपांत अंत्य स्वर लोपलेला नाहीं. पुढें अंत्य स्वरांची प्रक्रिया देतों.

१ प्राकृत अ > मराठींत लोप.

---

१ निबंध आणि भाषणें, पान ११९

२ La Langue Marathe, 37

माणूस [मनुष्य]; आठ [सं० अष्ट > अठ्ठ]; पान [पर्णम् > पण्णम]; ताक [तक्रम् > तक्कम]; मन [मनस् > मणं]; काम [कर्म > कम्म]; आतीत [आतिथ्य]; सेंद [संदूक]; 'एं'—तृ० ए० व० प्रत्यय [सं०एन > एण, एणं]; अग्न [अग्नेय]

प्राकृत अ > म० इः आजि [अद्य]; कालि [कल्य]

२ प्राकृत आ > मराठींत लोप.

आस (आशा); जांघ (जंघा); लाज (लज्जा); वाट (वर्त्मन् > वट्टा); वेळ-ळु (वेला); पाडिसाळ (प्रतिशाला); सेज (शय्या); नीज (निद्रा); भीख (भिक्षा); भाख (भाषा)

प्राकृत आ > म० ईः म्हैळी [महिला]; केळी [क्रीडा]

३ प्राकृत इ > मराठींत लोप [विकल्पानें]

आग-गि [अग्निः]; पड-डि [प्रति]; रात–ति [रात्रिः]; कूस [कुक्षिः]

४ प्राकृत ई > मराठी ई-इ.

केळी [कदली]; पांती [पंक्ति]; आंगोळी [अंगुलिः]; सुई [सूचिः]; गोसाविणी [गोस्वामिनी]; तेलिणी [प्रा० तेल्लिणी]; कुकडी [कुक्कुटी]; जरि–तरि [यर्हि–तर्हि]; जोइसि [ज्योतिषी][2]

५ प्राकृत उ, ऊ > मराठी उ, ऊ.

विजू [विद्युत्]; तांथु [तंतुः]; 'औनु-ऊनु'-भूत कृदंताचा प्रत्यय [अप० एप्पिणु, एविणु]; भातारु [भ्रातृ]; 'उ'–पुल्लिंगी प्र० ए० व० प्रत्यय [अप० 'उ': पुत्तु, णरु]

६ प्राकृत ए, ओ > मराठी इ, उ.

'सि'–च० ए० व० प्रत्यय [आर्श्वे]; 'उ-ओ'–पुल्लिंगी प्र० ए० व० प्रत्यय [प्रा० 'ओ' : नायको, राओ]; आम्ही, तुम्ही [< प्रा० अम्हे, तुम्हे]; कान्हु [< प्रा० कान्हो]

---

१ ही स्वरप्रक्रिया अति क्वचित् आढळते. उदा० ली० ३, दृ० ३६

२ पंढरपूर शिलालेख, ओळ ४

वरील प्रक्रिया पाहिल्या म्हणजे वर्तमान-मराठींत जो अंत्यस्वरलोप दिसतो त्याला यादव-मराठींत नुकता कोठें आरंभ झाला होता हें कळून येतें. प्राकृत-अपभ्रंशांतील 'अ, आ, इ' या अंत्य स्वरांचाच काय तो लोप तेव्हां होई. परंतु 'ई, उ, ऊ, ए, ओ' या स्वरांचे लोप न होतां त्यांचें स्वरूप पालटे. याबाबत पुल्लिंगी प्र० ए० व० प्रत्ययाचा पुरावा सबळ आहे.

सं० स् > प्रा० ओ > अप० उ > यादव-मराठी 'उ' अशा परंपरेनें 'प्राकृत-ओ' व 'अपभ्रंश-उ' यादवकालीं होता. या 'उ' चें प्राबल्य इतकें झालें कीं तो इतर लिंगांना, क्रियापदांना, कृदंतांना, व क्वचित् क्रियाविशेषणांनाहि लागूं लागला. 'करितु, जातु, नावेकु, आशु, फलु' अशीं उकारान्त रूपें विपुल आढळतात. म्हणजे तत्कालीं अंत्य स्वर उच्चारण्याचीच प्रवृत्ति होती, त्याचा लोप करण्याची नव्हती, हें या उकारावरून स्पष्ट आहे. दुसरें असें, कीं वर्तमान दक्षिण-कोंकणींत[१] अंत्य स्वर ऱ्हस्व रूपानें शिल्लक आहेत. प्रो० ब्लोकं[२] यांच्या मतें हे द्राविडी भाषांच्या संसर्गानें राहिले आहेत. वस्तुतः हे द्राविडीमुळें नव्हत, तर मूळचे आर्यच आहेत. डॉ० कात्रे[३] म्हणतात त्याप्रमाणें इ० स० १६०० च्या सुमारास गोंव्याचे ब्राह्मण दक्षिण कानडांत गेले ते बरोबर ऱ्हस्व अंत्य स्वरांचे उच्चार घेऊन आले व पुढें आजतागायत त्यांनीं ते कानडीच्या संसर्गामुळें कायम टिकविले आहेत. डॉ० कात्रे म्हणतात—

"We are thus restricted to the first alternative that when the Konkani spoken by Kanara Sarasvats, Gouda Sarasvats, and Christians of S. Kanara, separated from Goa stock, the final vowel was still pronounced, and it was only subsequent to this separation that the Northern dialects lost this vowel." (p. 107)

तात्पर्य, यादव-कालीं अंत्य स्वर पुष्कळ प्रमाणांत कायम होते, यादवोत्तर कालीं त्यांचा संपूर्ण लोप झाला, हेंच खरें. प्रांतिक बोलींची वाढ स्वतंत्र कशी असते, तें येथें दिसतें.

---

१ Dr. Grierson: Linguistic Survey of India, vol. VII, p. 188

२ La Langue Marathe. 37

३ Formation of Konkani, 17 (B. O. R. I. Vol. 18, part II)

§ ५ उपांत्य स्वर

महाराष्ट्री-प्राकृतांतील उपांत्य स्वर यादव-मराठींत बहुशः कायम आहेत. मात्र ऱ्हस्वाचे दीर्घ आणि दीर्घाचे ऱ्हस्व होतात. परंतु जुन्या पोथ्यांतून ऱ्हस्वदीर्घांचा नियम पाळलेला नाहीं. ज्ञानेश्वरीच्या राजवाडे प्रतींत व महानुभाव ग्रंथांत ऱ्हस्व–दीर्घाची निश्चिति नाहीं. तेव्हां त्या संबंधीं लिहिणें अशक्य आहे. पुढें प्रथम नियमित रूपें देऊन नंतर अपवाद देतों—

प्रा० अ > म० अ : माकड (मर्कट); पाथर (प्रस्तरः); कवाड (कपाट); सवत (सपत्नी); इंगल (अंगार); शांखळ (शृंखला); दुकळु (दुष्काळ); कुंवर (कुमार)

स्वरमात्रेंतच केवळ बदल होतो, स्वरोच्चारांत नाहीं.

प्रा० इ, उ > म० इ, उः दळवइ (दलपतिः); माणूस (मनुष्य); पूंस (पुच्छ); वांवरूल (वामरूल); मांजिठी (मंजिष्ठ); पाइक (पदिक); आंविस (आमिष); नारिएळ (नारिकेल)

वरील रूपांत उपांत्य स्वर अविकृत आहे. परंतु याला अपवादात्मक अशीं बरींच उदाहरणें सांपडतात. जसें—

प्रा० अ : देशाउर (देशांतर); सांबारीव (संभारः); लोणीचें (लवण–); कामीठा (कर्मस्थानं)

प्रा० इ : उबग (उद्विग्न); मिथळा (मिथिला); निसाणि (निःश्रेणि)

प्रा० उः जावळ (युगुल); कुकडी (कुक्कुटी); सींगी (शृंगी)

प्रो० ब्लोक् यांनीं वरील भिन्न रूपांची उपपत्ति गुजराती-हिंदीपासून सुचविली आहे. वस्तुतः अशी शंका घेण्याचें कारण नाहीं. उपांत्य स्वर कायम राहणें वा बदलणें असे दोन्ही प्रकार मराठीचेच मानावेत. प्राकृत वैयाकरणहि क्वचित् उपांत्य–' इ ' चा ' अ ' झालेला सांगतात.

प्राकृतांतील उपांत्य स्वर मराठींत पुष्कळ ठिकाणीं अंत्य झालेला

१ Pischel : Grammatika, 115; and Hemachandra : VIII.i.88—

दिसतो. स्वरांतर्गत व्यंजनांच्या लोपामुळें ही प्रक्रिया संभवते. पहा—

हात (हस्त); नागारी (नागरिक); गहूं (गोधूम); बीं (बीज); म्हैळी (महिला); नौवरी (नववरिका); गौमासी (गोमक्षिका) आंडौरी (अंतःपुरिका)

क्वचित् कोठें उपांत्य आ ऱ्हस्व होतो. उदा० पैठण (प्रतिष्ठान); मसणवट (श्मशान); इंगळ (अंगार); कुंवरी (कुमारी)

§ ६ उपांत्यपूर्व स्वर (Prepenultimate Vowels)

१. आद्याक्षरांतः आद्याक्षरावर साधारणतः आघात असल्यानें त्याची प्रक्रिया मराठींत फारशी नाहीं. परंतु स्वरप्रक्रिया नसली तरी मात्राप्रक्रिया भरपूर आहे. म्हणजे ऱ्हस्वीकरण विपुल आढळतें.

अ < अ : कढ (कथ्); फटिकु (स्फटिक); पन्हरें (पंचदश); अझुइं (अद्यापि); कव्हण (कः पुनर्); कसवटी (कर्षपट्टिका); घसणी (घर्ष); दलवै (दलपतिः); नडनाच (नटनृत्य); पडिसाद (प्रतिशब्द); मऱ्हाटी (महाराष्ट्री); संदु (छंदः); सवं (सम); कदन (कर्दन); गजराउ (गर्ज्); घडिवट (घटिकापात्र); नळनी (नलिनी) पडदनी (पटद्विगुण); पवाड (प्रवृद्ध); भवंर (भ्रमर); महुर (मधुर); छत्तीस (षट्त्रिंशत्); पसाय (प्रसाद); धवळे (धव+ल); वरंव (वरम्); सए (सखे); कवडा (कपर्दिक): ; दहिभातु (दधि-); मढ (मठ); बनकर (वनकर); तण्हार (तृणागार); धवड्डूं (धृष्ट :); अढाळ (आधार); म्हणौनि (भणित्वा)

आ < आः कांडगुंडा (कांड-); कापडी (कार्पटिक); गांव (ग्राम) जाणत (ज्ञायत्); ताराण (तारुण्य); दारवंडा (द्वार); धाकिन्नलां (ध्राक्); धाडी (ध्राड्); पाणियडा (पानीयवटः); पाहुणेर (प्राघूर्ण); पार्यातक (पारिजातक); मानकुल (माणिक्यं+ल); माहो (माघः); राणा (राजन्); साइली (छाया); ठाणवै (स्थानवती); घाय (घातः); जाकलिजत (व्याकुल); पाहे (प्रार्थ्); वाखाणिले (व्याख्या); सावेव (सावयव); आइती (आयत्); टाळ (तालः); दाय (दान); बावन (का० बावन) हाकारणें (हाक्); जाई (जाति); सांवळा (श्यामल); सावंतु (सामंत); राउळ (राजकुल); नारिएल (नारिकेल); साडे (सार्ध); दाम (द्राम);

वाओ (वातः); पावणें (प्राप्); सांतव (सामंत); भांगार (का॰ भांगार); सावज (श्वापद); गाणें–वाणें (गायनं वादनं); हाउळी (आवली); साहाण (पाषाण); भाख (भाषा)

आ < अ (प्रा॰) : आंकणें (अंक्); आंगलग (अंग–); आनान (अन्य अन्य); आगी (अग्निः); आझुइं (अद्यापि); आथि (अस्ति); आपणपें (आत्मत्वं); आरौत (अरतस्); आंविस (अमिष); कांटी (कंटकः); ठाओ (स्थः); तातलें (तप्त); पाइक (पदिक); पांगूळ (पंगु); पांचाखरी (पंचाक्षरी); पांजिरा (पंजरः); पालव (पल्लवः); पाहारु (प्रहरः); माझारीं (मध्यगृहं); राणी (राज्ञी–प्रा॰ रण्णी); सांपें (संप्रति); कापूरकेळि (कर्पूर-); कामाठी (कर्मस्थानं); खांद (स्कंधः); गाभेवन (गर्भपर्ण); चाउरी (चतुरिका); चाकवरा (चक्रवातः); दांतिरी (दंतः); पाख (पक्षः ;) मादना (·मर्दनं); हाथोबा (हस्त-); काजळ (कज्जल); कांसव (कच्छप); गाढव (गर्दभ); चांदिणें (चंद्रिका); चामडें (चर्म); जांघ (जंघा); जांभै (जृंभा); पाथर (प्रस्तर); माती (मृत्तिका); माथा (मस्तक); वांकुडें (वक्र); वाढणें (वर्धति); वाती (वर्तिका); वासरूं (वत्स); सांझ (संध्या); कानडें (कर्णाटक); सांसिन्नले (संसद्); आघात (अग्रहस्तः); पायस (पयस्); तांथु (तंतु); आंधणा (अंधस्)

अ > आ : अतीत (आतिथ्य); परावर्ण (प्रावर्ण); पवणें (प्राप्); अवज्ञा (वाह्य); खरसाहाण (क्षार-); चवंरें (चामर); शब्दसिद्धीचे प्रत्यय लागतांना किंवा क्रियापदांचीं रूपें होतांना आद्य 'अ' ऱ्हस्व करण्याकडे यादव-मराठीची प्रवृत्ति आहे. एरव्हीं 'पलंग' (< प्रा॰ पल्ल < सं॰ पर्यंक) व 'पालट' (< प्रा॰ पल्ल < सं॰ पर्यस्त), 'भला' (< प्रा॰ भल्ल < सं॰ भद्र) व 'भाला' (< प्रा॰ भल्ल) या जोड्यांतील ऱ्हस्व 'अ' ची उपपत्ति लागणार नाहीं. शिवाय, मराठींत 'अ' आणि 'आ' हीं अक्षरें पुष्कळ ठिकाणीं वर्णांतील मात्राभेद दाखवितात, उच्चारभेद दाखवीत नाहींत. त्यामुळें हा प्रश्न नीट सोडवितां येत नाहीं.

इ, उ < इ–ई, उ–ऊ : किडरूं (कीटक); किरूं (किल); गुंपणें

१ J. Bloch: La Langue Marathe, 48

(गुप्); तुका (का० तुक्क); कुऱ्हाड (कुठार); जिनि (जीवन); जिव्हार (जीव); टिळा (तिलक); थडिवा (तट); धुळिरा (धूलिः); निच (नित्य); निडळ (प्रा० णिडिळ); निबळ (निर्बल); निलख (निर्लेख); निलाग (निर्लाग); पुढार (पुरस्कार); बिजाखर (बीजाक्षर); रिगणें (रिंघ्); रीतहाती (रिक्त-); विणवणी (विज्ञति); विसंव (विश्रम्); सुरी (क्षुरिका); सुई (सूचिः); तुळसी (तुलसी); पिवळा (पीतल); पिळणें (पीड्;) पुनव (पूर्णिमा)

तसेंच शब्दांतील अंत्य स्वर दीर्घ असल्यास पहिल्याचें ऱ्हस्वीकरण होतें. उदा० किवी (कीटक); रितें (रिक्त); सुनें (शून्य); मुदी (मुद्रिका); सुई (सूचि)

सामान्यतः, द्व्यक्षरी शब्दांत आद्य उ आणि इ हे दीर्घ असतात, व बव्हक्षरी शब्दांत ते ऱ्हस्व असतात. हेंच नियमानें सांगावयाचें तर द्व्यक्षरी शब्दांत 'उपांत्य इ–उ' दीर्घ असतात व सामासिक शब्दांत ते ऱ्हस्व होतात. जसें—

इ : जीवु (जीव); पीठ (पिष्ट); दीठ (दृष्टिः); पीळ (पीड्); सीरी (श्री); दीवी (दीपिका); दीओ (दिवस); फूल (पुष्प)

उ : धूर (धूम); पूत (पुत्र); कूओ (कूप)

हे शब्द सामासिक झाले कीं त्यांतील आद्य इ–उ चें ऱ्हस्वीकरण होतें. जसें–जियाला, दिविआचेनि, धुरांतूनि, फुलौनि.

ए, ओ : हे स्वर वस्तुतः ऱ्हस्व आणि दीर्घ दोन्ही आहेत. परंतु मराठींत हा फरक दाखविण्यास चिन्हें नाहींत. कानडी लिपींत 'ऱ्हस्व ए' व 'ऱ्हस्व ओ' यांकरितां वेगळीं चिन्हें असल्यानें 'एक–एकासाठीं, कोण–कोणाला' यांतील भेद नीट कळतो. पुढील रूपांत ऱ्हस्व ए-ओ दिसतातः—

एकदरें; ओळगविणें (का० वोळग); गोसाविणी (गोस्वामिनी)

दीर्घ ए-ओ—

केणें (क्रयणं); कें (किम्); कोवळें (कोमल); खेंव (क्षेम); खेळ (खेल); खोपा (का० कोप्प); गोरूं (गोरूप); चोराकुळ (चोर-); क्वचित्

---

१ Dr. Grierson: Linguistic Survey of India, Vol. VII, p. 168

ऱ्हस्वीकरण होतां होतां या आद्य स्वरांचा 'अ' होतो. जसें—

अकरा (एकादश); वरि (उपरि)

तात्पर्य आद्याक्षरांतील 'आ, इ, उ' हे स्वर ऱ्हस्व करण्याकडे यादव-मराठीचा कल दिसतो.

यांखेरीज पुढील कांहीं स्वरप्रक्रिया यादव–मराठींत आढळतात, त्या नियमांत बसूं शकत नाहींत. उदा०

उ–ऊ : भूअरी (भ्रम्); सुत्र (क्षेत्र); कुसमळ (कश्मल)

ओ : मोहो (महा)

औ : आनौती (अन्यतः)

ए : सेंद (संदूक)

२. आद्येतराक्षरांत : (In the Non-initial Syllable).

शब्दाच्या अंतर्भागीं 'इ-ई' आणि 'उ-ऊ' या ऱ्हस्व व दीर्घ स्वरांचा यथार्थ उच्चार पुष्कळ ठिकाणीं लोपून त्यांचा 'अ' झालेला आढळतो. उदा०

इ : पडसाद (प्रतिशब्द); पाडवा (प्रतिपद्); पांखरुं-पांखिरुं (पक्षि+रूं); विखरणें (विष्किर); परणैली (परिणय); आगटी (अग्नि); निडळ (निटिल); मिथळा (मिथिला); मनकट (मणिकट); आळंगीले (आलिंगित); वरवड (उपरिपत्); उबगला (उद्विग्न); हळद (हरिद्रा)

ई : याचें प्रथम ऱ्हस्वीकरण होऊन, नंतर तो कायम राहिलाच तर सदा ऱ्हस्व असतो. उदा०

जोइशी (ज्योतिष्); गहिर (गभीर)

उ : आपडणें (आस्पृष्ट); पुरैतु (पुरोहित); माणसांचेनि (मनुष्य); कुकडी (कुक्कुटी); पडदनी (पटद्विगुण); आस्वपात (अश्रुपात); जावळ (युगुल)

ऊ : याची प्रक्रिया 'ई' प्रमाणें होते.

सेंद (संदूक); उन्मळणें (उन्मूलन); ताराण (तारुण्य)

ए : गवसैला (गवेषय्); उडणें (उड्डयते–प्रा० उड्डेइ); पालट (पर्यस्त–प्रा० पल्लेट्ठ); नीसणी (निःश्रेणी); उपखा (उपेक्षा)

ओ : अळणी (अ + लवण); पारसैला (पर्युषित); उटणें (उद्वर्तन- प्रा० उद्वोट्टण); करटी (करोटि); सुहावन (सुशोभन)

' शब्दांतर्गत आ ' च्या दोन भिन्न प्रक्रिया होतात. त्या अशा—

१ **र्‍हस्वीकरणः** आ > अ : पळणें (पलायन); जानिवसा (जन्यवास); गोवळरुवें (गोपाल + रुं); उजवणें (उद्यापन); आवस (अमावास्या); आरती (आरात्रिका); कढई (कटाह); दुकळु (दुष्काळ)

२ **आ कायम** राहतो.

ताणार (तृणागार); दिवाळी (दीपावली); वाखाण (व्याख्यान); मर्‍हाठी (महाराष्ट्री); कामारी (कर्मकारिन्); चाम्हारू (चर्मकार); जाणविणें (ज्ञापय्); शेजार (शय्यागार); वेव्हारा (व्यवहारक); तहान (तृष्णा); नहाण (स्नान); आव (तव्य); शिवाय " आरा, आळु " या तद्धित प्रत्ययांत; उभारा (उद्भार); पसारा (प्रसृ); विसांवा (विश्रम्)

वर ' इ, उ, ए ओ ' या स्वरांच्या र्‍हस्वीकरणाचीं उदाहरणें दिलीं आहेत. मात्र हें र्‍हस्वीकरण नियमानें होतें असें नाहीं. प्रो० ब्लोक[१] तसा नियम मानतात तो मानतां येणार नाहीं. कारण हे स्वर अविकृत राहिल्याचीं अनेक उदाहरणें यादव-मराठींत आहेत. जसें—पहिला (प्रथम—प्रा० पहिल्ल); बाउली (दे० बाउल्ली); सासुरें (श्वशुर); भींगुरटी (भृंगी); माजिवटें (मध्य + वट); परिणैली (परिणीत) वगैरे.

तात्पर्य, र्‍हस्वीकरणाचा नियम नव्हता. मात्र या र्‍हस्वीकरणाला प्रारंभ यादवकालीं न होतां त्यापूर्वीं म्हणजे प्राकृतकालीं झाला होता असें पिशेलनें[२] दिलेल्या प्राकृतांतील र्‍हस्वीकरणाच्या उदाहरणांवरून वाटतें. यादवकालीं हें र्‍हस्वीकरण प्राकृतापेक्षां बरेंच पुढें गेलें. पंढरपूरच्या शिलालेखांत फागनिपुर (सं० फाल्गुनीपुर) असें ' उ ' चें ' अ ' हें र्‍हस्व रूप येतें. यादवोत्तरकालीं हें र्‍हस्वीकरण आणखी पुढें गेलें. असो.

---

१ La Langue Marathe, 50

२ Prakrit Grammatika, 115 and 123

§ ७ प्राकृतांतील निकटवर्ती स्वर (Vowels in contact)

प्राकृतांत स्वरांतर्गत व्यंजनलोपामुळें दोन स्वर एकमेकांच्या सन्निध येत, परंतु त्याचा संधि मात्र होत नसे. प्राकृतांतील अशा दोन स्वरांतील 'प्रगृह्य' किंवा Hiatus क्वचित् 'य, व, र, ह' या वर्णांनीं टाळलें जाई हें खरें. कांहीं जैन हस्तलिखितांत आढळणाऱ्या य-व श्रुतींचीं उदाहरणें पिशेल देतात. परंतु त्यांचा आणि अर्वाचीन भाषांतील 'प्रगृह्य' निवारणाचा संबंध नसावा. यादव-मराठींत सन्निध स्वरांच्या प्रगृह्याची व्यवस्था तीन प्रकारांनीं झालेली दिसते. (१) 'य-श्रुति' किंवा 'व-श्रुति'; (२) दोन स्वरांचा संयोग; (३) स्वरसंक्षेप.

§ ८ 'य–श्रुति' किंवा 'व–श्रुति'

प्रो० ब्लोक यांच्या मतें मराठींत 'य–श्रुति' अति क्वचित् येते. वस्तुतः ते मानतात तितकी ती विरल नाहीं. 'व' श्रुतीपेक्षां तिचें प्रमाण कमी आहे हें खरें. परंतु विशेषतः यादव-मराठींत 'य–श्रुती' चीं बरींच उदाहरणें आढळतात. तीं पुढें देतों—

सं० क : पढियार (प्रीतिकर); स्याळ (शीतकाल)
सं० ग : सायर (सागर)... "अभिलषितार्थ-चिंतामणीं" त.
सं० ज : राय (राजन्)
सं० त : घाय (घात); म्हणियें (भणित); माय (मातृ); आणियलें (आनीत); वाणियले (वर्णित)
सं० द : पसाय (प्रसाद); पाय (पाद); सोयरा (सहोदर)
सं० न : दाय (दान)

शिवाय, यादव-मराठींत भूतकृदंतांत 'य–श्रुति' नियमानें होते. श्रवण-बेळगोळच्या शिलालेखांत 'श्रीचामुंडरायें करवियलें' असें रूप आहे. प्राचीन मराठीचा भूतकृदंतांतील 'य–श्रुति' हा एक विशेष होय.

---

१ 'प्रगृह्य' हा शब्द प्रो० वा० गो० परांजपे वापरतात. पहा— 'मराठी भाषेचा विकास', पान ९२, प्रो० ब्लोक यांच्या ग्रंथाचें भाषांतर.

२ Pischel: Prakrit Grammatika, 187

व–श्रुति

सं० क : कीवी (कीटकी); नागवा (नग्नकः); कावुळा (काक)
सं० ग : दुहवा (दुर्भगा); पराव (परागत); जुवळें (युगल)
सं० ज : रावो (राजन्)
सं० त : केवडा (केतक); घावो (घात); चेवो–ओ (चित्)
सं० द : पावो (पाद)
सं० प : मेळावा (मेलापक); सावज (श्वापद); कवडा (कपर्दिक); वरिपड (उपरिपत्); वावी (वापी); वहिल (प्रथम); परावर (परात्पर); दळवइ (दलपति); तावो (ताप); दीवी (दीपिका); वणी (पानीय)
सं० भ : सुहाव (सुशोभित); लोवस (लोभस)
सं० य : सावुली (छाया); माव (माया); प्रत्यवो (प्रत्यय); उपावो (उपाय); न्यावो (न्याय); संवधुर (स्वयं–)
सं० ह : मेव्हणा (मैथुन–); वो–व्हो (हो)

§ ९ संयुक्त स्वर

ऐ < अ + इ : बैस (उपविश्); म्हैषी (महिषी); पैज (प्रतिज्ञा); पैठण (प्रतिष्ठान); पैठ (प्रविष्ट); पैक (पदिक); म्हैळी (महिला); सैरा (स्वैर); आपैसें (आत्म + ईदृश); सैंवर (स्वयंवर)
ऐ < अ + ए : एकैक (एकएक); पैस (प्रवेश)
ऐ < इ : सनैधी (सन्निधि)
औ < अ + उ : जौहर (जतुगृह); नौवरी (नववरिका); चांपौल (चंपक-पुष्प); अंतौरी (अंतःपुरिका); चौक (चतुष्क); चौथ (चतुर्थ); औट (अर्धचतुर्थ)
औ < अ + ओ : किंसौरु (किशोर); पौळी (प्रतोलि)
औ < उ : सौर (शूर); सौंदरु (सुंदर)

'इ' चा 'ऐ' आणि 'उ' चा 'औ' झाल्याचीं उदाहरणें अति विरल आहेत. तीं बहुधा साम्याभासामुळें होत असावींत. तसेंच,

प्रथम स्वर दीर्घ असेल तर 'स्वरसंयोग' वा 'व-श्रुति' न होतां 'प्रगृह्य' कायम राहतें. उदा०

माउशी (मातृश्वसा); राउळ (राजकुल); गाई (गावी); पाउण (पादोन); नई (नदी); राउत (राजपुत्र); सुई (सूचिः); देशाउर (देशांतर); पाइक (पादिक)

§ १० स्वरसंक्षेप (Vowel Contraction)

प्रगृह्य टाळण्याची ही तिसरी रीति होय. हिचे पुढील प्रमाणें प्रकार आढळतात.

(१) आद्य स्वर 'अ' : अ + इ, उ, ए, ओ.

यादवकालीं 'ऐ' चें ऱ्हस्वीकरण आजच्याइतकें नव्हतें. प्राकृत-अपभ्रंशकालीं दोन सन्निध स्वरांचें प्रगृह्य, यादवकालीं त्यांचा संयोग व यादवोत्तरकालीं संयुक्त स्वरांचें ऱ्हस्वीकरण असा क्रम दिसतो. त्यानुसार यादव-मराठींत 'ऐ' हा संयुक्त स्वर टिकलेला आहे. उदा०

सं०		यादवकाल	वर्तमान-मराठी
अधस्तात्	>	हैत	हेट
दलपति	>	दळवै	दळवी
सेनापति	>	सेणवै	सेणवी

याचा अर्थ यादव-कालीं ऱ्हस्वीकरण नाहीं असा नव्हे. हें ऱ्हस्वीकरण शब्दाच्या अंतींच मात्र आढळतें. जसें —

सं० आनि (नपुं०प्र०अ०व०) > प्रा० आइं > म० एं
सं० अति (तृ० पु० ए० व०) > प्रा० अइ > म० ए
सं० आनि (आज्ञार्थ प्र० पु० ए० व०) > प्रा०आइं > म० एं
प्रा० आए (स्त्री० सामान्यरूप ए० व०) > म० ए

वर्तमान मराठींत 'ऐ' चें 'अ' असें ऱ्हस्वीकरण दिसतें. (उदा० तैस—तस; बैसणें—बसणें.) परंतु हें यादव-कालानंतरचें आहे. यादव-कालीं जैस, तैस, कैस अशीं संयुक्त स्वरांचींच रूपें मिळतात. तात्पर्य, द्विःस्वरापासून स्वरसंक्षेपाकडील भाषेच्या मार्गांतील यादव-मराठी ही मधली पायरी होय.

वर्तमान मराठींतील स्वरसंक्षेपाची प्रो० ब्लोकें यांची उपपत्ति समाधान-कारक नाहीं.

औ > ओ : चोवीस (चतुः—); मोहर (मधुर)
औ > उ : राउळ (राजकुल); देउळ (देवकुल)

'ऐ' प्रमाणेंच 'औ' चीं रूपेंहि यादव-कालीं वर्तमान-मराठीपेक्षां अधिक सांपडतात. जसें, 'मागौता, औनि, औनिया' (वर्तमान मराठी : मागुता, ऊनि, ऊनिया).

प्राकृतांतील अंत्य 'औ' च्या 'ओ' आणि 'आ' अशा दोन भिन्न प्रक्रिया होतात. उदा०

जाणो (ज्ञायतु); आंबा (आम्रक); पाडिवा (प्रातिपद); आश्रो (आश्रय); पान्हा (प्रस्नु); सवा (सपाद); पाला (पल्लव); स्त्री० प्र० अ० व० आकारान्त नामाचें रूप 'माला' (प्रा० मालाओ)

वरील शब्दांत प्राकृतांतील रूप 'अओ' असें असून मराठींतील 'आओ' असें आहे—तात्पर्य, या दोन रूपांच्या मध्यें 'औ' हा संयुक्त स्वर होता हें निश्चित.

§ ११ अ + अ

या दोहोंपैकीं एक स्वर दीर्घ असेल तेव्हां त्यांचा संक्षेप 'आ' असा होतो. तीन प्रकार—

१ **प्रथम अ दीर्घः**

सं० आज : राउळ (राज-कुल); राउत (राजपुत्र)
सं० आत : वाव (वात)
सं० आद : सवा (सपाद); आरिसा (आदर्श); वाणें (वादन)
सं० आप : वावी (वापी); पवाडा (प्रवाद); तोवें (ताप)
सं० आव : दिवाळी (दीपावली)
सं० आय : वाणें (वायन)

१ La Langue Marathe, 58

सं० आका : पार (प्राकार)

सं० आगा : कुलार (कुलागार)

२ **द्वितीय अ दीर्घ :**

सं० अका : अंधार (अंधकार); चाम्हार (चर्मकार);
　　　　कामार (कर्मकार); सोनार (सुवर्णकार)

सं० अवा : उपास (उपवास); सावासु (सहवास)

सं० अता : चारि (चत्वारि)

सं० अवा : आंवस (अमावास्या); आव्हाट (अपवाट)

सं० अगा : तण्हार (तृणागार); धवळार (धवलागार)

सं० अया : भासुर (भयासुर)

तसेंच आकारान्त पुल्लिंगी नामाचें प्र० अ० व० एकारान्त होतें, तें सुद्धां 'अक' या वृद्धीमुळेंच होय. जसें, सं० घोटकः > प्रा० घोडआ > म० घोडा–घोडे.

३ **दोन्ही स्वर ऱ्हस्व :**

संस्कृतांतील 'अय' या स्वरसमूहाचें संक्षेपीकरण प्राकृतकालींच झालें होतें. उदा० पाली—'नेति' (नयति); 'लेण' (लयन) वगैरे. संस्कृतांतील अशा दोन ऱ्हस्व स्वरांत जर अल्पप्राण व्यंजन असेल तर प्राकृतांत त्याचा 'य' होऊन मराठींत 'ए' होतो. जसें—

सं० अक : एं (नपुं० प्र० ए० व० प्रत्यय) आणि ए (पुल्लिंगी प्र० अ० व०)...सुणें (शुनकम्); घोडे (घोटकाः)

सं० अज : नेण (न ज्ञा)

सं० अत : गेल (गत); मेल (मृत); सें (शतम्); से
　　　　(स्मृति); सांपें (सांप्रत)

सं० अग : नेर (नगर); तेर (तगर); शेण (छगण)

सं० अद : केल (कदली); बेर (बदर)

तसेंच दोन ऱ्हस्व 'अ' मध्यें येणाऱ्या महाप्राणाचा लोप होऊन 'अ-अ' चा संयोग होतो. जसें:—

आण (आभाण); मऱ्हाठा (महाराष्ट्रक); आ ("अथ" लट

द्वि० पु० अ० व० प्रत्यय); सावासु (सहवास); हातोवा (हस्त+उष्ण); आर (अजगर)

(२) **आद्य स्वर 'इ' किंवा 'ए' :—**

इ + अ > ए–इ (शब्दांतर्गत) :

१ ए : माहेर (मातृगृह – माइअर); येर (इतर); हें (इदम्); अहेवपणा (अविधवा–); नेट (निकट); नेहटीं (निकट); सेवो (सीमा)

२ इ : शीळ (शीतल); दीओ (दिवस); दीढ (द्व्यर्ध); जिणें (जीवन); कळी (कलिका); माउसी (मातृश्वसा); दहीं (दधिक)

ए + अ > ए : वेणा (वेदना); केवडा (केतक)

इ–ए+आ > य : स्याळी (शीतकाल); व्याही (विवाही)

इ+इ > ई : अढीच (अर्धतृतीय-अड्ढइज); तीज (तृतीय)

शब्दांतर्गत ए+इ किंवा इ+ए > ए : नारियेळें[1] (नारिकेल); सुवेंद्ध (सु+विद्ध); शब्दांतीं ए+इ किंवा इ+ए > इ : स्त्री० सामान्यरूप बुद्धी, मती (प्रा० बुद्धीए, मतीए); प्रयोजक आज्ञार्थी ई–करी, जाई (प्रा० एहि); नपुं० प्र० अ० व० ईं–सुनीं (प्रा० अयाई)

इ + उ > इ [अंतीं] : वाणी (वणिज-प्रा० वाणियो-अप० यु); > उ (अंतर्गत) : उं-तुमंत (इतुम्); दुणावली (द्विगुणित)

(३) **आद्य स्वर उ किंवा ओ :**

उ+अ > ओ : वोवरें (वधूवरौ), मोहरें (मुखर), सोनार (सुवर्णकार)

उ+अ > उ : तूं (प्रा० तुमं < तुवम्); गहूं (गोधूम); जूआरी द्यूतकारी); नपुं० उकारान्त आणि ऊंकारान्त नामें 'उक' वृद्धीपासून; कुवा (कूप); जूं (युगम्)

---

१ हा शब्द यादवकाळानंतर " नारळ " असा झाला.

उ+उ > उ : उंबर (उदुंबर)
उ+ओ > उ : प्र० ए० व० 'उ' (सं० उको–प्रा० उओ)
उ+उ > ओ : गरोदर (गुरु+उदर)
उ+इ > ऊ :
ओ+अ > ओ : तोकडें (स्तोक); थोंब (स्तोम)
ओ+आ > ऊ : जळू (जलोका)
ओ+इ > ओ (अंतर्गत) : जोशी (ज्योतिषी); ओवी (अपपादिका)
> य–श्रुति : जोयिशी (ज्योतिषी)

§ १२ दोहोंहून अधिक स्वरांचा संक्षेप

आर (सं० अजगर–प्रा० अअअर); आला (सं० आगत–प्रा० आअअ); एं-हें (इदम्); पसारा (प्रसारित); स्त्री० प्र० अ० व० 'ई' (प्रा० इअए); नपुं० प्र० अ० व० 'ईं' (प्रा० इआइं); सिं–तृ० ए० व० प्रत्यय (सहित)

याप्रमाणें तीन प्रकारची व्यवस्था यादवमराठी प्राकृतांतील प्रगृह्याची करते. प्राकृत–अपभ्रंशांत स्वरांच्या ज्या एकमेकांना टांगलेल्या लगडी होत्या त्या मराठीच्या स्वभावाला खपत नाहींत. अतएव, वर्णप्रक्रियेच्या प्रांतांत या बाबतींत यादवमराठीचें पाऊल पुढें पडलें असून ती भारतीय भाषांच्या इतिहासांतील एक उत्क्रांत अवस्था होय यांत संशय नाहीं.

§ १३ सानुनासिक स्वर

(१) अंत्य अनुनासिक: शब्दाच्या अंतीं अनुनासिक असतें तेव्हां त्यामागील दोन स्वरांचा संक्षेप होतांना, अनुनासिकीकरण होतें. जसें—

कें (किम्); शें (शतम्); सिं (सहितम्); नपुं० एं-ईं-ऊं प्रत्ययान्त प्र० ए० व० (प्रा० अअं, इअं, उअं)

मात्र अंत्यपूर्व अनुनासिक व्यंजन मराठींत कायम राहिलें असेल तर अंत्य स्वराला अनुनासिकत्व येत नाहीं. उदा० लोणी (नवनीत)

यादव-मराठीच्या कांहीं विभक्तिप्रत्ययांत 'न' या अनुनासिकाची विशेष प्रक्रिया झालेली दिसते.

षष्ठी अ० व० 'आं' < प्रा० आण (?) < सं० आनाम्
(प्राकृतांत 'आण' असेंच रूप आढळतें व त्यापासून मराठींतील 'आं' ची उपपत्ति नीटशी लागत नाहीं. तेव्हां अपभ्रंशांतील 'अहं-आहं' या एकवचनी 'आह' पासून सिद्ध झालेल्या प्रत्ययाकडे वळावें लागतें. तात्पर्य मराठींतील 'आं' हा ष० अ० व० प्रत्यय अपभ्रंशापासून निष्पन्न होतो.)

नपुं० प्र० अ० व० 'ईं' < प्रा० आइं-आणि < सं० आनि

तृतीया ए० व० 'एं' < अप० एं-ईं < प्रा० एणं < सं० एनँ

म्हणजे मराठींतील वरील तीन विभक्तिप्रत्ययांबाबत अनुनासिकाची एक विशेष प्रक्रिया होते. 'न-ण' यांचे प्राकृतांत अनुस्वार किंवा सानुनासिक स्वर होऊन तीं रूपें अर्वाचीन भाषांत उतरतात. अनुनासिकाचा सानुनासिक स्वर होण्यास अपभ्रंशकालीं आरंभ झाला. कारण त्यांत 'आइं, आई, आँई' हीं रूपें 'आणि' या रूपाच्या बरोबरीनें आढळतात. गुजरातींत हाच प्रकार आहे.

द्विस्वरांतर्गत 'म' या अनुनासिकाचा 'वं' होतो व शेवटीं हा अनुस्वार मागील वर्णावर जातो. जसें—भंवर (भ्रमर); लोंव (लोमन्); कुंवरी (कुमरी); चंवरें (चामर)

प्रत्ययांतील स्वरांतर्गत 'म'च्या प्रक्रियेंत मात्र 'व' हा ओष्ठ्य वर्ण लोपून केवळ अनुस्वार शिल्लक उरतो. जसें–

एं-ईं (प्रा० आमि-एमि) प्र० पु० ए० व० प्रत्यय.

---

१ La Langue Marathe, 66.

२ डॉ० ग्रियरसन हे मराठी ए < अप० एं < अहि अशी तृतीयेच्या प्रत्ययाची उपपत्ति लावतात. ते म्हणतात—

"It is equally permissible to look upon it as a contraction of the Loc. termination 'ahi' extended to the Instrumental"
—J. R. A. S. 1921, p. 260
(Critical Review of M. Bloch's La Langue Marathe).

३ Prof. Turner: Gujrati Phonology, J.R.A.S. 1921, pp 525–26

ओं–ऊं (प्रा० आमो–अमो)–प्र० पु० अ० व० प्रत्यय.

(२) **शब्दांतर्गत ऱ्हस्व स्वर + अनुनासिक + व्यंजन** या समूहाच्या विविध प्रक्रिया होतात, त्या अशा—

(अ) ऱ्हस्व स्वर + अनुनासिक + अघोष व्यंजन.

(आ) दीर्घ सानुनासिक स्वर + अघोष व्यंजन :

चांपौल (चंपकपुष्प); आंकणें (अंक्); पांति (पंक्ति); सांबारींव (संभार)

(इ) ऱ्हस्व स्वर + अनुनासिक + घोष व्यंजन. किंवा,

(ई) दीर्घ सानुनासिक स्वर + अनुनासिक + घोष व्यंजन :

आंगवण (अंग-); डींगर (?); सेंभ (स्वयंभू); आंगण (अंगण); आंगीटोपरें (अंग-); चांदिणें (चंद्रिका); भांगार (का० भांगार); सांघातु (संघात); शांखळ (शृंखला); वांझौटी (वंध्या)

(३) 'र' युक्त जोड व्यंजनें किंवा महाप्राण तालव्ययुक्त जोड व्यंजनें यांच्या मागील दीर्घ स्वराला अनुनासिकत्व आलेलें दिसतें. जसें—

कांसव (कच्छप), बांबळणें (भर्भ्), वांकी (वक्र), आंथुरण (आस्तृ), कांकडी (कर्कटिका), आंख (अक्ष), विंचू (वृश्चिक), आंसू (अश्रु), सांचोकार (सत्य-च्च)

(टीप—दक्षिण कोंकणी भाषेंत[1] वरील अनुस्वार नाहींं. तो नसणें हा इंडो-आर्यन भाषांचा स्वभावच आहे. मराठीनें तो स्वतंत्रपणें निर्मिलेला दिसतो.)

(४) वरील नियमांत बसत नाहींत अशीं अनुनासिकत्वाचीं उदाहरणें मराठींत दिसतात. यांतील कांहीं इतर इंडो-आर्यनमध्यें असून कांहीं केवळ यादव-मराठींतच आहेत. उदा०

कांच (काच), लट् द्वि० पु० अ० व० प्रत्यय 'आं' (सं० अथ), तुवां–तृ० ए० व० (सं० त्वया), किंसौरु (किशोर), खांति (क्षिति)

यांतील कांहींची उपपत्ति दीर्घ स्वरानें लावितां येते.

(५) वर्तमान मराठींत अनुस्वारलोपाचीं उदाहरणें बरींच आहेत.

---

१ S. M. Katre: Formation of Konkani, (B. O.R.I., Vol. 18, p.252)

यादव-मराठींत अनुस्वारलोप विशेष दिसत नाहीं. माचा (मंचक), सलग (संलग्न), भुई (भूमि), भीतर (अभ्यंतर), अति–लट् तृ० पु० अ० व० प्रत्यय (अंन्ति), अत–वर्त० कृ० प्रत्यय (प्रा० अन्त), माथुल (मंथ्), पुसणें (पृच्छ्)

वर्तमान कृदंताचा 'अत' प्रत्यय निरनुनासिक खरा; परंतु यादव-मराठींत 'हो, दे, पाह, अस' वगैरे कांहीं मोजक्या धातूंचीं वर्त० कृदंतें मात्र सानुनासिक आढळतात. त्यांचीं रूपें 'होंत (भवत्), देंत, पांत, सांत (होंत-सांता)' अशीं होतात. उदा०

" अकालिचीं अभ्रें जैसीं। ऊर्मीवीण आकाशीं।
हारपति आपैसीं। उदैलीं **सांतीं** "॥ ज्ञा० ४–११६

तात्पर्य, वर्तमान मराठींतील अनुस्वारलोपाचें प्रमाण यादव-मराठींत नव्हतें. तत्कालीं ही प्रथा आजच्याइतकी व्यापक नव्हती हें वर्तमान कृदंताच्या वरील कांहीं सानुनासिक रूपांवरून दिसतें.

(टीप—यादव-मराठी कालांतील ज्या पोथ्या उपलब्ध आहेत त्यांत अनुस्वार देण्यासंबंधीं नियम असा दिसतच नाहीं. राजवाडे-ज्ञानेश्वरी, उद्धवगीता, पंचतंत्र वगैरे अस्सल पोथ्यांवरून प्रकाशित झालेले ग्रंथ पहावेत. त्यांत अनुस्वार लेखकानें मन मानेल तेथें दिले असल्यानें एतत्प्रकरणीं वरील ग्रंथांवर व एकंदर सर्व यादवकालीन मराठी ग्रंथांवर विसंबून चालणार नाहीं.)

§ १४ मराठी स्वर

यादव-मराठींतील स्वरप्रक्रियेची रूपरेषा आतां निश्चित होईल. संस्कृत–प्राकृत–अपभ्रंश या परंपरेनें यादव-मराठीच्या ज्या स्वरप्रक्रिया झाल्या त्यांचें हें ऐतिहासिक व औपपत्तिक समालोचन होय. पुढें प्रत्येक स्वरोच्चाराचें मूळ दाखवितांना जे आंकडे वापरले आहेत ते येथवरच्या चर्चेतील पोटविभागांच्या परिच्छेदांचे क्रमांक होत.

§ १५ अ

आद्याक्षरांतील :

मराठी अ = प्रा० अ < सं० अ क्र० ६–१
= प्रा० अ < सं० ऋ क्र० २–१
= स्वरसंक्षेपामुळें क्र० १०

मध्याक्षरांतील :

मराठी अ = सर्व संस्कृत व प्राकृत स्वर.

अंत्याक्षरांतील :

मराठी अ = सं० प्रा० अंत्य आ (स्त्री० नामांचा)
= सं० प्रा० अंत्य अ (नपुं० नामांचा)

संस्कृत 'इ, ए' आणि 'उ, ओ' यांपासून सिद्ध झालेल्या 'इ-उ'शीं संयोग पावून मराठी 'अ' चे 'ऐ-औ' हे संयुक्त स्वर होतात. क्र० ९

मराठी अ = संस्कृत ए (अति क्वचित्) क्र० ६

§ १६ आ

आद्याक्षरांतील :

मराठी आ = प्रा० आ < सं० आ क्र० ६–१
= प्रा० अ (द्वित्ताक्षरांतील) < सं० आ-अ क्र० ६
= प्रा० अ-आ (द्वित्त) < सं० ऋ (द्वित्तांतील) क्र० २–१

आद्येतर :

मराठी आ = प्रा० आं + आं क्र० ६–२

§ १७ इ

आद्याक्षरांतील :

मराठी इ = प्रा० इ < सं० इ क्र० ६–१
= प्रा० इ < सं० ऋ क्र० २–२
= प्रा० ए क्र० ६–१
= सं० अ (इंगळ < सं० अंगार; निडळ < सं० ललाट)
= सं० ऐ : निवेदु (नैवेद्य); विरू (वैर)

मध्याक्षरांतील :

मराठी इ = प्रा० इ < सं० इ किंवा ऋ क्र० ६–१, २
= प्रा० अ < सं० अ (क्वचित्) मांजिरी (सं० मंजरी)
= सं० ऐ : कुचिळें (कुचैल)

अंत्याक्षरांतील :

मराठी इ = प्रा० इआ < सं० इका क्र० १०
= प्रा० सं० ई (स्त्री० नामाची)
= प्रा० इउ (म० जांवइ < प्रा० जामातिउ)
= प्रा० सं० अंत्य ए
(म० आम्ही-तुम्ही < प्रा० अम्हे-तुंम्हे)
= प्रा० अइ (दळवइ < प्रा० दळवई)
= सं० इक : नागारी (नागरिक); गुळहारी.

कांहीं ठिकाणीं 'इ' सं० 'य' पासून येऊं शकतो. उदा० भीतर (सं० अभ्यंतरम्); भिजणें (सं० अभ्यंजते); विजण (व्यजन); जानिवसा (जन्यवास); चक्रवीहु (चक्रव्यूह)

§ १८ ई

(आद्य) मराठी ई = प्रा० 'इ' (द्व्यक्षरी शब्दांत)
= प्रा० ई < सं० ई + जोडाक्षर. क्र० ६
= प्रा० ई < सं० ऋ + जोडाक्षर. क्र० २-२
= प्रा० इ (द्वित्तांतील) < सं० ई + जोडाक्षर

(अंत्य) 'ई' चें स्वरूप निश्चित नाहीं. कारण ती ऱ्हस्व व दीर्घ दोहीं रूपांत आढळते. म्हणून, अंत्य 'इ' चें विवेचन येथें लागू आहे.

य < ई : वीभिचारु (व्याभिचार); अतींतु (अत्यंत)

§ १९ उ

आद्याक्षरांतील :

मराठी उ = प्रा० उ < सं० उ क्र० ६
= प्रा० उ < सं० ऋ क्र० २-३
= मूळ औ, इउ, उ-, ओ-, या स्वरांच्या संक्षेपामुळें क्र० १०

---

१ Prof. Turner suggests derivation from MIA "amhehi. tumhehi"–the plural forms. See: B. S. O. S. (London). Vol. VIII, p. 205.

प्रा० ओ > अप० उ

= प्रा० सं० इ ... बुंद (बिंदु); दुपाहार (द्विप्रहर).

अंत्य उ = प्रा० ओ > अप० उ

यादव-मराठींत क्वचित् ‘उ’ आणि ‘अ’ हीं दोन्ही रूपें एकदमच दिसतात. उदा० ‘पाटेफुटे’ (लीळाचरित्र, स्मृति० वगैरे.) सं० पट- पासून दोहीं शब्द निघतात. परंतु अर्थभेद दर्शविण्यासाठींच अशीं भिन्न रूपें होत असावींत. दुसरें उदाहरण झरणें व झुरणें (सं० क्षर्) हें आहे.

§ २० ऊ

आद्याक्षरांतील :

मराठी ऊ = प्रा० उ < सं० उ किंवा ऋ क्र० २–३

= प्रा० ऊ < सं० ऊ क्र० ६–१

= प्रा० ऊ < सं० ऊं किंवा ऋ + जोडाक्षर

‘अंत्य ऊ’ चें स्वरूप ‘अंत्य ई’ प्रमाणेंच निश्चित नाहीं.

याशिवाय आद्य स्वर उ किंवा ओ असलेल्या प्राकृतांतील स्वरसमूहाच्या संक्षेपापासूनहि ‘ऊ’ निघतो. क्र० १०

§ २१ ए

आद्य ए = प्रा० ए < सं० ए : शेत (क्षेत्र); वेताटी (वेत्रयष्टि); शेटी (श्रेष्ठी); देउळ (देवकुल); एं (एन)

< सं० ऐ. तेली (तैल्य); मेहुण (मैथुन)

< सं० इ. देह (दिह्), नेहटीं (निकट)

मध्य-अंत्य ए = सं० अय > प्रा० ए-अय : अतिशे (अतिशय), वळें (वलय); जे (जय); पेहें (पयस्); लेणें (रत्न-प्रा० लयण); उभे (उभय)

= सं० अ : वेल (वल्लि); सेज (शय्या); मेर (मर्यादा); वेऱ्ही (का० वरि);

= प्रा० ए < सं० ई : खेळु (सं० क्रीड्–प्रा० खेल)

= सं० इय : नेम (नियम)

= सं० इ : बेल (बिल्व;) पेंढारी (पिंड-); सुवेंझ (सुविद्ध)

= सं० अक.

संक्षेपामुळें येणारा ए < प्रा० अअ < सं० अक, अग, अज, अत, अद.

ए < सं० य : ... वेसन (व्यसन); वेथा (व्यथा); वेवहार (व्यवहार); अंतेज (अंत्यज)

§ २२ ओ

आद्य ओ = प्रा० ओ < सं० ओ : सोळा (षोडश); होट (ओष्ठ); कोंवळीक (कोमल–); जोगा (योग्य)

= प्रा० ओ < सं० औ : मोतीं (मौक्तिक); सोरट (सौराष्ट्र) कोडें (कौतुक); मोल (मौल्य); वोवरें (वधूवरौ),

< सं० अप : वोपणें (अर्प्); तोवे (तप्त), ओवरी (अप—)

< सं० अव : लोणी (नवनीत); नोवरा (नववर); वोदरें (अवद्द)

< सं० उव : सोनें (सुवर्ण)

= प्रा० उव < सं० उप : वोळख (उपलक्ष्)

< सं० उ : पोखरिणी (पुष्करिणी); सोवासनी (सुवासिनी)

'ओ' चा 'व' शीं विकल्प होतो. उ० ह० ओल-वोल (आर्द्र); ओठ-वोठ (ओष्ठ); ओपणें-वोपणें (अर्प्); ओहळवोहळ (ओघ); ओझें- वोझें (वह्य)

मराठी ओ = प्रा० सं० अ : चोंच (चंचु)

मागील अक्षरांतील 'ओ' मुळें 'मध्य ह' चा 'हो' झालेला यादव-मराठींत क्वचित् दिसतो. उदा० मोहोरलेनि (मधुर); डोहोळा (दोहद). ही लकब विशेषतः कोंकणी भाषेची आहे.

---

१ Dr. Grierson: Linguistic Survey of India, Vol. VII. pp. 157–167

प्रथम स्वर ' उ ' किंवा ' ओ ' असलेल्या प्राकृतांतील स्वरसमूहाच्या संक्षेपानें कधीं मराठींत ' ओ ' होतो. उदा०

आद्य ओ < सं० ऊ : सोरू (शूकर); सोपारें (शूर्पारक)

§ २३ व्यंजनप्रक्रिया— इतिहास

वर्तमान भारतीय–आर्य भाषांतील व्यंजनांची ऐतिहासिक परंपरा अपभ्रंश, प्राकृत यांच्या मार्फत थेट संस्कृतापर्यंत जाऊन पोहोंचते. ज्या तत्त्वांनीं प्राचीन संस्कृतांतील व्यंजनांची प्रक्रिया झाली त्यांचें संपूर्ण विवेचन प्रो० टर्नर यांनीं ' **गुजरातीची वर्णप्रक्रिया** ' यांत केलें आहे. तें यादव-मराठीलाहि उपयुक्त असल्यानें प्रथम व्यंजनप्रक्रियेची ऐतिहासिक रूपरेषा पुढें देतों.

व्यंजनांचा उच्चार अधिकाधिक अस्पष्ट व दुर्बल होत गेल्यामुळें संस्कृतांतून तीं व्यंजनें प्राकृत–अपभ्रंशांत उतरतांना पुढील प्रकार होतात. (१) अंत्य व्यंजनाचा लोप; (२) व्यंजनसमूहांतील वर्णसंयोग; (३) स्वरांतर्गत व्यंजन मृदु होऊन पुढें त्याचा लोप होणें (मूर्धन्य व्यंजनांखेरीज). या तीन दिशांनीं व्यंजनांची वाढ झाली. पाली या प्राकृतांतील प्राचीनतम भाषेंत अंत्यव्यंजनलोप असून जोडाक्षरांतील वर्णसंयोगहि झालेला आहे. परंतु स्वरांतर्गत व्यंजनलोप मात्र तींत नाहीं. त्याचा आरंभ पुढील प्राकृतांत दिसतो. वरील तीन प्रकारच्या प्रगतीचा विचार चार विभागांत करितां येईल.

(अ) सं० अंत्य व्यंजन > प्रा० लुप्त > मराठी लुप्त

(आ) सं० आद्य व्यंजन > प्रा० अप० म० अविकृत

(इ) स्वरांतर्गत व्यंजन–संस्कृतांतील :

१ सं० कठोर > प्रा० मृदु > म० लुप्त

२ सं० कठोर महाप्राण > प्रा० मृदु महाप्राण–' ह ' > म० ह

(ई) सं० व्यंजनसमूह > प्रा० द्वित्त व्यंजन > म० पूर्वस्वर दीर्घ + शुद्ध व्यंजन.

> म० द्वित्त

वरील नियम अर्थातच निरपवाद नाहींत. मागधींत व शौरसेनींत

१ Gujrati Phonology, J.R.A,S. 1921, pp.505–508

स्वरांतर्गत व्यंजनलोपाला आरंभ झाल्यावरसुद्धां दंत्य वर्ण कायमच दिसतात. म्हणजे या नियमांनीं प्राकृत-अपभ्रंशांच्या विकासाचें दिग्दर्शनच मात्र होतें असें डॉ० कात्रे एतत्प्रकरणीं म्हणतात तें योग्य होय[1].

§ २४ आद्य व्यंजन

संस्कृतांतील आद्य व्यंजनें कांहीं अपवाद सोडून अविकृत राहतात. हे अपवाद म्हणजे न, य, आणि महाप्राणांसंबंधीं होत. पैकीं,

सं० न > प्रा० ण > अप० ण > म० न

सं० नागर > प्रा० णायर > म० नागर

सं० नदी > प्रा० णई > म० नदी

सं० नयति > प्रा० णेइ > म० नेई

सं० य > प्रा० ज > अप० ज > म० ज

सं० युगुल > प्रा० जुउळ > म० जावळें

सं० यत्न > प्रा० जअण > म० जतन

सं० याचना > प्रा० जाअणा > म० जाचना

§ २५ महाप्राणत्व Aspiration

परंतु वरील दोन प्रक्रियांपेक्षां अल्पप्राणाचा महाप्राण होण्याची प्रक्रिया अधिक व्यापक स्वरूपाची आहे. प्रो० ब्लोकं[2] यांनीं एकंदर इंडो-आर्यन भाषांतील महाप्राणत्वाचा विस्तारानें विचार केला आहे; त्यावरून यादव-मराठींत महाप्राणत्वाचे दोन प्रकार मानावे लागतात, ते असे:

(अ) अल्पप्राणाचा महाप्राण प्राकृतद्वारा आलेला; आणि

(आ) यादव-मराठीनें स्वतंत्रपणें, प्राकृताला सोडून, केलेला अल्पप्राणाचा महाप्राण.

---

१ "These principles only express the laws under favourable conditions. Thus, these laws summarise the tendency in a given language which will ultimately reduce the language to a norm---". Dr. S. M. Katre.--B. O. R. I. Vol. XVIII, p. 263

२ L' indo aryen, pp. 59–62

§ २६ परंपरागत महाप्राणत्व

पुढील सं० आद्य अल्पप्राण प्राकृतांत व मराठींत महाप्राण होतात.

खेळणें (क्रीड्–प्रा० खेलइ); झाड (जाट–प्रा० झाडॅ) ; खापर (कुर्पर–प्रा० खोप्पर); खिळा (कीलक–प्रा० खीलओ); खुजें (कुब्ज–प्रा० खुज्ज); ढुलणें (दे० डुल–प्रा० ढुल्ल); फरस परशु–प्रा० फरस); झोंप (का० जोंप–झोंप); घागरी (गर्गरिका-प्रा० घग्गरिआ); फुल्लि (पुष्प–प्रा० फुल्ल); म्हइळी (महिला); म्हैस (महिषी)

वरील महाप्राणत्वाची प्रो० याकोबी यांनीं दिलेली उपपत्तिच वरीचशी प्रो० ब्लोक मान्य करितात[२]. ती अशी, कीं पुढें येणाऱ्या ' र ' किंवा ' स ' मुळें, महाप्राणत्व येतें. तसेंच, प्राकृतांत लोपलेल्या संस्कृतांतील ऊष्मवर्णांमुळेंहि हें महाप्राणत्व येऊं शकेल.

§ २७ स्वतंत्रतः सिद्ध महाप्राणत्व

वरील उदाहरणांच्या बरोबर यादव-मराठीनें स्वतंत्रपणें केलेले आद्य अल्पप्राणांचे महाप्राण आढळतात. प्राकृतांत हे अल्पप्राणच आहेत. परंतु यादवकालीं यादव-मराठी ही संस्कृत-प्राकृत अल्पप्राणांचे महाप्राण करिते. उदा०

ख : खांक (कक्षा-प्रा० कक्खा); खांकरणें (कखति-प्रा० कक्खइ); खैवंग (कट्वांग-); खोमणें (दे० कोम)

झ : झळाळ (ज्वल्)

ठ : ठीकलग, ठीकवणी (?)

थ : थडिवा (तटि)

ध : धा (दश–प्रा० दह)

फ : फडतरैले (प्रस्फुट–प्रा० पप्फुड्ड); फुटा (पट)

---

१ "Initial 'Jh' in Indo–Aryan", S.M. Katre. (Calcutta Oriental Journal, II, p. 104.)

२ La langue Marathe, 84

भ : भोळा (बहुलक ?)
ह : हाउळी (= समूह ......सं० आवली)

या प्रक्रियेचीं उदाहरणें मराठींत अति अल्प आहेत. कोंकणींत तीं विपुल आढळतात. पुढील वर्णांतील महाप्राण लोपल्यामुळें वरील ठिकाणीं आद्याक्षरांत महाप्राण येतो.

§ २८ अंत्य आणि मध्य महाप्राणत्व

या प्रक्रियेचीं उदाहरणें मराठींत थोडींच आहेत.

आंखणें (अंक्); वाखळ (वल्कल); जांभूळ (जांब); मढें (मृत); गुंफा (गुप्); पंढरपूर (का० पंडरि ?); दीठी (दृष्टि); आघाओ (अग्रीयः); पढियासणें (प्रतिभास्); धुवाठी (धूलिवटिका); भारथ (भारत); कामाठी (कर्मवटिका); हाथिएर (हत्यार); वोल्हास (आर्द्रांश); आधोली (आंदोलः); तांथु (तंतु)

§ २९ महाप्राणत्वलोप De-aspiration

ही प्रक्रिया वरील प्रक्रियेच्या अगदीं उलट आहे. यांत व्यंजनांतील महाप्राणत्वाचा लोप होऊन तें अल्पप्राण होतें. या प्रक्रियेचे दोन विभाग पडतात:—

१ आद्याक्षरांत: महाप्राण आद्याक्षरांच्या जागीं अल्पप्राण आल्याचीं स्थळें यादव-मराठींत फार थोडीं आहेत. कोंकणींत मात्र आद्याक्षरांतील महाप्राणत्वलोप विपुल आहे. मराठींतील उदाहरणें पुढें देतों—

क < ख : कांडणें (खंड्)
त < थ : तुरतुरू (नेपाळी : थुरथुरि)
ब < भ : बाइल (भार्या–भारिआ–भाइरा)
ट < ठ : टाकितु (स्था-ठा); टेवामांडणी (स्था)

१ यादव-मराठींत आद्य ' म ' क्वचित् ' भ ' होतो. उदा० भासळलें (मिश्रित)
२ Formation of Konkani–S. M. Katre, B. O. R. I., Vol.18. pp . 362–3

२ आद्येतराक्षरांत :

(अ) **शब्दांतीं—**

क < ख : भाक (भाषा), साकोपसाकीं (शाखा), जोतीक (ज्योतिष), भीक (भिक्षा), डंकु (दंश-डंख)

ग < घ : सीग्र (शीघ्र), जांग (जंघा)

ज < झ : माजीं (मध्य), गूज (गुह्य), सांज (संध्या)

ट < ठ : पाट (पृष्ठ), साटि (षष्टि), पालट (पर्यस्त), सांतीपाठ (शांतिपाठ)

ड < ढ : दीडु (द्व्यर्ध–प्रा० दिवड्ढ), कोड (कुष्ठ), साडेपन्हरें (सार्ध–)

त < थ : हातु (हस्त–प्रा० हथ्थ), वीत (वितस्ति)

द < ध : सांदि (संधि), खांदु (स्कंध), बांद (बंध), निषेदु (निषेध)

प < फ :

ब < भ : गाब (गर्भ)

य < ह : (पाये पाहे–सं० पश्यामि)

(आ) **शब्दाच्या मध्यभागीं—**

क < ख : दुकाळ (दुष्काळ), सुकें (शुष्क–प्रा० सुख्ख), शिकणें (शिक्ष्–सिख्ख), साकुर (शर्करा–प्रा० सख्खरा), सांकळ (शृंखला), आइकणें (प्रा० आइख्खइ), विकुरणें (विष्किर)

ग < घ : मगण (महिमन्), सांगड (संघट्)

ज < झ : शिजणें (सिध्यति), वाजांत्र (वाद्ययंत्र–प्रा० वझ्झयंत्र), समजणें (संज्ञा–प्रा० संझा)

ट < ठ : अडतीस (अष्ट–), पिटणें (पिष्ट–पिठ्ठ), घाटणें (घृष्ट)

ड < ढ : अडैच (अर्धतृतीय), हाडगुड (अस्थि–),

त < थ : हातरीती (हस्तरिक्ता), अस्तिति (स्थिति)

द < ध : मदराति (मध्यरात्रि)

प < फ : आपडणें (आस्पृष्ट–प्रा० आफ्फुड्ड)

ब < भ : सेंबुड (श्लेश्मन्), तांबजाली (ताम्र–प्रा० तांभ)

हीच प्रक्रिया ' ह ' या महाप्राणाच्या लोपालाहि लागू आहे. विशेषतः कांहीं संख्यावाचक विशेषणांत आणि पुल्लिंगी नामाच्या सामान्य रूपांत ' ह–लोप ' अधिक दिसतो. उदा०

म० अकरा (अप० एक्कारह, सं० एकादश)

म० बारा (अप० बारह–सं० द्वादश)......वगैरे.

तसेंच सामान्य रूपाचा प्रत्ययः—

एकवचनीं ' आ ' (अप० अह, सं० स्य)

अनेकवचनीं ' आं ' (अप० आहं, सं० णाम्)

§ ३० मराठी व्यंजनांचे उच्चार

मागें क्र० २३ मध्यें मराठींतील व्यंजनांची चार भिन्न दिशांनीं होणारी प्रक्रिया पाहिली. ते चार प्रकार असे—

१ सं० अंत्यव्यंजनलोप

२ सं० आद्यव्यंजनविकृति

३ सं० स्वरांतर्गत व्यंजनांच्या दोन प्रक्रिया

४ सं० व्यंजनसमूहाच्या दोन प्रक्रिया.

या प्रक्रियांमुळें यादव-मराठीची व्यंजनव्यवस्था पुढीलप्रमाणें झाली आहे.

कंठ्य : क् ख् ग् घ्

तालव्य : च् छ् ज् झ

मूर्धन्य : ट् ठ् ड् ढ्

दंत्य : त् थ् द् ध्

ओष्ठ्य : प् फ् ब् भ्

दंत्यतालव्य : च़् छ़् ज़् झ़

ऊष्मे : श् ष् स्

अर्धस्वर : य् व् र् ऌ

अनुनासिक : ण् न् म्

वरील व्यंजनांचे उच्चार व त्यांची ऐतिहासिक परंपरा पुढें देतों.

§ ३१ कंठ्य व्यंजनें

'क, ख, ग, घ' या कंठ्यांचा उच्चार आणि उच्चारस्थानें हीं संस्कृत, प्राकृत, अपभ्रंशांप्रमाणेंच मराठींत, कांहीं फरक न होतां, उतरलीं आहेत. गोंव्याच्या किरिस्तावांच्या बोलींत कांहीं ठिकाणीं 'ख' चा 'फ' झालेला दिसतो. यादवकालीन ग्रांथिक मराठींत ही प्रक्रिया कोठेंहि नाहीं.

§ ३२ तालव्य व्यंजनें

संस्कृतांतील शुद्ध तालव्यांचे उच्चार प्राकृतकालीं विकृत झाले. यादव-मराठींतहि प्राकृत-अपभ्रंशाप्रमाणें शुद्धतालव्य व दंत्यतालव्य असे दोन तऱ्हेचे उच्चार आहेत. सर्व तत्सम शब्दांत व 'इ-ए' हे स्वर पुढें असणाऱ्या तद्भव शब्दांत 'च, छ, ज, झ' यांचे उच्चार शुद्ध तालव्य होतात. इतर स्थळीं दंत्यतालव्य होतात. यासंबंधीं चर्चा प्रस्तावनेंत आली आहे. डॉ० कात्रे यांच्या मतें तर मूळ आर्य भाषेंतील शुद्ध तालव्य उच्चार मराठींत नाहींतच. त्यांच्या म्हणण्याप्रमाणें शुद्ध तालव्याचे दोन प्रकार होऊन वर्तमान भाषेंत उतरले आहेत.

§ ३२ (अ). तालव्य 'छ'

संस्कृतामध्यें 'छ' हा वास्तविक मूळचा 'च' चा महाप्राण नाहीं असें मत प्रो० ब्लोक यांनीं वाकरनागेलचें अनुकरण करून मांडिलें आहे. संस्कृतांत 'स्वरांतर्गत छ' चा उच्चार त्यांच्या मतें नेहमींच द्वित्व पावतो. यादव-मराठीपुरतें पाहिल्यास प्रो० ब्लोक यांच्या वरील मतास बळकट आधार मिळतो. यादव-मराठींत आद्याक्षरांतील व स्वरांतर्गत 'छ' चा 'स' झालेला अनेक ठिकाणीं दिसतो. (पहा–पुढें क्र० ४७). वर्तमान

---

१ (a) Palato-alveolar, (b) Dento-alveolar. — -Formation of Konkani, 84 (B. O. R. I. vol. 18)

२ La Langue Marathe, 102

मराठींत ही प्रक्रिया इतकी जोराची दिसत नाहीं. याचें कारण ती प्रक्रिया मंद झाली असा नव्हे; तर वर्तमान-मराठींत छ-युक्त शब्द तत्समच अधिक प्रमाणांत वापरण्यांत येतात, हें आहे. असो. यादव-मराठींतील 'छ-स' ची प्रक्रिया अति प्राचीन आहे. अशोकाच्या शिलालेखांत सं० चिकित्सा याचें चिकिच्छा असें न होतां 'चिकिसा' असें रूप होतें. तसेंच पुढील उदाहरणें चिंत्य आहेत.

संस्कृत	पाली
ककुच्छंद	ककुसंद
कृच्छ्र	कसिर

तसेंच हेमचंद्र सं० प्रोञ्छ् याचीं 'पुंछइ-पुंसइ' अशीं दोन रूपें देतो व 'कच्छप-कश्यप' हीं दोन्ही रूपें एक मानतो. उलट संस्कृत 'श' चा पाली कधीं 'छ' करतांना दिसते. उदा० छक (शकृत्), छव (शव), छाव (शाप), छेप्प (शेप) वगैरे. तात्पर्य, मूळ संस्कृत 'छ' मध्यें तालव्यापेक्षां दंत्य व ऊष्मे यांचेच उच्चारांश अधिक आहेत. त्यामुळें यादव-मराठींत तद्भवांत किंवा अर्धतत्समांत 'छ-स' ही प्रक्रिया विपुल आढळते. 'मराठी छ-स' हे कोणकोणत्या संस्कृत उच्चारांच्या जागीं येतात तें पुढें क्र० ८४ व १०१ मध्यें दिलें आहे.

§ ३३ मूर्धन्य व्यंजनें

इंडो-युरोपियन भाषांतील दंत्य वर्णमालेचे प्राचीन इंडो-आर्यनमध्यें दंत्य आणि मूर्धन्य असे दोन भेद झाले. 'ऋ, ष, र, ल, ए, ओ' या वर्णांच्या सान्निध्यानें प्राचीन इंडो-आर्यनमध्यें दंत्यांचें मूर्धन्यीकरण होतें. मात्र 'ऋ' किंवा 'र' च्या संपर्कामुळें संस्कृतांत दंत्य व्यंजन मूर्धन्य होतेंच असा नियम नाहीं. 'वर्तते' सारख्या रूपांत 'र' असून दंत्यच कायम आहे. परंतु प्राकृतांत मूर्धन्य नियमानें होऊं लागलें. उदा० सं० वर्तते > पाली–वट्टति.

---

१ "Cerebralisation in Sindhi"—Prof. Turner (J. R. A. S. 1924, pp. 555–584)

§ ३४ मूर्धन्यीकरण Cerebralisation

दंत्य व्यंजनांना मूर्धन्यत्व प्राप्त झालेलें पुढील पांच प्रकरणें तपासून ठरविलें पाहिजे.

१ मागें 'र' आला असतां
२ मागें 'ऋ' आला असतां
३ पुढें 'र' आला असतां
४ (अ) स्वरांतर्गत एकेरी दंत्य
(आ) स्वरांतर्गत द्वित्त दंत्य
(इ) आद्य दंत्य
५ आद्य आणि स्वरांतर्गत 'न, ल' असतांना.

वरील सर्व ठिकाणीं नियमानें मूर्धन्य येतेंच असें नाहीं. दंत्य कायम राहिल्याचीं अनेक स्थळें आहेत. पुढें मूर्धन्य झाल्याचीं उदाहरणें क्रमानें देतों—

१ मागें र आला असतां—

गांठी (ग्रंथि), पाडिवा (प्रातिपद), आड्ढ (आवर्त), सांठी (स्यार्थ), वाट (वर्त्मन्), गाढव (गर्दभ), कवडा (कपर्दिक), साडे (सार्ध), दीड्ढ (द्व्यर्ध), वाढणें (वर्धते), वरिपडा (उपरिपत्), पडिसाद (प्रतिशब्द), पढियास (प्रतिभास), अडकणिया (अर्धकणिका)

२ मागें ऋ आला असतां—

वाड (वृद्ध), मढें (मृतकम्)

३ पुढें र आला असतां—

एकवट (एकत्र)

४ (अ) स्वरांतर्गत एकेरी दंत्य :

यादव-मराठींत अशा स्वरांतर्गत दंत्याचा बहुधा लोप झाला आहे. उदा० मऊ (मृदु), नई (नदी), खाणें (खादति), कहाणी (कथानिका), दहीं (दधिक), वोवरें (वधूवर)

(आ) स्वरांतर्गत द्वित्त दंत्य :

बहुधा यादव-मराठींत हे वर्ण दंत्य म्हणूनच कायम राहतात आणि त्यांच्या मागील स्वर मात्र दीर्घ होतो. अर्थात् येथें मूर्धन्यीकरण नाहीं. उदा० पूत (पुत्र–पुत्त), माथा (मस्तक–मथ्थअ), वगैरे. कांहीं क्वचित् स्थळीं मूर्धन्य होतांना दिसतें. पहा—हाड (अस्थि–अथ्थि), पाटा (पत्ती)

(इ) आद्य दंत्य कायम राहतात—

ताक (तक्रं), तांबें (ताम्र), थेंबुटें (स्तोम), दूध (दुग्ध), दोरी (दारु), दिसणें (दृश्यते), धूर (धूम्र), ताराण (तारुण्य), तिवटना (त्रि–), थडी (तटि), दळवाडे (दल), दांतिरि (दंत), दी (दिवस), दिवटी (दीपयष्टि), धुळिरा (धूलि). क्वचित् कांहीं स्थळीं आद्य दंत्याचें मूर्धन्य होतें. उदा०

टिळा (तिलकः), टाळु (तालः), टाळें (तालकम्), डोहोळा (दोहद), डंकी (दंश्), डरी-डरणें (दर्)

५ आद्य 'न' आणि 'ल' अविकृत राहतात—

न : नांव (नामन्), नारिएल (नारिकेल), नळनी (नलिनी), निच (नित्य), नेपाळें (नेपाल), नेणता (न + ज्ञा)

ळ : लागीं (लग्), लळेवड्डु (लाल), लोंव (लोमन्), लाहो (लाभ), लाटु (लाट)

स्वरांतर्गत 'न' आणि 'ल' हे एकेरी असतांना बहुशः मूर्धन्य 'ण' आणि 'ळ' होतात. उदा०

न : खाणें (खादन्), न्हाण (स्नान), वहाणा (उपानहौ), गाणें-वाणें (गायनं-वादनं), सेणपुंजी (छगन—), पाणियेडा (पानीय-वट), जीणें (जीवनं), साजणें (सहजन)

ळ : वेळु (वेल-ला), केळी (कदली), जाळें (जाल), उपळ (उत्पल), राउळ (राजकुल), कुलाळ (कुलाल), अभिळासु (अभिलाषः), मेळावा (मेलापकः), गोधोळी (गोधूलिः)

'न' आणि 'ल' हे स्वरांतर्गत व द्वित्त असतांना नेहमीं दंत्यच राहतात. क्वचित् कोठें यादव-मराठींत त्यांचें मूर्धन्य झालेलें दिसतें. उदा० सळ (शल्य)

§ ३५ दंत्य व्यंजनें

वरील दंत्यांचीं मूर्धन्यें झाल्याचीं उदाहरणें सोडून इतर सर्व ठिकाणीं मूळ प्राचीन आर्य भाषांतील दंत्य उच्चार यादव-मराठींत कायम आहेत.

§ ३६ ओष्ठ्य व्यंजनें

प्राचीन आर्य भाषांतील ओष्ठ्य व्यंजनांचे उच्चार कायम आहेत. वर्तमान मराठींत इंग्रजी आणि फारशीच्या संपर्कामुळें दिसणारा 'फ' चा दंत्योष्ठ्य[१] उच्चार यादव-मराठींत असण्याचें कारणच नाहीं.

§ ३७ अनुनासिकें

यादवमराठींत 'ण, न' आणि 'म' या तीनच अनुनासिकांना स्वतंत्र अस्तित्व आहे. 'ञ' आणि 'ङ' या इतर अनुनासिकांचा त्या त्या वर्गांतील व्यंजनांशीं जोड होतो, आणि अनुस्वार हेंच प्रतीक त्यांच्याकरितां वापरलेलें दिसतें. 'आद्य ण, न,म' यादव-मराठींत कायम राहतात. प्राकृतांत आद्य 'न'चा 'ण' होई, परंतु मराठींत 'न' राहतो.[२] स्वरांतर्गत मध्य 'न' प्राकृतांत 'ण' होतो, परंतु मराठींत बहुशः 'न' च राहतो. प्राकृतांतील द्वित्त 'ण्ण' चा 'न' झाला आहे. स्वरांतर्गत म चा वँ किंवा व होतो.

---

१ (Ph): dento-labial.

२ प्रो० कृ० पां० कुळकर्णी यांनीं "न-ण या वर्णांचा उच्चारविपर्यय" या लेखानें न > ण आणि ण > न या प्रक्रियांची ऐतिहासिक दृष्ट्या सविस्तर चर्चा केली आहे. ती प्रस्तुत प्रकरणीं उपयोगी होईल. त्यांचें म्हणणें थोडक्यांत असें—

"न-ण यांच्या उच्चारव्युत्क्रमांत कालनिम्नत्व आहे, तें महाराष्ट्री आणि पैशाची या प्राकृत भाषांच्या कालाचें आहे. हेमचंद्र महाराष्ट्रीविषयीं "नो णः" (८-१-२२८) आणि पैशाचीसंबंधीं "णो नः" (८-४-३०६) असे नियम देतो. तेव्हां या दोन भाषिकांच्या मिश्रणानें मराठींतील न-ण या वर्णांचा विपर्यय होऊं लागला. या उच्चारभेदाचें कारण आघात हें होय." (पहा : महाराष्ट्र-साहित्यपत्रिका, वर्ष ८, अंक २)

प्रो० कुळकर्ण्यांनीं उदाहरणें प्रत्यक्ष बोलभाषेंतून आणि विशेषतः "ग्रामिक भाषेंतून" दिलीं आहेत. अर्थातच शिष्ट, ग्रांथिक मराठींत वरील प्रक्रिया नियमानें होतेच असें नाहीं. ग्रंथनिविष्ट यादवकालीन मराठींत 'आद्य ण' असलेले शब्द नाहींत. तसेंच मध्याक्षरांतील 'ण' हा आघातापेक्षां सरळ महाराष्ट्रीतून आला असावा असें वाटतें. कसेंहि असलें तरी प्रो० कुळकर्ण्यांची चर्चा मूलगामी आहे हें खरें.

§ ३८ अर्धस्वर Semi Vowels

प्राचीन इंडो-आर्यनमधील 'य' यादव-मराठींत तद्भव शब्दांत अति क्वचित् आढळतो. आद्याक्षरांत त्याचा 'ज' होतो, स्वरांतर्गत एकेरी 'य' चा लोप होतो, आणि जोडाक्षरांत त्याचा समानवर्णसंयोग झालेला दिसतो. 'दंत्य वर्ण' आणि 'र' यांच्याशीं युक्त असतांना याच्या पुढील वर्णांचें तालव्यीकरण होतें. मात्र 'प्राचीन य' नसला, तरी दोन निकटवर्ती स्वरांतील 'प्रगृह्य'[१] टाळण्यासाठीं मात्र यादव-मराठी 'व' वापरते. 'व' चा उपयोगहि असाच प्रगृह्य टाळण्यास होतो. (पहाः यश्रुति-वश्रुति, प्र० १ क्र० ८)

प्राचीन इंडो-आर्यनमधील आद्य 'व' यादव-मराठींत कायम आहे. तसेंच प्राचीन 'र्व–व्य' यांतील 'व' प्राकृत 'व्व' द्वारा मराठींत आहे. पंजाबी[२] आणि गुजरातीमध्यें 'व' ची हीच प्रक्रिया आढळते.

§ ३९ र, ल

मूळ इंडो–युरोपीयन मधील 'र-ल' यांची प्रक्रिया ऋग्वेदकालींच तीन प्रकारची होई. पुढें 'प्राकृत र-ल' आहेत, परंतु ते सदा 'संस्कृतांतील र-ल' च्याच जागीं अनुक्रमें येतात असें नाहीं. या दोन व्यंजनांतील अभेद प्राकृताप्रमाणें यादव-मराठींतहि आहे. उदा०

मराठी ल = सं० र : पेलिलें (प्रेर्); अलंग (अग्र); वोलें (आर्द्र); उकलणें (उत्कृ)

मराठी र = सं० ल

प्राचीन इंडो-आर्यनमधील 'र' चा उच्चार मराठींत सर्व स्थळीं कायम आहे, परंतु 'ल' मात्र स्वरांतर्गत असतांना 'ळ' होतो.

तसेंच, 'न-ल' यांचाहि अभेद क्वचित् यादव-मराठींत आढळतो. उदा० निलळता (निनलता), पाल्हैलें (प्रस्नु), लिंब-निंब (निंब)

§ ४० ऊष्मे

प्राचीन इंडो-आर्यनमधील 'श, ष, स' हे प्राकृतकालीं (मागधी

---

१ "Hiatus-tilger"

२ Dr. Jain: Phonology of Punjabi; 141

खेरीज करून) लोपून एक 'स' मात्र उरला. यादव-मराठींत 'ष' केवळ तत्सम शब्दांतच आढळतो. प्राकृताप्रमाणें फक्त 'स' न वापरतां यादव-मराठी तद्भव शब्दांत 'श' व 'स' हे दोन ऊष्मे वापरते. पुढें 'इ' किंवा 'ए' हे स्वर असल्यास 'श' आणि नसल्यास 'स' अशी साधारणतः मराठीची व्यवस्था आहे. म्हणजे परंपरा अशी—

सं० श–ष–स > प्रा० स > मराठी : श–स

संख्यावाचक विशेषण सं० दश–प्रा० दस यांतील 'स' चा 'ह' होऊन पुढें ११ ते १८ या संख्यांत या 'ह' चाहि लोप होतो. अकरा (एकादश) वगैरे.

ऊष्म वर्ण अनुनासिकांशीं संयुक्त असतांना प्राकृतांत त्याच्या तीन भिन्न प्रक्रिया होतात. 'श्म, ष्म, स्म' या जोडाक्षरांच्या प्रक्रिया अशा—

१ 'म' चा समानवर्णसंयोग.

२ ऊष्म वर्णाचा महाप्राण होऊन नंतर व्यत्यास होणें:

श्म < ह्म < म्ह

३ जोडाक्षराची प्फ अशी प्रक्रिया होणें.

पैकीं यादव-मराठींत दुसरी प्रक्रिया विशेष आहे.

§ ४१ महाप्राण–ह

प्राचीन इंडो-आर्यनमधील 'ह' च्या दोन प्रक्रिया होतात.

१ आद्य : मूळ ह कायम

२ आद्येतरः संस्कृत ह आद्य व्यंजनाचा महाप्राण करून स्वतः लुप्त होतें.

यांखेरीज उच्चारसौलभ्याकरितां शब्दांतील दोन वर्णांच्यामध्यें यादव-मराठी 'ह' कार घालते.

पुढें यादव-मराठींतील सर्व व्यंजनांची प्रक्रिया तत्कालीन ग्रंथांतील विशेष उदाहरणांसह देतों.

§ ४२ आद्य व्यंजनें : स्पर्श

संस्कृतांतील आद्याक्षरांतील सर्व स्पर्श यादव-मराठींत कायम राहतात. पुढें क्रमवार चर्चा देतों—

क : कहीं (कदापि), कदन (कर्दन), कामाठी (कर्म–), कीरु (किल), कसवटी (कर्षपट्टिका), कोंवळीक (कोमल–), कें (किम्), काह्याचें (कस्य–), काज (कार्य), कोडें (कौतुक), कुवा (कूप)

ख : खेळना (खेल), खांड (खंड्), खाणें (खाद्य), खेर (खदिर), खाणौरी (खन्)

ग : गजराउ (गर्ज्), गाभेवन (गर्भ–), गांवघेरी (ग्राम–), गोसावीणि (गोस्वामिनी), गुढर (फा० गुडर), गहीरु (गंभीर), गूज (गुह्य)

घ : घडि (घटि), घाय (घात), घणवट (घन-), घसणी (घर्ष्), घाटु (घाटः), घामु (घर्म)

च : चळवळ (चल्-), चाकवरा (चक्र–), चौकडणें (चतुर्-), चौक (चतुष्क), चोरमोळा (चोर-) , चाउरी (चतुरिका), चांपौल (चंपकपुष्प), चोख (चोक्ष्य), चौम्हेरि (चतुर् + मेरा)

छ : ' छ ' केवळ तत्सम शब्दांतच आढळतो. उदा० छत्र, छाया-मंडल. तद्भवांत त्याचा ' स ' किंवा ' श ' होतो–सेण (छगण), साइली (छाया), संद (छंद)

ज : जिणा (जित), जिनि (जीवन), जियालें (जीवित), जिव्हार (जीवागार), जानोसा (जन्यवास), जाई (जाति); जै (जय), जेवण (जेमन)

झ : झांटी (झाट), झांकरणें (झाकृ)

ट[१] : टांक (टंक), टका (टकः)

---

१ ' ट, ठ, ड, ढ ' हीं मूर्धन्य व्यंजनें आरंभीं असलेले शब्द यादव-मराठींत आहेत, परंतु ते सर्व ध्वन्यनुकारी असल्यानें त्यांची निश्चित व्युत्पत्ति नाही. शिवाय ते सर्व प्राकृतांत व वर्तमान भाषांत आढळतात. संस्कृतमध्येंहि ते बहुधा शब्दकोशांतच मात्र दिसतात.

ठ : }
ड : } ठीकवणी, डांडांति, डंब्राळ, डोंड, डो, ढीव, ढेंढें, ढोंकु, वगैरे.
ढ : }

त : ताराण (तारुण्य), तवं (तावत्), तिवटना (त्रिवटिका), तेव्हेळीं (तत्—), तळउपर (तल–), तण्हार (तृणागार), तातलें (तप्त), तैसा (तादृश). क्वचित् मृदु होतोः दोंदिल (तुंदिल)

थ : प्राचीन इंडो-आर्यनमध्येंच थ आद्याक्षरीं असणारे शब्द फार थोडे आहेत. आहेत ते बहुतेक ध्वन्यनुकारी. उदा० थैथै (थइथइ), थरथरणें (थरथरयते)

द : दळवाडें (दलवट), दांतिरी (दंत–), दी (दिवस), दीठी (दृष्टि), दीदळ (द्विदल), दुआड (दुष्प्राप्त), दारवंठा (द्वार–), दीडु (द्व्यर्ध), दाय (दान)

ध : धवळार (धवल–), धवळे (धव–), धाकिन्नला (ध्राक्), धावडहोडी (धाव्–), धुधुळिय (धुंद–), धुळिरा–(धूलि–), धायेपण (धात्री–)

प[१] : पडप (पट–), पढवणें (पठ्), पढियासणें (प्रतिभास्), पांती (पंक्ति), परियेसणें (परिश्रु), पवाड (प्रवृद्ध), पाख (पक्ष), पढियावो (प्रीति), पाणियडा (पानीयवट), पांचाखरी (पंचाक्षरिन्), पाहाती (प्रभात), पुढार (पुरस्कार), पैज (प्रतिज्ञा), पन्हरें (पंचदश)

फ : फळ (फल); फळक (फलक); फूल (पुष्प–प्रा० फुल्ल)

ब : बळियां (बल–); बाहाळी (बहुलता); बांधौडी (बंध; बिजाखर) (बीजाक्षर); बावनें (का० बावन); बाबुली (बाबुल); बोर (बदर)

भ : भंवर (भ्रमर), भारिवसु (भार–), भींगुरटी (भ्रमरी), भूअरी (भ्रम्), भरीया (भृत), भाका (भाषा), भेण (भय), भला (भद्र), भींती (भित्ति), भांगार (का० भंगार), भीख (भिक्षा), भुई (भूमि), भुंवई (भ्रू-)

---

१ 'आद्य प' क्वचित् लोपतो. उदा० ओतना (पूतना).

§ ४३ आद्य अनुनासिक

आद्याक्षरांतील 'न, म' यादव-मराठींत कायम राहतात. प्राकृतांत आद्य 'न' चा 'ण' होण्याबद्दल निश्चिति नाहीं.

नं : नळनी (नलिनी), नांदणें (नंद्), नायकवडी (नायकवट), नावेक (नामएक), निगुती (नियुक्त), निच (नित्य), निऱ्हा (निरस), निलाग (निर्लाग), निडळ (निटिल), नागारी (नागरिक), नडनाचें (नटनृत्य), नांवानांवा (नाम), निफन्नलीं (निष्पन्न), नेणणें (न+ज्ञा)

म : मढ (मठ), मधुवा (मधुपा), महुरु (मधुर), माघौतें (मार्गतस्), मादना (मर्दन), मानकुल (माणिक्य), मियां (मया), मेल्हवनी (मेल), मेहुणा (मिथुन), मफौरें (का॰ मुप्पुरि), मुडे (का॰ मुडि), मोत्यें (मौक्तिक), मऱ्हाठा (महाराष्ट्रक), माह्येर (मातृगृह)

प्राकृतांतील आद्य 'ण' चा मराठींत 'न' होतो.

§ ४४ आद्य अर्धस्वर

आद्याक्षरांतील 'य' चा तद्भव शब्दांत बहुश: 'ज' होतो; 'व, र, ल' हे कायम राहतात. क्वचित् 'व' चा ओष्ठ्य स्वर 'उ' किंवा 'ओ' झालेला यादव-मराठींत आढळतो.

य < ज : जूझ (युद्ध), जुझार (योद्धारः), जाउळें (युगुल), जूआरी (द्यूतकारी), जें (यत्), जुई (यूथिका), जोगी (योगिन्), जवळीक (युत-), जवं (यावत्)

व : वच्छ (वत्स), वडप (वृट)?, वाजौठी (वाद्य–यष्टि), वाटाऊ (वाटस्थः), वाणें (वादन), वाडी (वटिका), वांवरूळ (वामरूल), वाणेलग (वर्ण–), विसांवा (विश्रम्), वीरढें (विरूढ), वोरकल (का॰ वोरेकल्लु), वडील (वृद्ध), वोगर (का॰ वोगर)

कधींकधीं ओखट-वोखट, ओळगविणें-वोळगविणें, ओघ-वोघ, ओडवणें-

वोडविणें, ओलें-वोलें, अशा अनेक जोड्या आढळतात. येथें 'व' या अर्धस्वराचा 'ओ' असा शुद्ध स्वरोच्चार होतो.

व > ब : बरंव (वरम्), चळबळा (चल्?), बावी (वापी), बोजां (ओजस्), बासी (वत्स)

र : राओ (राजन्), रापणें (रंजनम्), राखोंडी (रक्षा), रीतहाती (रिक्तहस्ता), राणीव (राज्ञ–), राउळ (राजकुल), रळिया (रलः), रोस (रोष), रडणें (रुद्)

ल : लळेवड्ड (लाल–), लाहो (लाभ), लोंव (लोमन्), लागीं (लग्), लेहें (लेह्य), लेखा (लेखः), ले (लिप्), लीळाचरित्र (लीला–)

§ ४५ आद्य ऊष्मे

सं० श–ष–स > प्रा० स > मराठी श–स

श > स : सुनें (शून्य), सींग (शृंग), सेवाळें (शैवाल), सरांटी (शर–), सियाळी (शीत–), सेज (शय्या)

ष > स : साटि (षष्टि), सहा (षट्)

स > स : सकट (सहित), सर (स्वर), सवें (समम्), सराउ (सृ), सांकडें (संकट), साचोकार (सत्य–)

श > श : शांखळ (शृंखला), शोखणें (शुष्), शीयाळी (शीतलः)

स > ह : हान (सान)

प्राकृतांत 'श' चा 'स' नियमानें होई. यादव-मराठींत 'श–स'-मध्यें अभेद असलेला दिसतो. कारण, शाळ–साळ, शीयाळी–सीयाळी, शांखळ–सांखळ, शर–सर, अशीं दोन दोन रूपें अनेक आढळतात. पुढें ए-ई हे दीर्घ स्वर आल्यास 'प्राकृतांतील स' चा 'मराठींत श' होतो, हा नियम वर्तमान-मराठीला पूर्णतः लागू आहे; यादव-मराठीला विकल्पानें लागतो. किंबहुना यादव-मराठीचा 'स' कडेच अधिक कल होता असें दिसतें. पुढील रूपें पहा—

सामसाखा (श्यामशाखा), सीर (शिरस्), सीखर (शिखर), सैय्या (शय्या), सैत्य (शैत्य), सल्ल (शल्य), सुचि (शुचि), साया-साइली (छाया), सत्र (छत्र), सीस (शीर्ष), सौरियें (शौर्य), सल (छल), सोरू (शूकर), सीखवी (शिक्ष्)... वगैरे.

वरील रूपें पाहिलीं म्हणजे वर्तमान-मराठींत ' श-स ' मधील भेदाला जी निश्चिति आली आहे, ती यादवकालीं नसून, उलट ' स ' काराचेंच प्राबल्य होतें असें दिसतें. प्राकृतांतें संस्कृतांतील सर्व ऊष्म्यांचा एक ' स ' होई. अपभ्रंशांत ' स ' च राहतो. तेव्हां प्राकृत अपभ्रंशाचा हा ' स ' चा विशेष यादव-मराठींत वर्तमान-मराठी पेक्षां बराच कायम आहे. यादवोत्तर-कालीं हा प्राकृत विशेष लोपून ' स-श ' मधील भेद स्वच्छ झाला. यादव-मराठी ही प्राकृत-अपभ्रंशाला कशी जोडून आहे त्याचा हा एक पुरावा होय.

ह > ह : हातवसणें (हस्त-), हाथोबा (हस्त-उण), हडपु (का० हड्डिपु), हीरवा (हरित), हिंव (हिम), हियें (हृदय), हंसणें (हस्).

§ ४६ अंत्य व्यंजनें

संस्कृतांत शब्दांतीं जीं व्यंजनें असत तीं अनुनासिकें, विसर्ग आणि अल्पप्राण कठोर स्पर्श यांपैकीं असावीं लागत. पैकीं, प्राकृतकालींच हीं अंत्य व्यंजनें लोपून त्यांच्या पुढील प्रक्रिया झाल्या :

१ अल्पप्राण कठोर स्पर्श > अ : विद्युत् > विज्जुअ > विजू

२ विसर्ग > ओ–ए : पुत्रः > पुत्तो > पूतो; ततः > तओ

३ अंत्य अनुनासिक > पूर्वस्वर सानुनासिक व अंत्यवर्णलोप

वरीलपैकीं कोणत्या तरी एका प्रक्रियेनें प्राकृतांत अंत्यव्यंजनलोप होई. त्यामुळें पुढें अपभ्रंशांत व यादवमराठींत तद्भव शब्द व्यंजनान्त नाहींत. सर्व स्वरान्त आहेत. व्यंजनान्त शब्द तत्समांतच केवळ दिसतात.

---

१ यादव-मराठींतील ऊष्म वर्णांचा हा विशेष, व त्यांत दिसणारा प्राकृत-अपभ्रंशांचा अवशेष, यांचा उल्लेख प्रस्तावनेंत त्या त्या प्रकरणीं राहून गेला आहे. तरी प्राकृताच्या अवशेषांत ' स ' कारप्राबल्याचीहि गणना करावी व यादव-मराठीचें हें एक नियतचिन्ह मानावें.

§ ४७ स्वरांतर्गत व्यंजनें : अल्पप्राण स्पर्श

स्वरांतर्गत व्यंजनांपैकीं 'क, ग, च, त, द' यांचा लोप झालेला दिसतो. पहा—

क : चाम्हारु (चर्मकार), काउळा (कोंकोल), माथा (मस्तकम्), महार (मृतहर), राउळ (राजकुल), देउळ (देवकुल), कीवी (कीटक), एं (-अकम्), ई (-इका), आ (-अकः), पांती (पंक्ति), सेंद (संदूक), सीवार (सीमा-प्राकार), फुलौरा (पुष्पकार)

ग : सेण (छगण), जिव्हार (जीवागार), पडदनी (पटद्विगुण), दुहवा (दुर्भगा), सुहाव (सुभग), आर (अजगर), जावळ (युगुल)

च : सुई (सूचि), पिसें (पिशाचकम्), आण (वचन), मळयपांचौर (मलयपंचचील), पाखरी (पंचाक्षरी)

ज : राओ (राजन्), बीं (बीज), राणीव (राज्ञ-), आर (अजगर), रायांगण (राजन्-)

त : देशाउर (देशांतर), से (स्मृति), ठी (स्थिति), जूं (द्यूत), सें (शतम्), सीयाळ (शीतकाल), गेलें–मेलें–केलें (गत, मृत, कृत), माह्येर (मातृगृह), म्हणियें (भणितम्)

द : पाओ (पाद), सवा (सपाद), मऊ (मृदु), वाणें (वादनं), पाऊण (पादोन), पैकु (पदिक), सोयेरा (सहोदर)

प[१] : लावनी (लापनिका), गाभेवन (-पर्ण), वाओ (व्याप),

---

१ 'पाणी' हा शब्द समासांतर्गत असतांना यादव-मराठींत नेहमीं 'वणी' असा होतो. उदा० हातवणी, पायेवणी, कुळथवणी (= हुलग्याचें पाणी).

आव्हाट (अपवाट), ताओ (ताप), सीवारू (सीमाप्राकार :)

छ–झ : तत्त्वतः हे दोन स्पर्श म्हणजे ‘ च–ज ’ या अल्पप्राणांचे महाप्राण असले, तरी त्यांच्या उच्चारांत ऊष्म्यांचा अंश असतो. त्यामुळें इतर महाप्राण स्पर्शांप्रमाणें यांची प्रक्रिया न होतां त्यांचे बहुधा ऊष्मे होतात. म्हणजे यादव-मराठींत आद्य व स्वरांतर्गत ‘ छ ’ चा ‘ स ’ होतो. पहा—

साइली (छाया), सवसाया (-छाया), प्रेतसाया (-छाया), सळु (छलः), ज्ञानसत्रीं (-छत्र), संदु (छंद), उसीसे (उछ्वास), कासु–कासौटा (कच्छः); पुंस (पुच्छ)

§ ४८ महाप्राण स्पर्श

‘ ख, घ, थ, ध, फ, भ ’ या महाप्राण स्पर्शांतील स्पर्शत्व जाऊन केवळ महाप्राण ‘ ह ’ मात्र उरतो. ही प्राकृतांतील प्रक्रिया यादव-मराठींतहि आढळते. पहा—

ख > ह : लिहिणें (लिख्), सए (सखि), चांपौल (चंपकपुष्प- प्रा० चंपअफुल्ल), मुहुरैजे (मुख-), मोहोरें (मुखर)

घ > ह : जौहर (जतुगृह), लवलव (लघुलघु), खरहातु (खराघात), शशीकुनाहो (-नाथ), पाहोनरु (प्राघुर्णक-)

थ > ह : मेहुण (मैथुन), वहिला (प्रथम), पाहे (प्रार्थ्), कहाणी (कथानिका), जुई (यूथिका), पोहा (पृथुक)

ध > ह : महुर (मधुर), वोवरें (वधूवर), दहीं (दधिक), वहुमाय (वधुमाता)

फ > ह : चांपौल (चंपकपुष्प– > चंपअफुल्ल–प्रा०)

भ > ह : गव्हरु (गभीर), सोहोळा (शुभवेल), बहिरव (भैरव), लाहो (लाभ), पढियास (प्रतिभास्), ल्हाये (लभ्), सुहाव (सुभग), म्हणियें (भणित), अहीर (अभीर).

§ ४९ स्वरांतर्गत मूर्धन्य

संस्कृत वा प्राकृत स्वरांतर्गत मूर्धन्य व्यंजनांच्या यादव-मराठींत पुढील प्रमाणें प्रक्रिया होतात.

सं० प्रा० ट–ड > म० ड : निडळ (निटिल), कवडा (कपर्दिका-प्रा० कवड्डिओ), सांकडें (संकट), वरिपडा (उपरि-पत्), कोडें (कौतुकं, प्रा० कोड्डिअं), साडे (सार्ध-सड्ढ), साडा (शाटक), कुकडी (कुक्कुटी), खडु (क्षत :), लाडु (लाट :), वाडी (वाटिका), कडु (कटुक), मडें (मृतकं- प्रा० मडअं), फुडी (स्फुट), संकीड (संकीटक), कुडी (कुट)

प्रा० ठ–ढ > म० ठ : ठी (स्थिति–प्रा० ठिइ), आठ (अष्ट), गांठि (ग्रंथि), कामीठा (कर्मवाटिका), ठाउवा (स्था–)

प्रा० ड–ढ > म० ढ : पुढार (पुरस्कार–प्रा० पुडआर) उपंढरु (उत् + पांडुर), पढियासणें (प्रतिभास्), बूढ (बुध्न)

प्रा० ढ > म० ढ–ह : देहुडी-दी (द्व्यर्ध-दिवड्ढ-दीढ-दीह)

यादव-मराठींत कांहीं ठिकाणीं कठोर स्पर्श आद्य व स्वरांतर्गत मृदु झालेलेहि दिसतात. ही परंपरा प्राकृतापासूनचीच आहे. यादव-मराठींतील उदाहरणें :

क : अनेग (अनेक), गडा (कोटः), वासुगी (वासुकी), गेंद (कंदुक), डाग (तटाक)

च :

ट : किडा (कीटक), घडी (घटिका), कवाड (कपाट), तडी (तट)

त : दोंदिल (तुंदिल), दादा (तात)

प :

§ ५० अनुनासिक

प्राकृतांत शब्दांतर्गत स्थानीं 'संस्कृत न-ण' यांचा 'ण' होई. यादव-मराठींत हीच प्रक्रिया उतरली असून शब्दाच्या मध्यभागांतील 'ण' हा संस्कृत 'न-ण' पासून येऊं शकतो. पहा—

सं० ण > म० ण : कणीस (कणिश), सेण (छगण), म्हणौनि (भणित्वा), राणीव (राज्ञ–प्रा० रण्ण), दुणवटे (द्विगुण–)

सं० न > म० ण : वाखाणणें (व्याख्यान), पाणियेडा (पानीयवट), जीणें (जीवनं), न्हाणी (स्नान), पाऊण (पादोन), कहाणी (कथानिका), आंगण (अंगन), साजणें (सहजन), विणती (विनति)

सं० ण (जोडाक्षरांत) > म० न : पान (पर्ण), रान (अरण्य), कान (कर्ण)

सं० ण > म० ळ : वेळुवन (वेणुवन)

नामविभक्तिप्रत्ययांत आणि तद्धितप्रत्ययांत 'ण' व 'न' यांचा अनुस्वार होतो, किंवा निकटवर्ती स्वरांना अनुनासिकत्व येतें. उदा०

तृतीया ए० व० : अनेक > अप० अएं म० एं
षष्ठी अ० व० : अकानाम् अप० अआं > म० आं
नपुं० प्र० अ०व० : ईनि > अप० ईइं > म० ईं

'स्वरांतर्गत म' ची प्रक्रिया त्याच्या शब्दांतील स्थानावर अवलंबून आहे.

(अ) शब्दांतर्भागीं 'म' च्या दोन प्रक्रिया झालेल्या यादव-मराठींत दिसतात. एक 'म' चा 'वँ' होणें, आणि दुसरी 'व' हा निरनुनासिक राहून तत्पूर्व स्वर सानुनासिक होणें. वस्तुतः या दोन प्रक्रिया नसून एकीचेच दोन प्रकार आहेत. म्हणूनच यादव-मराठींत स्वरांतर्गत 'म' हा 'वँ' आणि '˘व' अशा दोहीं रूपांत दिसतो. तसेंच या दोहोंपैकीं अमक्या शब्दांत अमकीच प्रक्रिया नियमानें होईल असें नाहीं. तेव्हां दोहींचीं उदाहरणें एकत्रच देतों.

सं० म > म० वँ-व : भवंर (भ्रमर), विसांवा (विश्रम :) आविंस (आमिष), लोंव (लोमन्), गोसावीणि (गोस्वामिनी), वावरूळ (वामरूल), चवंरें (चामर), कुंवरी (कुमरी), नांव (नामन्), भुंई (भूमि), भूवरी (भ्रम्), गांव (ग्राम), गहूं (गोधूम), पांचवं (पंचम), नावेक (नामएक), सींव (सीमा), रवण (रमण), धवें (धाम)

यादव-कालांतील ज्या अस्सल पोथ्या उपलब्ध आहेत त्यांत अनुस्वारांची व्यवस्था नियमित नाहीं. ज्ञानेश्वरीची राजवाडे–प्रत, उद्धवगीता, धवळे, स्मृतिस्थळ, दृष्टांतपाठ वगैरे अस्सलांवरून छापलेल्या ग्रंथांतहि अनुस्वारांची दुर्दशाच आढळते. तेव्हां प्रस्तुत प्रक्रियेच्या दोन प्रकारां-संबंधीं निश्चित मत देतां येत नाहीं.

(आ) विभक्तिप्रत्ययांत व ताद्धितप्रत्ययांत संस्कृतांतील ‘ म ’ चा मराठींत अनुस्वार होतो. ही प्रक्रिया न-प्रमाणेंच आहे. उदा०

लट् प्र० पु० ए० व० : आमि > अप० आइं > म० ईं
लट् प्र० पु० अ० व० : आमः > अप० आओं > म० ऊं-ओं
नपुं० प्र० पु० ए० व० : अकम् > अप० अअं > म० एं

§ ५१ स्वरांतर्गत य-व

(अ) १ संस्कृत य > मराठी-लोप किंवा अ : मोर (मयूर); सुआळें (-आलय); निरइं (निरय); उदिम् (उद्यम); इसाळु (विषयालु); अतिशे (अतिशय); वळें (वलय); रसाएन (रसायन); उभे (उभय); पेहें (पयस्); पेणें (प्रयाण- ?); सैंवर (स्वयंवर); भासुर (भयासुर); सराठी (शरयष्टि)

२ प्राकृतांतील प्रगृह्यभेदक य > म० य : सायर (सागर); सोयरें (सहोदर); पायिक (पादिक); सीयाळ (शीतकाल)

३ सं० य > ज : देज (देयम्); पेज (पेयम्)

४ सं० अय > म० ए : वळें (वलय); एं (अकम्-प्रा० अयं)

५ सं० य > प्रा० यँ > म० व : माव (माया); सावुली (छाया) ; उपावो (उपायः) ; न्यावो (न्याय) ; रावो (राजन्)

(आ) १ सं० प > प्रा० व > म० व : वावर (प्राकार); दीवी (दीपिका–प्रा० दीविआ); तावो (तापः-प्रा० तावो); रावा (राजन्–प्रा० रावो); वावी (वापी–प्रा० वावी); ओवरी (उपरिका)

२ सं० अव > प्रा० ओ > म० ओ : हो (भवति–प्रा० होति) लोणीचें (लवणत्य); वोवरें (वधूवर); नोवरा (नववर); वोदरे (अवद्द); नातोंडु (नप्तृवत्)

३ सं० व > म० ब (क्वचित्) : आरबाई (-रव); कोंडबार (-द्वार)

§ ५२ र

संस्कृतांतील स्वरांतर्गत र यादव-मराठींत कायम राहातो. उदा० चांम्हार (चर्मकार) ; माझार (मध्यगृह) ; मरें (मृतं), पोखरिणी (पुष्करिणी); सोरट (सौराष्ट्र); सोरू (शूकरः) ; वरवड (उपरिपत्); विरूं (वैर); वेव्हारा (व्यवहारकः)

§ ५३ ल

स्वरांतर्गत 'ल' बहुतेक ठिकाणीं 'ळ' होतो. उदा० आभिळाखु (अभिलाषः); दळवइ (दलपतिः); राउळ (राजकुल); उपळीं (उत्पल); वेळु (वेलः); केळी (कदली); मेळाओ(मेलापकः); बहळ(बहुल); काळ (कालः) ; लीळाचरित्र (लीला-) ; फळक (फलक)

§ ५४ स्वरांतर्गत ऊष्मे

'संस्कृतांतील श , ष , स ' हे ऊष्मे प्राकृतांत एक 'स' म्हणून रहात. यादव-मराठींत तद्भव शब्दांत 'श' आणि 'स' हे दोन ऊष्मे आहेत.

संस्कृतांतील ऊष्म्यांच्या पुढील भिन्न भिन्न प्रक्रिया यादव-मराठींत दिसतात.

श > स : सामसाख (श्यामशाखा), आसु (आशा), पटिसाळा (प्रतिशाला), पिसें (पिशाच्च), पासीं (पार्श्वे), नासणें (नश्), कस्मळ (कश्मल), पसीमा (पश्चिम);

पारिसी (परिश्रय), पास (पाश), सरिस (सदृश), सोहोळा (शुभवेल:), किंसौरु (किशोर)

ष > स : सीस (शीर्ष), कसवटी (कर्षपट्टिका), साहाण (पाषाण), वरिस (वर्ष), वासुट (विप्रवत्), भास (भाषा), आविंस (अमिष)

स > स : पसरणें (प्रसृ), पढियासणें (प्रतिभास), हंसें (हास्य), कापुस (कर्पास)

स-ष > ख : खुडुगुण (षट्-), मूखक (मूषक), उपखा (उपवास), असेख (अशेष)

स, श > ह > अ : पांतु (पश्यंतु), पाह (प्रकाश), दिहां (दिवस)

§ ५५ ह

१ 'स्वरांतर्गत ह' चा कधीं लोप होतो.

सावासु (सहवास), सोयरा (सहोदर), दुइता (दुहिता), सपांती (सहपंक्ति), सीं–तृ० ए० व० प्रत्यय (सहितं)

२ क्वचित् यादव-मराठींत दोन वर्णांमध्यें सुलभोच्चाराकरितां हकार घातला जातो.

सोहोपें (सोपें), सोहोज्वळ (सोज्ज्वळ), अन्हवानी (अन्+उपानह्), चाम्हारू (चर्मकार:), मेहलन (मीलन), व्हेळीं (वेल:), मोहडा (मुद्रा); निन्हास (निरास), चौथाहार (-स्तर), सहंश्रुति (संस्तुति), माहियेर–माह्येर (मातृगृह–प्रा० माइघर), हिंदोळा (आंदोलक:), तण्हार (तृणागार)

§ ५६ कांहीं विशेष प्रक्रिया

यादव-मराठींत आद्य व स्वरांतर्गत व्यंजनाच्या कांहीं विशेष प्रक्रिया आढळतात. त्यांतील कांहीं अपवादात्मक होत व इतर नियमबाह्य नसल्या तरी गुंतागुंतीच्या आहेत. म्हणजे प्राकृत अपभ्रंशांतून ते शब्द मराठींत येतांना एकाहून अधिक प्रक्रिया त्यांच्या ठायीं झाल्या आहेत. अशा विशेष प्रक्रियांचीं कांहीं उदाहरणें पुढें देतों.

द्र > ज्र > न : नीनिली (निद्रित)
द > ड > ळ : डोहोळा (दोहद), केळी (क्रीडा)
र > ळ : इंगळ (अंगार), अढाळ (अंधार), साळांक (क्षार), अखळ (अक्षर)
ड, द > ज : सावज (श्वापद), गांजिव (गांडीव), माजिरा (मादक)
र > ड : पुढारु (पुरस्कार)
ग्न > ज्ञ : लज्ञ (लग्न)
ख > क्ष : क्षेदु (खेद)
ध > ख : संबोखीले (संबोध-)
थ > ख : पाखा (पश्यथ-द्वि० पु० अ० व०)
च > थ-प : सिंथितु (सिंच्), सिंपा (सिंच्)
च > स : सवडा (चर्म-)

§ ५७ प्राकृताच्या छटा : द्वित्त वर्ण

प्राकृत-अपभ्रंशांतील द्वित्त व्यंजनें मराठींत येतांना साधीं, एकेरी होतात, व बदलीं तत्पूर्व स्वर दीर्घ होतो. परंतु यादव-मराठींतील कांहीं शब्दांत प्राचीन द्वित्व शिल्लक राहिलेलें दिसतें व कांहीं ठिकाणीं तें अकारण आलें आहे. हे सर्व अपवाद होत. उदा०

वान्नरु (वानर), वन्नमाळी (वनमाली), मत्त (मत), विगुत्तले (विगुंत-), मन्नोरथु (मनोरथ), गंधफुल्ली (-प्रा० फुल्ल), तिल्लक (तिलक), लल्लाट (ललाट), निल्लजें (निर्लज्ज-प्रा० निलज्ज), सल्ल (शल्य-प्रा० सल्ल), नील्लळ (निलाल)

§ ५८ संयुक्त व्यंजनें (Conjuncts)

संस्कृतांतील संयुक्त व्यंजनें प्राकृतांत भिन्नवर्ण संयोगानें द्वित्त व्यंजनें होत. भिन्नभिन्न संयुक्त व्यंजनांच्या भिन्न प्रक्रिया प्राकृतांत होत असल्यानें, तेथें द्वित्त व्यंजनांचे विविध प्रकार आढळतात. हीं द्वित्त व्यंजनें प्राकृतांत व पुढें अपभ्रंशांत तशींच राहिलीं. नंतर अर्वाचीन इंडो-आर्यन भाषांच्या आरंभकालीं मात्र त्यांतील द्वित्त्व लोपून तीं व्यंजनें साधीं, एकेरी झालीं

आहेत व त्यामुळें बिघडणारा शब्दाचा तोल सांभाळण्यासाठीं पूर्वस्वर दीर्घ झाला आहे.

यादव-मराठींतील संयुक्त व्यंजनांची होणारी प्रक्रिया पुढील प्रकरणें तपासून अजमावितां येईल—

१ स्पर्श+स्पर्श : (अ) समवर्गीय (आ) विषमवर्गीय

२ अनुनासिकयुक्त जोडाक्षरें

३ स्पर्श+य

४ स्पर्श+र

५ स्पर्श+ल

६ स्पर्श+व

७ स्पर्श+ऊष्मे

वरील सर्व प्रकारांचीं उदाहरणें पाहिल्यास प्राचीन संयुक्त व्यंजनांची व्यवस्था यादव-मराठी कशी लाविते हें दिसेल.

§ ५९ स्पर्श + स्पर्श

(अ) समवर्गीय :—

क्क : चिखलु (दे० चिक्कल); कुकडी (कुक्कुटी)

च्च : उच–उंच (उच्च)

च्छ : कासोटेकारु (कच्छ–); कासव (कच्छप); तुसें (तुच्छ); पुसणें (प्रच्छ्)

ज्ज : लाज (लज्जा); काजळु (कज्जल); पैज (प्रतिज्ञा-प्रा० पइज्जा)

ट्ट : पाटें (पट्ट); पाटण (पट्टन)

ड्ड : उडणें (उड्डयते); आड– (का० अड्ड)

त्त : पातळ (पत्तल); चीत (चित्त); भीतभंग (भित्ति-); माताइते (मत्त–); ...... क्वचित् च होतो ... प्राचिन्ना (प्राक्तन–त्त).

द्ध : बूझ (बुद्धि:); जुझारू (योद्धार:); सुवेंझु (सुविद्ध:)

प्प : पिंपळ (पिप्पल)

(आ) विषमवर्गीय :-

ट्क > प्रा० क्क > म० क : सक (षट्क)
त्क > क्क : उकलणें (उत्कल्); उरुक (उत्कर्ष)
त्ख > ख्ख : उखणणें (उत्खन्); उखेंडी (उत्खेद:)
ड्ग > ग्ग-किंवा ड्ड : खाड (खड्ग)
द्ग > ग्ग : मोगर (मुद्गर)
द्घ > ग्घ : उघडणें (उद्घट)
क्त > त्त : मोतीं (मौक्तिक); भातु (भक्त); रितें (रिक्त) रातला (रक्त); पांती (पंक्ति)
प्त > त्त : सात (सप्त); तातली (तप्त); नातोंडु (नप्तृ), जागसुता (–सुप्त)
क्थ > थ्थ > त : शीत (सिक्थ)
ब्द > द्द : सादु (शब्द)
ग्ध > द्ध : दूध (दुग्ध)
ब्ज > ज्ज : खुजें (कुब्ज)
ब्ध > द्ध : लाधलें (लब्ध)
त्प > प्प : उपळ (उत्पल); उपजणें (उत्पद्यते); परावर (परात्पर)
द्भ > ब्भ : उभाव (उद्भाव)
द्ध > द्ध–झ्झ : वेंझ (विद्ध)
द्ध > ध : उधट (ऊद्धत)

§ ६० अनुनासिकयुक्त जोडाक्षरें

स्पर्श + अनुनासिक

१ कंठ्य + न–म = कंठ्य :--

क्न > क्क : मोकळीक (मुक्न–?)
ग्न > ग्ग : लाग (लग्न), आगि (अग्नि), नागवें (नग्न), उबग (उद्विग्न), आगियेल (अग्नि–)

क्म > क्क :

ग्म > ग्ग :

२ ज + न = ण :—

ज्ञ > ण : राणी (राज्ञी), राणीव (राज्ञ), जाणविता (ज्ञापय-), जानवें (यज्ञोपवीतम्), आण (आज्ञा)

३ त्न > त्त : सवत (सपत्नी), आइती (–यत्न)

द्न > द्द : ही प्रक्रिया संस्कृतकालींच होत होती असें दिसतें. उदा० सं० भिन्न < भिद् + न; छिन्न < छिद् + न

प्न > प्प : सपाइलें(–स्वप्न...?)

त्म > प्प : आप, आपण (आत्मन्–प्रा० अप्पणो)

§ ६१ अनुनासिक + स्पर्श

अनुनासिक आणि स्पर्श हीं संस्कृतांत एकत्र आलीं असतां त्यामुळें स्वरांना जें अनुनासिकत्व येतें त्याची चर्चा मागें क्र० १३ मध्यें केलीच आहे. त्या भिन्न भिन्न प्रक्रियांचा विचार पुढीलप्रमाणें करितां येईल—

–ंक : कांकण (कंकण), आंखणें (अंक्), कुंकू (कुंकुम)

–ंख : सांखळ (शृंखला)

–ंग : इंगळ (अंगार), आंगण (अंगन), सींगवटी (शृंग), आंगाविणें (अंग्), रंगाशिलें (रंग–)

–ंघ : जांधिवा (जंघा)

–ंच[1] : वांचणें (वंचयति), मांचा (मंचक), पांचाखरी (पंचाक्षरी), चोंच (चंचु)

–ंज : मांजिठें (मंजिष्ठ), पांजिरा (पंजर)

–ंझ : वांझौटी (वंध्या–प्रा० वंझा), सांझवेळ (संध्या–प्रा० संझा)

–ंट : वांटा (वंट), कांटा (कंटक)

–ंठ : सुंठ (शुंठि), कंठि (कठ–)

---

१ क्वचित् ' –ं च ' याची ' न्ह ' अशी प्रक्रिया होते–पन्हरें (पंचदश–पण्णरह)

∸ ड : मांडणें (मंड्), दांड (दंड), मुंठणें (मुंड्), सोंड (शुंडा)

∸ त : आंतौरी (अंतःपुरिका), दांतिरी (दंत–), आंत (अंतर), भींतर (अभ्यंतर), आंति (अन्ति–लट्. तृ० पु० अ० व०)

∸ थ : पांथ (पंथ), कांथेकारु (कंथा–)

∸ द : सेंदुर (सिंदूर), चांदिणें (चंद्र-), आनंदणें (आनंद्)

∸ द्र : प्रा० न्द : सांद (सांद्र), चांदिणें (चंद्र–)

∸ ध : आंधणा (अंधस्), रांधवणा (रंध्-), आंधारैले (अंधकार-), खांदेवरि (स्कंध–)

∸ ध्र > प्रा० न्ध :

∸ प : चांपौल (चंपकपुष्प), सांपडणें (संपत्), सांपें (संप्रति)

∸ फ : दुःखगुंफा (–गुंफ्– ?)

∸ ब : उंबर (उदुंबर), निंबौळी (निंब–), लांब (लंब)

∸ भ : खांबु (स्कंभ), कुंभार (कुंभकार)

§ ६२ अनुनासिक + अनुनासिक

(१) प्राकृतांतील 'द्वित्त न्न-ण्ण' हे यादव-मराठींत एकेरी होतात, व त्यामुळें तत्पूर्व स्वर दीर्घ होतो. मात्र मराठींत येणारें एकेरी अनुनासिक बहुशः दंत्य (न), व क्वचित् मूर्धन्य (ण) असतें.

ण्ण > न : पान (प्रा० पण्ण), कान (प्रा० कण्ण), सुनें (शून्य- प्रा० सुण्ण)

ण्ण > ण : वाण (वर्ण–प्रा० वण्ण)

न्न > न : कदन (कदान्न), आन (अन्य–प्रा० अन्न)

(२) प्राकृतांतील 'द्वित्त म्म' मराठींत एकेरी होऊन तत्पूर्व स्वर दीर्घ होतो—

चाम्हारु (प्रा० चम्मआर), कामारी (प्रा० कम्मआरी), चामक (चर्मक)

(३) दोन विषम अनुनासिक संयुक्त असल्यास त्यांतील दुसरें प्रभावी ठरतें व पहिलें दुसऱ्यांत मिसळतें—

म्न > प्रा० न्नं :

न्म > प्रा० म्म : उमाणें (उन्मान), उमलणें (उन्मीलन), उमाळा (उन्मेलः)

§ ६३ अनुनासिक + अर्धस्वर

[१] अनुनासिक+यः—

अनुनासिक प्रभावी ठरतें व 'य' चा त्याच्याशीं संयोग होतो—

रान (अरण्य); मान (मन्या); साम (साम्य); ताराण (तारुण्य), आनौतें (अन्यतः); जानवसा (जन्यवास)

[२] र युक्तः—

म्र > ं ब : तांबें (ताम्र), आंबा (आम्र)

र्ण > न-ण : सोनें (सुवर्ण); जुनें (जीर्ण), वाण (वर्ण)

र्म > म : कामारी (कर्म-), चाम्हारु (चर्मकार), चामाठी (चर्मयष्टि)

[३] लयुक्त :—

म्ल > ं ब : आंब (आम्ल)

[४] वयुक्त :—

न्व >

ंव >

§ ६४ अनुनासिकयुक्त ऊष्मे

(१) स्न, ष्ण > न्ह : उन्हाळें (उष्ण-), न्हाणी (स्ना-) पान्हा (प्रस्नव), कान्हु (कृष्ण)

(२) श्म : मिसुरें (श्मश्रु)

ष्म :

स्म : विसुरैला (विस्मृ-), मसणवट (स्मशान-)

§ ६५ य-युक्त जोडाक्षरें

(१) 'कंठ्य, तालव्य, मूर्धन्य, ओष्ठ्य स्पर्श + य' यांत स्पर्श प्रभावी ठरतात, आणि 'य' त्यांत मिळून जातो-

---

१ मराठी निम्होळ (सं० निम्न) ही व्युत्पत्ति बरोबर असल्यास हा अपवाद ठरतो.

क्य : सींकें (शिक्य)
ख्य : वाखाणिले (व्याख्यान)
ग्य : लागणें (लग्यते), जोगा (योग्य)
घ्य :
च्य : चूतांकुर (च्यूत-)
ज्य : जगजेठी (-ज्येष्ठ-), जोइसपण (-ज्योतिष-)
ट्य : तुटणें (त्रुट्यते), फोडणें (स्फुट्यते)
ड्य : जाडी (जाड्य:)
ढ्य :
प्य : लपणें (लुप्य)
फ्य :
ब्य :
भ्य : भीतर (अभ्यंतर), भिजणें (अभ्यंज्- ?)

(२) दंत्य स्पर्श+स : यांत प्रथम 'य' मुळें दंत्याचें तालव्य होतें व नंतर हें तालव्य प्रभावी ठरून त्यांत 'य' सामावतो.

त्य > च्य > च्च : अढेच (अर्धतृत्य), नाच (नृत्य), निच्च (नित्य), साचोकारें (सत्य), लोणीचें (लवणत्य)

थ्य > छ्य > च्छ :

द्य > ज्य > ज्ज : आजि (अद्य), विजू (विद्युत्), वाजौटी (वाद्ययष्टि), खाजें (खाद्य), वाजांत्र (वाद्ययंत्र), जूआरी (द्यूत-)

ध्य > झ्य > ज्झ[१] : सांझ (संध्या), माझार (मध्यगृह), वांझ (वंध्या), जुझतां (युध्य-)

(३) 'ल, व, श, ष, स + य' : येथें प्रथम वर्णांत 'य' सामावून जातो व पहिलें व्यंजन प्रभावी ठरतें.

ल्य : कालि (कल्य-), तेली (तैल्य-), मोल (मूल्य), सल्ल

१ क्वचित् 'ध्य' (स्वरांतर्गत) चा ढ होतांना दिसतो. उदा० ढवसाओ (अध्यवसाय:)

(शस्य), पालक (पल्यंक), सेलाटी (शल्ययष्टि)

व्य : वेव्हारा (व्यवहारक), वावरू (व्यापार), वाघ (व्याघ्र), विंजण (व्यजन), वेग्र (व्यग्र), वाओ (व्याप), चक्रवीहु (चक्रव्यूह)

श्य : दिसे (दृश्यते), नासे (नश्यति), सालेपण (श्यालकत्व)

ष्य : होईल (भविष्यति–प्रा० भविस्सहि) ...वगैरे भविष्ये लट्-मध्यें. क्वचित् क्ष होतो. उदा० मनुक्ष (मनुष्य), सीक्षे (शिष्य)

स्य : कांश (कांस्य)

त्स्य : मासोळी (मत्स्य)

(४) 'र्य' आणि 'ह्य' या जोडाक्षरांत मात्र 'य' प्रभावी ठरून प्रथम वर्ण 'र–ह' हे त्यांत मिसळतात—

र्य > य्य > ज्ज : जी (आर्य), काज (कार्य), आजा (आर्यक),

क्वचित् र्य > र : तुरें (तूर्य)

ह्य > य्यह > ज्झ : वोझें (वह्य), गूज (गुह्य), माझें (मह्यम् ?)

य्य > ज्ज : शेज (शय्या)

§ ६६ र-युक्त जोडाक्षरें

र-युक्त जोडाक्षरांत 'र' हा दुसऱ्या व्यंजनांत सामावला जाऊन दुसरें व्यंजनच प्रभावी ठरतें.

(१) 'र' हें दुसरें व्यंजन असलेलीं उदाहरणें—

क्र : वांकुडें (वक्र–), चाकवारा (चक्र–), ताक (तक्र), केणें (क्रयण)

ग्र : जागें (जागृत), गांव (ग्राम), गांठि (ग्रंथि), आघाओ (अग्रीय), गांवार (ग्रामकार), आगळें (अग्र–ल), उघाणी, (उद्ग्रहणीक)

घ्र : वाघ (व्याघ्र), घाणि (घ्राण)

त्र : वितुटी (वित्रुट्), पातें (पत्र), पाटसुत (पट्टसूत्र), आंतडें (अंत्र), जेथु (यत्र)

प्र : पाथर (प्रस्तर), पसर (प्रसर), पाहरा (प्रहर), पहिला (प्रथम), पाह (प्रकाश), पेणें (प्रयाण), पसाय (प्रसाद) पाहुणरु (प्राघुणक–), कानवाथरु (कृष्णप्रस्तर–व)

द्र : मुदी (मुद्रिका), मोहडा (मुद्रा), निजैला (निद्रित), दाम (द्राम)

भ्र : भावु (भ्रातृ), भवर (भ्रमर)

म्र > ं ब : पहा मागें क्रमांक ६३

ध्र : धाडी (ध्राडि :)

श्र : सासू (श्वश्रू), विसांवा (विश्रम), पारिसें (परिश्रय), शिन (श्रम), शोणितेपुरी (श्रोणित–)

स्र : मावुसी (मातृश्वसा)

छ्र : उसाण (उच्छ्रयण)

रयुक्त दंत्य स्पर्शांचा विचार मागें क्रमांक ३४ मध्यें केला आहे.

(२) 'र' हें पहिलें व्यंजन असतांना—

र्क : साकुर (शर्करा), माकोडा (मर्कटकः)

र्ग : घागरी (गर्गरिका), मागु (मार्ग)

र्घ : महाघ (महार्घ)

र्च : कूंचा (कूर्चक)

र्ज : गुजर (गुर्जर), मांजरी (मार्जारी–), भावजइ (भ्रातुर्जाया), गाजणें (गर्ज्), फूजिती (स्फूर्ज्)

र्प : वोपणें (अर्प्); सोपारें (शूर्पारक); कापड (कर्पट); कोंपर (कूर्पर); सापु (सर्प)

र्ब : दुबळा (दुर्बल); निबल (निर्बल)

र्भ : गाभेवन (गर्भवन); दुहवा (दुर्भगा)

र्ण : मागें पहा क्रमांक ६३

र्म : मागें पहा क्रमांक ६३

र्त, र्थ, र्द, र्ध : मागें पहा क्रमांक ३४

र्य : मागें पहा क्रमांक ६५

र्ल : निलागु (निर्लाग); निलजें (निर्लज्ज)

र्व : येथें प्रथम 'र' चा 'व' होऊन नंतरची प्रक्रिया कधीं ब न होतां साधें 'व्व' असें रूप होतें. या दोन्ही प्रक्रिया यादव-मराठींत आढळतात. उदा० चावणें (चर्वति); वरील (उर्वरित)

र्व > र्र : (क्वचित्) सरेगाउ (सर्वगत); पेर (पर्व)

र्श : पासीं (पार्श्व), पास (स्पर्श)

र्ष : घांसणें (घर्षति); सीस (शीर्ष)

§ ६७ ल-युक्त जोडाक्षरें

(१) ल्+म : मागें पहा क्रमांक ६३

ल्क : वाकळ (वल्कल... ?)

ल्ग : आवगणें (आवल्ग्)

प्ल, ल्प : कापणी (कल्प्... ?), पोहणें (प्लवते-)

ल्प > ल : आलुमालु (अला... ?)

(२) 'ल+य, व, ह'...यांत 'ल' प्रभावी ठरून 'य, व, ह' यांचा त्यांत समावेश होतो. उदा०

ल्य : मागें पहा क्रमांक ६५

ल्व : बेल (बिल्व)

ल्ह : उलाटयंत्र (उल्हाट)

(३) 'ल' द्वितीय वर्ण असतांना–

र्ल : मागें पहा क्रमांक ६६

ल्ल : पालवी (पल्लव)

§ ६८ व-युक्त जोडाक्षरें

(१) 'कंठ्य, तालव्य, मूर्धन्य स्पर्श + व' : यांत स्पर्श प्रभावी ठरून 'व' त्यांत सामावतो.

क्व : पिकैलें (पक्व); तवंक (त्वक्म्)

ज्व : जरु (ज्वर); जाळ (ज्वाल); उजळता (उज्ज्वलता)
च्छ्व : उसासें (उच्छ्वास)
ट्व : खटांग (खट्वांग); खाट (खट्वा)

(२) दंत्य स्पर्श + व : दंत्य हें 'व' मध्यें सामावून शेवटीं दोहींचा मिळून ओष्ठ्य स्पर्श होतो. जसें, त्व > व्व > प्प
त्व : 'पण' भाववाचक प्रत्यय (त्वन्)
द्व : बारा (द्वादश); उबगैला (उद्विग्न); ही प्रक्रिया क्वचित् होते. नेहमीं द्व > द्द हीच प्रक्रिया आढळते. उदा० दारवंठा (द्वार-); दीप (द्वीप); दुणो (द्विगुण); दंदीया (द्वंद्विन्); दुपहारी (द्विप्रहर)
ध्व : उभा (ऊर्ध्व)

(३) ल्व > ल मागें पहा क्रमांक ६७

(४) ऊष्मे + व : ऊष्मे प्रभावी आणि 'व' चा त्यांशीं संयोग.
श्व : पासीं (पार्श्वे); सावज (श्वापद); उसासितांति (श्वस्); आसुआर (अश्वकार)
ष्व : माउसी (मातृष्वस्रिका)
स्व : संवधुर (स्वयंधुर); सवें (स्वयं); सभावी (स्वभाव-); सर (स्वर); गोसाविणी (गोस्वामिनी); सूपवती (स्वप्)

(५) व्य-र्व : 'य' आणि 'र' हे 'व' मध्यें सामावले जातात. मागें पहा क्रमांक ६५–६६

(६) ह + व > भ्भ : जीभ (जिव्हा–प्रा० जिब्भा); आभावणें (आव्हा)

§ ६९ ऊष्मे-युक्त जोडाक्षरें

(१) ऊष्मे आणि स्पर्श हीं एकत्र आल्यास प्राकृतांत त्यांचा द्वित्त महाप्राण स्पर्श होतो. यादव-मराठींत हा स्पर्श एकेरी होऊन त्यांतील महाप्राणत्व कधीं कायम राहतें तर कधीं लोपतें. उदा०

श्च : विंचू (वृश्चिक); निचेष्ट (निश्चेष्ट); निचिंत (निश्चिंत)

ष्क : विखुरणें (विष्किरति); सुकें (शुष्क); पोखरिणी (पुष्करिणी); खीखींद (किष्किंध); दुकळु (दुष्काळ)
ष्प : निफन्नले (निष्पन्न)
ष्ट : आठै (अष्ट); मूठ (मुष्टि); पीठी (पिष्ट); उवेढा (उत्+वेष्ट); मांजिठी (मंजिष्ठ); वाजौठी (वाद्ययष्टि); आतुटी (आतुष्ट)
ष्ट्र : उंट (उष्ट्र)
ष्ठ : होट–ओठ (ओष्ठ); कोड (कुष्ठ); जगजेठी (जगज्जेष्ठ); पैठण (प्रतिष्ठान); पीढें (पृष्ठ); सेठी (श्रेष्ठिन्)
स्क : खांबु (स्कंभ); खांदु (स्कंध)
स्त : आंथुर (आस्तृ); पाथर (प्रस्तर); तोकडें (स्तोक); थोंबडें (स्तोभ); थोंवेकारी (स्तबक); माथा (मस्तक); हातु (हस्त); पालटु (पर्यस्त); चोरथरा (–स्तरः); वोथर (उपस्तृ); विसीर्ण (विस्तीर्ण); हाती (हस्तिन्)
स्थ : थोरु (स्थविर); ठी (स्थिति); थाउ (स्थः); थीर (स्थिर)
स्प : फांसणें (स्पृश् –?)
स्फ : फुटणें (स्फुट्); फुडें (स्फुट); फुजिती (स्फूर्ज्)

तात्पर्य, यादव-मराठीचा कल प्राकृतांतील महाप्राण कायम ठेवण्याकडे आहे. 'हातु, तोकडें, पालटु, ऊंट, सुकें' अशीं महाप्राण लोपल्याचीं उदाहरणें क्वचित् आढळतात. कोंकणींत मात्र नियमानें महाप्राणाचा लोप होतो[१].

यादव-मराठींत क्वचित् कांहीं ठिकाणीं स्पर्श वर्ण ऊष्म्यांत सामावला जातो. म्हणजे वरीलच्या उलट प्रक्रिया होते. वर्तमान-मराठींत ती नाहीं. यादव-मराठींत याचीं उदाहरणें अति विरल आहेत व तीं अपवादात्मक मानावींत. जसें—

पसीम (पश्चिम)

---

१ Formation Of Konkani S. M. Katre (B. O. R. I, Vol. 19, p p. 3)

(२) स्पर्श + ऊष्मे : याच्या विविध प्रक्रिया होतात. त्या अशा:—

क्ष > ख : आखर (अक्षर); सीखवी (शिक्षापयति); उपखा (उपेक्षा); पांखिरू (पक्ष); खर (क्षर); उखारला (उत्क्षारित्); खणौखणीं (क्षण–); खेंव (क्षेम) ; रुखराय (वृक्षराज) ; खेवण (क्षिप्); खीर (क्षीर); आख्यवानी (आक्षवाण); खांदवखाल (–प्रक्षल्)

क्ष > च्छ > श : माशी (मक्षिका–प्रा० मच्छिआ); लस्मि (लक्ष्मी); कुसि (कुक्षि); सूत्र (क्षेत्र); रीस (ऋक्ष); सुरी (क्षुरिका)

त्स > च्छ – श–स : मदमछर (मत्सर); वच्छहरण (वत्स); उछावो (उत्सव); वछलु (वत्सल); वांसरू (वत्स–); मासा (मत्स्य); उसंग (उत्संग)

क्ष > झ : झरणें (क्षर्) ; विझणें (वि + क्षि ...?)

प्स > छ-स : आसरे (अप्सरस्)

क्ष > ह : सिहाणा (शिक्षमाणः –?)

यादव-मराठींत 'सं० क्ष' च्या 'ख, स, झ' अशा तीन प्रक्रिया आढळतात. पैकीं झ–प्रक्रिया विरल आहे. ख, स–प्रक्रिया मात्र पाली प्राकृतापासून थेट वर्तमान आर्य भाषांपर्यंत विकल्पानें व जोडीनें रूढ दिसतात. छ–प्रक्रिया अथर्ववेदांत सांपडते इतकी जुनी आहे, 'क्ष–ख' हा विकार महाभारतांत दिसतो. (उदा० क्षेटका–'खेट'). प्राचीनकाळीं सं० क्ष–च्या 'छ' आणि 'ख' अशा दोन प्रक्रिया कांहीं प्रमाणांत स्थानभिन्न होत्या. म्हणजे प्राच्य शिलालेखांत 'ख' आणि पश्चिम शिलालेखांत 'छ' होई, असें मत सर्वमान्य आहे. यादव-मराठींत 'क्ष' च्या पुढील भिन्न प्रक्रिया आढळतात:—

सं० क्ष > ख : वर पहा.

सं० क्ष > स–श :

सं० क्ष > ख किंवा स : कांख–कांस (कक्ष); आंख–आंस (अक्ष)

सं० क्ष > छ–स : ऊस (इक्षु–प्रा० इच्छु); शेत (क्षेत्र–प्रा० छेत्त) वरीलपैकीं सं० क्ष > प्रा० छ > म० स हीच प्रक्रिया सर्वांत अधिक होत असल्यानें व त्याबाबत मराठीचें सिंहली आणि गुजराती या दोन भाषांशीं साम्य असल्यानें, प्रो० ब्लोक यांनीं मराठीला पाश्चात्य भाषाविभागांत घातली आहे.

(३) ऊष्मे + अनुनासिक : मागें पहा. (क्र० ६४)

(४) ऊष्मे + य – र – व : यांत 'र, य, व' हे ऊष्म्यांत सामावले जाऊन ऊष्मे कायम राहतात. मागें पहा क्र० ६६

(५) र + ऊष्मे : र ऊष्म्यांत सामावला जातो. पहा – क्र० ६६
श्य, ष्य, स्य : पहा क्रमांक ६५
श्र, ष्र, : पहा क्रमांक ६६
श्व, ष्व, स्व : पहा क्रमांक ६८

(६) ह्क, ह्ख, ह्प >अनुक्रमें क्क, ख्ख, प्प.

(७) म + ह >भ : भानवस (महानस – प्रा० म्हाणस)

§ ७० वर्णव्यत्यास (Metathesis)

वर्णव्यत्यासाचीं यादव-मराठींतील उदाहरणें—

उरफाटें (विपरीत); हळू (लघु–प्रा० हळुअ); सांतवराओ (सामंतराज); कुऱ्हाड (कुठार); तळपदी (दलपति); उरुक (उत्कर्ष); चाहा (इच्छा); ल्हाइजे (लभ्यते); भुजंकु (भुंजक); अचवटें (अवचट);

---

१ La langue Marathe : 101

२ प्रो० कृ० पां० कुळकर्णी यांनीं " मराठी शब्दोच्चारांतील एक चमत्कार, अर्थात्–वर्णविपर्यय " या लेखांत प्रस्तुत वर्णप्रक्रियेचा ऐतिहासिक व औपपत्तिक दृष्ट्या विचार केला आहे. हेमचंद्रानें दिलेलीं उदाहरणें (प्राकृत व्याकरण ८–२–११६ ते १२४) व मराठींतील उदाहरणें तपासून प्रो० कुळकर्णी यांनीं वर्णविपर्ययाची प्रक्रिया ही निरपेक्ष नसून सापेक्ष असल्याचें व 'र, ण, ल, न, च, ह, य' या वर्णांचा विशेषानें व्यत्यास होत असल्याचें दाखविलें आहे. वर्णव्यत्यासाचीं यादव–मराठींतील वरील स्थळें या विधानास पोषकच आहेत... ... (पहा : महाराष्ट्र-साहित्यपत्रिका, वर्ष १२, अंक ७ वा)

वाहाना (उपानह्); प्रजन्य (पर्जन्य); निभर्षिले (निर् + भाष्); गुजरध्वनि (गर्ज्); राण (नगर–रअण); अलंग (अग्र + ल); लुहडी (लगुड); रावणें (वर्ण – वरण); तवंक (तक्रन्); आरऊ (अंकुर)

§ ७१ समवर्णलोप (Haplolcgy)

मळयपांचोर (-पंचचौर); वादुकें (वावदूक); भवनीं (भवनवनीं); रिकामा (रिक्तकर्म); वाद्यंत्र (वाद्ययंत्र); गुप्तावेओ (गुप्तावयव)

§ ७२ वर्णागम (Prothesis)

'ए' आणि 'ओ' यांच्या पूर्वी अनुक्रमें 'य' आणि 'व' आल्याचीं उदाहरणें यादव-मराठींत विपुल आहेत. त्यांवरून यादवकालीन बोली-मराठीचें स्वरूप कळूं शकेल. वर्तमान-मराठींत 'य' आणि 'व' केवळ अशिक्षितांच्या बोलण्यांत येतात. यादव-मराठींत, विशेषतः नागर ग्रंथांत, 'ए–ओ' च्या मागें 'य-व' घालण्याचा स्वभावच दिसतो. तत्कालीन ग्रांथिक भाषेंत जर इतके वर्णागम होत, तर बोली-भाषेंत किती तरी अधिक होत असतील त्याची कल्पना येते.

अ : अस्त्रीया (स्त्री); अस्तवन (स्तवन); अस्तीति (स्थिति); अवोझें (वह्य)

य : येकु (एक); येर (इतर>एर); यकांत (एकांत); यकवंकी (एकवंकी); येतुल (इयत्–); त्येज (तेजस्)

व : वोखटें (ओखट); वोखद (औषध); वो (अहो); वोपणें (अर्प्); वोरकल (का॰ ओरेकल्लु); वोल (आर्द्र–ओल); वोस (उदास); वोगर (का॰ ओग्गर); वोतवरु (ओतवर); वोंवर (आवार); वोंकार (ओंकार); वीगुळी (अंगार–इंगळ)

अशा तऱ्हेचा वर्णागम प्राकृतांत फारच थोडा होता. वर्तमान भारतीय भाषांतहि तो विशेष नाहीं. बंगालींत तो अति क्वचित् दिसतो. परंतु

---

१ Origin and development of Bengali, S. K. Chatterji, pp, 377—

प्राकृतांत नसलेला हा वर्णागम यादव-मराठींत विपुल आहे. द्राविडी-सारख्या परभाषेचा संपर्क अधिक लागल्यानें, यादव-मराठींत वर्णागम विशेष आहे असें वाटतें.

§ ७३ स्वरभक्ति (Anaptyxis)

संस्कृतांतील संयुक्त व्यंजनांत प्राकृत भाषा एक स्वर घालून तें जोडाक्षर फोडीत. प्राकृताचा हा स्वभाव यादव-मराठींत विशेषत्वानें दिसतो. वर्तमान-मराठीपेक्षां स्वरभक्ति यादवकालीं निःसंशय अधिक प्रमाणांत होती. आज जीं स्वरभक्तीचीं रूपें अशिक्षितांच्या बोलींतच मात्र दिसतात, तीं यादवकालीं ग्रांथिक मराठींत होतीं. उदा०

आरिसा (आदर्श); वरिस (वर्ष); हाथिएर (हत्यार); सुनियें (शून्य); पुरता (पूर्त); दुरंधर (दुर्धर); परिवस (स्पर्श); असकतां (आसक्त); बहिरव (भैरव); लबधु (लुब्ध); सोआंग (स्वांग); निगुती (नियुक्ति); परमुख्य (प्रमुख); सदगदा (सद्‌गद); अहलाद (आल्हाद); भानवस (महानस); सौरियें (शौर्याणि); मुगुते (मुक्त); दरुसन (दर्शन); जतन (यत्न); आरत (आर्त); वरीसावो (वर्षाव); सवादु (स्वाद); सीरीगीरी (श्रीगिरि) नाहाण (स्नान); परावर्ण (प्रावर्ण); आंथरुतें (आस्तृत); समसान (श्मशान); कुजांतर (कुयंत्र)

§ ७४ स्पर्शागम (Insertion of Plosives)

संस्कृतांतील अनुनासिक+ल–र या जोडाक्षरांतील दोन घटकांमध्यें प्राकृतांत कधीं त्या अनुनासिकाच्या वर्गांतील घोष स्पर्श घातला जाई. पुढें यादव-मराठींत ल–रचा त्या घोष स्पर्शाशीं संयोग होई. अशा तीन भिन्न प्रक्रिया संभवतात—

सं० म्र > ं ब्र > ं ब : आंबा (आम्र); तांबें (ताम्र); आंबुट (अमृत)
सं० न्र > ं द्र > ं द : पंधरा (पंचदश–प्रा० पण्णरह)
सं० म्ल > ं ब्ल > ं ब : आंब (आम्ल)

§ ७५ आद्यव्यंजनलोप (Aphoeresis)

आद्याक्षरांतील य, व, यांचा क्वचित् लोप होऊन त्यांच्या जागीं स्वर मात्र राहातो. उदा०

व : ओलांतरणें (वेलांतर–); ओतपली (वोतपली); इसाल (विषयाल–)
य : ए (येई); एंति (येताति); एस्वदा (यशोदा); सएमु (संयम); जएजए (जयजय); रसाएन (रसायन)

§ ७६ स्वरलोप (Syncope)

स्तवे (अस्तवे); वरील (उर्वरित); शेखीं (अशेष); पैठिया (उपविष्ट); वाहाना (उपानह्); वाए (अर्पयति–अव्व); ढवसाओ (अध्यवसाय:)

§ ७७ व्यंजनसंधि

यादव-मराठींत क्वचित् कोठें–विशेषत: महदंबेच्या धवळ्यांत–एका शब्दांतील दोन व्यंजनांचा संधि झालेला दिसतो. वास्तविक व्यंजनसंधि हा संस्कृत भाषेचा विशेष आहे; प्राकृत, अपभ्रंश व मराठीचा नव्हे. परंतु मराठींत, ग्रांथिक भाषेंत नसले, तरी बोलींत व्यंजनसंधि होतात हें खरें. उदा० "तो पड्ला", "तो बोल्ला"–(पडला, बोलला). यादव-मराठींतहि बोलतांना असे संधि नि:संशय होत. ते ग्रंथनिविष्ट नसले तरी मुखनिविष्ट खचित होते. महादंबेचे धवळे हे तोंडानें गावयाचे असल्यामुळें त्यांत व्यंजनसंधि अनेक आढळतात. इतर ग्रंथ वाचले जात, तर ढवळे गायिले जात हा भेद नीट पाहिला पाहिजे. पुढें कांहीं व्यंजनसंधींचीं उदाहरणें धवळ्यांतून देतों.

श्री (शिरीं); श्रणागत (शरणागत); नग्रीं (नगरीं); तृग (तुरग); सैंवर (स्वयंवर); वेव्हारा (व्यवहारक:); केशवद्या (–देव > देय); संग्रो (संग्रह); वऱ्हाडीक (वरहाट—?); नृत्यकोणीं (नैऋत्य—); मनोर्थु (मनोरथ); व्रीदु (विरुद); अन्मोदित (अनुमोदित)

§ ७८ यादव-मराठींतील व्यंजनप्रक्रियेची रूपरेषा

येथवर भाषाशास्त्राच्या नियमांप्रमाणें होणाऱ्या सर्वसामान्य व वैयक्तिक स्वभावाप्रमाणें होणाऱ्या विशेष अशा दोन प्रकारच्या व्यंजनप्रक्रिया यादव-मराठीसंबंधीं पाहिल्या. त्यांवरून एकंदर व्यंजनप्रक्रियेची रूपरेषा

मांडितां येईल. मागें स्वरप्रक्रियेची रूपरेषा ज्या पद्धतीनें दिली आहे त्याच पद्धतीनें हीहि पुढें देतों. आंकडे याच भागांतील त्या त्या परिच्छेदांचे आहेत. ही रूपरेषा आद्य, मध्य व अंत्य अक्षरांतील व्यंजनांची पहाणें आहे. परंतु अंत्य व्यंजन प्राकृतकाळींच लोपलें. अर्थात् तें यादव-मराठींत नसल्यानें त्याची चर्चाच उद्भवत नाहीं. पुढें प्राकृत हा शब्द प्राकृत-अपभ्रंश अशा दोहींकरितां योजिला आहे.

§ ७९ क

(१) आद्यः—

मराठी क < प्रा० क < सं० क क्रमांक ४२
< प्रा० क < सं० क्र क्रमांक ६६, कोसु (क्रोश); केणें (क्रयण)
< प्रा० क < सं० क्ल, किलेस (क्लेश)
< प्रा० क < सं० क्व कढणें (क्वथ्)

(२) मध्यः--

मराठी क < प्रा० क्क < सं० क्न – क्र० ५९
< सं० त्क – क्र० ५९
< सं० क्म– क्र० ६०
< सं० क्य – क्र० ६५
< सं० क्र – क्र० ६६
< सं० र्क – क्र० ६६
< सं० ल्क – क्र० ६७
< सं० ष्क – क्र० ६९
< सं० क्व – क्र० ६८
< सं० ट्क – क्र० ५९
< सं० कः मुकें (मूक-प्रा० मुंक्क), एक (प्रा० एंक्क)

§ ८०. ख

(१) आद्यः—

मराठी ख < प्रा० ख < सं० ख – क्र० ४२
< सं० क्ष – क्र० ६९
< सं० क – कोळि (क्रीड्)
< सं० ख्य – क्र० ६५
< सं० स्क : खांदा (स्कंध); खांब (स्कंभ)

(२) मध्यः—

मराठी ख < प्रा० क्ख < सं० क्ष – क्र० ६९
< सं० श्क – क्र०
< सं० ष्क – क्र० ६९
< सं० स्क – क्र० ६९
< सं० ख्य – क्र० ६५
< सं० थ – क्र० ५६
< सं० क्त : तीखट (तिक्त)

§ ८१ ग

(१) आद्यः-

मराठी ग < प्रा० ग < सं० ग क्र० ४२
< सं० ग्र क्र० ६६
< प्रा० घ < सं० गृ : घर (गृह); घेपे (गृण्ही)

(२) मध्यः—

मराठी ग < प्रा० ग < सं० क क्र० ४७
< प्रा० ग्ग < सं० द्ग क्र० ५९
< सं० ग्न क्र० ६०
< सं० ग्य क्र० ६५
< सं० ग्र क्र० ६६
< सं० र्ग क्र० ६६
< सं० ड्ग क्र० ५९

< सं० ल्ग क्र० ६७

§ ८२ घ

(१) आद्यः—

मराठी घ < प्रा० घ < सं० घ – क्र० ४२
< प्रा० ग्घ < सं० घ्र – क्र० ६६

(२) मध्यः—

मराठी घ < प्रा० ग्घ < सं० द्घ – क्र० ५९
< सं० घ्न –
< सं० घ्र – क्र० ६६
< सं० र्घ – क्र० ६६

§ ८३ च

(१) आद्यः—

मराठी च < प्रा० च < सं० च – क्र० ४२
< सं० त्य : चा-ची-चें (त्यत्)
< सं० च्च – क्र० ५९

(२) मध्यः—

मराठी च < प्रा० च्च < सं० त्य – क० ६५
< सं० श्च – क्र० ६९
< सं० च्य – क्र० ६५
< सं० र्च – क्र० ६६

§ ८४ छ

(१) आद्य मराठी छ < प्रा० छ < सं० छ – क्र० ४२

(२) मध्य मराठी छ < प्रा० छ < सं० त्स्य : मदमछ्लु (–मत्स्य:)

यादव-मराठींत तद्भव शब्दांत मध्य छ क्वचित् येतो. बहुतेक ठिकाणीं त्याचा स होतो.

त्स–छ ही प्रक्रिया अति प्राचीन आहे. संस्कृत " चिकित्सा " याचें अशोकाच्या शिलालेखांत " चिकिच्छा " असें एक रूप होतें.

§ ८५ ज

(१) आद्य मराठी ज < प्रा० ज < सं० ज – क्र० ४२
< प्रा० ज्ज < सं० ज्य – क्र० ६५
< प्रा० ज्ज < सं० ज्व – क्र० ६८
< प्रा० ज्ज < सं० द्य – क्र० ६५
< प्रा० ज < सं० य – क्र० ४४

(२) मध्य मराठी ज < प्रा० अ < सं० ज : पांजिर (पंजर)
प्रा० ज्ज < सं० ज- ज्ञ : क्र० ५९
< सं० ब्ज – क्र० ५९
< सं० द्य – क्र० ६५
< सं० ज्व – क्र० ६८
< सं० र्ज – क्र० ६६
< सं० र्य – क्र० ६५
< सं० य्य – सेज (शय्या)
< सं० र्य : पेज (पेय);
दुजें (द्वितीय); क्र० ५१

§ ८६ झ

(१) आद्य मराठी झ < प्रा० झ < सं० झ – क्र० ४२
< सं० ध्य – क्र० ६५
< सं० ध्व

---

१ द्वितीय–तृतीय येथें 'य' ऐवजीं 'य्य' हा आदेश प्रो० ब्लोक मानतात. त्यांच्या मतें हा " य्य " वैदिक भाषेंतील होय. पहा—

La langue Marathe, 106

< सं० क्ष – क्र० ६९
< सं० ज

(२) मध्य मराठी झ < प्रा० ज्झ < सं० झ – क्र० ६५
< सं० ध्य – क्र० ६५
< सं० क्ष – क्र० ६९

§ ८७ ट

(१) आद्य मराठी ट < प्रा० ट < सं० ट क्र० ४२
< प्रा० त < सं० ट (क्वचित्) – क्र० ३४

(२) मध्य मराठी ट < प्रा० ट्ट < सं० अनुनासिक + ट : कांटी (कंटक)
< सं० ट्व – क्र० ६८
< सं० र्त : क्र० ३४
< सं० ट्य : क्र० ६५

§ ८८ ठ

(१) आद्य मराठी ठ < प्रा० ठ < सं० स्थ : क्र० ६९

(२) मध्य मराठी ठ < प्रा० ट्ठ < सं० अनुनासिक + ठ : कांठ (कंठ)
< सं० ष्ठ : क्र० ६९
< सं० ठ : मठ (मठ)
< सं० र्थ : क्र० ३४
< सं० स्थ : क्र० ६९

§ ८९ ड

(१) आद्य मराठी ड < प्रा० द < सं० द (क्वचित्) : डंक (दंश), क्र० ३४

(२) मध्य मराठी ड < प्रा० ड < सं० ड : सोंड (शुंडा), मांडव (मंडप)

< सं० ट : क्र० ४९
< सं० ऋ + त : क्र ३४
< प्रा० ड्ड < सं० र्द क्र० ३४
< सं० ड्ड : उडणें (उड्डी),
क्र० ५९
< प्रा० ड्ढ < सं० र्ध : क्र० ३४
< प्रा० ड < सं० र : क्र० ५६

§ ९० ढ

(१) आद्य मराठी ढ प्रा० ढ < मूळ संस्कृत अनिश्चित

(२) मध्य मराठी ढ प्रा० ड्ढ < सं० र्ध – क्र० ३४
< सं० ऋ + ध : वाढ (वृद्ध), क्र० ३४
< सं० ठ : मढ (मठ); पढ (पठ्)
< सं० ढ : दाढ (दृढ)
< सं० थ : सढळ (शिथिल)
< सं० ष्ट, ष्ठ : क्र० ६९

§ ९१ ण

(१) आद्य मराठी ण नाहीं

(२) मध्य मराठी ण < प्रा० ण < सं० न : क्र० ५०
< सं० ण : क्र० ५०
< प्रा० ण्ण < सं० र्ण : (क्वचित्) : क्र० ६३
< प्रा० ण्ण < सं० ज्ञ : क्र० ६०

§ ९२ त

(१) आद्य मराठी त < प्रा० त < सं० त : क्र० ४२
< सं० त्र : तीन (त्रीणि)
< सं० त्य :

(२) मध्यमराठी त < प्रा० त्त < सं० न्त : क्र० ६१
< सं० त्त : क्र० ५९
< सं० क्त : क्र० ५९
< सं० प्त : क्र० ५९
< सं० त्न : क्र० ६०
< सं० त्र : क्र० ६६
< सं० त्व :
< प्रा० त्थ < सं० स्त, स्थ : क्र० २९
< प्रा० त्थ < सं० क्थ : क्र० ५९
(क्वचित्)

§ ९३ थ

(१) आद्य मराठी थ < प्रा० थ < सं० स्त : क्र० ६९
< सं० स्थ : क्र० ६९
(२) मध्य मराठी थ < प्रा० त्थ < सं० त्र : क्र० ६६
< सं० र्थ : क्र० ३४
< सं० स्त : क्र० ६९
< सं० स्थ : क्र० ६९
< सं० न्थ : क्र० ६१
< सं० च्छ : (क्वचित्) क्र० ५६

§ ९४ द

(१) आद्य मराठी द < प्रा० द < सं० द : क्र० ४२
< सं० द्र : क्र० ६६
< सं० द्व : क्र० ६८
(२) मध्य मराठी द < प्रा० द्द < सं० द्द : क्र० ५९
< सं० द्ब : क्र० ५९
< सं० द्र : क्र० ६६
< सं० र्द : क्र० ६६

---

१ ही प्रक्रिया (थ < च) यादव-मराठींतच काय ती दिसते. हिचा उल्लेख कोणी करीत नाहीं. पहा— "सिंथितु" (सिंचू)

< सं० द्व : क्र० ६८
< प्रा० ध < सं० ध : क्र० २९
(महाप्राणत्वलोप)

§ ९५ ध

(१) आद्य मराठी ध < प्रा० ध < सं० ध : क्र० ४२
(२) मध्य मराठी ध < प्रा० द्ध < सं० न्ध : क्र० ६१
< सं० ग्ध : क्र० ५९
< सं० ब्ध : क्र० ५९
< सं० र्ध : क्र० ६६
< सं० ध्र : क्र० ६६
< सं० द्ध : क्र० ५९

§ ९६ न

(१) आद्य मराठी न < प्रा० न–ण < सं० न : क्र० ४२
< सं० न्य : नेसणें (न्यस्)
(२) मध्य मराठी न < प्रा० ण्ण < सं० ण्य : क्र० ६३
< सं० र्ण : क्र० ६३
< सं० ण्व : क्र० ६३
< प्रा० ण्ह < सं० क्ष्ण : सानें (श्लक्ष्ण)
< सं० ष्ण : कानवाथरु (कृष्णप्रस्तर)
< सं० श्न :
< सं० स्न :
< प्रा० न्न–ण < सं० न्न : क्र० ६२
< सं० न्य : क्र० ६३
< सं० ज्ञ : क्र० ६०
< सं० म्न : क्र० ६२

§ ९७ न्ह

(१) आद्य मराठी न्ह < प्रा० न्ह < सं० स्न : क्र० ६४

(२) मध्य मराठी न्ह < प्रा० ण्ह < सं० स्न : क्र० ६४ पान्हा (प्रस्नु)
< सं० ष्ण : क्र० ६४ ऊन्ह (उष्ण)
< प्रा० ण्णर < सं० चद : साडेपन्हरें (पंचदश)

§ ९८ प

(१) आद्य मराठी प < प्रा० प < सं० प : क्र० ४२
< सं० प्र : क्र० ६६
< सं० प्ल : क्र० ६७

(२) मध्य मराठी प < प्रा० प्प < सं० त्प : क्र० ५९
< सं० त्म : क्र० ६०
< सं० प्र : क्र० ६६
< सं० र्प : क्र० ६६
< सं० ल्प : क्र० ६७
< सं० त्व : क्र० ६८
< सं० प्य : क्र० ६५
< सं० च : क्र० ५६
(क्वचित्)
< प्रा० प्फ < सं० फ : क्र० २९

§ ९९ फ

(१) आद्य मराठी फ < प्रा० फ < सं० फ : क्र० ४२
< सं० स्फ : क्र० ६९
< सं० स्प : क्र० ६९
< सं० प : (क्वचित्)
क्र० २७

(२) मध्य मराठी फ < प्रा० प्फ < सं० स्फ : क्र० ६९
< सं० ष्फ : क्र० ६९
< सं० ष्प : क्र० ६९

§ १०० ब

(१) आद्य मराठी ब < प्रा० ब < सं० ब : क्र० ४२

< सं० द्व : क्र० ६८
< सं० व्र : क्र० ६६
< सं० व : क्र० ४४
(२) मध्य मराठी व < प्रा० व्व < सं० र्व : क्र० ६६
< सं० व्र : क्र० ६६
< सं० र्व : क्र० ६६
< प्रा० ब्भ < सं० भ : क्र० २९
< प्रा० म्म < सं० म्र-म्ल : क्र० ६३

§ १०१ भ

(१) आद्य मराठी भ < प्रा० भ < सं० भ : क्र० ४२
< सं० भ्र : क्र० ६६
< प्रा० म्ह < सं० मह : भानवस (महानस) क्र० ६९-७
(२) मध्य मराठी भ < प्रा० ब्भ < सं० द्भ : क्र० ५९
< सं० भ्य : क्र० ६५
< सं० र्भ : क्र० ६६
< सं० भ्र : क्र० ६६
< सं० व्ह : क्र० ६८

§ १०२ म

(१) आद्य मराठी म < प्रा० म < सं० म : क्र० ४२
< सं० म्र :
< सं० म्ल :
< सं० स्म : क्र० ६४
(२) मध्य मराठी म < प्रा० म्म < सं० न्म : क्र० ६२
< सं० म्य : क्र० ६३
< सं० र्म : क्र० ६३
< सं० ल्म : क्र० ६३
< प्रा० म्ह < सं० ष्म : क्र० ६४
< सं० श्म : क्र० ६४

< सं० स्म : क्र० ६४

< सं० क्ष्म : पाकळी (पक्ष्मन् ?)

§ १०३ म्ह

(१) आद्य मराठी म्ह < प्रा० म्ह < सं० म : क्र० २६ (महाप्राणत्व येऊन)

< सं० भ : म्हणौनि (भण्)

(२) मध्य मराठी म्ह < प्रा० म्म < सं० र्म : चाम्हारु (चर्मकार)

< सं० म्न : निम्होळ (निम्न) क्र० ६२

§ १०४ य

(१) आद्य मराठी य < प्रा० ए < सं० ए :

< सं० अइ :

< सं० य : (तत्सम शब्दांत)

(२) मध्य मराठी य < प्रा० य < सं० स्पर्श : क्र० ५१...

संस्कृतांतील क, ग, च, ज, त, द, प यांचा प्राकृतांत लोप झाल्यानें जें "प्रगृह्य" निर्माण होतें तें टाळण्यासाठीं मराठींत मध्यभागीं हा य येतो.

§ १०५ र

(१) आद्य मराठी र < प्रा० र < सं० र : क्र० ४४

< सं० वृ : क्र० २ रुख (वृक्ष)

(२) मध्य मराठी र < प्रा० र < सं० र : क्र० ५२

< सं० ल : क्र० ५६

§ १०६ ल

(१) आद्य मराठी ल < प्रा० ल < सं० ल : क्र० ५५

< सं० र : (क्वचित्) लेणें (रत्नं...?)

(२) मध्य मराठी ल < प्रा० ल्ल < सं० ल : क्र० ६६
< सं० ल्य : क्र० ६५
< सं० ल्व : क्र० ६७
< सं० ल्ल : क० ६७
< सं० द्र : वोल (आर्द्र), भला (भद्र)
< सं० ल्प : क्र० ६७

§ १०७ ळ

(१) आद्य मराठी ळ नाहीं.

(२) मध्य मराठी ळ < प्रा० ल < सं० ल : क्र० ५३–५४
< प्रा० ल–ड < सं० ट–ड : क्र० ५६
< प्रा० ल्ल < सं० ल्य : क्र० ३४ सळ (शल्य)
< प्रा० र < सं० र : क्र० ५६ साळांक (शर-)

§ १०८ व

(१) आद्य मराठी व < प्रा० व < सं० व : क्र० ४४
< सं० व्य : क्र० ६५
< सं० व्र : क्र० ६६
< प्रा० उव < सं० उप : वाहाना (उपानह्)
< प्रा० ओ < सं० ओ–औ : क्र० ४४ वोखद (औषध)

(२) मध्य मराठी व < प्रा० व < सं० प : क्र ५१
< सं० स्पर्श : य–प्रमाणें क्र० ५१
(हा ‘व’ प्रगृह्यभेदक आहे. क्र० ८)
< प्रा० वं < सं० म : क्र० ५०

§ १०९ ष

यादव-मराठींत ष केवळ शुद्ध तत्सम शब्दांतच येतो.

§ ११० श

(१) आद्य मराठी श < प्रा० स < सं० श : क्र० ४५
(२) मध्य मराठी श < प्रा० स < सं० श : तत्समांत
< सं० स्य : क्र० ६५ (क्वचित्)
< सं० र्श : पाशीं (पार्श्वे)
< प्रा० च्छ < सं० क्ष : क्र० ६९-२
माशी (मक्षिका)
< प्रा० च्छ < सं० त्स :

§ १११ स

(१) आद्य मराठी स < प्रा० स < सं० श, ष, स : क्र० ४५
< सं० श्र : क्र० ६६
< सं० श्य : क्र० ६५
< सं० श्ल : क्र० ६७
< सं० श्व : क्र० ६८
< सं० स्य : क्र० ६५
< सं० स्र : क्र० ६६
< सं० स्व : क्र० ६८
< प्रा० छ < सं० क्ष : क्र० ६९
< सं० छ : क्र० ४२
< सं० त्स : क्र० ४२

(२) मध्य मराठी स < प्रा० स
< सं० श, ष, स : क्र० ५४
< प्रा० स्स < सं० र्श : क्र० ६६
< सं० श्र : क्र० ६६
< सं० श्य : क्र० ६५
< सं० ष्य : क्र० ६५

< सं० स्य : क्र० ६५
< सं० स्र : क्र० ६६
< सं० श्ल : क्र० ६७
< सं० श्व : क्र० ६८
< सं० ष्व : क्र० ६८
< सं० स्व : क्र० ६८
< सं० र्ष : क्र० ६६
< प्रा० च्छ < सं० क्ष : क्र० ६९
< सं० प्स : क्र० ६९
< सं० च्छ्व : क्र० ६८
< सं० त्स : क्र० ६८
< सं० च्छ : क्र० ५९
< सं० छ्र : क्र० ६६
< सं० त्स्य : क्र० ६५

§ ११२ ह

(१) आद्य मराठी ह < प्रा० ह < सं० ह : क्र० ४५
< सं० स : क्र० ४५
< सं० स्वर : क्र० २७
हान (अन्य) महाप्राणत्वानें

(२) मध्य मराठी ह < प्रा० ह < स० श, स क्र० ५४
< सं० ख, घ, थ, ध, फ, भ,
(स्पर्शत्वलोपानें); क्र० ४८
< सुलभोच्चाराकरितां : क्र० ५५

भाग दुसरा

प्रत्ययप्रक्रिया

नामविभक्ति

§ १ लिंग

यादव-मराठींत पुल्लिंग, स्त्रीलिंग व नपुंसकलिंग अशीं तीन लिंगें आहेत. ही परंपरा संस्कृत–प्राकृत–अपभ्रंश यांच्या द्वारा आलेली आहे. इंडो-युरोपीयन भाषांत लिंगाला गौणत्व असून नामाची जाति, म्हणजे सचेतनत्व वा अचेतनत्व, हेंच मुख्य होयें, व त्या दृष्टीनें इंडो-युरोपीयनमध्यें नपुंसकलिंगी नामांचा एक वेगळाच गट पडतो. परंतु इंडो-आर्यनमध्यें सजीवतेला महत्त्व नसून नैसर्गिक लिंगभेदाला आहे. आर्य भाषांतील लिंगविचार प्रो० ब्लोक[२] यांनीं विस्तारानें केला आहे. त्यावरून मराठीनें लिंगभेदांची जुनी परंपरा कायम ठेवलेली दिसेल. यादव-मराठींत त्या त्या लिंगाचे कांहीं विशिष्ट अंत्य स्वर दिसतात. उदा०

— अ : तिन्ही लिंगीं, पण विशेषतः पुल्लिंगीं व नपुसकलिंगीं.

— आ : पुल्लिंग व स्त्रीलिंग

— एं : नपुंसकलिंग (सोनें, बोणें)

— ऐ : पुल्लिंग व स्त्रीलिंग

—ओ, औ : फक्त पुल्लिंग (ब्रह्माओ, गोल्हो, मांडौ)

म्हणजे विशिष्टीकरणाला आरंभ होत होता. यादव-मराठींत लिंगबदल मात्र फार जोराचा दिसतो. प्राकृतांत, अपभ्रंशांत तो होताचें. "णायकुमारचरिउ"-मध्यें

परियणाइं (परिजनः), किंकराइं (किंकरः)

दीणइं (दिनः), कुंभइं (कुंभः)

१ J. Lohmann's ' Genus and Sexus '

२ J. Bloch : L'indo–aryen, pp. 150

३ Hemchandra I. 31–36; IV 445

अशीं पुल्लिंगाचें नपुंसकलिंग झाल्याचीं अनेक उदाहरणें आहेत. अपभ्रंशाचीच परंपरा मराठीनें चालू ठेविली. यादव-मराठींतील कांहीं लिंगबदल पहा.

स्नेहो (न०)	– शिशु०	१०१	सं०	स्नेहः
विवसी (स्त्री०)	– शिशु०	१३२	सं०	विवासः
अंतोर (न०)	– शिशु०	२४०	सं०	अंतःपुरिका
पोफळी (स्त्री०)	– शिशु०	२९८	सं०	पुष्पफलः
गांव (न०)	– स्मृ०	२१२	सं०	ग्रामः
भीतरु (पु०)	– उद्ध०	३९९	सं०	अभ्यंतरम्
झिंजि (स्त्री०)	– उद्ध०	४४९	सं०	युद्धम्
आंधारें (न०)	– उद्ध०	८१७	सं०	अंधकारः
वेलें (न०)	– उद्ध०	७३०	सं०	वेलः–ली
फुला (पु०)	– ऋ०	५११	सं०	पुष्पम्
कणव (न०)	– ऋ०	४८०	सं०	कृपा
मन (पु०)	– ऋ०	६२२	सं०	मनस्
प्रणये (न०)	– स्मृ०	११४	सं०	प्रणयः
गीतु (पु०)	– स्मृ०	९०	सं०	गीतम्
कळी (स्त्री०)	– लीला०	१-३६	सं०	कलिः
कटकै (स्त्री०)	– लीला०	१-५४	सं०	कटकः–कम्
सांखळे (न०)	– दृ०	८१	सं०	शृंखला
सुनें (न०)	– उद्ध०	३२८	सं०	श्वन् (पु०)

अशीं अनेक उदाहरणें आहेत. कांहीं ठिकाणीं मात्र लिंग साभिप्राय बदललेलें दिसतें. उदा०

" काळें भवंडिलीं बापुडीं : **जीवपशुवें** । " ऋ० १७७

येथें ' पशु ' हें बुद्धयाच हीनत्वदर्शनाकरितां नपुंसकलिंगी केलें आहे. तसेंच—

" **तें ब्राह्मण** एकसर साबडें । " —शि० २०४

कांहीं नामें संस्कृताप्रमाणें मूळ लिंगांतच ठेविलीं आहेत. वर्तमान मराठींत त्यांत लिंगबदल दिसेल. उदा०

जन्म (न०) – उद्ध० ३६७
काच (पु०) – उद्ध० ६२२
स्वप्न (पु०) – दृ० १०४

पुल्लिंगी नामांचें स्त्रीलिंग बनविण्याकरितां 'ई' व 'ईणि' हे प्रत्यय साधारणतः वापरले जातात. पहा—

देउळ—देउळी (लीला० १–५९)
कळदिवा—कळदिवी (लीला० १–३८)
महार—महारी (दृ० ४८)
मळ—मळी (दृ० ६७)
तेली—तेलिणी (लीला० १–११)
गोसावी—गोसावीणी (दृ० ६२)
मढ—मढी (स्मृ० ६५)
पाथर—पाथरी (स्मृ० १८)

वरील लिंगबदलाचीं उदाहरणें पाहिलीं म्हणजे नैसर्गिक लिंगभेदाचा व व्याकरणांतील लिंगभेदाचा कधींतरी एकभाव होता किंवा नाहीं हा प्रश्न पुढें येतो. यादव-मराठीसारखी प्रगल्भ भाषा पाहिली तरी ती निसर्गसिद्ध वा अर्थसिद्ध लिंगाला सोडून केवळ शब्दाच्या रूपावरून लिंगनिश्चिति करते. वरील यादींत "फला" (पु०), "कटकै" (स्त्री०), "सांखळें" (न०) हीं नामें अनुक्रमें आकारान्त, ऐकारान्त व एकारान्त आहेत म्हणूनच त्यांस तीं तीं लिंगें प्राप्त झालीं आहेत. शब्दरूपावरून लिंग ठरविण्याचा जो प्रकार यादव-मराठींत दिसतो, तोच हॉटेंटॉटसारख्या[१] रानटी भाषेंतहि आहे. पुरुषवाचक व स्त्रीवाचक शब्दांना नित्य लागणाऱ्या अंत्यप्रत्ययांवरून या रानटी भाषेनें इतर शब्दांची लिंगव्यवस्था करून टाकली आहे. तात्पर्य, भाषा सुसंस्कृत असो वा रानटी असो, अमक्या शब्दाचें अमुक लिंग कां,

---

१ "Sex-distinction arose from the possibly accidental circumstance that the nouns indicating man and woman were formed with different derivative suffixes, and these suffixes thus began to indicate the distinction of sex in nouns where it could be distinguished"—

—Comp. Grammar of S. African Langs. by Bleek, pp. 123

या प्रश्नाचें उत्तर मिळेलच असें नाहीं. येस्पर्सन[१] या भाषाशास्त्रज्ञाच्या मतें तर हें लिंगकोडें कधींच सुटणार नाहीं.

§ २ वचन

यादव-मराठींत एकवचन व अनेकवचन अशीं दोन वचनें आहेत. अनेकवचनांत अर्थात् द्विवचन आलेंच. स्वतंत्र द्विवचन महाराष्ट्रींत[२] नाहीं, अपभ्रंशांत नाहीं. अर्थात्, यादव-मराठींतहि तें नसावें. परंतु क्वचित् कोठें द्विवचनाचीं रूपें आढळतात. पैकीं राजवाड्यांनीं "शशि-सूर्यां" एवढें एकच सप्तमीच्या द्विवचनाचें रूप दिलें आहे. महानुभाव ग्रंथांत आणखी पांचसात तरी शुद्ध द्विवचनें सांपडतात. सर्वांची एकच याद पुढें देतों—

१ शशिसूर्यां (सं० शशिसूर्ययोः) – ज्ञा० ७–३२
२ उपानहौ ......ऋ० २०५; स्मृ० २१८, लीला० १-७३
३ उपानौह, उपानौं — स्मृ० १७९
४ उपाहानउ — लीला० १–७२
५ श्रीचरणां (सप्त० द्विव०) — लीला० १–५७
६ चक्रवाकें — शि० २९९
७ करौ -- वच्छ० १०६
८ मायबापां -- वच्छ० ४०७
९ करां जोडौनि (सं० कराभ्याम्) – वच्छ० ३८६
१० ग्रामौ, द्वौ, पाषाणौ (चिकुर्डे ताम्रपट—राजवाडे)

वरील रूपांत एक विशेष आहे. उपानह्, चरण, कर, चक्रवाक् या शब्दांच्या सदा जोड्याच असतात. म्हणजे द्वैताची कल्पना त्यांत स्वच्छ आहे. अशा नामांचीं द्विवचनी रूपें क्वचित् आढळतात. 'करौ' आणि 'उपानहौ' हीं रूपें तत्सम म्हणून सोडलीं तरी, इतर रूपांतील द्विवचन स्पष्ट मराठी आहे. किंवा, दुसरी एक उपपत्ति लावतां येईल. वरील द्विवचनांपैकीं कांहींचीं प्रातिपदिकेंच मूळांत संस्कृत द्विवचनावरून घेतलेलीं असावींत. सर्व

---

१ Jesperson: 'Language', pp. 393
२ हेमचंद्र. प्राकृत व्याकरण, ३–१३०

महानुभाव ग्रंथांतून 'उपानह्' या नामाचें एकवचन वा अनेकवचन न आढळतां सदा 'उपानहौ' किंवा 'उपानौ' असें द्विवचन आढळतें. हें या दृष्टीनें चिंत्य आहे. कसेंहि असलें तरी यादवकालीं द्विवचनाची, द्विभाव-दर्शक नामांपुरती कां होईना, परंतु अंधुक आठवण होती हें निश्चित. मात्र एवढ्यावरून महाराष्ट्री व अपभ्रंश भाषांच्या व्याकरणांत द्विवचनाचा उल्लेख न केल्याबद्दल वररुचि–हेमचंद्रांची दृष्टि "पाणिनीप्रमाणें सर्वंकष नव्हती व ते दडपेबाजीचे नियम देतात" ही राजवाड्यांची टीका अयोग्य होय.

§ ३ नामविभक्तिप्रत्यय

नामरूपांच्या प्रक्रियेचा विचार येथें तीन दृष्टींनीं करणें आहे.

१ प्रत्ययसाधित रूपें : Synthetical

२ अर्धप्रत्ययसाधित रूपें : Quasi Synthetical

३ शब्दसाधित रूपें : Analytical

प्रथम प्रत्ययविभक्तीचें विवेचन करतों. एतद्विषयीं सामान्य चर्चा प्रस्तावनेंत केली आहे. येथें प्रत्ययांची परंपरा देतों. उदाहरणें मुख्यतः ज्ञानेश्वरी व महानुभावी ग्रंथ यांतून घेतलीं आहेत. मात्र, जेथें विशेष कारण पडलें तेथें शिलालेख–ताम्रपटांतून रूपें देतों. तीं ससंदर्भ आहेत.

§ ४ पुल्लिंगी नामें

यादवकालीं पुल्लिंगी नामांच्या अंतीं पुढील स्वर आढळतात...

अ, आ, इ, ई, उ, ऊ, ऐ, ओ, औ.

---

१ पंडित भीष्माचार्य या महानुभावीय वैयाकरणानें द्विवचनाचा उल्लेख केला आहे. तो म्हणतोः–

"सलिंग पदांचिए तीनि वचनें असति : एकवचन : द्विवचन : बहुवचन : 'देव आले' येथ द्वित्व बहुत्व असें भणौनि द्विवचन बहुवचन : तेंचि द्वित्व बहुत्व प्रकरणवशें जानिजे"

—पंचवार्तिक (संपा० मोने)

वरील, एक तर परंपरागत रूढिदर्शक आहे, किंवा यादव-मराठींतील पुसट द्विवचनाचें द्योतक आहे.

२ ज्ञानेश्वरीचें व्याकरण, पान, २०

३ राजवाडे ओकारान्त पु० नामांचा उल्लेख करीत नाहींत. त्यांनीं ज्ञानेश्वरीपुरतेंच पाहिलें आहे. महानुभावी ग्रंथांत हीं रूपें आहेत.

पैकीं अकारान्त नामांचा विचार प्रथम विस्तारानें करतों, म्हणजे इतरांचा उलगडा सहज होईल.

§ ५ अकारान्त पुल्लिंगी

प्रथमा:—एकवचन—१ गणेशु, रसु, वैद्यु, सूर्यु, जीउ, उगऊ, प्रसऊ, संभहु, सींहु, दत्तु, गाउ, गांवु [तासगांव ताम्रपट]

२ आश्रो, विषो, उपाओ, अतिसो, राओ, भाओ, तांओ, आओ, प्रीयो, न्यावो, उपद्रो, सिहिप्रो [नागांव शिलालेख], माहो

अशीं ओकारान्त व उकारान्त रूपें आहेत. अर्थात् 'उ' व 'ओ' असे दोन भिन्न प्रत्यय होते. परंतु दोहींची व्युत्पत्ति व परंपरा एकच आहे. ती अशी—

म० ओ–उ < अपभ्रंश उ < प्रा० ओ < सं० स्

'उ' कारान्त रूपें मराठीनें अपभ्रंशापासून घेतलीं.

आश्रो [आश्रयः], विषो [विषयः], माहो [माघः], हीं रूपें ओकारान्त होतात. तेव्हां य्–व् हे ऊष्मे व ह् हा महाप्राण उपांत्य असतां ए० व० ओकारान्त होई. यांत उच्चारसौलभ्य आहे. परंतु यावरून राजवाडे[2] नियम बांधतात, कीं "यान्त्य, वान्त्य व हान्त्य शब्दांचीं ए० व० ओकारान्त होतात." हा नियम मात्र थोडा सैल करावासा वाटतो. प्राकृतांतील 'ओ' प्रत्ययच पुढें 'उ' झाला हें खरें. परंतु अपभ्रंशांतहि क्वचित् कोठें 'ओ' कारान्त प्रथमा दिसते. उदा०

"जलुल्लोलभंगा : सिरे णत्थि गंगा ।

गले णत्थि **सप्पो** : मणे णत्थि **दप्पो** ।" णायकुमार० २–३–१०,

येथें सप्पो, दप्पो (सर्पः, दर्पः) आणि 'भविसयत्तकहा' मधील 'घोसो'

---

१ हेमचंद्र : प्राकृत व्याकरणम्, ८–३–२

२ ज्ञानेश्वरींचें व्याकरण, पान, ८

'वणिंदो' हीं रूपें ए० व० चीं होत. म्हणजे बहुशः उ आणि क्वचित् ओ अपभ्रंशांत होता. एकाच प्रत्ययाचीं नवींजुनीं अशीं दोन रूपें अपभ्रंशाप्रमाणें यादव-मराठींतहि आहेत. विशेषतः, 'उगउ' (उगमः), 'जीउ' (जीवः), 'संभहु' (संभवः), 'गावुं' (ग्रामः) हीं यान्त्य, वान्त्य व हान्त्य यांचीं उकारान्त रूपें महानुभावांत नित्य आढळतात. मार्कंड-शिलालेखांत 'उपांगराउ' व इ० स० १३०० तील गोमांतकी ताम्रपटांत 'देऊ' (देवः) अशीं रूपें आहेत. नागांव-शिलालेखांतील 'सिहिप्रो' या रूपांत कोठें य्, व्, ह् नाहीं. तात्पर्य, राजवाडे-नियम किंचित् विकल्पानें मानावा. अपभ्रंशद्वारा आलेला 'उ' व मूळचा प्राकृत 'ओ' असे दोन प्रत्यय यादव-मराठी वापरी. पुढें यांतील 'उ' तेवढा राहिला, आणि शेवटीं तोहि गेला. प्रत्ययी विविधतेचा हा एक पुरावा आहे.

याशिवाय "आचार्यां (ऋ० ६६), स्पर्शें (ऋ० १४९)" अशीं अशुद्ध रूपें विरल आहेत. परंतु तीं उपेक्ष्य होत.

अनेकवचन—"जन, जीव, गांव, अभिप्राय-ये, ठाय-ये" यांतील 'ये'-कारान्त नामें वस्तुतः अकारान्तच आहेत. म्हणजे अकारान्त पुल्लिंगी नामाच्या अ० व० चा असा भिन्न प्रत्यय नव्हता. क्वचित् ए० व० चा 'उ' कार लागे, परंतु अविकृत रूपेंच अधिक. या प्रयत्यलोपाची परंपरा अशी—

सं० अस् > प्रा० आ > अपभ्रंश अ > म० प्रत्ययलोप

सं० पुत्राः > प्रा० पुत्ता > अप० पुत्त > म० पूत

'भविसयत्तकहा' या अपभ्रंशकाव्यांतील कलस, जणविंद, नरिंद, पहिय हीं रूपें अकारान्तच आहेत. भाषेचा एकविधतेकडील हा कल होय. तरीहि यादव-मराठींत क्वचित् कोठें विकृत रूपें आढळतात. हीं अर्थात् प्राकृतांतील रूपांचे शेष होत. यांतील कांहीं पुढें देतों—

गजराउं (उद्ध० ६०६), निःकलंका (ऋ० १५), अनाथे आम्ही (ऋ० १६४), ब्रह्मवीदां (ऋ० ५७८), 'एकि मूर्ति त्रय भागा' (स्मृ० २५३) हे सर्व प्राकृतांतील प्रत्ययाचे शेष होत. विशेषतः,

"वेलापूर तेथल ध (र्म) स्थल वाटेस्वराचे गुण **मठअ** केले" या वेळापूर-शिलालेखांतील 'मठअ' हें रूप पहा.

सं० मठा : > प्रा० मठा–मठह > मठअ > मठ

अशी 'मठअ' ही मधली पायरी दिसते. तात्पर्य अ० व० चें रूप पुल्लिंगी ए० व० प्रमाणें झालें होतें. तरी अधून-मधून जुने अवशेष आढळतात. मालवण येथील श० १५८५ च्या लेखांत 'बैसके, पुरुसे' अशीं एकारान्त अनेकवचनें आढळतात[1].

द्वितीया:—प्राकृतांत द्वितीयेचीं रूपें प्रथमेहून भिन्न होत. परंतु विकल्पानें[2] प्र० अ० व० रूप द्वि० अ० व० च्या ठायीं वापरलें जाई. म्हणजे एकविधतेला आरंभ झाल्याचें सूक्ष्म चिन्ह प्राकृतांत आहे. मराठीनें अर्थात् द्वितीया प्रथमेप्रमाणेंच बनविली व ही लकब अपभ्रंशद्वारा आली. ए० व० 'ठाओ, प्रभाओ, पाहोनरु' आणि अ० व० 'टाळु', 'कर्माभिमानु' अशीं रूपें आहेत. परंतु यादव-मराठींत कचित् प्रथमेपासून भिन्न अशी सप्रत्ययी द्वितीया आढळते. उदा०

"ना तरि राणीव सांडावी : कापडें भगवावीं ।
वारानशी सेवावी : **तापसां** होओनि "॥ शिशु० ४७५

याखेरीज 'श्रीकृष्णां' (वच्छ० ९८) सारखीं अनेक रूपें आहेत. याशिवाय श्री० नेने[3] अशा द्वितीयेचीं इतर उदाहरणें देतात. परंतु तीं चतुर्थीचीं होत. मात्र सप्रत्ययी द्वितीया मराठीनें प्राकृतापासून घेतली, अपभ्रंशापासून नव्हे.

तृतीया—एकवचन—

१ मेघें, ईश्वरें, नायकें (पंढरपूर शिला०), गाढवें (परळ शिला०), चाउंडरायें (श्रवणबेळगोळ), उच्छाएं
२ पढियंतेन, सेतुगुडेन (पंढरपूर शिला०), सुनेन, देवें पुरुषेण (नेवासें शिलालेख)
३ मोळिकारां, अंधकारां, रामदेवां, वातां

१ राजवाडे : ज्ञानेश्वरींचें व्याकरण, पान २९
२ हेमचंद्र : प्राकृत-व्याकरणम्, ८–३–४
३ ह० ना० नेने : ज्ञानेश्वरदर्शन (साहित्यखंड), पान ३७

पहिल्या दोन प्रकारांची व्युत्पत्ति स्पष्ट आहे.

सं० एन > प्रा० एण > अप० एण-एणं > म० एं–एन. अपभ्रंशांत नासिक्यवर्णयुक्त [एन] व सानुनासिक [एं] अशीं दोन्ही रूपें होत. उदा०

'जणेण' < सं० जनेन [णायकुमार०]

'सखेवें' < सं० संक्षेपेण [सावयधम्म० १]

म्हणजे सं० एनपासून एं व एन अशीं दोन रूपें अपभ्रंशाप्रमाणें यादव-मराठी वापरी. प्रो० ब्लोक, प्रो० टर्नर[1] आदि सर्वांचें हेंच मत आहे. डॉ० ग्रीयर्सन[2] मात्र हा प्रत्यय अपभ्रंशांतील 'अहि' या सप्तमीच्या ए० व० पासून व्युत्पादितात. परंतु त्यानें तृतीयेच्या अनुस्वाराची उपपत्ति लागत नाहीं. शिवाय निष्कारण दूरान्वय होतो तो वेगळाच.

२. तृतीयेच्या 'आ'कारान्त ए० व० चा उल्लेख राजवाडे करीत नाहींत. 'वेगां', 'कृतकार्या' इत्यादि तृतीयेच्या अ० व० पुरते मूळ शब्द त्यांच्या मतें आकारान्त होते[3]. परंतु राजवाड्यांचें हें विधान भ्रांत आहे. मूळ अकारान्त नामांचीं 'आ'कारान्त तृ० ए० व० पुढें देतों.

"**मोळिकारां** धांडोळितां रानें : जेवि मोळिए जोडलें बावनें।"–ऋ० ४५

"जेणें **कृतकार्यां** होइजे"–ज्ञा० १–२५ [सं० येन कृतकार्येण भूयेत]

"तिहीं **मनुष्यां** होइजे । मृत्युलोकीं"—ज्ञा० १४–२७०

"सर्व प्रकारीं धांवा । करी पां **वेगां**"—ज्ञा० १७–१७३८

"**रामदेवां** देहावसान मांडिलें"—स्मृ० ६१

"तो **वातां** कांबळा सीरकला"—लीला० ३, पान ४४

हींच 'आँ' कारान्त रूपें अनेकवचनांत आहेत. पहा—

"**नवरसां** भरवी सागर"—ज्ञा० १२।११

"जैसें स्वप्निचेनि अमृतें : **अमरां** न्हविजे ।"–ज्ञा० ९–१४३

"तूंते **बोलां** पाहे हृषीकेशी"—शि० ८६

---

१ R. L- Turner : Phonetic Weakness of Terminational Elements in I. A. (J. R. A. S, 1927, pp. 227–239)

२ Linguistic Survey of India, Vol. VII

३ राजवाडे–ज्ञानेश्वरीचें व्याकरण, पा० ३३.

" निवृतां सांघातें **प्रवृतां** जेउं नये "—स्मृ० ५८

" **सर्वज्ञां** करितां बीजें : तरि दीशाचि आनंदें फुंजे । "—ऋ० २०६

पीरवाडी ताम्रपट क्र० २ मध्यें '**जादवां**' असें तृ० अ० व० आहे. श्री० मोडकं यांच्या मतें हीं आकारान्त रूपें सामान्य विभक्त्यन्त नसून, केवळ क्रियाविशेषणें आहेत. हें मत चिंत्य आहे.

" स्वभावें वाटा येतां । जरि वरपडा जालां **अवचितां** । " –ज्ञा० ६।१६८ यांतील 'अवचितां' याशीं सामान्य दिसतें म्हणून वरील रूपें क्रियाविशेषणाचीं आहेत असें नव्हे. उलट, सं० एन > एं या प्रत्ययावरूनहि 'एँ > आँ' अशी प्रक्रिया संभाव्य नाहीं. अर्थात् 'आँ'कारान्त तृतीया परंपरागत नसून यादव-मराठीनें ती एकविधतेच्या नादानें बनविली. 'अ'कारान्त पुल्लिंगी नामाची चतुर्थी, पंचमी व षष्ठी या आकारान्त होतात. तसेंच 'आ'कारान्त पुल्लिंगी नामांची तृतीया, विकल्पानें 'आं'कारान्त होई. (जसें, श्रोतां, डोलां). तेव्हां, परंपरा सोडून, स्वतंत्र असें आकारान्त तृतीयेचें रूप यादव-मराठीनें साम्याभासानें बनविलें. याविषयीं अधिक चर्चा सामान्यरूप-प्रकरणांत पुढें आली आहे. [पहा क्र० २४]

अनेकवचन—

१ परिमळीं, वेदीं, गोपाळीं, पंडितीं
   प्रत्यय–सं० एभि : > प्रा० एँहिं > म० हिं–इं
   अपभ्रंशांत गुणिहिं, पुण्णहिं, वयणहिं (भविसत्तकहा) अशीं रूपें आहेत.

२ 'आं' कारान्त अनेकवचनें ए० व० सारखींच होतात व त्यांची चर्चा एकवचनाच्या शेवटीं केली आहेच.

चतुर्थी:—चतुर्थी विभक्ति प्राकृतांत लोपली. परंतु पिशेल 'पुत्ताअ', 'देवत्ताए' यांसारखीं कांहीं प्राकृतांतील चतुर्थींचीं रूपें देतो. अपभ्रंश-काव्यांतून चतुर्थी दिसते. उदा०

१ भा० इ० सं० मं० अहवाल, शके १८३६
२ 'राजवाडे–ज्ञानेश्वरीचें पुराणत्व'–भा० इ० सं० मं० त्रै०, व्हॉ० १५.१
३ हेमचंद्र ८–४–३३५ (मोडक-नेन वाद, व्हॉ० १५।१६)

"णविवि **णरिंदहो**" (णायकुमारचरिउ १-८-१२)

"**रायहो** दाविय" (णायकुमारचरिउ ३-८-१६)

"**मुत्तिए**" (मौक्तिकाय) — भावनासंधिप्रकरण

"**सायरगयहिं समिलहिं**"— सावयधम्म० २

अपभ्रंशांत ए० व० "हो, हु, आसु" आणि अ० व० 'हिं, हुं' असे चतुर्थीचे प्रत्यय दिसतात. मराठीनें चतुर्थीचें रूप अपभ्रंशांतूनच घेतलें.

एकवचन—ब्राह्मणा (धवळे-पू० १६), श्रीकृष्णराया, अघासुरा, सागरा, ठाया, "स्वर्गा-नरका जाये" (वेळापूर शिलालेख)

अनेकवचन—ए० व० प्रमाणेंच होऊन सानुनासिक असतें. या रूपांची प्रत्ययपरंपरा अशी—

सं० आय > प्रा० आअ, आए > अप० हो, हु > म० आ

सं० पुत्राय > प्रा० पुत्ताअ > अप० पुत्ताहो-हु > म० पूता

पंचमी:—पंचमीचीं आर्ष विभक्तिरूपें फार विरल आहेत. 'हून'-साधित रूपेंच वापरण्याची प्रथा दिसते. तरीहि प्रत्ययसाधित रूप अधून-मधून आढळतें. उदा०

एकवचन—संसारा (वच्छ० ३९), नगरात्तु (गोमांतकी ताम्रपट), देशा (शि० ८७९)

सं० संसारात् > प्रा० संसाराउ > म० संसारा

सं० नगरात् > प्रा० त्तो > म० त्तु

अशी ही आर्ष रूपांची परंपरा आहे. परंतु असें रूप एकादें. नित्याचीं रूपें—

"स्वर्गौनि, ठाओनि, मेघौनि, मूडाहूनि, मठाहौनि"

प्रत्ययपरंपरा अशी—

म० "ऊन, हून, औनि, हौनि, ऊनि, हूनि" < हु, हुं, हो, आउ (अपभ्रंश) < त्तो, हिंतो, सुंतो, हिं (प्राकृत). अपभ्रंशांत '**दोषहिं** रहिउ' (सावयधम्म० ५), '**गिरिरायहो**', '**सग्गहो**' (णायकुमार०) अशीं पंचमीचीं रूपें होतात. त्यांपासून मराठी आलीं. सिंधींतहि ऑं (सं० आत्) प्रत्ययानें पंचमी साधली जाते. असें असतां, युरोपीय भाषा-

शास्त्रज्ञांनीं या विभक्तीचे वाभाडे काढले आहेत. बीम्स[१] या प्रत्ययाची व्युत्पत्ति 'होऊन' या भूतकृदंतापासून लावतो व ही अर्ध-प्रत्ययी विभक्ति ठरवितो. प्रो० ब्लोक[२] 'होऊन' या कृदंतजन्य उभयान्वयी निपाताकडे बोट दाखवितात. प्रा० कुलकर्णी[३] याच मताचे आहेत. परंतु प्राकृत 'हिंतो, सुंतो' पासून उपपत्ति नीट लागत असतां मुद्दाम आडवळणांत शिरण्याचें कारण नाहीं.

षष्ठीः–एकवचन–"नंदा (नंदन), गणनाथा (गोमांतकी ताम्र०), पोगुवाअ (नागांव शिला०), बोला, भीष्मा, हातातळीं, पापा भेणें"

अपभ्रंशांत "रायस्स, णायस्स, जयंधरासु, णरणाहहो" अशीं रूपें आढळतात (णायकुमार०)–षष्ठीचे प्रत्यय अपभ्रंशांत "स्स, सु, आसु, हो, हु" असे एकवचनीं होते. त्यांवरूनच प्राचीन मराठींतील षष्ठी निघाली. तिची प्रत्ययपरंपरा अशी—

सं० स्य > प्रा० स्स > अप० स्स, हु, हो > म० आ

सं० पुत्रस्य > प्रा० पुत्तस्स > अप० पुत्रस्स, पुत्तहु > म० पूता

अनेकवचन—रूपें ए० व० प्रमाणेंच होतात. मात्र तीं सानुनासिक असतात. प्रत्ययपरंपरा—

सं० आम् > प्रा० आण–णं > अप० हं > म० आं

सं० पुत्राणाम् > प्रा० पुत्ताणं > अप० पुत्ताहं > म० पूतां

(देवें[४]– असें एक षष्ठीचें रूप आढळतें. परंतु तें अपवादात्मक होय.)

सप्तमीः—एकवचन—१ पायीं, लोकीं, गर्भें, पाशें, मार्गीं, ठायीं.
२ प्रसादां, रांजनां, निंबां, द्रोणां, दिहां, उसंगां, कुहां, अघासुरां, सागरां

---

१ "This can be called quasi-synthetical form, synthetical by origin, but not so in the manner of its employment,"— Comparative Grammar : pp, 233.

२ J. Bloch: "Formation de la langue Marathe,"

३ मराठी भाषा, उद्गम–विकास, पा० ३३६

४ "वेळोवेळां देवेचरणा लागती तिया बाळा।" (धवळे पू० ५७)

अनेकवचन—१ विषै (यीं), आचारीं, गांवीं

२ दीसां, विचारां, नगरां, (पीरवाडी शिलालेख), वारां–मासां

एकवचन आणि अनेकवचन यांचीं रूपें सारखींच आहेत. त्यांत दोन प्रकार मात्र स्वच्छ दिसतात. एक ' ई ' कारान्त व दुसरीं ' आं ' कारान्त[1]. पैकीं ' ई ' व ' एं ' कारान्त हीं एकच होत. त्यांची परंपरा—

एकवचन--सं० स्मिन् > प्रा० म्मि, म्हि > अप० हिं, इं > म० ईं–ए

अनेकवचन—सं० सु > प्रा० सु, सुं > अप० हिं, हं > म० ईं

ईंकारान्त रूपांची व्युत्पत्ति लागते, व तत्पोषक प्राचीन रूपेंहि अपभ्रंशांत मिळतात. जसें,

" अठ्ठमइ, गयउरि, वयणिं, पकईं, अच्छेतएं " (भविसत्तकहा)

" सग्गि, णरि, णरकोट्ठइं, तरंगहिं, दियंतहिं " (णायकुमार०) अशीं सप्तमीचीं रूपें आहेत. परंतु यादव-मराठींतील ' आं ' कारान्त रूपांची उपपत्ति यांपासून लागूं शकत नाहीं. प्रा० कुळकर्णी[2] हा ' आं ' सं० ' अंतर् ' या अव्ययापासून व्युत्पादितात. म्हणजे, त्यांच्या मतें ' आं ' कारान्त रूपें हीं शुद्ध-प्रत्ययी नाहींत. ही उपपत्ति तितकी शास्त्रशुद्ध वाटत नाहीं. शब्दयोगी अव्ययाचें वर्णप्रक्रियेनें प्रत्ययांत रूपांतर होऊं शकेल व त्यानुसार आं < त < आंत < अंतर ही प्रक्रिया नियमाला धरून आहे. परंतु ' आंत ' हें शब्दयोगी तत्कालीं रूढ असतां पुन्हां तज्जन्य आं प्रत्यय वापरांत असणें संभवनीय नाहीं. अर्थात् ' आंत ' हें शब्दयोगी व ' आं ' प्रत्यय हीं एकाच काळीं रूढ नसावींत. तर मग 'आं' प्रत्ययाची उपपत्ति कोणती ? याचें उत्तर असें, कीं हीं रूपें 'आकारान्त' पुल्लिंगी नामांच्या सप्तमी-

---

१ ' आं ' कारान्त रूपांचा उल्लेख राजवाडे करीत नाहींत. परंतु यादव-मराठींत तीं विपुल आढळतात. उदा० "**समसतां नगरां** गांवीं " (पीरवाडी ताम्रपट)

२ कृ० पां० कुळकर्णी , " मराठी भाषा, उद्गम–विकास ", पान ३३८

वरून साधलीं गेलीं. आकारान्त नामांचीं सप्तम्यन्त रूपें 'माथां, गळां' अशीं 'आँ'कारान्त होतात. त्यावरून 'अ' कारान्त नामाचीं वरील रूपें साधलीं. किंवा असेंहि असूं शकेल, कीं एकविधतेच्या नादानें चतुर्थी, पंचमी व षष्ठी यांच्यासारखेंच सप्तमीचेंहि एक रूप आँकारान्त बनलें गेलें. यासंबंधीं अधिक चर्चा सामान्यरूपावरील प्रकरणांत आली आहे.

संबोधनः—

एकवचन—कृष्णा, अर्जुना, पंडितो, पाठको, बापेया, इंद्रेया, कृष्णेया, विठ्ठले

अनेकवचन—बापेया, चांगदेवो, राउळो, देवव्हो, जनेहो

महाराष्ट्री-अपभ्रंशांतील पूत, पूता (ए० व०) व पुत्तहों (अ० व०) या रूपांवरून मराठीचें संबोधन सिद्ध होतें. मात्र, "इंद्रेया, पाठको" हीं नियमाला सोडून होणारीं रूपें महानुभावी ग्रंथांत आहेत. अर्थात्, राजवाडे त्यांचा उल्लेख करीत नाहींत.

§ ६ आकारान्त पुल्लिंगी

यादव-मराठींतील आकारान्त पुल्लिंगी नामें तीन तऱ्हांनीं सिद्ध होतातः—१ सं० अक – प्रा० अअ- म० आ (गळा, घोसा, घोडा)

२ सं० ऋ – प्रा० उ, अर[2]- म० आ (पिता, कर्ता)

३ सं० अन् – प्रा० अ, आण[2]–म० आ (राजा, आत्मा)

यांचीं रूपें पुढें देतों—

	एकवचन	अनेकवचन
प्र०	गळा, ढोळा, थडिवा, तांबीया वसैठा, ब्रह्मा, पान्हु, पान्हाओ	डोळे, कवडे, घोसे, गोवळे
द्वि०	,, ,, ,,	,, ,, ,,

१ 'पूतांनो' सारखीं नासिक्यवर्णयुक्त संबोधनें यादव-मराठींत नाहींत. तीं नंतर आलीं. फादर स्टीफन्स तीं देतो. पहा—त्याचें 'ग्रामाटिका'—५८ ते ६१

२ हेमचंद्र ८–३–३९, ४०

	एकवचन	अनेकवचन
तृ०	ब्रह्मदेवराणां (वेळापूर शि०) ब्रह्मां, मासां, डोळां, खीळां, जाणतां, महात्मां, मुकेनि, मुकिएण, नाथोबायें	डोळेनि, कोथलोबान, बावायें, कवडां
च०	भलेतेया, व्यवहारेया, अनामआ	
पं०	ठाउनि	जाणतेयांहूनि
ष०	राजया, घोडेया, खांडेआं, आत्मेयां	पावेआं, आत्मेयां
स०	गळां, दारवंडां, माथां, देव्हारां, पाडिवां, माथेआं, पवाडेआं, वेढेआं	डोळेआं, डोळां, गळां
सं०	कान्हा, कान्हो	महात्मेहो, राणेहो

प्रथमेचीं ' पान्हु, पान्हाओ ' अशीं रूपें अकारान्ताच्या साम्याभासानें होतात. तृतीयेचीं रूपें ' आं ', ' एन-ण ' व ' यें ' या विविध प्रत्ययांनीं सिद्ध होतात. आकारान्त नामांचीं पंचमीचीं रूपें विरल आढळतात.

आकारान्त नामांच्या विभक्तिरूपांची उपपत्ति संस्कृत ' एतत् ' या सार्वनामिक रूपांपासून राजवाडे लावतात ती युक्तच आहे. सार्वनामिक बीजांपासून प्रत्यय साधणें हा प्रत्येक भाषेचा स्वभाव आहे.

§ ७ इ-ईकारान्त पुल्लिंगी

हीं दोन तऱ्हांनीं सिद्ध होतातः—

१ सं० इ – म० ' इ ' कारान्त (हरि, यति, ऋषि)

२ सं० इन्– म० ' ई ' कारान्त (विवेकी, ज्ञानी, संन्यासी)

यांचीं रूपें—

	एकवचन	अनेकवचन
प्र०	ज्ञानिया, संतोषिया, पक्षिया, व्यभिचार्या, रुक्मिया, सेटिया,	दी, संन्यासिये, पक्षिये, परमार्थिए, विरहे, मुनी,

---

१ ज्ञानेश्वरांचें व्याकरण, पान ३१

	(गोमांतकी ताम्र०), अधिकारिया मळिया (नागांव शिला०), प्राणीया	कवी, पापीए, गौळी
द्वि०	... ...	... ...
तृ०	यतीं, योगियें, पारधिया, धातुर्वादियें, वनमालीए, रुक्मियें, गोसाविया, गोसावीं	पक्षीं
च०	ऋषी, रोगिया, संन्यासीया, क्षीराब्धा, केशिया	परिवारिआं, कवीं, कृमीं, गौळिआं, योगिआं, वैरिआं
पं०	आगीहूनि	दरिद्रियांहूनि
ष०	पक्षिया, गुणिआ, गौळियां, सांगातीया, वन्ही, रोगिआ	वऱ्हाडियां, विवेकियां
स०	दीं, पाणीं (= हातांत)	दरिद्रियां
सं०	स्वामिया, जोगिया, आनंदमूर्तें, जगजेठी	पापीये, उपवासीये

पैकीं 'इ'कारान्त तत्सम नामें संस्कृतांतील प्रत्यय लागून चालवींत असा प्रकार दिसतो. परंतु, नियम मात्र नाहीं. दोही रूपें सारखीं करण्याकडे कल होता.

§ ८ उ-ऊकारान्त पुल्लिंगी

	एकवचन	अनेकवचन
प्र०	एदु, वायो, वसो, कडुवा	बंधू, विंचू, पशुं
द्वि०	,, ,, ,, ,,	,, ,, ,,
तृ०	मनु, भिक्षु, विंचुवें, हेतु, वाटाउवें, वारुवें	विंचुवां
च०	वारुवा	वेळुवां, पशुवां, वारुवां, तरुं
पं०	... ...	... ...
ष०	विंचुवा, पशुवा	विंचुवां, पशुवां
स०	रितु	आणुआणीं
सं०	एदु, भानु, बंधो	...

‘ ई ’ कारान्त नामाप्रमाणें ‘ ऊ ’ कारान्ताचीं रूपेंहि सार्वनामिक प्रत्ययांनीं सिद्ध होतात.

§ ९ ऐकारान्त पुल्लिंगी

संस्कृतांतील ‘ इ ’ कारान्त नामांतील व्यंजनलोपानें यादव-मराठींतील ‘ ऐ ’ कारान्त नामें सिद्ध होतात. उदा०

सं० दलपतिः > प्रा० दलवइ > म० दळवै

यांचीं पुढील रूपें आढळतात—

प्र० सेणवै (नागांव शिलालेख), दलवै

तृ० दलवैएं, दलवीं

च० दलवैया

१० ओकारान्त पुल्लिंगी

राजवाडे यांचा उल्लेख करीत नाहींत. कदाचित् त्यांना ते अकारान्त नामांचींच रूपें समजत असावेत. तीं महानुभावी ग्रंथांत खालीलप्रमाणें आहेत.

वरो (उद्ध० ७२५), ब्रह्माओ (ध० पू० २६), गोल्हो (स्मृ० ३३), दादो (स्मृ० १८२), डो (स्मृ० २००), पो (लीला० ३–३०) शिवाय ‘ डोचें ’ ‘ वरोची ’ अशीं चान्त रूपेंहि आहेत.

§ ११ औकारान्त पुल्लिंगी

सं० मंडपः > प्रा० मंडवउ > अप० मंडउ > म० मांडौ

प्र० मांडौ, वोडौ, बिडगौ, अनुभौ

§ १२ अकारान्त नपुंसकलिंगी

नपुंसकलिंगी नामें:—यादव-मराठींत नपुंसकलिंगी नामांच्या अंतीं पुढील स्वर आढळतात—अ, इ, ई, उं, एं

अकारान्त नपुं० नामें हीं सर्व संस्कृतांतील अकारान्त नामांपासूनच सिद्ध होतात. उदा० “ घर, दळ, दूध, पोर ”

	एकवचन	अनेकवचन
प्र०	न्हाण, प्रणये, आश्चर्यें, कार्यें, केळ, अंतराळु, अंबरुं, मनु	वेळें, तमें, दुधेंतकें, नारिएळें, सोनेकेळें, दैन्यु
द्वि०	तुपा, तेला, कुटुंबें, अमृतूं (शिवाय प्र० प्रमाणें)	सकळां (शिवाय प्र० प्रमाणें)
सं०	परब्रह्मा	बापें हो, पोरें हो

इतर सर्व विभक्त्यांचीं रूपें पुल्लिंगी अकारान्ताप्रमाणें होतात. वरील रूपांपैकीं कांहीं उल्लेखनीय आहेतः—

(१) प्रत्ययपरंपरा अशी—

प्र० ए० व० : सं० म् > प्रा० ँ > म० अविकृत
प्र० अ० व० : सं० आनि > प्रा० आणि, आइँ > अप० अइं > म० एं

(२) प्रथमेद्वितीयेखेरीज इतर विभक्त्यांचीं रूपें पुल्लिंगी अकारान्त नामासारखीं करण्याचा गुण यादव-मराठीनें संस्कृत-प्राकृत-अपभ्रंश अशा परंपरेनें उचलला आहे.

(३) अपभ्रंशांत प्रथमा, द्वितीया यांच्या अनेकवचनांचींच रूपें तेवढीं अकारान्त पुल्लिंगी नामांहून भिन्न आहेत. अपभ्रंशांत "तणाइं, गोहणाइं, धण्णइं" हीं अनेकवचनी रूपेंच मात्र पुल्लिंगाहून भिन्न आहेत. एकवचन अपभ्रंशांत पुल्लिंगी नामाप्रमाणें 'उ'कारान्त आढळतें. यादव-मराठीनें एकवचन व अनेकवचन यांत हा भेद केलेला नाहीं. तींत दोन्ही वचनांचीं रूपें पुल्लिंगाहून भिन्न आहेत. या एका बाबतींत यादव-मराठीनें अपभ्रंशाला सोडून संस्कृत-प्राकृत महाराष्ट्रीला धरलें आहे.

(४) प्रणये, आश्चर्यें, प्रमेंए, अशीं प्रथमेचीं एकारान्त वा येकारान्त रूपें आढळतात तीं वस्तुतः अकारान्तच होत. अन्त्य 'य'मुळें तीं एकारान्त भासतात.

(५) अंतराळु, मनु, अंबरुं, या प्रथमेच्या रूपांत 'उ'कार पुल्लिंगाच्या साम्याभासानें लागला आहे.

(६) सप्रत्ययी द्वितीया ओळखतां येईल अशीं कांहीं अकारान्त नपुंसकलिंगाचीं रूपें:—

"मां वाटिभरि **तुपा** जेवितासि तरि प्रीतीचें प्रमाण राखतें।" —स्मृ० ४५

"मग बाईसीं **तेला** आणिलें।" —लीला० ३, पा० ३५

"मग **कुटुंबें** घेउनि गांवासि गेले।" —स्मृ० ९८

(७) 'शिशा' (सं० शीर्षम्) सारखें आकारान्त प्रथमेचें रूप क्वचित् आढळतें. परंतु एकटें दुकटें असल्यानें तें उपेक्ष्य होय.

(८) तृतीयेचीं पुल्लिंगाप्रमाणें "विश्वां, बीजां, शास्त्रां, दुधां, बळां, द्वारां" अशीं आंकारान्त रूपेंहि आढळतात. त्यांची उपपत्ति पुल्लिंगी रूपांप्रमाणेंच होय.

(९) "गाउनि, तोंडूनि, ग्रामूनि, तोंडौनि, आणौनि, अंतराळौनि" हीं पंचमीचीं रूपें पुल्लिंगासारखींच आहेत. परंतु तीं अधिक प्रमाणांत येतात.

(१०) "हृदां, दळां, खेळनां, नीरां, वृंदावनां, तीर्थां" अशीं सप्तमीचीं रूपेंहि पुल्लिंगाप्रमाणें आहेत.

(११) 'भेणें' (शिशु० ४०) सारखें तृतीयेचें रूप प्रत्ययाची द्विरुक्ति होऊन होतें.

सं० भयेन > प्रा० भयेण > अप० भएण > म० भेण+एँ

रूपांच्या एकविधतेकडे लक्ष लागल्यानें अशीं रूपें शास्त्राला सोडून होतात.

(१२) 'सौरभ्यूं' (शि० ३७७) व 'भेणूं' (शि० १४३) हीं अनुक्रमें सप्तमीचीं व तृतीयेचीं रूपें एकविधतेच्या नादानेंच 'उ'कार घेतात. पुल्लिंगी प्रथमेचा एकवचनी उकार असा वाटेल तेथें लागू शके.

§ १३ इ-ईकारान्त नपुंसकलिंगी

हीं नामें संस्कृतांतील अकारान्त नपुंसकलिंगी नामांवरूनच सिद्ध होतात. अर्थात् अकारान्त नपुंसक नामांची प्रक्रिया त्यांना लागू आहे. उदा०

सं० मौक्तिकम् > प्रा० मोत्तिअँ > म० मोतीं
सं० दधिकम् > प्रा० दहिअँ > म० दहीं
सं० नवनीतम् > प्रा० लवणीअँ> म० लोणीं

यादव-मराठींत यांचीं खालील रूपें आढळतात.

मोतियें (प्र० अ० व०) --ऋ० ५१५
पाणियें-एं (तृ० ए० व०) —स्मृ० २००
पाणिया (तृ० ए० व०) --ली० ३
बांदिएं (सप्त० ए० व०) --वच्छ० ४६३

§ १४ उंकारान्त नपुंसकलिंगी

हीं नामें तीन रीतींनीं सिद्ध होतात—

१ संस्कृत अंत्य वर्णाचा लोप होऊन : कुंकु (कुंकुम), गाउ (ग्रामः)
२ 'रु' हा स्वार्थे प्रत्यय लागून : लेकरुं, पांखिरुं, बटिकुरुं
३ संस्कृत 'उ' कारान्त नामांपासून : आसु (अश्रुः), पशु (पशुः)

यांचीं रूपें खालीलप्रमाणें आढळतात.

	एकवचन	अनेकवचन
प्र०	तारुं, गोरुं, हातिएरुं, पाखिरुं, हातिरुं, हातिरुवें, आसुं	आसुवें, पशुवें, गोरु, वटिकुरुयें पाखिरुवें, गाउवें, गोवळरुवें
द्वि०	... ...	... ...
तृ०	पाखिरुवां, गोरुवां, लेंकरुवें, किडरुवें	लेंकरुवीं
च०	लेंकरुवा	लेकरुवां, वासुरुवां
पं०	... ...	... ...
ष०	लेंकरुवा	पाखिरुवां, गाउआं

क्वचित् एकवचनाचें रूप अनेकवचनीं वापरलें जाई.
जसें—"तवं तेथं **गोरूं** चरूं आलीं।"—स्मृ० ७४

---

१ लिंगबदल

क्वचित् अनेकवचनाचें एकवचनीं वापरलें जाई. म्हणजे दोन वचनांचीं रूपें सारखीं करण्याकडे कल होता.

§ १५ एंकारान्त नपुंसकलिंगी

हीं नामें मूळचीं अकारान्तच असें राजवाडे मानतात तें योग्य आहे. परंतु संस्कृत 'एतत्' व 'इदम्' या सर्वनामांपासून अपभ्रंशद्वारा निघालेलें एं हें सर्वनाम लागून हीं नपुंसक नामें झालीं आहेत हें राजवाड्यांचें मत मात्र सर्वांशीं सत्य नाहीं. 'म्हणियें', 'बोलनें' अशा कांहीं क्रियानामांची उपपत्ति 'ए' प्रत्ययानें लागूं शकेल. पण "खतें, जातें, भांडें, सासुरें" इत्यादींची वाट काय ? तेव्हां आकारान्त पुल्लिंगी नामांच्या ठायीं जो 'अक' हा संस्कृत प्रत्यय मानला तोच येथें मानला पाहिजे. म्हणजे एकारान्त नपुंसक नामांची सिद्धि सार्वनामिक प्रत्ययानें न होतां, अंत्यवर्णप्रक्रियेमुळें होते. अकारान्त नामें तत्सम व एकारान्त तद्भव असा भेद राजवाडे करतात, तोहि अयुक्त होय. कारण "घर, न्हाण, दुध, गांव, पोर, केळ" अशीं अनेक अकारान्त नपुंसक नामें तद्भवच आहेत. अर्थात् तत्सम वा तद्भव या दृष्टीनें न पाहतां 'अक' युक्त व 'अक'-विहीन सिद्ध या भूमिकेवरूनच पाहिलें पाहिजे. यांचीं रूपें—

	एकवचन	अनेकवचन
प्र०	आळें, आंधारें, सांकडें, पन्हें, लेणें, सासुरें, खतें, ठाउवें, जुंझणें	सांकडीं, मुकियें, सुनीं, सोनेखैरीं
द्वि०	,, ,, ,, ,,	,, ,, ,, ,,
तृ०	आलेया, चांदिणेनि, मुराडिवें, बोलना	सांकडीं
च०	उसीसेयां, म्हणिया	आळेयां
पं०	... ...	...
ष०	लेणया, पन्हया, आलेआ	पन्हयां

१ ज्ञानेश्वरीचें व्याकरण, पान ४०–४१

स० भांडां, आळां, सुनियें, नवां
मडकां, जातां

स्त्रीलिंगी नामें:—यादव-मराठींत स्त्रीलिंगी नामांच्या अंतीं पुढील स्वर आढळतात—

अ, आ, इ, ई, उ, ऊ, ए, ऐ

§ १६ अकारान्त स्त्रीलिंगी

हीं नामें खालील रीतींनीं सिद्ध होतात.

१ सं० आ > प्रा० आ > अप० अ > म० अ
(सं० आशा > प्रा० आसा > अप० आस > म० आस
सं० निद्रा > प्रा० णिद्दा > अप० णिद्द > म० नीज)
२ सं० इ–ई > प्रा० ई > अप० ई > म० अ
(सं० रुक्मिणी > म० रखमीण
सं० रात्रि > म० रात – त्र)
३ सं० अ > प्रा० अ > अप० अ > म० अ
(सं० पेय > प्रा० पेज्ज > म० पेज
सं० प्रभात > अप० पहात > म० पहाट)

पैकीं, संस्कृत आकारान्तापासून होणारींच अधिक. त्यामुळें प्रथमेचें एकवचन सोडून इतर रूपें आकारान्त स्त्री० नामांप्रमाणेंच होतात.

	एकवचन	अनेकवचन
प्र०	भाष, सांखळ, साळ, चुलु, बरव, आश, आणु, आसु, नारिएल	बाइलाँ, माया, डांगा, नारिएळी
द्वि०	,, ,, ,, ,,	,, ,, ,,
तृ०	सांखळा, आंगउबा, ओला, काती, दाढे, हावा, कणवा, चाडे, माया, पाहाटा, कणवे	सांखळाँ, मायाँ
च०	उत्तरे, खेवा, ओळगे, जवळीके, बाइले, पसीमा	
पं०	... ...	... ...

ष०	जाणिवेया, नीळे	
स०	सांखळे, सेजे, पेजां, पेठे, पूर्वे, विहीरां पाहाटां, राणिवें, होडां	वहाणां, रात्रें
संबो०	माए	

§ १७ आकारान्त स्त्रीलिंगी

१ सं० आ > प्रा० आ > अप० आ > म० आ
(सं० बाला > म० बाळा, सं० रेषा > म० रेखा)
२ सं० ऋ > प्रा० आ > म० आ
(सं० मातृ > म० माता)

	एकवचन	अनेकवचन
प्र०	जटा, माला, देवता, नौकु, जमनु, नम्रतु, विद्युल्लतु	देवता, जटै, कल्पलतु
द्वि०	... ...	... ...
तृ०	सभा, कृपा, छायां, रेखां, माता, बाळां, लीले, गीते	पिपासीं, मालां
च०	वीद्ये, लाह्या, वाचे, भिक्षे, जसोदा	बाळां, देवांगनां
पं०	... ...	... ...
ष०	कथे, देवते	सरितां, देवतां
स०	दीशें, द्वारकेंसी, मणिकर्णिकेंसि, अवस्छां, क्रीडां	कळां, दीशीं
संबो०	रंभे, रंभाई	

§ १८ इ-ईकारान्त स्त्रीलिंगी

१ सं० इ > प्रा० इ > अप० इ-ई > म० इ-ई
(सं० बुद्धि > म० बुद्धि)
२ सं० ई > प्रा० ई > अप० ई > म० ई
(सं० पुरी, भीमकी > म० पुरी, भीमकी)
३ मराठी "ई-ईणि" हे स्त्रीलिंगी प्रत्यय लागून
(तेलीणि, हडपिणी, कुळी)

	एकवचन	अनेकवचन
प्र०	मुदी, कुसि, फुल्ली, दीवी, कासुवी, पाहाटी, रांधीभांडी, बहिणि, गोडिआ, कांटी	मासीआ, वाळीया, सीवीया, बाइया, महात्मीं, वोविया, धाया, हडपिनी, अंतौरिया, वेलिए, तीखणीया, भवै, हीरडिया, **कांटीआं**[1]
द्वि०	” ” ”	” ” ”
तृ०	मुंगीयें, देवकिया, दिठीं, आवडीं, पृथ्वीया, आवइया, माऊलीए, बाइं, डोइएं, बाइया	परीयां, परी, मुंगां, बुद्धीयां, उपासिनीं, ओविअें, मालतिअ।
च०	कुंतीये, दिठी, कीटकीये, भिये, मुखश्रीया, भीमकीय, देवी, पींडीए, वनाश्रिया, वैजयंतिया	दीवीयां, विरहिणीं
पं०	... ...	... ...
ष०	स्त्रिये, घडिये, देवकीये, कांटीये, खेडकुळीया	तुरयां, आंगुलिआं
स०	खळीयें, थडिवां, करिणीयें, मोळिएं, झोळिएसि, रातिवें, देउळीएं, उपंगळीएं, नदीं, डोणिं	दांडीयां, थडिवां
संबो०	भीमकीये, सए, आवै, रूपै, गौराये, उभै, आइ, कृशोदरीए	महात्मेहो

§ १९ उ-ऊकारान्त स्त्रीलिंगी

१ सं० उ > प्रा० ऊ > म० उ–ऊ

(सं० ऊरुः > प्रा० उरू > म० उरु – रू)

२ सं० उक > प्रा० उअ > म० ऊ

(सं० भालुक > प्रा० भालुअ > म० भालू)

---

१ “ कांटीआं कांटी झाडावी। ” – शिशु० ४९४

या नामांचीं खालील रूप आढळतात –

प्र० अ० व० : उरु, जानु, भालुआं (शि० ९०१)

तृ० ए० व० : उजुया

§ २० ए–ऐकारान्त स्त्रीलिंगी

१ सं० इ > प्रा० अइ (व्यंजनलोपामुळें) > म० ए-ऐ (सं० स्मृति > प्रा० सइ > म० से; सं० संवृत्ति > प्रा० सव्वइ > म० सवे : सवै)

२ सं० इका > प्रा० इआ > म० ऐ (सं० जृंभिका > प्रा० जंभिआ — म० जांभै)

३ 'ई' या स्त्रीलिंगी प्रत्ययानें (कटकै, आंबजै, फडै)

या नामांचीं पुढील रूपें आढळतात—

प्र० ए० व० : सेवै, से, सवे, बाहे, साधे, कटकै, कठीये, फडै, राउतै, एकवंकै, चावटै, जांभै

प्र० अ० व० : ठाणवैया, सेया, शाळैया

तृ० ए० व० : रूपैया, कटकैये

तृ० अ० व० : कटकैयां, साधीं

च० ए० व० : आंबजैए

स० ए० व० : कडीएं

हीं रूपें ईकारान्ताप्रमाणेंच होतात.

§ २१ स्त्रीलिंगी नामांचे विशेष

स्त्रीलिंगी नामांचीं वरील सर्व रूपें पाहून त्यांत पुढील विशेष आढळतात.

(१) प्रथमेच्या एकवचनांत क्वचित् आढळणारा 'उ' कार (आशु, नम्रतु, लतु). हा मूळचा नसून पुल्लिंगाच्या साम्याभासानें येणारा आहे. 'उ'काराचें यादव-मराठींतील प्राबल्य यावरून दिसेल.

(२) 'ई'कारान्त नामाचें क्वचित् आढळणारें आकारान्त असें प्रथमेचें एकवचन. उदा०

"याची **गोडिया** सांडौं न शके" – शिशु० १३५

हीं आकारान्त रूपें प्राकृत काळींहि होतीं. तात्पर्य, प्राकृतांतील कांहीं विकल्प यादव-मराठींत कायम आहेत.

(३) अकारान्त पुल्लिंगी नामांचीं कांहीं तृतीयेचीं आकारान्त रूपें मागें पाहिलीं. तशींच कांहीं आकारान्त तृतीया ईकारान्त स्त्रीलिंगी नामांचीहि आढळते. (उदा० "बुद्धीआं, मुंगां, परीयां") पहा —

"मुंगीयांचें मढें तें **मुंगांचि** काढावें कीं गा।" –स्मृ० ५९

"ऐसेया **परीयां** पवित्र : करावें शरीरयंत्र।" –उद्ध० ४११

प्राकृतांत 'ई'कारान्त स्त्रीलिंगाचा तृतीयेचा 'हिं–हि' असा अनेकवचनी प्रत्यय आहे. अर्थात् आकारान्त तृतीया प्राकृत-अपभ्रंशांत नाहीं. यादव-मराठीनें हा 'आ' प्रत्यय नावीन्यानें लिंग व अंत्य वर्ण यांच्या उपाधिभेदातीत लावण्यास आरंभ केला.

(४) पुल्लिंगी–नपुंसकलिंगी नामांत न दिसणारी सप्तमीच्या अनेकवचनी 'सु' प्रत्ययाची ओळख क्वचित् कोठें स्त्रीलिंगांत आढळते. पहा—

"तंवं भणावें हरिहरि : **मणिकर्णिकेंसि**।" – शिशु० १३७

"तो यादवासी राज्य करी : **द्वारकेंसी**।" – शिशु० ३७

"हां हो तुम्ही **झोळिएसि** कैसे जेविलेति।" स्मृ० १५९

वरील जाड ठशाचीं रूपें सप्तमीचीं आहेत. या सप्तमीच्या 'सि' प्रत्ययाची परंपरा अशी —

सं० सु > प्रा० सु–सुं > अप० हिं० > म० इं–सिं

सं० नदीषु > प्रा० नईसु > अप० नईहिं > म० नदिएसिं

अर्थात्, अपभ्रंशांत लोपलेलें 'स्' हें व्यंजन पुनः यादव-मराठींत प्रकट

---

१ हेमचंद्र : प्राकृत व्याकरण, ८–३–२८

"स्त्रियां वर्तमानादीकारान्तात् सेर्जस्–शसोश्च स्थाने आकारो वा भवति।"

होऊन ' सि ' हा प्रत्यय क्वचित् दिसतो. येथें मराठीनें अपभ्रंशाला सोडून प्राकृताला धरलें आहे.

(५) इ-ईकारान्तांतील भेद दिसत नाहीं. तो अपभ्रंशकालींच लोपला होता.

§ २२ अनेकवचन

यादव-मराठींतील नामांचे एकवचनाचे व अनेकवचनाचे प्रत्यय संस्कृत-महाराष्ट्री-अपभ्रंशद्वारा सिद्ध होतात. मात्र अनुनासिक ही जी तिन्ही लिंगीं द्वितीयेपासून संबोधनापर्यंतच्या अनेकवचनांची नियत खूण तिचें विवेचन करणें आहे. पूताँ (द्वि०), पूतीं (तृ०), पूताँ (च०), पूताँऔनि (पंचमी), पूताँ (ष०), पूतीं (स०), पूताँहो (संबो०) या सात विभक्त्यांच्या अनेकवचनांत अनुनासिक नियमानें आढळतो. या अनुनासिकाची उपपत्ति राजवाड्यांनीं पल्हवी व जुनें फारसी या भाषांतील अनेकवचनी ' आन् ' प्रत्ययापासून लावण्याचा प्रयत्न केला आहे, तो फोल होये. बाकी, त्यांच्याहि लिहिण्यांत मेळ नाहीं. एकदां " हा अनुनासिक आगंतुक म्हणजे प्राकृतेतर आर्यभाषांतून आला असला पाहिजे " (पान २४) असें म्हणून नंतर " अनेकवचनाचा अनुनासिक फारसीचा संसर्ग होण्यापूर्वींचा आहे " (पा० ७४) असें विरुद्ध विधान ते करितात. राजवाड्यांच्या सिद्धांतांतील विसंगति चिं० वि० वैद्यांनीं उत्तम दाखविली आहे. एतावता, या अनुनासिकाची परंपरा अशी होयः—

सं० णाम् (ष० अ० व०) > आँ
सं० आन् (द्वि० अ० व०) > आँ
सं० आनि (नपुं० प्र० अ० व०) > आँ

प्रथमा, द्वितीया व षष्ठी यांच्या रूपांचा पगडा बसल्यानें अनेकवचनी अनुनासिक उत्पन्न झालें. महाराष्ट्रींत व अपभ्रंशांतहि तृतीया, षष्ठी, सप्तमी, या अनेकवचनी विभक्तिप्रत्ययांचे अंत्य स्वर सानुनासिक आहेत. जसें,

---

१ वि० का० राजवाडे– " ज्ञानेश्वरींचें व्याकरण " पान २४

२ चिं० वि० वैद्य– " निबंध आणि भाषणें ", पान १२९ (१९२७)

वच्छहिं, देवहिं ... तृ०
वच्छाणं, देवहं ... ष०
वच्छेसुं, देवहिं ... स०

वरील रूपांशीं एकविधता पावून यादव-मराठींत द्वितीयेपासून सर्व विभक्त्या अनेकवचनीं अनुसासिक घेतात.

अनेकवचनाबाबत आणखी एक विचार आहे. अनेकवचन प्रत्ययानें दाखविण्याऐवजीं एकाद्या गणवाचक शब्दानें दाखविण्याची रीत प्रत्येक भाषेंत आढळते. उदा० ओरिया भाषेंत 'मान' या गणवाचक शब्दानें अनेकवचनाचें काम होतें. जसें—

"जाल—जालमान" (=जाळीं)
"भार—भारमान" (=ओझीं)

यादव-मराठींत अशीं कांहीं रूपें आढळतात. उदा०

"जयाचेया आंगउबा विटे शृंघारु **कामिनीजनाचा**।" उद्ध० ३९३
"तैं मुळ पाठविलें ऋषिशृंगासि। **वधुजनातें**।"—उद्ध० ४२०,

येथें 'जन' शब्दानें अनेकवचन व्यक्त होतें. अपभ्रंशांतहि 'घोडेअहोगणु' असें शब्दसाधित अनेकवचन आहे. परंतु एवढ्यावरून प्रत्ययी अनेकवचनाची उपपत्ति या गणवाचक-शब्दसाधित किंवा 'प्लेओनॅस्टिक' पद्धतींत शोधणें अयोग्य आहे. फार तर, दोन्ही रीती यादव-मराठींत रूढ होत्या, इतकेंच म्हणतां येईल. हॉर्न्लें या दोहींत संबंध जोडूं पहातो म्हणूनच राजवाडे त्याच्या भाष्याला 'गप्पाष्टक' म्हणतात. मात्र वर्तमान-मराठींतील 'पुरुषमाणसें', 'मूलमंडळी' इत्यादि प्रयोग पाहून हॉर्न्लेंच्या गप्पाष्टकांतील सत्यांश दिसेल.

§ २३ अर्धप्रत्ययसाधित विभक्ति

प्रत्ययात्मक शब्दयोगी:—येथवर प्रत्ययी नामविभक्तिप्रक्रिया

१ "These socalled Nominative Plural forms are elliptic phrases which must be filled up by supplying some collective noun as लोक, गण–" The Pleonastic Construction; Hornle: Gaudian Grammar, pp. 213—214

पाहिली. शुद्ध प्रत्ययांनीं सिद्ध होणारीं नामरूपें यादव-मराठींत विस्काळित झालीं व एका विभक्तिरूपाचा दुसऱ्याशीं घोंटाळा होऊं नये म्हणून शब्दयोगी जोडून नामरूपें साधण्याची प्रथा कशी निघाली याचें सविस्तर विवेचन मीं प्रस्तावनेंत या प्रकरणीं केलें आहेच. येथें या दोन प्रकारांतील मधल्या पायरीचें आलोचन करतों. प्रत्ययी नामविभक्ति विस्काळित झाली म्हणून हरघडीं वापरांत असणाऱ्या विभक्तींचीं रूपें ओळखणें कठिण होऊं लागलें. तेव्हां त्या त्या विभक्तींचे निदर्शक असे प्रत्यय यादव-मराठीनें मूळांत स्वतंत्र अस्तित्व असणाऱ्या शब्दांपासून बनविले. तृतीया, चतुर्थी व षष्ठी या तीन विभक्तींना हे प्रत्ययात्मक शब्द लागत. पंचमीचा वापर फार थोडा असल्यानें तिच्या बाबत हा प्रश्न उद्भवला नाहीं. मात्र, हे प्रत्यय मूळ संस्कृतासिद्ध प्रत्ययांपासून अलग मानले पाहिजेत. किंबहुना हे प्रत्यय नसून प्रत्ययात्मक शब्दयोगी आहेत हेंच अधिक खरें. शुद्ध प्रत्यय आणि शुद्ध शब्दयोगी यांच्यांतील हा दुवा किंवा संधिकाल प्राकृत अपभ्रंशावरून कसा निष्पन्न होतो व त्याचीं अति सूक्ष्म बीजें प्राकृतांत कशीं आढळतात हें मीं प्रस्तावनेंत लिहिलेंच आहे. पुढें हीं प्रत्ययात्मक शब्दयोगी देतों.

तृतीया :— 'सिं-सीं' ...

सं० सहितम् > प्रा० सहिइं > अप० सहिं > सीं

राजवाडे 'सिं' प्रत्यय सं० समम् पासून व्युत्पादून हा तृतीया-सप्तमी योग मानतात. असा योग मानण्याचें वास्तविक कारण नाहीं. 'समम्' पेक्षां 'सहितम्' हाच शब्द तृतीयेशीं अधिक निगडित आहे व शिवाय तो स्वतंत्र-पणेंहि शब्दयोगी म्हणून मराठीनें वापरलेला दिसतो. पहा—

"तैं नित्ययाग**सहितें**। सृजिलीं भूतें समस्तें।" —ज्ञा० ३।८६

असा स्वतंत्र वापर 'समम्'चा नाहीं. अर्थात् सहितम् हें शब्दयोगी व तज्जन्य 'सिं' प्रत्यय हीच जोडी युक्त होय. शिवाय तृतीया-सप्तमीच्या योगाचें येथें कारण पडत नाहीं. 'सिं' रूपांत 'समम्'पेक्षां 'सहितम्' चाच अर्थ अधिक व्यक्त कसा होतो तें पहा—

---

१ ज्ञानेश्वरीचें व्याकरण, पान ९

" ऐसांही तोडीजे तरि **मूळांसि** वोलि हातासि ये। " इ० ३५

(=मूळांसकट, सहित)

" एक वेळ कवीस्वरत्रास **सांगातियेंसि** अटना गेले होते। " इ० १०

(=सांगात्यांसह)

" वैजोब्रा **गाडेनिसिं** निगाले। " –स्मृ० ८५

(=गाड्यासह)

" अर्जुनु असे पांतु। तो दलभारु समस्तु। **संभ्रमेंसीं** ॥ "

–ज्ञा० १–१७६

तात्पर्य, व्युपत्ति आणि अर्थ दोन्ही दृष्ट्या 'सहितम्' हेंच बरोबर वाटतें. डॉ० भांडारकरांचें मत मात्र राजवाड्यांसारखेंच आहे.

चतुर्थी:—(१) **सिं, सीं, शीं**—

सं० आर्श्वे > प्रा० आस्सइ > अप० आस्सिं > म० सिं–सीं

बीम्स हा प्रत्यय षष्ठीच्या 'स्य' पासून व्युत्पादितो. त्याचें म्हणणें राजवाड्यांनीं योग्य तऱ्हेनें खोडलें आहे. " शेषे षष्ठी " हें सूत्र मानून सुद्धां या चतुर्थीला षष्ठीचा अर्थ प्राप्त होऊं शकत नाहीं. डॉडरेटचें मत असेंच आहे.[२]

रूपें—

" श्री विठ्ठल **देवरायासि** " (पंढरपूर शिलालेख)

" नातरि पवनु **मेघासि** विहे। कीं **अमृतासि** मरण आहे। "

—ज्ञा० २–१४

क्वचित् या प्रत्ययात्मक शब्दयोगीच्या पुढें शुद्ध शब्दयोगी जोडलें जातें. पहा:—

" जें **आर्तासि कारणें**: संसारश्रमाचें विसंवणें। "–ऋ० ४४

" जे **काळासि वरि** वज्रांगी: ते कृपादृष्टी गगनमार्गी। "

–ऋ० २१६

---

१ Wilson Philological Lectures. pp, 251

२ 'Si is, as if, the abraded form of a separate word implying propinquity '—W. Doderet (B. S. O. S. Vol. V)

(२) थें-तें

सं० अर्थे > प्रा० अत्थे > म० थें-तें

पैकीं ज्ञानेश्वरींत व महानुभावी ग्रंथांत केवळ तेन्त्य रूपेंच आहेत. "शाखातें, कृष्णातें, सदनातें" अशीं रूपें होतात. थेन्त्य रूपें खालील प्रमाणें आढळतात—

"नायकाथें, उखेथे, माथे, तुथे"—उषाहरण (चोंभा)

'तुथें'—(निवृत्तिदेवकृत गीतेची समओवी टीका)

"माथें, स्मार्ताथे, तिंतिराथे" (गद्य पंचतंत्राची जुनी प्रत) संपा० प्रा० पोतदार, पृ० २३–२७

थेन्त्य रूपें इ० स० १६०० तील फादर स्टीफन्सच्या ख्रिस्त-पुराणांतहि येतात. अर्थात् थेन्त्य रूप असणें हा प्राचीनत्वाचा पुरावा नाहीं. एकाच प्रत्ययाचीं हीं दोन रूपें होत.

चतुर्थीचा 'ला' प्रत्यय यादव-मराठींत नाहीं व म्हणून त्याचा विचारहि कर्तव्य नाहीं. लागीं-लागौनि यांची चर्चा पुढें शुद्ध-शब्दयोगींत केली आहे.

षष्ठीः—(१) चा-ची-चें

सं० त्यत् > प्रा० च्च > म० च

राजवाडे म्हणतातः "वस्तुतः या 'च'ला षष्ठीचा अर्थ स्वार्थी नाहीं. षष्ठीच्या रूपाला जोडला जाऊन षष्ठीचें उसनें सामर्थ्य त्याच्या ठायीं भासमान होतें." प्राकृतांतहि षष्ठीचीं चान्त रूपें सांपडतात--

अह्मेच्चयं < सं० अस्माकम्

तुह्मेच्चयं < सं० युष्माकम्

अर्थात् मराठी 'च' संस्कृत 'त्यत्' या तद्धित प्रत्ययापासून निघाल्यानें हे चान्त शब्द विशेषणात्मक आहेत. हा 'च' मूळशब्द, पंचमी, सप्तमी

१ भा० इ० सं० मं०, वार्षिक इतिवृत्त, श० १८३८

२ भा० इ० सं० मं०, त्रैमासिक, वर्ष ३

३ ज्ञानेश्वरीचें व्याकरण, पान १४

४ हेमचंद्र : प्राकृत व्याकरण ८–२–१४९

यांना जोडला जाऊन चान्त विशेषणें होतात व तीं विशेष्यनिघ्न असतात. तसेंच संस्कृतांतील 'त्यत्' प्रमाणें 'च'लासुद्धां साती विभक्त्यांचे प्रत्यय लागतात. जसें—

	पुल्लिंग-नपुं०	स्त्रीलिंग
प्रथमा–द्वितीया	चा–चें	ची
तृतीया	चेनि, चेन, चें	चिया
चतुर्थी	चेया, चाया	चिये
पंचमी	,, ,,	चिया
षष्ठी	,, ,,	चिया, चिये
सप्तमी	चां, चियें	चां, चियें

उदा० "आत्मबोधाचिया आवडीं"–तृ० (ज्ञा० ६–२८)
"इंद्रियांचेया घरा"–च० (ज्ञा० ६–६२)
"इंद्रियांचा राजबींदीं"–सप्तमी (ज्ञा० ७–१०३)
"तेया शुकाचेनि आंगभारें"–ष० (ज्ञा० ६–७६)
"क्षोभु मनीं नेणिजे, द्रोणाचिये"–सप्तमी (ज्ञा० २–३९)
"तयाचीये दिठीचा झनें कलंकु। लागे प्रेमा"–ष० (ज्ञा० ६–११५)
"विण विषयांचिया बोला : कैसेनि कोंभैला"–तृ० (उद्धव २६३)

प्राचीन गुजरातींत हा 'च' आहे. पहा—

नरसैंयाचा सवामिणु मुखडुं फरिफरि जसोद नयाळे रे।"
—नरसिंह : बाळलीला, ४

नरसी मेहत्यांच्या काव्यांत याचीं उदाहरणें विपुल आहेत. प्रो० ब्लोक[1] या 'च' चा, म्हणजे पर्यायानें संस्कृत 'त्यत्' चा संबंध 'त्वा' या भूतकृदन्ताच्या प्रत्ययाशीं जोडतात तो चिंत्य आहे.

---

१ Formation de la Langue Marathe. 205

(२) 'ज' — चान्त विशेषणाप्रमाणें क्वचित् कोठें जान्त विशेषण आढळतें. पहा—

"**श्रीरायाजा** प्रधानु" (नागांव शिलालेख)

"**कंसाजा** तूपभातु : जेओनि ठेला खाखातु।"–शिशु० ४३८

"आणि मनसर्पाची सृष्टि। डोले **नाराजांची** सुटी।" ज्ञा० १६।२४१

"**ज्वराजेनि** आटोपें। रोगी भलतैसें जल्पे।"–ज्ञा० १६–३६४

(साखरे प्रत)

"कांडरु फोडुनि **नाराजु**।" – उषा० १२०–६६

पैकीं रायाजा, कंसाजा, ज्वराजेनि हीं रूपें स्वच्छ जान्त आहेत. संस्कृत नाराच् शब्दाचें चान्त होतांना साभ्याभासानें 'नाराजांची' असें रूप झालें आहे (च > ज) तें महत्त्वाचें आहे. तरी हीं सर्व रूपें खरोखर जान्त मानावींत काय? च–जमधील अभेद मराठींत हरघडीं आढळतो. "मेचकें–मेजकें, कुचका–कुजका, बोचकें–बोजकें, खाचकुइली–खाजकुइली" अशीं अनेक च व जयुक्त रूपें आहेत. परंतु मूळ शब्दांत 'च–ज'चा अभेद मानला तरी प्रत्ययांत तो तसा होणार नाहीं. तेव्हां जान्त रूपें स्वतंत्र मानणेंच युक्त.

सं० कार्य > प्रा० केर–कज्ज > अप० इज्ज > म० ज

अशी या 'ज'ची परंपरा असावी. हीं जान्त रूपें अति क्वचित् आढळतात.

(३) 'स'—

"दैत्यकाळ **युनासा** भेण"–उषाहरण १४२३

"तीये **अग्नीसी** माझारीं" ,, १७३३

हीं चान्त विशेषणांचीं सान्त रूपें आहेत.

(४) 'क'—

"मी कांइ येकाधा **चोळीका** महात्मा" –स्मृ० ९९

---

१ "Ja (जा) is not merely a variation of the voiced and unvoiced palatals"– W. Doderet : Archaic Marathi 'Ja' Genitive (B. S. O. S. Vol. V)

"परशास्त्रसंमत : मियां आइकिलें **देवकें**चरित्र ।"–ऋ० १९८

"ले **देवकें** लेणें : तरि विषयांचे गिरिदुर्ग जिणे ।"–उद्ध० १६१

सं० कृत > प्रा० करितो–करिओ–केरो > हिं० के–का

तात्पर्य, जो प्रत्यय हिंदींत के-का रूपानें व बंगालींत एर रूपानें आहे, तोच यादव-मराठींत क्वचित् 'क' रूपानें आढळतो. अर्थात्, हा हिंदीद्वारा आला हें उघड आहे.

म्हणजे यादव-मराठींत षष्ठीचीं चान्त, जान्त, सान्त व कान्त अशीं चार रूपें आढळतात. पैकीं, चान्त व सान्त हीं एकच होत. याचा अर्थ—

सं० त्यत् > म० चें

सं० कार्य > म० ज

सं० कृत > म० क

अशीं तीन भिन्न भिन्न रूपें यादव-मराठींत होतीं. जान्त व कान्त क्वचित् येत, चान्त नित्य येई. पुढें चान्ताचेंच प्राबल्य होऊन इतर दोन गळलीं. राजवाड्यांनीं चान्ताखेरीज इतरांचा विचार केलेला नाहीं. यादव-मराठी ही एकविध नसून विविधतापूर्ण होती व अनेक रूपांची चाळवा-चाळव होऊन नंतर त्यांतील कांहीं निश्चित झालीं, या विधानाला षष्ठीचीं हीं चार रूपें बळकटी आणतात.

§ २४ सामान्यरूप

प्रत्यय वा शब्दयोगी लावण्यापूर्वीं नामाचें सामान्यरूप वर्तमान-मराठी करते. पण येथें यादव-मराठीपुरतेंच पहाणें आहे. "ज्ञानेश्वरकालीन मराठींत विभक्तिप्रत्यय किंवा शब्दयोगी अव्ययें ह्यांच्या पूर्वी नामांचें सामान्यरूप होत नसे" असें राजवाड्यांचें मत आहे. चिं० वि० वैद्य यांनी

१ Dr. P. D. Gune: Comparative Philology, pp- 30

२ Dr. Grierson: Linguistic Survey of India.

३ कृष्णशास्त्री चिपळोणकर (व्याकरण, पान ६२) व कृष्णशास्त्री गोडबोले (व्याकरण, पान ६३) हा 'च' संस्कृतांतील 'ईय' या तद्धितापासून व्युत्पादितात.

४ ज्ञानेश्वरीचें व्याकरण, पान २५

५ निबंध आणि भाषणें, पान १२७–२८

त्याला विरोध केला नाहीं त्याअर्थी त्यांना तें मान्य दिसतें. उलट, प्रा० कृ० पां० कुलकर्णी सामान्यरूपाची पद्धति फार जुनी मानतात. त्यांच्या मतें अपभ्रंश, प्राकृत, संस्कृत, या सर्वांत सामान्यरूप आहे. वास्तविक हीं दोन्ही मतें आत्यंतिक होत. संस्कृतांतील

"रामः, रामं, रामेण, रामाय, रामात्, रामस्य, रामे" या सात विभक्त्यांच्या एकवचनी रूपांत सामान्यरूप कोणतें आणि कसें मानणार? राम हें मानावें तर तें मूळ प्रातिपदिकच आहे. तसेंच अपभ्रंशांतील[2]

"तुहुं, तइं, तइं, तउ, तउ–तुज्झ, तइं"
प्र० द्वि० तृ० पं० ष० स०

या एकवचनी रूपांत 'त' हें फार तर प्रातिपदिक मानतां येईल, सामान्यरूप नव्हे. म्हणजेच आज ज्याला सामान्यरूप म्हणतात, किंवा युरोपीय वैयाकरण ज्याला 'ऑब्लिक' मानतात, तें संस्कृत–प्राकृतांत नाहीं. अर्थात् प्रा० कुलकर्ण्यांचें वरील विधान अतिव्याप्त आहे. राजवाड्यांचें विधान कांहीं एका प्रमाणांत सत्य आहे. आज ज्या परिणत स्वरूपाला सामान्यरूप पोंचलें आहे, ती परिणतावस्था ज्ञानेश्वरकालीं नव्हती हें खरें. परंतु ज्ञानेश्वरांच्या मराठींत सामान्यरूप होतच नव्हतें असेंहि नाहीं. माझ्या मतें यादवकालीन सामान्यरूपाची स्थिति पुढीलप्रमाणें आहे—

१ **प्रत्ययी–विभक्तिरूपें :** सामान्यरूप नाहीं. संस्कृत-प्राकृत-अपभ्रंशद्वारा सिद्ध झालेले प्रत्यय सरळ प्रातिपदिकाला लागत. अर्थात् एकविधता नव्हती.

२ **प्रत्ययात्मक शब्दयोगी-साधित विभक्ति :** सामान्यरूप नाहीं, परंतु पुढें होणाऱ्या सामान्यरूपाचीं बीजें मात्र आहेत.

तृतीया—संभ्रमेंसिं, घोडेनिसिं, मूळांसिं, वेलींसिं, फळेसिं
चतुर्थी—पूतासि–ते, डोलेयासि–ते, वेलियेसि-ते, फलासि–ते

---

१ मराठी भाषा उद्गम–विकास, पान ३४०
२ हेमचंद्र : प्राकृत व्याकरण, ४–३७५ ते ३८१

षष्ठी—पूताचा, डोलेयाचा, मुनीचा, वेलियेचा, दिसणेयाचा

वरील रूपें त्या त्या विभक्तीला प्रत्ययात्मक शब्दयोगी लागून झालेलीं आहेत. तृतीयेचें 'संभ्रमें'–सिं, चतुर्थीचें 'पूता'–सि, व षष्ठीचें 'वेलिये'–चा अशी या रूपांची उपपत्ति आहे. म्हणजे मूळ शुद्धप्रत्ययी विभक्तीवरूनच हीं रूपें आलीं असल्यानें येथेंहि सामान्य रूप नाहीं हें उघड होय.

३ शब्दयोगी-साधित विभक्ति : सामान्यरूप सर्वत्र नसलें तरी बरेंच आहे. क्वचित् कोठें नाहीं.

तृतीया : मियांविण, यादवांकरविं, साउलीएविणें, काठीएकरूनि
चतुर्थी : ज्ञानालागी, लेंकरुवापासीं, हुडेयालागौनि, गोरुवासाटीं
पंचमी : चंद्रकरांतव, पाटाउवापासि, हीरयापासौनि, मुंगीयेहोउनि
षष्ठी : वाटाउवाजवळीं, सिगेवरि, सुनेयापरी, विंचुवावरि
सप्तमी : पदरांभीतरीं, खुणेआंतु, पाणीयांतुल, सोनेयामाजीं

प्रातिपदिकाचें सामान्यरूप न करितां शब्दयोगी लावल्याचीं उदाहरणें पुढें देतों—

"**आंबांतु** घाली : **खीरीआंतु** घाली।" दृ० ६४
"परि पंचमालापीं बोलिका : **कोकीळुवांचौनि** नाहीं।" उद्ध० ६४७
"कीं **देवतावरी** : प्रसाद छत्र धरी।"—ऋ० ८७
"उद्धवदेवाचेया **खांदावरि** हातु।"–ध० पू० ५०
"**गोविंदवरी** ऐसा पाडु नाहीं मज।" ध० पू० ६६
"म्हणौनि **तिचिवरि** अवकास केला।"—स्मृ० २२३
"**पेणप्रति** एकूएकें नीरोपेंसी एकूएकातें पाठवीति।"–ली० १.७

परंतु सामान्यरूप नसलेलीं वरच्यासारखीं स्थळें थोडीं. बहुश: तें आहे. तात्पर्य, यादव-मराठींत प्रत्ययी विभक्तींत नसलें, तरी सामासिक विभक्तींत सामान्य रूपाचें अस्तित्व आहे असा निष्कर्ष निघतो. तसेंच, राजवाडे म्हणतात त्याप्रमाणें हा एकविध भाव द्वितीयेपासून सुरू न होतां तृतीयेपासून होतो. चिं० वि० वैद्य यांनीं राजवाड्यांचें म्हणणें योग्य तऱ्हेनें खोडलें आहे.

१ चिं० वि० वैद्य : "निबंध आणि भाषणें", पान १२७

सामान्यरूपाच्या उपपत्तीबाबत पंडितांत मतवैचित्र्य आहे. विभक्ति-प्रत्यय लोप पावत पावत त्या सर्वांच्या एकीकरणानें एकवचनी सामान्यरूप निर्माण झालें व षष्ठीच्या 'णाम्' प्रत्ययापासून अनेकवचनी सामान्यरूप निघालें असें बीम्स[1] मानतो. गौड भाषांतून तें आलें अशी होर्न्लेंची[2] उपपत्ति आहे. डॉ॰ भांडारकरांच्या[3] मतें सामान्यरूपाचें मूळ षष्ठी विभक्तींत आहे. प्रो॰ ब्लोकच्या[4] मतें तें षष्ठी-चतुर्थींत आहे. डॉ॰ कात्रे[5] यांनीं ब्लोकचाच अनुवाद केला आहे. प्रा॰ कुळकर्णी[6] ब्लोकचें मत खोडून सामान्यरूप हें सार्वनामिक बीजांपासून निष्पन्न करूं पाहतात. राजवाडे[7] एक तर ज्ञानेश्वरी-मराठींत सामान्यरूपच मानत नाहींत; आणि वर्तमान-मराठींतील सामान्य-रूपाची उपपत्ति ते ज्ञानेश्वरी-मराठींतलि विभक्तिरूपांवरून लावतात.

मतामतांच्या या गलबल्यांत प्रो॰ ब्लोक, डॉ॰ भांडारकर व राजवाडे यांच्या विधानांत व उपपत्तींत पुष्कळ सत्य दिसतें. ब्लोक आणि भांडारकर यांच्या मतांत पुष्कळ साम्य आहे. राजवाडे मात्र कोणत्याहि एका विभक्ती-पासून सामान्यरूप न मानतां तें ज्ञानेश्वरी-मराठींतलि अनेक विभक्तिरूपांवरून मानतात. मला वाटतें, हीं दोन मतें वाटतात तितकीं तीं विरोधी नाहींत. दोहींचा समन्वय करून माझ्या मतें सामान्यरूपाची–यादव-कालीन सामान्यरूपाची उपपत्ति अशी—

१ एकविधता
\+
२ षष्ठीचें अधिष्ठान
} = सामान्यरूप

१ "Oblique is not derived from any one special case but it results from a fusion of all cases".
Beames : Comp. Grammar, Vol. II, pp. 210

२ Grammar of Gaudian Languages.

३ Wilson Philological Lectures, pp. 239-244

४ La Langue Marathe. pp. 179-183

४ L'indo Aryen, pp.156-161

५ Formation of Konkani, (B, O. R. I. Vol. xx, pp. 29)

६ मराठी भाषा, उद्गम-विकास, पा॰ ३४२

७ ज्ञानेश्वरीचें व्याकरण, पा॰ ७१-७२.

एकविधतेच्या नादानें व षष्ठी या सर्वगामी विभक्तीच्या साहायानें यादव-मराठींतच सामान्यरूप बनलें या माझ्या विधानास पुढीलप्रमाणें पुरावा देतों—

एकविधता:—भाषेचा कल विविधतेकडून एकविधतेकडे असतो हें तत्त्व सर्वमान्य आहे. यादव-मराठी ही संपूर्णतः एकविध नसली तरी एकविधतेच्या मार्गावर होती हें निश्चित. अपभ्रंशकालींच अनुकरणानें विभक्त्या एकविध होत होत्या. प्रथमा आणि द्वितीया या प्राकृतांत भिन्न आहेत, परंतु अपभ्रंशांत त्यांचीं रूपें सारखींच होतात. चतुर्थी, पंचमी आणि षष्ठी यांचीं रूपेंहि अपभ्रंशांत सारखींच होत. पुढें "सावयधम्मदोहा"[१] मधून उदाहरणें देतों—

एकवचन :

"सायरगयहिं समिलहिं"	(चतुर्थी)	सा० दोहा,		२
"सुक्खफल आयसहु"	(पंचमी)	सा० दोहा,		५७
"दोषहिं रहिउ"	(पंचमी)	"	"	५
"गोत्तहु जसधन हाणि"	(षष्ठी)	"	"	४८

अनेकवचन :

"जेण चोरहं अतियउ"	(चतुर्थी)	"	"	८४
"जेण अपत्तहं धणु दिण्ण"	(चतुर्थी)	"	"	८४
"सव्वहं गुणहं णरु मुच्चइ"	(पंचमी)	"	"	४४
"संकाइयदोसहं रहिउ"	(पंचमी)	"	"	१९
"आयहं अट्टहं अंतरि"	(षष्ठी)	"	"	२२
"चोरी बहुयकिलेसहं खाणि"	(षष्ठी)	"	"	४८

म्हणजे चतुर्थी, पंचमी व षष्ठी तिहींचीं रूपें एकवचनीं 'हि–हु' कारान्त व अनेकवचनीं 'हं' कारान्त आहेत. उच्चारप्रक्रियेच्या ओघांत अपभ्रंशकालीं जसे या तीन विभक्त्यांचे प्रत्यय एकरूप झाले होते, तसाच प्रकार यादव-मराठींतहि झाला. प्रथमा व द्वितीया यांचीं रूपें अपभ्रंशाप्रमाणें येथेंहि सारखींच आहेत. चतुर्थी, पंचमी व षष्ठी यांचीं प्रत्ययी-विभक्तिरूपें वर्णप्रक्रियेनें सारखींच भासत.

१ संपा०, प्रा० हिरालाल जैन.

सं० पुत्राय > प्रा० पुत्ताय > अप० पुत्ताअ > म० पूता (च०)
सं० पुत्रात् > प्रा० पुत्ताउ > अप० पुत्ताहँ > म० पूता (पं०)
सं० पुत्रस्य > प्रा० पुत्तस्स > अप० पुत्तह > म० पूता (ष०)

पुढें ज्ञानेश्वरींतील चतुर्थी-षष्ठीचीं रूपें ससंदर्भ देतों—

" तो संबंधु सांघों **दिठी** । दीसे तैसा । "॥ ज्ञा० १८–५० (चतुर्थी)
" हे आदिपुरुषाची माया । ब्रह्मेयाही नैयेचि **आया** । " ज्ञा० १-२०३ (चतुर्थी)
" **नयेंकां** भलेतैसी थोरी । परि गंगा...सागरीं । " ज्ञा० १७–३२२ (षष्ठी)

रात्रि आणि **दिवसा । कनका** आणि **कापुसा ।**
" पाडु कां जैसा । तैसाचि हा ॥ " ज्ञा० १३–१०९६ (षष्ठी)

यादव-मराठीने हा एकविधतेचा चाळा चतुर्थी, पंचमी व षष्ठी यांच्यापुरताच केला असें नव्हे. अकारान्त पुल्लिंगी नामाच्या तृतीयेच्या अनेकवचनावरहि त्याचा परिणाम झाला. तृतीयेचें एकवचनी ' एं ' व अनेकवचनी ' ईं ' हे प्रत्यय वर्णप्रक्रियेला धरून आहेत. पण त्याशिवाय वर्णप्रक्रियेच्या नियमांनीं सिद्ध न होणारा असा ' आँ ' प्रत्यय यादव-मराठी अकारान्त नामाला दोहीं वचनांत लाविते. जसें—

" कृतकार्यां, भाटां, सर्वज्ञां, भक्तां "—पु०

पुल्लिंगाच्या अनुकरणानें ईकारान्त स्त्रीलिंगी नामालाहि तृतीयेंत हा ' आँ ' प्रत्यय लागतो. जसें––

" भुंगां, बुद्धींआं, परीयां "––स्त्री०

हा ' आँ ' प्रत्यय पुल्लिंगी नामाच्या चतुर्थी, पंचमी, षष्ठी यांच्या अनेकवचनी रूपांवरून मराठीनें केवळ अनुकरणानें केला आहे.

चतुर्थी अ० व० – पूतां
पंचमी अ० व० – पूतां
षष्ठी अ० व० – पूतां
अर्थात्—तृतीया अ० व० – आँ

पुढें, तृतीयेचेंहि आकारान्त सामान्यरूप झालें तें या आँ प्रत्ययावरून झालें (पहा, क्रमांक ५)

---

१ राजवाडे प्रतींत ' न यों कां ' असा पाठ आहे, तो अशुद्ध असावा.

एतावता, एकविधता, एका विभक्तीनें केलेलें दुसरीचें अनुकरण, हेंच सामान्यरूपाच्या मुळाशीं आहे. एकविधतेच्या नादानें विभक्तिरूपें सारखीं झाल्यावर, अर्थव्यक्तीकरितां शब्दयोगी अव्ययें वापरांत येऊं लागलीं व साहजिकच तीं या एकविध विभक्तिरूपांना लावण्याचा प्रघात पडला. राजवाड्यांनीं विभक्तिरूपांपासून केलेलें सामान्यरूपाचें व्युत्पादन येथवर खरें आहे.

षष्ठीचें अधिष्ठान :—मात्र वर वर्णिलेली एकविधता ही स्वतंत्र नाहीं. तिला षष्ठी विभक्तीचें अधिष्ठान आहे. संस्कृतांत सुद्धां षष्ठी ही एक सर्वगामी विभक्ति होती. "शेषे षष्ठी" हें सूत्र प्रसिद्धच आहे. प्राकृतांत चतुर्थीचें काम षष्ठीच करी. अपभ्रंशकालीं तर द्वितीया व तृतीया यांचा भाव क्वचित्, आणि चतुर्थी व पंचमी यांचा भाव नित्य, षष्ठीच दाखवी. 'णायकुमारचरिउ' मधून दाखले देतों—[1]

द्वितीया : "आयहु वणकरिंदु **कणयउरहो**।" (कनकपुरस्य) ३–१५–१३
"**सव्वहं** पाडमि जमदंडघाउ।" (सर्वाणाम्) ४–९–२

तृतीया : "मणु **मणहो** मिलिउ करु**करहो** मिलिउ" (मनसः करस्य) १–१८–९

चतुर्थी : "धीयउ **कंदप्पहो** दिण्ठउ।" (कंदर्पस्य) ३–७–१६
"कहियं **णरणाहहो**।" (नरनाथस्य) ३–१३–२
"सव्वंगु णविउ **परमेसरासु**।" (परमेश्वरस्य) ४–१३–९

पंचमी : "जलहितरंग णाइ **गिरिरायहो**।" (गिरिराजस्य) ३–१६–८
"**पंथहो** णोसरियउ" (पंथस्य) ४–१३–६
"**केलासहो** होंतउ।" (कैलासस्य) ३–१५–१३

तात्पर्य, अपभ्रंशकालीं षष्ठी ही विभक्ति द्वितीयेपासून षष्ठीपर्यंतच्या विभक्तींचे अर्थ व्यक्त करतांना दिसते. म्हणजेच, षष्ठीला तेव्हां सामान्य-विभक्तीचें स्वरूप प्राप्त झालें होतें. अपभ्रंशांतील या सामान्यविभक्तीवरून, म्हणजे षष्ठीवरून, मराठींतील सामान्यरूप निघालें. भाषेंत प्रातिपदिक व

---

१ संपादक : प्रा० हिरालाल जैन

प्रत्यय हीं एकमेकांस जोडण्यास षष्ठीसारखी दुसरी विभक्ति नाहीं. कारण, षष्ठी ही मुळांतच विशेषणात्मक विभक्ति आहे. अर्थात्, सामान्यरूपानें तिचाच आधार घेतल्यास नवल नाहीं. यादव-मराठींत ही षष्ठी चतुर्थी-पंचमीचें काम करिते हें वर पाहिलेंच आहे. इत्यर्थ असा, कीं एका षष्ठीचें रूप अनेक विभक्तींत योजूं लागले. हीं सारखवट असणारीं विविध रूपें एकविध होत गेलीं व कालांतरानें त्यांस सामान्यरूपाचें स्वरूप प्राप्त झालें. नियमानें बोलावयाचें तर, एका षष्ठीपासून अनुकरणानें अनेक रूपें बनलीं व त्या सर्वांचें शेवटीं एक सामान्यरूप झालें.

षष्ठी = चतुर्थी, पंचमी, षष्ठी (क्वचित् द्वि० तृ०)=सामान्यरूप. हेंच संकेतानें—

एक > > अनेक > > एक

असें मांडतां येईल.

यादव-मराठींत शब्दयोगी पुरतेंच सामान्यरूप आहे व तें सुद्धां नियमानें नव्हे, हें मीं प्रथमच स्पष्ट केलें आहे. हीं सामान्यरूपें पांच प्रकारांनीं सिद्ध झालेलीं आढळतात. ते असे —

एकवचन-	आ	अनेकवचन-	आं
,,	ई	,,	ई
,,	ई	,,	आं
,,	ऊ	,,	ऊं
,,	ए	,,	आं

या प्रकारांची सविस्तर चर्चा प्रा० कुलकर्णी व डॉ० भांडारकर यांनीं केली आहेच. अनेकवचनांतील अनुस्वाराविषयीं मागें लिहिलें आहे.

(पहा भाग २, क्र० २२)

§ २५ शब्दसाधित विभक्ति

यादव-मराठींतील नामविभक्तींचें हें तिसरें आणि परिणत स्वरूप आहे. प्रत्ययी विभक्तिरूपांचा एकमेकांशीं घोंटाळा होऊं लागला तेव्हां स्वतंत्र

---

१ चिं० वि० वैद्य, "निबंध आणि भाषणें", पान १२८

२ "मराठी भाषा—उद्गम विकास", पान ३४०

३ डॉ० भांडारकर : "वु० फि० लेक्चर्स", पान २३४–२४४

शब्दांपासून साधलेलीं प्रत्ययात्मक शब्दयोगी अव्ययें निघालीं व त्यांच्याहि द्वारां संपूर्ण अर्थव्यक्ति होईना म्हणून शुद्ध शब्दयोगींच्या साहाय्यानें विभक्तिरूपें बनूं लागलीं. भाषेचें हें परिणत असें सामासिक स्वरूप होयें. राजवाड्यांच्या मतें कोणत्याहि शब्दयोगी अव्ययाच्या मागें प्रथमा, पंचमी व सप्तमी या विभक्त्यांचीं रूपें येत नाहींत. हें म्हणणें यथार्थ नाहीं. प्रथमे-पासून सप्तमीपर्यंत साती विभक्तिरूपें शब्दयोगींशीं निगडित आहेत. पुढें प्रत्येक विभक्तीचीं शब्दयोगी अव्ययें ससंदर्भ देतों—

प्रथमा[1]:—

१ **वांचौनि** (वृज् धातूचें अव्ययी भूत कृदंत –"राजवाडे धातुकोश"[2])

"तुं सांतव राओ वांचौनि आणिक : कवण राखैल।"–उद्ध० १०३

"पुण आवघेंचि जालें चोरमोळे : नरदेहवांचौनि।"–उद्ध० २४७

"हा परमेश्वरु एकु वांचुणियां : कवण रक्षता असे।"–उद्ध० ४१२

"कव्हणी सुक्षेत्र नाहीं ऐसें। तें वांचौनिया।"–ऋ० ९९

"तूं एकुवांचौनिया आनु नाहीं अवधारी।"–ध० पू० ८

"तो तुझें वाक्य वांचूनि। न जींपे आणिकें।"–ज्ञा० २-६४

क्वचित् हें नामाच्या पूर्वीहि येतें. जसें—

"वांचूनि कर्मारंभ उचित। न करितां सिद्धवत।"–ज्ञा० ३-४५

२ **वेन्हीं** (< का० वरि)

"दीप घरोघरीं : असति कोडि संख्यावेन्हीं।"–उद्ध० २९७

"भणाल हेंचि वेन्ही नेणता : तरि मागिलेसि अन्वयो कथा।"ऋ० ६१२

"हां गा हा ठावोवेन्हीं मौन्यचि।"–स्मृ० २०

"तिया बीळवेन्हीं दृष्टीचें राखण घातलें।"–स्मृ० १०५

"आणि अपयश तें न वचैल : कल्पांतुवेन्हीं।"–ज्ञा० २-२०१

"निवडूनि कीजे सेना लक्षवरि।"–ज्ञा० ७-११

---

१ J. Bloch: La Langue Marathe, 195-207

२ राजवाडे, ज्ञानेश्वरीचें व्याकरण, पा० १८

तृतीयेच्या आणि षष्ठीच्या 'वरि' हून हें 'वेऱ्हीं' भिन्न आहे. प्रा॰ कुलकर्णी समजतात त्याप्रमाणें हीं सर्व रूपें सप्तम्यर्थक नसून त्या त्या विभक्तीच्या विशिष्टार्थीं योजिलीं जातात.

३ **पर्यंत** (सं॰)

"तें देहपर्यंत नमस्करीलें।"–स्मृ॰ ८

"तें कव्हणाइ जीवां क्षेणुपरियंत अनुकरवेना।"

–लीला॰ ३, पान ५९

४ **सहित** (सं॰)

हें सदा तृतीयेशीं युक्त असतें; परंतु क्वचित् प्रथमेशीं योग आढळतो। उदा॰

"तैं नित्ययागसहितें। सृजिलीं भूतें समस्तें।"–ज्ञा॰ ३–८६

द्वितीया:— द्वितीयेचीं प्रत्ययी रूपें जशीं प्रथमेसारखीं झालीं तशींच-सामासिक रूपेंहि झालीं. अर्थात् प्रथमेचीं शब्दयोगी अव्ययें द्वितीयेलाहि लागतात. उदा॰

"अहर्निसीं माझें रूपडें : वांचौनि डोळेयां आन नावडे।"

–उद्ध॰ ८००

तृतीया:—

१ **विण** (< अप॰ विणु < सं॰ विना)

"तुवांविण श्रीरंगा : विजयश्री गेली भंगा।"–उद्ध॰ ९५

"आगा मुखमेलेविण। पीलेयाचें पोखण।"–ज्ञा॰ १३–१४०

हें शब्दयोगी नामाच्या पूर्वींहि येतें. उदा॰

"चाले विण पाउलीं : कर्मांचिये वर्तेंवरि।"–उद्ध॰ ६०५

२ **हीन** (सं॰ विहीनें)

"जैसी भातारें हीन वनिता। उपहति पावे सर्वथा।"–ज्ञा॰ २–१९९

३ **सहित** (सं॰)

---

१ कृ॰ पां॰ कुलकर्णी, "मराठी भाषा" पान ३४०

२ राजवाडे, कुलकर्णी, बीम्स यांपैकीं कोणीहि याचा उल्लेख करीत नाहींत. डॉडेरेट् मात्र करितो.

"श्रीयेसहित रथीं आरूढ श्रीचक्रधर।"–ध० उ०, १
"वऱ्हाडीयांसहित वर पातला मंडपाचीया द्वारा।"–ध०उ० २७
"तो कपोता : सहित कांता : अरणीं होता।"–उद्ध० ३०६

४ **सरिस** (< सं० सदृश)
"एकादशेंसीं सरिसीं : भाजुनि साहित्य देशी।"–उद्ध० ८२६
"शिराजाळें सरिसा : गुंफौनि अस्थींचा पाशा।"–उद्ध० ७५९

५ **सवें** (सं० समम्)
"भक्त आंगवळेसवें रथीं आरूढले गोवींदराणा।"–ध० पू० ७२
"तो आघवियाचि भूमिका। सवें चाले।"–ज्ञा० १८-१०३७

६ **वांचौनि**—हें सदा प्रथमेशीं युक्त असतें. परंतु क्वचित् तृतीया आणि षष्ठी यांचाहि योग होतो. तृतीयेचें उदाहरण पहा–
"परि मोक्ष तो माझेनि ज्ञानें : वांचौनि नाहीं।"–उद्ध० ६४१

७ **करूनि** (< प्रा० करिऊण < सं० कृत्वा)
"कोंभैजे केतकी दळ : मेघींकरूनि।"–उद्ध० १८
"चंद्राचां रश्मीकरूनि सीळापाषाण निवति।"–दृ० ९
"चाटसीएकरूनि मळी वेगळी करी।"—दृ० ६७
"तेहीं (सर्पु) काठीएकरूनि कूपावरि घातला।"–लीला० ३, पा० ३७
"लोक सायासें करूनि बहुतें। कां वेचीति आपुलीं जीवितें।" ज्ञा० २–२०९
"परमेश्वरु आपुलेया कृपाशक्तिकरूनि अविद्याछेद करीति।" –च० सि० सूत्रें २९

८ **करवीं** ('कृ' चें प्रयोजक)
"ऐसें बोलौनि गोपाळें : यादवांकरविं पालानविलें।"–उद्ध० ५७
"तरि या हरिकरवि म्हणवूं।"–स्मृ० १२१
"आपुलीए राणिएकरवि पूसविलें।"—लीला० १–५
"गोसावीया करवि करू कैसा लाववीला।" लीला० १–६८

९ **वरि** (...?)
"तेथ बाणवरि धनुर्धर। वरिषताति निरंतर।"—ज्ञा० १–१६६

"धुधुवातें कुठारेवेन्हीं : बानभुजांचीं करौनि कांडौरीं।"
—शि० ४५५

"एक दीस कवळीयावरि बाहीरि घाली।"—ह० ९०

"गोसावी द्वारावतिएसि खराटेवरि बीदी झाडीती।" लीळा० १-२

"दूध आणिलें : बोळेवरि पाजिलें।"—स्मृ० २

ही करणार्थे तृतीया होय.

चतुर्थी :—

१ **लागीं-लागौनि**—यादव-मराठींत 'ला' हें प्रत्ययात्मक शब्दयोगी नाहीं. त्याचें मूळचें स्वतंत्र शब्दयोगी 'लागीं-लागौनिया' हें आहे. संस्कृतांतील 'लग्' धातूचें हें भूतकृदन्त होय. लागीं ही लाग (...सं० लग्न) ची सप्तमी होय.

"ळावेयालागी"—नागांव शिला०

"हिताहित जाणावें। हिताचि लागी।"—ज्ञा० ८-२३७

"हा येणें मानें महंतु। वरि आम्हालागी कृपावंतु।"—ज्ञा० २-४४

"जेआंलागी उदासु : जोंजार प्रसवलासि बहुवसु।"—ऋ० १९०

"जैसी ओरसें धेनु : हुंबरुत ये वच्छालागौनि।"—ऋ० १५७

"तेवि तूं जगदंबिके : मजलागौनि।"—ऋ० २८०

"तयांसि स्नानालागौनि पाणी सारिलें होतें।"—लीळा० १.२७

क्वचित् 'लग' हें व्ययी कृदन्त (< सं० लग्न) नामापुढें जोडून विशेषण साधलें जातें. पहा—

"वारेलगें पाखिरूं"—ज्ञा० १३-३१४

२ **कारणें** (सं०)

"या कारणें राया : वायू गुरु केला मियां।"—उद्ध० २.७९

"जें आर्तांसि कारणें : संसारश्रमाचें विसंवणें।"—ऋ० ४४

"हें इतुकें उचिष्ट रंभायेकारणें ठेवि।"—स्मृ० १६२

३ **प्रति** (सं०)

"इयप्रति गोपाळु ऐसें केंवि आलें तुमचिया मना।"—धः० पू० ५

"पेणेंप्रति एकूएकें नीरोपेंसीं एकूएकातें पाठवीति ।" –लीळा० १–७
"तैसें जेयाचें मन । मानुष (षा ?) प्रति आनान ।" –ज्ञा० १३-३५६

४ **साठीं** (< सं० स्यार्थें; ... गजवाडे : < सं० सार्धम्)

"एवढी कुळाचळाची आटि : काढिजे जयासाटिं ।"–उद्ध० ५१२
"दूध मागितलेया साटीं ... वाटी करूनि ठेविली ।" ज्ञा० १०–१७
"येतुलिया साटिं निश्चंतु । नास्तिकु होय ।"—ज्ञा० १३–७६३

५ **दोषें** (< सं० उद्देश...... ?)

"सौरभ्यें गिवसावेआ दोषें : गर्भ सुमनाचा ।" ऋ० १४४
"जें असौनि त्रिशंकु दोसें । धात्रेयाही आणावें वोसें :"
–ज्ञा० १८–१७६६

६ **पासीं–पासाव** (< सं० पार्श्वे)

"कीं नाभिमंडळापासाव : रोमराजीची बरव ।" –ऋ० ५७६
"परि तेयांपासिं पांडवा । मी हारतला गिवसावा ।" ज्ञा० ९–२०७

७ **स्तव** (सं०) हें बहुधा पंचमीशीं युक्त असतें; क्वचित् चतुर्थीशीं आहे.

"मन मोडे : स्नेह विघडे
"तें मैत्र माघौतें न घडे : धात्रेयास्तव ।" –उद्ध० ७४७

पंचमी :—

१ **तवं** (< सं० स्तव)

"अन्नातव भूतें । प्ररोहो पावति समस्तें ।" –ज्ञा० ३–१३४
"शाखातव देखा । पल्लव पानें ।" –ज्ञा० १०-९७
"सोमकांता गळति थेंबटें : चंद्रकरांतव ।"–उद्ध० १७
"तरि आकाश कां भिन्न नव्हे : परमाणुतव ।"–उद्ध० ५८०
"तयासि गोसावीयापासौनि स्थिति : तयातवं देवभाव ।" लीळा० १-१२

'तवं' आणि 'स्तव' हीं अनुक्रमें तद्भव व तत्सम रूपें आहेत. त्यांचा अर्थ एकच. प्रो० ब्लोकें 'तवं' हें संस्कृत तावत् पासून

---

१ J. Bloch. La 'Langue Marathe' 203–4

व्युत्पादितात, तें बरोबर नाहीं. महानुभाव ग्रंथांतील आणि ज्ञानेश्वरींतील 'तवं' एकच होय, व दोघांची व्युत्पत्तिहि तीच.

२ **लागीं–लागौनि** (< सं० लग्)

"जो मुंगियेलागौनि ब्रह्मावेऱ्हीं। नीयमीतु असे।"–ज्ञा० १०-२७२

"जो मशकालागौनि ब्रह्मावेऱ्हीं। ग्रासी तो मीं।"–ज्ञा० १०-२५०

"अन्यथा ज्ञानालागीं : वरि घालिजे पतंगीं।"–उद्ध० ३४०

३ **पसि** (< सं० पार्श्व ...?)

"साधनापसि साध्य उत्तम।"–दृ० ६९

"कर्मचांडाळापासि जातचांडाळ चांग।"–दृ० ४८

"तया प्रेमाचा महुरु : शांभवसुखापसि मधुरू"–उद्ध० ७९५

"गृहस्मरणापसि झाडातळिं मनोरथ आठविसि तें निकें।"–स्मृ० ३३

४ **पासाव** (< सं० पार्श्वात्)

"आतां ऐसेसेयां अपराधां। मर्यादा नाहिं मुकुंदा।
म्हणौनि रक्ष प्रमादा। प (पा?) साओ म्हणवीं।"–ज्ञा० ११-५६४

"वज्रापासाव कठीणु : मज दैवहताचें अंतःकरणु।"–ऋ० २२१

५ **पासौनि–पाउनि** (< 'पार्श्व' याची पंचमी)

"चंद्रापासौनि निववितें। अमृताहूनि जीववितें।" ज्ञा० ९-२४

"तीअें बरवीं ओष्ठपूटें : बिंबफलांपासौनि।" –शि० ४११

"लाभापासुनि लाभ।"—दृ० ३९

"तैं कुंतिएसि भेटी जाली। तंवं पाऊन दुपहारीं भरली।" शि० ६१२

६ **होउनि–हौनि**–(< सं० भूत्वा)

'औनि, ऊनि' या पंचमीच्या प्रत्ययापासून हें शब्दयोगी भिन्न आहे. प्रत्ययाची परंपरा औनि < अप० होहुं < प्रा० हिंतो, सुंतो < सं० तस् अशी आहे. 'होऊन' हें शब्दयोगी—

---

१ नागांव शिलालेख, इ० स० १३६७.

सं० भूत्वा > प्रा० होत्तूण > म० होऊन

अशा परंपरेनें आलें आहे व तें पंचमीशीं युक्त होतें. बीम्सनें या दोहोंत घोंटाळा केला आहे. वास्तविक हें शब्दयोगी प्रत्ययापासून स्वतंत्र असून तसें तें स्वच्छ दिसतें. पहा—

"पाताळा होंनि निम्न । जियें उंचियें सानें गगन ।"–ज्ञा० १६–३२९

"वारेआं पासौनि वेगाडे : पर्वता हैनि दळवाडे ।" –शि० ९३४

"गाइची तृषा हरूं । व्याघ्रा विष होउनि मारुं ।" –ज्ञा० १२-१४६

या शेवटल्या उदाहरणावरून भूत कृदन्ताचें शब्दयोगी कसें होत होतें तें ध्यानांत येईल. तसेंच त्यांतील 'हो' धातूचा अवशेषहि येथें दिसेल. कोंकणींतहि[3] 'होउनु' व 'ठाउनु' (सं० स्था) अशीं पंचमीचीं शब्दयोगी आहेत.

७ यांखेरीज डॉडेरेट[4] '**सौनि**' हं आणखी एक पंचमीचें शब्दयोगी मानतो. वास्तविक तें तसें नाहीं. डॉडेरेट् पुढील उदाहरण देतो—

"तैसा संतोषाचा काई घडिला । कां **सिद्धभांडारौनि** हान काढिला ।
दीसे तेणें मानें रूढला । साधकदशे ॥"–ज्ञा० ६–४६२ (राजवाडे)

म्हणजे राजवाडे प्रतींत सैनि असा पाठ नसून औनि असा नेहमींचाच आहे. डॉडेरेटच्या मतें राजवाडे प्रतींत 'सैनि' असा पाठ नसला तरी ज्ञानेश्वरीच्या इतर नऊ प्रतींत तो आहे. तेव्हां केवळ संख्येला भुलून डॉडेरेट 'सैनि' हाच पाठ मानतो. वास्तविक संख्या हें येथें प्रमाण नव्हे. फार तर ती नऊ नकलकारांची चूक म्हणतां येईल. डॉडेरेट् एतत्संबंधीं आणखी

---

१ Beames: Comparative Grammar, pp. 233

२ J. Bloch:La Langue Marathe, 203

३ Father Stephens : Konkani Grammar 523 (vide S. M. Katre Formation of Konkani, B. O. R. I. Vol. xx part 1 pp. 37)

४ W. Doderet : Grammar of Jnyaneshvari. B. S. O. S. Vol. IV

एक प्रमाण म्हणून देतो. त्याच्या मतें ज्ञानेश्वरींतील 'सिन-सिनानी' हीं विशेषणें 'सैनि'च्या मुळाशीं आहेत. उदा०

"तेचि श्रद्धा तामसी। सिनानी नाहीं।"–ज्ञा० १७-७०

"हो कां पाणियां जवली। परि सिनी तोचि बावुली।"–ज्ञा० १८-२७०

येथें 'सिन-सिनानी' यांचा अर्थ 'भिन्न, वेगळीं' असा असून त्याचा डॉडेरेट्मानित 'सैनि'शीं अर्थाअर्थीहि संबंध नाहीं. गांवढळांच्या बोलींतील 'तिथून्शेन्, करूनशान्' यांतील 'शेन्-शान्'शीं वरील 'सिना'चें साम्य डॉडेरेट् दाखवितो. परंतु या सर्व कल्पनाच होत. महानुभाव ग्रंथांत व शिलालेखांत हा 'सैनि' प्रत्यय आढळत नाहीं. ज्ञानेश्वरीच्या इतर प्रतींत तो आहे, परंतु राजवाडे प्रतींत नाहीं. इतर प्रतींतहि एकंदर साधारण ९००० ओव्यांत तो एकुलता एकच आढळतो. तात्पर्य, मूळ 'सैनि' असें रूपच नाहीं. आहेत ते सारे 'औनि'चे अपपाठ आहेत. अर्थात्, मूळांतच अस्तित्वांत नसणाऱ्या या 'सैनि'ची परंपरा व संबंध शोधण्यांत अर्थ नाहीं.

षष्ठी :—

१ **वरि** (< सं० उपरि)

"तो कैवल्यनाथु चरणचारिया : पदें ठेवि जेआं वरियां।" ऋ० १२१

"एकु अडखळौनि पडति : मढआंवरि।"–शि० १०५८

२ **सकट** (< सं० सकृत्...?)

"तेणें संग्रहें होए नाशु : देहा सकट।"–उद्ध० ३६८

"तो जाळी सर्वांगें : मुळांसकट।"–उद्ध० ६०९

"तें सर्वांगु जालें काळें नीळें : नखांसकट।"–शि० ८२३

३ **समोर** (< सं० सन्मुखर)

"तो माझेआं घाआं समरू : कहीं नोहें।"–शि० ८९२

४ **परौता** (< सं० परतस्)

"सृष्टीपरौता जिआ : सौरसु होए बोलावेआ।"–ऋ० १४

"कीं जाति वेव्हारा परौता : जेया परिकर्म संकळितां।"–ऋ० ६५

"या परते पाप नाहीं।"–उद्ध० ४०५

"तेया परौता अंधकारु।"–उषा० १५७९

५ **वांचौनिया**

"राखता नाहीं भवारी : तुजवांचौनिया।"–ऋ० १९५

"प्रस्तुत आतां गुणीं इहीं।तुज वांचौनि आनु नाहीं।"-ज्ञा० ९-४१

६ **वारिया** (< सं० वृ)=ऐवजीं

"तुझीया वारिया मज : नाचों नये।"–उद्ध०२४२

सप्तमीः—

१ **आंतु** (< सं० अंतर्)

"सर्वेचि खुरखुरितु पडे : नरकाग्नि आंतु।"–उद्ध० ३६३

"हाचि प्रस्नु पूर्वीं अर्जुनें केला : जुझां आंतु।"–उद्ध० ६९४

"गाडेयाचीये चाकारीयेआंतु पडिली असे।"–स्मृ० १४६

"आंबांतु घाली : खीरीआंतु घाली।"–दृ० ६४

हें नामापूर्वींहि येतें. पहा—

"तो ही पडे आंतु संसाराचेया अगडा : संगास्तव।"–उद्ध० १९०

क्वचित् आंतुल वापरलें जातें—

"पाणियांतुल गुंडा...।"–दृ०२७

२ **भीतरीं** (< सं० अभ्यंतरम्)

"तैसे पदांचेया पदरां : भीतरि भाव डोळां दीसती।"–उद्ध० २९

"तया भीतरीं कवणु होए : तो गोसावीं सांघावा।"–उद्ध० ६२९

"तो विरहाग्नी खरा : म्हणौनि हृदयमुसे भीतरां।"–ऋ० ६२४

३ **माजि–मध्यें** (< सं० मध्ये)

"लपौनि राहिला माजिवास्थारा : जंघद्वइं।"–ऋ० ५६५

"मी दैवेंहीन माजिसकळिकां ...।"–स्मृ० १६५

"जघन जानूचिया संधी : मध्यें कुंठलिया बुधी।"–ऋ० ५६३

४ **माझारीं** (< सं० मध्यगृहम्)

"तेथचेया ब्राह्मणांमाझारि : नांव लुब्धपाणी।"–उद्ध० ७१८

"तिहीं लोकांमाझारी याचेनि रूपें-गुणें क्षेत्री नाहीं।"–ध० पू० ४२

"जालें येक पेणें माझारी सोरटि।"–मा० रु० स्व० २३

"पैं ध्यातां आपणपेंचि परी। ध्यानरूपें वृत्ती माझारि।"
ज्ञा० १८-१०२७

येथवर साती विभक्त्यांना लागणारीं शब्दयोगी पाहिलीं. यादव-मराठींत शब्दयोगी-प्रकरणीं पुढील विशेष आढळतात—

(१) शब्दयोगी लागण्यापूर्वी बहुतेक ठिकाणीं प्रातिपदिकाचें सामान्य-रूप होतें. परंतु होतेंच असा नियम सांगतां येणार नाहीं. उदा० 'हेंचि वेन्हि'–ऋ० ६१३, 'कोंडिवेन्हि' ज्ञा० ७, 'लेंकरुवें वांचौनि' उ० ३२७वगैरे रूपांत सामान्यरूप नाहीं. 'वांचौनि' आणि 'वेन्हीं' हीं सामान्यरूप न घेणारीं विशेष शब्दयोगी दिसतात.

(२) क्वचित्, शब्दयोगी हें नामाप्रमाणेंच अव्ययाला व कृदंतांनाहि लागे. जसें—

"तंवंचिवेन्ही"–ऋ०११८
"तंवंपर्यंत"–दृ० ७५
"नावेकवेन्हीं"–शि० ७०७
"वीन बैसौनि"–शि० ५७५

(३) 'वेन्ही' हें शब्दयोगी एकूण तीन अर्थांनीं वापरलें जातें. पैकीं प्रथमेशीं युक्त असणारें मुळांत द्राविडी असून तृतीयेचें व षष्ठीचें आर्योद्भव आहे. याखेरीज, 'वेन्ही' या शब्दयोगीचे पुढील अर्थ पहा—

"पात्रवेन्हीं पाणि आणिति।"–लीला० ३ पान ३५ (=पात्र भरून)
"जो देसावरि खांडें काढूनि जाये।"–स्मृ०१९५ (=देशांतराला)

(४) 'वेन्ही' प्रमाणेंच 'वांचौनि, पासाव' हीं शब्दयोगी अनेक विभक्त्यांशीं युक्त आहेत.

(५) क्वचित् कोठें प्रत्ययात्मक शब्दयोगी व शुद्ध शब्दयोगी हीं जोडीनें वापरलेलीं आहेत. प्रत्ययी नामविभक्ति आणि सामासिक नामविभक्ति यांमधील टप्पे कळण्यास अशा जोड्यांचा उपयोग फार आहे. पहा—

"जे काळासि वरि वज्रांगी...।"–ऋ० २१६
"तुतेनि करूनि माती फेडी। इळेनि करूनि गवत घेऊं बैसला।" दृ० ५४

§ २६ सर्वनामें

नामांपेक्षां सर्वनामांनींच प्रत्ययी विभक्ति अधिक जागृत ठेवलेली दिसते. तसेंच, रूपांची विविधताहि येथें नामांपेक्षां जास्त आहे. पुढें

सर्वनामांचीं प्रत्ययी व प्रत्ययात्मक शब्दयोगींनीं सिद्ध होणारीं रूपें देतों. शुद्ध शब्दयोगी सहजसिद्ध आहेत. तीं नामांप्रमाणेंच सर्वनामांनाहि लागत असल्यानें निराळीं देण्याचें प्रयोजन नाहीं.

पुरुषवाचक सर्वनामें

प्रथमपुरुष :—

	एकवचन	अनेकवचन
प्र०	मीं (< अप० हउं < सं० अहम्)	आम्हीं (< अप० अम्हे, अम्हइं)
द्वि०	,,	आम्हाँ
तृ०	मिआ, मिआं, मियां, मासीं (< अप० मइं < सं०मया)	आम्हीं (< अप० अम्हेहिं)
च०	मज, मसीं, मजसीं, मासी, माते (< अप० महु)	आम्हां, आमुतें, आमसीं, आमुसीं
पं०	मजहुनि (< अप० महु, मज्झु)	आम्हांहुनि (< अप० अम्हहं)
षं०	मज (< अप० < सं० मह्यम्)	आम्हां (< अप० अम्हहं)
स०	मीं (< अप० मइं)	आम्हीं–आम्हांतु (< अप० आम्हासु)

द्वितीयपुरुष :—

	एकवचन	अनेकवचन
प्र०	तूं (< अप० तुहुं, तुमं)	तुम्हीं (< अप० तुम्हे, तुम्हइं)[2]
द्वि०	,, ,, ,,	,, ,,
तृ०	तुआं–वाँ (< अप० तइं, पइं)	तुम्हीं (< अप० तुम्हेहिं)
च०	तुज, तुजें, तुसीं, तूंतें (< अप० तुहुं)	तुम्हां, तुम्हांइं, तुमतें, तुम्हांसि
पं०	तुजहुनि (< अप० तउ, तुज्झ)	तुम्हांहुनि (< अप० तुम्हहं)

१ संस्कृतांत 'मह्यम्' हें कधीं षष्ठ्यर्थीं वापरलें जातें, उदा०
" यथा तेन पिता मह्यं पूर्वं दग्धो विषाग्निना "।
—महाभारत (क्रिटि० प्रत) १–४७–५

२ अपभ्रंश-रूपें हेमचंद्र-व्याकरणांतून घेतलीं आहेत.

ष०	तुज (< अप० तउ, तुज्झ)	तुम्हां (< अप० तुम्हहं)
स०	तूं (< अप० तइं)	तुम्हीं (< अप० तुम्हासु)

तृतीयपुरुष...एकवचन...

	पुल्लिंगी	नपुंसकलिंगी	स्त्रीलिंगी
प्र०	तो (< अप० सो)	तें	तें, त्यें, तीयें, ती (<अप०सा)
द्वि०	तो (< अप० तं)	,,	,, ,, ,,
तृ०	तेणें, तेया, तिं, तेणेंसिं (< अप० तेण, तें, ताइं)	पु० प्रमाणें	तिआं, तिया, तीए, त्या, तीं, तियांसिं (< अप० तीए, ताइं)
च०	तेया–आ, तेआतें, त्यातें तेहा–सि (< अप० तहो)	,, ,, ,, ,,	तिअें, तिये–य, तीतें, तीसी तीयेतें (< अप० तहे, ताह)
पं०	तीए	तयाही	
ष०	तेआ, तेया–हा (< अप० तहो, तासु)	पु० प्रमाणें	तीये (< अप० तहे, ताह)
स०	तिए, तैं (< अप० तहिं)	तिअें–यें	ते, तिअें, तीये, तीयां, तीं (< अप० तिहिं)

अनेकवचन—

	पुल्लिंगी	नपुंसकलिंगी	स्त्रीलिंगी
प्र०	ते (< अप० ते, ताइ)	तियें, तें, त्यें	तिया, तेया, ते
द्वि०	,, ,,	तिअें	,, ,,
तृ०	तेहीं, तिहीं, तेयां तिहींसिं (< अप० तेहिं)	तिहीं, तिहींशीं	तिहिं–सिं
च०	तेआं–यां, तेहांसिं–तें	पु० प्रमाणें	तियांसिं–तें
पं०	,, ,,	,, ,,	,, ,,
ष०	तेयां–आं–हां (< अप० ताहं)	,, ,, ,, ,,	तियां
स०	तेयां	तीं	तिआं–यां

यादव-मराठीनें प्रथमेचें एकवचन प्राकृत-अपभ्रंशांतील सामान्य विभक्तीवरून घेतलें.

दर्शक सर्वनामें :–

१ सं० एतत् > प्रा० एय, ऐअ > अप० ऍय > म० ए
२ सं० इदम् > प्रा० ईम > अप० आँय > म० इ
३ सं० अदस् > प्रा० अंमु > अप० ओइँ > म० इ

या तिहींचा परस्परांशीं घोंटाळा होऊन यादव-मराठींतील दर्शक-सर्वनामें सिद्ध झालीं. त्यांचीं रूपें पुढें देतों :–

एकवचन—

	पुल्लिंगी	नपुंसकलिंगी	स्त्रीलिंगी
प्र०	हा	एं, हें	हे, ए
द्वि०	,,	,, ,,	,, ,,
तृ०	एणें–सिं, यया, इया, या	यां	इआं, एया, यया–सिं
च०	यया–सि, या, इया एया, येया	......	इय–ये–सीं, इयेसी–ते
पं०	एयाहुनि	...	...
ष०	यया, इया, एया, या	या	ए, एया
स०	एं, इयें, ययां, यांतु, ये, एहीं, इहिं	हें, इं, इहिं	इएं, यें, इया

अनेकवचन—

	पुल्लिंगी	नपुंसकलिंगी	स्त्रीलिंगी
प्र०	हे, ए	यें, एं, इयें, हें, हीं	या, इया, एया
द्वि०	,, ,,	... ...	...
तृ०	एहीं–सीं, येहीं, इहिं	इहिं	इहीं–सीं, यां–सिं, एहिं
च०	याहांसि–ते, एयां	...	इयां–सि–ते, यां
पं०	येयांहुनि	...	...
ष०	एयां, इयां, यां, इं		एआं–यां
स०	यां, एहीं	एं, यें, येहीं, इयां	इयां, यां

१ हेमचंद्र : प्राकृत व्याकरण, ८–३–७० ते ८६
२ हेमचंद्र : प्राकृत व्याकरण, ४–३६२, ३६४, ३६५

संबंधी सर्वनाम

ज (जो, जी, जें) < अप० ज < प्रा० ज < सं० यत्

हें सर्वनाम तत् > म० त प्रमाणेंच चालतें. उदा०

पुल्लिंग : जो–जे, जेणें–जेहीं, जेआं–ते, जेआं, जिअें

नपुंसक० : जें–जिएं, " " " " "

स्त्रीलिंग : जे–जिआ, जिआ–जेहीं, जिआं

प्रश्नार्थी सर्वनाम

१ कांइ, कें < अप० क < प्रा० क < सं० किम्

याचीं रूपें : "कांइ, कें, काह्या, काह्याचेनि" अशीं आढळतात. तीं अपभ्रंशांतील "कोइ, काहं, को, कहु, कहो, कहिं" या रूपांवरून सिद्ध होतात.

२ कवण < अप० कवणु < ?

याचीं 'कवण, कव्हण, कोण्ह' अशीं रूपें सांपडतात. व्युत्पत्तिसंबंधीं पंडितांत मतभेद आहेत. होर्न्ले[1] अपभ्रंशांतील 'केवडुं' पासून, पिशेल[2] 'कु' या अल्पार्थी प्रत्ययापासून व प्रा० कृ० पां० कुलकर्णी[3] संस्कृत 'कःचन' पासून हें सर्वनाम व्युत्पादितात. 'कः पुनर्' ही उपपत्ति प्रसिद्धच आहे. परंतु अशा कोणत्याहि एका संस्कृत शब्दावरून 'कवण' हें रूप साधणें बरोबर नाहीं. 'कः पुनर्' हें कवण या अर्थी संस्कृतांत वापरण्यांत नाहीं. तें तसें असतें, तर हेमचंद्र

"अपभ्रंशे किमः स्थाने काइं कवण इत्यादेशौ वा भवतः।" (४,३६७)

एवढेंच म्हणून थांबता ना. एकाच 'किम्' ची 'काइं' व 'कवण' अशीं दोन रूपें तो अपभ्रंशांत मानतो. तेव्हां, माझ्या मतें कवणची उपपत्ति अशी—

---

१ Hoernle : Gaudian Grammar, pp. 219

२ Pischel : Prakrit Grammatika, 428

३ मराठी भाषा, उद्गम विकास पा० ३४८

सं० किम् > प्रा० किणो[१] (पंचमीचें रूप) > अप० कवणु.
तात्पर्य, 'कवण' हें सर्वनाम महाराष्ट्री-प्राकृतांतील 'क'च्या पंचमीच्या 'किणो' या रूपावरून निघालें. याचीं 'कव्हण, कव्हणी, कव्हणें' अशीं तीन लिंगी रूपें होतात.

यादव-मराठींत 'कवण' या सर्वनामाला नेहमींच्या प्रश्नार्थाहून भिन्न असा 'कोणताहि' हा अर्थ आहे. पहा—

"सृष्टीमध्यें **कव्हणें** करणें मुचिजेना... ।"–चक्र० सि० सूत्रें १
"न मनितां भेदाचें दळवाडें: **कव्हणी** वेहारु न घडे ।"
–उद्ध० ५७६
"काळु कहीं **कव्हणी** दीशे: प्रतिबिंबला नाहीं । उद्ध० ५८१
"**कव्हणीं** सुक्षेत्र नाहीं ऐसें: जेथ फीटे भवपाशें।"–ऋद्धि० ९९
"मग ते म्हणे हें **कव्हणाचेनिहीं** न बुझावें ।"–दृ० ९८

म्हणजे रूढ प्रश्नार्थी व विशेष नकारार्थी अशा दोन अर्थांनीं 'कवण' हें सर्वनाम वापरलें जातें. इतर आर्य भाषांतहि असाच प्रकार आहे.

आत्मवाचक सर्वनाम

१ सं० आत्मन् > १ प्रा० अप्प० > अप० अप्पा > म० आपुँ
> २ प्रा० अप्पणो (षष्ठी) > अप० अप्पणउ > म० आपण

म्हणजे एकाच आत्मन्‌पासून प्राकृत प्रातिपादिक 'अप्प' याच्या द्वारा 'आपु' व प्राकृतांतील षष्ठी 'अप्पणो' याच्या द्वारा 'आपण' अशीं दोन आत्मवाचक सर्वनामें यादव-मराठींत आलीं. 'आपण' मधील 'पण' हा अनुनासिकयुक्त षष्ठी विभक्तीचा अवशेष आहे. एकाच 'किम्' पासून जशीं 'कांइ' व 'कव्हण' हीं सर्वनामें येतात, तसाच प्रकार येथेंहि आहे. पैकीं प्रा० कुलकर्ण्यांच्यां मतें 'आपु' हें स्वतंत्रपणें न येतां 'आपोआप,

१ Hemchandra : Prakrit Grammar, 3–68
२ J. Bloch : L'indo-aryen, pp. 202
३ हेमचंद्र, २–५१; वररुचि, ५–४५
४ मराठी भाषा–उद्गम विकास, पान ३४६

आपसुख' अशा शब्दांत येतें. परंतु क्वचित् कोठें 'आपु' चा स्वतंत्र वापरहि आढळला. उदा०

"तेणें सवंतारेंनि करीं। **आपु** विश्व।"–ज्ञा० ७–१३२

"मनहि चंचल वादुकें : नव्हेंचि **आपु**"–ऋ० ३४१

'आपण' मात्र सरसहा वापरांत आहे. त्याचीं रूपें—

"आपण, आपणयां, आपणेयां, आपणयाहुनि, आपणेंआं" (वर्तमान मराठींत 'आमच' आणि 'आपल' यांतील भेद स्पष्ट आहे. आमच (सं० अस्मत्) यांत ज्याशीं बोलावयाचें त्याचा समावेश होत नाहीं व आपल (सं० आत्मन्) यांत होतो. परंतु आत्मवाचक व पुरुषवाचक सर्वनामांत यादव-मराठी क्वचित् घोंटाळा करते. उदा०

"म्हणौनि गूढपण आपुलें मोडों। वरि न बोलणेंहि बोलावें घडों।
परि **आमचिये** जीविचें पडो। तूझां जीविं॥"–ज्ञा० ९–३७

येथें 'आमचिये' हा वापर यथार्थ आहे. परंतु,

"किंबहुना सहसा : **आपुला** स्नेहो नाहीं तैसा
उद्धवदेवा मज कां जैसा : तुं पढियेसि।"–उद्ध० ८०६

येथें मात्र 'आमचा' हा अर्थ अभिप्रेत असून 'आपुला' वापरलें आहे)

२ सं० स्वतस् > म० स्वताँ, स्वतः–हें बहुधा आपणशीं जोडून येतें.

संकीर्ण सर्वनामें

१ एर–येर (< सं० इतर) : एरूं, एरां, एरीं, एरांसि–ते, एरें
२ सर्व (< सं० सर्व) : सर्व, सर्वे, सर्वां–सि–ते
३ सकल (< सं० सकल) : सकल, सकलै, सकलां
४ कित (< सं० कियत्) : कितां दीसां (सप्त०)
५ आणिक (<अप० अण्णेक < सं० अन्यएक) : आणिक–की–कें

हें सर्वनाम 'दुसरें, निराळें' या अर्थी नित्य आढळतें—

"**आणिकी** घागरीं भरूनि आणिलें : तेंही रांजणिं घातलें।"
–स्मृ० १८५

"ना तरि सांडौनि **आणिकी** धुरां : चातकु ए मेघांचेया द्वारा।"—उद्ध० ७२३

"कीं तो **आणिकींते** न साहे।" —ऋ० १९

"मग **आणिकी** भांडांचा **आणिकी** भांडां घाली।"-द० ६७

६ इखित (< सं० ईषत्)—लीला० ३-२७

७ भलत (?) : भलतेया, भलतेणें, भलतयां

८ आनान (< सं० अन्य + अन्य) : "ऐसें भूतप्रति आनान"-ज्ञा० ७-३८

संयुक्त सर्वनामें

यादव-मराठींत दोन सम वा विषम सर्वनामांचे संयोग होऊन त्यांना विशिष्ट अर्थ प्राप्त होतात. अशा जोड्या अपभ्रंशांतहि आढळतात. पुढें कांहीं रूपें व त्यांचे विशिष्ट अर्थ देतों—

"तो **कांइएकी** वाचा वाणी : प्राकृत मी।"-ऋ० ३८९

"तवं तेथ **एकेएकु** (= सर्व) लोकु वेधला।"-स्मृ० १२०

"**एकमेकेंसीं**, एकमेकांते" (< प्रा० एकमेक्कं—हेमचंद्र ३१)

"मग **एरएर** (= दोघेहि) गोसावीयांचेया दर्शना आले।"-ली० १-४६

"ऐसें **एरु** पुसे **एरु** पुसे।" (= प्रत्येक) -लीला० १-१२

"**एरीकडीचां ऐरीकडी** घातली।" (= इकडून तिकडे)-लीला० १-४३

"**येरयेरांचां** बोलना प्रहरु येकुपर्यंत—।" (= एकमेकांच्या)-स्मृ० २२८

"**एकाधा एकु** उबगला म्हणे।" (= एखाद दुसरा)-द० ५७

"**एकैकु**, एकाकी"-उद्ध० ६९, शि० १०७८

"**केतुलेयां एकां**, जेतुलेयां एकां।"

"जेयातें प्रमाणें नेणती : **तेणें तुवां** घेतली।" (= त्या तूं)-शि० ८०

सार्वनामिक विशेषणें

१ ऐस, जैस, तैस कैस (सं० एतादृश > प्रा० एआरिस > अप० एआइस > म० ऐस)

२ एतुल, जेतुल, तेतुल, केतुल ('केतुलेआं एकां काळां'—ली० ३) (< प्रा० एत्तिअ, जित्तिअ... + 'ल' स्वार्थे)

३ एतुक, जेतुक, तेतुक, केतुक ('तेतुकां सवे'—दृ० ९४) (< प्रा० एत्तिअ + 'क' स्वार्थे)

४ एवढ, जेवढ, तेवढ, केवढ (सं० एतावत् > प्रा० एआवड > म० एवंढ)

५ एउत, जेउत, तेउत, केउत

६ एसण, जेसण, तेसण, केसण ('विश्वायेसनें'–उद्ध० ६०१; तूं 'येसना'–स्मृ० ११५

७ अनारिस (< प्रा० अण्णारिस < सं० अन्यादृश)

८ जेतुल जेतुला, तेतुल तेतुला (= जेव्हढा–तेव्हढा) – दृ० १४

९ एसणाळ, जेसणाल, तसणाल वगैरे ('ल' स्वार्थे. जसें, 'एसणालीं फळें'–लीला० ३–३४)

१० आपुल, आपुलाल, आपणाल (= आपापल), आपैसें, आपणवें. जसें, "आपणालेआं पैजा"—शि० ९१०

वरील सर्व सर्वनामांचीं चान्त रूपें होतात व त्यांस शब्दयोगीहि लागतात. बहुधा शब्दयोगी लागण्याच्या पूर्वी सर्वनामाचें सामान्यरूप होतें. परंतु क्वचित् अविकृत प्रातिपदिकालाहि शब्दयोगी लागल्याचीं उदाहरणें आढळतात. पहा—

जेहूनि (लीला० ३–३४), तूं वांचौनि, तो वांचौनि (वच्छ० ४९), तीचा (ऋ० १९१)

---

१ "MIA केवढ्ढ"—J. Bloch: L'indo aryen, pp. 203

§ २७ संख्यावाचक सर्वनामें

(यांचीं सामासिक रूपें कंसांत देत आहें)

एकु < अप० एक्क < प्रा० एक्क-एग्ग < सं० एक
(सामासिक : एकैक, एकमेक)

दोनि < अप० दुअ, बे, बिण्णि < प्रा० दोण्णि < सं० द्वि
(दुपहारी, दुपटें, दुफोडी, दुटी, दुणी, दोनिच्यारि)

तिन्हीं < अप० तइ, तिण्णि < प्रा० तिण्णि < सं० त्रीणि
(तिधार, तिवटना, तीथरी)

चारी < अप० चत्तारि < प्रा० चत्तारि < सं० चत्वारिं
(चौदंत, चौमेरीं, चौकी, चौतोंडा, चौवारी, चौपुटी, चहुंमती, चौहातु, चौपाइ)

पांच-पांचै < अप० पंच < प्रा० पंच < सं० पंचन्
(पांचपुडें, पांचवटें)

सहा, सा, साहै < अप० छह < प्रा० छा < सं० षष्
(षदुऊर्मी)

सांत-सांतै < अप० सत्त < प्रा० सत्त < सं० सप्तन्

आठ-आठै < अप० अट्ठ < प्रा० अट्ठ < सं० अष्टन्

नऊ-नव-नौ < अप० णव < प्रा० नव < सं० नवन्

दहा-दा < अप० प्रा० < दह < सं० दशन्

अकरा < अप० एग्गारह < प्रा० एआरह < सं० एकादश
(राजवाडे 'अकरा' ची व्युत्पत्ति एकों ठिकाणीं पुढीलप्रमाणें मानतात-पूर्ववैदिक—'एकअपरदशन्' > एआअरदशन् > एआरह > अकरा. त्यांच्या मतें यांत 'र' ची उपपत्ति नीट लागते. परंतु, पुराव्याच्या अभावीं ही व्युत्पत्ति मान्य नाहीं.)

---

१ "O is due to palatalization in the sk. form 'dvan'"
—S. M. Katre (B. O. R. I. Vol. xx. part 1)

२ भा० इ० सं० मं० वार्षिक, खिस्ताब्द १९१३

सर्व संख्या देण्याचें कारण नाहीं. राजवाडे[1] यांनीं समग्र याद दिली आहेच. पुढें फक्त वरील संख्यांचीं कांहीं विभक्तिरूपें देतों—

प्र० एकु–एके (पु०), एकी (स्त्री), दोणी, दो, दोघदोघी, तीं, तिघै, चौघचौघी (स्त्री०), पांचै, सातै, आठै.

तृ० एकें, दोघाइं, दोघीं, तिहीं, चहूं, नवीं, दाहें.

स० एकीं, दों, तिहीं, चौं, पांचां, सातां, नवां, दाहां.

वरील संख्यांत व त्यांच्या रूपांत पुढील विशेष दिसतात—

(१) यादव-मराठींत एक, दोनि, तीनि, चारी, या चार संख्यांचीं व्ययी विशेषणें होत व तीं तिहीं लिंगीं चालत. मात्र असें होतांना एकाला 'ल' आणि इतरांना 'घ' स्वार्थें लागे. जसें, एकल–ला–ली, दोघ, तिघ, चौघ.
(सं० ग्रह–द्विग्रह > अप० घह > म० घ.........?)

(२) सं० एकादश > प्रा० एआरह > अप० एग्गारह > म० अकरा. या परंपरेंत संस्कृत–प्राकृतांतील विशिष्ट 'ए' मराठीनें सोडला व त्याजागीं 'अ' असा आदेश केला. कोंकणीनें मात्र जुन्या 'ए' ला जवळ असणारा 'इ' कायम ठेविला आहे. (जसें, कों० इकरा)[2]

(३) मराठी 'दोनि' या शुद्ध संख्येंत संस्कृतांतील मूळचा 'द' कायम आहे. सामासिक संख्येंत मात्र तो 'ब' होतो.

जसें–सं० द्वादश > प्रा० अप० बारह > म० बारा
सं० द्वाविंशति > प्रा० बावीसइ > म० बावीस

क्रमवाचकामध्येंहि हाच प्रकार होतो.

सं० द्वितीय > अप० बीयउ–दूयउ > म० बीज

(४) 'नवा' च्या संयुक्त संख्या 'एकोन' या संस्कृतांतील प्रयोगापासून सिद्ध होतात. जसें—

---

१ ज्ञानेश्वरीचें व्याकरण, पा० ६३–६९.

२ S. M. Katre : Formation of Konkani (B. O. R. I. Vol. xx part I.)

सं० एकोनविंशति > प्रा० एओणवीसइ > म० एकोणीस
गुज० ओगणीस

(५) १००० ही संख्या संस्कृत 'सहस्रा'नें व्यक्त होते. फारशी 'हजार' या शब्दाचा संपर्क यादव-मराठीला अगदीं नाहीं.

(६) क्वचित् **'सत्तीस'** (३६) असें रूप आढळतें. जसें—

"अभीनव सत्तीस दृष्टी : तरि सर्वांगें घेउनि आटी।"-उद्ध० ४५२

सं० षट्त्रिंशत् > प्रा० छठतीसइं > म० छ–सत्तीस

म्हणजे प्राकृत–अपभ्रंशांतील 'छ'चा 'स' येथें विकल्पानें होतो. मंगलोरच्या आणि गोंव्याच्या किरिस्तांवांच्या कोंकणी बोलींत अनुक्रमें 'सोत्तीस' व 'शेतीस' अशीं रूपें होतात. तात्पर्य, 'छ–स'चा विकल्प वर्तमान मराठी-विसरली, परंतु किरिस्तांवांच्या कोंकणींत तो जागा आहे.

क्रमवाचक

पहिल–वहिल < अप० पहिलउ < प्रा० पढमिळ < सं० प्रथम हें कधीं कांहीं विशेषार्थी वापरलें जातें. उदा०

"तवं मनापासौनि **वहिला** : वारूं पालानिला।"–शि० ५११(= प्रिय)

"मेलिअे वो माअे...**वहिली** गे धाअे : बोलावी।"–शि० ८२९
(= पहिली, प्रथम)

"तऱ्हें झडझडौनि **वहिला** निग। इये भक्तीचिये वाटे लाग।"
–ज्ञा० ९।५११

दुज–दुसर–बीज < अप० दूयउ–बीयउ < प्रा० बिइज्ज < सं० द्वितीय
< अप० प्रा० सर–अँ

तिज–तिसर < अप० तइयउ < प्रा० तिइज्ज < सं० तृतीय
< अप० प्रा० सर–अ (हें रूप आवधी भाषेंतहि आहे)[३]

---

१ H. Narayan Rao : "An Etymological Glossary of Southern Konkani", Part I (1917)

२ "Origin and Development of Bengali", Dr. Chatterji, pp. 700

३ Baburam Saksena : "Evolution of Awadhi"—pp. 156

(एका अति प्राचीन लोकगीतांत ' तिनव्या ' असें रूप येतें. पहा–

" तिनव्या मासीं कंथाला ठाव ।
हळदीकुंकाची लल्लाटीं लेव "—पाळणा[1]

अर्थात्, हें मिथ्यानुकरण होय. " तिसनो " असें रूप क्वचित् कोंकणींत येतें.)

चौथ < अप० चउत्थ–चोत्थ < प्रा० चउत्थ < सं० चतुर्थ

पांचव < अप० प्रा० सं० पंचम

क्वचित्, या क्रमवाचकाचा उपयोग पट दाखविण्याकडे केला आहे. जसें–

" उफाड जोड करीतु : **पांचविअें** धारें वावडतु। " (=पांचपट)
—शि० ५३४

याप्रमाणेंच पुढील रूपें होतात.

अंशवाचक

पाव < प्रा० पाअ < सं० पाद

आड–ध < प्रा० अद्ध < सं० अर्ध (" आधां दातीं "—
ह० ८२)

पाऊण < प्रा० पाओण < सं० पादोन

सवाअ < प्रा० सवाअ < सं० सपाद (" सवाअे दुपहारी "
-शि० ७२२)

दीढ < प्रा० दिअद्ध < सं० द्वि-अर्ध (दीढें, दीढां- सप्तमी)

(प्रो० दिवेटिया सं० अर्धद्वितीय पासून व्युत्पादितात[2])

अढैच < प्रा० अद्धइज्ज < सं० अर्धतृतीय
(" पाहारा अढैचां "–ली० १–७६)

आउठ < प्रा० अद्धुट्ठ < सं० अर्धचतुर्थ (गुज० ऊठ)

attested in MP. XI.

१ म० सा० पत्रिका, वर्ष ६, अंक १

२ " Certain fractional numerals in Gujrati "—
N. B. Divatia, B. O. R. I. Vol. XII

§ २८ विशेषणें

यादवकालीन मराठींत विशेषणें विशेष्यनिघ्न व अविकृत अशीं दोन्ही आहेत. परंतु विशेष्यनिघ्नच फार. विशेष्याचें जें लिंग, वचन, विभक्ति तेंच विशेषणाचें असल्याचीं उदाहरणें पुढें देतों—

"जरि **माझेरें श्रीमंतें** होति: तुम्हां ऐसीं।"–ज्ञा० ९–३
"**सबीजें तृणें** जैसीं : सुलीनें होंति।"–ज्ञा० ९–१००
"भणौनि पूजावेया **पात्रता : बहुता** आति।"–ऋ० ३७४
"सर्वांसी **देवांगें चांगें**।"–धवळे उत्त० २५
"कढती **कढती आंबील**।"–लीलाचरित्र १–२०
"**श्रीगणगाथा देवाचां** राउळीं।"–गोमांतकी ताम्रपट
इ० स० १३००
"झुंझतां रणीं शीणले : **शौरें घांई** मातले।"–शिशु० १०५६
"**सकळीं गोपाळीं** सहीतु।"–वच्छ० ४८७

अशीं अनेक स्थळें आहेत. विशेष्यनिघ्न विशेषणें वापरण्याची ही लकब तत्कालीन मराठींत इतकी मुरली होती, कीं क्वचित् विशेष्य अविकृत राहून जाई व विशेषणालाच प्रत्यय वा शब्दयोगी लागे. याचा अर्थ हाच, कीं विशेषणांचें विशेषणत्व लोपून त्यांना स्वतंत्र प्रातिपदिकांचें स्थान मिळालें होतें. उदा०

"म्हातारी एकीचा पुत।"–लीलाचरित्र ११३५
"ब्राह्मणा एकाचेया घरासि।"–लीलाचरित्र ४०
"तेलिया एकाचेया घरा।"–लीलाचरित्र ११
"मी अवघेयांमध्यें ग्रहोसि मुख्य नाएकु।"–लीलाचरित्र १९
(वरील दोन ठिकाणीं अनुक्रमें चान्त व शब्दयोगी हीं विशेषणाला लावलीं आहेत.)
"एथ होए मर्दना : स्वामी माझेया।"–ऋ० ४६४
"मागिलेसि अन्वयो कथा।"–ऋ० ६१३

१ हा गुण कांहीं प्रमाणांत सर्व इंडोआर्यन भाषांचा दिसतो, पहा—
J. Bloch : L'indo aryen pp. 183–189

यांखेरीज वर्तमान व भूत कृन्दतें हीं विशेषणासारखीं वापरलीं जाऊन विशेष्यांप्रमाणेंच चालतात. अशा विशेषणात्मक धातुसाधितांचा विचार कृदन्तप्रकरणांत केला असल्यानें पुन: येथें करीत नाहीं. अविकृत विशेषणांचींहि उदाहरणें देण्याचें कारण नाहीं. फक्त कांहीं नामसाधित विशेषणें देतों :—

‘ **सेवाळलें** खडक, ’ ‘ **देहलुतैलें** वाळुक ’ (दृष्टान्त पाठ)

‘ **विखारा** सर्पिणी ’ (< सं० विषार:)–वच्छ० ४४९

§ २९ आख्यात विभक्ति

यादव-मराठींतील क्रियापदांच्या प्रत्ययप्रक्रियेचा विचार करण्यापूर्वी तत्कालीन धातूंचे उगम पाहिले पाहिजेत. संस्कृत धातु, प्राकृत धात्वादेश आणि देशी नामधातु यांवरून यादव-कालीन मराठी क्रियापदें बनलीं आहेत. धातुसिद्धीचा हा भाग महत्त्वाचा होय. यास्तव मराठी धातूंचीं भिन्न भिन्न उगमस्थानें पुढें देतों :—

(१) **प्राकृत धात्वादेशाच्या द्वारा** : संस्कृत धातु प्राकृतभाषांत येतांना त्याला आदेश होतात. हीच आदेश-प्रक्रिया पुढें चालवून प्राकृत–अपभ्रंश–मराठी या परंपरेनें धातु सिद्ध होतात. यादव-मराठींत प्राकृत धात्वादेशाचे चार प्रकार आढळतात. ते असेः–

(अ) मूळ संस्कृत धातु व त्याचे आदेश एकाच रूपाचे :

सं०	प्रा०	अप०	मराठी
चलति	चलइ	चल्लइ (कर्मणिद्वारा)	चळणें
खादति	खाअइ	खाअइ	खाणें
चुंबति	चुंबइ	चुंबइ	चुंबणें

येथें धातु तत्सम राहिल्यानें आदेश असा नाहींच.

(आ) आदेशप्रक्रियेच्या नियमानुसार होणारे :—

पीडयति	पीलेइ	पिळेइ	पिळणें
अर्पयति	अप्पेइ	अप्पेइ	ओपणें
खिद्यते	खिज्जइ	खिज्जइ	खिजणें
घटते	घडइ	घडइ	घडणें

१ प्राकृत व्याकरणांतील धात्वादेश : प्र० धों० कानिटकर. (म० सा० पत्रिका, वर्ष २, २)

(इ) मूळ संक्रत धातूच्या गणचिन्हासह आलेले :—

गण	सं०	प्रा०	अप०	मराठी
४	नृत्यति	णच्चइ	णच्चइ	नाचणें
५	विचिनोति	विचिणइ	...	वेंचणें
७	भिनत्ति	भिन्दइ	भिद्दइ	भेदणें
७	छिनत्ति	छिन्दइ	छिद्दइ	छेदणें
९	जानाति	जाणइ	जाणइ	जाणणें
९	गृह्णाति	गेण्हइ	घेण्णइ	घेणें
३	बिभेति	बीहइ	बीहइ	बिहणें (ज्ञा०)

(ई) संस्कृत धातूंशीं यत्किंचित्‌हि संबंध नसलेले आदेश :

कथयति	बोल्लइ	बोल्लइ	बोलणें
भ्रंशते	चुक्कइ	चुक्कइ	चुकणें

यांची चर्चा पुढें आली आहे.

(२) **देशी धातु** : वररुचि आणि हेमचंद्र यांच्या धातुपाठांत जवळ जवळ ४५३ धातु देशी आढळतात. परंतु हे प्राकृत वैयाकरण मात्र त्यांना तसे समजत नाहींत. ते धात्वादेश देतात ते असे :

सं०	प्रा०	मराठी
मज्जति	बुड्डइ	बुडणें
विलपति ?	बडबडइ	बडबडणें
गवेषति	ढंढोल्लइ	ढांढोळणें

वास्तविक या प्राकृत-मराठी धातूंचा संबंध संस्कृत धातूंशीं आदेश-प्रक्रियेच्या नियमानें पोहोंचत नाहीं.[१] या संबंधीं प्रा० कुलकर्णी म्हणतात[२]—

"या आदशांचें शास्त्रशुद्ध स्पष्टीकरण म्हणजे हे संस्कृत धातु निराळे स्वतंत्र व पुढें आदेश म्हणून दिलेले प्राकृत धातु हे निराळे स्वतंत्र आहेत. त्यांचा परस्परांचा कांहीं एक संबंध नाहीं. कांहीं देशी धातु प्राकृतकालीं

१ Dr. Grierson : Prakrit Dhatvades (Memoirs Of Asiatic Society, Bengal, Vol. VIII, 2).

२ "राजवाडे मराठी धातुकोश", प्रस्तावना, पान २२–२३

वापरांत होते. ते कांहीं संस्कृत धातूंशीं समानार्थक असल्यामुळें त्यांचा संबंध प्राकृत वैयाकरणांनीं लावला इतकाच याचा अर्थ आहे."

(३) **वैदिक धातु :** हे वैदिक धातु पाणिनीय धातुपाठांत वा प्राकृत धातुपाठांत नाहींत. मात्र वैदिक वाङ्मयांत ते ज्या अर्थानें वापरले आहेत त्याच अर्थानें त्यांचीं अपभ्रष्ट रूपें यादव-मराठींत दिसतात. पुढें असे कांहीं ज्ञानेश्वरींतील धातु देतों—

ज्ञानेश्वरी	वैदिक
आवांक (१३–४०३)	आ+वच्
गोंगांव (९–१४)	ङ्
उगण (९–४००)	उत्तन्
उफल (१३–५४०)	उत्पल्

नागलोकांच्या वैदिक भाषेचा अपभ्रंश आणि मराठी यांच्यांतील राजवाड्यांनीं दाखविलेल्या संबंधाला हे वैदिक धातु बळकटी आणतात.

(४) **नामधातु :**—यांची सविस्तर चर्चा पुढील भागांत शब्द-सिद्धीच्या प्रकरणीं आली आहे. (पहा–प्रस्तुत प्रबंध– भाग ३, शब्दसिद्धि)

याखेरीज उपसर्गसहित, उपसर्गविरहित, ध्वनिधातु, द्विरुक्त, द्विधातु-संयोग वगैरे अनेक प्रकार मराठी धातूंचे आहेत. परंतु त्यांची चर्चा धातु-पाठाच्या कक्षेंतील असल्यानें येथें करीत नाहीं. शिवाय या विषयाचा सांग व संपूर्ण परिष्कार प्रा० कुलकर्णी यांनीं केलेला आहे.

§ ३० धातूंची प्रत्ययप्रक्रिया

संस्कृतांतील क्लिष्ट व गुंतागुंतीची क्रियापद-प्रक्रिया हळूहळू लोपत जाऊन तिच्या जागीं कृदन्तव्यवस्था प्राकृतांत कशी आली याचें विवेचन प्रस्तावनेंत केलें आहेच. प्रो० ब्लोकनें यांनीं प्राकृत–अपभ्रंश–वर्तमान आर्य भाषा या तिहींतील आख्यातविभक्तीचा विचार विस्तारानें केला आहे व

१ राजवाडे : राधामाधव-विलासचंपू—प्रस्तावना, पान १५८–६०

२ "राजवाडे मराठी धातुकोश" प्रस्तावना

३ J. Bloch : L'indo aryen, pp. 237 ff.

त्याचा उपयोग एतत्प्रकरणीं बराच आहे. हा इतिहास पाहून यादव-मराठींतील क्रियापदांची व्यवस्था खालीलप्रमाणें करावीशी वाटते.

१ प्रत्ययी : Synthetical or Verbal
२ कृदन्तसाधित : Participial or Nominal
३ संयुक्त : Compound

पैकीं प्रत्ययी व कृदन्तसाधित रूपें परंपरागत असून संयुक्त रूपें मात्र मराठीनें सर्वस्वीं नवीन बनविलीं. हीं तीन तऱ्हांचीं रूपें सिद्ध होण्याच्या आधीं मराठींतील धातु पुढील तीन मार्गांनीं प्रत्यय घेण्यास तयार होतात. यांनाच प्रो० ब्लोक[१] Themes ही संज्ञा देतात.

१. **वर्तमान कर्तरि पासून** : हा पहिल्या म्हणजे प्रत्ययी रूपांच्या बाबत वापरला जातो. उदा० बैस, जा, खा, लाह, पाह
२. **वर्तमान कर्तरि कृदन्तावरून** : पाविज, असिज, म्हणिज
३. **भूत कर्मणि कृदन्तावरून** : काढ, धाड, सुक, जिंत, दुभ, < सं० कृष्ट, धृष्ट, शुष्क, जित, दुग्ध

पुढें यादव-मराठींतील प्रत्ययी आख्यातविभक्ति देतों—

§ ३१ वर्तमाने लट्

लट्च्या मराठींतील प्रत्ययांची प्रक्रिया पुढील प्रमाणें :—

एकवचन:

	सं०		प्रा०[२]		अप०[३]		या० मराठी
१	आमि	>	मि	>	उं–मि	>	एं–इं
२	असि	>	सि–से	>	हि–सि	>	असि–इसि
३	अति	>	इ–ए	>	इ	>	ए–इ–ऐ

१ J. Bloch: La Langue Marathe, 225 ff
२ हेमचंद्र : प्राकृत व्याकरण, ३–१३९
३ " " " ४–३८२

अनेकवचन :

	सं०	प्रा०	अप०	या० मराठी
१	आमः	> मो–मु–म	> हुं–मो	> उं–ओं
२	अथ	> इत्था–ह	> हु–ह	> आ–आं
३	अन्ति	> न्ति–न्ते	> हि–न्ति	> अति–इति

यादव-मराठींतील रूपें—

एकवचन :

१ यें, जाय, उठी, बैसे, गाय, वाय, जीणे, आणै

२ फेडिसी, होसि, रीगेसी

३ असे, आथि, नोहे, दे, गणी, उजिडे, पीये, ल्ये

अनेकवचन :

१ नेणों–णौ, जाणौं, स्मरौं

२ हसा, नेणा

३ असेंति, पांती, सूति, सांधैति, भणेंती, देखैंती, नाचेती, ल्हाति, सांधैति, चाखेति

टीका—

(अ) हीं सर्व रूपें अपभ्रंशांतून सहजच सिद्ध होतात. अपभ्रंशांतील[१] कांहीं रूपें पहा—

१ करउं, कहउं, जिणमि, अवयरहुं

२ होसि, जाणहि, हिंडहि

३ कहइ, भमइ, जिणंति, लब्भंति

म्हणजे अपभ्रंशांतील लट्च्या रूपांशीं मराठींतील रूपांचा सांधा नीट जुळतो. "लट्मध्यें मराठीनें अपभ्रंशाला सोडून महाराष्ट्रीचें जास्त अनुकरण केलें आहे,"[२] हें राजवाड्यांचें म्हणणें अयुक्त होय.

(आ) "मानी, धरी, संहारी" या रूपांत 'इ' हा आगम आहे, व

१ णायकुमारचरिउ, प्रस्तावना, पान ५४

२ ज्ञानेश्वरीचें व्याकरण, पान ७७

" भिये, पाहे, जुझ " या रूपांत तो नाहीं. इडागम घेणारे व न घेणारे असा भेद साहजिकच पडतो. परंतु या भेदाचा संस्कृतांतील सेट्–अनिट् या भेदाशीं मुळींच संबंध नाहीं. राजवाडे म्हणतात—

" हा इडागम घेण्याचा, न घेण्याचा किंवा विकल्पानें घेण्याचा गुण मराठीनें महाराष्ट्रीपासून घेतला आहे. "[1]

हें मान्य करूनहि त्यांनीं ' सेट् ' व ' अनिट् ' हीं नांवें धातूंना दिलीं आहेत तीं अयुक्त होत. बीम्स[2] या इडागमाची उपपत्ति संस्कृत प्रयोजक प्रत्यय अय् पासून लावतो, ती समाधानकारक नाहीं. तसेंच राजवाडे मराठींत परस्मैपद व आत्मनेपद हे संस्कृतांतील भेद मानतात. वास्तविक हे भेद [3]प्राकृतांतच लोपले होते. अपभ्रंशांतहि ते नाहींत. अर्थात् मराठींतहि ते नसावेत. राजवाड्यांनीं दिलेलें

" तिये मुकुटीं कुसुमें सुगंधें । शोभते भलीं ।"–ज्ञा० १–१८

यांतील ' शोभते ' हें आत्मनेपदी रूप चिंत्य आहे. शोभती असेंच रूप नित्य आढळतें. ' शोभते ' हें अपवादात्मक होय.

(इ) वर्तमान मराठींत या 'लट्' ला रीतिभूताचा अर्थ येऊन बसला आहे. ज्ञानेश्वरकालीं सुद्धां ' लट् ' हा वर्तमानच दाखवी असें नाहीं. संदर्भानुरोधानें त्याचे वर्तमान, भूत व भविष्य असे तिन्ही काळांचे अर्थ होत. उदा०

वर्तमान : " तूं अनुचिता चित्त **नेदिसि** । धीरु कहिं न **सांडिसि** । "—ज्ञा० २–८

" जेयांचें ज्ञान विषो **नेणे** । जाणिवा मजचि एकातें **जाणे** "
—ज्ञा० ९–४४३

" आम्ही तयांचा तोंडीं कुरंधनें **पीळूं** । "—स्मृ० २

भूत : " मग संजयो **म्हणे** रायातें । "—ज्ञा० २–१

---

१ ज्ञानेश्वरीचें व्याकरण, पान ७७
२ Beames : Comparative Grammar, part III Ch. 2
३ हेमचंद्र : प्राकृत व्याकरण, ३–१३९

"तंव भीमकी **भणे** : पहा वो तंवं याचें बोलणें।"
–शि० २०५

भविष्य : "एथ कौमारत्व **दिसे**। मग तारुण्यें तें **भ्रंशे**।"
–ज्ञा० २–१०९

"एणें करुनि समस्तां। परितोखु होईल देवतां।
मग ते तुम्हां इच्छितां। अर्थातें **देति**।"–ज्ञा० ३–९५

वरील ठिकाणीं रूप लट्चेंच आहे परंतु अर्थ मात्र भिन्न आहेत. प्रो० ब्लोकच्या मतेंहि लट्चा मूळ अर्थ यादव-कालींच डळमळित झाला होता.[१] लट्नें दाखविल्या जाणाऱ्या काळांची ही विविधता, म्हणजे पर्यायानें अनिश्चिति ध्यानांत घेऊन डॉडेरेट त्याला Aorist ही संज्ञा देतो.[२] वर्तमान मराठींतील रीतिभूताला एक वेळ ही संज्ञा लागेल. परंतु यादवकाळीं लट् हा विशेषतः वर्तमानार्थींच वापरला जात असल्यानें त्याला Aorist किंवा Historic Present म्हणण्याऐवजीं 'लट्' म्हणावें हेंच अधिक युक्त. त्याच्या अर्थविकृतीला तेव्हां नुकता आरंभ झाला होता. अद्यापिहि हा लट् मूळ अर्थानें कांहीं म्हणींत दिसतो. उदा०

"फुटलें मोतीं, तुटलें मन, सांधूं न **शके** विधाता।"
"ज्याची **लागे** चाड, तो **उडे** ताडमाड।"

(ई) 'लट्'चे प्रथमपुरुषीं एकवचनी व अनेकवचनी प्रत्यय अनुक्रमें 'एं–इं' आणि 'उं–ओं' असे आहेत. कोंकणींत ते 'आं' आणि 'आउं' असे आहेत. कोंकणींतील हे प्रत्यय अपभ्रंश 'आंमि–आंमो' यांपासून व्युत्पादितां येतात. पंजाबी आणि सिंधीमध्येंहि हा प्रत्यय 'आं' असाच आहे व त्याची परंपराहि अशीच. तेव्हां पंजाबी, सिंधी व कोंकणी यांतील प्रथमपुरुषी प्रत्ययावर प्रथमपुरुषी सर्वनामाचा–'हउं' चा परिणाम झाला असावा. सर्व प्रत्ययांचीं बीजें सार्वनामिक आहेत या विधानाला

१ J. Bloch: La Langue Marathe, 237
२ W. Doderet, B. S. O. S. Vol. IV

वरील उपपत्तीनें बळकटी येते. मराठीनें मात्र या सार्वनामिक बीजावांचूनच अपभ्रंशद्वारा हे प्रत्यय सिद्ध केले. यासंबंधीं लुई ग्रे[1] यांचें विवेचन योग्य आहे.

§ ३२ आज्ञार्थे लोट्

लोट्च्या मराठींतील प्रत्ययांची प्रक्रिया पुढील प्रमाणें :—

एकवचन	सं०	प्रा०	अप०	मराठी
१	आनि	मु	...	उं
२	...	सु, इज्जसु, इज्जे, हि.	अ, इ, उ, ए, सु, हि	एं, इं, ऐ
३	तु	उ	उ	ओ
अनेकवचन				
१	आम	मो	...	...
२	त	ह	हु	आ–आं
३	अन्तु	न्तु	अंतु	ओतु–अतु

यादव–मराठींतील रूपें :

एकवचन : १ ......

२ जाये, खाये, पूस, रींगै, धांवै, देखै, आइकें, देईं, जाणीं, घे, पांहे

३ असो, येवो, यो, हो

अनेकवचन : १ मानों, जावों, देवों,

२ आइकां, परिएसां, देआं, घेया, भुंजा, पाहा–पां

३ सांगतु, होंतु, पाळितु, पांतु

टीका—

(अ) प्रथमपुरुषीं एकवचनी लोट्चीं रूपें आढळत नाहींत. राजवाडे आपल्या ज्ञानेश्वरीच्या व्याकरणांत (पा० ८०) जीं देतात तीं काल्पनिक असावींत. कोंकणींतहि एकवचनी रूपें नाहींत. मात्र मॅफे[3] आपल्या

---

१ Louis H. Gray : Observations on Middle Indian Phonology, B. S. O. S. Vol. VIII

२ S. M. Katre : Formation of Konkani, B. O. R. I. Vol. xx. pp. 161

३ Father Maffei : A Konkani Grammar, 1882

कोंकणीच्या व्याकरणांत तीं देतो. अपभ्रंश-ग्रंथांतहि एकवचनाचीं रूपें दिसत नाहींत. अनेकवचनाचीं विरल आहेत. उदा० "पुंजहं, उथ्थलहं, घल्लहं" (भविसयत्तकहा). 'णायकुमारचरिउ' मध्यें हीं सुद्धां नाहींत. अर्थात् यादव-मराठींत एकवचनी रूपें नाहींत हें बरोबरच आहे.

(आ) लोट्च्या तृतीयपुरुषी एकवचनांत क्वचित् आशीर्लोट् व क्वचित् इच्छार्थ प्रकट होतो. आज्ञार्थाच्या या छटा होत. उदा०

"अनव्रता भूतलीं। **भेटोतु** भूतां ॥"–ज्ञा० १८–१७७५

"ते सर्वांही सदा सज्जन। सोयरे **होंतु** ॥"–ज्ञा० १८–१७७७

"मग कर्मेंद्रियें व्यापारीं। **वर्त्तंतु** सुखें।"–ज्ञा० ३–७६

§ ३३ भूते लङ् (Imperfect)

एकवचन	सं०	प्रा०	अप०	मराठी
	आसम्	आसिं	आसि, अगमं	असें
	आसीः	आसी	आसि	असस
	आसीत्	आसि	आसि	असे
अनेकवचन				
	आस्म	आसीमो–मु	आसि	असों
	आस्थ	...	...	असा–असां
	आसन्	...	...	असत

यादव-मराठींतील रूपें

"पळतु पळतु **पाचारी**: एकें हातें नीरी **धरी**।"–शि० १४३

"एकु वेळु मणिकर्णिकेसीं **असें** जपतु।"–शि० १३८

"आरोगण जालेयांवीण स्त्री **जेवीं** ना।"–ली० १–१५

"यांहांसि तुम्ही अन्न **घालां**।"–वृद्धा० २१

"तैं आम्ही **नसों** ऐसी चित्ता। प्रतीति तुज।"–ज्ञा० ४–४०

टीका:

(अ) यादव-मराठीनें या काळाचीं रूपें महाराष्ट्री–अपभ्रंशद्वाराच, परंतु अधिक प्रमाणावर घेतलीं. वास्तविक प्राकृतांत हा भूतकाळ जवळ जवळ लोपला होता. प्राकृतांत यापेक्षां निष्ठान्तप्रयोगांनीं म्हणजे कृदन्तांनींच

भूतकाळ अधिक व्यक्तविला जाई. हेमचंद्रहि या 'लङ्'ची विशेष चर्चा करीत नाहीं. शिवाय, 'अस्'चीं 'आसि' आणि 'अहेसि' अशीं रूपें 'लङ्'चीं सर्व पुरुषीं, सर्व वचनीं होतात असेंहि हेमचंद्र सांगतो. पहा—

"अस्तेर्धातोस्तेन भूतार्थेन प्रत्ययेन सह आसि अहेसि इत्यादेशौ भवतः। आसि सो तुमं अहं वा। जे आसि। ये आसन्नित्यर्थः। एवं अहेसि ॥" प्राकृत व्याकरण, ३–१६४

अपभ्रंश ग्रंथांतहि 'लङ्'चीं रूपें अति विरल आढळतात. उदा०

"तहु आढत्तु आसि।"—भविसयत्तकहा ९–१४–६

"आसि खलु देवरु तहुं।"—भविसयत्तकहा ७–१०–५

"आसि रिसिहिं वक्खाणियउ।"–णायकुमारचरिउ ६–८–११

'अगमं' असें एक रूप भविसयत्तकहामध्यें येतें. परंतु एकंदरींत अपभ्रंशांत भूतकाळ कृदन्तांनींच व्यक्त होई. यादव-मराठींत मात्र लङ् प्रचारांत दिसतो. अर्थात् लङ्चें स्वरूप अपभ्रंशद्वारा, परंतु वापराचें प्रमाण मात्र स्वतंत्र रीत्या मराठीनें योजिलें.

(आ) लङ् पुढें असतां, संस्कृतांत धातूंच्या मागें जो 'अडागम' होतो, तो मराठींत होत नाहीं. प्राकृतांतहि विकल्पानेंच होई. जसें—

सं० अग्रहीत् > प्रा० गेण्हिअ–अगेण्हिअ > म० घेई

यामुळें लट् व लङ् यांचीं रूपें सारखींच दिसूं लागून 'तो म्हणे' याचा अर्थ म्हणतो व म्हणाला असा द्विविध होऊं लागला.[१] याच कारणानें पुढें हे दोन्ही लकार लोपून त्यांऐवजीं कृदन्तेंच वापरांत आलीं असावींत. रूप एकच परंतु अर्थ दोन ही तऱ्हा भाषेला खपत नाहीं. या रूपसादृश्यामुळें कृष्णशास्त्री गोडबोले, बीम्स आणि होर्न्ले हे 'लङ्'ला 'लट्' मानीत. 'लङ्'चीं रूपें व त्यांची उपपत्ति शोधण्याचें श्रेय सर्वस्वीं राजवाड्यांकडे जातें.

§ ३४ भूते लुङ् (Aorist)

'लुङ्'चीं रूपें प्राकृतांत नाहींत, अपभ्रंशांत नाहींत. अर्थात् यादव-

१ ज्ञानेश्वरीचें व्याकरण, पान ८०–८२

मराठींतहि तीं नसलीं तर नवल नाहीं. राजवाडे मात्र 'होता' हें रूप लुङ्‌चें मानतात. उदा० "तो वैवस्वतु जैं **होता**।"–ज्ञा० तसेंच "मी असे त्यांची **होती** ऐसें जाणवा शारंगपाणी।"–ध० पू० १३ हें रूपहि मग 'लुङ्'चें मानावें लागेल. राजवाडे याची उपपत्ति अशी लावतात—

सं० अभूत् > (अर्धमागधी) होत्था > म० होता.

ही व्युत्पत्ति पांडित्यप्रचुर, परंतु कृत्रिम आहे. एक तर 'लुङ्' सारखा अतिक्लिष्ट प्रकार भाषेच्या सुलभीकरणांत राहणें शक्य नाहीं. दुसरें, तो महाराष्ट्रींत, अपभ्रंशांत नसतांना मराठींतच कोठून येणार? तिसरें, 'होता-होती-होतें' अशीं तिहीं लिंगीं रूपें फिरतात त्याची वाट काय? राजवाड्यांनीं याचें केलेलें समर्थन पुरेसें नाहीं. एतावता 'लुङ्' चा मागमूसहि मराठींत नाहीं हेंच खरें.

§ ३५ भूते लिट् (Perfect)

लुङ् प्रमाणेंच लिट्‌ची अवस्था आहे. 'लिट्' प्राकृत-अपभ्रंशांत नाहीं. यादव-मराठींत अर्थात् नाहींच. राजवाडे मात्र सं० अस् > म० 'आह धातूचें 'आहा' हें रूप 'लिट्'चें मानतात. त्यांनीं दिलेलें उदाहरण :

"तो विश्वासें मारितां रिपु। निवटूनि घातला दर्पु।
आणि जेयाचा **आहा** कंपु। तापसांसि॥"–ज्ञा० १८–१०५१

असेंच एका महानुभाव ग्रंथांतील रूप पहा—

"न लगतां काळाचे पाशे। एकें सदैवु **आहाति** ऐसें।"
–ऋ० ४३३

परंतु हीं रूपें लिट्‌चीं निःसंशय नव्हत. तीं लट्‌चीं–वर्तमानाचीं–अपवादात्मक रूपें आहेत. वरील 'लुङ्' ची चर्चा येथेंहि लागू आहे.

§ ३६ लेट् संकेतार्थे (Conditional)

'वैदिक लेट्' संस्कृतांतच लुप्त झाला. अर्थात् तो प्राकृत–अपभ्रंश–मराठी यांत नाहीं.

§ ३७ विधिलिङ् (Optative)

एकवचन

	सं०	प्रा०	अप०	मराठी
१	ईयम्	इज्ज	...	इजे
२	ईः	इज्ज, इज्जसु	इज्ज, इज्जहि	इजे, इजसु
३	ईत्	इज्ज, इज्जइ	इज्जइ	इजे

अनेकवचन

१	ईम	इज्जम	...	इजे
२	ईत	इज्जह	इज्जहु	इजे
३	ईयुः	इज्ज	इज्जइ	इजे

अपभ्रंशांतील रूपें:—

	एकवचन	अनेकवचन
२	अच्छिज्जहि, करिज्जहि, होज्जहि, सुप्परिज्जहि कासिज्ज	अच्छिज्जहु, करिज्जहु
३	किज्जइ, दिज्जइ (भविसयत्तकहामधील)	भिज्जइ

यादव-मराठींतील रूपें :-

१, २, ३ } पुसिजे, कीजे, दीजे, वाचिजाये, पाडिजाये, लेइजे, खेळिजे, सिंपिजे, होइजे

टीका :

(अ) यादव-मराठींत तिन्ही पुरुषीं व दोन्ही वचनीं एक 'जे'कारान्त रूपच आढळतें. त्याअर्थी 'इज' हा प्रत्यय सर्वत्र आहे यांत शंका नाहीं. संस्कृतांतील विध्यर्थांतील 'य' पासून तो निघाला. परंतु यादव-मराठींतील विधिलिङ्वर संस्कृतांतील कर्मणि 'य' प्रत्ययाचीहि छटा आहे. प्राकृतांतहि धातूचें इजन्त रूप होऊन त्याला वर्तमानाचे प्रत्यय लागून विध्यर्थ बनतो. हेमचंद्राचें पुढील सूत्र पहा—

"सतम्यादेशात् ज्जात्पर इर्वा प्रयोक्तव्य : । भवेत् होज्जइ । होज्ज ॥"
३–१६५

म्हणजे प्राकृतांतहि विध्यर्थी 'य' व कर्मणि 'य' या दोहींचे अवशेष दिसतात. शिवाय तिन्ही पुरुषीं व दोन्ही वचनीं लिङ्ची रूपें सारखींच आहेत, त्याअर्थी त्यांत कर्मणि 'य' चा अंश असलाच पाहिजे. 'लिङ् कर्तरि' व 'लोट् कर्मणि' यांचे अर्थ पुष्कळ जवळ आहेत. एतावता, त्या दोहींचा समन्वय करून यादव-मराठी कर्मणि लिङ्चीं 'जो' कारान्त रूपें बनविते. या रूपांत वास्तविक आज्ञार्थापेक्षां विध्यर्थाचाच भाव अधिक आहे. असें असूनहि राजवाडे[1] त्यांची गणना कर्मणि लोट्मध्यें करितात, तें चिन्त्य होय. यादव-मराठींतील विध्यर्थांत विध्यर्थी 'य' आणि कर्मण्यर्थी 'य' अशीं दोन बीजें कशीं आहेत तें पुढील उदाहरणांवरून दिसेल.

"तोहि वीकुनि **जीजे** : या परतें पाप नाहीं।"–उ० ४०५
"वऱ्हाडें बीजें **कीजो** ... ...।"–ध० पू० ४५
"तेणें म्हणितलें : यैसें सामोरें **येइजो**।"–स्मृ० २०४
"तें **वेचिजो, दीजो, खेळिजो**।"–ली० १–५
"ऐसियापरी **असीजो** गा दे मती।"–दृ० ५४

वरील ठिकाणीं कर्मण्यर्थाप्रमाणेंच विध्यर्थहि स्पष्ट आहे. संस्कृतांतील विध्यर्थ व कर्मणि आज्ञार्थ यांच्या समन्वयानें मराठीनें स्वतंत्र विध्यर्थ सिद्ध केला व साहजिकच त्यांत दोहींचीं बीजें आहेत. तीं एकाच स्वरूपाचीं (य) असल्यामुळें वेगळीं भासत नाहींत, इतकेंच. वास्तविक तीं भिन्न होत. बीम्स व राजवाडे दोघांनींहि विधिलिङ्ची उपपत्ति एकांगी लाविली आहे. वस्तुत : असें दुहेरी निर्वचन केल्याखेरीज गति नाहीं. डॉ० भांडारकरें[2] मात्र विध्यर्थांत कर्मणीचा अंश असल्याचा उल्लेख करितात. परंतु, त्यांचें म्हणणें सुस्पष्ट नसून एकंदरींत गुंतागुंतीचें झालें आहे.

---

१ ज्ञानेश्वरीचें व्याकरण, पान ८७
२ Wilson Philological Lectures, pp. 215–216

§ ३८ भविष्ये लुट् First Future.

हा लुट् प्राकृत-अपभ्रंशांत नाहीं. अर्थात् मराठींत तो नाहींच. राजवाडे तो ज्ञानेश्वरींत भविष्यार्थी व वर्तमान-मराठींत संकेतार्थी आहे असें म्हणतात. हें त्यांचें म्हणणें ऐतिहासिक दृष्ट्या व भाषाशास्त्रदृष्ट्या सर्वस्वीं चुकीचें आहे.

१	सं० तास्मि > म० ताहें	२	सं० तास्मः > म० ताहों
३	सं० तासि > म० ताहासि	४	सं० तास्थ > म० ताहां
५	सं० ता > म० ता	६	सं० तारः > म० ते, तेति

अशी व्युत्पत्ति लावून संस्कृतांतील 'लुट्' पासून मराठींतील हा भविष्यकाळ निघाला असें राजवाडे मानतात. राजवाड्यांचें विवेचन रूपदृष्ट्या व उपपत्तिदृष्ट्या अशास्त्रीय होय. एक तर यादव-मराठींतील हीं रूपें भविष्यकाळाचीं नाहींत, तीं संकेतार्थाचीं आहेत. हा संकेतार्थ मराठी वर्तमान कृदन्ताला 'हो' धातूचीं रूपें जोडून बनविलेला आहे, हें मी पुढें दाखवितोंच. (पहा, क्र० ५२) शिवाय हा लुट् महाराष्ट्री-अपभ्रंशांत नसतांना मराठींतच एकदम कोठून प्रकट झाला? आणि संस्कृत लुट्पासून मराठींतील रूपें निघतीं तर त्यांना लिंगविकार कां होते? या प्रश्नांना राजवाड्यांच्या उपपत्तींत उत्तरें नाहींत. त्यांच्या अनुवाद्यांनींहि वरील शंका न घेतां यादव-मराठींत लुट् होता असेंच मानलें आहे. चिं० वि० वैद्यांनीं राजवाड्यांचें लुट्संबंधींचें विवेचन मान्य करून फक्त "लुट् आहे, परंतु हेतुहेतुमद्भावी आहे" एवढीच टीका त्याजवर केलेली आहे. वास्तविक लुट् हा भविष्यार्थी वा संकेतार्थी कोणत्याच रूपांत मराठींत नाहीं. भाषाशास्त्रदृष्ट्या राजवाड्यांच्या उपपत्तींतील मुख्य अडचण अशी, कीं संस्कृतांत 'कर्तृ' या नामाला 'अस्' चीं रूपें जोडलीं जातात तर मराठींत 'करित' याला 'हो' धातूचीं रूपें जोडलीं जातात. असा फरक कां पडावा?

सं० कर्तास्मि > म० करिताहें

हें रूप कसें सिद्ध होईल? एवंच राजवाड्यांची उपपत्ति इतिहासाला व

१ ज्ञानेश्वराचें व्याकरण, पान ८३–८४

२ निबंध आणि भाषणें, पान १३९

शास्त्राला धरून नसल्यानें त्याज्य होय. या रूपांचा विचार मी पुढें क्र० ५२ मध्यें करीत आहें.

§ ३९ भविष्ये लट् (Second Future)

एकवचन	सं०	प्रा०	अप०	मराठी
१	स्यामि	स्सामि–हामि–हिमि	एसमि	एं–इं–उं
२	स्यसि	हिसि–हिसे	एसहि	असि–इसि
३	स्यति	हिइ–हिए	एसइ	इ
अनेकवचन				
१	स्यामः	स्सामो, हामो	एसमो	ऊं–ऊनि
२	स्यथ	हिह–हित्था	एसह	आ
३	स्यन्ति	हिन्ति–हिन्ते	इहिंति	अति–इति

टीका :—

(अ) लट्चीं रूपें वर्तमान लट्सारखीं दिसतात. तेव्हां राजवाडे म्हणतात त्याप्रमाणें " दोहोंतील भेद दाखविण्याकरितां मराठीनें लट्च्या रूपांना 'ल' स्वार्थे प्रत्यय विकल्पानें लाविला. विकल्पानें लावला म्हणण्याचें कारण कीं, 'ल' प्रत्ययाखेरीज लट्चीं रूपें सांपडतात. शके ११२८ तील पाटण शिलालेखांतील 'उघटे' व 'वाहंति' हीं रूपें 'ल' प्रत्ययाखेरीज 'लट्'चीं आहेत." यादव-मराठींत 'लट्'चीं रूपें खालीलप्रमाणें आढळतात:—

	एकवचन	अनेकवचन
१	असैनु, झोंबेनु, जीवुं, वाणुं, मेळउं, लें, घें, जिणें, भाऊं, सूं, देइल, एइल	करों, गिळौं, रांगौं, यों, लाहों, टाकूनि, जाऊनि, नेंदूं, त्यजौनि
२	देसी, होसी, वांचसी, जीसील, साहासी	कराल, जाणाल, होआल, असा
३	ठाके, घडे, जाये, करी, पडैलु, वसैलु, तुटैलु, सोये, ये, होए	करिती–ल, जाणिती, होतील

१ ज्ञानेश्वरीचें व्याकरण, पान ८५

पैकीं, राजवाडे प्रथमपुरुषीं एकवचनीं 'उं' कारान्त रूपें मानीत नाहींत. पण महानुभावांत तीं अनेक आढळतात.

(आ) प्रथमपुरुषीं अनेकवचनीं 'राहूनि, त्यजौनि, सांघौनि' अशीं रूपें आहेत. तीं भूत कृदन्तांसारखीं वाटतात, परंतु तशीं नाहींत. महानुभाव गद्यांत तर तीं हरघडीं दिसतात. त्यांची उपपत्ति अशी :—उं > ऊन > ऊन + 'इ' (पादपूरक). यांचा उल्लेखहि राजवाडे करीत नाहींत. पुढें या रूपांचीं विविध उदाहरणें देतों—

"आम्हीं पूर्णकाम **होउनि** (=होऊं)। जरि आत्मस्थितीं
राहुनि।"–ज्ञा० ३।१४

"ते वस्तु मज स्वामीं। एकीहेला दिधली तुम्हीं।
हें बोलों म्हणतों तरि आम्हीं। तूं **पाहूनि** कैंचें ॥"–ज्ञा० ११-४८

"तरि **सांघौनि** (=सांघूं) ज्ञान सहज। विज्ञानेंसीं ॥"–ज्ञा० ९-४२

"आम्ही प्रेमाचां कडलगीं : **ठाकौनि** (=ठाकूं) कैवल्यदुर्ग ॥"
–उद्ध० १६५

"त्या आशावांचौनि जीविता : ना तरि **त्यजौनि** (त्यजूं) प्राणांतें ॥"
–स्मृ० ११४

"तयांपासि चला : मां तयांकरवि **सांघउनि**।" (=सांघवूं)
–वृद्धा० १६

"तेहीं म्हणितलें : ना आम्हींचि **बोलाउनि**।" (=बोलावूं)
–ली० १-३०

"आम्हीं (गोरुवें) **बांधौनि** : आम्हीं **दोहौनि**"।—ली० १-४०.

हा 'ऊनि–औनि' प्रत्यय म्हणजे केवळ एक उच्चारप्रक्रिया आहे.

(इ) बीम्स[१] या काळाचें प्रत्ययी स्वरूप केवळ गुजराती व हिंदी भाषांपुरतें मानतो. मराठींत तें नाहीं हें त्याचें मत चूक होय. डॉडेरेटच्या[२] मतानें हा भविष्यकाळ प्रत्ययी नसून सामासिक आहे व लट्च्या रूपांनाच 'ल' प्रत्यय लागून भविष्यार्थ साधला आहे. ब्लोकचें[३] मत कांहीं अंशीं

१ Beames: Comparative Grammar, Vol. III pp. 112
२ B. S. O. S. Vol. IV
३ La Langue Marathe, 240

असेंच असून त्यानें 'ल' ची उपपत्ति 'सं० लाव्–ले' पासून लावण्याचा यत्न केला आहे. चिं० वि० वैद्यांनीं बीम्सच्या मताचाच अनुकार केला आहे. प्रा० कुलकर्णीहि या भविष्यकाळाची उपपत्ति लट्पासूनच लावतात. ते म्हणतात: "जुन्या वर्तमानकाळाला भविष्यकाळाचा अर्थ प्राप्त झाला आहे." हीं सारीं मतें एका बाजूला आणि राजवाड्यांचें दुसऱ्या बाजूला अशी स्थिति आहे. परंतु संख्येनें अधिक असलीं तरी पहिलीं मतें भ्रांत होत. एक तर, ल–सहित व ल–विहीन अशीं दोन्ही रूपें भविष्यकाळाचीं आढळतात. तेव्हां हा 'ल' स्वार्थे होता व तोहि वैकल्पिक होता हें निश्चित. आतां ज्या रूपांत 'ल' नाहीं तीं लट्चीं मानून त्यांना भविष्यार्थ कल्पिणें कांहींना प्राप्त होतें. म्हणजे 'लट्' हा एकच काळ वर्तमान व भविष्य दोन्ही दाखवी असें म्हणावें लागेल. परिणत स्वरूपांत असणाऱ्या यादव-मराठींत हें केवळ अशक्य होय. दुसरें, लट्ची उपपत्ति मानली तर 'सांधौनि' (सांधूं), 'त्यजौनि' (त्यजूं) या प्रथमपुरुषी रूपांची वाट काय लावणार? डॉ० कात्रे भूतकृदन्त 'ऊनि' याची छटा वरील रूपांत असल्याचें सुचवितात. म्हणजे भूताला भविष्याचा अर्थ कल्पावा लागतो. तात्पर्य, वर्तमान, भूत व भविष्य या तीन काळांची भेसळ केल्याखेरीज वरील मतांचें समर्थन होऊं शकत नाहीं. तिसरें, राजवाड्यांचें म्हणणें अपभ्रंशांतील 'लट्'चीं रूपें पाहून अधिकच पटतें. अपभ्रंशकाव्यांत—

	एकवचन	अनेकवचन
१	परिसेणमि	वज्जरिसु–मो
२	पेक्खेसहि, जाएसहि, होसहि	तरेसहं, देसहं
३	कीलेसइ, जणेसइ, लेसह	करिहिंति

अशीं रूपें 'णायकुमारचरिउ' व भविसयत्तकहा' मध्यें आढळतात. म्हणजे मराठींतील 'लट्' ला परंपरा आहे, इतिहास आहे. अपभ्रंशांतील रूपांवरून मराठी रूपें सहज सिद्ध होतात. तात्पर्य 'मराठी लट्' हा संस्कृत–महाराष्ट्री–

१ निबंध आणि भाषणें, पान १३९
२ मराठी भाषा, उद्गम–विकास, पान ३६७
३ Formation Of Konkani, B. O. R. I. Vol. xx pp. 162

अपभ्रंश या परंपरेनेंच निघाला. अपभ्रंशांत ‘ल स्वार्थे’ मुळींच नाहीं. कारण तेव्हां ‘लट्’ चीं रूपें ‘लट्’ हून वेगळीं भासत होतीं. पुढें यादव-मराठींत दोहोंचा घोंटाळा होऊं लागून स्वार्थे ‘ल’ ची आवश्यकता भासूं लागली.

(ई) या स्वार्थे ‘ल’ च्या मागें अनुनासिक आल्यास त्याचा ‘न’ होतो. (ल > न) जसें, हसें+ल = हसैन; हसूं + ल = हसूं=हसौनि. परंतु कांहीं ठिकाणीं मूळ ‘ल’ कायम राहिलेला दिसतो. पहा—

“ हे एइल तरि मी एइल । ” –ली० ३

“ ढीढरें देइल (मी) म्हणे । ” ,, ,,

हे अपवाद होत.

(उ) वर्तमान-मराठींत—

मी करीन = I Shall do. मी काय करीन = What I Shall do.

मी काय करूं = What Shall I do?

असा करूं आणि करीन यांत भेद आहे. प्रथमपुरुषी एकवचनी ‘ऊं’-कारान्त रूपें प्रश्नार्थ दाखवितात. असा भेद यादव-मराठींत नाहीं. ‘करूं’ व ‘करीन’ हींच रूपें दोहीं अर्थी वापरण्यांत येतात. पहा—

“ ऐसेयांतें कैसेनि **मारूं** । कवणावरि शस्त्र **धरूं** ।

निजहृदया **करूं** । भेदु केवि । ”–ज्ञा० १–२२१

येथें प्रश्नार्थ स्पष्ट आहे. परंतु,

“ येसी स्त्री येकि मढाबाहीरि : आतां काइ **करिन** वो :

यैसें पुनः पुनः शब्दीं रडों लागली । ”–स्मृ० २५८

(=आतां काय करूं हो!)

येथेंहि प्रश्नार्थ आहे. परंतु तो स्पष्ट नाहीं. तात्पर्य, ई आणि ऊं या प्रत्ययांत असा घोंटाळा होता.

(ऊ) माडगांवकरी ज्ञानेश्वरींत—

“ आतां तो उदारु कैसा **वरुसैला**। जेणें अर्जुनाचलु निवैल । ”

–ज्ञा० २–७९

असें रूप येतें. तेवढ्यावरून 'डॉडेरेट्' 'वरुसैला' हा भविष्यकाळाचा एक विशेष प्रकार मानतो. वास्तविक हा अपपाठ होय. राजवाडे-प्रतींत—

"आतां तो उदारु कैसा वरुषैल।"

असा बरोबर पाठ आहे. अर्थात् डॉडेरेटच्या या 'खास' भविष्याला आधार नाहीं.

§ ४० हेतुहेतुमद्भावे लङ् (Conditional)

हा लङ् प्राकृत–अपभ्रंशांत नाहीं. अर्थात् यादव-मराठींतहि तो आढळत नाहीं. राजवाडे लङ् मानतात. वस्तुतः तो लङ् नसून साधा लट् भविष्य आहे. वाक्यांतील विशिष्ट वापरानें तो कांहीं ठिकाणीं हेतुहेतुमद्भावी वाटतो, इतकेंच. त्याचा नेहमींचा अर्थ आणि रूपें हीं थेट भविष्यासारखीं आहेत. शिवाय भविष्ये लट्ला यादव-मराठींत संकेतार्थ येऊन राहिलाच होता. तेव्हां आणखी एका लङ्चें कांहींच प्रयोजन नव्हतें. प्राकृत–अपभ्रंशांत तो नाहीं हा पुरावा सबळ होय. तरी राजवाडे ज्याला लङ् मानतात, तो खरा लट्च आहे. चिं० वि० वैद्यांची टीका अशीच आहे.

§ ४१ अकरण रूप

यादव-मराठींत अकरणरूप विविध मार्गांनीं सिद्ध होतें.

(१) '**न**' या अव्ययानें :

नुरवी, नाकळे, न संडी, नैये, नेघे, नेदा, नेदखे, नेदे, नए

(२) '**ना**' या अव्ययानें :

"म्हणौनि भलेतेयाः ज्ञानप्रकाश ना।"–उ० ६२७
"प्रमेय धांडोळितां सृष्टीं : आथीचिना।"–ऋ० १३१
"सांवळेयां लाहाचेनि आंधारें : कांहीं सुजावे ना।"–शि० ५५६
"पोसीस ना तरि मारि गा देवा।"–ली० ३
"तें काइसेनिही बुझावे ना।"–स्मृ० ११२

(३) '**आह**' आणि '**हो**' या धातूंचीं अकरणरूपें मुख्य क्रियापदाशीं जोडून :

---

१ Grammar of Jnyanesvari, B. S. O. S. Vol. IV

न + आह = नाह (नाहीं, नाथि)
न + हो = नहो (नोहे, नव्हे, नहो, नव्हसि, नोहां, नव्है, नोहोंति, नव्हति...)

यांचीं रूपें ज्ञानेश्वरींत पुढीलप्रमाणें आढळतात.

नोहे १८–११४
नाथि १५–५३ ("आणि आथिनाथि तेतुकें।")
नोहोंति ६–३९८ ("परि तैसीं सोनिं बहुतें नोहोंति।")
नव्हैल ३–२२२
नोहावें ३–१६९
नोहिजे २–१९६ वगैरे वगैरे.
नेंघों (भविष्ये० स्मृ० ६४)
नव्हां = व्हो (लट्० स्मृ० २०४)
नोव्हे (लट्. शि० ९२०)

(४) **नको** (<सं० न्यक्–कृ ?)...राजवाडे याची उपपत्ति 'न कर्तव्यम्' पासून लावतात.[१] ती योग्य नसली, तरी अद्यापि हा शब्द बरोबर व्युत्पादिला गेला नाहीं. याचा वापर आज्ञार्थांत द्वितीयपुरुषीं होतो. जसें-

"मुख पांति गावारे। तैसें नका हो।"–ज्ञा० १५–२४३
"नको घेवों।"–स्मृ० ८२
"कव्हणी हांसों नको।"–स्मृ० ९७
"ओझें कांहीं घेवों नोको।"–ली० १-७२
"न पुसत नको या।"–स्मृ० १४५

परंतु आज्ञार्थाकरितां कधीं साधें 'न' वापरलेलें दिसतें. उदा०

"न पळ न जाये।"–ध० उ० ६; 'न म्हण।'–उ० ५७५

(५) '**झणें**' या अव्ययानें :

"परि पार्था हें झणें। सायास घेसि हो मनें।"–ज्ञा० ६–३५
"म्हणोनि अझुइं अर्जुना। झणें चित्त देसी या हीना।"–ज्ञा० २-१७

१ राजवाडे–लेखसंग्रह, भाग २, पान ४२

छत्तीसगडी बोलीच्या व्याकरणांत 'झिन' अव्ययाचा उपयोग वरीलप्रमाणेंच होतो हें पुढें निपात-प्रकरणांत दाखविलें आहे. (पहा, क्र० ५३)

§ ४२ कर्मणि व भावे रूपें

यांची सविस्तर चर्चा पुढील भागांत प्रयोगप्रकरणीं केली आहे. (पहा, भाग ३)

§ ४३ प्रयोजक रूपें (Causals)

यादव-मराठींतील प्रयोजक सिद्ध करण्याच्या खालील रीति होत—

(१) **अव** : सं० आपय > प्रा०[1] अ, ए, आव, आवे, अवि
> अप० आविय, अवि, इवि
> म० अव

जसें—

सं० कारापयति	> प्रा० कारावेइ	> अप० काराविअ–वी	> म० करवी
सं० हारपयति	> प्रा० हारवेइ	> अप० हारिवि	> म० हारवी
सं० उत्स्थापयति	> प्रा० उठ्ठावेइ	> अप० उठिवि–अ	> म० उठवी
सं० रंजयति	> प्रा० रंव्वयह	> अप० रंवइ	> म० रांवी

(ध० उ० १६)

याचीं रूपें पुढील प्रमाणें आढळतात :—

जाणवे, नाचवी, नीववी, होववे, भेटवी, घोकवी, आंगवे........

कांहीं विशेष रूपें पुढें देतों—

" भटोबास पंडितबासांसि **घोकवीत** होते । "–दृ० ६७ (= संथा देत होते)

" आपुलां मधुरस्वरीं : हे सदां कोकिळांतें **विसारीं** । "–शि० ८०३ (सं० विस्मृ)

" अगा जी हृषीकेशी : आझुइ किती **चाळविसी** । "–शि० ७८

" आतां **गमाल** दीस : कव्हनीं परी । "–शि० १२३ (= गमवाल)

" गोसावी **ओळखवीती** तरि वोळखीजे । "–ली० ३ (ओळख करून देणें)

---

१ हेमचंद्र, प्राकृत व्याकरण, ३–१५०

" कैसीं नीलोत्पलातें **रावित** । "–ज्ञा० ११–५९० (सं० रंजयत्)
क्वचित् मूळ ' य ' (< आपय) दिसतो. जसें,

" तया वीषयेसुख **तीडिकाय** : स्वर्गसुख **चडुफाय** । "–उद्ध० १७५
(= तिडीक उठवितें) (= चडफडवितें)

परंतु असें रूप विरल. बहुशः ' य ' चा ' व ' होतो.

(२) धातूच्या उपधेस वृद्धि होऊन :

धातूची वृद्धि + अव < सं० आपय

जसें—उघडी–उघाडी; फुट–फोडी
पड–पाडी; मन–मानी
फिट–फेडी;

सं० पातयति > प्रा० पाडयइ > म० पाडी
सं० मानयति > प्रा० माणयइ > म० मानी

(३) क्वचित् साधें, अविकृत रूप प्रयोजकार्थी वापरलेलें दिसतें. उदा०

" जीवींची हांव प्राणियां : कवणु न **करी** । "–शि० ६८३ (=करवी)

" ना तरि पवें घालितां वारा : उमानैल **कीरूं** । "–ऋ० १७९

" तुवां **जन्मौनि** पोसिलीं । "–ऋ० २७७ (= जन्म देऊन)

यादव-मराठींत पहिल्या दोन पद्धति एकमेकींहून भिन्न आहेत. त्यांत कोठें मिथ्याभासानें एकात्मता आलेली दिसत नाहीं. सर्व इंडो-आर्यन भाषांमध्यें प्रयोजक रूपें बनविण्याच्या वरील दोन रीतिच आहेत व त्यांत कोठें मिथ्याभासानें भेसळ झालेली नाहीं. अर्थात् मराठींतहि ती न दिसल्यास नवल नाहीं. परंतु कोंकणींत अशी भेसळ झाली हें मात्र नवल आहे. उदा०

मराठी : तुटणें–तोडणें
कोंकणी : थुंटता–थुंटयता

म्हणजे येथें मराठीप्रमाणें वृद्धि न होतां, नेहमींचा ' आय ' प्रत्यय लागतो. हें भाषेचें सुलभीकरण होय. तें कोंकणींत आहे, परंतु यादव-मराठींत नाहीं.

---

१ J. Bloch : L'indo Aryen, 242–4

बोलींची वाढ स्वतंत्र असते, मध्यवर्ती भाषेशीं निगडित नसते, हा भाषाशास्त्रांतील नियम येथें लागू पडतो.

§ ४४ वर्तमान कृदन्तें

येथवर दशविध लकारांचा विचार केला. या दहा लकारांपैकीं यादव-मराठींत जे काहीं शिल्लक आहेत त्यांच्या रूपांचा एकमेकांशीं संकर होऊन तीं ओळखणें कधींकधीं जड जातें. अतएव, या प्रत्ययी आख्यात विभक्ती-कडून सामासिक विभक्तीकडे भाषा वळलेली दिसते. या वळणांतील कृदन्तें हा मधला टप्पा होय. एका बाजूला दशविध लकारांपैकीं कांहीं अवशिष्ट भाग व दुसऱ्या बाजूला संयुक्त क्रियापदें या दोन टोकांच्या मध्यें कृदन्तें बसतात. कृदन्त-पद्धति संस्कृतांत–प्राकृतांत होती हें खरें. परंतु यादव-मराठीनें तिचा विस्तार करून तिच्या उपयोगाचें क्षेत्रहि वाढविलें हें नाकबूल करतां येणार नाहीं. पुढें वर्तमान-कृदन्ताची घटना देतों—

१ सं० अत् > प्रा० न्त[२] > अप० न्त > म० त

२ सं० मान > प्रा० माण > अप० माण > म० आं

संस्कृतांत 'अत्' आणि 'आन–मान' असे अनुक्रमें परस्मैपदीं व आत्मने-पदीं वर्तमान कृदन्ताचे प्रत्यय आहेत. पैकीं 'अत्' पासून मराठींतील 'त' निघाला व 'मान' पासून 'आं' निघाला. मात्र राजवाडे मानतात[३] त्याप्रमाणें यांतील एक परस्मैपदी व दुसरा आत्मनेपदी असा भेद नाहीं. भेद आहे तो त्यांच्या अर्थांत आहे, व त्याची चर्चा पुढें येईलच. येथें 'त' धांतु-साधिताचीं रूपें देतों—

सं०	प्रा०	अप०	मराठी
भणत्	भणन्त	भणन्त	भणत
असत्	असन्त	सन्त	सांत, असत
भवत्	होन्त	होन्त	होंत

१ S. M. Katre : Formation of Konkani, B. O. R. I. Vol. xx pp. 159

२ हेमचंद्र, प्राकृत व्याकरण : ३–१८१

३ ज्ञानेश्वरीचें व्याकरण, पान ९५

हें कृदन्त विशेषणात्मक असल्यानें त्यास पुल्लिंगी आ, स्त्रीलिंगी ई व नपुंसकलिंगी एं असे आदेश होतात. जसें–बोलता, बोलती, बोलते. हें कृदन्त यादव-मराठींत दोन तऱ्हांनीं वापरलें जातें. एक क्रियापद म्हणून व दुसरें विशेषण म्हणून.

१ **क्रियापद :** लट्, लिङ् आणि लृट् म्हणजे वर्तमान-भूत-भविष्य या तिहीं काळांचीं रूपें सारखींच दिसूं लागल्यानें वर्तमानकाळ व्यक्तविण्याकरितां हें कृदन्त अधिकाधिक प्रचारांत आलें. केवळ वर्तमान–कृदन्त वापरून काळ साधल्याचीं उदाहरणें पहा:—

" देखैं देह **कांपत** । तोंड असे कोरडें **होत** ।
विकलता **उपजत** । गात्रांसि । "–ज्ञा० १–१९६
" पाहे पां तरंग तरि **होंत जात**। परि तेथें उदक तें अखंड **असत**। "
–ज्ञा० ८–१७५
" तूं कां **भीत** या संसारा : कां **घेत** अविद्येचा दरारा । "–उद्ध० १५६
" तूं **सांडित** येदुराज : हें महीतळ । "–उद्ध० १३३
" कुरुवाळा **करितें** : पाखीं **झडपितें** ।
कपौतीं **खेळतें** : देखिलीं तेणें । "–उद्ध० ३१९
" नाना तापीं **तपत** : हृदय असे **जळत**। "—ऋ० १०१
" परतले यादव कवण **साहातु** असे घाओ । "–ध० उ० ३

केवळ वर्तमानकृदन्त वापरून काळ साधल्याचीं उदाहरणें फारशीं नाहींत. वर्तमान कृदन्तांचा क्रियापदासारखा उपयोग संयुक्त काळांत मात्र फार होतो. त्याचें विवेचन पुढें येईल. (पहा—क्र० ५१)

२ **विशेषणात्मक :**

"सेविती परी।" ज्ञा० १-५९। "पढियंतां ठाइं।" ज्ञा० १८-७८
"पसरतेनि हातें।" उद्ध० ३१; "डांडाती गर्जना।" उद्ध० १९७
"चुकविती परी।" उद्ध० ६७७; "नव्हतीं बाधलें।" उद्ध० ७२६
"तें देखतें ना अदेखतें।" उद्ध० ७५४; "संतें फळें।" उद्ध० १०
"तें माझें रूप : संत ना असंत।" उद्ध० ६५३
"करितिये आज्ञेचे।" ऋ० ६०१ "जाती वेळ।" वच्छ० २७०

"महदाइसें शोधीति शोधीति गेली।" स्मृ० २
"धर्मवार्ता होती असे।" स्मृ० १०२
"असतेनि पदार्थें असीकेयाचा वीधि।" स्मृ० १७६
"चाटसीएतें व्यापारवीती व्यापारवीती पाकनिष्पत्ति करी।" दृ० ६४
"घेतें द्वार : सांडितें द्वार।" दृ० ४६
"तेथ **गातीं वातीं : वाणितीं वाखाणितीं**
"दिसतीं पात्रें **नाचतीं** : मेणिके ऐसीं।" शि० ३४९
"लावाल कलहो **नव्हते** : हें फुडें कीरू।" शि० १२४
"तैसियां **उचलतां** पायीं धावती।" शि० ६८२
"**खांखांतें** प्रेतें : खाअें गिळी **करितें**।" शि० ९०२

वरील वर्तमान कृदन्तें विशेषणात्मक असल्यानें तीं विशेष्यनिघ्न आहेत. त्यांना लिंगविकार होतात.

§ ४५ "आं" वर्तमान कृदन्त

यादव-मराठींत 'जातां, करितां, खातां, नेतां' अशीं रूपें आढळतात. तीं अव्ययी भूत कृदन्तें होत असें राजवाड्यांचें म्हणणें. वास्तविक तीं भूतकृदन्तें नसून वर्तमानकृन्दतें आहेत. 'त्वा' या संस्कृत भूतकृदन्ताच्या प्रत्ययापासून 'ऊण' प्रत्ययान्त मराठी कृदन्तें होतात व तीं वरील 'तां' कृदन्तांपासून वेगळीं आहेत, हें राजवाड्यांनाहि मान्य दिसतें. म्हणूनच त्यांनीं अर्धमागधींतील 'त्ता' या 'क्त्वा'च्या अपभ्रंशावरून मराठींतील 'तां' कृदन्त व्युत्पादिलें आहे. परंतु, एक तर महाराष्ट्री-अपभ्रंशांत या व्युत्पत्तीला कोठेंहि आधार नाहीं. दुसरें, 'नेतां, करितां, खातां, देतां' या रूपांत वर्तमानकाळच उद्दिष्ट आहे, भूतकाळ नाहीं. इतकेंच, कीं या वर्तमान कृदन्ताचा उपयोग नेहमींचा नसून तो क्रियाविशेषणात्मक आहे व तसा आहे, म्हणूनच हीं रूपें सदा 'आं'-न्त असतात, तीं लिंगवचनाबरोबर फिरत नाहींत. म्हणजे यादव-मराठींतील 'त' प्रत्ययान्त वर्तमानकृदन्तें विशेषणात्मक आहेत, तर 'आं' प्रत्ययान्त कृदन्तें क्रियाविशेषणात्मक आहेत. राजवाडे त्यांना भूतकृदन्तें मानतात, हें अयोग्य होय.

१ ज्ञानेश्वरीचें व्याकरण, पान १०८

मराठींतील या क्रियाविशेषणात्मक वर्तमानकृदन्ताचा बरोबर छडा अद्यापि कोणीं लाविला नाहीं. बीम्स[1] तें अव्ययी मानतो, परंतु उपपत्ति देत नाहीं. कृष्णशास्त्री चिपळोणकरांनींहि[2] त्याचें क्रियाविशेषणात्मक रूप मानण्यावरच काम भागविलें आहे. माझ्या मतें याची उपपत्ति अशी —

सं० मान (आत्म०) > प्रा० अप० माण > आण > म० आं

हा 'आं' प्रत्यय नेहमींच्या 'त' कृदन्ताला लागून त्याचें क्रियाविशेषणात्मक रूप बनतें. जसें करित + आं = करितां. अपभ्रंशांत माण प्रत्ययानें साधलेलीं वर्तमान कृदन्तें आहेत. उदा० पविस्समाण, पिच्छमाणु (भविसयत्तकहा), गच्छमाण, णच्चमाण, चोयमाण (णायकुमार०) अपभ्रंशांतील माण प्रत्ययाचें ओष्ठ्य वर्णाच्या लोपानें 'आण–आं' असें रूप झालें व तें अपभ्रंश-प्राकृताप्रमाणें एकटेंच न वापरतां, नेहमींच्या 'त' कृदन्ताला जोडून वापरण्यांत आलें. तात्पर्य,

(अत् > त) + (मान > आं) = तां

असें जोड स्वरूप वर्तमान कृदन्ताचें आहे. म्हणजे, याला **सामासिक वर्तमान कृदन्त** म्हणतां येईल. कोंकणींतील अशा कृदन्तांतील 'आं'ची उपपत्ति पाली भाषेंतील 'तिट्ठंतम' या द्वितीयेच्या रूपापासून डॉ० कात्रे[3] लावितात. परंतु यादव-मराठी आणि कोंकणी या दोहोंतील 'आं' हा संस्कृत 'मान' चाच अवशेष असावा असें मला वाटतें. या 'तां' कृदन्ताची मीं वर दिलेली उपपत्ति सर्वस्वीं स्वतंत्र आहे. या रूपाचीं कांहीं उदाहरणें देतों —

"कां कामना हि न **करितां**। अवसांत घडे पांडुसुता।
परि वायकांड न **झुझतां**। लागे जैसें।"–ज्ञा० १८–१०३

"जीन एथ उखिता। वस्तिकरू वांटे **जातां**।"–ज्ञा० १३–३५

"घाय **सुतां** मुखीं : विकळु गेला।"– उद्ध० ४६८

"कीं आव्हाटीं म्हैसवा थरु : **नव्हतां** दृष्टीगोचरु।"–ऋ० २९८

"**देखत देखतां** आत्मघातु : घडला जेया।"–ऋ० ३५

---

१ Comp. Grammar. Vol III Ch. iii.

२ मराठी व्याकरणावरील निबंध, पान २११

३ Formation of Konkani, B. O. R. I. Vol. xx, pp. 168

"**जेवितजेवितां** भटोबासांचां पात्रीं घातला।"–स्मृ० २७
"त्यातें **येतां** देखिलें।"–लीला० ३-३३
"**आराधितां** मूक्ति : **वीरोधितां** भूक्ति।"–लीला० ३-१९
"ऐसें **असत असतां** तया लेंकुरवाची माउली सरली।"–दृ० ९१
"**चिंतीत चिंतीतां** तीसीहि पाख नीगती।"–दृ० ९६

पैकीं 'जेवितजेवितां, चिंतीतचिंतीतां, असतअसतां' हीं द्विरुक्त रूपें महत्त्वाचीं आहेत. त्यांत पहिलें कृदन्त 'त' प्रत्ययान्त व दुसरें 'तां' प्रत्ययान्त दिसतें. दोहोंनीं दिग्दर्शित काळ एकच व तो म्हणजे वर्तमान. प्राकृतांतील 'न्त' व 'माण' या वर्तमान कृदन्तांच्या दोन प्रत्ययांतून दोन भिन्नार्थी कृदन्तें यादव-मराठींत कशीं आलीं हें पाहण्यासारखें आहे. विशेषतः 'तां कृदन्त' हें जोड असल्यानें त्यांत सामासिक विभक्तीचीं बीजें दिसतात हें विशेष होय.

कर्मणि व प्रयोजक रूपांची चर्चा अन्यत्र केली आहेच. येथें फक्त त्यांचीं वर्तमानकृदन्तांचीं रूपें देतों—

कर्मणि वर्तमान कृदन्त–असिजत, म्हणिजत, पाविजत, करिजत
प्रयोजक वर्तमान कृदन्त–करावित, निववित, भणवित

§ ४६ भूत कृदन्तें

कर्मणिभूतकृदन्तः— क्रियापदाचीं प्रत्ययी रूपें जसजशीं लोपत चाललीं, तसतशीं कृदन्तें अधिकाधिक उपयोगांत येऊं लागलीं. यांत भूत कृदन्तें हीं अति महत्त्वाचीं होत. संस्कृतकालापासूनच त्यांचा वापर आहे. प्राकृतांत त्यांची वाढ झाली व भूतकाळ बहुशः कृदन्तांनींच व्यक्त होऊं लागला. "प्रायो भूते निष्ठान्तप्रयोग एव प्राकृते दृश्यते।" हें सूत्र प्रसिद्धच आहे. संस्कृतांतील निष्ठारूपच महाराष्ट्री-अपभ्रंशद्वारा यादव-मराठींत आलें. कोंकणींतील इतर आर्य भाषांत भूतकाळ अशाच कृदन्तांनीं साधला जातो. कोंकणींतील या भूतकाळाचे दोन भेद डॉ० कात्रे[१] करतात. त्यांच्या मतें भूतकाळाचा

१ Formation of Konkani, B. O. R. I. Vol. xx pp. 163

स्वार्थे 'ल' कधीं मूळ धातूंना लागतो, तर कधीं कृदन्ताला लागतो. एतावता, मूळ धातूपासून साधलेला व मूळ कृदन्तापासून साधलेला असे भूतकाळाचे दोन प्रकार ते मानतात. त्यांची ही विचारसरणी मान्य केल्यास मराठींतहि असेच दोन प्रकार मानावे लागतील. परंतु वास्तविक ते तसे नाहींत. एका कृदन्तालाच स्वार्थे 'ल' लागून मराठींत भूतकाळ होतो. यादव-मराठींतील भूत कृदन्तांच्या रूपांत फरक दिसतो तो त्यांच्या उपपत्तींत नसून वर्णप्रक्रियेमुळें होणारा आहे. मराठींतील व्ययी भूत कृदन्ताची परंपरा अशी—

सं० क्त > प्रा० अप० १ अ (जाअ, हुअ, न्हाअ)
२ त्त (पात्त, आत्त, खत्त)
३ इअ (दमिअ, धरिअ, कहिअ)
४ ण्ण (दिण्ण, विच्छिण्ण, भिण्ण)

हींच रूपें वर्णप्रक्रिया होऊन मराठींत येतात व तेथें त्यांना 'ल' स्वार्थे लागतो. जसें—

दिण्ण + ल; जाअ + ल; पात्त + ल वगैरे.

होर्नलें[1] या 'ल' ची उपपत्ति शौरसेनी द > ड > र > ल अशी लावतो. परंतु ही वर्णप्रक्रिया सापेक्ष असल्याचें प्रा० कुळकर्णी दाखवितात तें योग्यच आहे. या 'ल' ची खालील व्युत्पत्ति आतां सर्वमान्य झालेली आहे.

प्रा० अप० "अल्ल, इल्ल, उल्ल" > म० 'ल'

अपभ्रंशांतील रूपें : कहिय, णिय, धरिअ
मराठींतील रूपें : कथिल, नेल, धरिल

म्हणजे अपभ्रंशांत स्वार्थे 'ल' अगदीं नाहीं. यादव-मराठींत तो नित्य आहे. याचाच अर्थ हा, कीं 'अ, अय, इय' हे अपभ्रंशांतील भूतनिष्ठेचे प्रत्यय पुढें वर्णप्रक्रियेच्या ओघांत भूतकाळ व्यक्तविण्यास असमर्थ झाले आणि म्हणून भूतकाळाचें नियत-चिन्ह या अर्थी 'ल' स्वार्थे मराठीनें

---

१ Hoernle : Gaudian Grammar, pp. 306

वापरांत आणला. हा 'ल' लागण्यापूर्वी यादव-मराठींत भूतनिष्ठा तीन तऱ्हांनीं प्रकट होते. म्हणजे, 'ल' पूर्वींचें भूतकृदन्ताचें रूप अकारान्त, तकारान्त, किंवा नकारान्त असूं शकतें. हा सारा वर्णप्रक्रियेचा प्रकार होय. पुढें यांचीं उदाहरणें देतों.[1]

	संस्कृत	प्रा० अप०	मराठी
१ अकारान्त :			
	आगत	आअअ	आअ + ल
	कृत	किअ	किअ–के + ल
	स्नात	न्हाअ	न्हा + ल
	अर्पित	अप्पिअ	अर्पिय + ल
	मानित	माणिअ	मानिय + ल
	जात	जाअ	जाअ + ल
२ तकारान्त :			
	उपात्त	पात्त	पात + ल
	तप्त	तत्त	तात + ल
	जित	जिअ	जिंत + ल
	गृहीत	गेण्हिअ	घेत + ल
	भणित	भणिअ	भणित + ल
	हरित	हारिअ	हारित + ल
	सिक्त	सित्त	सीत + ल
	सुप्त	सुत्त	सुत + ल
३ नकारान्त :			
	धावित	धाविण्ण	धाविन्न + ल
	दत्त	दिन्न	दिन्ह + ल[2]
	युद्ध	जुज्झिन्न	जुझिन्न + ल

१ या वर्णप्रक्रियेची सविस्तर चर्चा राजवाड्यांनीं केली आहे. पहा ज्ञानेश्वरीचें व्याकरण, पान ९६ ते १००

२ पाटण शिलालेख, खिरताब्द १२०६

हासित	हासिअ	हासिन्न+ल
निर्गत	निग्गअ	नीनि+ल
नंदयित	नंदयिअ	नांदिन्न+ल
रुदित	रुदिअ	रडिन्न+ल

हें भूतकृदन्त विशेषणात्मक असल्यानें त्याला पुल्लिंगीं, स्त्रीलिंगीं व नपुंसकलिंगीं अनुक्रमें 'आ, ई, एं' असे आदेश होतात. जसें, धाविन्नला–ली–लें.

यादव-मराठींत या कृदन्ताचे एक विशेषणासारखा व दुसरा क्रियापदासारखा असे दोन उपयोग आहेत.

१ **विशेषणात्मक :—**

"तूं उभा **ठाकला** चि पुरे।" लीला० १–२९
"तूं **चिंतिला** पावसि स्वामि सळा।" उद्ध० ११७
"लाहे **तान्हैला** जीवनु।" ऋ० ४७
"**आतैले** डोळे तीए दीशे : धांव घेति।" ऋ० १४२
"**वालभैलें** परब्रह्म : पाठीं धांवे।" ऋ० १५६
"**झगटलें** पाणी हालें।" ऋ० ९६
"देशु **उचलला** होइल।" स्मृ० ८३
"**बोलिलि** क्रिया काइसेनि आठवैल।" स्मृ० ६३
"**निजैले वैसले** ठाये गोसावियांचे।" स्मृ० ५७
"**वाकले** हरीबासीं (तृ०) गीता वाखाणीली।" स्मृ० १२१
" दधिभातु उन्हें **तापला** आला। " लीला० ३–१८

२ **क्रियापदात्मक :**

पु० आळिला, पराभविला, उभिले, सांसीनले, देखिलासि, कांटाळैला

स्त्री० दीन्हली, डीरैली, जिंतली, वाइलिया, रडीनली

नपुं० हातवसिलें, ओल्हावलें, विसंवलें, नांदिनलें, कोंभैलीं, भीडीनलीं

प्रयोजक : वनाविलें, मुसावलें, चालविलों, लेवविलों, मानलवला, आनंदवीले, जाणविले, उठाविला.....

क्वचित् या कर्मणि कृदन्ताचा साम्याभासानें 'ज'. कर्मणि केला जातो. जसें 'बोलिजेलें' (दृ० २३)

वरील भूतकृदन्ताचीं विशेषणात्मक व क्रियापदात्मक रूपें अभिन्न आहेत. म्हणजे यादवकालीं एकच कृदन्त नामार्थी व क्रियापदार्थी वापरलें जाई, वर्तमान मराठीनें दोहोंत भेद केला आहे. 'ल' हा आणखी एक स्वार्थे प्रत्यय लावून वर्तमान-मराठी कृदन्त-विशेषणें बनविते. जसें, गेले + ल, मानवले + ल, वगैरे. हा दुसरा 'ल' यादव-मराठींत नाहीं. तो यादवोत्तर कालीं वापरांत आला व भूतकृदन्ताच्या सामान्यरूपाला[1] (गेले, मानवले,... + ल) लागूं लागला.

§ ४७ कर्तरि भूत कृदन्तें

यादव-मराठींत कर्मणि भूत कृदन्ताप्रमाणेंच कर्तरि भूत कृदन्तेंहि आढळतात. "मी दारां गेलां", "मी जेविलां" हीं कृदन्तें उघड उघड कर्तरि होत. यांचा उल्लेखहि बीम्स व होर्न्ले करीत नाहींत. राजवाड्यांनीं मात्र यांची स्वतंत्र उपपत्ति बसविली आहे. त्यांचें म्हणणें थोडक्यांत असें—

"संस्कृतांतील 'तवत्' हा भूत कृदन्ताचा प्रत्यय कर्तरि आहे. त्यापासून मराठीनें कर्तरि भूत कृदन्तें साधलीं. जसें—

पु० कृतवान् > प्रा० किअवां > म० किअ + ल + आं = केलां
स्त्री० कृतवती > प्रा० किअवइ > म० किअ + ल + अइ = केल्यें"[2]

श्री० नेने[3] यांनीं राजवाड्यांच्या मताचाच अनुकार केला आहे. राजवाडे आपल्या उपपत्तीला ज्ञानेश्वरींतून आधार देत नाहींत. नेन्यांनीं उदाहरणें दिलीं आहेत, परंतु या रूपांची परंपरा दाखविलेली नाहीं आणि वस्तुतः तशी परंपराच त्यांना नाहीं. कारण वररुचि व हेमचंद्र या कर्तरि भूतकृदन्ताचा उल्लेख करीत नाहींत. शास्त्रीय वैयाकरणांची गोष्ट सोडली तरी अपभ्रंश-ग्रंथांतून वरील रूपें आढळत नाहींत. अपभ्रंशांत कर्मणि भूत कृदन्तें विपुल आहेत, परंतु कर्तरि अगदीं नाहींत. तेव्हां, यादव-मराठींत हीं रूपें

---

१ J. Bloch : La Langue Marathe, 256

२ ज्ञानेश्वरीचें व्याकरण, पान १०२–३

३ दृष्टान्तपाठ (संपा० ह० ना० नेने) परिशिष्ट ५, पान १५०

परंपरेनें, म्हणजे प्राकृत-अपभ्रंशद्वारा आलीं नाहींत हें स्पष्ट आहे. शिवाय असें, कीं यादव-मराठींत वरील कृदन्तांचीं प्रथमपुरुषी रूपेंच तेवढीं विपुल आढळतात. द्वितीय व तृतीयपुरुषी रूपें नाहींत असें नव्हे, तर तीं अति विरल आहेत. हें कर्तरि भूत कृदन्त परंपरागत असतें तर तिन्ही पुरुषांत आढळतें. आढळत नाहीं त्या अर्थी राजवाड्यांनीं दिलेलीं महाराष्ट्री-प्राकृतांतील रूपें काल्पनिक ठरतात व मराठींतील या कृदन्ताची निराळी उपपत्ति शोधावी लागते. प्रथम हीं रूपें देतों—

" यऱ्हविं तऱ्हिं मीं मुर्खु । जऱ्हैं **जाला** असे अविवेकु । "–ज्ञा० १–७६
" कां कव्हणि येकु भ्रमलेपणें । मी तो नोहें गा **चोरलां** म्हणे ।"-ज्ञा० ६-७४
" तो मीं तूझें **जालां** आहे । खेलणें आजि । "–ज्ञा० १८–२८२
" मी वाघें **खादलां** । हस्तीं **वोळघलां** ।"–दृ० १०४
" आगा : मी प्रसन्न **जालां** । "–दृ० ११
" मी **जेविलां** नाहीं : मी भुकैलां **होतां** । "–दृ० १९
" मी चहुंकडे **आळिलां** : वरि ममतेचा खीळां : **गाडिलां** मी । "
–उद्ध० २३४
" मी **हिंडिनलां** अनेग देश । "–उद्ध० ६४३
" मी सर्वस्व **नागवलां** । "–ऋ० ३६५
" मी **गेलां** आणि **नीघालां** । "–स्मृ० १०६
" भटोबास थोर **मानवले** । "–स्मृ० १८ (= भटोबासांनीं मानलें)

वरील रूपांची उपपत्ति माझ्या मतें अशी :—

कर्मणि भूत कृदन्तांचें (पु०) प्र० ए० व० + लट्‌चा प्र० पु० ए० व०चा अनुस्वार
" " (पु०) गेला + आं = गेलां

पुल्लिंगाप्रमाणें स्त्रीलिंगीं ई (गेली–एं) व नपुंसकलिंगीं एं (गेलें–एं) अशीं रूपें होतात. राजवाड्यांच्या उपपत्तीला जसा अपभ्रंशांत नाहीं, तसाच आधार वरील उपपत्तीलाहि नाहीं हें खरें. परंतु, राजवाडे वरील रूपें परपंरागत मानतात, आणि मी तीं तशीं मानीत नाहीं, हा या दोन उपपत्तींमधील मुख्य फरक आहे. माझ्या मतें या रूपांना परंपरा नसून तीं मराठीनें भूत कृदन्त व लट्‌चा प्रथमपुरुषी एकवचनी प्रत्यय यांच्या जोडानें बनविलीं.

अर्थात् ही मराठीची स्वतंत्र बनावट असल्यानें अपभ्रंशांत तिचें बीज सांपडणें अशक्य होय. ही उपपत्ति मी चर्चेस पुढें करीत आहें.

§ ४८ अव्ययी भूत कृदन्तें (Absolutives)

यादव-मराठींत ल्यन्तांच्या अंतीं "ऊनि, ऊनु, ओनि, औनि, ओनु औनिया" असे प्रत्यय आढळतात. यांची उपपत्ति पाहतां मतवैचित्र्य आढळतें. राजवाडे, डॉ० भांडारकर हे संस्कृत 'त्वा' पासून, तर डॉडेरेट[१] सप्तमीच्या विभक्तीपासून यांची उपपत्ति लावितो. प्रो० ब्लोक[२] यांचें मत अगदींच भिन्न आहे. ते म्हणतात :

" These terminations are the ablatives of Marathi verbal stem, plus the 'ni' locative attachment, abbreviated from 'tani' as in the case of ablative of nouns. "

प्रो० ब्लोक यांचें म्हणणें सर्वस्वीं अयोग्य आहे. कोणत्याहि विभक्तीचा या कृदन्तांशीं संबंध नाहीं. प्रा० कुलकर्णी यांनीं याबाबत स्वतःचें मत दिलें नसलें तरी त्यांनीं उं–कृदन्ताचा आणि ऊन–कृदन्ताचा जो संबंध जोडला आहे तो अशास्त्रीय वाटतो. प्रा० कुलकर्णी[३] म्हणतात : "उं कृदन्ताचाच आणखी एक प्रकार म्हणजे ऊन कृदन्त होय. ...ऊनच्या पुढची पायरी म्हणजे ऊं." वास्तविक उं कृदन्त भविष्यार्थी व ऊन कृदन्त भूतार्थी असतांना दोहीं एकच असें म्हणणें बरोबर नाहीं. या प्रत्ययांची उपपत्ति सरळ असतां खरें म्हटलें तर आडवळणांत शिरण्याचें कारणच नाहीं.

सं० त्वानम्–त्वीनम् > प्रा० त्ताणं, तूणं, ऊण
> अप० ऊण, एविणु, एप्पिणु
> म० ऊनि, ऊन, ऊनिया...

पुढें अपभ्रंशांतील कांहीं रूपें देतों—

ऊण–बुज्झिऊण, भज्जिऊण, अइऊण (णायकुमार०), गिण्हिऊण (भविसयत्तकहा)

---

१ Grammar of Jnyanesvari, B. O. R. I. Vol. IV

२ La Langue Marathe, 261–3

३ मराठी भाषा, उद्गम–विकास, पान ३७३

एविणु–लेविणु (णायकुमार०), करेविण्णु (भविसयत्तकहा)

एप्पिणु-आपोप्पिणु, साहेप्पिणु (णायकुमार०), पणवेप्पिणु (सावय-धम्म०) अर्धमागधींतहि[1] ‘ऊणं–इऊणं’ हे प्रत्यय लागून “काऊणं, जाणिऊणं, दाऊणं, पासिऊणं” अशीं रूपें होतात. तात्पर्य, महाराष्ट्री प्राकृत, अर्धमागधी आणि अपभ्रंश यांत “ऊणं, इऊणं, एविणुं” हे प्रत्यय दिसतात. यांच्या-पासून अपभ्रंशद्वारा मराठींतील प्रत्यय निघाले. मराठींतील ‘ऊनि’ आणि ‘औनि’ या प्रत्ययांची वर्णप्रक्रिया अशी कल्पितां येईल—

म० **ऊनि–औनि** < अप० औण्णु–ण्णि
< अप० तुअण्ण–इ
< सं० त्वानम् + त्वीनम्

म्हणजे त्वानम् आणि त्वीनम् यांच्या संयोगानें मराठींतील प्रत्यय सिद्ध होतात. मराठींतील प्रत्यय—

(१) ऊनि, ऊनु : करूनि, म्हणूनि, नेदुनु, पेरुनु

(२) औनि–नु, ऊनिया, औनिया : म्हणौनि, करौनि, चेओनिया, म्हणोनियां

‘इ’ व ‘उ’ हीं केवळ पादपूरणार्थ आहेत. मात्र, ‘इया’ तसें नाहीं. संस्कृत ल्यबन्तांतील हा अवशेष होय.

सं० य > प्रा० इय > म० इयां

म्हणजे त्वान > ऊन + य > इयां असें हें जोड रूप आहे. प्रो० ब्लोक[2] म्हणतात त्याप्रमाणें याचा सप्तमीशीं मुळींच संबंध नसून राजवाड्यांच्या म्हणण्याप्रमाणें संस्कृतांतील ल्यबन्त-प्रत्यय ‘य’ या पासून निघालेलें हें पादपूरक होय. याचीं रूपें—

करौनियां, लाहौनियां, म्हणौनिया, वगैरे.

(३) महानुभाव ग्रंथांत ऊन-कृदन्तांचेंच एक ‘उं’ रूप आढळतें. त्याची परंपरा ‘ऊन’ प्रमाणेंच होय. इतकेंच कीं ऊनमधील नासिक्य वर्ण जाऊन त्याचें अनुनासिकांत रूपांतर झालें आहे.

---

१ P.L. Vaidya: “A Manual of Ardhamagadhi Grm.” pp. 64

२ La Langue Marathe, 261

ऊन > ऊन् > ऊं : हसून > हसून् > हसूं

हें रूप ज्ञानेश्वरींत नाहीं. महानुभाव ग्रंथांत, विशेषतः गद्यांत हें नित्य येतें. एकाच काळांतील भाषेचे थर सूक्ष्म भेद कसे व्यक्तवूं शकतात त्याचा हा उत्तम दाखला आहे. हीं रूपें ज्ञानेश्वरींत नसल्यानें साहजिकच राजवाडे किंवा डॉडेरेट त्यांचा उल्लेख करीत नाहींत. तीं रूपें येणेंप्रमाणें—

" महदाइसें घरांतु रीगों बैसली । " – स्मृ० २३ (=रिगौनि)

" ते बाइ घरांतु जाऊं बैसली । " – स्मृ० ५३ (=जाऊन)

" प्रकरणींचीं लक्षणें केलीं भटोबासां पुसपुसों । " – स्मृ० १० (=पुसून)

" तेहिं शब्द घडउं घडउं पदें बांधिलीं । " – स्मृ० १७४ (=घडवून)

" भिक्षू तयातें बोलावूं बोलावूं विजना नेति । " – स्मृ० ११०

" ते नांवें घेंवों घेंवों बोलवीति । " – लीला० १–३४

" एरें श्रीकरें भुइचे अनु वेचवेचुं तेथ घालीति । " – लीला० १–५३

पद्यांत हीं रूपें जवळ जवळ नाहींतच. म्हणजे वास्तविक ऊन मधील नासिक्य वर्णाचा उच्चार व्यंजनान्त करण्याकडे कल होता व त्याचेंच रूपांतर अनुनासिकात झालें. गद्यांत भाषेचें खरें स्वरूप दिसतें तें असें.

§ ४९ भविष्य कृदन्तें

(१) **तुमन्त :** हें अव्ययी कृदन्त असून त्याची परंपरा अशी—

सं० तुम् > प्रा० उम > अप० उं, हुं, इवि > म० ऊं

अपभ्रंशांतील 'उं–हुं' प्रत्ययांच्या द्वारा मराठींतील ऊं सिद्ध झाला. क्वचित् पूर्वस्वराशीं संधि पावून त्याचा ओं, औं होतो.

सं०	प्रा०	अप०	मराठी
दातुम्	दाउं–उम	दाउं	देऊं
गृहीतुम्	घेत्तुं	घेत्तउं	घेऊं

अपभ्रंशांत 'उं–हुं' प्रत्ययाबरोबर 'इवि' हा निष्ठाप्रत्यय लागूनहि तुमन्त सिद्ध होई. जसें, कहिवि (कथयितुं)–सावयधम्म० २०१

कड्ढिवि (कर्षितुं)–णायकुमार० ७–६–२

करिवि, धरेवि – भविसयत्तकहा

म्हणजे एकच भविष्यार्थ अपभ्रंशांत 'इवि' व 'उं-हुं' या प्रत्ययांनीं दाखविला जाई, आणि एक निष्ठेचा 'इवि' प्रत्यय भूतार्थी व भविष्यार्थीहि योजिला जाई. यादव-मराठींत हा संभ्रम नाहीं. एकविधता आल्याचा हा पुरावा होय. पुढें कांहीं तुमन्ताचीं रूपें देतों—

'राहाटों नये।' उद्ध० २९७
'वरूं जाये।' ऋ० ३३३
'पुसौं, करौं।' ध० पू० १०
'जेऊं ये' (=जेवतां येतें) स्मृ० ७२
'बैसों घातलें' (=बसावयास) स्मृ० ९७
'स्मशानें वसों आदरिलीं।' ज्ञा० १३-२५
'वाखाणूं आदरिलें।' स्मृ० १२०
'पेवों'। ह० ४१
'पीयों, पेओं।' उद्ध० ७२५
'प्रणूं आला।' ध० पू० ३०
'विटाळूं नेंदावा।' स्मृ० ५०
'नको हों।' (=होऊं नका) स्मृ० ९४
'धूं-धों।' स्मृ० २१
'पीडा हों लागली।' लीला० १-२८

(२) **आव:** (Potential Participle)

सं० तव्य > प्रा० अव्व > अप० एवअ-इवअ > म० आव

अपभ्रंशांत एवअ-इवअ हे प्रत्यय लागून रूपें होतात. जसें—

"वंचेवअ, करेवअ, मारेवअ, दारेवअ" (णायकुमार०)

"अप्पिव्वइ, करिव्वइ, जाणिव्वइ, लाइव्वइ" (भविसयत्तकहा)

मराठीनें अपभ्रंशांतील एकार व इकार न घेतां महाराष्ट्री-प्राकृतांतील 'अ' दीर्घ केला आहे. म्हणजे 'आव' प्रत्यय मराठींत अपभ्रंशद्वारा न येतां साक्षात् महाराष्ट्रींतून आला.

हें व्ययी भविष्य कृदन्त असून लिंगवचनाप्रमाणें बदलतें. याचीं रूपें पुढीलप्रमाणें होतात.

सं०	प्रा०	मराठी
हसितव्य	हसिअव्व	हसाव (वा, वी, वें)
भवितव्य	होइअव्व	होआव (वा, वी, वें)

उदा० "जीणावीं राज्येंकुलें।"-शि० ४९२
"जीआवें दीसु दोनिच्यारि।"-शि० १३७

या कृदन्ताचा नामाप्रमाणेंहि उपयोग होतो—

"श्रोतेयां विनती : सुआवी न लगे।"–उद्ध० १३

"यदुवंशाची वेळुवनें : वनवावीं असति।"–उद्ध० ५३

"लाहावेआचें।"–वच्छ० २५३

(३) 'ज' : (< सं० य)

सं०	प्रा०	मराठी
गुह्य	गुज्झ	गूज
कार्य	कज्ज	काज
भोज्य	भोज्ज	भोजें
खाद्य	खाज्ज	खाजें (दृष्टान्त० २१)

हीं कृदन्तें यादवकालींच नामें झालीं होतीं.

(४) **आवेया** : हा प्रत्यय लागून 'करावेया, बोलावेया, जावेया' अशीं रूपें नित्य होतात. त्यांना अर्थ तुमन्ताचा असला तरी त्यांची उपपत्ति संस्कृत तुम् प्रत्ययापासून लागूं शकत नाहीं. राजवाडे या कृदन्ताचा विचार करीत नाहींत. माझ्या मतें तें व्ययी आणि अव्ययी भविष्य कृदन्तांच्या प्रत्ययांच्या जोडानें बनलें आहे.

१ आव <(सं० तव्य) + २ इव > इय (अपभ्रंशांतील तुमन्त प्रत्यय) अपभ्रंशांत "कड्ढिवि, परिणेवइ, वंछइ" अशीं तुमन्ताचीं रूपें होतात हें आपण तत्प्रकरणीं पाहिलेंच आहे. हा 'इवि' प्रत्यय मराठी शुद्ध तुमन्तांत लोपला, तरी प्रस्तुतच्या अव्ययी भविष्य कृदन्तांत तो दिसतो. जसें,

"कराव" + इवि > इय = कराविय > करावेय–या.

अशा रीतीनें हीं रूपें सिद्ध होऊं शकतात. तात्पर्य, हें जोड कृदन्त होय. कोंकणींत 'कोर्च्या' या व्ययी कृदन्ताला 'क' हें चतुर्थीचें शब्दयोगी लागून 'कोर्च्यांक' असें रूप होतें. यादव-मराठींत त्याची चतुर्थी न होतां अपभ्रंशांतील 'इवि' हा प्रत्यय व्ययी भविष्य कृदन्ताला लागतो. या जोड कृदन्ताची ही उपपत्ति नवीन व स्वतंत्र असून तिला अपभ्रंश-ग्रंथांत आधार आहे.

---

१ S. M. Katre : Formation of Konkani, B. O. R. I. Vol xx pp. 170

पुढें याचीं कांहीं रूपें देतों. कधींकधीं हें कृदन्त चतुर्थीचें 'लागीं' हें शब्दयोगी घेतें. तेवढ्यापुरतें त्याचें मागें सांगितलेल्या कोंकणींतील रूपाशीं साम्य आहे.

"भोगावेयालागीं।" उद्ध० ३४१ "नमस्करावेया।" स्मृ० ८
"जीणावेया।" मा० स्व० २८ "खावेया।" दृ० ८
"आलिंगावेया।" वच्छ० १७१ "उद्धरावेआं।" वच्छ० ४
"देखावेआं लागौनि।" वच्छ० २१५

§ ५० कांहीं विशिष्ट कृदन्तें

कांहीं कृदन्तांचीं विशेष रूपें व विशेष अर्थ आढळतात. तीं पुढें देतों—

म्हणौनि : (=मुद्दाम, आपण होऊन)
"तूं म्हणौनि नको करूं।" स्मृ० २०२

पौनःपुन्यदर्शक : "जेवितजेवितां, पुसपुसों, वेचवेचुं, घडउंघडउं असतअसतां, चिंतीतचिंतीतां, पळपळित वीतुवीतु"

संयुक्त कृदन्तें : होंत सांता-सांती–सांतें
जाला सांता, जाली सांती-जालें सांतें.
ठकलीं ठेलीं (शि० ६१०), करीतसांतां (दृ० १०)

अर्थदृष्ट्या : "पळपळित निगौनि जाये।" दृ० ८९ (पळतपळत)
"ऐसे असतअसतां।" दृ० ९१ (=होतांहोतां)
"तोचि हूनि जरि बाहिरि जाये।" दृ० ७४
(तो आपण होऊन)

व्ययी भविष्य कृदन्त + 'नाहीं' :
"आपण कव्हणा आधीन व्हावें नाहीं :
आपण आधीन कव्हणा करावें नाहीं।"–दृ० ६२

तुमन्ताचें एकाकी रूप :
"पाणी **पा** दीयाल।"–लीळा० १–४५ (=पिण्यास)
सं० पातुम् > पाउअं > पाउं > पा

§ ५१ संयुक्त क्रियापदें (Compound Verbs)

संयुक्त क्रियापद हें आख्यात विभक्तीचें तिसरें व परिणत स्वरूप आहे. प्रत्ययी आख्यातविभक्ति जाऊन कृदन्तें येणें व शेवटीं या कृदन्तांनाच सहाय धातूंची जोड मिळून सामासिक आख्यातविभक्ति सिद्ध होणें हा भाषेचा स्वभावच आहे. नामविभक्तींत शब्दयोगींचें जें स्थान तेंच आख्यात-विभक्तींत संयुक्त क्रियापदांचें होय. यादव-मराठींत सामासिक क्रियारूपांना आरंभ झालेला दिसतो. यांत मुख्य धातूचें कृदन्त रूप व सहाय धातूचें आख्यात-रूप यांचा जोड होतो. संयुक्त क्रियापदें मानावींत कीं न मानावींत या वादांत येथें शिरण्याचें कारण नाहीं. इतकें खरें, कीं सुसंपन्न अशा यादव-मराठींत वर्तमान, भूत आणि भविष्य या तीन काळांचा कांटेकोर उपयोग केवळ अशक्य होय. त्या काळांच्या विविध छटा कृन्दतांनींच केवळ दिग्दर्शित होणें शक्य नव्हतें. त्यामुळें सहाय क्रियापदांची वाण भासूं लागली असावी. प्रा० कुलकर्णी[१] संयुक्त क्रियापद मानणाऱ्यांपैकीं आहेत. ते म्हणतात—"संयुक्त काळ मानावे लागतातच, म्हणून संयुक्त क्रियापदें मानिलीं पाहिजेत."

आर्य भाषांच्या इतिहासांत संयुक्त क्रियापदाला आरंभ अपभ्रंशानंतर अर्वाचीन भाषांच्या उदयकाळीं झाला असेंच म्हणावें लागतें. कारण यादव-मराठींत, प्राचीन हिंदींत संयुक्त क्रियापदें आढळतात. परंतु अपभ्रंशांत मात्र तीं नाहींत. अपभ्रंशांत आख्यातें आणि कृदन्तें यांच्या एकएकट्या रूपांवर काम भागविलें जातें. आख्यातांपेक्षां कृन्दतांचा वापर अपभ्रंशांत खूपच मोठ्या प्रमाणावर आहे हें खरें; परंतु दोहोंचा जोड होण्यास आरंभ झाल्याचीं चिन्हें मात्र त्यांत नाहींत. यादव-मराठींत व प्राचीन हिंदींत तीं चिन्हें आहेत. उदा०

संस्कृत	अपभ्रंश	प्राचीन हिंदी	प्राचीन मराठी
नमति	णमइ	नमता है	नमत आहे
नश्यति	णासइ	नसता है	नासत आहे

तेव्हां अपभ्रंश व अर्वाचीन भाषा यांमधील दुवा कोणता ?

---

१ मराठी भाषा, उद्गम-विकास, पान ३५९

यादव-मराठींत कृदन्तांना अस, आहृ (सं० अस्) व हो (सं० भू) या धातूंच्या रूपांची जोड होऊन संयुक्त क्रियापदें बनतात. या धातूंचीं आख्यात रूपें पुढीलप्रमाणें आढळतात.

अस (< सं० अस्)

लट् : १ असें २ असूं – असों ३ अससि ४ असां
५ असे–आथि ६ असती, आथि

विधिलिङ्: असिजे

आज्ञार्थे लोट् :	१ असों, असूं	२ असों	३ अस
	४ असां	५ असो	६ असतु
भूते लङ् :	१ असें	२ असों	
	३ अस‍स	४ असा, असां	
	५ असे	६ असत	
भविष्ये लुट् :	१ असताहें	२ असताहों	
	३ असतासि	४ असताहां	
	५ असता	६ असते	
भविष्ये लृट् :	१ असैन	२ असूं, असों	
	३ अससी–ल	४ असाल	
	५ असैल	६ असतील	
वर्तमान कृदन्त :	असत	सांत	

आहृ (< सं० अस्)

लट् :	१ आहें	२ आहों
	३ आहासि	४ आहां
	५ आहे	६ आहेति

इतर लकार नाहींत.

हो (< सं० भू)

लट् :	१ होई, होएं, होयें	२ होऊं, होवों
	३ होसि	४ होआ, व्हा
	५ होई, होए, होये	६ होंति

विधिलिङ् :	होइजे	
आज्ञार्थे लोट् :	१ हों, होऊं, होवों	२ होऊं, होवों
	३ हो, होई, होये	४ होआं, व्हां
	५ हो, होवो	६ होंतु
भूते लङ् :	१ होंई, होएं, होयें	२ होऊं, होवों
	३ होस	४ होआ, व्हा
	५ होई, होए, होये	६ होंत
भविष्ये लुट् :	१ होतांहें	२ होताहों
	३ होतासि	४ होताहां, होतां
	५ होता	६ होते
भविष्ये लृट् :	१ होईन, होईं	२ होऊं, होऊन
	३ होंसील	४ होआल, व्हाल
	५ होईल	६ होंतील
वर्त० कृदन्त :	होंत	

वरील रूपें कृदन्तांना लागून संयुक्त क्रियापदें होतात.

१ **वर्तमान कृदन्त + "अस–आह"** :— यांचीं रूपें पुढीलप्रमाणें आढळतात—

'तूं कां **जातासि**।' उद्ध० ११३ ; 'स्वरूप निजक्षेत्रीं : **असतुचि असे**।' उद्ध० ३००

'वनवावीं असती।' उद्ध० ५३; 'तो धडा असे घालिता।' ऋ० ६५

'देती आसी हे।' ऋ० १४६; 'रंगमाळिका **सुचिताए** खुणे।' ऋ० ४९१

'कवण साहातु असे घावो।' ध० उ० ३; 'भीक्षा करीतें असति।' स्मृ० ६२

'मी जन्म **गमीत असे**।' स्मृ० १६५; 'ते बाई थापनीती होती।' ली० १-१३

'तूं काहा **भीतासि**।' ली० ३–५४; 'कां (तूं) **पाजीतीएसी**।' दृ० ४४

'वर्णना **करावीसे**।' शि० ३२६; 'दोघें...भलीं **दीसतींति**।' शि० २१४

'कां **धावतुसां** वाउगियां।' शि० ६९५; 'साहतीसे, मातलीसी, करीतीसी।' शि० ६९४

'करितु आहों।' ज्ञा० ९–७; 'मिरवत असे।' ज्ञा० १–३
'इच्छितु असें जाणतें।' ज्ञा० १३–६; 'चिंतितु आहासि।' ज्ञा० २–१८०
'हे डुळकीताये तरि कां पाजीतीएसि।' दृ० ४४
'काइ **करितासि** : दूध **पीताएं**।' दृ० ४१

वरील रूपें यादव-मराठींतील संयुक्त क्रियापदाचीं म्हणून तर महत्त्वाचीं आहेतच; पण त्यांचें महत्त्व आणखी एका दृष्टीनें आहे. तें असें, कीं या संयुक्त क्रियापदांपासूनच वर्तमान-मराठींतील वर्तमान काळ सिद्ध झाला. राजवाड्यांचें मत असें नाहीं. त्यांच्या मतें वर्तमान कृदन्ताला लट्चे प्रत्यय लावून वर्तमान-मराठी वर्तमान काळ साधितें. जसें,

१	वट्टउं	वट्टहुं
२	वट्टसि	वट्टह
३	वट्टइ	वट्टति

या अपभ्रंशांतील रूपांचे '१ उं, २ हुं, ३ सि, ४ह, ५ इ, ६ ति' हे प्रत्यय राजवाड्यांच्या मतें वर्तमान कृदन्ताला लागतात, आणि

करितु + उं = करितों (पु०)
करितीं + उं = करित्यें (स्त्री०)
करितें + उं = करितें (नपुं०)

अशीं रूपें बनतात. राजवाड्यांचें हें मत भाषाशास्त्रदृष्ट्या अयुक्त आहे. वर्तमान कृदन्तांचा क्रियापदांसारखा स्वतंत्र उपयोग रूढ असतांना पुन्हां त्यांना लट्च्या प्रत्ययांची आवश्यकता भासण्याचें कारण नाहीं. उलट यादव-काळीं संयुक्त क्रियापदें होतींच; म्हणजे सामासिक आख्यात विभक्तीला आरंभ झालेला होताच. याचीच वाढ पुढें वर्तमान-मराठींत झाली. ज्ञानेश्वरींतील पुढील रूपें पहा—

"तूं अझुइ कां न विचारिसि। काइ हें **चिंतितु आहासि**।" ज्ञा० २–१८०
"हें जूंझ नव्हे प्रमादु। येथ प्रवर्तलेयां **दीसतसे** बाधु।" ज्ञा० २–३१
"तरि तेचि येतुलां अवसरीं। काय **कीजतसे** येरएरीं।" ज्ञा० १–८७

---

१ ज्ञानेश्वरीचें व्याकरण, पान ११४–११५

"तैसें **विवरीतु असे** अनंतु। ..." ज्ञा० २–८७

"तेथ बाणवरि धनुर्धर। **वरिषताति** निरंतर।" ज्ञा० १–१६६

वरील रूपांची मीमांसा केली म्हणजे खालील संयुक्त क्रियापदें कल्पितां येतात—

	ए० व०	अ० व०
१	मी वर्तत असे, आहे	आम्ही वर्तत आहों, असों
२	तूं वर्तत आहासि	तुम्हीं वर्तत आहां, असां
३	तो वर्तत असे तो वर्तत आहे	ते वर्तत आहाति, आति

यांतील कृदन्ताच्या व अस–आहच्या रूपाच्या संयोगापासून वर्तमान मराठीनें वर्तमानकाळ साधला. वस्तुतः तो वर्णप्रक्रियेच्या नियमांनींच सिद्ध होतो. वर्तमान-मराठींत एकवचनीं 'तो' कसा आला याचें डॉडेरेटनें[१] केलेलें विवेचन योग्य आहे. तो म्हणतो—

"It is significant to note that while the plural has practically still retained its archaic form, the 'O' model is already present in the archaic First Person plural. Thus, the 'O' impetus was communicated in a natural mannar from First Plural to First Singular and subsequently to the Second and Third sing. of modern present definite. The 'ta' form of the present participle had nothing to do with the "organic" evolution of the modern present definite."

तात्पर्य प्रो० ब्लोकँ[२] मानतात त्याप्रमाणें हा 'तो' म्हणजे 'ता' चा पर्याय नसून त्याची स्वतंत्र सामासिक उपपत्ति आहे. तसेंच राजवाड्यांच्या मताप्रमाणें वर्त० कृदन्त + लट्चे प्रत्यय यांपासून वर्तमान मराठींतील वर्तमानकाळाची उत्पत्ति नसून ती यादवकालीन संयुक्त क्रियापदांपासून आहे.

---

१ Grammar Of Jnyanesvari, B. S. O. S. Vol. IV, pp.560–67

२ La Langue Marathe, 237

२ भूत कृदन्त + क्रियापदाचीं रूपें :—

"(मी) घायेवटलां असे।" उद्ध० २३५
"तूं देखिलासी।" उद्ध० २०९
"तुम्ही आले होतेती।" स्मृ० १९८
"तुम्ही म्हणत होतीती।" स्मृ० १९७
"पाहाविले होते।" स्मृ० २२०
"ते धाले जाति।" दृ० ८
"अवघा जनु थकला ठेला असे।" लीला० ३
"मी बोलवीत गेलीये होतीये।" लीला० ३-४७

§ ५२ संकेतार्थ

प्रथम संकेतार्थी रूपें देतों—

"हेंचि थोडें गा वानणें। जें **बुझतासि** तूं॥" ज्ञा० १८-१३३१
"जो अभिलाखित मनोरथु चि। **पुरविता**।" ज्ञा० १-२७
"मी **वधिता** हे **मरते**। म्हणतु आहासि।" ज्ञा० २-१३७
"देव न **करिते** बळोबळि : तरि अमृताची पानकेळी : केवि **करिते**।" उद्ध० २२२
"परि **उचावता** त्रीकु : तरि प्रभुस्वरूप **भणतों**।" ऋ० ५.४६
"वाटिभरि तुपा **जेवितासि** तरि प्रीतीचें प्रमाण **राखतें**।" स्मृ० ४५
"हेंचि जरि सर्पु **खाता** : तरि कवणिं मायेचा पोटीं **रीगतां**।" स्मृ० २५
"कवणु संहारु **करिता** : तरि तेयातें उपाओ **पुसजिता**।" शि० ८४०
"यन्हविं थडीए **पडतां** : तरि हाडगुड **नुरतें मरता**।" लीला० १-४७

वरील रूपें संकेतार्थी होत हें स्पष्टच होय. संस्कृतांतील लुट् पासून यांची राजवाड्यांनीं लाविलेली उपपत्ति कशी अशास्त्रीय आहे हें मीं याच भागांत क्र० ३८ मध्यें दाखविलें आहे. वस्तुतः हीं रूपें म्हणजे संयुक्त क्रियापदेंच मानिलीं पाहिजेत. त्यांची मीमांसा अशीः—

वर्तमान कृदन्त + 'हो' धातूचीं रूपें = संकेतार्थी रूपें

प्रथम व द्वितीय पुरुषांत धातूच्या वर्तमान कृदन्ताला 'हो' धातूच्या रूपांचा जोड होऊन संकेतार्थ बनतो, तर तृतीय पुरुषांत 'हो' च्या रूपांवांचूनच म्हणजे केवळ वर्तमान कृदन्तानेंच तो साधला जातो. जसें—

१	पडत + आहें	पडत + आहों
२	पडत + आहासि	पडत + आहां
३	पडता–ती–तें	पडते–तिया–तीं

वरील उपपत्तीला इतिहासांत आधार आहे. महाराष्ट्रींत वर्तमान कृदन्ताला असेंच सहाय क्रियापद लागून संकेतार्थ होई. हेमचंद्राचें पुढील सूत्र पहा—

"क्रियातिपत्तेः स्थाने न्तमाणौ आदेशौ भवतः । होन्तो । होमाणो । अभविष्यदित्यर्थः ॥"—प्राकृतव्याकरणम्, ३-१८०

अपभ्रंश-ग्रंथांतून हीं रूपें नित्य येतात. मात्र पुष्कळ ठिकाणीं सहाय क्रियापदाचा जोड न करतां, केवळ वर्तमान कृदन्तच संकेतार्थी वापरलें जातें. उदा०—

"जइं दउनिं तेणसह तउ **करंतु** तो किं असमाहिए सहु **मरंतु**।"—भवि० २१-१

"जइं पढमउं **जिहंतु** तुह एहउ तो किर को **मरंतु** मणि रेहउ।" भवि० २–५

हीच परंपरा यादव-मराठीनें पुढें चालविलेली दिसते. म्हणजे वर्तमान कृदन्ताला संकेतार्थ प्राप्त होणें हा आर्य भाषांचा स्वभावच दिसतो. बंगालीमध्यें हाच प्रकार आहे. एतावता, 'भविष्ये लुट्' शीं या संकेतार्थाचा संबंध नाहीं. दोन्ही सारखे दिसतात एवढेंच. प्रो० ब्लोक यांनीं साधारणतः अशीच उपपत्ति मांडली आहे.

---

१ J. Beames : Comparative Grammar, Vol. III pp. 129

२ J. Bloch : La Langue Marathe, 244–245

§ ५३ सहाय क्रियापदें (Ancillary Verbs)

यादव-मराठींत संयुक्त क्रियापदें आहेत, त्याप्रमाणें सहाय क्रियापदेंहि आहेत. हीं कृदन्तांशींच जोडलीं जातात व विशेष अर्थ दाखवितात. पुढें कांहीं सहाय क्रियापदें ससंदर्भ देतों—

१ जा (< सं० या)

"भावाचा फुलौरा होंतु जाये। मतिवरी।" ज्ञा० ९-२७
"तो प्राणातें घेऊनि जाये।" ज्ञा० ३-२०९
"एथ चित्तपण समरसें। विरौनि जाये।" ज्ञा० ६-३६७
"पैं आटौनि गेलेयां सागर। मग तरंग ना नीर।"–ज्ञा० १५-४७३

१–अ : जाल (< सं० जात–भूत कृदन्त 'जन्' चें)

"ते विदेहाचां पाटणीं : पुर्वी असती जाली।" उद्ध० ३७६
"तो तियें आपेंपरु : लाहातीं जालीं।" ऋ० ९७
"अवधारां कृष्णु ऐसें। बोलते जाले।" ज्ञा० ९-३३

२ ये (< सं० ज्ञाय–कर्मणि)

राजवाड्यांच्यां[१] मतें 'ये' हा 'ज्ञा' चा अवशेष आहे. ज्ञाय कर्मणिपासून ते 'ये' हा कर्मणि धातु व्युत्पादितात. त्यांचें म्हणणें बरोबर वाटतें. महाराष्ट्री अपभ्रंशावरून याला पुष्टि मिळते. पहा—

"अमिअं पाउअकव्वं पढिऊं सोऊं अ जे ण आणन्ति।"
(गाथासप्तशती) १–२

"अमृतं प्राकृतकाव्यं पठितुं श्रोतुं च ये न जानन्ति।" (सं०)

अशाच अर्थी तें मराठींत येतें. जसें,

"तरि तें सांडी विखुरीं गेलें। **म्हणों ये** काइ।"–ज्ञा० ९-३९
"म्हणौनि गुज तुम्हीं तुझां ठाइं। **लपौं नेए**।"–ज्ञा० ९-४१
"तयांवरि पावो **देऊंचि न ए** : तथा **ठेऊंचि न ए**।"–द० २६
"परि समग्रें अंधकारीं : **राहाटों नये**।"–उद्ध० २९७

१ 'राजवाडे लेखसंग्रह' भाग २, पान १४–१५

२ ज्ञानेश्वरीच्या नवव्या अध्यायाचें संस्कृत भाषांतर, राजवाडेकृत, पान १८ (धुळें, शके १८५६)

" तूप रोटिया भरित **जेऊं ये** : आणि माझें **घेऊं नये** । " स्मृ० ७२
" तेथ ब्रह्मचर्याचिये सौरिये : केंवि **पुरवाति ये** । " ऋ० ३४७

३ दे (< सं० दा)
" तुज ज्ञानविज्ञान तैसें । वांटूनि देऔं । " ज्ञा० ९-४४
" कफपित्ताचे थारे । उरों नेंदी । " ज्ञा० ६-२१७
" सेजे आणिकासि रीगों नेंदी । " दृ० ८५

४ घाल (< ?)
" अमरपण उचिता । देउनि घली । " ज्ञा० १५-५५०
" न व्हाये तरि घालावें । मोकळूनि । " ज्ञा० ६-३८०

५ ठाक (< सं० स्था)
" देहिं जेयाची अहंता । बुडौनि ठेली । " ज्ञा० १५-३९४
" तेयां पुनरावृत्तीची वाट । मोडोनु ठेली । " ज्ञा० १५-२८८
" तैं होउनि ठाके सवंसारु । मोक्षमयु । " ज्ञा० १५-२४
" तें पातेंचि ठेली । दुखों ठेलें । " लीला० ३

६ लाग (< सं० लग्)
" जाल पडों लागे कर्मभ्रष्टां । भुलौनियां । " ज्ञा० १५-१९८
" मग लागला जवं पाहों । तवं ज्ञान तें तोंचि । " ज्ञा० ६-८८
" मग ते मोहाची तुगुटी । नाचों लागे । " ज्ञा० ६-१२१
" श्रोतेयां विनती : सुआवी न लगे । " उद्ध० १३
" संबंधु दीधला देवें : भणौनि लागती वाणावे । " ऋ० ३५५

७ पाह (< सं० प्रार्थ्)
" म्हणौनि घोंटु भरुं पाहे एकसरा । आघवेयाचा । " ज्ञा० १५-७०
" दिठी जाकलोनि निगों पाए । ' ज्ञा० ६-२६७

८ राह (< ?)
" मग सौम्य होउनि राहे । सुषुम्नेपासीं । " ज्ञा० ६-२४०

वर कांहीं सहाय क्रियापदें दिलीं आहेत. संयुक्त क्रियापद आणि सहाय क्रियापद यांच्यामुळें यादव-मराठी चांगलीच सुसंपन्न झालेली दिसते. श्री० नेनें[1]

---

१ ह० ना० नेने : ज्ञानेश्वरकालीन मराठी (ज्ञा० दर्शन, साहित्यखंड, पान ४५)

यांनीं 'लाग' धातूचीं साधारण २५ विविध रूपें दिलीं आहेत तीं आख्यात-विभक्तीची विविधता दाखवितील. येथवर आख्यातांचें प्रत्ययी, कृदन्तात्मक व सामासिक असें तिहेरी स्वरूप पाहिलें. पुढें क्रियाविशेषणांचा विचार करितों.

§ ५४ निपात

निपातांचे क्रियाविशेषणें, उद्गारवाची, उभयान्वयी व पादपूरक असे भेद राजवाडे करतात ते योग्य होत. यादव-मराठींतील निपात चार तऱ्हांनीं सिद्ध होऊं शकतात.

१ विभक्तिरूपांपासून—हे बहुधा तृतीया आणि सप्तमी यांवरूनच निघतात. जसें – वेगें, विशेषें, स्वभावीं.

२ सर्वनामांपासून—आनौतें, एउता, जें, कैसें, जैसें, ऐसां.

३ जुन्या निपातांपासून—आजि (< सं० अद्य), पुनै, कीरूं.

४ निपातात्मक शब्दांपासून—बापु, पहातेआं, वहिलें.

राजवाड्यांची निपातयादी ज्ञानेश्वरीपुरती संपूर्ण असली तरी तींत उदाहरणें नाहींत. शिवाय महानुभावी ग्रंथांतून त्यांशिवाय अनेक अधिक निपात येतात. तेव्हां दोहोंची यादी राजवाडे पद्धतीनें खालीं देतों—[१]

§ ५५ पादपूरक निपात

१	चि	प्रा०	चिअ	सं० चित् (तैसीचि, ठाओचि)
२	हि	प्रा०	भि	सं० अपि (तयाही, जालेयांही)
३	इ	प्रा०	विवँ	सं० इव (माझेनि, देऊनि)
४	पैं	प्रा०	प्पइ	सं० त्वै (स्मृ० ११४)
५	पां			सं० बत (ऋ० ४३, लीला० १–१४)

१ ही व पुढील यादी म्हणजे राजवाडे यादीच्या (ज्ञा० व्या०, पा० १३५-१४४) नकला नव्हत. राजवाड्यांनीं न दिलेले असे कांहीं ज्ञानेश्वरींतलि व इतर महानुभावी ग्रंथांतील निपात येथें संदर्भांसह देत आहें. अपभ्रंश उदाहरणांकरितां 'णायकुमारचरिउ' व 'भावनासंधिप्रकरण' यांचा उपयोग केला आहे.

२ णायकुमारचरिउ, ३-८-३

६ कीरु, की	सं० किल (उद्ध० १६८, शि० १२४)
७ हान	सं० हन्त (ज्ञा० ९-४२)
८ तंर	सं० तर्हि (उद्ध० ६९४)
९ पुण <पुणअ, पुणउ सं० पुनर्
" म्हणौनि मज आत्मारामा : पुण पढियेती ।" उद्ध० ८०४
१० तंव (सं० तावत्) = तर
" सर्वज्ञ तंव जाणताति आमुचा । पूर्वापारु ।" ऋद्ध० २६७
" उदक तंव लागैल ।" स्मृति० द० ६
११ इ (सं० अपि-हि-इ) लीला० १-१५
१२ नु (सं० नु) शि० ४७०

§ ५६ उद्गारवाची

१ जय (सं० जय)	२ जी (सं० जय)[2]-उद्ध० ५८
३ नमो (सं० नमस्)	४ अगा, हांगा, गा -स्मृ० ३६
५ हांहो, हांहोजी - शि० १०३१
६ हे, रे, आरे, ओ, वो, अवो, वा, आहा बा, आरेरे
७ अहो जी, होजी, हांजी-ऋद्ध० ३२६, २७४
८ पां -ऋ० ४३
९ बापु -ऋ० २४
१० कटकटा -ज्ञा० ११ - ३९५, उद्ध० ११४, स्मृ० ९३, १३९
११ उगें
" पुण्यातें म्हणे उगें : नावेकवेऱ्ही" -उद्ध० १८८
१२ ना (सं० न) " म्हणौनि भलेतेया । ज्ञानप्रकाश ना ।"
-उद्ध० ६२७; ऋद्ध० २४८
१३ पुरे-" म्हणे स्वर्गसुखातें पुरे ।" - ऋ० २१४
१४ आइ —स्मृ० ७७

---

१ सामान्यतः हें उभयान्वयी असतें. पण खालील उदाहरणांत केवळ पादपूरक आहे.
" तर श्रीकृष्णराओ बोलिला ।" उद्ध० ६९४

२ राजवाडे 'आर्य' पासून व्युत्पादितात. ज्ञा० व्या०, पान १३६

१५ हारे, व्हो –लीला० १–३३, वच्छ० ८३
१६ हो कां जी –लीला० १–५८
१७ है रे, हां रे –लीला० ३–४९, वच्छ० ९५
१८ ना वो आइ–दृ० ५९
१९ बापु रे चोज–शि० २७८
२० हों काज (= हो काय, जणुं काय)
"कीं हो काज भवज्वरा : शांति जैसी।"–ऋ० ३९५
"भणौनि हों काज घेतलें मिषु।"–शि० ८३
२१ आवो आवो –शि० २१८
२२ होहो –ज्ञा० ६–१४२

§ ५७ उभयान्वयी

१ जवं-तवं (सं० यावत्-तावत्) –उद्ध० ५९, लीला० १-६४
२ पुण-णु (सं० पुनर्) –उद्ध० ७०
३ जै-तै
४ कीं (सं० किंवा) –ऋ० १८६
५ के (= आणि) "वच्छपद के समुद्र।" ऋ० २८८
६ तवंचिवेऱ्ही –ऋ० ११८
७ वरि (सं० उपरि) = शिवाय
"मी सर्वभूतीं असें अहर्नीसी। वरि देह तें तूं नव्हेसि।" –उद्ध० १५५
"ऐसा जात्यंधु अधस्तु। वरि भवरोगीं ग्रस्तु।"–ऋ० ७
"तो अध्याय सहावा। वरि साहित्याचिया बरवा।" –ज्ञा० ६-१३
ऋ० ३०, ४४५, ज्ञा० ४–१९१
८ नावेकवेऱ्ही –उ० १८८
९ आनीक (सं० अन्यत्क)
"आनीक आचारें पवित्रता। होए तीर्थकुता।"–उद्ध० २८२
"ब्रह्मासि आणिक जीवा। स्वरूपें भेदु जाणावा।"–उद्ध० ५८६
१० ऐसांही ('ऐस' याची सप्तमी + हि) = असें असतांनाहि
"ऐसांही जीवांसि संसारु। तो येणेंचि कारणें।" उद्ध० ६२०

११ जें (सं० यत्) = कारण

"...भीचि गेलां बरळु। जे इयेचा मस्तकु तळु। पायेचि ना।"
उद्ध० ७५४

"निकियापरि संतोषला। जे संवादु फावला।" ज्ञा० ६-८

"न लगे श्रोतेयांसि कडसावें। जे अधिकारिये।" ज्ञा० ६-२७

१२ फुन–पुन (सं० पुनर्) ऋ० ४१२ (शिवाय, वर)

"पुन हे प्रकटली श्रीचक्रपाणी। तो कळसोद्धऊ।" ऋ० १०

१३ पुनै (सं० पुनरपि) –ऋ० २४३

१४ जें (सं० यत्) = कीं; ऋ० २९६

"इये ह्याचि उपाओ : जे मिळे यादवराओ।" शि० ८४६

१५ जेव्हळीं, तेव्हळीं, केव्हळीं –धवळे पू० ६०

१६ तंव--मा

"आतां तंव माझिये दसेचा नव्हे : मा तुमचिये दसेचा कांइ होइल।"
स्मृ० १९

१७ येवंपर्यंत –स्मृ० ३०

१८ येऱ्हवी (सं० इतरथा अपि) स्मृ० ३०

१९ जंवजंव–तंवतंव (द्विरुक्त) = जों जों – तों तों

"जंव जंव जाणता : तंव तंव नेणता।" स्मृ० ६७

२० मां (= तर)

"मी काइ चोळीका महात्मा : मां हें आणलें असें।" स्मृ० ९९

"हें नव्हे मां रोकडें।" ज्ञा० ११–३८६

२१ मगा–आतां (= मघांशीं आणि आतांहि)

"मगा तरि मगा : आतां तरि आतां।" लीला० २–१३

२२ ना तरि –शि० ५९७, ज्ञा० ६–११७

२३ जेवि, तेवि, केवि – वच्छ० २१७

२४ आणि (सं० अन्यत्क)

२५ कां (सं० किम्) = अथवा

"दिठींचि पाहतां निविजे। कां तोंड भरौनि बोलिजे।"
ज्ञा० ६-११७

"तेथ सुहृद आणि शत्रु। कां उदास आणि मित्रु" ज्ञा० ६-९४

२६ तरी करितां

" तैसी गुरुकृपा होए । तरी करितां काय आपु नोहे " ज्ञा० ९-३५

२७ म्हणौनि (सं० भणित्वा)

" म्हणौनि भक्ति गा एथ सरे । जाति अप्रमाण । " ज्ञा० ९-४४८

२८ वांचौनि-वांचूनु

" वांचूनु या वेगळें । रूप करणें हें न मिळे । " ज्ञा० १३-८४५

" वारा अभाळचि फेडी । वांचौनि सूर्यातें न घडी । " ज्ञा० १८-१२२५

२९ आणि (= तर)

" गोसावियांचेया जाल आणि (= तर) होइल । " लीला० ३-३०

३० तरि (= सुद्धां, शिवाय)

" कालि तरि कालि आलियांत : आजि तरि आजि आलियांत । "
(= कालहि, आजहि) ली० ३-३९

३१ तंवं (= पर्यंत)

" धायतवं खाइजे : पाहे तवं निजिजे । " लीला० ३-४९

§ ५८ क्रियाविशेषणें

१ माघौतें, माघौतीं, – उद्ध० ५३, ३२३

२ पुडुतीं – उद्ध० ७८, ज्ञा० ८–२६१, १८–१७८८

३ स्वभावीं (सं० स्वभावेन) – उद्ध० ८०, १६६

४ अवचिते – उद्ध० १०१

५ निन्हां – उद्ध० १३४, वच्छ० ८२, ज्ञा० १७–२४८

६ आझुइं (सं० अद्यापि) – उद्ध० १३५, शि० ७८

७ वेगांचि (सं० वेगेन) – उद्ध० १३८

८ मागां – उद्ध० १४०, ऋ० ४९६

९ सवें – उद्ध० १८०, ऋ० ५३९

१० बहुतकरुनि – उद्ध० १८३

११ विशेषता (सं० विशेषतः) – उद्ध० २२४

१२ भलेतेया परी – उद्ध० २२६, ३१३

१३ अवचटा (= अकस्मात्)–उद्ध० २३०, ५१९, ह० ७७
१४ सहसा (सं०) – उद्ध० ३२९, ऋ० ५८
१५ देखतखेवों – उद्ध० ३६०, ७७०
१६ गरगरां – उद्ध० २०९
१७ आनौतें (सं० अन्यतः) – उद्ध० ३८०, ऋ० ५६७, ज्ञा० १२-७९
१८ वायांचि (सं० व्यर्थ) – उद्ध० ३८३, स्मृ० ३२
१९ आंतु-बाहिरि – उद्ध० ३८६
२० निडें (सं० निकट) – उद्ध० ३९८
२१ असासीतु – उद्ध० ४४८, ३२५
२२ वरुतीं-वरौतीं (सं० उपरि) – उद्ध० ४९७
२३ हळु-हळु (सं० लघु) – उद्ध० ५२३
२४ वायांविण (सं० ब्यर्थ + विना) – उद्ध० ६२६, शि० १३५
२५ घडिभरि – उद्ध० ८०२
२६ निरंतरीं – रुं, – उद्ध० ७८५, शि० ३६
२७ ऐकेंवेळें (= एकदम) – उद्ध० ७५२, शि० १३८
२८ एकाकी – उद्ध० ७२७
२९ वेळोवेळां – उद्ध० ६८६
३० पूर्वीं – उद्ध० ६६६
३१ तडकु (= सपाट्यानें)–उद्ध० ६४८ "अंधकारु धाडी तडकु : रविराजुचि ।"
३२ फुकांचि – उद्ध० ६१७
३३ रात्रिदेओ (रात्रि + दी) – उद्ध० ५०१
३४ जेवि, तेवि, केवि
३५ कें – ऋ० २५१
३६ कहीं (सं० कदापि) – ऋ० २८६
३७ सापें (< संपई < संप्रति) – ऋ० १२४, स्मृ० ७१
३८ विपायें – ऋ० १७९
३९ साउमा (सं० संमुख) – ऋ० ८२
४० आपेंपरु – ऋ० ९७

४१ सुखी (सं० सुखेन) – ऋ० १५५ "रमती सुखी : मानसीं आपुलांचि।"
४२ सैरा (सं० स्वैर) – ऋ० ३१३
४३ आपें आपें (सं० आत्मन्)–ऋ० ३४८
४४ हावा (= निश्चयानें) – ऋ० ३६७
४५ सदा (सं०)
४६ सदाकाळु (सं०) – ऋ० ४५२
४७ पुढारा (सं० पुरतस्) – ऋ० ५६०
४८ दुरि (सं० दूर) – ऋ० ६३४
४९ सरिसु (= सह) – धवळे पू० २३
५० जेथ, तेथ, जेथचि तेथ (= जेथें तेथें) – धवळे पू० ३३
५१ पुनती पुनती (सं० पुनर्) – धवळे पू० ५३
५२ तळउपर (सं० तले + उपरि) – धवळे पू० ७१, ज्ञा० १३-४१७
५३ मधीं (सं० मध्ये) – धवळे उ० २८
५४ भलतेधवां – स्मृ० ३४, १३५
५५ वायें वायें (सं० व्यर्थ) – स्मृ० ३४, "वायें वायें ओळखीचेया घरा न वचावें।" स्मृ० ५८, शि० १०३२
५६ पैल, पैलाकडूनि
५७ पैन्हां – द० २९, स्मृ० ८०, लीला० १ – १२, ३–३७
५८ मागीलाकडूनि, मागिलाचि, मागौतिआं – स्मृ० ७९ तें ८४, शि० ९०८
५९ सामोरें (सं० संमुखर) – स्मृ० २०४
६० ऐलाडि, पैलाडि – लीला० ३, द० ६, ज्ञा० १३-८४०
६१ वरिलाकडे, खालिलाकडे, ऐलीकडे – लीला० १–४८, ज्ञा० ९-५१
६२ आजिलागौनि, तैं लागौनि (= पासून) – स्मृ० ८९, १०७
६३ जैं, तैं, तैंहूनि – स्मृ० ११३
६४ दिसवडी (= रोजरोज) – स्मृ० १०१
६५ सावेया (सं० स्वभावतः) – स्मृ० १२२
६६ आजि (सं० अद्य) – ऋ० २१२, शि० ६८

६७ कालि – स्मृ० १६७, लीला० १–१७
६८ बाहीर-बाहिरी (=बाहेरच्याबाहेर) – स्मृ० ९७, १५२, शि० ४९४
६९ भलतेथ, भलतया, भलतैसें – स्मृ० २४१
७० जवळां (सं० युत + ल) – स्मृ० २६१
७१ लवलव (सं० लघु) – लीला० १–४
७२ अरुते (सं० अरतस्) – लीला० ३
७३ परुते (सं० पुरतस्) – लीला १-२४
७४ काहा, काह्या (सं० किंहि) – लीला० ३-५४
७५ झडती –दृ० ९८
७६ आंतुल-बाहिरिल – दृ० १-२
७७ नावेंक (सं० नामएकं) – शि० १३४, ज्ञा० ७-१८०
७८ स्वभावतू (सं० स्वभावतः) – शि० ७१
७९ पुढां (सं० पुरतस्) – शि० १०७४
८० वरिचा वरि (सं० उपरि) – शि० १००८
८१ झडकरौनि, झडझडौनि – शि० ५११
८२ जेउतीं, तेउतीं, केउतीं, – शि० ८२८
८३ सहजे (सं० सहज) – वच्छ० २७, ज्ञा० ९-२६
८४ आधीं (सं० आद्य)
८५ येथौनि, जेथौनि, तेथौनि, कोठौनि
८६ अळुमाळु (सं० अल्पमल्पं) – शि० ४१
८७ नावां नावां (वारंवार) – ज्ञा० ९-४२, १६–१७८
८८ आहाचु (वरवर) – ज्ञा० २–३९, ६–२५
८९ नावभरि (क्षणभर)
९० खेंव-वो (" देखतखेंवो, उदैजतखेंवो ") – ज्ञा० १६-१४
९१ अऱ्हां-परौतें (इकडे-तिकडे) – ज्ञा० १५-७५
९२ पुढां माघौतें (पुढें-मागें) – ज्ञा० १५-७५
९३ एकसरें (एकदम) – ज्ञा० ६-१५५
९४ **चौम्हेरि** (चतुर् + मेर) = चहूंबाजूंस –ज्ञा० २-२००
" ना तरि अरण्यीं शव सांडिजे । तें **चौम्हेरि** गिधिं विदारिजे । "

कोंकणींत 'मेर' हा शब्द 'सीमा, बाजू' या अर्थी आहेच. राजवाडे या निपाताचा उल्लेख करीत नाहींत.

९५ **सांविया-संविया** (हें खालील तीन भिन्न भिन्न अर्थी येतें)
(= निःशेष) " मना येया बाहीरिलीकडे । येयावेयाचि सवेचि सावियां मोडे । " ज्ञा० ८-१०९
(= योगायोगानें) " परि सांव्हिआं हि उंच होइल । तरि आंग हान डोलैल । " ज्ञा० ६-१८४
(= तात्काळ) " जें अमृतही परी नावडे । ऐसें संवियांची अरोचक जैं पडे । " ज्ञा० ४-१९५

९६ **झणें–झणि** (नकारार्थी)
" इंद्रियांचां चाकवरां : झणें भवसि गरगरां । " उद्ध० २०९
" जरि ब्रह्मयाचेनि सळें : झणें उठीति कव्हणें वेळें । " ऋ० ४३४
" झणीं माय करिसी चिंता यादवांचा रावो कृष्ण पाहे वो । "
धवळे पू० ३२
" परि पार्था हें झणें । सायास घेसि हो मनें । " ज्ञा० ६-३५
हिंदींत '**झिन**' हें अव्यय याच अर्थी येतें. पहा–
" चल भाई **विलम झिन** "=विलंब करूं नकोस.

९७ **झिन्न** (= चटकन्) यावरूनच आधुनिक 'झाणिं' निघालें. या 'झणी'चा व यादव-झणीचा संबंध नाहीं. उदा०
" मुरडतां झिन्न वेगु : डोळां सुजावती ना । "–शि० १०१२

९८ **ऐसां** (= असें असतांहि. 'ऐस'ची सप्तमी)
" ऐसांही झाडिजे तरि घड तुटे परि झडेना । "–दृ० ५६
" ऐसांही मीठ मीरपुडी लाऊनि खाइजे तरि तोंडीं खतचि पडे । "–दृ० ३१

---

१ हिरालाल : छत्तीसगडी बोलीचें व्याकरण, पान १४४
२ हें विशेषतः महानुभावी गद्यांतच आढळतें.

९९ **मा** (त्रिवार)

" तो कहींचि नुधरे : मा नुधरे : मा कहींचि नुधरे । "–स्मृ० ३५

१०० **हों का** : " ना तें हों का सेजार : परसुखाचें । "–ऋ० २२५

यांखेरीज सर्वनामांपासून साधित अशीं अनेक अव्ययें यादव-मराठींत आहेत. परंतु त्यांची यादी राजवाड्यांनीं समग्र दिली असल्यानें येथें देण्याचें कारण नाहीं. राजवाड्यांची ज्ञानेश्वरीपुरती निपात-यादी पाहिली म्हणजे महानुभावी ग्रंथांत तदितर अनेक निपात येत हें स्वच्छ दिसतें. "झिन्न, तवं–मा, थैक, तडकु " वगैरे निपात ज्ञानेश्वरीबाहेर आढळतात. वर दिलेली यादी अर्थात् संपूर्ण नाहीं, परंतु निपातांचा विस्तार तीवरून समजेल. अपभ्रंशांत निपात-विस्तार एवढा नव्हता हें " भावनासंधिप्रकरण " व " सावयधम्मदोहा " या ग्रंथांवरून दिसतें. तरीहि प्राचीन मराठींतील बरेच निपात अपभ्रंशावरूनच सिद्ध होतात हें खरें. अशांची व्युत्पत्ति मीं त्या त्या स्थळीं दिली आहे. तात्पर्य, निपात-प्रकरण मराठीनें अपभ्रंशद्वारा घेतलें, व स्वतंत्र रीत्या विस्तृत केलें.

भाग तिसरा

शब्दसिद्धि, प्रयोग, वाक्यरचना, अर्थप्रक्रिया

इत्यादि

§ १ शब्दसिद्धि

यादव-मराठींत शब्दसिद्धीचे महत्त्वाचे प्रकार खालीलप्रमाणें आढळतात—

(अ) तद्धितप्रक्रिया	Formatives
(आ) ध्वन्यनुकारी	Onomatopoeia
(इ) सादशब्द	Echo-words
(ई) आम्रेडित	
(उ) सामासिक व द्विरुक्त	Reduplicatives
(ऊ) अकरणदर्शक	Negatives
(ए) नामधातु	Noun-verbs
(ऐ) क्रियानामें	Verbal Nouns.

§ २ तद्धितप्रक्रिया

यादव-मराठींत साधित शब्दांची संख्या विपुल आहे. ज्या तद्धित प्रत्ययांनीं हे साधित शब्द बनले आहेत ते मुख्यतः महाराष्ट्री व अपभ्रंश यांच्या द्वारा आलेले आहेत. पुढें कांहीं तद्धितप्रत्यय त्यांच्या विशेषांसह देतों—

अक (< सं० अक) : देशकु, थडक

इक (< सं० इक < अप० इक्क) : सोइरिक, वऱ्हाडिक, वैसिक, पेखणिक, वारिक

उक (< अप० उक्क) : सामानुक, निरवणुक, झळंबुक, जाचणुक

इव : भारिवा, खडीव, आवारिव, राणीव, हष्टीवा, वाठीव, सोलीव, सांबारीव

इउ (< सं० इव) : कांतिउ, वोतिउ, थळिउ
आळा : कुरुवाळा, जीवाळा, करुणाळा, कांटाळा, पाटोळा, गुंडाळा
आळी : विह्याळी, मांचळी, जुआळी, पांसाळी
वळ : देशवळु, सेजवळ
आळु : (सं० आलु) : पाखाळु, उजाळु, सियाळु, इसाळु वेल्हाळ, वंचळ
आळ : घोंसाळ, शिसाळ, चविढाळ, महंचळ, ढसाळ, खडुळ
उत : धडौता
इत : वेळाइतु, रिणाइतु
ल-ली : साइली, माणिकुल, पातुली, इवल, तेथल
लें : (हीनत्वदर्शक) : जीयालें, थोकलें, आंगलें
ल : (स्वार्थे) : एकल, दादुल, बाइल, वडिल, उगेला, माउली
इल : (सं० इल; प्रा० इल्ल) : आदिल, वरिल, पहिल, बाहिरिल, पूर्वील
ठां : (सं० स्थः) : घरठा, वसैठा, कामिठा, आगिठा, मांगठा, चव्हाठा, पाणोठा
डें : (हीनत्वदर्शक) : रूपडें, रांकडें, बापुडें, थोबडें, निऱ्हावडें
डा : निबरडा, उखरडा, वारुडा, दुधडा, धादुडा, वेगाडा
डी : उत्तरडी, राखौंडी, झांपडी, बांधौडी, सेतडी, लहुडी
वट : वायेवट, घडिवट, सींगवट, वळिवट, पायेवट
वड : लळेवडु, वाघवड
अस-इस : डोळस, गोडिस
रा : मोकरा, धुळौरा, फुलौरा, केदारा, उबारा, गोडिरा
री : दांतिरी, खुलैरी, उजिएरी
रूं : गोवळरूं, बटिकुरूं, गोरुं, हावरु, पाझरु, उपंढरु, गोवरु (तासगांव ताम्रपट)

---

१ " कामतामध्यें चहवंटा। " – पाटण शिलालेख, ओळ २५

ट : वरवंट्ट, थेंबट्ट, घरटी (स्त्री०), तांबट, चोखट, वंकट, सानटें, चिरटी, धाकुट, भिंगुरटी, कोनट, थोरट

वन : बोळावन, सांटवन, आंगवण, विसंवण, कालवण, वोल्हावन, माजवन

वाण : लोणवाण, केळवाण

लग : वाणलग, आंगलग

णी : चोखणी, चोवणी

वणी : हातवणी, पायेवणी, मुळवणी, बुझावणी, विणावणी

कारू : जीळीकारू, माळेकारू, फुटाणेकारू, मोलकरू, घोडेकारू, कातेकारू, कासोटेकारू

इप : कुळीपु (शि० ८६१)

च : (सं० त्यत्) गांवच, एथच, तियेच

§ ३ भाववाचक नाम

भाववाचक नाम साधण्याचे तद्धित-प्रत्यय खालील प्रमाणें आढळतात–

१ पण : (< अप० त्तण–प्पण < प्रा० त्तण < सं० त्व) चोखाळेपण, पाईकपण, राणेंपण, आपुलेंपण, पढिलेपण, दुसुरेंपण, गोडिरेपण, सालेपण, पितेपण, चौरसपण

२ पैं : (< प्रा० प्य < सं० त्म्य) : आपणपें < प्रा० आप्पणाप्पं < सं० आत्मात्म्यम्

३ एं : (< अप० त्तण < प्रा० त्तण < सं० त्व) : रांजवाडे[१] अपभ्रंशांत ' प्पण ' हा एकच प्रत्यय मानतात. वास्तविक ' प्पण ' आणि ' त्तण ' अशीं दोन रूपें अपभ्रंशांत आहेत.

---

१ राजवाडे : ज्ञानेश्वरीचें व्याकरण, पान १३०

उदा० मणुयत्तणु (मनुष्यत्वं); पवित्तणु (पवित्र-त्वं)
यादव-मराठींत वर्णप्रक्रियेनें हा 'एं' होतो. पहा—
" कीं तृष्णेचें **साजणें** "—उद्ध० ३०९ (सं०
सहजन + त्वं)

" मी वर्तें तंव **मऱ्हाटें** वर्तेंल।"—स्मृ० ८६
(= मराठेपण)

" चैद्यें घेतिलें मोक्षाचें **निजवणें**।"—शि० १०८६
(= आत्म-त्वं)

४ इक : कोंवळिक, जवळिक (दृ० १११)
५ ई : (< य)
" नवल **जिनि** जाली : वैराग्यांसि।"— उद्ध० ४४
(सं० जीवनं चें भाववाचक)
" वेधां **बाह्याळी** जाली।"—उद्ध० ४७ (= विपुलता)
" कीं आत्मजाची **थोरी**।—ऋ० ३५३
" जवळी " (ऋ० १७०); " गुर्ती " (ध० पू० ४९)
" खाराणी " (दृ० १०५)

६ ता-ती (सं०):
" ना ते मूर्त जाली **संगीता** : चंद्रकीरणींची।"
उद्ध० ४२२

" भवांवरी पवित्रता : जेथची तीर्थपूतता।" ऋ० २४१
'काकुळती' (ऋ० ६२६)
७ इव : (< अप० व्व < सं० त्व ...?)
" तियेचिये **सिह्याणिवेचि** रूढी : मानली तयां।"
उद्ध० ४७७

" जे कांडाच्चेनि आंधारें करिति **रातिवा** :
पारिकेआंवरी।" — शि० ९४४ (= रात्रपणा)

---

१ भावनासंधिप्रकरण (संपादक, मोदी)

८ त्व : (सं०) " **सौकर्यत्वें** दीसतोसी। " – स्मृ० १२२
" हीरवट आणि **कठिणत्व**। " – दृ० ६६

९ य : (सं०) " मग **उदास्य** स्विकारिलें। " – लीला० १-५७

१० आरु : (सं० आचार...?)
" जाणौनि आपुला पतिकरु : तया करावया **पाहुणरु**। "
– उद्ध० ४७८
" तेणें **पुढारु** साचु केला। "– स्मृ० २६१ (=पुढारीपण)

११ अविकृत : क्वचित्, तद्धित प्रत्यय न लावतां विशेषणेंच भाववाचक नामांसारखीं वापरलेलीं आहेत. उदा०
" **हीरवट** आणि कठिणत्व हे दोन्ही दोष जाती :
सुरै आणि मृदुत्व हे गुण एति। " – दृ० ६६
(सं० सुरभि)

१२ ऐ : (< ई < सं० ता)[१]
" चावटै, एकवंकै, ग्राहकै, राउतै " (शि० १००१)

तात्पर्य, भाववाचक नाम साधण्याचे इतके बारा प्रकार यादव-मराठींत आहेत. ज्ञानेश्वरींत मात्र यांपैकीं पांच सहाच आढळतात. येथें महानुभाव-ग्रंथांतील प्रत्ययविविधता उघड आहे.

§ ४ द्विरुक्त शब्द (Reduplicatives)

शब्दाची किंवा त्यांतील कांहीं भागाची द्विरुक्ति करून नवीन शब्द वा शब्दांची जोडी साधणें हा यादव-मराठींतील शब्दसिद्धीचा एक महत्त्वाचा प्रकार आहे. द्विरुक्तीच्या या सदराखालीं ध्वन्यनुकारी शब्द, सादशब्द, सामासिक शब्द, पौनःपुन्यवाचक शब्द इत्यादि अनेक भाग येतात. हे सर्व प्रकार मराठीनें संस्कृत-महाराष्ट्री-अपभ्रंश या परंपरेनेंच घेतले आहेत. मात्र सादशब्दांची प्रथा द्राविडीपासून आली. शब्दसिद्धीचे इतर प्रकार संस्कृत-महाराष्ट्रींत आहेतच. संस्कृतांतील ‘किकिराकृ’, ‘मस्मसा कृ’, ‘घुरघुरायते’ ‘कोकिल’ इत्यादि नादानुकारी व ‘प्राचीं प्राचीम्’, ‘गृहेगृहे’, ‘उत्तरोत्तर’,

१ राजवाडे : ज्ञानेश्वरीचें व्याकरण, पान १३०

'पूर्वापूर्व', 'इतरेतर' वगैरे आम्रेडित शब्द प्रसिद्धच आहेत. वैदिक संस्कृतांत 'पिब पिब', 'यजस्व यजस्व', 'स्तुहि स्तुहि' इत्यादि द्विरुक्त क्रियापदें आढळतात. संस्कृतांतील शब्दसिद्धीच्या या प्रकारांची वाकरनागल[१] आणि रेनो[२] यांनीं दिलेलीं उदाहरणें पाहून कल्पना येते. प्राकृतांतील 'अन्नमन्न', 'एक्कमेक्क', 'खंडाखंडी', 'घुम्माघुम्मी', 'अलट्ट पलट्ट', 'वइल्ल बइल्ल' हे प्राकृतांतील द्विरुक्त शब्द संस्कृत-पालीच्या धर्तीवरच आहेत. प्राकृतांतील द्विरुक्त शब्दांची मीमांसा डॉ० कात्रे यांनीं विस्तारानें केली आहे. तीवरून यादव-मराठीनें शब्दसिद्धीचीं हीं साधनें परंपरेनें कशीं उचललीं याची कल्पना येईल. डॉ० कात्रे म्हणतात—

"All these different types in reality go to form but one category which plays an important role in the development of Middle and Modern Indo-Aryan languages, and the term "Reduplicative" properly expresses the totality of these formations."[४]

वर्तमान-मराठींत द्विरुक्त शब्दांची संख्या साधारणत: १५०० पर्यंत मानली जाते. पुढें यादव-मराठींतील द्विरुक्त शब्दांचे प्रकार सोदाहरण व सटीक देतों—

१ **ध्वन्यनुकारी**:—नादानुरोखानें शब्द बनविणें हा प्रत्येक भाषेचा स्वभावच आहे. मराठीनें ध्वन्यनुकारी शब्दांची प्रथा द्राविडीपासून घेतली असावी हें कांहीं पंडितांचें म्हणणें कसें भ्रांत आहे हें मीं पुढील भागात विस्तारानें दाखविलें आहेच. संस्कृत-महाराष्ट्रीपेक्षां अपभ्रंशांत ध्वन्यनुकारी शब्दांचें प्राबल्य विशेषच आढळतें. उदाहरणार्थ, "णायकुमारचरिउ" या अपभ्रंशकाव्यांतील कांहीं शब्द पहा—

---

१ Wackernagal : Altindische Grammatik II. 1, pp 6–9, 329, 143

२ L. Renou, in B. S. O. S. Vol. 10

३ S. M. Katre; Reduplicatives in Indo-Aryan "–Bulletin of the Deccan College Research Inst, Vol. I, No. 1

४ Ibid, pp. 60

"कणगणंति, किलकिलंति, गुमुगुमुगुमंत, जिगिजिगिजिगंत, झलझलइ, हणहणहणंत, टणटणटणंत, ललललंति, सलसलंति" इत्यादि. इतक्या प्रमाणांत जरी नव्हे तंरी यादव-मराठीनें अपभ्रंशांचीच परंपरा पुढें चालू केली. येथें द्राविडी संसर्गाचा अगदीं संबंध नाहीं. कांहीं ध्वन्यनुकारी शब्द—

झिळिमिळी	उद्ध० ७४	डुळकणें	ह० ४४
कडाडिलें	उद्ध० १०१	झांवळें	ह० १०२
तिडिकाय	उद्ध० १७५	बांबळैले	शि० ४१
चुडुफाय	उद्ध० १७५	धुधुवात	शि० ४५५
कुडकुडा	उद्ध० ३१६	फुफुवात	शि० ४५७
गुळळा	ऋ० ५३८	कसकुसी	शि० ४३५
झांजरे	ऋ० ५३३	भडाडु	शि० ४९७
बोंबी	ऋ० ५६९	धगधगित	शि० ९१४
झळकलिता	ध० उ० ४२	सनसनिती	
गजंबु	ध० उ० ३२	तरारिती	
झनानिती	मा० स्व० ३०	घुरघुरिती	
कीलुकीलु	लीला० १–२२	दुमदुमिती	
बुडडा	ज्ञा० ७–६७	घनघनिती	
उह्लाल	ज्ञा० ७–७३	खिनखिनिती	शि० ५२२
बोंबले	ज्ञा० ७–८५	डमडमिती	ते
झडझडौनि	ज्ञा० ९–५२१	कडकडिती	५२८
खळाळ	उद्ध० ११०	गिडगिडिआं	
झळाळ	उद्ध० १९२	फडफडिती	
कडकडी, गडबडी	उद्ध० २०४	लफलफिती	
झीगीमीगी	उद्ध० ३४०	फगफगिती	
खुरखुरित	उद्ध० ३६३	शैक	ह० ६०
घुरघुरी, खांकरी	उद्ध० ३८५	खांखाळि	शि० ५०३
थवथवित	उद्ध० ७५८	धडधडाट	शि० १०५५
टाहुवा	ऋ० ९१	गजबजाट	शि० १०५५

मीटिमीटि	ऋ० ५१४	हिंहिंकारु	शि० १००५
रूं रूं, ठकठक	स्मृ० ६१		
पचकरुनि थुंकली	स्मृ० १०६		
लवलवौनि	स्मृ० १३१		
बोबाति	लीला० १–६६		

२ सादशब्द[1] :—सादशब्दांत पहिल्या शब्दाची संपूर्ण पुनरुक्ति होत नसून किंचित् पुनरुक्ति होते. मूळ शब्दाचा अर्थ व नाद हे सादशब्दांत कायम असतात. परंतु मूळ शब्दांतील एका वर्णाचा मात्र सादशब्दांत बदल होतो. (उदा० घोडा-बिडा, घर-बिर). सादशब्दांना 'किंचित् द्विरुक्त' शब्द म्हणतां येईल. परंतु मूळ इंग्रजी शब्दाचें 'सादशब्द' हें भाषांतरच मला अधिक बरें वाटतें. साद-शब्दांची प्रथा मराठीनें द्राविडीपासून कशी घेतली याचें सविस्तर विवेचन मीं पुढील भागांत[2] केलें आहे. महाराष्ट्री-अपभ्रंशांत असे सादशब्द नाहींत. यादव-मराठींत आहेत. मात्र वर्तमान-मराठींत ज्याप्रमाणें 'बि' हा सादवर्ण निश्चित आहे तसा तो यादव-मराठींत नाहीं. द्राविडी-पासून ही प्रथा नुकतीच घेतल्यानें यादव-मराठी एकच सादवर्ण न वापरतां "त, द, व, प, ग" असे अनेक वापरते. या विविधतेवरून सादशब्दांचा प्रकार बाल्यावस्थेंत असल्याचें स्पष्ट दिसतें. कानडींतील 'गि' हा सादवर्णहि वापरल्याचीं उदाहरणें क्वचित् आहेत. सादशब्दांना स्वतंत्र शब्द मानावेत कीं नाहीं याविषयीं मतैक्य नाहीं[3]. पुढें यादव-मराठींतील कांहीं सादशब्द देतों—

पाटेफुटे	उद्ध० १२२	हाडगुड	लीला० १-४७, इ० ९२
बळोंवली	उद्ध० २२२	अशेषविशेष	इ० १०२
चलवल	उद्ध० ४५२	उटेंरेटें	शि० १३६
जातिजुती	ध० उ० ५४	पेणोवेणां	शि० ५७६
गीतमातु	स्मृ० ८९	बाहिरीवाहिरी	शि० ४९४

---

१ Echo-words

२ भाग ४, क्र० ४

३ Jesperson : Language, pp. 313

लाळले-ताळले	स्मृ० १७७	आहाळबाहाळीं	शि० ४११
हळवैली पळवैली	स्मृ० १७५	धडगोड	दृ० ९४
नेटेंबोटें	उद्ध० ७	आफळसाफळ	दृ० ८८
उगुमुगु	लीळा० ३-४३		

३ आम्रेडित :—या प्रकारांत नामें, सर्वनामें, विशेषणें, संख्यावाचक आणि क्रियापदें यांची द्विरुक्ति होतांना दिसते. व्यापकत्वाचा अर्थ सूचित असतो. उदा०

दिहेंदिहूं	शि० ८३७	आटाआटी	शि० ९८८
लांबलांबे	शि० ८९१	घालाघाली	शि० १००६
आणआणूं	शि० ८१	दडवादडवी	शि० ४८०
येरझारा	ऋ० २८	आनानीं	उद्ध० ७२८
चडफडीती	ऋ० ६२१	जएजए	ध० उ० ५८
वळितपळित	उद्ध० ५२१	खणौखणीं	ध० उ० ५७
सीतेंसीतें	ली० १–१९	दीपोदीपीं	ध० उ० ४१
दरेदरकुटे	ली० १—५	तीटततीटत	दृ० ५४
खेंवाखेंवी	ली० ३	आळुमाळु	ज्ञा० ९–५२९
सारवासारवी	शि० ५०१	पळपळीत	दृ० ८९
पुसपुसों	स्मृ० १६	रवरवां	शि० १००४
वाटवाटें	ली० ३ पा० ३४	वेगेवेगु	ध० उ० १८

४ सामासिक जोडशब्द :—यादव-मराठींत द्राविडी भाषांतून बरेच शब्द शिरले. क्वचित् अशा परकीय शब्दानें अर्थव्यक्तीचें कार्य नीटसें होत नसावें. एतावता, त्याच अर्थाचा एक तत्सम वा तद्भव म्हणजे आर्य शब्द जोडून अर्थ सुस्पष्ट केला जाई. एक स्वकीय व दुसरा परकीय अशा दोन शब्दांची जोड होऊन हा समास बने. उदा० वर्तमान मराठींतील "चिल्लीपिल्ली" हा शब्द पहा—

सं० शाबाल > शावाल > चावाल > चील
\+ तामीळ : पिळ्ळइ

येथें 'चील' व 'पिल्लइ' या समानार्थक परंतु विजातीय शब्दांचा जोड झाला आहे. यासंबंधीं डॉ० चॅतर्जी लिहितात—

"This has the form of a compound word, but the idea expressed is only one. This may be called translation compound, and ascribed to linguistic conflict and compromise in Indo-Aryan."

याचींच आणखी उदाहरणें म्हणून डॉ० चतर्जी 'पहाड-पर्वत' व 'इक्षु-गंडेरी' हे शब्द सांगतात. असले जोडशब्द संस्कृतांत नाहींत, परंतु वर्तमान आर्य भाषांत मात्र आहेत. इंग्रजींतहि साधारण याच धर्तीवर शब्दांचे जोड बनूं शकतात, व क्वचित् दोन समानार्थक शब्द जवळ आल्यास त्यांच्या वर्णांची परस्परांत भेसळ होऊन स्वतंत्र शब्द तयार होतो. उदा०

Blunt = Blind + Stunt
Glaze = Glare + Gaze
Knoll = Knell + Toll
Slender = Slight + Tender
Slide = Slip + Glide

कु० लुइझा पाउंड हिनें अशा भ्रांत संयोगाचीं इंग्रजींतील विपुल उदाहरणें देऊन शब्दसिद्धीचा हा प्रकार विस्तारानें वर्णिला आहे. दोन समानार्थक शब्दांचा संयोग करण्याची ही पद्धति मात्र यादव-मराठींत नाहीं. वर्गीकरणाच्या दृष्टीनें भिन्न परंतु अर्थानें अभिन्न असे शब्दांचे जोड यादव-मराठी बनविते. पहा—

पाटपीढी उद्ध० ४७६ (सं० पृष्ठम् > १ पाट, २ पीढें)
मांदीमेळावा उद्ध० ५३६
दगडगुंडे उद्ध० ७३१ (तद्भव + देशी)
मार्लीमर्दना ध० पू० ६८ (तद्भव + तत्सम)

---

१ 'Polyglottism in Indo-Aryan' Dr. S. K. Chatterji, –7th Oriental Conference, 1933

२ Miss Louise Pound : "Blends–their Relation to English Word Formation," 1914

मळघाणि स्मृ० ७३
कवतिकेंकोडें शि० ९४५ (तत्सम + तद्भव)
केळिक्रीडा लीला० ३–५९ (तद्भव + तत्सम)
डाळखांदी दृ० ११ (देशी + तद्भव)
घनदाट लीला० ३, पान २४

वरील जोड्यांत दोहीं शब्दांचा अर्थ एकच असून त्यांचीं स्वरूपें मात्र भिन्न आहेत. इंग्रजींतील भ्रांत संयोगाहून हे शब्द वेगळे आहेत. यादव-मराठीनें ही शब्दसिद्धि नव्यानें सुरू केली. हिचाच आणखी एक प्रकार यादव-मराठींत दिसतो. वाक्यांतील एका शब्दाचा अर्थ त्याच वाक्यांत दुसऱ्या शब्दानें व्यक्तविण्याची लकब तत्कालीन गद्यांत दिसते. म्हणजे दोन समानार्थक शब्दांचा जोड न करितां ते एकमेकांपासून अलग ठेवून अर्थव्यक्ति साधली जाते. या प्रकाराला **साभिप्राय समानार्थक शब्द** असें नांव मी देतों. उदा०–

" मग भटोबासीं **संभाषूनि म्हणितलें** । "–स्मृ० ९५
" हें **आइकौनि परिसौनि** केशवाचार्यें म्हणितलें । "–स्मृ० ११६
" ऐसें म्हणौनि **म्हणीतलें : आन सांगीतलें** । "–शि० १-१४
" मियां तुमतें **झांकवीले : चाळवीले** । "–लीला० ३-२१
" गोसावियासि **मर्दना** जाली : **माजणें** जालें । "–लीला० ३-२९
" तयावरि पावो **देऊंचि** तथा **ठेऊंचि** नए । "–दृ० २६
" **कुंभचासी तथा भार** आथौनि पीके । "–दृ० २८
" **सिंचा** वो **सिंपा** कनकधारा । "–शि० ७०४
" परि कैसीहि कांहीं घूणा **नुपजैचि होए** । "–लीला० १-२०

समानार्थक शब्दाचा हा वापर खास यादव-मराठीचा होय. कारण तो प्राकृतांत, अपभ्रंशांत नव्हता व वर्तमान-मराठींत नाहीं.

५ **संकीर्ण सामासिक व जोड शब्द** :—वरील चार प्रकारांत जे येऊं शकत नाहींत असे कितीतरी द्विरुक्त व जोडशब्द यादव-मराठींत आढळतात. वर्तमान आर्य भाषांचा व त्यांतील शब्दांचा या वर्गीकरणाच्या दृष्टीनें अद्यापि अभ्यास झालेला नाहीं. तो झाला, म्हणजे आणखी सूक्ष्म

वर्गीकरण करणें शक्य होईल. तोंवर, संकीर्ण जोड शब्दांतच त्यांची गणना केली पाहिजे. असे कांहीं शब्द पुढें देतों—

रळियारापदळिया	वच्छ०	काजभोज
गोरागोमटा धारेधाकुटा	दृ० १३	पुडुवाटवा
सांदीसवडी	दृ० ४०	पाटाउवें-सुटाउवें
सेजियासाइलिया	दृ० ४४	दाएपसाए
आडीदरडी	दृ० ४४	इळाखिळा
पालापाणी	दृ० ९४	मोडकेतोडके
ढळमळीतु	ऋ० ३९४	सोएरीधाएरी
दुनीदेहुडी	शि० ५६२	वोखटेंगोमटें
तिळतेलिण	लीला० १-१८	पाहानपटी

६ विरोधी जोड शब्द:— परस्पर विरोधी शब्द यादव-मराठी 'अ' किंवा 'उ' या वर्णांनीं दाखविते. पुढील जोड्या पहा—

पवाड्डु-अपवाड्डु	उद्ध० १४१	जडे-उजडे	दृ० १४
वेढा-उवेढा	उद्ध० १०५	भरे-रीचवे	दृ० १२
सुचि-असुचि	उद्ध० ४७२	पहुड-उपहुड	लीला० ३
टाळे-उटाळे	उद्ध० ६८३	आपें-परु	ऋ० २७२
रंग-उरंग	उद्ध० १४०	रुची-अरुची	ली० ३, पा०२६
आपुलें-परावें	उद्ध० ६१९	पालाणें-उपलाणें	शिशु०

७ अकरणदर्शक शब्द:—संस्कृतांतील 'अ' हा अकरणवाचक उपसर्ग यादव-मराठी नित्य वापरते, यांत नवल नाहीं. परंतु जेथें संस्कृत विरोध-वाचक शब्दांची जोडी तयार आहे तेथेंहि क्वचित् यादव-मराठीनें 'अ' किंवा 'न' कारानें नवीन शब्द बनविला आहे. हा अर्थात् साम्याभास होय. उदा०

'निबल' (= अबल) –दृ० ७७
'असक्ति' (= शक्तीचा अभाव) –स्मृ० १९८
'अपरीतोषु' (= खेद) –स्मृ० १३९

'आक्रोध' (= शांत) –वृद्धा० १३
'अन्हवाणी' (= वाहाणांवांचून) –स्मृ० २१८
'अदैव' (= दुर्दैवी)–शि० ५१६
'निललता' (= मालिन्य) –स्मृ० २१७
'असान' (= मोठें) –शि० ४७४

§ ५ नामधातु

नामापासून धातु कीं धातुपासून नाम हा वाद फार पुरातन आहे. यास्काच्या वेळीं हा मतभेद निरुक्तांमध्यें रूढ होता. 'सर्व शब्द आख्यातांपासून सिद्ध होतात' असें म्हणणारा एक पक्ष आणि 'कांहीं थोडे शब्द आख्यातज असून बाकीचे स्वतंत्र आहेत' असें मानणारा दुसरा पक्ष. यास्काचार्यांनीं आपला "आख्यातजानि नामानि"[१] हा सिद्धांत प्रस्थापित केला आहे व शाकटायन आणि गार्ग्य यांच्यांतील वादाचा निकाल दिला आहे. सर्वच नामें आख्यातज नाहींत या गार्ग्याच्या म्हणण्याला साईसच्या[२] ग्रंथांतून पुष्टि मिळते. परंतु आजच्या शास्त्रीय युगांत साईसचा ग्रंथ मान्य नाहीं. आर्यभाषेंतील क्रियापद हें पूर्वीं नाम होतें व सर्व शब्द नामें असणें हीच भाषेची प्राचीनतम अवस्था इतकें म्हणण्यापर्यंत साईसची मजल जाते. म्हणजे तो मूळांत नामधातुच तेवढे मानतो. वास्तविक शाकटायन आणि साईस या दोघांचींहि मतें एकान्तिक आहेत. इतकें मात्र खरें, कीं नामाचेंच मूळ आद्य रूप म्हणजे धातु होय. आधुनिक भाषाशास्त्राला हेंच मत संमत दिसतें. यासंबंधीं प्रो० कुलकर्णी[३] म्हणतात—

"धातूंच्या कक्षेच्या बाहेर वावरणारीं स्वतंत्र वृत्तीचीं अशीं कांहीं नामें सांपडणारच. बहुतेक नामें हीं व्युत्पाद्य असतात. त्यांची व्युत्पत्ति

---

१ यास्क : निरुक्त १-१२

२ Sayce : Introduction to the Science of Language Vol. I (Preface)

३ राजवाडे मराठी धातुकोश (प्रस्तावना, पान ३१)

काढिली, कीं तिच्या मुळाशीं धातु हा असणारच...सर्व नामें धातूंपासून काढणें हें कांहीं बाबतींत हठात् व्युत्पादन होईल."

वरील चर्चेचें तात्पर्य हेंच, कीं धातूंपासून नामें सिद्ध होतात व पुनः नामांपासून धातु सिद्ध होतात. नामांचें आणि धातूंचें असें हें रहाटगाडगें आहे. अर्थात् यादव-मराठींत क्रियानामें आढळतात, तसेंच नामधातुहि आढळतात. पुढें यादव-मराठीनें बनविलेले कांहीं नामधातु देतों—

आंगवणें (अंग[1]) – " जेयांचेनि आठवें। शब्दसृष्टि आंगवे।"
ज्ञा० १३-२

उधवणें (ऊर्ध्व) – " कां उधवली आकाशें। शिलाराशी।"
ज्ञा० १६-३७७

थोरावणें (स्थविर) – " विज्ञानें भलीं थोरावलीं।" उद्ध० ४७
शिळावणें (शीतल) – " सौंदर्य शिळावलें।" उद्ध० ९८
हातवसणें (हस्तवश) – " कवणु विषयवीरु हातवसी।" उद्ध० ५५६
एकवटणें (एकवत्) – " पाठिपोट येकवटे।" उद्ध० २०२
पोटाळणें (पोट) – " मुंगियें केवि पोटाळे : महदाकाश।" उद्ध० २१५
खांबाटणें (खांब) – " ते मुनीमनातें खांबाटी।" उद्ध० ३६५
चौकडणें (चौ + ?) – " हरिणु...मरणाभेण चौकडे।" उ० ३७१
सुखणें (सुख), बळणें (बल), ज्ञानणें (ज्ञान) – " सुख सुखियें : बळ बळियें
ज्ञान ज्ञानियें : जयास्तव।" उद्ध० ३९०
दुरावणें (दूर) – " गोडी घेतां मोक्ष : दूरावे तया।" उद्ध० ३७५
आंधारणें (आंधार) – " आंधारली ब्रह्मेयांची दिठी।" उद्ध० ६७१
बोबडणें (बोबड) – " मनु पांगुळैजे : वेदु बोबडैजे। उद्ध० ७९२
डीरणें (डीरी)[2] – " सवेंचि दिसे डीरैली : प्रेमलता।" उद्ध० ७९४

---

१ राजवाडे सं० आगम् पासून व्युत्पादितात.
२ राजवाडे मराठी धातुकोशांत या धातूचा उल्लेखच नाहीं.

खालविणें (खालीं) – " तैसें जीवमात्र अशेषा । खालविले । " ज्ञा० ९-२२४
उभणें (ऊर्ध्व) – " जेआंवरी असे उभिले : असेख ते । " ऋ० ५३७
मोहरणें – (मुखर) – " मनबुद्धि मोहरी । अध्यात्मज्ञानीं । " ज्ञा० १३-६१८
" दृष्टि न मोहरे । कांहीं केली । " ऋ० ५१३
कालवंडणें (काळवंड) – " कीं उवडला देखौनि सोच्यु : काळवंडैल । " ऋ० ४०७
उंचावणें (उंच) – " परि उचावता त्रीकु तरि... । " ऋ० ५४६
येरझारणें (येरझार) – " तो एकला प्राण एरझारें । " ऋ० ६२३
नवसणें (नवस) – " नवसीली असे मीथां अंबीके यात्रा । " ध० पू० ७५
जोहारणें (जोहार) – " दोन्हीं करीं जोहारिले गोवींदु । " ध० पू० ७८
" मग तैसाचि भेणभेण । पुडतीं जुहारी चरण । " ज्ञा० ११–४८५
गुढरणें (गुढर) – " वारु रथ संजोगीले गुढरीले हस्ती । " ध० पू० ४८
होकारणें (हांक) – " कृष्णा म्हणौनि हाकारिजे । " ज्ञा० १०-५४६
आंपलवणें (आपल) – " अवघींचि आंपलवले । " स्मृ० १९२
(= आपुलकी वाटली)
क्षेमाविणें (क्षेम) – " तयातें क्षेमावले । " ली० १-११
सेंवाळणें (शे-सेवाळ) – " सेंवाळलें खडक असे । " दृ० २६
दुनणें (दुण-न) – " मग नांगरीजे : दुनीजे । " दृ० २८
सनिपातणें (संनिपात = एक रोग) – " पाइकु सनिपातैला असे । " दृ० ३६
जारसणें (जरा) – " जारसैलें वाळुक । " दृ० ३१ (= जून झालेलें)
कामाविणें (काम) – " कीं मेरूचा गाभा कामाविला : विश्वकर्मैनीं । " शि० ४५
एणायणें (एणः = हरिण) – " नेणों तुज जोडला सायासीं :
तरि खडा अेणाअे । " शि० २२१ (= काळा पडेल)
बालावणें (बाल) – " **बालावेया** पंडुनंदनु : श्रीकृष्णरायां । " शि० ४६२
भगवणें (भगव) – " ना तरि राणीव सांडावी : कापडें भगवावीं । " शि० ४७५
वेडणें (वेड) – " प्रेमभरें वैडैलीं : मनें... । " शि० ६०७

बरविणें (बरंव) – " राऊतें बरंवतांति।" शि० ५६५ (=शोभतात)
कौतुकणें (कौतुक) – " मग कवतिकैलैनि महाकाळें।" शि० ९३५
डिंहणें (डिंभ) – " महाकाळें काळु : तो डिंहाला।" शि० १०८०
तिखटणें (तिखें) – " तंव तो धारासिंपे तिखटे।" शि० ७११

§ ६ क्रियानामें

यादव-मराठीनें क्रियापदांपासून नामें बनविण्याची पद्धति परंपरेनेंच घेतली आहे. शब्दसिद्धीचें हें एक साधन आहे. पुढें कांहीं क्रिया-नामें देतों—

वोडवन –उ० १२ (वोडवणें)
चंढावा –उ० २८ (हल्ला)
पेटवन –उ० ६८ (इंधन)
नागवण –उ० ८५
गांवघेणी –उ० ६९ (घेण्याची क्रिया)
गांवघेरी –उ० १०७ (घेणें)
ताटकाढा –उ० १६२ (सेवक)
उपेणें –उ० २१४ (वास)
रीगावा –उ० २३८ (प्रवेश)
कांतिउ –उ० २५१ (कांतलेला)
वोतिउ –उ० २५१ (ओतलेला)
वोहट –उ० २९४ (उतार)
दीवेलावणी –उ० ३४४
निहारु –उ० ३९९ (न्याहाळणें)
आधोलि –उ० ४३७ (आंदोल्)
हींडी –उ० ४७६ (हिंडणें)

थलिवं –ज्ञा० १७–३४२ (उमटविलेलें)
सांगातु –ऋ० ६१७ (सहवास)
आट –ऋ० ६२४ (आटणें)
पळ –ध० उ० ४
बैसिक –ज्ञा० १३–४८४ (बैठक)
ताटकाढा –ध०उ०४७ (सेवक)
चोंख –ध०उ०३८ (चोखणें)
राहावा –स्मृ० ६५ (मुक्काम)
बुझ –स्मृ० ७२ (बुझ्)
हाकारें –स्मृ० ९१ (बोलावणें)
उठिबैसी –स्मृ० ९४ (वागणूक)
म्हणियें –स्मृ० ९८ (काम)
निरवणुक –स्मृ० १४५ (निरोविणें)
पोफळ-फोडणा –स्मृ० १५८

प्ऱरतनी –उ० ५२३
आळोंचु –उ० ५५४ (आळोचणें)
दारकोंडी –उ० ५९५ (कोंडलेली)
उति –उ० ७३६ (उत् + इ)
अंकिला –ऋ० ५९ (अंक्)
हालिचालि –ऋ० ११३
खनवादी –ऋ० १३४ (खन्)
मोकारा –ऋ० १६५
निगावा –ऋ० १७१ (निर्गम्)
वेंझें –ऋ० १९३ (विंध्)
धांवा –ऋ० २२५ (धाव्)
उजाळु –ऋ० २९० (तेज)
पाएपुसणें –ऋ० ३३६
घालणी –ऋ० ३४० (घाला)
राहाणें –ऋ० ४०४ (निवासस्थळ)
सांघनी –ऋ० ५२८ (गोष्ट)
ठाउवा –ऋ० ५४७ (खूर–सं० स्था)
पहुडु –ऋ० ५४९ (झोंप)
सामानुक –ऋ० ५७१
च्ढावा –ऋ० ५८५ (पुट)

भांडेता –स्मृ० २१९ (भांडणारा)
घे–दे –स्मृ० २२८ (वादविवाद)
हेला –स्मृ० २६१ (अपमान)
मोलकै –ली० १–३९
वरैत –दृ० ५९ (वृ)
साधुनूक –शि० ३२८
घालनें –शि० २६९ (हन्)
आवगणें –शि० २६८ (आत्मीकृ)
कलिलावा –शि० १२७ (लग्)
लावकै –शि० १२९ (लावालावी)
मानबरळा –शि० २१८
पागारू –शि० ५४६ (पालनकर्ता)
उभनी –शि० ५९८ (रचना)
दाहावी –शि० ६०९ (दह्)
गुंफीव –शि० ६३१
पाहिली –शि० ८६६ (पहाट)
खांओगिळी–शि० ९०२
काढाओ –शि० ९५६ (पळ)

§ ७ **समास** आणि **समासांतर्गत विभक्ति**

यादव-मराठींत समस्त आणि व्यस्त अशी दोन प्रकारची रचना आढळते. पैकीं व्यस्त रचना प्रत्ययप्रक्रिया प्रकरणावरून ध्यानांत येईल.

शब्दाला प्रत्यय वा शब्दयोगी जोडून केलेली व्यस्त रचना आढळते. येथें सामासिक रचना देतों—

समास :—

शरीरसांडोवा	ज्ञा०	९।३७७
अनुष्ठानभाषा	ज्ञा०	१८।३१६
अंतःकरणकुहरीं	ज्ञा०	७।१२२
मातुअघडती	ज्ञा०	१।२३५
सांडीविंखुरी	ज्ञा०	९।३९
देशधडी	वच्छ०	४१
मसीटिळा	वच्छ०	८२
मीमाझेंपणु	वच्छ०	२५९
आवळेवेलेंआलेंआं	वच्छ०	३८५
सोनेंकेतकी	वच्छ०	१५६
चेंडुफळी	वच्छ०	८५
अमृतघोळिलेबोल	वच्छ०	२३६
विखोवेव्हारु	दृ०	११
कानवाथरु	दृ०	२९
दायेपसाये	दृ०	४०
कूपकांटी	दृ०	७६
गुरुभाऊ	स्मृ०	१३१
चांपैविहिरी	शि०	१०२८
पडवळकांठिया	शि०	१०३४
बाजसूपवती	लीला०	१।६९
डाळखांदी	दृ०	११
साडेंपन्हरें	ऋ०	५८७
वीजनवारे	ध० पू०	६४
जांबडाहाळा	उषा०	७६।५४
फुटामुख्य	स्मृ०	१०६

समासांतर्गत विभक्ति :—

यादव-मराठींत समासांतील पूर्वपदाची विभक्ति कायम ठेविल्याचीं उदाहरणें पुष्कळ आहेत. परंतु, अशांची गणना अलुक् समासांत करण्यांत येत नाहीं असें दामले[1] म्हणतात, तें युक्तच आहे. ही समासांतर्गत विभक्ति म्हणजे यादव-मराठीचा एक विशेष होय. वर्तमान मराठींत ती क्वचित् आढळते. पुढें उदाहरणें देतों. समासांतर्गत विभक्ति कोणती तें कंसांत दिलें आहे.

मोहोतुरांचेनि गजरें ।	उद्ध० ६००	(प्रथमा)
तुझिये कथेची **दीवे**लावनि ।	उद्ध० १६६	(प्रथमा)
तरि **गाभे**वनाचां संपुटीं ॥	उद्ध० २२०	(सप्तमी)
या आदिकरूनि **आत्मयाा**रामा ।	उद्ध० ६८८	(सप्तमी)
श्री **चक्रधरा**रायाचा संबंधु ।	स्मृ० १३०	(षष्ठी)
चुनेंजाति निरूपलि ।	लीला० १–५६	(प्रथमा)
गोत्रांकुटुंबातें दाखवावेया ।	लीला० १–१६	(चतुर्थी)
इष्टांमित्रांपुढें सांघों लागले ।	लीला० ३–३६	(षष्ठी)
कंठापाशिका धरिले ।	शि० २१७	(चतुर्थी)
राअेचापेआंचीं फुलें ।	शि० ३०२	(षष्ठी)
पिटौनि सूदिला **धुळीं**कोठीं ।	शि० ४५२	(सप्तमी)
स्नेहोदूधभारिता ।	वच्छ० ३२२	(प्रथमा)
संसारुमोचक ।	वच्छ० ३२२	(प्रथमा)
भूतांग्रामांते ।	वच्छ० ३९३	(चतुर्थी)
मनांपवनांते ।	वच्छ० ४१२	(चतुर्थी)
लयांगतु ।	वच्छ० ३२१	(सप्तमी)

§ ८ संधि

प्राकृत, अपभ्रंशाप्रमाणेंच यादव-मराठींतहि संधि विकल्पानें होतात.

१ मो० के० दामले : शास्त्रीय मराठी व्याकरण, पान ६०४

ई (सं० अपि) या अव्ययाचा मागील शब्दाच्या अंत्य स्वराशीं क्वचित् संधि होतो.[1] जसें—

सकळैं, आठै, सातै, चोविसैं, भलतैं (ज्ञा० २।१८१)

क्वचित् नाम-सर्वनामाचा क्रियापदाशीं व क्रियाविशेषणाशीं संधि आढळतो. उदा०

" पूतनाणि बकासुरु "	– वच्छ० ९१
" जयाव्यथा "	– वच्छ० ४७५
" कवणुसे " (कवणु असे)	– वच्छ० ४११, शि० १०३०
" वाणावेआंचेनुमुखें "	– ऋ० ५५५
" आनोबाणित जळु "	– स्मृ० १८५
" तेथुसे " (तेथु असे)	– शि० १०३६

संधि न झाल्याचीं उदाहरणें—

" मकरंद आस्वादनमिषें "	– वच्छ० १६१
" क्षेणएकु "	– वच्छ० १५७
" उन्मनी अवस्थां "	– वच्छ० १५२
" अनउपम्य रचना देखे "	– ध० पू० १४
" आत्मेआंरामा "	– उद्ध० ६८८

§ ९ प्रयोग

यादव-मराठींत कर्तरि, कर्मणि व भावे असे तीन प्रयोग होते. पैकीं कर्मणि व भावे हे विवेचनीय आहेत. सर्वांचीं उदाहरणें व चर्चा पुढें देतों—

कर्तरि

" हें प्रतिज्ञोत्तर माझें । उघड **आइका** ॥ " –ज्ञा० ९।१

" अर्थु बोलाची वाट न **पाहे** । " –ज्ञा० ९।२७

" आतां **जळो जळो** हें जीयालें । " –उद्ध० ४०७

---

१ " ज्ञानेश्वरीचें व्याकरण " राजवाडे, पान १४६

" **चालती** सीग्रवेगें ब्रह्मादीक देव **करिती** जयजयकारु।" धवळे पू० २८
हा प्रयोग संस्कृताप्रमाणेंच होतो. कर्तरीचें एक रूप विचित्र आढळतें. उदा०

" श्रीकृष्णाचां जांघिवां होइजे : तरि लावण्याचें पडप लाहिजे ।
भणओनि मदनु **सादैजे** : लेंकरूपणालागी ॥ "–शिशु० ३७०

येथें कर्तरि अभिप्रेत असून साम्याभासानें व यमकाकरितां कर्मणि रूप वापरलें आहे.[1]

कर्मणि

हा प्रयोग पांच रीतींनीं सिद्ध होई.

(१) **व्ययी कृदन्तांमुळें** उत्पन्न झालेला कर्मणि—

" श्रीचरणतीर्थिचेनि ओलें : वरील सुख पाहाळीं **गेलें** । "–ऋ० ६०६
" ये अर्थी बाळु : मियां **केला** गुरु । " –उद्ध० ४७४

संस्कृतप्रमाणेंच कृदन्त वापरून क्रिया व्यक्तविण्याची पद्धति मराठींतहि आल्यामुळें हा कर्मणि प्राचीन व अर्वाचीन मराठींत वारंवार येतो. अशा प्रयोगांत अर्थदृष्ट्या कर्त्याकडे प्राधान्य असल्यामुळें कित्येक वेळां हा कर्मणि प्रयोग मानण्यांतहि येत नाहीं. हें शास्त्राला सोडून आहे. तसेंच श्री० दामले[2] हे आधुनिक वैय्याकरण याला "प्रधान–कर्तृक कर्मणि" असें म्हणतात तेंहि अयुक्तच होय. भाषाशास्त्राची दृष्टि अर्थापेक्षां रूपाकडेच असावी व अर्थदृष्ट्या कसेंहि असलें तरी स्वरूपदृष्ट्या व व्याकरणतः या प्रयोगाला शुद्ध कर्मणिच म्हणावें. यादव-मराठीनें हा प्रकार परंपरेनें घेतला.

(२) **'इज' कर्मणि**:— या प्रत्ययाची परंपरा अशी–

सं० य > प्रा० ज, इज्ज > म० इज, ज

या प्रकारांत तृतीयान्त कर्ता व प्रथमान्त कर्म असतें. परंतु 'लागी' हें शब्दयोगी वापरलें असतां मात्र कर्म चतुर्थी घेतें. हा कर्मणि बहुशः लट्

---

१ हें यमकावलंबित्वच होय. 'शब्द्' (म० साद) हा धातु संस्कृतांत दशमगणीं असल्यानें त्या गणाचें 'अय' हें चिन्ह येथें 'ज' रूपानें अवशिष्ट आहे असें मानणें चूक होईल. यमकरचनेमुळें असे आभास उत्पन्न होतात.

२ मो० के० दामले : 'शास्त्रीय मराठी व्याकरण' – पान ७५८

वर्तमाने, लोट् आज्ञार्थे व विधिलिङ् यांत आढळतो. आज्ञार्थांत मात्र 'ओ' हा प्रत्यय 'इज'च्या पुढें लागतो. (उदा० अवधारिजो, करिजो)

" तरि अवधान एकलें देइजे। मग सर्व सुखांसि पत्र घेइजे।" ज्ञा० ९–१

" इया ग्रंथा पुण्यसंपत्ति। सर्वसुखीं सर्वभूतीं। संपूर्ण होइजो। ज्ञा० १८।१७८८

" जेथ मन पांगुळैजे : वेदु बोबडैजे।"–उद्ध० ७९२

" उदैजेति परबिंबीं। कळिकोळिगा राहिला कोंभीं।" ऋ० ५७०

" उद्धरण बोलिजेलें।"–स्मृ० २३ (वृद्धा०)

" पायवणी **घेइजत असिजें**।"–स्मृ० १२७

" बटिकुरें काइसया **सीनविजतें असिजति**।"–लीला० १-११

" थाटिजेति, कीजेति, सींपिजेति... "–शि० ३१२

वरील उदाहरणांतील जाड अक्षरांतील संयुक्त क्रियापदांचे कर्मणि प्रयोग महत्त्वाचे आहेत. ज्ञानेश्वरींतील 'पाहिजे' हें कर्मणि रूप चिंत्य आहे. 'पाह' धातूत्पन्न या रूपाचा अर्थ बहुशः 'पाहावें' 'देखिलें जातें' असा होतो. वर्तमान-मराठींतील या रूपाचा "आवश्यकतेचा अर्थ" तेव्हां इतका रूढ नव्हता.

(३) 'व' कर्मणि :—

सं० य > प्रा० व्व, व > म० व (किंवा लोप)

मराठींत या रूपांच्या अंतीं 'व' येतो किंवा त्याचा 'लोप' होऊन तत्स्थानीं स्वर मात्र राहतो. (जसें, सं० रम्यते > प्रा० रम्मइ > म० रमवे. सं० ज्ञायते > प्रा० णव्वइ म० जाणवे. सं० गम्यते > प्रा० गम्मइ > म० गमे). याचीं उदाहरणें पुढें देतों—

" परि तेया ही हें क्षेत्र। नेणवे चि।" ज्ञा० १३-६९

" मुंगिये केवि पोटाळे। महदाकाश।" उद्ध० २१५

" मेघांचेनि वडपें : आकाश कहीं न सींपे।" उद्ध० २८०

" एक काइसेनिही बुझावे ना।" द० ९८

" तें दुःख मनां वाचेसीं : अनुवादवे ना।" शि० १०२

" तिये स्थानींची महिमा : केवि वर्णवे प्राकृतां आम्हां।" ऋ० २४५

म्हणजे मूळ संस्कृत ‘ य ’ कर्मणीचें यादव-मराठींत ‘ ज ’ आणि ‘ व ’ कर्मणि असे दोन प्रकार होत.

(४) **‘ प ’ कर्मणि**[1] :— हा प्रकार कांहीं विशिष्ट धातूंपुरताच उपयोगांत येतो. ते धातु असे—

“ घे, घाल, म्हण, हार. ” या प्रकाराची प्रत्ययपरंपरा

सं० प्य > प्रा० प्प > म० प

अशी असावी. मूळांतील ‘ प्य ’ चा प्रयोजकाचा अर्थ लोपून त्याला केवळ कर्मणि-अर्थ प्राप्त झाला आहे. इतकेंच नव्हे, तर ‘ इज ’ व ‘ प ’ कर्मणि हे दोन्ही क्वचित् समन्वयानें वापरलेले आढळतात. हेमचंद्र प्राकृतांत या रूपाचा उल्लेख क्वचित् कोठें करतो. अपभ्रंशांत क्वचित् एकादें रूप दिसतें. उदा०

“ रिउ **जिप्पंति** विइण्णकुसंग वि । ” (सं० जीयन्ते) –णायकुमार० ३–२

म्हणजे अपभ्रंशकाळीं दोहोंत घोंटाळा होऊन प्रयोजकाचें रूप शुद्धकर्मणि अर्थानें वापरण्यास नुकता आरंभ झाला होता. अपभ्रंशांत क्वचित् येणारें हें रूप यादव-मराठींत कांहीं विशिष्ट धातूंचें वारंवार दिसतें. त्या त्या धातूंचीं रूपें पुढें देतों.

(१) **घे** —या धातूचें ‘ घेप ’ हें रूप ज्ञानेश्वरींत सुमारें ४० वेळां येतें, व ‘ घेइजे ’ हें १० वेळां येतें. अर्थात् ‘ घेप ’ असें कर्मणि रूप अधिक प्रचारांत होतें हें निःसंशय. प्राकृतांत सं० ‘ ग्रह् ’ याचा कर्मणि आदेश ‘ घेप्प ’ असा होई. पहा– “ ग्रहेः कर्मभावे घेप्प इत्यादेशो वा भवति— घेप्पई, गिण्हिजइ । ” –हेमचंद्र ८–४–२५६

---

१ राजवाडे या ‘ प ’ व पुढील ‘ पिज ’ कर्मणीचा विचार मुळींच करीत नाहींत. येथें हें विवेचन सविस्तर केलें आहे.

१ हेमचंद्र (प्राकृत–व्याकरणम् ८-४-२४५) “ ब्भो दुह्–लिह्–वह्–रुधामुच्चात् । ” असा नियम देतो. म्हणजे या धातूंच्या ठायीं “ अन्त्यस्य कर्मभावे द्विरुक्त भो वा भवति । ” जसें, दुब्भइ–दुहिज्जइ. परंतु या उत्सर्गाचा मराठींतील ‘ प ’ कर्मणीशीं संबंध नाहीं. अपभ्रंशांतसुद्धां ‘ दुह् ’ चें कर्मणि ‘ दुब्भइ ’ असेंच होतें. (णायकुमारचरिउ ९–८–९)

तसेंच, सं० स्निह् > प्रा० सिप्प, सं० आरभ् > प्रा० आढप्प असे आदेश कर्मभावे होत. (हेमचंद्र ८–४–२५४, २५५)

अपभ्रंशांतहि 'ग्रह्'चा 'घिप्पो' हाच आदेश आढळतो. जसें—

"गुणणिहिपुरिसु परिक्खिवि **घिप्पइ**।" णायकुमार० ३–३–५

म्हणजे 'ग्रह्' या संस्कृत धातूचे कर्मभावे आदेश प्राकृत-अपभ्रंशद्वारा येऊन मराठींत 'घे' धातूचा 'प' कर्मणि सिद्ध झाला आहे. पुढें यादव-मराठींतील याचीं रूपें देतों—

"जो कामनामात्रें न **घेपे**। मोहमलें न लिंपे।" – शि० ३–७१

"परि जें वाहातां विसावेया। मिलैल तें **घेपे**।" – ज्ञा० १८–९३४

"आणि पापपुण्यचीन्हीं। **घेपवेना**।" – उद्ध० २८७

"तेहींचि **घेपे** तिहींचि **देपे**।" – लीला० ३, पान २४

(येथें 'देपे' हें कर्मणि रूप 'घेपे' या कर्मणि रूपामुळें बनलें आहे. 'दे' धातूचा 'प' कर्मणि आढळत नाहीं. अर्थात् हें मिथ्यासादृश्य होय.)

"मां तियेचें कार्य कोणें। **घेपे** दीजे कर्म।" – ज्ञा० १८-२६४

(येथें 'प' आणि 'इज' असे दोहीं कर्मणि आहेत.)

(२) **घाल**:—या धातूचें 'घाप' असें कर्मणि रूप ज्ञानेश्वरींत साधारण २० वेळां येतें. प्राकृतांत 'घल्लइ' असें या धातूचें साधें रूप येतें. अपभ्रंशांतहि[२] तेंच आहे. अर्थात् या धातूचा 'प' कर्मणि परंपरेनें आलेला नाहीं. डॉडेरेट्[३] हा धातु सं० घट् पासून व्युत्पादितात. परंतु त्यापेक्षां सं० क्षिप् > प्रा० घल्लइ > म० घाल हीच व्युत्पत्ति अधिक समाधानकारक दिसते. परंतु प्राकृत 'घल्ल' धातु देशी कीं तद्भव हें निश्चित नाहीं. मात्र मराठी 'घाल' धातु प्राकृत 'घल्ल' पासूनच होय.[४] प्राकृत धातु जर तद्भव

१ Hemachandra: "Prakrit Grammar," 8, IV 322, 422.

२ णायकुमार० ६–१३–२१

३ "Passive Voice in Jnyanesvari"—W. Doderet, B. S. O. S. Vol. IV

४ Sten Konow—J. R. A. S. (1902) pp. 421

असेल व तो संस्कृत 'क्षिप्'पासूनच निघाला असेल, तर मराठींतील 'घाल' धातूच्या 'प' कर्मणीचा एक फार दूरचा धागा संस्कृत 'क्षिप्'मध्यें शोधितां येईल. एरव्हीं, या रूपाचा उलगडा होत नाहीं.

यादव-मराठींतील रूपें—

" यऱ्हवि चांदिणें पिकविजत आहे चेंपणीं।
किं वारेया **घापत** आहाति वार्णी।" – ज्ञा० ९-२०

" देखैं अगनीमाझि **घापति**।"– ज्ञा०२–३४६

" तरि आत्मा तूं यकसरा। हें इं म्हणों जातां दातारा।
आंतौनि बाहिरा। **घापतासि**।" – ज्ञा० १८-२३

" परि घेउनि स्वासु **घापे**।" – ज्ञा० १६-४०९

(३) **म्हण :** या धातूचेंहि 'प' कर्मणि रूप स्वतंत्रच आहे. तें प्राकृत वा अपभ्रंशांत नाहीं. मराठींतील उदाहरणें – (हें ज्ञानेश्वरींत साधारणतः ३९ वेळां येतें.)

" स्नेहालागि माये। **म्हणिपे** तें कीरु होये।"–ज्ञा० २-४२

" देखां षड्दर्शनें **म्हणिपती**। तेचि भुजांची आकृति।"–ज्ञा० १-१०

" तो **म्हणिपैल** संवादु : श्रीकृष्णोद्धवाचा।"–उद्ध० ३७

" पींगळा **म्हणिपे** सामान्य रमणी।"–उद्ध० ३७६

(= म्हणून, नांवाची)

" उदार देओ दीक्षागुरु : तूं तें **भणिपैं**।"–शि० ४५८

(४) **हार :**—'व्याहृ' या संस्कृतांतील उपपदयुक्त 'हृ' धातूचा कर्मभावे आदेश 'वाहिप्प' असा होतो. (हेमचंद्र, ८-४-२५३) या प्राकृत रूपांतील 'प' मराठींत अपभ्रंशद्वारा येणें शक्य आहे. परंतु अपभ्रंशांत या धातूचें 'प' कर्मणि रूप सांपडत नाहीं. ज्ञानेश्वरींत हीं रूपें सुमारें ४३ आहेत. या धातूसंबंधीं एक गोष्ट महत्त्वाची आहे. त्याचें 'हारिजे' असें इज-कर्मणि रूप जवळ जवळ नाहींच. म्हणजे हा धातु नियमानें 'प'-रूपच घेई. उदा०

" माझें असतेपण लोपो। नामरूप **हारपो**।" ज्ञा० १३-१९७

" दिशांचे ठाये **हारपले**।" ज्ञा० ११-१८८

" अकालिचीं अभ्रें जैसीं। ऊर्मीविण आकाशीं।
हारपति आपैसीं। उदैलीं सांतीं॥" ज्ञा० ४-११६

" अनंतें **हारपैलीं** ब्रह्मांडें।" ऋ० ५४४

क्वचित् या धातूंत 'प' ऐवजीं 'त' दिसतो. उदा०

" मुक्तीचा ठेवा **हारतला**।" उद्ध० ८८

या रूपांचा आणखी एक विशेष आहे. यादव-मराठींतील 'घेप, घाप, म्हणिप' हीं रूपें नंतर लोप पावलीं, परंतु 'हारप' हें 'प-कर्मणि रूप' मात्र वर्तमान-मराठींत शिल्लक उरलें आहे. याप्रमाणेंच 'पळिप' (ज्ञा० ४-१२७); 'तळप' (ज्ञा० १३-६०८) हीं पान्त रूपें आज रूढ आहेत.

वर दिलेल्या **'घे-घाल-म्हण-हार'** या चार धातूंच्या 'प' कर्मणि रूपांपैकीं 'घे' ची संपूर्ण व 'घाल' ची किंचित् परंपरा सांपडूं शकते. संस्कृत 'ग्रह्' चा प्राकृत कर्मभावे आदेशच 'घेप्प' असा आहे. 'म्हण' व 'हार' या दोन धातूंचीं कर्मणि रूपें पान्त कां आणि विशेषतः 'हार' चीं पान्तच कां याची नीट उपपत्ति लागत नाहीं.

(५) 'पिज' कर्मणि:—हा प्रकार मागील 'प' व 'इज' कर्मणि यांच्या संयोगानें सिद्ध होतो. तेव्हां हा जोड-कर्मणि म्हणावा. हा क्वचित् येतो. उदा०

" तेथ साहंतेनि नवले। **घेपिजे** ना।" ज्ञा० १३-३५१

" दोघीसि हारि आपण। **हारविजे** ऐसें। ज्ञा० १८-१५६६

(प $<$ व)

" तेहींचि **घेपजे** दीजे।" लीला० ३, पान २४

'प' कर्मणि जसा कांहीं विशिष्ट धातूंच्या ठायींच संभवतो, त्याप्रमाणें हा 'पिज' कर्मणिहि प-साधित असल्यानें त्याच धातूंचा होऊं शकतो. ही जोड-कर्मणीची प्रथा यादव-मराठीनें प्राकृत, अपभ्रंशापासून स्वतंत्र बनविली.

वरील पांच प्रकारांखेरीज 'धवळयां' त कर्मणीचा आणखी एक विशेष दिसतो. पहा—

" देवें श्रवणीं झळंबुके **घरीया :** पायांतकें माथा **भरीया** । "
(धवळे उत्तरार्ध १९)

हीं कर्मणि भूत कृन्दतें हिंदी तत्सम रूपांशीं साम्य पावतात व तीं एकटीं दुकटीं असल्यानें उपेक्षणीय होत.

भावे

हा प्रयोग चार रीतींनीं सिद्ध होई.

(१) **व्ययी कृदन्तांमुळें** उत्पन्न झालेला—या प्रकाराची उत्पत्ति तत्सम कर्मणि प्रमाणेंच आहे. मात्र भावे प्रयोगाच्या स्वभावानुसार येथें क्रियापद हें कर्तृगामी वा कर्मगामी नसून सदा तृतीयपुरुषीं नपुंसकलिंगीं एकवचनीं असतें. उदा०

" मीं एवों इइल " – लीला० १-६१ (भावे भविष्यकृ०)
" कां साउली न पांतां घातलें । कुहां सिंहें । " ज्ञा० ९-१४८
" एसणें असत्य कैसेनि तुम्हां बोलावलें । " लीला० १-१४

(२) **' इज ' भावे :**—संस्कृतांतील कर्मणि ' य ' प्रत्ययापासून यादव-मराठींत ' इज ' प्रत्यय कर्मणि व भावे प्रयोगांत आला. अर्थात्, याचीं भावे रूपें कर्मणि सारखींच आहेत. वाक्यरचना मात्र प्रयोगस्वभावानुसार भिन्न असते. उदा०

" जेथ मन पांगुळैजे : वेदु बोबडैजे । "–उद्ध० ७९२
" तुम्हीं श्रीमंतांचां घरीं जन्मवीजाल । "–स्मृ० १३२
" एथौनि तुमते झकवीजत होते : हासिजत होते । "–लीला० १-१६
" पैं स्थूलदृष्टी देखिजे माते । "–ज्ञा० ९-१४३

(३) **' व ' भावे :**—कर्मणिप्रमाणेंच याची परंपरा आहे व तशींच रूपेंहि होतात. अंतीं ' व ' येणें किंवा त्याचा लोप होऊन केवळ स्वर राहणें ही रूपपद्धति कर्मणिप्रमाणेंच आहे. हा ' व ' प्रकार नित्य आढळतो. वरील दोहींपेक्षां याचें प्राबल्य फार होतें. पहा—

" ऐसीं हाव कवणासि बांधवे । " उद्ध० ३८
" परि विषयत्यागाचिये वाटा : कव्हणा जाववे ना । " उद्ध० २३०
" अविद्ये निरवयेवे : जरि ब्रह्म अवछेदवे । " उद्ध० ५८०
" हे आम्हां जिनवती ना । " स्मृ० १३

" तें कोन्हा न मने चि।" स्मृ० ४३

" रुधीपुरीचे भात मज वेळवती ना।" स्मृ० २०१

" वैकुंठा गरऊ सांडविला।" शि० ३१७

(४) **तृतीयान्त भावे**:—हा प्रयोग म्हणजे संस्कृतांतील भावे प्रयोगाची केवळ छायाच आहे व तो केवळ यादव-मराठींतच आढळतो. पुढें तो लोपला. संस्कृतांतील भावे प्रयोगांत उद्देश्य व पूरक दोन्ही तृतीयान्त असतात. तशींच तीं मराठींत आहेत. हा संस्कृत भावे महाराष्ट्रींत वा अपभ्रंशांत नाहीं. यादव-मराठीनें तो साक्षात् संस्कृतपासून घेतलेला दिसतो. यादवकालीं भाषेचें कांहीं प्रमाणांत संस्कृतीकरण होत होतें त्याचा हा पुरावा आहे. या प्रयोगाचीं उदाहरणें पुढें देतों—

" तिहीं **मनुष्यां** होइजे। मृत्युलोकीं॥" – ज्ञा० १४-२७०

" अमरीं **भाटां** होइजे। मग मृत्युलोकातें वानिजे॥"–ज्ञा० ६-४५४

" तुवां **शरीरपरां** नोहावें। कामनाजात सांडावें॥"–ज्ञा० ३-१८५

" **ब्रह्मायुषां** होइजे। मग निर्जैलेयांचि असिजे॥"–ज्ञा० १४-१८६

" **अमरां** नव्हीजे"। दृ० २२

" **ऐसेयां** अवघेआं जाणतां: गोतां कुटुंबा वारितां।"–शि० २११

" जाणतेन गुरू भजिजे। जेणें **कृतकार्यां** होइजे।"–ज्ञा० १-२५

वरील प्रयोगांत " मनुष्यां, भाटां, अमरां" वगैरे जाड अक्षरांतील पूरकें तृतीयान्त आहेत व तीं सदाच आंकारान्त असतात. संस्कृतांतील

" येन कृतकार्येण भूयेत।" (जेणें कृतकार्यां होइजे)

या प्रयोगाची बरोबर छाया पडून मराठीनें उद्देश्य व पूरक दोन्ही तृतीयान्त ठेविलीं आहेत. श्री० मोडक वरील अकारान्त रूपें कोणत्याहि विभक्तीचीं न मानतां, केवळ क्रियाविशेषणें मानतात.[१] त्यांच्या मतें ज्ञानेश्वरींतील " भावे प्रयोगांतील पूरक-विशेषण नित्य आं-प्रत्ययांत असतें." परंतु महानुभाव ग्रंथांतील प्रयोग पाहतां हीं रूपें तृतीयेचींच मानलीं पाहिजेत.

---

१ गो० कृ० मोडक: " राजवाडे ज्ञा० चें पुराणत्व" भा० इ० सं० मं० त्रै० व्हॉ० १५, अंक १

शिवाय भावे प्रयोग नसतांना सुद्धां तृतीयेचीं आकारान्त रूपें होतात हें मीं प्रत्ययप्रक्रियेंत (प्र० २) दाखविलेंच आहे. तात्पर्य, संस्कृतांतील भावे प्रयोग त्याच्या अंगभूत तृतीयेसह यादव-मराठींत दिसतो.

सं० जनैः अमरैः न भूयेत ।

म० जनीं अमरां नव्हीजे ।

हा प्रयोग एकनाथ-कालांत नाहींसा झाल्यावर 'अमरां' हें तृतीयेचें रूप प्रथमेसारखें भासूं लागलें. म्हणूनच ज्ञानेश्वरीच्या एकनाथी प्रतींत हीं रूपें प्रथमेसारखीं लिहिलेलीं आढळतात, तीं भ्रष्ट होत.

§ १० सता तृतीया–सति सप्तमी

यादव-मराठींत कृदन्त विशेषणांची स्वयंवर्ती तृतीया व स्वयंवर्ती सप्तमी होई. स्वयंवर्ती चतुर्थी क्वचित् होई. स्वयंवर्ती किंवा सता तृतीया—

१ 'उदैलेनि सुधाकरें' (ज्ञा० ११-२४८)
२ 'कापुरें वेंचलेनिहिं' (ज्ञा० १८-४२०)
३ 'तेणें आलविलेनि' (ज्ञा० १८-११४६)
४ 'पाहालिया सृष्टीचिया पाहाटा' (ऋ० ३२४)
५ 'पाहातीए निशी' (शि० ७७८)
६ 'स्तवितां वेदां' (वच्छ० २९७)

स्ववंयर्ती किंवा सते चतुर्थी—

१ 'आमुतें येतां कां न साहां।' (शि० ९५७)

स्वयंवर्ती किंवा सति सप्तमी—

१ 'विरूढलेयां जोन्हला' (ज्ञा० १४-१२५)
२ 'जैसें प्रगटलेयां गभस्ती' (ज्ञा० २-२६१)
३ 'खाजें खादलेयां क्षुधानिवृत्ति होए' (दृ० २१)
४ 'दोघां असतां जवळि : गोष्टि घडे' (उद्ध० ४८२)
५ 'एथ एकलेआं चालतां' (ऋ० २९)
६ 'स्वर्गादि सुखां : रातलेआं जीवां' (ऋ० १७३)
७ 'नसतां संसारां' (= मिथ्या संसारांत) (ऋ० ५६५)

८ 'भटोवासां गेलेयां' (स्मृ० ८५)

९ 'आम्हां इतुकेयां असतां' (लीला० १-१९)

१० 'कोपलेयां महाकाळां' (शि० १०२१)

श्री० मोडक स्वयंवर्ती सप्तमी मानीत नाहींत. त्यांच्या मतें ही तृतीया होय. परंतु 'माथां, पायां' हीं सप्तमीचीं रूपें नित्य आढळणारीं असल्यानें वरील सति-सप्तमीच मानावी. शिवाय संस्कृतप्रमाणें प्राकृत व अपभ्रंश यांतहि स्वयंवर्ती सप्तमी होती. पहा, महाराष्ट्री प्राकृत—[२]

"विरहे होत्तम्मि को जीअइ"– (विरहे भवति) गाथासप्तशती २-२४

"दैवम्मि पराहुत्ते" (दैवे पराभूते) गाथासप्त० ३-४५

"पत्ते वि णअरदाहे" (प्राप्तेऽपि नगरदाहे) गाथासप्त० २-६३

"नइऊरसच्छहे जोव्वणम्मि" (नदीपूरसदृशे यौवने) गाथासप्त० १-४५

अपभ्रंश — "**वयहं गयहं** धम्मु गउ" – सावयधम्मदोहा २०६

(व्रते गते धर्मो गतः)

"**वाहिहिं विणिधारयहिं** वेयण होइं न एक्क"– सावयधम्म० ४३

(व्याधिषु विनिवारितेषु वेदना एकाऽपि न भवति)

"**अब्भितरचित्ति वि मइलयइं** बाहिर काइं तवेण"

—पाहुडदोहा ६०

(अभ्यंतरचित्तेऽपि मलिने बाह्यतपसा किम्)

"**अग्गिहिं उल्हाावियहं** अवस ण उठ्ठइ धूउ"

—सावयधम्म० ३९

(अग्नौ आर्द्रीभूते अवश्यं न उत्तिष्ठति धूमः)

म्हणजे स्वयंवर्ती सप्तमी ही परंपरागत आहे. संस्कृत-प्राकृत-अपभ्रंश या परंपरेनें कृदन्त विशेषणांचीं हीं रूपें मराठींत आलीं.

§ ११ वाक्यरचना

यादव-मराठींत वाक्यरचनेच्या दोन भिन्न पद्धति आहेत—

---

१ भा० इ० सं० मं० त्रै०, व्हॉ० १५, अं० १ – "राजवाडे ज्ञानेश्वरीचें पुराणत्व"

२ प्राकृतांतील उदाहरणांकरितां मी श्री० नेने यांचा आभारी आहें.
(दृष्टांतपाठ, नेने प्रत, पान १५२)

१ क्रियापदिक — Verbal construction
२ नामिक — Nominal construction

क्रियापदिक वाक्यरचनेंत क्रियापद कर्त्याच्या लिंगाबरोबर न बदलतां अविकृत राहतें व नामिक पद्धतींत तें तसें रहात नाहीं, हा दोहींतील मुख्य भेद होय. अर्थात् पहिली कर्तरि प्रयोगाशीं व दुसरी कर्मणि प्रयोगांतील कांहीं प्रकारांशीं निगडित आहे. क्रियापदिक वाक्यरचनेंत सदा क्रियापदाचीं प्रत्ययी रूपें आढळतात, तर नामिक वाक्यरचनेंत कृदन्तांवर काम भागविलें जातें. यादव-मराठी क्रियापदांचीं प्रत्ययी रूपें वापरण्याची पद्धति सोडून कृदन्तांकडे अधिकाधिक कशी वळत होती हें आपण प्रत्ययप्रक्रियेच्या भागांत पाहिलें. कांहीं लकार त्यांतील क्लिष्टतेमुळें व कांहीं दोघांतील स्वरूपसाम्यामुळें न वापरतां मराठी कृदन्तांचाच उपयोग अधिक करते. तात्पर्य, यादव-मराठीचा क्रियापदिक वाक्यरचनेकडून नामिक वाक्यरचनेकडे कल होता हें स्पष्ट आहे. के० ओक यांनीं केलेलें ज्ञानेश्वरीचें संस्कृत भाषांतर पाहिल्यास हीच गोष्ट ध्यानांत येईल. धातूंचीं प्रत्ययी रूपें जात जात कृदन्तें जसजशीं प्रचारांत वाढूं लागलीं तसतशी नामिक पद्धतिहि अधिक दिसूं लागली. तरीहि, कांहीं ठिकाणीं कर्ता प्रथमेंत तर क्रियापद कर्मण्यर्थी, व कर्ता तृतीयान्त तर क्रियापद कर्तरि असा विकृत प्रकार दिसतो. उदा०

"भटोबासां (तृ०) झोळीया दृष्टीपूत करीती ।"–स्मृ० १०७

"मग तिहीं (तृ०) कुदळी पाउडें घेऊनि आले ।"–लीला० १-११

असेच लिंग व वचन यांचेहि घोटाळे क्वचित् आढळतात. उदा०

"तेचि आमुचे गोसावी होए ।"–लीला० १-५

(कर्ता अ० व०, क्रिया० ए० व०)

"ते (पु०) [बिंदू] पन्हरेयावरी मानुकूलीं तैसीं मिरवतीं (नपुं०),"

लीला० १-८

"तुम्ही (अ० व०) आदि नको (ए० व०) हों गा ।"–स्मृ० ९४

"जे वस्तु (स्त्री) अगाध अलेख । ते कलियुगीं...सुलभु जाला (पु०)

ऋ० २४६

पुढील वाक्यांतील विभक्तींचे कारक अर्थ विशेष पहाण्यासारखे आहेत :—

" कांइ **माझें** घेतलें वीरूं । "–उद्ध० ७७ (अधिकरण)
" हें नव्हे **तुमचें** उचित । "–ध० पू० ३५ (अपादान)
" **तयासि** तयांवरि लक्षचि नाहीं । "–स्मृ० ११९ (प्रयोजन)
" गोसावी **आउसेचें** अन्न स्वीकारीलेयावीन आरोगण न करीती । "
–स्मृ० १९६ (कर्ता)
" **गोसावीयातें** (=ची) लेकी वाढत असे । "–ली० १–५५ (संबंध)
" तयासि कव्हणि ठाइं **सुखासि** न ए । "–दृ० ८६ (कर्ता)
" **तुझा** (= तुझ्याकडून) जालेआं अव्हेरूं : जो ए दुःखाचा पूरूं । "
–शि० १०३ (करण)
" कर्मफलांचेनि **आंगणें** : रांगौं पांती । " –शि० ९२ (अधिकरण)
" तरि कोपतील **आम्हां** : ब्रह्मवणदूं । "–शि० ३६४ (अधिकरण)
(संस्कृतांत कुप् धातु सदा चतुर्थी घेतो. जसें,
" कुप्यंति हितवादिने । "–कादंबरी १०८. ही संस्कृतची परंपरा यादव-मराठीनें राखली आहे. वर्तमान-मराठीनें मात्र ती सोडली.)

अशीं कांहीं स्थळें सोडल्यास यादव-मराठीचीं कारकें वर्तमान मराठी-प्रमाणेंच आहेत. वाक्यरचनाहि वरील कांहीं अपवाद सोडल्यास नियमांना धरून होते. हे अपवाद म्हणजे विकृत रचना केवळ गद्यांतच आढळते. ज्ञानेश्वरीसारख्या नागर पद्यांत विस्कळित रचनेचें एकहि उदाहरण नाहीं.

§ १२ तरतमभाव

संस्कृतांतील ' तर–तम ' व ' ईयस्–इष्ठ ' हे तुलनेचे प्रत्यय महाराष्ट्री व अपभ्रंश यांनीं अपभ्रष्ट रूपांत कायम ठेविले होते.

सं० तर > प्रा० अर > अप० आर
सं० ईयस् > प्रा० इअ > अप० इय
सं० इष्ठ > प्रा० अप० इठ

अशा वर्णप्रक्रियेनें जुने तरतमवाचक प्रत्यय अपभ्रंशांत जागे आहेत. उदा०

" पहिलारउ (सं० प्रथमत्तरः); भल्लारउ (सं० भद्रतरः)
बलीयउ (सं० बलीयस्); पाविठ्ठ (सं० पापीष्ठ) "[1]

---

१ णायकुमारचरिउ, प्रस्तावना, पान ५४

परंतु यादव-मराठी हे परंपरागत प्रत्यय वापरीत नाहीं. त्याऐवजीं शब्दयोगी अव्ययें वापरून तरतमभाव व्यक्तविला जातो. कोंकणींतहि असाच प्रकार आहे. पुढें, या कामीं येणारीं शब्दयोगी व इतर शब्द ससंदर्भ देतों.[१]

१ **पासौनि—**

"तरि आतां चंद्रापासौनि निववितें । अमृताहीहूनि जिववितें ।" ज्ञा० ९–२४

"तैसा क्षराक्षरा पासौनि । आनुचि तो ।" ज्ञा० १५–४९८

"तिअें वरवीं ओष्ठपूटें : बिंबफलापासौनि" । शि० ४११

"तेणें वैकुंठापासौनि विशालें । मजलागि केलीं राउलें ।" ज्ञा० ९–३८५

२ **परौतं—**

"जो गुरुपरौता । मार्गु नेणें ।" ज्ञा० १३–४४४

"परि नीकें काय यया परौतें ।" ज्ञा० २–५२

"तोहि विकुनि जीजे : या परतें पाप नाहीं ।" उद्ध० ४०५

३ **होउनि, हूनि—**

"ना तरि काष्टिचा काष्ठाहूनि । अनारिसा जैसा वन्हि ।" ज्ञा० १५–४९८

"ते पतीहीहुनु काइ न वनिजे । पतिव्रता ।" ज्ञा० ६–१२९

"वारेआंपासौनि वेगाडे : पर्वताहौनि दळवाडे ।" शि० ९३४

४ **पसि—**

"जाणतेयापासि वर नेणता चांग ।" दृ० ५८

"साधनापसि साध्य उत्तम ।" दृ० ११४

"गृहस्मरणापसि झाडातळिं मनोरथ आठविसि तें निकें ।" स्मृ० ३३

५ **पासाव—**

"वज्रापासाव कठीणु : मज दैवहताचें अंत:करणु ।" ऋद्धि० २२१

"तें रंगापासाव उजाळें : अधिक दिसे ।" उद्ध० ७९६

---

१ 'वरि' हें शब्दयोगी तरतमभावदर्शक श्री० नेने मानतात. परंतु तें तसें नाहीं. ('ज्ञानेश्वरकालीन मराठी' –ह० ना० नेने, ज्ञानेश्वरदर्शन, साहित्यखंड, पान ३८)

६ यांखेरीज **षष्ठी-सप्तमी** यांच्या विभक्तिरूपांनींहि तरतमभाव दर्शविला जातो. पहा—

" हें आगाधाचें आगाध कीं : हे विशाळुवाचे विशाळु । " दृ० ५९

" जें सकळ गुह्यां गोसांवी । पवित्रां राओ । " ज्ञा० ९–४७

" आणि धर्माचें निजधाम । तेविं चि उत्तमाचें उत्तम । " ज्ञा० ९–४८

७ **स्वतंत्र शब्दांनीं**—

" रंगवाहाळा रूपका : वरि नाचो हे नृत्यनायका । " शि० ६९८

तात्पर्य, परंपरेचे प्रत्यय सोडून यादव-मराठी स्वतंत्र शब्दयोगींच्या साहाय्यानें तारतम्य दर्शवी. पंचमी ही विभक्ति या कामीं प्रचलित दिसते. षष्ठी-सप्तमींचाहि क्वचित् वापर होतो.

§ १३ वाक्प्रचार (Idiom)

वास्तविक भाषाशास्त्राच्या कक्षेंत वाक्प्रचार, म्हणी वगैरे येत नाहींत. कारण कोणत्याहि शास्त्राचे नियम वाक्प्रचारांना लागू नसतात व उलट त्यांपासून कोणताहि सिद्धान्त वा नियम बांधतां येत नाहीं, हें खरें. परंतु भाषेच्या वाक्प्रचारांवांचून तिचें हृद्गत कळणार नाहीं हेंहि तितकेंच खरें. वर्णप्रक्रिया व प्रत्ययप्रक्रिया अभ्यासिल्या असतां भाषेचा सांगाडा कळेल, परंतु तिचें सम्यक् ज्ञान होऊं शकणार नाहीं. तें व्हावें, यादव-मराठीचा सांगाडाच केवळ नव्हे, तर त्या सांगाड्याची हालचालहि समजावी एतदर्थ वाक्प्रचार पहाणें आहेत. अर्थात् मागें प्रस्तावनेंत म्हटल्याप्रमाणें, या वाक्प्रचारांची विविधता जितकी गद्यावरून दृष्टींत भरेल तितकी पद्यावरून भरणार नाहीं. म्हणून पुढें लीळाचरित्र, स्मृतिस्थळ, पूजावसर, दृष्टांतपाठ आणि पंचतंत्र या गद्य ग्रंथांतून यादव-कालीन मराठी भाषेच्या लकबी देतों. ज्यांना म्हणींचें स्वरूप प्राप्त झालें आहे अशांची याद शेवटीं देतों. मग आलेला शब्दसिद्धीचा भाग व हे वाक्प्रचार यांवरून यादव-मराठीची अर्थव्यक्ततेची श्रीमंती डोळ्यांत भरेल. प्रथम कांहीं तत्कालीन शब्दप्रयोगों वरील गद्य ग्रंथांतून उद्धृत करितों—

१ **शब्दप्रयोग :**

दृष्टान्तपाठ : बीजें करणें (= गमन); म्हणीयें करणें (= काम)

ठाओ घालणें; तनें दाटणें; जिव्हा झडणें; बीरडें लावणें; आधां दांतीं सीस देणें; खंति येणें; तोंड देणें; कूपकांटी करणें; वेंझ देणें; विवळणें (= उजाडणें).

स्मृतिस्थळ : वेव्हारु लावणें; वीजन करणें; संपादूं आदरणें; नेम सारणें; अभ्यागता म्हणणें; सुरंग मिरविणें; वडपिंपळीं लावणें; अभंगु देणें; चंद्रमय होणें; भीक्षा करणें (=संन्यास); राहाणें; ताट करणें.

लीळाचरित्र : (१) फुलौर बांधणें; निबंध काढणें (= आधार बघणें); भुंकों लागणें (= निंदा); मोडणें (= खो घालणें); मूळ येणें; वास पाहणें.

(२) चेवो येणें (= जागृति); काळावरी नांव घालणें; ग्रहो फेडणें (= भूत); हात वोडवणें; बोबाणें; उधाणी करणें (= वाद).

(३) कवाड घालणें; आइती करणें (= तयारी) आडपालौ वोडविणें; घागरा बांधणें.

(४) खालीं पाहणें (= लज्जेनें); डोळा घालणें (= खुणावणें).

आचारस्थळ : सांडितांहि न संडे; निर्पौनि काढणें; साक्षी ठाकणें; महाराष्ट्री असावें; जन्म वोपणें.

पंचोपाख्यांन : बोलाचें उनें असे (= बोल फोल होय).

पंचतंत्रं : ढाळकरासैचिया वृत्तीं राहिले; हातु उभारणें; उपदेशु बोलणें; उपजउं लागणें; तुम्हां आम्हां वैर; कळावणें (प्रयोजक); प्रत्ययो उपजणें; शून्य होणें.

२ वाक्प्रयोग :—

गद्य ग्रंथांतील वाक्पद्धतीचा विशेष व विविधता पुढील वाक्यांवरून ध्यानांत येतील. ही तेव्हांची ग्रांथिक मराठी बोलीच्या स्वरूपांत आहे. अर्थात्

---

१ संपादक–नेने (भारत-इतिहाससंशोधक मंडळ, त्रैमासिक, वर्ष १९)
२ संपादक–पोतदार (भारत-इतिहाससंशोधक मंडळ, त्रैमासिक, वर्ष ३)

बोली भाषेचे सर्व विशेष तींत आढळतात. द्विरुक्ति, रूपांचा सैलपणा, नियमांची शिथिलता, क्रियापदलोप, उद्गारवाचकें वगैरे बोलीचीं चिन्हें तींत आहेत. उदाहरणें संकीर्ण आहेत.

स्मृतिस्थळ :

स्मृ०

१ तेणें दुःखगुंफा केली ।

२ भटोबासीं तया पीकीचें **ज्ञान केलें** (= शिकविलें)

१३ दृष्टीचीं **राखणें** घालीती (= पाळत ठेवणें)

३५ तो कहींचि नुधरे : मा नुधरे : मा कहींचि नुधरे । (= त्रिवार)

३८ येरां दैन्य जालें । (= ओशाळले)

८३ देशु उचलला होईल । (= उध्वस्त)

८९ गीतमातुचां ठाइं बहुत **भरु** धरिला । (= छंद)

९७ देह थोर तुटलें । (= अशक्त झालें)

१०६ पिंडें पिंड खेळों । (= विषयसेवन करूं)

११४ आम्ही रायारायांच्या कुमरी । (= थोरामोठ्यांच्या)

१२४ **घे-दे** म्हणौनि थोरें जिज्ञासा करीत होते । (= हिरीरीनें वाद करणें)

१५० त्या **सृष्टिशून्य** जाइल । (= ईश्वरबोध हाणार नाहीं)

१५१ तयाचेया पुत्रासि तयांची **वृत्ति न पाळीतीचि** । (= वतन सोंपविणें)

१६२ वोहटळीची गोटी वोहटळां येइल कीं । (एक म्हण)

१७१ बाइया व्याख्यान न धरे । (= बाईला ज्ञान होत नाहीं)

१८७ हा अवघा **कानाखुरांसकट** अनुसरला । (= सर्वस्वीं)

१९५ यैसा कोणी मायेंचां पोटीं जन्मला नाहीं । (= मायेचा पूत)

१९८ **कटावूनि** म्हणितलें । (= मुद्दाम)

२०१ पैठण रुधिपुरीचे भात मज वेळवतीना । (= मला करमत नाहीं)

२०४ तो अर्थपाठु त्याचा **कळांसि** बैसला । (= बेमालूम)

२०४ श्लोकु वाखाणिला । (= भाष्य करणें) सं० व्याख्या ।

२१३ अर्ध कुपीं अर्ध सूपीं : ऐसें कां करितां । (= अर्धवट काम)

२२८ थोरी **घे-दे** होत होती ।
२३२ पिस्या पिंपळगांवो काइ दूरि । (= वेड्याला काय दूर ?)
२५४ एक दीसु ती **बहुत** राहिली । (= तिचें दुखणें अधिक झालें)
२५९ कोण्हा माझें **वेकास** गेलें असैल । (= उणें अधिक बोललेलें)
२६० भटोबासां **ईश्वरदर्शन** जालें । (= मृत्यु)

वृद्धाचार

९ म्यां तुमची **जाणीव** यांपुढें सांघीतली[१] । (= माहिती)
११ त्यासि तें घोंकविणें न वैसेचि । (= जमेना)
२० सर्पें खादलें । (= साप चावला)

लीळाचरित्र :

१-३६ बोंब जाली : धांवणें नीगालें । (= धांवपळ, धांवाधांव)
४२ वाणी पडली आणि म्हैसा आला । (= बोलाफुलाला गांठ)
५१ गोसावीयातें सभा केले । (= पंच)
७४ ऐसें एइल चोजवित चोजवित । (= चौकशी करीत)
९२ भुइं काढति जटै । (= भुईपर्यंत पोंचतात)
३-१८ जवं जवं तवं तवं स्थीति होये ।
२४ सभा घनदाट बैसली असे ।
२६ **रूची-अरूचीचिया** गोष्टी होत होत्या । = (सुखदुःखाच्या)
२७ गावे नाचावे सूपली वाजवावी ।
३१ **नाव नाव** अवघां ठाईं राखा । (= थोडेंथोडें)
३० **एथौनि** करूनि दाखविजैल । (= माझ्याकडून)
३९ कालि तरि कालि आलियांत : आजि तरि आजि आलियांत।
४२ ते संध्या करूं करूं आले ।
४५ तैं आपण **किंचित्** होते या । (= कृश, बारीक)
४७ **एकें पेणेंनि** मागिलीकडौनि । (= एका मुक्कामानें मागें)

१ "I have conveyed your knowledge to him," हा इंग्रजी वाक्प्रचार तुलनेकरितां पहावा.

४९ धायतवं खाइजे : **पाहे तवं** निजिजे । (= उजाडेपर्यंत)
५८ मर मर पोरा : तुझा मढा बांधे घागरा (एक म्हण)

दृष्टान्तपाठ :

दृ० १४ जेतुलजेतुला प्रपंचीं जडे तेतुलतेतुला परमेश्वरीं उजडे ।
१७ **ऐसा** सारी : **ऐसा** सारी । (= उलथापालथ करी)
७२ हातातळीं हात वोडवीती ना । (= याचनेला हात पुढें करणें)
८२ ते तयासि **तोंड दे** । (= वाद घाली)
९० बाह्या भरैति, (= दंड भरून आले)
९३ तयाचें जन्म **कडे** पडे । (= सार्थकीं लागे)
१०५ शौच्य केलें । (= शुद्ध झालों)

पूजावसर : " रात्रि **वडिल** असे : एवढेया वेळा बापुडें वानरें कें जाइल । "

" उन्हाळे दीस तरि एकू सोगा एकीकडे : एकू सोगा एकीकडे : स्याळे दीस तरि खोल बूंथि घालीति : पाउसाळे तरि : चांदोवा धरीति । "

" ना तरि धांववीति : पळवीति : जुळवीति : दरेदरकुटे बूजवीति । गोसावी म्हणति : मरा मरा पोरे हो : तुम्हापासि वर ढोरें चांग : जेंचि खाति तेंचि रोंवतीति : एथौनि जाइजे । "

पद्यांतील :

' **शीशीं बैसे** पीक : पुण्यफळांचें । ' उद्ध० १७६
(= कंटाळा आणतें)

' गोष्टी मातु करी वाउगी : वेळु फेडावेया । ' उद्ध० १८७

' **काढति** भुजायुगुलें : जिरति कपोळे । ' उद्ध० २०५
(= हात निखळतात, गाल बसतात)

' जाणतां दिधलें **मेल्हवणें** : संसारासि । ' उद्ध० २४८
(= तिलांजली दिली)

' मग **दिहा धवलेया** : आंतु रीगौनि बळिया । ' उद्ध० ५२५
(= दिवसाढवळ्या)

'तिहीं दीधलें वीश्वासि : **आंगावरि**।' उद्ध० ६३४
(=अंगावर कर्ज देणें)
'मीचि गेलां वरळु।' उद्ध० ७५४ (= भ्रांत झालों)
'मी **होडेचा** पांचाखरी।' उद्ध० ७७३ (= हमखास गुण देणारा)
'जैसा कां गांजिला दे गाऱ्हाणें : समर्थासीं।' ऋ० २५९
'ना तरि कृपाळुवांचिया सोइरिका : निमित्येंवीण।'
ऋ० २८१ (एक सुभाषित)
'ना तया राजमठा : सदैवीं आणिला **दुखवटा**।' ऋ० ४२६
(सांत्वनपर भेट)
'सोनें **पीका** नीगालें।' ऋ० ५१८ (= उजळलें)
'निकुरेनि परतली कस्तुरी : श्रीप्रभूचे कान भरी।' ऋ० ५९९
(= चहाडी करते)
'रात्री जाली **पाहाती**।' शि० २२२ (= उजळूं लागली)
'तुम्हां लागीनिलियां गौमासिया : तरि वारा जा कां।' शि० २१९
'**काळरात्री**[१] उदो भणवीली : रणामाजीं।' शि० ४४८
(= गोंधळ)
'राया **राणिअँचा जाळा** : जरि घे लोहाचा कांटाळा।'
शि० ४७१ (= बाईलवेडा)
'माझेनि नांवें **पाणि जळे**।' शि० ७५७ (स्त्रियांची एक म्हण)
'हात उभौनि जिंतले।' शि० ८०५ (= प्रतिज्ञेनें)
'बहुत माणुस **रणां आले**।' शि० ८७६ (= मेले)
'हा भीमु आपुलेनि नांवें : **आणौनि आण** करील।'
शि० ९२३ (= अचाट करील)
'जेथ मनाची नाखि न लगे।' ज्ञा० १२–४१
(= प्रवेश होत नाहीं)

१ पहा "अंबाबाई उदो" प्रो० पोतदार, भा० इ० सं० मं०, चतुर्थ संमेलनवृत्त, शके १८३८

'तेव्हलिं विजयश्रियेचा । पाटीं एकु चि बैसे॥' ज्ञा० ७–१२
'तैसीं बांधलिं सोडितां । बुडालीं काढितां ।
सांकडीं फेडितां । आर्त्तांचिया ।' ज्ञा० १६–१९९

§ १४ अर्थप्रक्रिया

भाषाशास्त्राच्या कांटेकोर चौकटींत वास्तविक शब्दार्थशास्त्राला स्थान नाहीं. डॉ० भांडारकर, इतिहासाचार्य राजवाडे किंवा प्रो० ब्लोक यांपैकीं कोणीहि प्रस्तुत प्रकरणाचा विचार करीत नाहींत. भाषाशास्त्राचें लक्ष उच्चारप्रक्रिया आणि प्रत्ययप्रक्रिया यांकडे म्हणजे भाषेच्या बाह्यांगाकडे असतें. उलट, शब्दार्थशास्त्रांत भाषेचें अंतरंग पहाणेचें असतें. परंतु भाषेच्या बाह्य आणि आंतर स्वरूपाची अशी चीरफाड करूनहि उपयोगाचें नाहीं. म्हणूनच अथप्रक्रियेचें प्रकरण प्रस्तुत प्रबंधांत मर्यादित नसून सुद्धां यादव-मराठीचें संपूर्ण आणि यथार्थ दर्शन व्हावें एवढ्याचकरितां शब्दार्थशास्त्राचीं सर्वसामान्य तत्त्वें लावून तत्कालीन शब्दांची मीमांसा पुढें करीत आहें.

प्रो० मायकेल ब्रील यांनीं आपल्या शब्दार्थशास्त्रावरील ग्रंथांत अर्थप्रक्रियेचे कांहीं विशेष प्रकार व त्यांची चर्चा दिली आहे. वर्णोच्चारांतील फरक कांहीं तरी नियमांप्रमाणें होतात, तसे शब्दार्थांतील फरक होत नाहींत. म्हणजे उच्चारप्रक्रियेची कारणमीमांसा करतां येते, तशी अर्थ-प्रक्रियेची होऊं शकणार नाहीं, हें खरें. तथापि, प्रो० ब्रील यांनीं भाषेच्या स्वभावाचे विशेष म्हणून कांहीं दिले आहेत.[१] ते असे...

१ विशेषीकरण Law of Specialization.
२ विभक्तीकरण ,, ,, Differenciation.
३ सामान्यीकरण ,, ,, Irradication.
४ साम्याभास ,, ,, False Analogy.

शब्दांची अर्थप्रक्रिया वरील चार दिशांनीं होत असते व उच्चार-प्रक्रियेशीं तिचा मुळींच संबंध नसतो. तेव्हां, भाषेचे हे स्वभावविशेष ध्यानांत घेऊन यादव-मराठींत अर्थप्रक्रिया कोणत्या स्वरूपाची दिसते

१ M. Bre'al : Semantics, pp. 1–50, and 60–77

त्याचें विवेचन करतों. यादव-मराठींतील गद्य व पद्य दोन्हीहि समृद्ध असल्यानें व वेदान्त, पौराणिक कथा, आठवणी, चरित्र, स्थलवर्णन इत्यादि विविध विषयांवर ग्रंथरचना झाल्यानें साहजिकच अर्थप्रक्रिया मोठ्या प्रमाणांत दिसते. अलंकारप्रचुर लेखनशैलीचा परिणाम एतत्प्रकरणीं बराच झाला आहे.

(१) **अर्थसंकोच**:—शब्दाचा मूळ अर्थ विस्तृत असतांना त्याऐवजीं तो शब्द संकुचित अर्थानें वापरला जातो. उदा०

रसाळ (< सं० रसाल) “ कीं कोकिळां रसाळीं : नेसों दीधलें ।” उद्ध० १४ (= आम्रवृक्ष)

संस्कृतांतहि क्वचित् हाच अर्थ-संकोच आढळतो. पहा—
“ भृंगा रसालकुसुमानि समाश्रयंते । ”–भामिनीविलास १–१०

भूअरी (< सं० भ्रम्) = उटी, उटणें, उगाळण्याची क्रिया.
“ अनुलेपनाचिया भूअरी : मी अहंकारातें घोनारीं ।” उद्ध० १५९

घालणें (< सं० घातय्) = हल्ला, चढाई.
“ घालीति वित्तरागां घालणें । ” – उद्ध० ४३५

वोडण (वोडणें = पुढें करणें) = ढाल
“ तरि सुइं वोडण माझेया जीविता । ” – ज्ञा० ११–३७८

महुरु (सं० मधुर) = आंब्याचा मोहोर
“ तया प्रेमाचा महुरु : शांभवसुखापसि मधुरू । ”– उद्ध० ७९५
(हें उदाहरण विशेष होय. कारण, येथें मधुर हा तत्सम शब्द मूळार्थी असून महुर हा तद्भव मात्र संकुचितार्थी आहे)

पेज (सं० पेय) = तांदुळांची वेळण – उद्ध० ७८३

अवगति (सं० अवगत = मिळालेलें) = सोंग, वेष.
“ ते अवगती—बरव तोचि जाणे । ” उद्ध० ६०३

फुला (सं० पुष्पम्) = फुलांचा गुच्छ. ऋ० ५११

जानवसा (सं० जन्यवासः) = वऱ्हाडाचा मुक्काम.
“ दीधलें रुखवुत माडीं धवळारीं दीधला जानवसा । ”
ध० पू० ३०

राणा-राणी (सं० राजन्) = देवळाचा गुरव, गुरवीण, स्मृति० २, १०५

अन्याकार (सं०) = निराळें; विषण्ण

" परि नावेक अन्याकार जाले । " स्मृ० ८०

सलाग (सं० संलग्न) = सांसारिक. स्मृ० १६९

पात्र (सं० पात्र) = व्यक्ति

" कोथळेयासारीखे पात्र जर पाणी पी तरि । " स्मृ० १९३

लिंग (सं० लिंग) = स्त्री० लीला० १–११

सिंचणारा (सं० सिंच्) = कारंज. शिशु० ६४३

पांखर (सं० पक्षः) = झूल. शि० ९६२

कवळी (सं० कवलः = घांस) = मिठी, आलिंगन

" उच्चपणें देतीं कवळीं : धूमंडळांसीं । " शि० ३२२

जोडी (सं० युत) = मिळकत. द० ६३

लोखंड (सं० लोहखंड) = शेतीचें हत्यार

" तुमचीं जेतुलीं लोखंडें आहाति तेतुकीं बांधौनि आमचीये बाजेबुडीं ठेवा । " द० ५४

(२) **अर्थविस्तारः—**

वाणें (सं० वर्णः) = सणंग, वस्त्र. उद्ध० ५८२

बावन (का० बावन) = पिवळें

" बावन रूप वेधाचें मूळ स्वभावें : भणौनि साच भणों । " ऋ० ५३७

नामना (सं० नामन्) = कीर्ती

" तया पुरुषाची नामना सारावी । " स्मृ० १०१

माझें (= माझें येथें)

" तुम्हीं माझें मासां दीसां जेवावें । "–स्मृ० ५६

पायांचे (= पायदळ)

" पायांचें भिडतां : तोडिति जानिवसे जे । " शि० १०४५

अरल (का० अरळु = फूल) पुष्पशय्या. उद्ध० १३०

(३) **व्यंजना, साम्याभास, अर्थभ्रंश,** वगैरेंमुळें होणारे बदल—

कासणें = युद्धास तयार होणें. उद्ध० २५

वरिपड (सं० उपरिपत्) = प्राप्त. उद्ध० ५०, वच्छ० १०७

अवघडा = संकट (नाम) उद्ध० ५६ 'तरि चुकती अवघोचि अवघडे।'

विचारणें = विचार करणें. उद्ध० ६४

वाणें (सं० अर्प्) = चाल करणें. उद्ध० ४२८

हीरवा (सं० हरित) = घात न करतां, शाबूत. उद्ध० ४३९

"तो धरूनि हीरवा : ऋष्यश्रृंग रायापुढें सुआवा।"

त्यागी (सं० त्यज्) = देणारे. 'पडपत्यागी' = शोभा देणारे. उद्ध० ६४४

अवघड = आंवरण्यास कठिण. 'अनादि अविद्या अवघडी।' ऋ० १६२

जतन (सं० यत्न) संरक्षण. ऋ० ५७३

वाहाणें = रस्ता रहदारीचा असणें. 'परमार्गु वाहाति सदैवें।' ऋ० ६१९

द्दती (सं० द्युति = तेज) = रस, चव. ध० पू० ५३

विणें (सं० वी) = देणें. "त्या वीती वीरगांठीं।" ध० पू० ६९

विस्तारणें (सं० विस्तृ) = अन्न वाढणें. 'बोनें विस्तारिती नारी' ध० उ० ४४

सुश्रुषित = शिष्य. स्मृ० ५०

चालतें = वहिवाटींत असलेलें. 'चालतीं घरें, चालतीं उखळें : चालतीया चुली।' स्मृ० ५१

व्यवस्था = हकीकत. 'व्यवस्था सांघीतली।' स्मृ० ९१

हळु = हलकें. 'झोळी हळु लागली।' स्मृ० १०७

विराहित = न कळत. 'केशोबासां विराहित म्हणितलें।' स्मृ० १३१

प्रबळ = पुष्कळ. 'प्रबळ तूप वाढिलें।' स्मृ० १३५

दूषण = अडचण. 'बहुत दूषण दाउनि वारिलें।' वृद्धा० ३

जाणिव (सं० ज्ञापय्) = माहिती. 'म्यां तुमची जाणीव सांघीतली ।' वृद्धा० ९

दुभणें (सं० दुह्=दूध काढणें) दूध देणें. 'गाए दुभें ।' इ०५४

सांडणें = आडवे होणें, लवंडणें. 'विसंवला प्राणनाथु सांडिजे ।' शि० ६०४

वाढणें = पुढें होणें, येणें. शि० ५६५

जेवनी (सं० जेमनम्) = उजवी, उजव्या बाजूची.
'जेवनी घातली ।' शि० १०२८ 'जेवनीअें भुजे' – शि० ५४७

वहिला (सं० प्रथम) = आवडता. "मनापासौनि वहिला ।" शि० ५१

एकसर (सं० एकसर = एकगति) = संपूर्ण, केवळ. 'तें ब्राम्हण एकसर सावडें'—शि० २०४

(४) खालील **शब्दांचे मूलार्थ** यादव-मराठींत कायम आहेत. परंतु वर्तमान मराठींत मात्र ते बदलले आहेत.

विज्ञापन[1] (सं०) = जाहीर केलेलें, कळविलेलें.
" एथिचेया नामधारका : विज्ञापन परिवारिआ मार्गिका ।" ऋ० ६३६

अपरोक्ष (सं०) = साक्षात्, प्रत्यक्ष
" आचारतेया पुरुषा शाब्दांचि अपरोक्ष म्हणणें ।" स्मृ० २४८

चौगुण (सं० चतुर्गुण) = चौपट
" असो हे चौगुणा चढली भरिमळा ।" शि० २७३

दुपाहारीं (सं० द्विप्रहरौ) = दोन प्रहरांत (दुपारीं नव्हे)
" चांदिनेयाचिआं दुपाहारीं : वायां निनिली वाहिरी ।" शि० ८३१

यांखेरीज ग्राम्यतापरिहार, अकारण गौरव वगैरे अनेक कारणें अर्थ-प्रक्रियेचीं आहेत. परंतु तीं कारणें होत, प्रकार नव्हत. अर्थात् त्यांचा विचार

१ हिंदींत अद्यापि 'विज्ञापन' हा शब्द 'जाहिरात' या अर्थीं आहे.

प्रस्तुत प्रबंधाच्या कक्षेंत येत नाहीं. भाषेंतील शब्दांचे हे भिन्नभिन्न कल शास्त्राच्या सीमेंत येऊं शकत नाहींत. या संबंधीं प्रो० ब्रील म्हणतात—[१]

"...How should words have tendencies? Nevertheless, we hear of a pejorative tendency, of a tendency to deteriorate, etc. These tendencies must take their place among those 'forces' with which the science of the Middle Ages peopled nature."

एतावता अशा स्वभावविशेषांची नोंद करण्याचें कारण नाहीं. प्रो० ब्रील यांनीं एकंदर अर्थप्रक्रियेची केलेली मीमांसा प्रस्तुत प्रकरणीं उपयुक्त वाटेल म्हणून ती पुढें देतों. ते म्हणतात—[२]

"One fact which dominates the whole subject is that by a necessity our languages are condemned to a perpetual lack of proportion between the word and the thing. Expression is sometimes too wide, sometimes too narrow."

वरील उद्गारांत अर्थप्रक्रियेचें इद्गत सांगितलेलें आहे. यादव-कालीन मराठीच्या अर्थप्रक्रियेची मीमांसा अशीच करितां येईल. परंतु अर्थप्रकरण विषय-मर्यादेपलीकडील असल्यानें येथें अधिक चिकित्सा करण्याचें प्रयोजन नाहीं. यादव-मराठीच्या दृष्टीनें विवेचन संपूर्ण व्हावें एवढ्याचकरितां वरील उदाहरणें दिलीं आहेत.

---

१ Semantics : pp. 99

२ Semantics : pp. 106

भाग ४ था

परभाषांचा संसर्ग

प्रास्ताविक

दोन भिन्न भिन्न भाषिकांच्या निकट सहवासानें त्यांच्या भाषांचा एकमेकींवर परिणाम होऊं शकतो. ही अवस्था यादव-कालीन मराठीची झाली. द्राविडी भाषिकांशीं तिचा निकटचा संबंध आल्यानें कांहीं बाबतींत या आर्यभाषेला द्राविडी वळण लागल्याचें दिसेल. या सान्निध्यजन्य परिणामाचें टिपण करण्यापूर्वी तत्कालीन मराठी भाषेभोंवती द्राविडीचें वातावरण कसें पसरलें होतें तें दाखवितों.

कानडी भाषा ही मराठीहून निःसंशय प्राचीन असून तिचा जन्मकाल दुसऱ्या शतकांत मानला जातो. कानडींतील पहिला ग्रंथ "**श्री विजय**" हा समंतभद्र श्री विजय नांवाच्या जैन लेखकानें इ० स० ४५० त लिहिलां. नृपतुंगाचा **कविराजमार्ग** हा काव्यशास्त्रविषयक ग्रंथ इ० स० ८१४ त झाला. म्हणजे देवगिरीच्या यादवांची राजवट सुरू होण्याच्या फार पूर्वी कानडी भाषा व वाङ्मय हीं चांगलींच फोफावलीं होतीं व यादव-कालांत त्यांचा अभ्यासहि मराठी पंडितांकडून झाला असला पाहिजे. कानडीला म्हैसूरच्या गांग राजांचा आश्रय होता व तसेंच देवगिरीकर यादवांची ती राजभाषा नसली तरी त्यांचा ओढा तिकडे असावा. निदानपक्षीं ती यादवांच्या दरबारीं सन्मान्य होती हें खचित. हळेबीडचे होयसळ यादव हे तर पूर्णतः कन्नडिग असून त्यांचा तसा उल्लेखहि गदगच्या शिलालेखांत (इ० स० ११९१) येतो.[२] देवगिरीचे कृष्णदेव (इ० स० १२४७–६०) व महादेवराय (इ० स० १२६० ते ७१) यांचें कन्नडप्रेम त्यांच्याच प्रधानांच्या मल्लीशेट्टी, चौंडिशेट्टी, कामय्या नाइक या कानडी नांवांवरून दिसतें. सिंघणाचा (इ० स० १२१०–३८) बीचणण हा हस्तक असून

---

१ द० रा० बेंद्रे : "ज्ञानेश्वरपूर्वकालीन कानडी वाङ्मय" (म० सा० पत्रिका, व्हॉ० ७

२ राइस : "कन्नड शिलालेख"

त्यामार्फतच त्यानें म्हैसूर व कर्नाटक हीं जिंकलीं. यावरून त्याकाळीं कानडीचा विस्तार कसा व किती होता हें दिसेल. आणखी पुरावा शिलालेख व ताम्रपट यांचा देतों. येथें भाषा व लिपी हीं बहुश: कानडीच आढळतील. आजचे मराठी प्रांत यादवकालीं कानडी असावेत असें कांहीं शिलालेखां-वरून वाटतें. भाषा संस्कृत व लिपी कानडी, भाषा कानडी व लिपी देवनागरी, आणि भाषा मराठी तर लिपी कानडी असे त्रिविध प्रकार या शिलालेखांत आहेत. त्यांची यादी खालीं देतों.

१ तेरचा[1] शिलालेख, इ० स० १०७८
भाषा कानडी आहे. तेर बार्शीजवळ असून तेथें गोरोबा कुंभाराची समाधि आहे.

२ गोमांतकीं[2] मराठी ताम्रपट, इ० स० १३००
लिपी कानडी, भाषा मराठी.

३ तिसरा गोविंद राष्ट्रकूट याचा मंडळें[3] ताम्रपट, इ० स० ८१०
भाषा संस्कृत, परंतु कानडी छटा.

४ चिक्क-बागेवाडी ताम्रपट, इ० स० १२४९
भाषा हळेकन्नड.

५ मंगळवेढें[4] शिलालेख, इ० स० ११०३
भाषा मराठी व कानडी.

यांवरून असें दिसतें कीं **यादवकालीन महाराष्ट्राच्या सीमा आजच्या-हून भिन्न होत्या.** बदामीच्या चालुक्यांपासून कल्याणीच्या कलचुरी घराण्यापर्यंत महाराष्ट्रावर कन्नड राजांचा अंमल होता आणि या कालांत ती राजभाषा असल्यानें कानडीची सावली महाराष्ट्रांतील मराठीवर पडली असलीच पाहिजे. कानडीचा संपर्क टाळणें हें त्या मराठीला शक्य नव्हतें,

१ Dr. Barnett : Epigraphia Indica, xix 39. Cousins and Bourgess : Archeological Survey of India, pp. 199 (1902–3)
२ भारत-इतिहाससंशोधक मंडळ, वार्षिक १९१५
३ ,, ,, ,, ,, त्रैमासिक, व्हॉ० १
४ खरे : द० म० इ० साधनें.

इतक्या त्या दोन्ही एकमेकींत मिसळल्या होत्या. नृपतुंग हा कानडी कवि तत्कालीन तिरुळ् कन्नडच्या म्हणजे गाभ्याच्या कानडी भाषेच्या कावेरी-पासून ते गोदावरी नदीपर्यंत सीमा सांगतो त्या अशा—

किसवोळल्[1] (= विजापूर जिल्ह्यांतील पट्टकदल)
कोप्पणनगर (= कोप्पळ, रायचूर जिल्हा)
पुलिगेरे (= लक्ष्मेश्वर, धारवाड जिल्हा)
ओंकुंद (= ? बेळगांव जिल्हा)

जुन्या कानडीच्या या सीमांवरून मराठीचा या भाषेशीं असणारा निकटचा संबंध अजमावितां येतो.

आणखी एक प्रमाण या विषयासंबंधीं देतों, आणि तें म्हणजे **पंढरपूरच्या श्री विठ्ठल संप्रदायाचें.** हा संप्रदाय मूलतः कानडी दिसतो. चौंडरस, पुरंदरदास, कनकदास इत्यादि प्राचीन कानडी संतकवींचें विठ्ठल हेंच एकमेव दैवत होतें. इ० स० १३०३ च्या सुमारास होऊन गेलेला चौंडरस हा कानडी कवि आपल्या "अभिनव दशकुमारचरिते"[2] या ग्रंथांत एक विठ्ठल-स्तुतिपर अष्टक घालतो व पंढरपूरच्या विठ्ठल-मंदिराचें वर्णन करितो—

"मेरेव चेन्निग विठ्ठलरायनेप्पिदं ।"

पंढरपूरच्या देवळांतील कानडी शिलालेखांत[3] (इ० स० १२३७) पंढरपूर या ऐवजीं 'पंडरगे' असा उल्लेख आहे. अविधेय राष्ट्रकूटाच्या इ० स० ५१६ तील ताम्रपटांत[4] "पांडरंगपल्ली" हें नांव येतें. पंढरपूरचा हा सर्वांत प्राचीन उल्लेख होय. यावरून पंढरपूर हें नांव संस्कृत पांडुरंगपूर यापासून न निघतां कानडी 'पंडरिगे' यापासूनच निघूं शकतें हें श्री० खरे[5] यांचें मत सिद्ध

---

१ नृपतुंग : "कविराजमार्ग" इ० स० ८१४
२ नरसिंहाचार्य : 'कर्नाटक कविचरिते' भाग १ पान ४०३
३ ग० ह० खरे : 'श्री विठ्ठल आणि पंढरपूर'
४ Report of Mysore :Archeological Department, 1929 pp. 198
५ ग० ह० खरे : 'श्री विठ्ठल आणि पंढरपूर'

होतें. तसेंच 'विठ्ठल' हा शब्दहि संस्कृत 'विष्णु' याचा कानडी अपभ्रंश आहे, प्राकृत अपभ्रंश नव्हे.

सं० विष्णु > का० विट्टु

> का० विट्टु + 'र' (कन्नड मानार्थी अ० व० प्रत्यय)

> म० विठ्ठ + ल

डॉ० भांडारकर[१] यांच्या मतेंहि हा शब्द मूळ संस्कृतचा कानडी अपभ्रंश आहे. म्हणजे मराठी 'विठ्ठल' हा शब्द संस्कृतांतून कानडीच्या द्वारा आला. मॉ० झिलस्की हे तर विष्णु या देवतेस द्राविडी मूळ व ऑस्ट्रो-एशियाटिक नांव सुचवितात[२] (ऑस्ट्रो-एशियाटिकमध्यें 'ष' आणि 'ठ' या वर्णांची अदलाबदल होते. त्याप्रमाणें विष्णु >विठु असें रूप होईल.)

विठ्ठल-पंढरपुराचे हे सारे उल्लेख आणि या शब्दांची व्युत्पत्ति यांवरून विठ्ठल संप्रदाय कानडीच होता असें अनुमान निघतें. हंपी (विजयनगर) येथील विजयविठ्ठलाच्या मंदिरांत आज पंढरपुरांत असलेली विठ्ठलमूर्ति होती हा आणखी एक पुरावा आहे. डॉ० नारायणरांव हे आपण विजयानगरच्या विठ्ठलमंदिरांतील अवशेषांत डाव्या कडेवर रुक्मिणीची सूक्ष्म आकृति असलेली एक विठ्ठलमूर्ति पाहिल्याचें सांगतात. ही मूर्ति बहुशः मूळाची प्रतिकृति असावी व या विधानाला नामदेवाच्या "वामांगीं रखुमाई दिसे दिव्य शोभा" या प्रसिद्ध उक्तीमुळें बळकटी येते. तात्पर्य, यादव-कालीन विठ्ठलसांप्रदायी मराठी कवींना विठ्ठल हें दैवत व मूर्ति हीं कानडी आहेत अशी जाणीव असावी. रा० आवटे यांचा 'सकलसंतगाथा' तर ज्ञानेश्वरांचा म्हणून एक संपूर्ण कानडी अभंग देतो. तो अभंग असा—

---

१ Dr. Bhandarkar : "Vaishnavism and Shaivism."

२ M. Zilleski : Archiv Orientalene, Vol, IV No.2 Translated into English by Mythic Society, Banglore.

३ Dr. C. Narayanrao : Summary of papers—8th Oriental Conference, Mysore, pp.114.

" आकानि केळले चिकाना तुमा । भारले धसिणे मरुळादने ।
चलुवाने पंढरीराया चलुवाने । यह्ले दोनर्कवाने ।
पुंडलीकने भक्तिबंदा । रखुमादेवीवर विठ्ठलुने । " १०१
(आवटे-प्रत, १९२४)

हा अभंग प्रक्षिप्त म्हणून संशयास्पद मानला तरी इतर ठिकाणीं विठ्ठल हें दैवत कानडी असें ज्ञानेश्वर मान्य करतात. उदा०

" **कानडा हा विठ्ठलु** कर्नाटकु । तेणें मज लाविलें वेधीं । "

ज्ञानेश्वरींतहि कानडें म्हणजे कठिण या अर्थी प्रयोग आहे. पहा—

" आतां केती नावां नावां गूज ।
म्हणतां कानडें हान आवडैल तुज । " ज्ञा० ९–४२

या नंतर पुढें तीनशें वर्षांनीं सुद्धां महाराष्ट्र कवींत ही जाणीव कायम होतीच. एकनाथांचा पुढील अभंग पहा—

" **तीर्थ कानडें देव कानडे** । क्षेत्र कानडें पंढरीये ।
विठ्ठल कानडे भक्त हे कानडे । पुंडलीकें उघडे उभे केले ।
एका जनार्दनीं भक्ताचिया चाडा । **विठ्ठल कानडा** विटेवरी । "

एतावता आपला संप्रदाय, आराध्य दैवत, मूर्ति आणि क्षेत्र हीं सारीं मुळांत कानडी असल्याची साक्ष महाराष्ट्र-कवि देतात. यादव-कालीन मराठीवर कानडीचा परिणाम होण्यास वरील गोष्टींची मदत झाली असावी. यादव-कालाच्याहि पूर्वीचा कानडीचा विस्तार, ताम्रपटांचीं स्थळें व स्वरूपें, आणि विठ्ठल संप्रदायाचें मूळ या तीन प्रमाणांवरून मराठी-कानडीचा संपर्क अजमावितां येतो. भाषिक देवघेव ही तेव्हां टाळतां येण्यासारखी नव्हती.

हा परिणाम भाषेच्या चार प्रांतांत झाला—

१ शब्द
२ उच्चारप्रक्रिया
३ प्रत्ययप्रक्रिया
४ वाक्यरचना

तो अनुक्रमें पुढें देतों—

§ १ शाब्दिक संपर्क

यादव-कालीन मराठीनें कानडीपासून अनेक शब्द साक्षात् वा संस्कृत-प्राकृतद्वारा उचलले आहेत. पैकीं दुसऱ्यांचा विचार विषयमर्यादेंत येत नाहीं. संस्कृतांतील द्राविडी शब्दांचें मान, संस्कृत-भाषाशास्त्रकार पहातील. येथें फक्त जेवढे द्राविडी शब्द साक्षात् मराठींत आले तेवढ्यांचाच विचार करणें आहे. शिलालेखांपासून आरंभ करतों. यादव-कालीन मराठी शिलालेखांत खालील कानडी शब्द आहेत—

(१) "गंगाराजें **सुत्तालें** करवियलें" (श्रवणबेळगोळ इ० स० ९८३)
का० सुत्ताल = देवळाभोंवतालचा कोट.
(या शब्दाचा अर्थ सुतानें, मुलानें असा कै० भावे आदिक करतात, तो बरोबर नव्हे.)

(२) "अर्धमापहारी रूपाचें **सूंक**" (पाटण, इ० स० १२०६)
का० सूंक = जकातपट्टी.

(३) "देवस्छलासि गुरवि **ओडेरि**
सत्रस्छलासि ब्राह्मणु **ओडेर**।" (तासगांव ताम्रपट[१], इ० स० १२५०)
का० वोडेयर = मालक, अधिपति.

(४) '**सतदवरु**' (पीरवाडी ताम्रपट[२], क्रमांक १, इ० स० १२०४)
का० देवरु (रु-रि हा कानडींत मानार्थी प्रत्यय आहे.)

(५) "पुराणवृत्ति भूमि **सर्वनमस्येन**" (नेवासें, इ० स० १२३९)
का० सर्वनमस्य = बक्षीस.

यांपैकीं 'देवरु' हा शब्द जरी मूलतः कानडी नसला तरी सं० देव याला लागलेला 'रु' हा अ० व० मानार्थी प्रत्यय कानडीच आहे.

---

१ भारतइतिहाससंशोधक मंडळ, त्रैमासिक व्हॉ० १५

२ इ० स० १२०४ मधील तीन ताम्रपट–राजवाडे, भारतइतिहाससंशोधक मंडळ, वार्षिक १९१४

ज्ञानेश्वरींतील कानडी शब्द[१] :—

अध्याय	ओवी	शब्द	कानडी शब्द व अर्थ
१	९	चोखाड	चोक्कळ = शुद्ध
१	९	मिरवणें	मेरे = चकाकणें
१	५२	कडसणें	कड = घुसळणें
१	८५	मातु	मातु = शब्द
			(तेलुगू–माटा = भाषा, गोष्ट)
१	११६	पन्नासणें	पण्ण = मांडणी करणें
१	२३३	किडाल	किडु = बिघडणें
२	३३९	अडदरु	अड्डु = अडथळा
३	२१	भीड	भिडे = विनय
३	१००	ओलग	ओळग्गिसु = सेवा करणें
४	१०६	ओगर	वोगर = भात
			ओरग्यिसु = खाणें
६	२५	आडणें	आड्डिसु = अडथळा करणें
६	३१४	आड्ड	" "
६	९८	भांगार	भांगार = सोनें
९	२१२	पौलि	पौलि = आवार
११	३५८	हुडा	हुडा = बुरुज
१२	७०	बोचर	बोच्चु = दंतहीन
			(तेलुगू–बोक्की)
१२	२१०	बिढार	बिडार = रहाण्याची जागा
१२	५२	आडवंक	अड्डवंक = दांडा, गज
१३	२६	लांचकरु	लंच = लांच

१ या यादीकरितां प्रा० जोशी यांच्या ओरिएंटल कॉन्फरन्स ७ वी (१९३३) मधील लेखाचा उपयोग झाला. परंतु प्रो० जोश्यांनीं दिलेले बरेच शब्द कानडी नसून तद्भव आहेत. ते अर्थात् मीं गाळले आहेत.

अध्याय	ओवी	शब्द	कानडी शब्द व अर्थ
१३	२४३	बाग	बगे = रीत, पद्धति
१३	३३५	हरलु	हरळु = खडा
१३	४१८	हडपु	हाडिपु = नोकर
१३	४१८	उलिग	ऊळिग = सेवा
१३	५६९	मुरकुंडी	मुरि = वांकविणें
			(ते० मुरिकोन्नु = मोडणें)
१३	५४१	सूड	सूडु = जळणें
			(ते० सुडिचु = द्वेष करणें)
१३	४१८	उगालु	उगुलु = थुंकणें
१३	६३२	आडसो	अडसु = रेटणें, ढकलणें
१३	५५०	केळवणें	केळे = काळजी घेणें
१४	१४०	तूंक	तुकमु = वजन करणें
१५	१५०	टका	टक्के = निशाण
१५	९२	बेंबल	बेंबळ = जोर
१६	१५१	साटी	साटी = सारखेपणा
			ते० साटी = बरोबर
१७	१६३	मेचु	मेच्चु = स्तुति करणें
१७	४०४	वोरकल	ओरेकल्लु = कसोटीचा दगड
१७	४१५	चडकणा	चटकाणी = थापड
१८	६८७	मदवी[१]	मदवी = लग्न
१८	४८९	आंकसाला	अंगसालेर = सोनार

१ 'मदवी' हा शब्द मराठींत अर्थ बदलून आला. पहा–
"आतां अविद्येचां गांवीं । मोहाची वेढूनि मदवी" । ज्ञा० १८।६८७
"क्षणक्षणीं नीचनवी । दृश्याची चोख मदवी ।" अमृ० ७।१२६
येथें अर्थ 'वस्त्रें' असा असून मूळ कानडींत "लग्न" हा आहे.

अध्याय	ओवी	शब्द	कानडी शब्द व अर्थ	
अमृतानुभव				
१	३६	बोणें		
७	१२६	मदवी		
७	१११	बरड	बरडु	= माळजमीन
उद्धवगीता				
१९		तोवरु	ओत्तु	= बहर
२८		हेवा	हेव	= मत्सर
१७०		भांगार	भांगार	= सोनें
१८२,४३४		उलींगवाडी	उळि	= चोर
१३०		अरल	अरळु	= फूल
४५५		चडकणा	चटकाणी	= थापड
५२०		कांडगुंडा	गुंडा	= दगड
५४३		तुकाआगळा	तुका	= वजन
५४७		वोरकल	ओरेकल्लु	
५९४		भैरवगुंडा	गुंडा	
५२३		अडण	अड्डु	= भय
४९१		खोपा (घरटें)	कोप्पे	= पिशवी
६३८		वोळग (सेवा)		
७३१		दगडगुंडा	दक्कड + गुंडा	
ऋद्धिपूर-वर्णन				
४५		बावनें	बावन	= चंदन
५१		वोळगवट	वोळग	= सेवा
२८		सगर	सग्गर	= पायवाट
१३४		गुंडा	गुंडा	= दगड
१७८		तुकमठ	तुक	+ मठ
२०४		उलींग	उळिंग	= काम, सेवा

ओवी	शब्द	कानडी शब्द व अर्थ
३१९	बोरा	बोरु = खडा
३८६	हावरु	हेव + रु
५१७	इडरीं	इड्डुली = एक पक्कान्न
५०९	वोगर	ओग्गर
४४२	अरवारु	अरलु
४९३	उलंगिया (सेवक)	उळिंग
५४२	एळा	यालकी = वेलदोडा
५७०	कळिकोळिगा	कोळग = भ्रमर

शिशुपालवध

६०,५२७	गुढी	गुड्डि = पताका
१३३	चाहाडाचाहाडी	चाडिचुकली
१६०	उरगुढें	उरु = खेडें, + गुढे = देऊळ
४०७	दळभिड	भीडे
४४०	ओगरु (घांस)	वोग्गर
५७०	गुढरूं	गुडर = सतरंजी
५१०	आंगिटोपरें	टोप्पा = शिरोभूषण
६१५	चविनट	चवि = चव
७९८	अरुवारु	अरळु

धवळे (महदंबा)

पूर्वार्ध

१७	वोळग	वोळग
२९	कुडगी	कुडगी = हातांतील दागिना
४७	गुढर	गुंडर
५४	तुकणें (हालविणें) तुक	
५६	वोजा	ओजे
४५	केळवणें	केळे = स्नेह

ओवी	शब्द	कानडी शब्द व अर्थ
६९	आडा (ओळ)	अड्ड
७३	अंदु	अंदु = पायांतील दागिना
७३	कळाविया (हस्तभूषणें)	कै = हात
उत्तरार्ध		
८	ओघमान	ओग्गु = अतिशय
४२	मुडे	मुडि = हस्तभूषण
४२	मफैरे-मुप्पुरि (तीनपेडी माळ)	(मूरु = तीन + हुरि = पीळ)
४२	एरणी	ऐरणी = हाराडेरा
६०	घीर्वंदा (एक पेय)	पीर्वंदु = हीर्वंदु[१]
स्मृतिस्थळ		
२८	बोडी (डबकें)	बोड्डि
९७	तोडगळसुरी	तोड्डु
१७९	गारी	गारी (खड्डा)
२१९	हांवरु (हुंदका)	हाव
वृद्धाचार		
२३	बहळ	बहळ = विपुल
दृष्टान्तपाठ		
१७	बोडी	बोड्डि
२८	कुंभचासी	सं० कुंभ + का० तास = शेत
५८	कोल	कोल्लु = काठी
६८	आळि	आळु = रडणें
९२	हाडगुड	हाड + गिड
१०६	झळका (चकाकी)	झळका

---

१ "The 'P' period and 'H' period in Kannad"
Kannad–English Dictionary (Rev. Kittel)
—Preface, pp. iv

लीळाचरित्र भाग १

पृष्ठ ३६	चडकणा	चटकाणी
३८	तराळ (पहारेकरी)	का० ते० तलीर
४७	हाडगुडें	सं० अस्थि > हाड + कानडी 'गि' हा सादशब्दाचा वर्ण. येथें मुख्य शब्द तद्भव असून त्याचा प्रतिध्वनि कानडी आहे.
६४	लवलव (घाईनें)	का० लघुलघु (क्रि० वि०) अर्वाचीन मराठींत 'हळु' (सं० लघु) याला अर्थ उलट आहे. अर्थात् 'लवलव' या शब्दावर कानडीची छाया आहे.
भाग ३	चीरकुट	सं० चीर + का० गुट्ट

तामीळ शब्द :—यादव-कालीन मराठीनें तामीळ भाषेंतून दोनच शब्द घेतलेले दिसतात.

१ **पेंव** < ता० पयंबु = खळगा

" किंबहुना जें पेंव । विंचुवांचें " ज्ञा० ८।१४३

२ **पिलूं-पिलें** < ता० पिलु

" व्याधापासौनि सुटलें । आर्तु पक्षिणीचें पिलें ।" ऋ० ३८५

तेलुगू शब्द:—तेलुगू भाषा ९ व्या शतकांत जन्मली, आणि तिचे व मराठीचे प्रांत लागून असल्यानें साहजिकच कांहीं शब्द तिजपासून मराठीनें घेतले. अर्थात् हें ऋण कानडीच्या द्वारा आलें. म्हणजे तेलुगू-कानडी-मराठी अशी परंपरा आहे. यादव-मराठीचा तेलुगूशीं निकट संबंध आला असावा असें 'पंडिताराध्यचरित्र[२]' (इ० स० १३००)

१ मागील प्रकरणांतील सादशब्द-विचार पहावा.

२ "ज्ञानेश्वरकालीन तेलुगू ग्रंथांतील मराठी गाणीं " प्रा० पोतदार, भा० इ० सं० मं० त्रैमासिक, व्हॉ० ११

या तेलुगू ग्रंथांतील मराठी गाण्यांवरून दिसतें. त्या मराठी गीतांतील 'अप्पुले लिंग,' 'अत्तु' 'घेत्त' यांतील द्वित्त व्यंजनें हीं निःसंशय द्राविडी होत. तेलुगू शब्दः—

१ **बुरी** (चिखल) < ते० बुरड
" वोढालाचां सुरीं। आखरु आते बुरी।" ज्ञा० १३-५५७

२ **उबात** (उकाडा) < ते० उब्ब
" कां उबातेनि वस्त्र फेडिलें।" ज्ञा० ८-६५

३ **येकवंकी** (एकपणा) < ते० वंकबंकी ज्ञा० ४।१२

४ **जाकळणें** (व्यापणें) < ते० जागिलि
" दिठी जाकलौनि निगों पाए।" ज्ञा० ६-२६७
" मग जाकलिला ढेंकरें : तृप्तु जैसा।" ज्ञा० १८-१७

५ **टाळें** (कुलुप) < ते० टाळमु
" फेडावेआ गुणचित्ताचें टाळें।" उद्ध० ६८३
" कामकळिकेसि टाळी घातली।" शिशु० १९०

६ **जाडी** (कांबळें) < ते० जाडी
—स्मृ० ८, लीळाचरित्र १-६६

७ **तूप** < ते० तुप्प

८ **गदारोळु** < ते० गंदरगोळयु (का० गद्दल)
" सांडौनि गदारोळु : मज एणें घातला आळु।"—शि० १९२

येथवर यादव-मराठी आणि द्राविडी यांतील शब्दसाम्य पाहिलें. परंतु भाषाशास्त्रांत, विशेषतः भाषिक परिणामासंबंधींच्या चर्चेत, तौलनिक शब्दकोशाचा पुरावा तितका सबळ मानला जात नाहीं. परकीय भाषेपासून अनेक शब्दांचें लेण घेऊनसुद्धा मूळ भाषेचा स्वभावसिद्ध सांगाडा अविकृत राहूं शकतो. म्हणून तौलनिक शब्दकोशावर न विसंबतां वर्णप्रक्रिया व प्रत्यय-प्रक्रिया तपासल्या पाहिजेत.

§ २ वर्णप्रक्रिया

वर्णप्रक्रियेसंबंधीं पाहतां, प्रत्येक भाषेला तिची स्वतःची अशी परंपरा असते व तिला धरूनच भाषेच्या वर्णांत बदल होत असतात, हें लक्ष्यांत आणलें पाहिजे. या नियमाप्रमाणें, यादव-मराठी ही संस्कृत, प्राकृत

व अपभ्रंश यांचीच वर्णप्रक्रिया पुढें चालविणार हें स्पष्ट होय. परंतु परंपरेव्यतिरिक्त इतर परिणाम भाषेच्या वर्णप्रक्रियेवर होऊंच शकणार नाहींत हें मात्र खरें नव्हे. शब्दऋण शक्य व उच्चारऋण अशक्य हें विधान पूर्णपणें सत्य नव्हे. आजहि आपण इंग्रजीच्या सहवासामुळें मराठींत 'फ' चा 'f' असा दंत्योष्ठ्य उच्चार आलेला पहातोंच कीं नाहीं? फारशीमुळें अंतर्गत 'अ' चा एक विशिष्ट निभृत उच्चार व अल्पप्राण 'ह' चें प्राबल्य हीं मराठींत शिरलींच कीं नाहीं? आणि असें असूनहि मराठीनें पूर्वपरंपरा सोडली असें नाहीं. हीच गोष्ट यादव-मराठीची होय. तिनें अपभ्रंशाचें वळण कायम ठेवून शिवाय कांहीं द्राविडी विशेष उचलले. दक्षिणेकडील पांड्यांचा व आर्यांचा संबंध तिसऱ्या शतकापासून[1] आला, व साहजिकच आर्य आणि द्राविडी भाषांचा संपर्क इतका जुना तरी खचित असला पाहिजे. तेलंगणांत व कर्नाटकांत इ० स० २५० च्या सुमारास महाराष्ट्री-प्राकृत वा तत्सम भाषा बोलली जात असावी असें राईसनें[2] प्रसिद्ध केलेल्या शिलालेखांवरून दिसतें. कृष्णस्वामी आयंगार[3] हे या विधानाला पुष्टि देतात व एका अति प्राचीन शिलालेखामुळें[4] त्याला निश्चिति येते. या ८०० हून अधिक वर्षांच्या संबंधामुळें खालील परिणाम यादव-मराठीवर द्राविडीचे उच्चारदृष्ट्या झाले आहेत.

(१) **य्–व् या अर्धस्वरांचें बाहुल्यः**—अपभ्रंश स्वरांच्या जागीं यादव-मराठींत बरेच वेळां 'य्–व्' हे अनुक्रमें तालव्य व ओष्ठ्य अर्धस्वर येतात. जसे—

सं० दानप्रसाद

> अप० पसाअ (णायकुमारचरिउ २–६–१०)

> म० दायपसाय (धवळे पू०४, ज्ञा० १८–१७७२)

---

१ चिं० वि० वैद्य: "द्रविड देशांतील आर्यांचा प्रसार" भा० इ० सं० मं०, त्रैमासिक, व्हॉ० १

२ एपिग्राफिआ कर्नाटिका, व्हॉ० ७, पान ६

३ 'Beginning of the History of South India.'

४ Jagayyapeth Stupa: Ind. Antiquary Vol. 11

तसेंच, सं० सुभग > अप० सुहअ (णायकुमार ३-५-१०)
> म० सुहाव (ऋद्धिपूर २०५)

अशींच सं० तत् > म० त्यें, सं० एक > म० येक हीं सर्वनामांचीं उदाहरणें प्राचीन मराठींत आहेत. भूतकर्मणि कृदन्तें पहा— सं० विद्ध, कृत, > म० वेधियले, करियेली. ही 'य' श्रुति व 'व' श्रुति द्राविडीद्वाराच आली. द्राविडीच्या संसर्गानें ती अपभ्रंशांतसुद्धां दिसते. द्राविडी भाषांत मध्यस्वराच्या जागीं 'य्-व्' सहज येतात. उदा०[1] वर - एल्लइ = वरवेल्लइ
पुलि - इल = पुळियिल

हीच प्रक्रिया अपभ्रंश व प्राचीन मराठी यांनीं उचलली.

(२) मराठीनें **मूर्धन्य व्यंजनें** द्राविडींतून घेतलीं कीं काय यासंबंधीं आजवर बरीच चर्चा झाली आहे. डॉ० काल्डवेलच्या मतें इंडोआर्यनमध्यें हीं मूळचीं नव्हतीं. हें विधान कांहीं प्रमाणांत एका 'ळ' पुरतें तेवढें खरें आहे. परंतु बाकीचे 'ट, ठ, ड, ढ, ण' हे वर्ण प्राचीन इंडो-आर्यनमध्यें मूर्धन्य म्हणूनच होते.[2] 'ळ' मात्र द्राविडीपासूनच येणें संभवनीय आहे हें मीं वर्णप्रक्रियेच्या प्रकरणांत दाखविलें आहे. वैदिक ळ[3] हीमू ळ 'ड' किंवा 'ढ'ची प्रक्रिया होय, व त्याचा येथें अर्थात् अगदीं संबंध नाहीं. मराठी 'ळ' द्राविडी व स्कायदियन[4] भाषांपासून आलेला दिसतो.

---

१ Dr. Caldwell : Dravidian Grammar, pp. 70–74

२ "The original Aryan sound was a semi-cerebral (if not a pure one), which has in India only varied in two directions, so as to become the true cerebral and the true dental respectively." Hoernle : Grm. Gawdian Langs. pp. 10

३ Max Muller : 'Sanskrit Grammar' No. 4

४ "Cerebral sounds are peculiar to the Tartar or Finnish class of languages. Really, the Dravidian languages are of Tartar origin; or at least, their phonetic and grammatical affinities are Tartar."
——Mr. Norris's paper on 'The Languages of the Scythian tablets of Behistun.'

(३) **शुद्धतालव्य वर्णांपासून भिन्न असलेले 'चे छे जे झे,' हे दंत्यतालव्य** वर्ण मराठीनें द्राविडीपासून घेतले. देशी शब्दांत आणि कांहीं विशिष्ट अपवाद सोडून (या अपवादांची चर्चा वर्णप्रक्रियेंत आली आहे) तद्भव शब्दांत हे दंत्यतालव्य वर्ण मराठी वापरते. प्रा० दिवेटिया[1] यांच्या मतें शुद्धतालव्यांचा हा अर्धतालव्य उच्चार मोंगलांच्या संपर्कामुळें आला. परंतु प्राकृतांतसुद्धां हा उच्चार होता हें कबूल करून नंतर तो मोंगलांपासून आला हें म्हणण्यांत विसंगति नाहीं काय? प्राकृतकालीं हा दंत्यतालव्य उच्चार होता[2]. वररुचीच्या[3]

" चवर्गस्य स्पष्टता तथोच्चारण: । "

या सूत्रांतील 'स्पष्टता' या शब्दांतील सूचितार्थाबद्दल वाद असला तरी तत्कालीं 'च' वर्गाचे भिन्नभिन्न उच्चार महाराष्ट्री प्राकृत व मागधी प्राकृत यांत होते हें खरें. तात्पर्य हा उच्चार प्राचीन असून ज्या अर्थी तो प्राकृतकालीं अंशमात्रानें कां होईना पण होता, त्या अर्थी तो यावनी नाहीं. तेलुगू भाषेंत 'इ, ई, ए, ऐ' खेरीज करून सर्व स्वरांच्या मागचा 'च' हा 'त्स' सारखा उच्चारला जातो. तुळू बोलींत हाच प्रकार आहे[4]. तेव्हां दन्त्यतालव्य द्राविडींतून प्राकृतद्वारा मराठींत आला हेंच खरें.

यादव-मराठीवर उच्चारांच्या दृष्टीनें द्राविडीचे एवढेच परिणाम झालेले दिसतात. द्राविडी भाषांचे वैयाकरण आणखी अनेक बाबी आधुनिक इंडो-आर्यन भाषांनीं द्राविडीपासून घेतल्या असें प्रतिपादितात. डॉ० काल्डवेलच्या[5] मतें 'क, च, ट, त, प' या कठोर वर्णांच्या जागीं 'ग, ज, ड, द, ब' हे मृदु वर्ण येण्याची प्रक्रिया द्राविडीमुळें होय. तामिळीमधील आणि अर्वाचीन इंडो-आर्यनमधील स्वरभक्ति, यांत कांहीं

१ Divetia : 'Wilson Philological Lectures' Vol. I pp. 349
२ Dr. Grierson : Prakrit Palatals'- J. R. A. S. (1913) pp. 391
३ प्राकृतप्रकाश : ९-५.
४ Dr. Caldwell : Dravidian Grammar, pp. 25
५ Ibid : pp. 21

तरी संबंध असावा असें मत डॉ० चतर्जी[1] यांचें आहे. तामीळमध्यें, 'श्री > तिरु, स्नेह > सिनेगम, मित्र > मित्तिर' अशी प्रक्रिया होते. पण तेवढ्यावरून आर्य भाषांनीं ही लकब द्राविडीपासून उचलली असें नव्हे. खुद्द ऋग्वेदकाळीं विश्लेष होता. तात्पर्य, वरील प्रक्रिया म्हणजे एका भाषेचा दुसरीवर परिणाम नसून तीं केवळ साम्यें आहेत. खरी गोष्ट ही, कीं संयुक्त वर्णांचा विश्लेष होणें हा भाषावृद्धीचा एक स्वभावच आहे व त्यानुसार आर्य आणि द्राविडी भाषांतून तो बरोबरीनेंच रूढ झाला. जसा आर्य भाषांत वैदिक काळीं तो दिसतो तसाच प्राचीन द्राविडीमध्येंहि तो आहे. उदा०

प्राचीन तामीळ 'द्राविड' > दरामिळ > दआमिळ > दामिळ > तामिळ.

तात्पर्य, विश्लेषासारख्या उच्चारप्रक्रिया यादव-मराठींत परंपरेनें व स्वभावानें आल्या; त्याकरितां द्राविडीच्या संसर्गाची आवश्यकता मुळींच नव्हती.[2]

§ ३ प्रत्ययप्रक्रिया

प्रत्ययप्रक्रियेवर परभाषांचे होणारे परिणाम तपासतांना तर अत्यंत दक्षता ठेवली पाहिजे. नामांचीं आणि क्रियापदांचीं रूपें म्हणजे भाषेचा प्राण असून तीं शतकानुशतकें आपलें रंगरूप अविकृत राखतात. उच्चारप्रक्रिये-प्रमाणेंच या प्रांतांतहि बाह्य साम्यांवर विसंबतां कामा नये. त्याबरोबर, परभाषेचा परिणाम व्याकरणदृष्ट्या होणारच नाहीं असेंहि नव्हे. निकट सहवासामुळें आपला जन्मसिद्ध सांगाडा कायम ठेऊनसुद्धां एक भाषा दुसरींतील कांहीं लकबी उचलूं शकते. आजसुद्धां इंग्रजी वळणाची एक विशिष्ट वाक्यपद्धति मराठींत रूढ झाली आहेच कीं नाहीं ? विष्णुशास्त्री चिपळोण-करांसारखा खास मराठी वळणाचा लेखक देखील ती दृष्टिआड करूं शकत नाहीं. तरी समतोल बुद्धीनें व निरीक्षणानें परभाषेचा व्याकरणावरील परिणाम पाहिला पाहिजे.

---

१ Origin and Development of Bengali–Appendix B.

२ J. Bloch's—'Les consonnes intervocaliques en Tamoul'–translated in Indian Antiquary (1919) pp. 191

१ नामविभक्तिः—

(अ) डॉ० काल्डवेलच्या[१] मतें यादव-मराठींतील 'उ' काराचें प्राबल्य हा द्राविडीच्या संपर्काचा परिणाम होय. कानडींत 'उ' किंवा 'वु' शब्दान्तीं येतो. उदा०

का० केळ–वु (थोडें)

का० पल–वु (विपुल)

सं० वाक्–का० वाकु

प्राचीन मराठींत पुल्लींगी नामाच्या एकवचनीं प्रथमेलाच केवळ नव्हे, तर क्वचित् निपातांना, कृदन्तांना व सप्तमीला देखील 'उ' कार लागे. (जसें, पैलु, निरंतरू, मारुनु, पाणियांतु, वगैरे) परंतु, हीं साधीं साम्याभासाचीं उदाहरणें होत. प्रथमेचें 'उ' कारान्त रूप परंपरेनेंच सिद्ध होतें. अर्थात्, काल्डवेलचें म्हणणें सर्वथा भ्रांत आहे.

(आ) शब्दयोगी अव्ययांनीं विभक्तिरूपें साधण्याची यादव-मराठीची पद्धति काल्डवेलच्या[२] मतें मूळची द्राविडी होय. प्रा० जागिरदारांच्या[३] मतेंहि मराठींतील सामासिक विभक्तीवर द्राविडीचा व विशेषतः कानडीचा परिणाम झालेला आहे. "सहितें, वाचूनि, पासूनि, वरि, सवें, वीण हीं" ज्ञानेश्वरींतील शब्दयोगी अव्ययें त्यांच्या मतें जरी संस्कृतोद्भव असलीं, तरी तीं वापरण्याची क्रिया मात्र कानडी आहे. सामासिक विभक्तिरूपांकडे कल असणें हा प्रत्येक भाषेचा स्वभाव आहे, एवढेंच नव्हे तर विकासाची एक दिशा आहे. अतएव प्रा० जागिरदारांचें विधान एकांगी वाटतें. प्राचीन इंडोआर्यनचें प्रत्ययी स्वरूप विस्कळित होत होत वर्तमान देशी भाषांत तें सामासिक होणें, म्हणजेच प्रत्ययांच्या ऐवजीं शब्दयोगी वापरांत येणें, हें भाषाशास्त्राला धरूनच आहे. हा बदल भाषेच्या हाडामासांत खिळलेला,

---

१ Comp. Grammar of Dravidian Languages, pp. 17–18

२ Ibid. pp. 59 (Introduction)

३ 'Kanerese Influence on old Marathi'
——Annals of B. O. R. I. Vol. XI part 4

अंतस्थ आहे, बाह्यतः होणारा नव्हे. एक बाब मात्र विचारार्ह आहे. अर्वाचीन इंडो-युरोपीयन भाषांनीं शब्दयोगी हीं नामांच्या पूर्वी लावण्याची पद्धति उचलली असतां वर्तमान इंडो-आर्यन भाषा मात्र तीं नामांच्या पुढेंच ठेवितात[१]. उदाहरणार्थः—

" तैं नित्ययाग**सहितें** । सृजिलीं भूतें समस्तें ।" ज्ञा० ३।८६

" स्नेहा**लागि** माये । म्हणिपे तें कीरु होये ।" ज्ञा० २।४२

" मनोरथा**पसि** निद्रा कीजे ।" स्मृति० ३३

इंडो-युरोपीयन भाषांच्या उलट मराठीनें ही 'उत्तरपद' शब्दयोगी-साधित विभक्ति द्राविडीपासूनच घेतली काय ? परंतु हाच स्वभाव सर्व अर्वाचीन आर्य भाषांचा असल्यामुळें निश्चित मत देतां येत नाहीं.

(इ) **'वरि' हें शब्दयोगी** यादव-मराठींत दोन अर्थांनीं वापरलें जातें—एक नेहमींच्या 'वर' या अर्थीं, व दुसरें 'पर्यंत,' 'तोंवर,' अशा अर्थीं. उदाहरणार्थः—

" नावेकवेऱ्हीं " (= क्षणभर, थोडा वेळपर्यंत) –उद्ध० १८८

" आंगें घेतुसे उफाळा : सिगेवरी " –ऋ० ५१०.

" गांवोवरि एति " (= पर्यंत) –लीळा० ३, पा० ५७.

" हा ठावोवेऱ्ही " –द० ८७

हें 'वरि' कानडी 'वरम' पासून व्युत्पादितां येतें. जसें—

" कावेरियिंदम आ गोदावरि वरम इर्द नाडदाकन्नडदोळ् ".
(= गोदावरी पर्यंत) –नृपतुंग–कविराजमार्ग.

येथील 'वरम'चा अर्थ व उपयोग मराठींतील 'वरि' शीं जुळतो.

२ आख्यातविभक्ति :—

(अ) प्राचीन मराठींत जुन्या कर्मणीला विध्यर्थाचा एक वेगळाच अर्थ प्राप्त झालेला दिसतो. उदाहरणार्थः—

" तोंड अबद्ध तरि **वाचिजाये** : पोथी अबद्ध तरि **फाडिजाये** ।"
–स्मृ० १७२

---

१ Post-positional as against pre-positional declension.

"तंव तेहीं म्हणितलें-**एइजो** जा।"–लीळा० १–४८
या नव्या विध्यर्थाबरोबर जुना साध्या कर्मणीचा अर्थ अर्थात् कायम आहेच. उदाहरणार्थ:—

"सामथयाची अणी : सेवुनि **वोविजे** मुक्तामणि" –उद्ध० २०
"गोसावी ओळखिती तरि **वोळखिजे**।"–लीळा० ३

म्हणजे, यादव-मराठींत परंपरागत कर्मणि रूपांना एक साधा व दुसरा विध्यर्थाचा असे दोन भिन्न अर्थ आहेत. पैकीं पहिला प्राकृत-अपभ्रंशद्वारा 'इज्ज' या कर्मणि प्रत्ययाची प्रक्रिया होऊन आलेला आहे.[१] प्राकृतांत कर्मणीला विध्यर्थाचा अर्थ नव्हता. अपभ्रंश-कालीं तो द्राविडीच्या संसर्गानें प्राप्त झाला. कारण रूप कर्मणि परंतु अर्थ विध्यर्थाचा अशीं उदाहरणें अपभ्रंश काव्यांतून आढळतात. पहा—

"विरइज्जइ", "पाविज्जइ" ३–२–१४
"णासिज्जइ", "संतोषिज्जइ" ३–३–१०
(णायकुमारचरिउ)

प्रो० जागिरदार[२] यांच्या मतें हा कानडीचा परिणाम होय. हळेकन्नड (प्राचीन कानडी) मध्यें सकर्मक क्रियापद अकर्मक समजून वापरणें हा कर्मणि प्रयोगाचा एक प्रकार आहे.[३] उदा० ओडे (सकर्मक) = मोडणें.

"अवम (तो) अदम (तें) **ओडेवम**"। (मोडतो)
परंतु, "अदम (तें) **ओडेदुड**।" (मोडलें जातें)
"कळिदवर्ग–**अळवुदु** अळ्तोडवेरेळवोडम अंतवरिं।"[४]
(= ओरडलें जातें)

येथेंहि 'अळवुदु' हें सकर्मक क्रियापद अकर्मकवत् वापरून कर्मणि साधला आहे. म्हणजे 'उदु' हा एकच प्रत्यय दोहीं ठिकाणीं वापरून प्रथम

---

१ Sir George Grierson : J. R. A. S. (1910) pp. 163
२ Annals of B. O. R. I. Vol XI part 4
३ Dr. Caldwell : Dravidian Grammar, pp. 315
४ 'Adi-puran,' quoted in Kavi-Charite, pp. 30 (Vol. I)
(Ed. R. Narsinhacharya, 1908)

आख्यात व विध्यर्थ सिद्ध होतात. साहजिकच दोहोंत घोंटाळा होतो. ' अळवउदु ' याचा अर्थ ओरडावें हा आहे कीं ओरडलें जातें असा आहे, याचा उलगडा संदर्भाशिवाय होऊं शकत नाहीं. प्राचीन मराठीनें हीच लकब कानडीपासून उचलली.

(आ) हळेकन्नडमध्यें विध्यर्थ्याचें अकरणरूप मूळ धातूच्या तुमन्ताशीं ' बा ' (येणें) या सहाय-धातूचें अकरणरूप जोडून दाखविलें जातें. जसें,

' उच्चारिस बारदु ' (= उच्चारूं नये)

(' उच्चरिस ' हें ' उच्चरिसु ' याचें तुमन्त)

प्राचीन मराठींत हीच रीति आहे—

" तैसी सद्बुद्धि हे थेंकुटि : **म्हणों न ये** । " ज्ञा० २-२३८

म्हणजे ' म्हणों ' हें तुमन्त + ' न ये ' अशा जोडानें विध्यर्थ्याचें अकरणरूप होतें. ' येणें ' या धातूचा हा विशिष्ट उपयोग म्हणजे प्रो० जागिरदारांच्या मतें कानडीचा परिणाम होय.

याखेरीज कानडीच्या ज्ञानेश्वरकालीन मराठीवर परिणाम म्हणून दोन तीन बाबी तरी प्रो० जागिरदार देतात, व हळेकन्नडच्या आणि यादव-मराठीच्या व्याकरणविशेषांची तुलना करून पहिल्यापासून दुसरे निघाले असें प्रतिपादितात. विशेषतः मराठींतील संयुक्त रीति-वर्तमान किंवा लट्चा एक विशिष्ट प्रकार कानडीवरून आला असें प्रो० जागिरदारांचें ठाम मत आहे. वास्तविक तो परंपरागत आहे, शुद्ध आर्य आहे, परभाषेच्या संसर्गानें आलेला नाहीं, हें मीं आख्यातविभक्ति प्रकरणांत दाखविलें आहेच. दोन भाषांतील साम्य वेगळें व त्यांचा एकमेकींवरील परिणाम वेगळा. परंतु ' साम्या ' लाच ' परिणाम ' समजल्यानें डॉ० काल्डवेल व प्रो० जागिरदार यांचीं विधानें नीट पारखून मगच ग्राह्य वा अग्राह्य ठरवावींत.

§ ४ वाक्यरचा, वाक्प्रचार वगैरे

उच्चार व व्याकरण या बाबींसंबंधीं परभाषासंपर्क विशेष नसला तरी वाक्प्रचारांबाबत मात्र तो विपुल आहे. यादव-मराठीनें कानडीपासून उचललेले वाक्यरचनाविशेष व शब्दसिद्धीचे प्रकार पुढें देतों.

(अ) मराठींत 'म्हणौनि' हें रूपदृष्ट्या वास्तविक अव्ययी भूत कृदन्त आहे, परंतु यादवकालीं आणि आतांहि त्याचा उपयोग एक उभयान्वयी निपात असा होतो. असाच उपयोग कानडींत व तामीळमध्यें 'एंदु' व 'एन्रू' या कृदन्तांचा आहे. मराठींत कृदन्तांखेरीज वर सांगितलेला निपातार्थ पहा—

" हाडुवेळु नव्हे **भणौनि** वृक्षा एका तळीं नीजे।" दृ० ११

" **म्हणौनि** कुळें जाति वर्ण। हें आघवेंचि गा अकारण।"

ज्ञा० ९-४५२

'भण्' धातूत्पन्न कृदन्ताचा हा विशिष्ट उपयोग संस्कृतास वा प्राकृतास ठाऊक नाहीं. मात्र, कानडींत 'एन्नु' (= बोलणें) धातूचें 'एंदु' हें भूतकृदन्त असून त्याचा उभयान्वयी निपाताप्रमाणें वापर होतो. उदा०

" सरित्तटवनलतागृहदोळ् सीते बळ्दळ् **एंदु**
विश्रमिसि सुखं ईर्पुदु।"—पंपरामायण, २२२

(= सीता दमली होती आणि म्हणून...विश्रांति घेत होती)

यादव-मराठींत याच कृदन्ताला 'असें' किंवा 'इति' असा दुसरा अर्थ आहे. उदा०

" पुरुषु आपुलें करणीयें **म्हणौनि** प्रवर्तें" (=इति) लीळा० १-२९

कानडींतील एतदर्थी प्रयोग पहा—

" पाताळलंके **एंब** पुरम्।"—पंपरामायण २२३

येथें 'एंब' हें भूत कृदन्त नसून वर्तमान कृदन्त आहे. 'म्हण' धातूच्या वर्तमान कृदन्ताचा असाच प्रयोग अद्यापिहि कर्नाटकस्थ मराठीयांच्या बोलण्यांत येतो. पहा—

" रामा म्हणणारा मुलगा आला होता" (रामा नांवाचा). असा प्रयोग महाराष्ट्रीय कन्नडिग करतांना ऐकूं येतात. तात्पर्य, 'म्हण' धातूचीं वर्तमान व भूत कृदन्तांचीं रूपें भिन्नार्थी वापरण्याची लकब यादव-मराठीनें कानडींतून घेतली.

(आ) कांहींच्या[१] मतें **ध्वन्यनुकारी शब्द** वापरण्याची प्रथा मराठीनें द्राविडी व कोळ भाषांपासून उचलली. हें विधान असत्य आहे. कारण संस्कृत, प्राकृत व अपभ्रंश या तिहींत ध्वन्यनुकारी शब्दयोजना आहे. 'णायकुमारचरिउ' या अपभ्रंश काव्यांतील

"जिगिजिगिजिगंत, ललललंति, धगधगंति"

हे शब्द पहावेत. नादानुकारी शब्द बनविणें हा प्रत्येक भाषेचा धर्म आहे. प्रो० मॅक्स म्युल्लरची 'डिंग-डाँग' उपपत्ति प्रसिद्धच आहे. यादव-मराठीनें नादानुकारित्व द्राविडीपासून घेण्याचें यत्किंचित् कारण नाहीं.

(इ) यादव-मराठींतील पुढील वाक्प्रचार पहा—

"कवाड दाटुनि **घातलें**।" लीळा० १–६६

"चौकीचें कवाड **घातलें**।" स्मृ० २१६

"कवाड घालणें" (= कवाड लावणें) हा वाक्प्रचार म्हणजे कानडीचें शुद्ध भाषांतर होय. कानडींत,

"बागला **हाच्चु**" (= घालणें = लावणें)

"बागला **तगि**" (= काढणें = उघडणें)

अशी लकब आहे. अद्यापिहि, कर्नाटकस्थ मराठीयांच्या तोंडीं 'दार घाल, दार काढ' असा प्रयोग ऐकूं येतो. हें ऋण थेट यादव-कालापासून चालत आलें आहे.

(ई) **साद-शब्द**: —वर्तमान भारतीय आर्य भाषांत साद-शब्द[२] साधण्याची रीत द्राविडीपासून आली आहे. साद-शब्द म्हणजे मूळ शब्दाची किंचित् द्विरुक्ति असून, नवीन बनलेल्या शब्दाचा नाद व अर्थ मूळासारखाच असतो. साद शब्दांतील किंचित् द्विरुक्तीचा सादवर्ण प्रत्येक

---

१ B. C. Muzumdar: 'Study of some Onomatopoeic Desi words'—J. R. A. S. 1905, pp. 555
P. O. Bodding: 'Materials for a Santali Grammar' Vol. I pp. 31

२ Dr. S. K. Chatterji: 'Echo-words'—Origin and Development of Bengali, Appdx. B

भाषेपुरता स्वतंत्र ठरलेला असतो, व त्याचा उपयोग 'वगैरे वगैरे' चा अर्थ ध्वनित करण्याकडे होतो. वर्तमान भाषांतील कांहीं साद-वर्ण पहा—

मराठी	...	बि	:	माणसंबिणसं, आंबेबिंबे, साबूबिबू.
बंगाली	...	ट	:	घोराटोरा
हिंदी	...	उ	:	घोडाउडा
गुजराती	...	बो	:	घोडोबोडो
तामीळ	...	कि	:	नीरुकीरु
कानडी	...	गि	:	कुडिरे गिडिरे, नीरुगिरु

सादशब्द बनविण्याची ही लकब संस्कृत, प्राकृतांत नाहीं. मराठींत ती द्राविडीपासून आली. यादव-मराठींत तर कानडीचा 'गि' हा सादवर्ण वापरून साधलेले दोन सादशब्द मीं टिपले आहेत.[१] ते असे—

"यऱ्हवीं थडिये पडतां : तरि **हाडगुड** नुरतें : मरता।"

लीळा० १-४७

"सभेकडे पाहे तो पडे : तयाचें **हाडगुड** नुरे।" दृ० ९२

"**गीतमातुचां** ठाइं।" स्मृ० ८९

(का० 'मातु'-का० सादशब्द 'मातगीत'-म० गीतमातु) येथें मूळशब्द आणि सादशब्द दोहीं कानडी आहेत. फक्त मराठीनें त्यांची उलटापालट केली आहे. आतां, द्राविडी धर्तीवर बनविलेले इतर शब्द पहा—

"आमतें गोसावीं **लाळले ताळले**"—स्मृ० १७५

"**हळवैली पळवैली**"—लीळा० ३, पा० ३८

"**पाटेफुटे**"—उद्ध० १२२

"**झींगिमिंगि**" – उद्ध० ३४०, ६४४

"सेवटीं नेति भणौनि आपैसी : **गजबजीनिली**।" –शि० ८६

वरील सादशब्दांत सादशब्द साधण्याचें साधन, म्हणजे सादवर्ण, वर्तमान मराठीप्रमाणें एकच नाहीं, तर ते 'त, प, ब, फ, म,' असे विविध आहेत.

---

१ अद्यापिहि कर्नाटकांतील महाराष्ट्रीयांत "खुर्ची-गिर्ची, मराठी-गिराठी, मास्तर-गिस्तर" असे प्रयोग ऐकू येतात.

वर्तमान मराठींत ' त्रि ' वापरण्याची एकविधता आहे तर यादव-मराठींत विविधता आहे. तात्पर्य, कानडीपासून मराठीनें तत्कालीं ही साद-शब्द-सिद्धि नुकतीच घेतली होती, व अनेक वर्णांचे प्रकार यादव-मराठी करून पहात होती. पुढें यांतील ' त्रि ' निश्चित होऊन इतर वर्ण गळले.

§ ५ नंदभाषेंतील शब्द

येथवर द्राविडी भाषांचा परिणाम पाहिला. नंद भाषेंतील कांहीं शब्द तत्कालीन मराठींत उतरले होते. नंदभाषा ही व्यापारी लोकांची एक सांकेतिक भाषा समजली जाते. विसोबा खेचराच्या पुढील अभंगांत नंदभाषेंतील कांहीं शब्दात्मक संकेत उतरले आहेत.[१] वास्तविक हा परभाषेचा परिणाम नव्हे. परंतु विषयपूर्तीकरितां हा अभंग देतों.

" **मुळ** (५) वदनाचा **उदानु** (३) नेत्राचा
अंगुळ (१०) हस्ताचा स्वामी माझा ।
मुगुट जयाचा **केवळया** (१) आगळी काठी
पवित्र तळवटी चरण ज्याचे ।
सेलीते (६) भागली **पोकु** (४) वेडावले
अंगुळ (१०) मागी झाली थकित तथा ।
ढकारा (१०००) वदनाचा आला वर्णावया
जिव्हा चिरलिया न कळे त्यासी ।
सद्भावें शरण **अवारु** (२) जोडोनि
खेचर विसा चरणीं विनटला ॥ "

§ ६ फारसी शब्द

ज्ञानेश्वरांच्या आणि तत्समकालीन लेखकांच्या मराठी भाषेंत फारसी शब्द नाहींत असा सर्वत्र समज आहे, व राजवाडे[२] तर तशी ग्वाही देतात. परंतु यादव-मराठीला फारसीचा संपर्कहि नव्हता हें म्हणणें

---

१ कृ० पां० कुलकर्णी : विविधज्ञानविस्तार (१९२५), अं० १२

२ ज्ञानेश्वरी–प्रस्तावना, पान १०३

अवास्तव आहे. इतिहास आणि यादव-कालीन मराठी भाषा हीं त्याच्याविरुद्ध जातात. उत्तर कोंकणच्या किनाऱ्याशीं अरबांचा व्यापार ७ व्या शतकापासून सुरू होता, आणि साहजिक तत्कालीन कोंकणी प्रांतिक बोलींत कांहीं अरबी शब्द शिरले असले पाहिजेत. या दृष्टीनें इ० स० १३६७ च्या नागांव शिलालेखांतील 'हिजरत, भाई, दार्यु, म्सदे' वगैरे फारसी शब्द विचारणीय आहेत. 'महिकावतीच्या बखरीं'त[1] यादवांचा वंशवृक्ष आला आहे. त्यांत

"१७ रामराजा तुर्काण जालें।"

असें वाक्य येतें. मोंगलांच्या देवगिरीवरील स्वारीचे असेच उल्लेख तत्कालीन महानुभावीय गद्यग्रंथांतून येतात. हा ऐतिहासिक पुरावा झाला. आतां शाब्दिक देतों. यादव-मराठींत खालील फारसी शब्द आढळतातः—

१ पोतडी	(ज्ञा० १४–१७)	फा० पोतेह्
२ निसाण[2]	(ज्ञा० ९–२१६, उद्ध० ४४)	फा० निशान
३ मालकै	(शि० ७२६)	फा० मालिख्
४ पेरोज	(धवळे उत्त० ५)	फा० पेरोज् (मोतीं)
५ तेजी[3]	(शि० ९३७)	फा० ताझी
६ रुका	(स्मृ० ११०)	अर० रुकूआ
७ रुखवत	(ध० पू०)	फा० रुषवत् (=देणगी)
८ सुलतान	(स्मृ० ८३)	फा० सुलतान्
९ तुरुक	(स्मृ० ८५)	फा० तुरुख्

वरील फारसी शब्दच मात्र यादव-मराठींत आले. वर्णांच्या उच्चारांवर व भाषेच्या सांगाड्यावर फारसीचा परिणाम अगदीं नाहीं.

§ ७ ग्रीक शब्द

ग्रीकचा भारतीय आर्य भाषांशीं संबंध संस्कृतापासूनच आला.

१ "बिंबाख्यान किंवा माहिकावतीची बखर"

२ राजवाडे हा शब्द सं० निःसाण (?) पासून व्युत्पादितात.

३ हा शब्द 'अभिलषितार्थचिंतामणी' (इ० स० ११२९) मध्यें येतो.

अलेक्झांडरच्या स्वारीपूर्वीं, (म्हणजे ख्रिस्त शकापूर्वीं ३३७ वर्षें) ग्रीसचें हिंदुस्थानशीं दळणवळण होतें व तें थेट ३ ऱ्या शतकापर्यंत चाललें. साहजिकच संस्कृत, प्राकृत, अपभ्रंशद्वारा कांहीं ग्रीक शब्द यादव-मराठींत शिरलेले दिसतात. ते असे—

१ **सेवैयां[1]—सरवलैया** (स्मृ० ४१)

ग्री० सेमिडालिस > सं० समिता-दा

> प्रा० सिमिद > म० सेवैया

हा शब्द बंगालींत ' सेवो ' आणि हिंदींत ' सिवइ ' या रूपांत आहे.

२ **दाम**— ' म्हातारदाम ' (= पेन्शन) स्मृ० १०७

' **दाम**नियांचे **दाम** करा '-लीळा० १-५८. '**दाम** च्यारि' दृ० ४०

ग्री० ड्राक्मे > सं० द्रम्य > प्रा० दम्म > म० दाम-दमडी

३ **यवन**—ग्री० आयोनिअन > सं० यवन

> प्रा० योन[2]

> म० यवन

वरील शब्द यादव-मराठींत परंपरेनें आले, साक्षात् आले नाहींत.

१ Indian Vermicelli (Grk. " Semidalis ")

२ अशोकाचा शिलालेख

वर्णप्रक्रियेची शब्दसूचि

टीपः—१ वर्णप्रक्रियेच्या भागांत यादव-मराठींतील जे विशेष शब्द उदाहरणांदाखल वापरले, त्यांची सूचि पुढें देत आहें. तींत वर्तमान मराठीहून ज्यांचें स्वरूप भिन्न आहे असे केवळ यादवकालीन शब्दच बव्हंशीं येतील. तत्कालीन, परंतु आजसुद्धां नित्य वापरांत असलेले शब्द अर्थात् या सूचींत नाहींत.

२ उदाहरणांकरितां सर्व महानुभावीय ग्रंथ व नमुन्यादाखल म्हणून ज्ञानेश्वरीचा समग्र नववा अध्याय यांची सूचि पुढें आहे. ज्ञानेश्वरीच्या इतर अध्यायांतीलहि शब्द आहेत, परंतु नवव्यांतील विशेषत्वानें आहेत. जेथें अध्यायाचा आंकडा नाहीं तेथें ९ वा अध्याय समजावा.

३ सूचींतील संक्षेपचिन्हें अशीं :—

उ = उद्धवगीता; ऋ = ऋद्धिपूर–वर्णन; स्मृ = स्मृतिस्थळ; दृ = दृष्टांतपाठ; ली = लीळाचरित्र; शि = शिशुपालवध; व = वच्छहरण; धपू = धवळे पूर्वार्ध; धउ = धवळे उत्तरार्ध; मास्व = मातृकी रुक्मिणी-स्वयंवर; चौं = चौंभा उषाहरण; ज्ञा = ज्ञानेश्वरी; शिला = शिलालेख; ता = ताम्रपट.

४ शब्दसंदर्भ एक किंवा दोन प्रत्येकीं दिले आहेत. ही तौलनिक व सर्वसंग्राहक सूचि करण्याचा उद्देश नाहीं. केवळ वर्णप्रक्रियेच्या प्रकरणाला आधार व संदर्भ म्हणूनच ती आहे.

अ

मराठी आख्यानक कविता

संपादक—प्रा. प्र. वा. बापट, एम्. ए., बी. टी.

प्राचीन कवितेंत, आख्यानक कवितेचा निदान एक तरी काव्य-प्रकार कलादृष्टीनें चांगला जोपासिला जाऊन पुष्कळच विकसितरूप पावला होता, इकडे आधुनिक कवितेच्या रसज्ञांचें लक्ष वेधावें व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांस प्राचीन मराठी आख्यानक कवितेची ओळख व्हावी म्हणून हें पुस्तक रचण्यांत आलें आहे. प्रस्तावनेदाखल मराठी आख्यानक कवितेच्या 'तंत्र व विकासा' वर सुंदर व विवेचक निबंध देण्यांत आला आहे.

नवीन आकार, पृष्ठें १५२, किंमत १। रुपया

★

पंजाबांतील नामदेव

लेखक—शंकर पुरुषोत्तम जोशी

सुप्रसिद्ध 'साधु नामदेव' यांच्या चरित्रावर अगदीं नवा प्रकाश या ग्रंथानें पाडला आहे. या महाराष्ट्रीय सत्पुरुषाची सर्व हिंदुस्थानभर केवढी छाप बसली होती हें या ग्रंथावरून दिसून येतें. प्रा. प्र. वा. बापट, एम्. ए., बी. टी. यांची मार्मिक प्रस्तावना पुस्तकाला जोडली आहे.

पृष्ठें १६६, किंमत १२ आणे

के शव भि का जी ढ व ळे : श्रीसमर्थ—सदन, गिरगांव, मुंबई